

महात्मा गांधी
आदिपर्व

लेखक : प्यारेलाल

अनुवाद : ब्रिजमोहन हेडा

महात्मा गांधी

आदिपर्व

खंड २ रा

लेखक

प्यारेलाल

अनुवादक

ब्रिजमोहन हेडा

प्रथमावृत्ती :

१५ ऑगस्ट २००४, (स्वातंत्रदिवस)

ISBN No.: 81-901982-1-1

प्रकाशक:

पराग एजन्सीज्, अकोला

अनुवादकाचे निवेदन

'आदिपर्व'चा हा दुसरा खंड वाचकांच्या सेवेशी सादर करताना आनंद होत आहे. मुळात 'आदिपर्व' या ग्रंथाची रचना एकाच खंडात करण्यात आली होती. परंतु तो ग्रंथ अदाजे १,१०० पृष्ठांचा झाला असता व त्यामुळे तो हाताळणे कठीण गेले असते असे जाणवल्यामुळे 'अर्ली फेज' या ग्रंथाची दोन खंडात विभागणी केली.

'अर्ली फेज'मधील 'गांधीजीज अर्लिएस्ट प्लेंट' हे परिशिष्ट (परिशिष्ट एच) या अनुवादातून वगळले आहे. ते परिशिष्ट देण्यामागील लेखकाचा हेतू गांधीजींची शैली दाखवण्याचा होता. परंतु मराठीत अनुवाद केल्यामुळे गांधीजींच्या मूळ शैलीचा वाचकांना अनुभव येणार नाही असे जाणवल्यामुळे ते परिशिष्ट वगळले आहे.

'अखेरचं पर्व' आणि 'आदिपर्व' या दोन्ही ग्रंथांतील सूची वगळली आहे. सूची बरीच लांब होती व पृष्ठसंख्या वाढल्यामुळे किंमत वाढायच्या भीतीमुळे ती या ग्रंथांमधून वगळली होती. परंतु अखेरचं पर्वच्या वाचकांनी सूचीची आवश्यकता आहे असं कळवल्यामुळे, या पुढील खंडांच्या अनुवादाचे काम पूर्ण झाले की सूचीचा एक वेगळा खंड काढायचा विचार आहे. सूचीची आवश्यकता जाणवणारे वाचकच त्यामुळे तो खंड विकत घेऊ शकतील आणि इतर वाचकांवर विनाकारण या बदलामुळे अतिरिक्त किंमतीचा भूर्दंडही पडणार नाही.

'अखेरचं पर्व'प्रमाणेच वाचक याही खंडाच्या अनुवादाचं स्वागत करतील असा विश्वास बाळगतो आणि या कामात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानतो. तऱ्ही न्यून तें पुरतें, अधिक ते सरतें करूनि घेयावे तुमते, विनवतु असे.

ब्रिजमोहन हेडा

प्रकाशक

'महात्मा गांधी – आदिपर्व' या मराठी भाषांतराचे संपूर्ण दोन खंड आज १५ ऑगस्ट २००४ रोजी स्वातंत्र दिनी प्रकाशित करतांना आनंद होत आहे. श्री. प्यारेलालजी यांच्या Mahatma Gandhi - Early Phase या ग्रंथाचे मराठी भाषांतर प्रसिद्ध करण्याची रितसर परवानगी श्री. धीरूभाई मेहता यांनी दिल्यामुळेच हे प्रकाशन कार्य पूर्ण होवू शकले. श्री. ब्रिजमोहनजी हेडा यांनी प्रकाशनाचे काम आमचेवर सोपवून जो विश्वास दाखवला आणि हे साहित्य प्रकाशित व्हावेच या तीव्र ईच्छेमुळेच आजचा हा योग आलेला आहे. या निमित्याने मदतीस येणाऱ्या सर्व स्नेहीजनांचे मी आभार मानते.

धन्यवाद !

१५ ऑगस्ट २००४

सौ. शुभा कुलकर्णी

अनुक्रमणिका

अनुवादकाचे निवेदन

प्रकाशकाचे निवेदन

भाग १ ला: गुदमरलेला आवाज

प्रकरण १ - वेळ आली की माणूसही येतो

प्रकरण २ - जुन्या दिव्यांबद्दल नवीन दिवे

प्रकरण ३ - पाण्यावर काय आहे

प्रकरण ४ - जबर मोल देऊन मिळविलेला विजय

प्रकरण ५ - जिविकेच्या शोधापासून तर ईश्वराच्या शोधापर्यंत

प्रकरण ६ - परत मातृभूमिला

परिशिष्ट, टिपा, शब्दार्थ

परिशिष्ट अ

परिशिष्ट ब

परिशिष्ट क

परिशिष्ट ड

परिशिष्ट इ

परिशिष्ट फ

परिशिष्ट ग

परिशिष्ट ह

परिशिष्ट ई

परिशिष्ट ज

श्री. प्यारेलाल यांची ग्रंथसंपदा

द एपिक फास्ट

स्टेटस ऑफ इंडियन प्रिन्सेस

अ पिलिग्रिमेज फॉर पिस

अ नेशन बिल्डिंग अॅट वर्क

गांधियन टेक्निक्स इन द मॉडर्न वर्ल्ड

महात्मा गांधी - द लास्ट फेज (खंड १ आणि २)

टुवर्ड्स न्यू हराइझन

महात्मा गांधी - द अर्ली फेज

डिस्कव्हरी ऑफ सत्याग्रह

बर्थ ऑफ सत्याग्रह

ब्रिजमोहन यांनी अनुवादित केलेले साहित्य

राजबदल : लेखक बिमल मित्र

महात्मा गांधी - अखेरचं पर्व : लेखक प्यारेलाल (खंड १ ते चार)

महात्मा गांधी - आदिपर्व : लेखक प्यारेलाल (खंड १ ते २)

आगामी

एका गुलामाची आत्मकथा : फ्रेड्रिक डग्लस

भाग १ ला

गुदमरलेला आवाज

प्रकरण १ ले: वेळ आली की माणूस येतो

१

केवळ निवेदनांनी फारसं काही साध्य होऊ शकत नाही हे गांधीजींच्या लक्षात आलं. त्याच्या पाठीशी जोरदार आणि सातत्यानं केलेल्या कृतीचा आधार आवश्यक होता. भारतीयांच्या प्रश्नासंबंधी वसाहत राज्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनाचा त्यांच्यावर काही परिणाम व्हायचा असेल तर भारतीयांच्या प्रश्नासंबंधीच्या गाढ अज्ञानानं आणि पूर्वग्रहांनी गोऱ्यांच्या विचारात निर्माण झालेली विकृती पद्धतशीर प्रयत्नांनी दूर करून दक्षिण आफ्रिकेतील आणि बाहेरील लोकमत त्या प्रश्नामागे गोळा करणं आवश्यक होतं. यासाठी स्थायी स्वरूपाची यंत्रणा उभारणं आवश्यक होतं.

गांधीजींनी नाताळमध्ये मुक्काम करायचं ठरवल्यानंतर त्यांना राहायचा आग्रह करणारांची दादा अब्दुल्ला यांच्या वेस्ट स्ट्रीट येथील जागेत प्राथमिक सभा झाली व त्यानंतर दोन दिवसांनी सर्व लोकांची सभा झाली. दादा अब्दुल्लांच्या जागेतील पहिल्या मजल्यावरील प्रशस्त खोली डरबनमधील प्रमुख भारतीयांनी गच्च भरलेली होती. नावावर बराच घोळ झाला. सखोल विचारविनिमय झाला. गांधीजींना माहीत असलेली एकमेव राजकीय संस्था होती भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. हे नाव परंपरागत इंग्रजांच्या नाकात घाण वास मारते याची गांधीजींना जाणीव होती. परंतु ते नाव तेवढ्यासाठी न स्वीकारणं हा भ्याडपणा झाला असता. त्यातून भारतीयांच्या उच्चतम राजकीय आकांक्षांची अभिव्यक्ती होत होती. भारत मातेच्या काही महान पुत्रांच्या त्यागानं, ज्यांची नावं प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणात कोरली गेलेली होती, काँग्रेसच्या नावाला पावित्र्य लाभलं होतं. ज्या दादाभाई नौरोजींबद्दल गांधीजींच्या मनात नितांत श्रद्धा आणि भक्तीची भावना ते लंडनमध्ये विद्यार्थीदशेत असल्यापासूनच वसत होती त्याच दादाभाई नौरोजीसारख्या पितामहांनी काँग्रेसचं संगोपन केलेलं होतं.

'त्यामुळे मी काँग्रेसचा भक्त होतो व ते नाव लोकप्रिय व्हावं अशी माझी इच्छा होती. मी अननुभवी असल्यामुळे मी नवीन नावाचा शोध घ्यायचा प्रयत्न केला नाही. चूक व्हायचीही मला भीती वाटत होती. त्यामुळे नाताळ इंडियन काँग्रेस हे नाव स्वीकारायचा मी सभेला सल्ला दिला.

[एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ४६]

सभेतील प्रत्येक माणसानं त्या सूचनेचं स्वागत केलं आणि ऑगस्ट २२, १८९४ला औपचारिकपणे नाताळ इंडियन काँग्रेसची अब्दुल्ला हाजी आदम यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली व गांधीजी मानद सचिव व तेवीस प्रमुख भारतीय उपाध्यक्ष झाले. [गांधीजींनी आपल्या आत्मकथेत सांगितलं आहे की नाताळ इंडियन काँग्रेस मे २२ला स्थापन झाली. निश्चितपणेच ही तारीख चुकीची आहे. काँग्रेसच्या पहिल्या अहवालाप्रमाणे काँग्रेसची स्थापना २२ ऑगस्टला झाली होती. आपण हे लक्षात ठेवायला हवं की गांधीजी त्या प्रसंगांची आठवण ३० वर्षांनंतर करत होते व त्यामुळे अशी चूक होणं शक्य आहे.] 'अत्यंत उत्साहात' नियमांना मंजुरी देण्यात आली.

त्यावेळी ठरवण्यात आल्याप्रमाणे काँग्रेसची उद्दिष्ट अशी होती :

(१) वसाहतीत राहणाऱ्या युरोपिअन आणि भारतीय लोकांमध्ये उत्तम सामंजस्य निर्माण करून आणि मैत्रीभावना वाढीस लावणं,

(२) वृत्तपत्रातील लेख, पत्रकं, व्याख्यानं आदींच्या माध्यमातून भारत आणि भारतीयांबद्दलच्या माहितीचा प्रसार करणं,

(३) भारतीयांना, विशेषतः वसाहतीत जन्मलेल्या भारतीयांना, भारतीय इतिहासाचं ज्ञान करून देणं आणि भारतीय विषयांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणं,

(४) भारतीयांना ज्या विविध अडचणी सहन कराव्या लागतात त्यांची दखल घेणं व त्या दूर करण्यासाठी सर्व प्रकारच्या घटनात्मक मार्गाचा अवलंब करणं,

(५) भारतीय बंधुआ मजुरांच्या परिस्थितीची चौकशी करणं व त्यांना जर काही

विशेष अडचणी असतील तर त्या दूर करायचा प्रयत्न करणं,

(६) गरीब आणि गरजवंतांना योग्यप्रकारे मदत करणं, आणि

(७) भारतीयांचा नैतिक, सामाजिक, बौद्धिक आणि राजकीय दर्जा वाढवण्यासाठी शक्य असतील ते सर्व प्रयत्न करणं.

ज्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नमुन्याबरहुकूम ही काँग्रेस स्थापन करण्यात आली होती तिच्याप्रमाणे केवळ वर्षातून एकदा अधिवेशन न भरवता (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापर्यंत अशाप्रकारेच काम करत होती.) ही काँग्रेस वर्षभर काम करणार होती. व सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिच्या सदस्यांचं नियमित रजिस्टर ठेवण्यात येणार होतं.

सदस्यत्वासाठी 'काँग्रेसच्या उद्दिष्टांबद्दल सहानुभूती' आणि दरमहा किमान ५ शिलींग वर्गणी अशी अट ठेवण्यात आली होती. परंतु ज्यांची क्षमता असेल त्यांना जास्त देण्याचं आवाहन करण्यात आलं होतं. समाजातील सर्व प्रमुख लोक काँग्रेसचे सदस्य झाले. ७६ लोकांनी जागेवरच सदस्यत्व घेतलं. अब्दुल्ला शेठ यांनी दरमहा २ पौंड द्यायचं ठरवून पहिला मान पटकावला. अंदाजे पाचसहा लोकांनी जवळपास तेवढेच पैसे द्यायचं कबूल केलं. गांधीजींनी स्वतः दरमहा १ पौंड द्यायचं जाहीर केलं. त्यांच्या पाठोपाठ बऱ्याच लोकांनीही तेवढीच वर्गणी द्यायचं घोषित केलं. दहा लोकांनी दरमहा २० शिलींग आणि २२ लोकांनी दरमहा १० शिलींग देणार म्हणून जाहीर केलं. त्याशिवायही काही देणग्या जाहीर करण्यात आल्या व त्यांचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार करण्यात आला.

पूर्वी कधी नव्हे ती जागृती होऊन पहिल्या महिन्यातच ३०० सदस्यांची नोंदणी झाली. त्यात हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन आदी सर्व जमातींचा व नाताळमधील सर्व प्रांतातील लोकांचा समावेश होता. अगदी सुरुवातीपासूनच भर संख्येवर नव्हता तर दर्जावर होता. काँग्रेसच्या सदस्यपटलावर निष्क्रिय सदस्यांची नावं टाकून तो फुगवायला गांधीजींचा सुरुवातीपासूनच विरोध होता. ज्या सदस्यांकडून सतत तीन महिने सदस्यशुल्क यायचं नाही वा

जे सदस्य योग्य कारण नसताना सतत सहा सभांना अनुपस्थित राहायचे त्यांची नावं लगेच नोंदवहीतून काढून टाकण्यात यायची व अशा रीतीनं काँग्रेसच्या सदस्यपटलावर केवळ सक्रिय सदस्यच राहायचे.

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना प्रथमच सार्वजनिक जीवनाची प्रेरणा झाली. दरमहा सभा होत असत व सर्व हिशेब सादर करण्यात व मान्य करण्यात येत असताना आवश्यकता पडल्यास त्या आठवड्याच्या अंतरानंसुद्धा घेण्यात येत असत. ताबडतोब ज्या प्रश्नांकडे समाजाचं लक्ष वेधणं आवश्यक असायचं त्यांची चर्चा करण्यात यायची, तत्कालीन घडामोडींचा परामर्श घेण्यात यायचा व कामकाजाचा वृत्तांत रीतसर ठेवण्यात यायचा. सदस्यांना प्रश्न विचारण्यासाठी आणि नवीन विषय सुचवून त्यावर चर्चा घडवून आणण्यासाठी प्रेरित करण्यात यायचं. सुरुवातीला चारचौघात उभं राहून बोलायचा त्यांच्यातील कुणालाच अनुभव नसल्यानं तसं करायचा त्यांना संकोच वाटायचा. परंतु एकदा कामकाजाच्या नियमांची आणि पद्धतीची त्यांना माहिती करून देण्यात आल्यानंतर, ज्याची त्यांना आधी माहिती नव्हती, ते मुद्देसूदपणे आणि थोडक्यात आपलं म्हणणं मांडायचे. संकोच जसजसा कमी होत गेला तसतसं 'लोकांसमोर बोलायची ज्यांना सवय नव्हती.... तेही सार्वजनिक विषयासंबंधी विचार करायला आणि बोलायला शिकले.'

नाताळ भारतीय काँग्रेसच्या सभांना भारतीयेतरांनाही उपस्थित राहायची अनुमती होती. काँग्रेसला वंश आणि धर्म यांपलीकडे जाऊन सर्व वर्गाची सहानुभूती मिळवायची इच्छा असल्यामुळे ज्या युरोपिअनांची सहानुभूती असल्याचं माहीत असे त्यांना प्रतीक म्हणून सभेचं निमंत्रण देण्यात येई. काँग्रेसच्या निमंत्रणाला मान देऊन फक्त एक युरोपिअन सभेला उपस्थित राहिला. ते होते श्रीयुत ॲस्क्यू, सॉलिसिटर आणि वेस्ली धर्मगुरू. ते गांधीजींच्या निकट संपर्कात आलेले होते. पुढील वर्षी नाताळ इंडियन काँग्रेस संकटात आली असताना गांधीजींच्या या दूरदृष्टिपूर्ण प्रतिभेचाच तिला फायदा झाला.

बाल्यावस्थेतील कोणत्याही संघटनेप्रमाणे काँग्रेसलाही अनेक अडचणींना तोंड द्यावं लागत होतं. त्यातील मुख्य अडचण होती वर्गणी गोळा करायची. वेळेवर वर्गणी न भरणारांची संख्या बरीच मोठी होती. ९०० पौंड अपेक्षित उत्पन्नापैकी प्रत्यक्षात केवळ ५०० पौंड म्हणजे ५९ टक्केच वर्गणी गोळा व्हायची. अनेक उपाय योजण्यात आले. परंतु कशालाच यश आलं नाही. त्यामुळे मासिक वर्गणीच्या ठिकाणी वार्षिक वर्गणी ठेवायचं व ती वर्षाच्या सुरुवातीलाच गोळा करायचं ठरवण्यात आलं. वार्षिक वर्गणी ३ पौंड ठरवण्यात आली. त्याशिवाय दुसरा एक उपाय योजण्यात आला. तो म्हणजे प्रत्येक व्यापाऱ्यानं आयात केलेल्या प्रत्येक पाकिटावर १ पेन्स स्वैच्छिक लेव्ही काँग्रेसच्या निधीसाठी लावण्याचं ठरवण्यात आलं. मिठाच्या चार पाकिटांना एक पाकीट समजण्यात यायचं. अशा रीतीनं जवळपास १९५ पौंड गोळा झाले. परंतु प्रत्येक व्यापाऱ्यानं हा निधी गोळा केला असता तर हा निधी दहापट झाला असता.

उत्साह वाढवण्यासाठी गांधीजींनी सदस्यत्वासाठी घरोघरी जाऊन प्रचार करायचं आणि जागेवरच मागील थकबाकी गोळा करायचं ठरवलं. अनेक प्रमुख व्यावसायिकांनी यासाठी स्वयंसेवक म्हणून काम केलं व त्यासाठी ते आपल्या खर्चानं सर्वत्र फिरले. त्यात श्रीयुत दाऊद महम्मद, मुसा, हाजी आदम, महम्मद कासिम, जिवा पारसी रुस्तमजी आणि गांधीजींचा समावेश होता. त्यांनी संपूर्ण वसाहतीचा प्रवास रस्त्याच्या खडबडीतपणाचा वा बऱ्यावाईट हवामानाचा वा अडचणींचा विचार न करता केला. [या रस्त्यांनी प्रवास करायच्या आपल्या अनुभवाचं वर्णन करताना सर जॉन रॉबिन्सन यांनी आपल्या आठवणींमध्ये लिहिलं : 'प्रवासाच्या पहिल्या दोन टप्प्यात भट्टीतून निघाल्यासारखी गरम हवा वाहत होती आणि माझ्या गाडीलाचे जोडलेले घोडे उमकोमाच्या भव्य दरीत कोसळले व थेट इक्सोपोपर्यंत पेटत्या वाऱ्याच्या झळांमध्ये मला २० मैल पायी चालत जावं लागलं. दोन रात्रींनंतर दोनचाकी उघडी टपाल गाडी आम्हांला घेऊन सूर्योदयाच्या किती तरी तास आधीच पर्वताच्या गूढ आणि खडबडीत रस्त्यावरून ठेचाळत निघाली. त्या मार्गातील धोक्यांचं काळोखामुळे आणि धुक्यामुळे सुदैवानं आम्हांला दर्शन होत नव्हतं.' - *अ लाईफ टाईम इन साऊथ आफ्रिका*, एल्डर अँड कंपनी, लंडन, (१,९००) पृष्ठ १७०] त्यांना मिळालेला अनुभव संपन्न आणि उत्साहवर्धक होता.

एकदा टोगाट येथील त्यांच्या यजमानाकडून ६ पौंड यायचे होते पण तो ३ पौंडापेक्षा अधिक द्यायला तयार नव्हता. युक्तिवाद वा विनवणीचा काहीच उपयोग होत नव्हता. त्यांनी जर तिथं पराभव पत्करला असता तर इतर ठिकाणच्या वर्गणीवरही त्याचा परिणाम झाला असता. त्यावेळी बरीच रात्र झालेली होती व सर्व जण भुकेले झालेले होते. सोबतच्या कार्यकर्त्यांचा संयम सुटू लागला होता व मोठ्या मुश्किलीनं ते आपला राग आवरू शकत होते. परंतु गांधीजी रात्रभर न चिडता शांत राहिले. सकाळ होता होता यजमानांनी माघार घेतली आणि ६ पौंड दिले. प्रत्येकाला आनंद झाला. कार्यकर्ते आणि यजमान दोघांनाही चांगलाच धडा शिकायला मिळाला.

टोगाट येथील यशाचा परिणाम किनारपट्टीवरील स्टँगर आणि अंतर्भागातील चार्ल्सटाऊनपर्यंत झाला. वर्गणी गोळा करायच्या या मोहिमेनं केवळ द्रव्यच गोळा झालं नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांना उत्तम असं राजकीय प्रशिक्षणही मिळालं. त्यामुळे काँग्रेसच्यामागे लोकमत उभं करायचाही मार्ग सापडला.

काँग्रेसनं दक्षिण आफ्रिकेत आणि विदेशातही जोरदार प्रचार केला. अगदी पहिल्याच वर्षी इंग्लंड आणि भारतातील १,००० मित्रांना पत्रं पाठवण्यात आली आणि पत्रकं वाटण्यात आली. त्यातील 'एक अनावृत पत्र' आणि 'प्रत्येक ब्रिटिशालां विनंती' या दोन पत्रांचा फार दूरवर परिणाम झाला. त्यांच्याकडे आपण नंतर वळणारच आहोत. बंधुआ मजुरात कामाला सुरुवात करण्यात आली आणि अन्यायग्रस्तांना, दडपशाहीला वा छळाला बळी पडणारांना कायदेविषयक मदत पुरवण्यात आली.

दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या लोकांचा वर्णविद्वेष बाजूला ठेवला तरी त्यांचं भारतीयांच्या धर्माचरणाबद्दल, परंपरा आणि वहिवाटींबद्दलचं अज्ञान भयावह होतं. डरबनमधील मुसलमान भारताप्रमाणेच मोहरमचा सण साजरा करत असत. परंतु गोऱ्यांना त्या सणाचं पावित्र्य जाणवण्याऐवजी त्यांना लेंट सणापूर्वीच्या सोहळ्यासारखा तो एक सोहळा वाटायचा.

काही भारतीयांनी 'ढोलक्याचा आवाज केला व त्यामुळे रविवारी चर्चमध्ये जाणारांना त्रास झाला म्हणून १८९५च्या मेमध्ये त्यांना अटक करण्यात आली.' एका युरोपिअन गृहस्थांनी त्या अटकेचं वर्णन असहिष्णुता असं केलं. सॉनी म्हणून सही करणाऱ्या या गृहस्थांनी *नाताळ ॲडव्हरटाईझरच्या* वाचकांना सांगितलं की शहरातील कोणत्याच चर्चमधील लोकांना ढोलक्यांचा तो आवाज क्वचितच ऐकू येऊ शकत होता. ते काहीही असलं तरी कामाच्या वेळात रस्त्यावरील वाहनांचा जेवढा आवाज होतो त्यापेक्षा तो आवाज मोठा नव्हता. 'मी तर सुचवीन की या ट्रामना चर्चमधील प्रार्थनेच्या वेळी रबरी धावा लावाव्या, पण त्या मुख्यत्वेकरून युरोपिअनांच्या उपयोगासाठी व कदाचित चर्चमध्ये जाणारांसाठी धावत असतात.... भारतीयांची मिरवणूक आपल्याला विचित्र वाटू शकते, परंतु आपण स्वतः परिपूर्ण झाल्याशिवाय आणि त्यांना परिपूर्ण व्हायची साधनं दिल्याशिवाय (जे आपण निश्चितच करणार नाही कारण त्यात आपल्याबरोबरची समानता गृहीत धरण्यात आलेली आहे व त्यांच्या रंगामुळे ही गोष्ट अडवायचा आपण पूर्णपणे प्रयत्न करू) तोपर्यंत त्यांना त्यांचा मार्ग आचरू देणं हेच उचित होईल.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जून १२, १८९५]

त्या विरोधाचा युरोपिअनांवर काहीच परिणाम झाला नाही. पुढील वर्षी डरबन येथील २१६ गोऱ्या करदात्यांनी डरबन टाऊन कौंसिलला अर्ज करून आधीचा निर्णय बदलवून 'ढोल बडवणं', 'मूर्खपणाचे विनोद', आणि 'आनंदोत्सव' साजरा करणं यामुळे युरोपिअनांची रात्र भेसूर होते या कारणासाठी बंदी घालायची विनंती केली. नगरपाल क्रॅट यांनी नगरपालिकेत त्या समारंभाचं वर्णन 'दारुड्यांच्या हालचाली, ज्यात फार मोठ्या प्रमाणात गुंडगिरी आणि अश्लील भाषेचा वापर करण्यात येतो अशा प्रकारचा समारंभ' असं केलं. एवढंच नाही तर नाताळ विधानसभेचे सदस्य आणि वकील बॅरिस्टर हेन्री बेल यांना तरी त्या सणाबद्दल चांगली माहिती असायला हवी होती. परंतु त्यांनीही 'अगदी अनावश्यक.... ओंगळ आणि गोंगाटाचं प्रदर्शन' असं त्या सणाचं वर्णन केलं. ते म्हणाले की मी चौकशी केली आणि हा धार्मिक समारोह अगदीच

नाही. हा समारंभ महम्मद वा महम्मदाशी संबंधित असलेल्याच्या मृत्यूबद्दल आहे.... वा तशाच काही प्रकारचा आहे.' [*नाताळ विटनेस*, मे २०, १८९६]

काँग्रेसला ह्या हालचालीची माहिती कळताच तिनं हे प्रकरण हाती घेतलं. परिणामी त्यावर्षी मोहरम साजरी करायला मनाई करण्यात आली नाही परंतु तो समारंभ उमसिदुसी या ठिकाणातच करावा असं बंधन घालण्यात आलं.

मनाला घरं पाडणाऱ्या या गोष्टी वैयक्तिकदृष्ट्या कदाचित महत्त्वाच्या वाटणारही नाहीत परंतु त्यांच्या एकूण परिणामामुळे स्वाभिमानी भारतीयाचं जीवन असह्य व्हायचं. आतापर्यंत ते त्यांनी मूकपणे सहन केलं होतं. आपण अगदीच असहाय आहोत या जाणिवेनं त्यांच्या संवेदना बधिर झाल्या होत्या. आपण उभं राहू शकतो आणि झगडू शकतो एवढ्या जाणिवेनंच त्यांना धीर आला होता.

त्याचबरोबर काँग्रेसनं अंतर्गत सुधारणांच्या कामालाही सुरुवात केली. भारतीयांवर घाणेरडेपणाचा आणि कंजूषपणाचा आरोप करण्यात यायचा. त्यांची घरं म्हणजे केवळ झोपड्याच होत्या. ते जिथं व्यापार करायचे तिथंच झोपायचे. ज्या युरोपिअनांना शारीरसुखाच्या वातावरणाची सवय लागलेली होती ते या कंजूष आणि 'वास मारणाऱ्या तेलकट चिंध्याचिरगुटांवर झोपणाऱ्या' लोकांबरोबर व्यापारात स्पर्धा कसे करू शकणार होते? कोणीही त्यांच्याकडे घृणेनं बोट दाखवू नये म्हणून गांधीजींनी वैयक्तिक आरोग्य, सार्वजनिक आणि वैयक्तिक स्वच्छता, आणि निवासी आणि व्यावसायिक ठिकाणं वेगळी ठेवायची आवश्यकता अशासारख्या विषयांवर व्याख्यानं आणि वादविवादांचं आयोजन केलं व सूचना मागवल्या. सुखवस्तू लोकांना त्यांच्या स्थानाप्रमाणे जीवनमान वाढवायचा सल्ला देण्यात आला. संपूर्ण कामकाज गुजरातीत चालायचं. कोणत्याही समितीच्या सभेत धूम्रपानाची परवानगी नव्हती.

'युरोपिअनांप्रमाणे तुम्ही बग्गी का ठेवू नये?' असं त्यांनी एका प्रमुख भारतीय व्यापाऱ्याला विचारलं.

श्रीमंत परंतु घाबरट व्यापारी आपल्या तुटक्याफुटक्या इंग्रजीत म्हणाला, 'आम्ही युरोपिअनांची नक्कल करायचं साहस कसे काय करू शकतो?' त्याच्या दृष्टीत युरोपिअन मालक होते.

'तुमच्यापैकी प्रत्येकजण मालक आहे. ही जाणीव तुम्ही तुमच्यात बिंबायला शिकलं पाहिजे.' गांधीजींनी त्यांना सांगितलं.

तो लठ्ठ व्यापारी आरामशीरपणे आपल्या बग्गीत बसला आणि काही दिवसातच डरबनच्या फॅशनेबल भागात प्रसिद्ध झाला.

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचं भवितव्य वसाहतीत जन्मलेल्या भारतीय तरुणांवर अवलंबून आहे हे दिसण्याएवढी हुशारी गांधीजींमध्ये याही वेळी होती. त्यांना आपली भूमिका बजावता यावी आणि सार्वजनिक जीवनातील आपला वाटा उचलण्यासाठी त्यांना तयार करावं म्हणून गांधीजींनी नाताळ *इंडियन एज्युकेशनल असोसिएशन* ची स्थापना *नाताळ इंडियन काँग्रेस*च्या अंतर्गत केली. तिचे अध्यक्ष श्रीयुत पॉल झाले आणि ते स्वतः त्या संस्थेचे चिटणीस झाले. एखाद्या वादविवादाच्या संस्थेसारख्या संस्थेत तिचं परिवर्तन झालं. त्या संस्थेला एक लहानसं ग्रंथालय आणि वाचन कक्ष जोडण्यात आला होता. सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करण्यासाठी सदस्यांना नाममात्र शुल्कावर ती जागा मिळू शकायची. तिथं ते वृत्तपत्रं वाचू शकायचे, वादविवाद घडवून आणू शकायचे तसंच आपल्या गाऱ्हाण्यांची चर्चा करू शकायचे.

मातृभूमीबद्दलच्या प्रेमाची भावना आणि आपल्या देशाचा इतिहास, संस्कृती व संपन्न आध्यात्मिक परंपरा यांचा परिचय करून घ्यायची इच्छा माजी बंधुआ मजुरांच्या मुलांत निर्माण करण्यात संस्थेला यश आलं. त्याचबरोबर मुक्त भारतीय त्यांना आपलेच बांधव मानतात ही भावनाही त्यांच्यात रुजवायचा आणि मुक्त भारतीयांच्या अंतःकरणात त्यांच्याबद्दलच्या आदराची आणि जिव्हाळ्याची भावना चेतवायचा संस्थेनं प्रयत्न केला. एका सामान्य उद्दिष्टानं

आणि परस्परांतील आणि भारतासंबंधीच्या ऐक्याच्या भावनेनं लवकरच हे सर्व विविध घटक एकत्रित आले व जोमदारपणे काम करू लागले.

नाताळ इंडियन काँग्रेसच्या संघटनेवर आणि कामकाजावर गांधीजींच्या नेतृत्वाचा आणि कार्यपद्धतीच्या काही क्रांतिकारक वैशिष्ट्यांचा ठसा उमटला. ही वैशिष्ट्ये नंतर त्यांच्या नावाशी जुळली. सार्वजनिक कार्याचा खर्च त्या कार्यातूनच निघाला पाहिजे असं त्यांचं मत होतं. जर तसं होत नसेल तर त्या कार्याच्या संकल्पनेत काही दोष आहे वा ते कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांत काही उणिवा आहेत असं म्हणावं लागेल व तशा अवस्थेत एक तर त्या कार्यात आमूलाग्र परिवर्तन करायला पाहिजे वा ते कार्य बंद करायला पाहिजे असं गांधीजींचं मत होत. कोणतंही सार्वजनिक कार्य उधारीच्या पैशावर करायची त्यांना घृणा होती. गांधीजींचा कालावधी संपेपर्यंत नाताळ इंडियन काँग्रेस कधीही कर्जात नव्हती असं ते अभिमानानं म्हणू शकले.

त्याचप्रमाणे कुणाजवळही 'आवश्यकतेपेक्षा अधिक पैसा असण्याच्या ते विरोधात' होते. काही दिवसांनंतर काँग्रेसच्या संपन्नतेत भर पडत असल्याचं त्यांना आढळलं तेव्हा गांधीजींच्या सूचनेनुसार काँग्रेसनं १०८० पौंडाची मालमत्ता सतत उत्पन्न व्हावं म्हणून विकत घेतली. २०० पौंड करमूल्य असलेली ती मालमत्ता दरमहा १० पौंड भाडं मिळवून द्यायची. ते काँग्रेसच्या दैनंदिन खर्चासाठी पुरेसं असायचं. गांधीजींसाठी खेदाची गोष्ट ही होती की त्यामुळे कटकटी आणि भांडणांना सुरुवात झाली व काँग्रेसच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होतो की काय असं वाटायला लावणारी एक वेळ आली. गरज पडेल त्याप्रमाणे निधी गोळा करायचा असतो व तो गोळा करून ठेवण्यासाठी नसतो हा धडा त्यातून गांधीजी शिकले. ज्या संस्थेचं उद्दिष्ट सत्ता नसून लोकशाहीच्या आदर्शाप्रत जाण्यासाठी जनतेची शुद्ध सेवा करणं असतं त्या संस्थेसाठी फार जास्त पैसा वा निश्चित उत्पन्न हितावह नसतं.

सार्वजनिक संस्था म्हणजे लोकांच्या पाठिंब्यानं आणि पैशानं चालणारी संस्था. अशा प्रकारच्या संस्थेला लोकमताचा पाठिंबा राहत नाही तेव्हा ती अस्तित्वात राहायचा आपला

अधिकार गमावते. स्थायी निधीवर चालणाऱ्या संस्था या बहुधा लोकमताकडे दुर्लक्ष करताना आढळतात व अनेकदा त्या जनहितविरोधी कामासाठी जबाबदार असल्याचं दिसून येतं. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स* विथ ट्रुथ, पृष्ठ १९८]

पैशाचा उपयोग करताना काटेकोर काळजी घेण्यात आली. त्यांनी काही काळानंतर आपल्या आत्मकथेत लिहिलं, 'अशा प्रकारची काटकसर सार्वजनिक संस्थेसाठी अतिशय आवश्यक असते आणि अशाप्रकारची काळजी अनेकदा घेण्यात येतेच असं नाही हेही माझ्या लक्षात आलेलं आहे. त्यामुळे या लहान परंतु फोफावू पाहणाऱ्या संघटनेच्या बाबतीत सुरुवातीपासूनच ही काळजी घेणं मला आवश्यक वाटलं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १५१]

काटकसर आणि स्वावलंबनाचा आदर्श पुढे ठेवण्यासाठी त्यांनी पावतीपुस्तकं, परिपत्रकं, अहवाल एवढंच नाही तर सभांच्या सूचना इत्यादी आपल्या हातानं लिहून काढल्यानंतर चक्रमुद्रित करून घेतल्या. रद्दी कागदाचा एक तुकडाही फेकण्यात येत नसे. त्याची कोरी बाजू कच्च्या लेखनासाठी वापरण्यात येत असे. दोन्ही बाजू भरल्यानंतर ते ते कागद शिवायचे. अशाप्रकारच्या शिवलेल्या वह्यात ते वृत्तपत्रातील कात्रणं चिकटवायचे. अशाप्रकारे तयार केलेल्या वृत्तांताचे त्यांनी तेरा खंड तयार केले.

खर्च करण्यात आलेल्या प्रत्येक पेनीचा हिशेब ठेवण्यात यायचा. येणाऱ्या प्रत्येक पेनीची पावती देण्यात यायची. देणगीदारांनी जरी मागणी केली नाही तरी पावती दिली जायचीच. किरकोळ खर्चाला त्यांच्या हिशेबात स्थान नव्हतं. नाताळ इंडियन काँग्रेसच्या वार्षिक अहवालात ६ पेन्सच्या फरकाचं, ज्याला इतर कोणत्याही संघटनेत उपेक्षणीय समजण्यात आलं असतं, स्पष्टीकरण असं देण्यात आलं आहे :

अशा रीतीनं मुद्रित प्रतीशी तुलना करता आम्हांला ६ पेन्सचा हिशेबात फरक आढळून येतो..... असं घडायचं कारण एका सदस्यानं एकदा अडीच शिलींग आणि एकदा तीन शिलींग

दिले. हे तीन शिलींग यादीत कदाचित बरोबर नोंदवण्यात आले नसावे. [नाताळ इंडियन काँग्रेसचा पहिला अहवाल]

'काळजीपूर्वक हिशेब ठेवणं ही प्रत्येक संघटनेसाठी अपरिहार्यता आहे' असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी लिहिलं आहे की 'नीट हिशेब ठेवल्याशिवाय संस्था बदनामीच्या भोवऱ्यात सापडते व शुद्ध स्वरूपात सत्य टिकवता येऊ शकत नाही.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १५१]

काँग्रेसचे सदस्य शिस्तीच्या बाबतीत खेद वाटावा एवढे ढिले होते. त्यात नियमितता आणण्यासाठी त्यांनी दंडाची पद्धत सुरू केली. उशीर करणाराला प्रत्येक चुकीसाठी ५ शिलींग दंड द्यावा लागायचा. ही पद्धत बंद पडायच्या आधी अनेक सदस्यांकडून दंड गोळा करण्यात आला.

'अतिशयोक्ती करायची सवय' तोडायला आणि आपल्या अंतर्मनाचा शोध घ्यायला शिकवण्यासाठी त्यांनी याहूनही अधिक मेहनत घेतली होती.

आपल्या स्वतःच्या उणिवांकडे लक्ष वेधण्यासाठी सतत प्रयत्न करण्यात येत असत. युरोपिअनांच्या युक्तिवादात जे काही सत्य असेल ते मान्य करण्यात येत असे. युरोपिअनांबरोबर समता आणि स्वाभिमानाच्या भावनेनं सहकार्य करायच्या प्रत्येक संधीचं स्वागत करण्यात येत असे. [एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ४८]

आपल्या नंतरच्या अहिंसक संघर्षात या लहानशा गोष्टींच्या महत्त्वाचं स्पष्टीकरण देत गांधीजींनी लिहिलं, 'मी जाणीवपूर्वक हे सर्व सविस्तर सांगत आहे कारण ते कळल्याशिवाय सत्याग्रह एकाएकी कसा अस्तित्वात आला आणि भारतीय लोकांनी स्वाभाविकपणे त्याची तयारी करायला कशी सुरुवात केली हे वाचकांना कळणार नाही.' [एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका*, पृष्ठ ४७]

लहान आणि मोठ्याची ही काय खिचडी आहे, प्रमाणाचं काही भान आहे की नाही असं कदाचित उतावळ्या वाचकाला विचारायचा मोह होईल. असं करणं हे अहिंसा कशी काम करते व तिचं सामर्थ्य कसं वाढतं याचं ज्ञान नसणाऱ्या वाचकाच्या अज्ञानाला बळी पडणं होईल.

गांधीजींच्या कामाचा आढावा घेताना आपण हे लक्षात ठेवायला हवं की ते बंधुआ आणि माजी बंधुआ मजुरांच्या अगदी तळाहून तळातल्या वर्गात काम करत होते. स्वार्थीपणाच्या हावेतून आजपर्यंत शोधण्यात आलेल्या मजूर व्यवस्थेतील सर्वात अतिशय निर्दय, मानहानिकारक अशी ही व्यवस्था होती व ते मजूर त्या व्यवस्थेखाली चिरडले जात होते. अशा प्रकारच्या समूहात दडलेल्या या सूक्ष्म शक्तीला जागृत करून व तिचा शक्य तो उत्तम उपयोग करण्यासाठी आपल्या सर्व शक्तीनिशी त्यांचं जीवन घडवणाऱ्या साध्या आणि घरगुती गोष्टींकडे त्यांना लक्ष देणंच आवश्यक होतं. त्यासाठी जिच्यावर बाह्य परिस्थितीचा परिणाम होणार नाही अशा पराकाष्ठेच्या सहनशीलतेची, श्रद्धेची, न डगमगणाऱ्या निदिध्यासाची आणि जीवनातील लहानात लहान गोष्टही निर्दोषतेनं करायची आवश्यकता होती.

भारतीय समाज चेतनाहीन असंघटित समूह होता. पहिले बारा महिने संपायच्या आतच त्याच्या हृदयाचं स्पंदन नव्या जोमानं सुरू झालेलं होतं. डरबनशिवाय काँग्रेसच्या शाखा पिटरमारिट्झबर्ग, हॉविक, इसिपिंगो, चार्ल्सटाऊन, उमसिंगा, पाइनटाऊन, स्टँगर, इस्टकोर्ट, टोगाट आणि व्हेरुलम या १० ठिकाणी स्थापन करण्यात आल्या होत्या. सदस्यसंख्या २२८पर्यंत पोहोचली होती. संस्थेची वार्षिक वर्गणी ९०० पौंड व्हायला हवी होती परंतु त्यातील ५३५ पौंडच वसूल झाले होते. देणग्यांसहित एकूण उत्पन्न ६१६ पौंड झालं होतं.

एकोणिसाव्या शतकातील शेवटच्या दशकातील गोऱ्यांसाठीही ही फार मोठी उपलब्धी झाली असती. परंतु आहे त्यातच समाधान मानणारा गांधीजींचा स्वभाव नव्हता. काँग्रेसच्या पहिल्या वार्षिक अहवालात काँग्रेसला २,००० पौंडाच्या भक्कम पायावर उभी करायचं आवाहन

करण्यात आलं होतं. काही आठवड्यांनंतर ही रक्कम दुप्पट करायचं जेव्हा आवाहन करण्यात आलं तेव्हा नाताळ संसदेच्या कबुतरखान्यातही फडफड सुरू झाली.

ट्रान्सवालमध्ये स्वतःची डिफेन्स ऑफ इंडिया लीग होती. नाताळ इंडियन काँग्रेससारखीच ती संघटना होती. तसंच केपटाऊनमध्येही वेगळी संघटना होती. त्यांच्या घटनांत नाममात्र अंतर होतं व कमीअधिक प्रमाणात त्या एकाच दिशेनं काम करत होत्या.

२

काँग्रेसच्या उद्घाटनाच्या एका पंधरवड्यानंतर गांधीजींनी नाताळ सर्वोच्च न्यायालयाकडे वकिलीची सनद मिळावी म्हणून अर्ज केला. अशा प्रकारचे अर्ज वकीललोक सामान्यपणे कोणतंही शुल्क न घेता सादर करत असत. दादा अब्दुल्ला अँड कंपनीचे कायदेविषयक सल्लागार असलेले महाधिवक्ता हॅरी एस्कॉम्ब यांच्याकडे यासंबंधी विचारणा करण्यात आली असता त्यांनी त्यासाठी आनंदानं संमती दिली. माजी महाधिवक्ता श्रीयुत मॉरकॉम यांनी त्याला पाठिंबा दिला. परंतु तो अर्ज न्यायालयाला सादर करायच्या ऐन दिवशी नाताळच्या लॉ सोसायटीनं त्याला विरोध केला. वकिलाला सनद देण्यासंबंधीचे नियम जेव्हा दाखवण्यात आले तेव्हा ते म्हणाले की हे नियम तयार करताना काळा माणूस यासाठी अर्ज करील अशी कल्पना करण्यात आलेली नव्हती.

नाताळच्या न्यायमंडळाबद्दल फार आदरानं बोलण्यात यायचं कारण ते पद भूषवणारे लोक साम्राज्यातील कोणत्याही न्यायालयाच्या तोडीचे होते. उलटपक्षी नाताळच्या वकील मंडळातील हाताच्या बोटावरील मोजता येण्याएवढ्या लोकांचा अपवाद सोडला तर कायदेविषयक ज्ञान, युक्तिवादातील कौशल्य आणि शैक्षणिक गुणवत्ता या दृष्टीनं विचार करता इतर ठिकाणच्या वकिलांपेक्षा तिथल्या वकिलांचा दर्जा फार सामान्य होता. गोऱ्या व्यावसायिक बांधवांच्या तोंडातील घास काढला जायच्या भीतीनं ते स्वतःला लहानशा संस्थेत बंदिस्त करू

पाहत होते. त्या दृष्टीने ते आता वर्णविद्वेषाचा फायदा घेऊ इच्छीत होते. वसाहतीची निर्मिती युरोपिअन उपक्रम आणि युरोपिअन पैशाच्या आधारे झालेली असल्यामुळे सर्व प्रकारच्या उच्च दर्जाच्या व्यवसायात युरोपिअनांचं स्थान असायला हवं असं त्यांचं म्हणणं होतं. परंतु नाताळ महानगरपालिकेची घटना आतापर्यंत तरी वर्णभेद करणारी नसल्यामुळे या युक्तिवादाचा फार आधार घेता येत नव्हता. त्यामुळे मूळ इंग्रजीतील प्रशस्तिपत्र अर्जाला जोडलेलं नाही असा संस्थेनं आक्षेप घेतला.

संस्थेनं ज्या प्रसिद्ध वकिलांना अर्जाला विरोध करण्यासाठी नेमलं होतं ते दादा अब्दुल्ला अँड कंपनीशीही व्यावसायिक दृष्टीनं संबंधित होते. त्यांनी गांधीजींना मूळ प्रशस्तिपत्र का जोडण्यात आलेलं नाही हे समजावून घेण्यासाठी बोलावलं. गांधीजींनी सांगितलं, 'मूळ प्रशस्तिपत्र मुंबई उच्च न्यायालयात नोंदणी करताना देण्यात आलेलं आहे. परंतु माझ्याजवळ रजिस्ट्रारनी दिलेला त्या आशयाचा दाखला आहे व त्यावर श्रीयुत ए. एच. फॅरेल यांची सही आहे. त्याचबरोबर माझ्याजवळ नियमाप्रमाणे आवश्यक असलेले दोन युरोपिअनांनी दिलेले चारित्र्यविषयक दाखलेही आहेत.' गांधीजींना वाटलं होतं की आपल्याच देशातील एखाद्या माणसाकडून घेतलेल्या चारित्र्याच्या दाखल्यापेक्षा वर्णविद्वेषाच्या वातावरणात युरोपिअन माणसानं दिलेल्या दाखल्याचा प्रभाव जास्त पडेल. परंतु संस्थेच्या वकिलानं याच गोष्टीवर आक्षेप घेतला. 'तुमच्या पार्श्वभूमीबद्दल त्यांना काय माहीत आहे? त्यांची तुमची ओळख तरी किती वर्षांची आहे?' त्यांनी विचारलं.

'परंतु इथं तर सर्वच नवीन आहेत. इतकंच नाही तर शेठ अब्दुल्ला यांच्याशीही माझी ओळख इथंच झालेली आहे.' गांधीजी उत्तरले.

'हे खरं आहे. परंतु ते तुमच्या शहरातील आहेत. आणि तुमचे वडील प्रधानमंत्री असल्यामुळे अब्दुल्ला तुमच्या कुटुंबाला नक्कीच ओळखत असतील. तुम्ही जर दादा अब्दुल्ला यांचं प्रतिज्ञापत्र आणलं असतं तर माझा कोणताच आक्षेप उरला नसता.'

गांधीजींना माहीत होतं की जर त्यांनी असंच केलं असतं तर तो दाखला नामंजूर करण्यात आला असता आणि मग एका युरोपिअन गृहस्थाकडून त्यांना दाखला आणायला सांगण्यात आलं असतं. शिवाय त्यांनी जन्म घेतलेल्या कुटुंबाचा त्यांच्या सनदेशी काय संबंध होता. थोड्या प्रयासानं त्यांनी आपला राग आवरला. लॉ सोसायटीला ह्या सर्व चौकशीचा काय अधिकार आहे हे न विचारता गांधीजींनी संस्थेनं मागितल्याप्रमाणे दादा अब्दुल्लांचं प्रतिज्ञापत्र द्यायला मान्यता दिली.

हे सर्व करण्यात आल्यानंतर वकिलांनी आपलं समाधान झाल्याचं सांगितलं. परंतु संस्थेनं इनर टेम्पलच्या मूळ दाखल्याचा दाखल्याचा आग्रह धरला. परंतु त्याबद्दल त्यांनी सर्वोच्च न्यायालयात जेव्हा फार आग्रह धरला तेव्हाच मुख्य न्यायाधीशांनी घोषित केलं की अर्जदारानं शपथ घेतलेली आहे आणि त्यांना व्यवसायासाठी सनद देण्यात येत आहे. श्रीयुत ग्रीन यांनी त्यानंतर आपला मुद्दा पुढं रेटला नाही.

'अर्जदारावर खोट्या शपथेचा खटला चालवण्यात येणार आहे काय?' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर ६, १८९४] न्यायमूर्ती महोदयांनी विचारलं.

न्यायमंडळातील सर वाल्टर रॅग यांनी अगदी तांत्रिक दृष्टीनं पाहिल्यास आक्षेप योग्य असल्याचं सांगितलं. परंतु अर्जदारानं दिलेली माहिती विश्वासार्ह असल्यामुळे अर्ज मान्य करावा असं त्यांचं मत होतं. उलट त्यांचे सहकारी न्यायमूर्ती टर्नबुल म्हणाले की 'प्रशस्तिपत्र दाखल करावे लागतात ही गोष्ट मी प्रथमच ऐकतो आहे.' मुख्य न्यायमूर्तींनी महाराणींच्या वकिलाच्या नियुक्तीच्या वेळी वकिलांकडून आलेल्या पत्राधारेच वकिलाची नियुक्ती करण्यात आल्याचं उदाहरण दिलं आणि 'महाराणी सरकारांनी कोणत्याही प्रशस्तिपत्राशिवाय ते बॅरिस्टर असल्याचं मान्य केलं.' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर ५, १८९४] महाधिवक्त्यांना उत्तर द्यायला न बोलावताच त्यांनी आदेश दिला : 'श्रीयुत गांधी, आता तुम्ही शपथ घेऊ शकता.'

गांधीजी रजिस्ट्रारसमोर शपथ घ्यायला उभे राहिले. परंतु त्यांनी शपथ घेताच मुख्य न्यायाधिशांनी त्यांच्या शिरोवस्त्राकडे त्यांचं लक्ष वेधलं. ते मुंबई उच्च न्यायालयाच्या नियमानुसार होतं. न्यायमूर्ती महोदय म्हणाले, 'श्रीयुत गांधी, आता तुम्ही तुमची पगडी काढायला पाहिजे. नाताळ न्यायालयातील वकील असल्यामुळे न्यायालयात असताना न्यायालयात वकिली करणाऱ्या बॅरिस्टराप्रमाणे पोषाख करायला पाहिजे.'

नाताळमधील न्यायालयात पहिल्यांदाच उपस्थित राहत असताना गांधीजींच्या पगडीबद्दल आक्षेप घेण्यात आला असताना गांधीजींनी तिथून निघून जाणं पसंत केलं होतं. परंतु या वेळी न्यायमूर्तीच्या बोलण्यात तथ्य असल्याचं गांधीजींना जाणवलं. : 'रोममध्ये असताना रोमनांसारखे राहा.' त्यांनी ताबडतोब आपल्या डोक्यातील पगडी काढली आणि न्यायमूर्तीसमोर ते झुकले आणि मग तिथून गेले.

मी तो आदेश झुगारला असता तर त्याचं समर्थन करता आलं नसतं असं नाही....परंतु मला माझ्या मर्यादा माहीत होत्या.... मला माझी शक्ती मोठ्या लढ्यासाठी वाचवून ठेवायची होती. लढवय्या म्हणून माझ्यात असलेलं कौशल्य माझी पगडी वाचवण्यासाठी खर्च करायची माझी इच्छा नव्हती. त्याहून श्रेष्ठ कार्यासाठी ती होती. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १४७]

त्यांच्या अनेक मित्रांना, त्यात दादा अब्दुल्ला यांचाही समावेश होता, त्यांची ही भूमिका पटली नाही. गांधीजींनी त्याना स्पष्ट करत सांगितलं की एखाद्या भारतीय वा इंग्रज न्यायाधीशांनी वा अधिकाऱ्यांनी पगडी काढायचा आदेश दिला असता तर तो आदेश मान्य न करणं योग्य झालं असतं. परंतु नाताळ प्रांतातील न्यायालयाच्या न्यायमूर्तीनी नाताळमध्ये दिलेल्या आदेशाची अवमानना करणं मला उचित वाटलं नाही.

त्यांना ते पटलं नाही. पण प्राप्त परिस्थितीत आपण योग्य निर्णय घेतल्याचं गांधीजींना समाधान होतं. 'वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहणं' हा त्यांच्या सत्य आणि

अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा आधार होता. त्यांनी नंतर लिहिलं होतं की, 'सत्याच्या आग्रहानंच मला तडजोडीतील सौंदर्य पाहायचं शिकवल.' आणि पुन्हा : 'माझ्या नंतरच्या आयुष्यात मला कळलं की ही तयारी सत्याग्रहासाठी आवश्यक आहे. त्यामुळे अनेकदा माझ्या जिवाला धोका निर्माण झाला आहे व मित्रांच्या मैत्रीला मुकायची माझ्यावर वेळ आलेली आहे. परंतु सत्य हे कठोरही असतं आणि हळुवारही असतं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १४८]

नाताळच्या न्यायालयात वकिली व्यवसाय करण्यापासून गांधीजींना अडवायचा संस्थेनं केलेल्या प्रयत्नामुळे संस्थेवर कठोर टीका झाली व तिची टिंगलही करण्यात आली. संस्थेनं घेतलेल्या आक्षेपाचं वर्णन नाताळ मर्क्युरीनं 'वकिलांना न शोभणारा शब्दच्छल' असं केलं. कारण 'श्रीयुत गांधी यांची प्रशस्तिपत्राची प्रत खोटी असेल तर त्याचा पुरावा मिळवणं सोसायटीला सहज शक्य होतं व मग लॉ सोसायटीच्या हाती आयतंच शस्त्र सापडलं असतं' [नाताळ मर्क्युरी, सप्टेंबर ६, १८९४] श्रीयुत गांधी जर युरोपिअन असते तर संस्थेनं इनर टेम्पलच्या मूळ प्रशस्तिपत्राची विचारणा केली असती काय म्हणूनही त्यानं विचारलं.

जोहान्सबर्ग येथील स्टारनं भाष्य करताना लिहिलं : 'इनर टेम्पलचे सदस्य म्हणून ते आपल्या इतर अनेक सहकाऱ्यापेक्षा वकिलीचा व्यवसाय करायला अधिक पात्र आहेत [*स्टार*, सप्टेंबर ५, १८९४] असं ज्या 'काळ्या माणसाबद्दल' म्हणजे संसद सदस्य दादाभाई नौरोजीबद्दल लॉर्ड सॅलिसबरी म्हणायचे त्याच 'काळ्या माणसासारख्या' श्रीयुत गांधींना वसाहतीतील उच्च न्यायालयात वकिलीचा व्यवसाय करण्यापासून अडवायचा 'कटासारखा' जो प्रयत्न संस्थेनं केला तो तिच्या 'आधीच संशयास्पद असलेल्या प्रतिष्ठेला गौरवास्पद स्थानाकडे नेणारा' निश्चितच नाही.' 'साम्राज्याच्या इतर सर्व भागातून' टाकून देण्यात आलेल्या पद्धतीचा स्वीकार करणं या लहानशा वसाहतीला कठीण जाणार आहे अशी स्टारनं सावधगिरीची सूचना दिली.

सर्वाधिक आत्मनिरीक्षण करायला लावणारी टीका केली *नाताळ विटनेसनं.* त्यानं संस्थेला आठवण करून दिली की संस्था आपल्या दर्जानुसार वर्तन करत नसल्यामुळे संस्थेच्या

सदस्यांना वकील म्हणून वा अटर्नी म्हणून शेजारच्या वसाहतीतही व्यवसाय करायचा अधिकार नाही. आणि ग्रिकॉलँड जेव्हा स्वतंत्र राज्य होतं तेव्हा नाताळच्या वकिलांना तिथं केवळ अटर्नी म्हणूनच काम करायचा अधिकार होता. त्यामुळे *नाताळ विटनेसनं* पुढं जाऊन मत दिलं की 'जेव्हा संस्थेच्या वा व्यक्तीच्या दर्जाबद्दल इतरांना खात्री नसते तेव्हा व्यक्तीनं वा संस्थेनं आपल्याकडे इतरांचं लक्ष वेधून घेणं अतिशय धोक्याचं असते.' रंगभेद या गोष्टीच्या मुळाशी होता असं सांगण्यात येतं परंतु खरोखरी पाहता 'याच्या मुळाशी सोन्याची तृष्णा होती.' संस्थेच्या क्षुद्र संकुचितपणासाठी संस्थेवर टीका करत *नाताळ विटनेसनं* संस्थेच्या वर्तनाचं वर्णन 'विक्षिप्तपणाचं आणि घृणास्पद' असं करत लिहिलं :

ऑक्सफर्ड आणि केम्ब्रीजसारखी विद्यापीठं आणि न्यायालयांच्या इन आपल्या प्रतिष्ठेकडे आणि स्वाभिमानाकडे अगदीच न लक्ष देता आपल्या दारातून कुठूनही आलेल्या बुद्धिमत्तेला प्रवेश देतात व त्यांना आपल्याजवळ असलेलं सर्व काही देतात ही अतिशय खेदाची गोष्ट आहे यात काही संशय नाही. किती खेदाची गोष्ट आहे की साम्राज्याच्या संसदेचा सदस्य होण्यासाठी व्यक्तीच्या जन्माचं ठिकाण, त्याचा वर्ण यांचा कोणताच अडथळा मानण्यात येत नाही आणि साम्राज्याच्या राजधानीत आणि हृदयस्थळी असलेल्या एका मतदारसंघानं एका भारतीय बॅरिस्टरला आपलं प्रतिनिधी निवडण्याएवढ्या खालच्या पातळीवर स्वतःला न्यावं? किती दुःखद गोष्ट आहे की दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट संघाच्या खेळाडूंना क्रिकेटच्या मैदानावर कॅम्ब्रीजमधील भारतीय पदवीधराबरोबर सामना करावा लागून काळ्यांच्या संसर्गाला बळी पडावं लागत? हे सर्व तर दुःखद आहेच पण प्रत्येक काळ्या ढगाला ज्याप्रमाणे रुपेरी किनार असते, आणि चूक करायच्या स्वातंत्र्यावर अजूनही बंधनं असल्यामुळे अजूनही पापाच्या काळोखात सापडलेल्या या जगासाठी थोडीशी आशा शिल्लक आहे. 'मी, केवळ मीच, उरलो आहे' ही जुन्या काळातील प्रेषिताची हाक होती, परंतु तिकडून प्रत्युत्तर आलं की इस्राएलमध्ये अजूनही ७,००० असे लोक जिवंत आहेत की ज्यांनी खोट्या ईश्वरासमोर अजून गुडघे टेकवलेले

नाहीत, आणि त्याचप्रमाणे जरी जुनी विद्यापीठं, साम्राज्याची संसद, इंग्लंडमधील मतदारसंघ, न्यायालयाच्या इन आणि वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्था या सर्वांना रंगांधतेची बाधा झालेली असली आणि त्यांनी बौद्धिक समतेच्या खोट्या ईश्वरासमोर गुडघे टेकवले असले तरी नाताळ लॉ सोसायटी अजूनही अशी आहे की जी या खोट्या तत्त्वज्ञानानं प्रभावित झालेली नाही आणि जी कर्मकांडांना आणि पूर्वग्रहांना जिवंत ठेवते आहे. [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर ५, १८९४]

केपच्या वृत्तपत्रांनी लिहिलं की, 'नाताळ सोसायटीनं श्रीयुत गांधींना न्यायालयाबाहेर ठेवायचा प्रयत्न करणं ही श्रीयुत गांधींसाठी सर्वात मोठी जाहिरात होईल. हे खरं आहे की ते उद्या नाताळच्या न्यायालयात न्यायाधीशाच्या पदापर्यंतही पोहोचू शकतात व त्यांच्या देशबांधवांवरील त्यांच्या प्रभावाचे चांगले परिणामही होऊ शकतात. त्यांना संसदेपर्यंत पाठवण्याएवढं सामर्थ्य त्यांच्यात निश्चितच आहे.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर १८, १८९४]

काही दिवसांनंतर गांधीजी प्रथमच आपल्या अशिलाकडून दिवाणी दाव्यात उपनिवासी न्यायाधीश श्रीयुत डिल्लनसमोर उभे राहिले. वादी दादा अब्दुल्ला यांनी गोपी महाराज यांना विकलेल्या मालाची रक्कम आणि उधार दिलेले पैसे परत न केल्यामुळे गोपी महाराजावर २६३ पौंडचा दावा केला होता. त्यांच्या विरोधात मेसर्स फर्मान आणि रॉबिन्सन कंपनीचे श्रीयुत रॉबिन्सन होते. न्यायालयानं खर्चासहित दावा मान्य केला. नाताळ ॲडव्हरटाईझरनं गांधीजींनी आपला पहिला खटला जिंकल्याबद्दल गांधीजींचं अभिनंदन केलं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २०, १८९४]

३

लवकरच गांधीजी नाताळच्या वकील मंडळात प्रस्थापित झाले. तथ्य समजावून घेण्यासाठी आणि खटल्याचा अभ्यास करण्यासाठी ते अतिशय मेहनत करत असत. त्यांच्याबरोबर काम करणारे त्यांना विश्वसनीय वकील समजायचे व न्यायाधीश त्यांच्या कायद्यातील नैपुण्याचा, बौद्धिक क्षमतेचा आणि स्पष्ट निर्णयशक्तीचा आदर करायचे.

१८९५ सालच्या सुरूवातीस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांशी त्यांची कायदेविषयक युक्तिवाद करताना जी झटापट झाली तिला वृत्तपत्रांच्या मथळ्यात स्थान मिळालं होतं. हसनजी दावजी हे गृहस्थ मृत्युपत्र न करता वारले होते. त्यांच्या संपत्तीची मुसलमानांच्या कायद्याप्रमाणे वाटणीची योजना सादर करायला मुख्य न्यायाधिशांनी गांधीजींना सांगितलं. त्याप्रमाणे करण्यात आलं आणि मास्टरनं ती योजना स्वीकारायची शिफारस केली. श्रीयुत टॅथॅम यांनी मास्टरच्या अहवालाला मान्यता द्यायची सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली. सर वाल्टर यांनी विधवेच्या हक्कापुरता अहवाल मान्य केला परंतु जो भाग मृताच्या मुलांना आणि भावांना मिळावा म्हणून गांधीजींनी सुचवलं होतं तो सरळ मास्टरला देण्यात यावा असा आदेश दिला. त्यांचं म्हणणं होतं की भावाला त्याचा वाटा तेव्हाच मिळेल जेव्हा आपण गरीब असल्याचं तो दाखवू शकेल. सन्माननीय न्यायमूर्ती म्हणाले की 'श्रीयुत गांधींना *मुसलमान कायद्याची काहीच माहिती नाही. एखाद्या फ्रेंच माणसाप्रमाणे ते मुसलमान कायद्याविषयी अज्ञानी आहेत. त्यांनी जे काही सांगितलं आहे ते सिद्ध करण्यासाठी त्यांना तुमच्या-आमच्याप्रमाणे कायद्याचा अभ्यास करावा लागेल, त्यांना स्वतःचं असं त्यासंबंधी काहीच ज्ञान नाही.*

गांधीजींना मुसलमान कायद्याच्या वारसा हक्कांसंबंधीच्या आणि झकतसंबंधीच्या (दानसंबंधीच्या) तरतुदींचं चांगलं ज्ञान होतं. श्रीयुत टॅथॅम यांनी प्रतिवाद केला. संपत्तीच्या वाटणीची योजना धर्मगुरू आणि गांधीजी या दोघांकडूनही मागवण्यात आली होती. त्यांनी वसाहतीत मिळू शकणाऱ्या सर्व पुराव्यांचा अभ्यास केला होता. आता ते कुणाला विचारू शकणार होते? श्रीयुत टॅथॅम यांनी विचारलं.

सर वाल्टर रॅग : श्रीयुत गांधी जो भाग मृताच्या भावाला मिळावा म्हणून सांगतात तो मुसलमान कायद्याप्रमाणे गरिबांना मिळायला पाहिजे. श्रीयुत गांधी हिंदू आहेत आणि त्यांना आपल्या धर्माची निश्चितच माहिती आहे, परंतु त्यांना मुसलमान कायद्याची काहीच माहिती नाही.

श्रीयुत टॅथॅम : प्रश्न आहे की आपण श्रीयुत गांधींचा दृष्टिकोन विचारात घ्यावा की धर्मगुरूचा (उलेमा)?

सर वाल्टर रॅग : तुम्ही धर्मगुरूचंच मत विचारात घ्यायला पाहिजे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च २२, १८९५]

त्यामुळे त्या संपत्तीसंबंधीचा अंतिम निर्णय घेता आला नाही आणि *नाताळ ॲडव्हरटाईझरनुसार* 'वकिलांनाच संपूर्ण ऑइस्टर मिळायची शक्यता होती.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च २३, १८९५]

मृताच्या संपत्तीतील नैसर्गिक वारसदारांचा वारसाहक्कासंबंधी कुराणाचा हा जो अर्थ लावण्यात आला होता त्यामुळे मुसलमान लोकांवर दूरगामी महत्त्वाचा परिणाम होणार होता. गांधीजींना ती गोष्ट मुसलमान कायद्याचा विरोध करणारी आहे असं वाटलं व तिला आव्हान देणं आवश्यक असल्याचं गांधीजींना जाणवलं.

सर वाल्टर यांच्या मताचा प्रतिवाद करत गांधीजींनी २३ मार्च १८९५च्या *नाताळ विटनेसमध्ये* लिहिलं की सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय मुसलमान कायद्याच्या चुकीच्या दृष्टिकोनावर आधारित आहे. मुसलमान कायद्याचं ज्ञान केवळ मुसलमानालाच असू शकतं आणि मुसलमानेतरांना ते नसतं हे विधान थोडा जरी विचार केला तरी टिकणार नाही : 'एखादा माणूस इतर काही पात्रता नसताना केवळ मुसलमान आहे म्हणून माझ्याबद्दल निर्णय देऊ लागला असता तर मला फार दुःख झालं असतं. मुसलमानांना अंतःप्रेरणेनं कायद्याचं ज्ञान होतं आणि मुसलमानेतरानं मुसलमान कायद्याबद्दल कधीच मत देऊ नये हा साक्षात्कार माझ्यासाठी नवीन आहे.

हे शक्य आहे की माननीय न्यायमूर्ती महोदय जेव्हा वारसाहक्काबद्दल बोलत होते तेव्हा त्यांच्या मनात बहुधा दानाबद्दलचा (झकत) विचार असावा. 'ही गोष्ट प्रत्येक मुसलमानावर

बंधनकारक आहे.' परंतु निश्चितपणे तो त्यांच्या श्रद्धेचा भाग असला तरी दानाच्या तत्त्वाचा परिणाम वारसाहक्काची वाटणी करताना होत नाही.

मुसलमान जेव्हा दान देतो तेव्हा तो स्वर्गप्राप्ती करत असतो वा स्वतःसाठी स्वर्गात सन्माननीय स्थान मिळवत असतो. परंतु त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीतून शासनानं दिलेल्या दानानं आध्यात्मिक दृष्टीनं त्याचा कोणताच फायदा होऊ शकत नाही कारण ते त्याचं कृत्य नसतं. मुसलमानाच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीवर त्याच्या वारसदारांचा अग्रहक्कच नव्हे तर संपूर्ण अधिकार असतो. [*नाताळ विटनेसला* गांधीजींचं पत्र दिनांक २३ मार्च १८९५, प्रसिद्धी २८ मार्च १८९५]

पवित्र कुराणातील सुरा (प्रकरणं), आणि आयती (कडवे), मुसलमान कायद्यातील वारसाहक्कासंबंधीची कलमं व त्यांच्यावरील प्रख्यात न्यायविदांची मतं उद्धृत करत गांधीजींनी दाखवलं की माननीय न्यायमूर्ती महोदयांनी जी योजना अवैध ठरवली होती ती सर्वार्थानं पवित्र कुराणाच्या नियमानुसार आणि मुसलमान वारसा हक्काच्या कायद्यानुसारच होती.

परंतु अहवाल असं सांगतो की धर्मगुरू आणि माझ्यात मतभेद आहेत. तुम्ही जर मला वगळलं आणि त्या ठिकाणी कायदा हा शब्द ठेवला (कारण कायदा काय आहे तेवढंच मी सांगितलं आहे) तर मी असं म्हणायचं साहस करीन की धर्मगुरू आणि कायदा यांच्यात कधीच अंतर निर्माण होऊ नये, व तसं जर होत असेल तर धर्मगुरू बाजूला सारला जातो, कायदा नाही. परंतु या प्रकरणी धर्मगुरूंच्या आणि माझ्या म्हणण्यात अंतर नाही. कारण श्रीयुत टॅथॅम यांनी मला पाठवलेल्या अहवालात सुचवलेल्या संपत्तीच्या वाटणीला जर धर्मगुरूंचीही मान्यता असेल - ती आहे असं त्यांच्या सल्ला देणाऱ्या पत्रावरून आढळते - तर अर्ध्या भावाच्या गरिबीमुळे त्याला वाटा देण्यात येत आहे असं धर्मगुरू कुठंच म्हणत नाहीत.

तरीही आपल्या म्हणण्याला जोर येण्यासाठी गांधीजींनी पुढं लिहिलं की मी काही मुसलमान सद्गृहस्थांशीही याबाबतीत चर्चा केली. श्रीयुत वाल्टर यांचं म्हणणं होतं की,

त्यांच्याप्रमाणेच कायद्याची माहिती असाण्याची शक्यता असलेले मुसलमानही यामुळे आश्चर्यचकित झाले होते. 'क्षणाचाही विचार करायला वेळ न घेता - कारण ही गोष्ट त्यांच्यासाठी अतिशय साधी आणि स्पष्ट होती - ते म्हणाले, 'मृताच्या संपत्तीतून गरिबांचा कोणताच वाटा नसतो. अर्ध्या भावाला *भाऊ म्हणून* त्याचा वाटा मिळायलाच पाहिजे.'

त्यांनी सर वाल्टर यांना आठवण करून दिली की मुसलमान कायद्यावरील सर्वात चांगल्या पुस्तकाचं संपादन एका मुसलमानेतरानं, मॅक्गॅटन यांनी, केलेलं आहे व बिन्स आणि मॅसन यांनी आपल्या अहवालात या विषयावरील सर्वात सुंदर पुस्तक असं त्याचं वर्णन केलं आहे. लेखाचा शेवट करत त्यांनी लिहिलं :

त्यामुळे देण्यात आलेला निर्णय हा मुसलमान कायद्याच्या, धर्मगुरूच्या आणि मुसलमान सद्गृहस्थांच्या मतांच्या विरोधात आहे असं माझं निश्चित मत आहे. मृतकाच्या नातेवाइकांचा कायदेशीर अधिकार असलेल्या भागाला 'ते गरीब असल्याचं सिद्ध करीपर्यंत' जर टाळे लावण्यात आले तर त्यांचे अतिशय हाल होतील. अशी अट मुसलमान कायद्यानं वा मुसलमानांच्या परंपरांनी कधीच घातलेली नाही. [*नाताळ विटनेसला* गांधीजींचं पत्र दिनांक २३ मार्च १८९५, प्रसिद्धी २८ मार्च १८९५]

या द्वंद्वात नाताळमधील कायदेविषयक तज्ज्ञांचं मत भारतीय बॅरिस्टरकडून होतं व सर वाल्टर यांना अतिशय प्रखर टीकेला तोंड द्यावं लागलं. नाताळ मर्क्युरीमध्ये 'ज्युनियस' यांनी लिहिलं :

असं दिसते की श्रीयुत गांधींवर टीकेची झोड उठवायची जणू काय फॅशनच पडलेली आहे. श्रीयुत गांधी यांना मुसलमान कायद्याविषयी काही कळत नाही, एखाद्या फ्रेंच माणसाप्रमाणे मुसलमान कायद्याविषयी ते अज्ञानात आहेत, त्याबद्दल त्यांना जे काही ज्ञान असेल ते त्यांचं पुस्तकी ज्ञान असेल, व त्यांच्या स्वतःच्या अनुभवानं मिळवलेलं त्यात कोणतंच ज्ञान नाही इत्यादी नुकत्याच घडलेल्या प्रकरणात न्यायमूर्तींनी गर्विष्ठपणानं जे उद्‌गार काढले

त्याबद्दल इतक्या उशिरा का होईना मी माझा दुर्बल निषेध नोंदवायचा प्रयत्न करणार आहे. विद्वान न्यायमूर्तींचं सगळं पुस्तकी ज्ञान काढून टाकण्यात आलं तर ते बौद्धिक आणि कायदेशीर दृष्टीनं नग्न झालेले दिसतील. आणि फ्रेंच माणसाला मुसलमान कायदा का कळू नये? आणि श्रीयुत गांधींना का कळू नये?

आणि विद्वान न्यायाधीशांना तो का कळावा? जे प्रकरण केवळ मुसलमानालाच कळू शकतं असं त्यांचं मत आहे त्या प्रकरणी न्याय द्यायची त्यांच्यात क्षमता कुठून आली? त्यांनी स्वतः मुसलमान कायद्याचं हे ज्ञान कुठून मिळवलं? ते एखाद्या अप्रत्यक्ष स्रोताकडून मिळवलेलं ज्ञान आहे की 'त्यांचं स्वतःचं ज्ञान' आहे? [*नाताळ मर्क्युरी*, एप्रिल १०, १८९५]

ही केवळ सुरुवात होती. त्यांचा नावलौकिक वाढतच होता. नंतर एका नादारीच्या प्रकरणात गांधीजींनी वकिली व्यवसायातील प्रतिद्वंद्वी श्रीयुत टॅथॅम यांच्याविरुद्ध एका मुद्यावर विजय मिळवला तेव्हा श्रीयुत टॅथॅम विनोद करत हसत हसत न्यायालयात म्हणाले : 'गांधी महान.... पुन्हा काळ्यानं गोऱ्यावर विजय मिळवला !' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, फेब्रुवारी २२, १८९५]

४

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या नशिबी दररोज हेटाळणी, छळ आणि गांजणूकच असायची. घराबाहेर पडल्यानंतर एखाद्या गोऱ्या पुंडांकडून आपल्यावर केव्हा हल्ला होईल, पोलीस कशाबद्दल आणि का हटकेल आणि तुरुंगात परवड काढत नेईल वा सर्वसामान्य नागरिकांकडून या ना त्या प्रकारे केव्हा अपमानित व्हावं लागेल हे अगदी प्रतिष्ठित माणसालाही माहीत नसायचं. बहुतेक प्रकरणी कायद्याकडून फार कमी संरक्षण मिळायचं. काही उदाहरणं अशी : १८९५ सालच्या नाताळच्या सणाच्या दिवसात गोऱ्यांच्या एका टोळक्यानं फिल्ड स्ट्रीटवरील दुकानांना आगी लावल्या व त्यामुळे एका ग्राहकाचा डोळा फुटायची वेळ जवळपास आलेली होती. ही दोन्ही प्रकरणं पोलीस अधीक्षकांना कळवण्यात आली. माझ्याकडून शक्य

असेल ते मी करीन असं त्यांनी आश्वासन दिलं. भारतीयांविरुद्ध लोकांचा पूर्वग्रह आणि द्वेष इतका तीव्र होता की उत्कट इच्छा असूनही गरीब बिचारा तो अधिकारी काहीच करू शकला नाही. वर्णद्वेषानं प्रेरित होऊन त्याच्या स्वतःच्या हाताखालील लोकांनीही गुन्हेगारांचा शोध लावण्यासाठी काहीच केलं नाही. एका पोलीस शिपायाकडे अन्यायग्रस्त व्यक्ति तक्रार करायला गेली असता तो शिपाई भारतीयाकडे पाहून हेटाळणीच्या सुरात हसला आणि म्हणाला की गुन्हेगाराला अटक व्हावी असं वाटत असेल तर त्यासाठी आधी न्यायाधीशांकडून अटक करायचा हुकूम आण!

गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाई करणं हे कष्टाचं आणि खर्चाचंही काम होतं. तरीही निकाल काय लागेल ते सांगता येत नसे. अनेकदा गुन्हेगाराला केवळ सूचना देऊन वा ५ शिलींग दंड करून वा एक दिवसाची तुरुंगाची शिक्षा देऊन सोडून देण्यात यायचं. साक्षीदाराच्या कठड्यातून बाहेर पडल्यानंतर तक्रार करणाराच्या मागे लागून ते त्याची टवाळी तर करायचेच पण अनेकदा त्यात धमक्यांचीही भर पडायची व त्याचं जीवन अजूनच कठीण व्हायचं. अशाप्रकारच्या घटनांच्या प्रसिद्धीचा उपयोग केवळ इतरांना तसं करण्यासाठी प्रेरणा मिळण्यापुरताच व्हायचा.

छळ विविध प्रकारची रूपं धारण करायचा. जहाज मालक आणि भारतीय व्यापारी समाजातील एक प्रमुख व्यापारी अब्दुल्ला हाजी आदम हे गांधीजींबरोबर एकदा डरबनपासून तेवीस मैल अंतर असलेल्या क्रांट्झक्लुफ स्टेशनवर जात होते. अब्दुल्ला हाजी आदम जेव्हा उतरले तेव्हा त्यांना हॉटेलमध्ये खोली मिळू शकली नाही. कोणी त्यांना ब्रेड विकायलाही तयार नव्हता. बाकावर झोपण्याशिवाय त्यांच्याजवळ कोणताच पर्याय नव्हता. थकलेल्या आणि भुकेल्या अवस्थेत दक्षिण आफ्रिकेतील कडाक्याच्या थंडीत ते रात्रभर कुडकुडत राहिले.

डरबनमध्ये दुर्भावनेच्या अगदी हलकटपणाच्या स्वरूपाचं दर्शन घडलं. पारसी रुस्तमजी हे व्यापाऱ्यांचे सम्राट होते. लोककल्याणाच्या कामासाठी त्यांचा दानशूरपणा प्रसिद्ध होता.

त्यासाठी त्यांचं नाव केवळ भारतीयांतच घरोघरी घेतलं जायचं असं नाही तर सर्व समाजांत त्यासाठी त्यांची ख्याती होती. कोणत्या तरी आजारासाठी टर्किश पद्धतीच्या आंघोळीची त्यांना शिफारस करण्यात आली होती. त्यासाठी ते सार्वजनिक स्नानगृहात गेले. ते स्नानगृह जरी डरबन महानगरपालिकेच्या मालकीचं होतं व रुस्तमजी महापालिकेचा कर इतर गोऱ्यांप्रमाणेच वेळच्यावेळीच भरत होते तरी त्यांना कोणतीही भीडमुर्वत न ठेवता परत पाठवण्यात आलं.

ज्यांनी त्यांना इथं थांबवून ठेवण्यासाठी काम द्यायचं कबूल केलेलं होतं त्या अशिलांचं कायदेविषयक काम करत असतानाच विविध प्रकारच्या अन्यायांना बळी पडणाऱ्या इतर भारतीय बांधवांचे खटले न्यायालयात चालवण्यासाठी गांधीजी आपला सर्व वेळ आणि कौशल्य खर्च करत असत. त्यांच्या त्या भयावह संघर्षात ते कोणत्याच मेहनतान्याची अपेक्षा करत नसत व तो त्यांना मिळतही नसे. केवळ कामावरील प्रेमामुळे ते ते काम करायचे.

१८६९च्या कायद्याच्या कलम १५चा उल्लेख आधीच करण्यात आलेला आहे. या कायद्यानुसार कोणत्याही 'रंगीत माणसाला' रात्री नऊनंतर आपलं घर सोडता येत नसे. 'कोणत्याही एखाद्या गोऱ्या माणसाचा कागद परवाना म्हणून त्याला वापरता येई. त्या परवान्यात कोणत्या कामासाठी त्याला बाहेर जायचं आहे हे नमूद करणं आवश्यक असे. मुळात हा कायदा केवळ आफ्रिकी लोकांना लागू होता. तो 'रंगीत माणूस' म्हणून 'कुलींनाही' कसा लागू झाला याचा इतिहास आश्चर्यचकित करणारा आहे.

१८६९आधी 'कुली' हा शब्द केवळ ८-९ भारतीय आप्रवासी विषयक कायद्यात उपयोजिण्यात आलेला होता. त्या कायद्याचा प्रस्ताव मांडताना सांगण्यात आलं होतं की ज्यांना सार्वजनिक खर्चानं वा खाजगी व्यक्तीनं आपल्या खर्चानं या वसाहतीत कायद्यानं ठरवण्यात आलेल्या खास कामासाठी आणण्यात आलेलं आहे त्या व्यक्ती 'कुली' आहेत. जेव्हा हे कायदे एकत्रित करण्यात आले तेव्हा 'कुली' या शब्दाऐवजी 'आप्रवासी कुली' हा शब्द वापरण्यात आला. तो शब्द १८९१पर्यंत वापरात होता. त्यावेळी काळजीपूर्वक 'कुली' हा शब्द वगळण्यात

आला व 'आप्रवासी भारतीय' एवढाच शब्द तिथं राहिला. १८९१च्या कायद्याच्या एका कलमात 'आप्रवासी भारतीयांच्या मुलांना' काहीही कारण नसताना अशा प्रकारच्या लोकांशी जोडण्यात आलं. ज्या 'आशियायी' वा 'अरबांचा' आधी समावेश करण्यात आलेला नव्हता त्यांना काळजीपूर्वक वगळण्यात आलं. *मुक्त भारतीयाला म्हणजे कराराची मुदत संपल्यानंतर मुक्त झालेल्या भारतीयाला तसंच त्याच्यावर अवलंबून असणारांनाही अशा रीतीनं त्या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आलं. परंतु जे लोक स्वखर्चानं स्वतंत्रपणे आफ्रिकेत आले होते त्यांना या कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात आलेलं होतं.*

ह्या अंतराचा विसर पडला वा सोयिस्करपणे त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं आणि कायद्यात उपयोजिण्यात आलेला 'आप्रवासी भारतीय' हा शब्द वसाहतीत येऊन स्थायी झालेल्या सर्व भारतीयांसाठी वापरण्यात येऊ लागला. परिणामी सर्व रंगीत माणसांना ठराविक वेळेनंतर आपल्या कायदेशीर कामासाठी जरी बाहेर जायचं असलं तरी सुरक्षितता वाटत नसायची. उदाहरणार्थ १८९५च्या जानेवारी महिन्यात १९ भारतीय फेरीवाल्यांवर बुलवर मार्गावर परवान्याशिवाय सूर्योदयाच्या आधी आराम करताना सापडण्याच्या आरोपावर डरबनमधील बरो येथील न्यायालयात खटला भरण्यात आला. रात्री दोन वाजता बुलवर रोडवर फळांच्या आणि भाज्यांच्या टोपल्या घेऊन ते आराम करताना आढळले होते. नेटिव्ह पोलिसानं त्यांना पोलीस स्टेशनमध्ये चलायचा हुकूम दिला. स्वाभाविक भीतीनं त्यांनी सकाळपर्यंत हालायला नकार दिला. पोलीस स्टेशनमध्ये त्यांना प्रत्येकी ५ शिलींगच्या जमानतीवर सोडण्यात आलं. न्यायमूर्ती श्रीयुत डिल्लन यांच्या न्यायालयात त्यांना हजर करण्यात आल्यानंतर त्यांनी सांगितलं की आम्ही बेलिअरवरून ग्रे स्ट्रीटवरील मशिदीजवळच्या बाजारात जात होतो व ठोक व्यापाऱ्यांकडून माल घेण्यासाठी बरंच अंतर चालावं लागल्यामुळे आम्हाला थकवा आला होता व त्यामुळे आम्ही आराम करत होतो. त्यांच्या वकिलानं युक्तिवाद करताना सांगितलं की कायद्यानं रंगीत लोक जर योग्य स्पष्टीकरण देऊ शकत असतील तर रंगीत लोकांना सूर्योदयापूर्वी बाहेर राहायची

परवानगी दिलेली आहे आणि या लोकांनी बाहेर राहण्यासंबंधी दिलेलं स्पष्टीकरण पुरेसं समाधानकारक आहे. त्यामुळे कायदेशीरपणे ते बाहेर जात असताना त्यांना अटक करणं हा त्यांच्यावर शुद्ध अन्याय आहे. अशा परिस्थितीत त्यांना निर्दोष म्हणून सोडून देण्यात यावं. न्यायाधीशांनी वकिलांचा युक्तिवाद मान्य केला व अटक करण्यात आलेल्या लोकांना सोडून देण्यात आलं. [*नाताळ मर्क्युरी*, जानेवारी २९, १८९५] परंतु त्या गरीब बिचाऱ्या फेरीवाल्यांची त्यांच्या डोक्यावरील ओझ्यापासून दोन दिवसात जी कमाई झाली असती ती मात्र बुडाली. खटला चालू असताना त्यांना दोन दिवस तुरुंगात ठेवण्यात आलं होतं. सुटकेसाठी त्यांना अटर्नीची फीही द्यावी लागली होती. गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे 'लवकर उठून मेहनत करायचं त्यांना योग्य बक्षीस मिळालं असंच म्हणावं लागेल!'

काही महिन्यांनंतर डरबनमधील 'चांगला सुशिक्षित आणि अतिशय हुशार' असा एक प्रतिष्ठित भारतीय, ज्याची शहरातील विविध भागात मालमत्ता होती, आपल्या आईबरोबर सिडेनहॅम येथे गेला. तिथंही त्याची काही मालमत्ता होती. दोन नेटिव्ह पोलिसांनी त्यांना पकडलं व पोलीस स्टेशनमध्ये नेलं. त्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये कारभार पाहत असलेल्या पोलिसानं उडतउडत त्यांची तक्रार ऐकून घेतली. त्या गृहस्थांना जायची परवानगी देताना तो त्यांना म्हणाला की पुढील वेळी जर परवान्याशिवाय आढळलात तर याद राखा, तुम्हाला अटक करून तुमच्यावर खटला भरण्यात येईल! धक्का बसून *नाताळ मर्क्युरीनं* लिहिलं :

पोलीस जर गरम डोक्याचा असता आणि पोलीस स्टेशनचा कारभार पाहणारा बाहेर गेलेला असता,... तर या अतिशय सन्माननीय भारतीयांना अतिशय वाईट वागणूक देण्यात आली असती व त्यांना लज्जास्पद रीतीनं कोठडीत डांबण्यात आलं असतं.... ब्रिटिश वसाहतीत ब्रिटिश प्रजा असल्यामुळे अशा पद्धतीची वागणूक देण्यात येण्याबद्दल त्यांचा (तरुण भारतीयांचा) आक्षेप आहे.... त्यांच्या मुद्यात फार मोठं तथ्य आहे.... व तो असा मुद्दा आहे की ज्यांचा अधिकारावर असलेल्या लोकांनी नक्कीच विचार करायला पाहिजे.... अनेक लोक श्रीयुत गांधी

यांना ओळखतात.... त्यांचं शिक्षण, त्यांचं कौशल्य आणि त्यांची क्षमता याबद्दल कुणाचं दुमत असू शकत नाही, तरीही त्यांच्यावर अशाच प्रकारे अपमानित व्हायची पाळी येऊ शकते.... आणि हे भारतीय लांब पोषाखाच्या अरबांपेक्षा अधिक चांगल्या परिस्थितीत आहेत. आपल्या संस्कृतीचं किती सुंदर दृश्य यातून दिसतं! [*नाताळ मर्क्युरी*, एप्रिल १३, १८९५]

हे खरं आहे की पोलिसांनी लांब डगलेवाल्या अरबांशी तारतम्यभावानं वागावं अशी अपेक्षा होती. परंतु करारबद्ध नसलेले सर्व भारतीय, ज्यांना आप्रवासी भारतीय म्हणण्यात येत असे ते वा मुक्त भारतीय वा त्यांची मुलंबाळं अरबांचा पायघोळ पोषाख घालत नसत. मुसलमानेतर तसा पोषाख करत नसत. अतिशय संवेदनशील असल्यामुळे भारतीय ख्रिश्चनांनी इंग्रजी पोषाख करायला सुरुवात केलेली होती. या सर्वांना कायद्याची धार अधिक तीव्रतेनं बोचत होती.

२७ जानेवारी १८९६च्या रात्री ॲडिंग्टन येथील कुली डेपोचे अधीक्षक ए. एम. पिल्ले आपल्या घरी जात होते. प्रिन्स अल्फ्रेड स्ट्रीटवर युरोपिअन पोलिसानं हटकल्यानंतर त्यांनी महापौरांनी दिलेला परवाना दाखवला. त्या परवान्याद्वारे त्यांना परवान्याच्या कायद्यापासून कायम सूट देण्यात आली होती. ते पाहिल्यानंतर तो शिपाई काही तरी पुटपुटला. तो काय म्हणतो आहे ते न कळल्यानं पिल्ले यांनी 'काय?' म्हणून विचारलं. तेव्हा त्यांची मान पकडून त्यांना धक्का मारण्यात आला. अशा वर्तनाचं कारण काय असं स्तंभित झालेल्या पिल्लेंनी विचारलं. पुन्हा त्यांना मारहाण करण्यात आली व येथून ताबडतोब काळं केलं नाही तर कोठडीत टाकण्यात येईल अशी धमकी देण्यात आली. पोलीस स्टेशनवर जाऊन त्यांनी मारहाणीची तक्रार केली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी आपली तक्रार आप्रवाशांच्या संरक्षकाकडे नोंदवली. श्रीयुत पिल्लेबरोबर असलेल्या एका शाळामास्तरनं श्रीयुत पिल्लेंनी सांगितलेली गोष्ट सत्य असल्यासंबंधीचा पुरावा निवासी न्यायाधीश कॅप्टन ल्युकास यांच्यासमोर दिला. आरोप नाकारत आरोपी म्हणाला की फिर्यादी उद्धटपणे वागणारा आहे. न्यायाधीशांनी पोलिसाच्या विधानावर

विश्वास न ठेवता त्याला १ पौंड दंड वा एका आठवड्याची शिक्षा केली. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, फेब्रुवारी ६, १८९६]

असं होऊनही उनाडक्यांचं राज्य कायमच राहिलं. १८९५च्या डिसेंबरच्या शेवटी 'नीटनेटका युरोपिअन पोषाख केलेले व प्रतिष्ठित दिसणारे व अस्खलित इंग्रजी बोलणारे माजी बंधुआ मजुरांची मुलं असलेल्या दोन ख्रिश्चनांवर' - जॉन लुचमन रॉबर्ट्स आणि सॅम्युअल रिचर्ड्स यांच्यावर - रात्री ९.३० वाजता घराबाहेर असण्याचा आरोप ठेवण्यात आला. त्यातील एक शाळेत शिक्षक होता तर दुसरा नागरी सेवेच्या परीक्षेचा गांधीजींच्या हाताखाली अभ्यास करत होता. न्यायालयासमोर पेशी झाली असता त्यांनी सांगितलं की आम्ही फिरायला गेलो होतो व परतू लागलो तोच आम्हाला अटक करण्यात आली व रात्रभर कोठडीत डांबण्यात आलं. सकाळी त्यांच्यापैकी एकाचा जामीन मंजूर करण्यात आला परंतु दुसऱ्याला नाकारण्यात आला. त्याला अग्रिम भरल्यानंतर सोडण्यात आलं. त्यांचं म्हणणं होतं की आमची राहणीच आमच्या प्रतिष्ठितपणाची निदर्शक होती.

सुनावणीच्या दरम्यान त्यांच्यातील एकानं सांगितलं की मी माझं नाव जेव्हा सॅम्युअल सांगितलं तेव्हा माझी हेटाळणी करण्यात आली.

अधीक्षक : किती महिन्यांपासून तुझं हे नाव आहे? - माझं धर्मांतर झाल्यापासून, अठरा महिन्यांपासून.

तुझे आईवडील काय आहेत? - बंधुआ मजूर; धर्मगुरूचे धोबी.

* * * *

अधीक्षक : तुझं कौटुंबिक नाव तुला आवडलं नाही तर इंग्रजी नाव धारण केल्याचं व भारतीयांच्या कायद्यापासून तुला सूट असल्याचं पोलिसांना कळवलं होतं काय ? - नाही.

अधीक्षक : (दुसऱ्या माणसाला, रॉबर्ट्सला) तुझे आईवडील कोण होते? - बंधुआ

मजूर.

पोलिसांनी तुझ्या आईवडिलांपेक्षा तुला अधिक मोकळीक का द्यावी? – कारण माझं दिसणं पुरेसं आहे. [*नाताळ मर्क्युरी*, जानेवारी २९, १८९६]

प्रतिवादीच्या बाजूनं युक्तिवाद करत गांधीजी म्हणाले की या माणसाला बाहेर पडायचा पूर्ण अधिकार होता. ही दोन्ही पोरं अतिशय सज्जन आहेत व त्याच्या वागण्यातून त्यांनी तसं दाखवून दिलेलं आहे. त्यांच्यापैकी एकाची पोलिसाला माहिती होती. मागील प्रसंगी अशाच प्रकारच्या परिस्थितीत महापौरांकडून सूट मिळवायची त्याला सूचना देण्यात आली होती परंतु आजारामुळे त्याला तसं करता आलं नाही. तथ्यांवर भाष्य करत न्यायाधीश म्हणाले की हे फिरायलाच निघालेले होते व उनाडक्या करत नव्हते याबद्दल माझं समाधान झालेलं आहे. गांधीजी म्हणाले की जो 'स्वतःबद्दलची चांगुलपणाची खात्रीलायक माहिती देऊ शकतो' त्याच्यासाठी महापौरांकडून परवाना मिळवायची आवश्यकता असू नये. परंतु न्यायाधीशाच्या म्हणण्याप्रमाणे मी माझ्या अशिलाला आज्ञा पालनाचा सल्ला दिला. त्यानुसार पहिल्या प्रतिवादीनं महापौरांच्या परवान्यासाठी अर्ज केला परंतु शहर कारकुनानं त्याला कळवलं की 'कारकुनाला आणि शाळा शिक्षकाला दखलपात्र गुन्ह्याखाली कधीच अटक करता येणार नाहीं' म्हणून तुला परवाना देता येऊ शकणार नाही. [*नाताळ मर्क्युरीला* गांधीजींचं पत्र दिनांक मार्च २, १८९६, प्रसिद्धी मार्च ६, १८९६]

'भारतीयांसाठी कायद्याची अंमलबजावणी करण्याविषयीच्या प्रशासनिक नियमात बदल करणाऱ्या' श्रीयुत वाल्टर यांनी दिलेल्या निकालामुळे वृत्तपत्रांमध्ये बरीच खळबळ माजली होती. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जानेवारी २९, १८९६] ह्या खटल्याचं वर्णन कसोटी खटला असं करत नाताळ मर्क्युरीनं लिहिलं, 'प्रत्येकजण मान्य करील की या कायद्यामुळे काही लोकांसाठी अतिशय अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे यात काही संशय नाही. [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी २८, १८९६]

गांधीजींच्या लक्षात आलं होतं की केवळ न्यायालयात खटले जिंकून काम भागणार नाही. युद्ध जिंकण्यासाठी कायदा आणि सुव्यवस्थेचं रक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांची सदिच्छा जिंकणं आवश्यक होतं. त्यामुळे खटल्याच्या शेवटी भारतीयांबद्दल थोड्या असं अधिक सद्भावनेनं सामंजस्यानं वागायची गांधीजींनी पोलिसांना विनंती केली. पोलीसही चुका करू शकत होते. उडाणटप्पूपणाच्या कायद्याचा पोलिसांनी भारतीयांविरुद्ध थोडा समंजसपणानं वापर केला व अटक करताना तारतम्यभावाचा वापर केला तर या कायद्याची दाहकता कमी होईल. [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी २१, १८९६]

पिल्ले प्रकरणी आपल्या पोलिसांना दंड झाल्यामुळे व्यथित झालेल्या पोलीस अधीक्षकांना आपल्या लोकांच्या बाजूनं आपण उभं राहिलं पाहिजे असं कदाचित जाणवलं असावं व त्यामुळे त्यांनी तो मुद्दा वैयक्तिक वादाचा विषय बनवला. त्यांचं म्हणणं होतं की ज्या प्रकरणात त्या दोन मुलांना 'तरुण उपटसुंभ' म्हणून कलंकित करायचा प्रयत्न करण्यात आला होता त्यांनी 'जामिनावर सुटण्याऐवजी रात्रभर पोलीस कोठडीत राहणं पसंत केलं होतं.' त्या प्रकरणाची एकतर्फी बाजू नाताळ मर्क्युरीमध्ये प्रकाशित करण्यात आली. त्यात न्यायाधीशांनी दिलेला निकाल ही 'न्यायदानातील गफलत' असल्याचं त्यातून दाखवण्यात आलं. पोलीस प्रमुख उद्‌गारले :

यातून काय घडणार आहे याची लोकांना चांगली कल्पना येईल.... काही दिवसांपूर्वी एका कुलीनं आपला परवाना दाखवायला नकार दिल्यामुळे पोलिसांनी त्याच्या खांद्याला धरून पकडल्यामुळे कॅप्टन ल्युकास यांनी एका युरोपिअन पोलिसाला एक पौंड दंड केला.... आता तो भारतीय तरुण रॉबर्ट्स न्यायाधीशांनी परवाना मिळवण्यासाठी दिलेल्या आदेशाकडे दुर्लक्ष करतो.... आणि एवढा उद्धट झाला आहे की ठराविक वेळेनंतरही तो आमच्या माणसांसमोर रस्त्यावरून हिंडतो.... दुसऱ्या पोलिसाचीही तशीच अवस्था करावी असा आता त्याचा हेतू आहे काय?.... पोलीस जागृत होते व त्यांच्या लक्षात त्याची युक्ती आली....

पोलिसांनी थोडं सौजन्यानं वागावं अशी गांधीजींनी केलेल्या विनंती विषयी:

मी उत्तर दिलं की.... त्यांनी अरब व्यापाऱ्याच्या वा इतर प्रतिष्ठित भारतीयांच्या रात्रीच्या हालचालीत कधीच अडथळा आणला नाही, परंतु या भूतलावर माणसाच्या खिशात परवाना आहे की नाही हे त्यानं दाखवल्याशिवाय त्यांना कसं कळेल.... भारतीयाला जर धर्मांतर आणि नामांतर केल्यामुळे कायद्यातून पळवाट काढायची सूट देण्यात आली तर लोक असंच करतील अशी मला भीती वाटते. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जानेवारी २९, १८९६]

नाताळ मर्क्युरीतून गांधीजींनी विचारलं की ती मुलं बंधुआ मजुरांची मुलं होती ही बाब त्यांच्या विरोधात का जावी? आणि माणसाची पारख जे इंग्रज जन्मावरून न करता गुणांवरून करतात त्या इंग्रजांच्या समाजात हे व्हावं ही किती आश्चर्याची गोष्ट आहे? खाटकाच्या मुलाचा सन्मान त्यांनी फार मोठा कवी म्हणून केला नव्हता काय? दोन वर्षांपूर्वी बदलवलेल्या नावाचं फार मोठं प्रकरण करत अधीक्षकांनी या तरुणाला अटक करणाऱ्या पोलिसांनी जो उघडउघड अपमान केला त्याकडे दुर्लक्ष करायचा प्रयत्न केलेला आहे. नाव केव्हा बदलवण्यात आलं हे न कळल्यानं पोलीस दोषमुक्त होऊ शकत नाहीत असं गांधीजींनी दाखवून दिलं:

उडाणटप्पूपणाच्या कायद्यातून सुटका करून घेण्यासाठी आपल्या देशाची ओळख लपवावी असं त्या तरुणाला (भारतीय) वाटलं असलं तरी, जसं की अधिक्षकांना वाटतं, ती लपवता येऊ नये असा त्या तरुणाचा चेहरामोहरा होता. 'होय माझ्या पोरा, सर्व लोक तुझ्यासारखे असते तर पोलिसांना एवढा त्रास झाला नसता हे जे अधीक्षकांनी उद्‌गार काढले त्यावरून असं दिसतं की त्या मुलाला आपल्या जन्माच्या ठिकाणाची वा नावाची लाज वाटत नव्हती. [*नाताळ मर्क्युरीला* गांधीजींचं पत्र दिनांक मार्च २, १८९६, प्रसिद्धी मार्च ६, १८९६]

आपला धर्म बदलवणं जोपर्यंत चूक ठरत नाही तोपर्यंत एखाद्यानं आपलं नाव बदलवलं तर त्यात एवढी चूक काय आहे? 'श्रीयुत क्विल्यम हे हाजी अब्दुल्ला झाले होते आणि मॅनिशिया

येथील कॉंस्युलेट जनरल पैगंबरवासी श्रीयुत वेब यांनी मुसलमान धर्माचा स्वीकार केल्यानंतर मुसलमान नावाचा स्वीकार केला होता' व वसाहतीतील कुणालाच त्याचं काहींच वाटलं नव्हतं. परंतु 'पोलिसाच्या दृष्टिकोनातून भारतीयांसाठी ख्रिश्चन नावाचा स्वीकार करणं हाच केवळ गुन्हा नव्हता तर ख्रिश्चन पोषाखाचा स्वीकार करणं हाही गुन्हा होता.... आणि आता अधीक्षकांच्या दृष्टिकोनातून धर्म परिवर्तन करणारा भारतीय संशयिताच्या कक्षेत येतो.' [*नाताळ मर्क्युरीला* गांधीजींचं पत्र दिनांक मार्च २, १८९६, प्रसिद्धी मार्च ६, १८९६] गांधीजी म्हणाले की हे परिवर्तन करण्यामागे प्रामाणिक श्रद्धा नसून कायद्यातून पळवाट काढण्यासाठी केलेला तो प्रयत्न आहे असं गृहीत धरण्याशिवाय अन्य कारण आहे असं वाटू शकत नाही. 'सदरहू प्रकरणात.... दोन्ही प्रतिवादी प्रामाणिक ख्रिश्चन आहेत.... कारण दोघांबद्दलही डॉ. बूथ यांना आदर वाटतो.' [*नाताळ मर्क्युरीला* गांधीजींचं पत्र दिनांक मार्च २, १८९६, प्रसिद्धी मार्च ६, १८९६; डॉ. बूथ हे सेंट एडन्स चर्चचे धर्मगुरू होते]

गांधीजींनी मान्य केलं की 'ख्रिश्चनाच्या वेषात असलेला माणूस प्रामाणिक ख्रिश्चन आहे की ख्रिश्चनाच्या वेषातील तो सैतान आहे' हे सांगणं कठीण आहे. परंतु गांधीजींचं म्हणणं होतं की संशयाच्या अवस्थेत 'सामान्य परिस्थिती गृहीत धरून ज्याप्रमाणे इतर प्रकरणात संशयित गुन्हेगार असायचा संशय असला तरी संशयिताला फायदा देतात त्याप्रमाणे याही प्रकरणात संशयिताला म्हणजे भारतीयाला संशयाचा फायदा द्यायला पाहिजे.'

या प्रकरणातील दुर्दैवी मुलांनाही तशीच वागणूक द्यायला पाहिजे अशी मी विनंती करू शकतो काय? कोठडीऐवजी त्यांना पडायला दुसरी जागा द्यायला पाहिजे होती. जर कोठडी टाळताच येत नव्हती तर निदान त्यांना स्वच्छ ब्लँकेट द्यायला पाहिजे होते. पोलीस त्यांच्याशी सौजन्यानं बोलू शकला असता. असं करण्यात आलं असतं तर प्रकरण न्यायाधीशासमोर कधीच गेलं नसतं.

'तरुण उडाणटप्पूनं जामीनावर सुटण्याऐवजी रात्रभर पोलीस कोठडीत राहणं पसंत केलं होतं' या पोलीस अधीक्षकांच्या उद्‌गारावर गांधीजींनी जोरदार आक्षेप घेतला. गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं की सत्य याच्या एकदम विपरीत आहे.

त्यांनी जामीन मागितला आणि रात्रीच्या वेळी त्यांना तो नाकारण्यात आला....त्यांनी सकाळी परत जामिनासाठी विनंती केली. दुसऱ्या प्रतिवादीची विनंती मान्य करण्यात आली. पोलिसानं पहिल्याला जामीनावर सोडायला नकार दिला. त्याच्या नावासमोर 'सोडण्यात येऊ नये' अशी नोंद आहे. [*नाताळ मर्क्युरीला* गांधीजींचं पत्र दिनांक मार्च २, १८९६, प्रसिद्धी मार्च ६, १८९६]

आणि वास्तवात ही नोंद असलेली नोंदवही न्यायालयात सादर करण्यातसुद्धा आली होती. परंतु ही गोष्ट 'एका दर्शकानं' नाताळ ॲंडव्हरटाईझरमध्ये दर्शवल्याप्रमाणे कार्यवाही करायच्या योग्यतेची होती. त्यामुळे न्यायाधीशांनी नोंदवहीत ती नोंदवायला नकार दिला आणि ते म्हणाले की 'महानगरपालिकेवर कोणतीही कार्यवाही होऊ द्यायची माझी इच्छा नाही.' [*नाताळ ॲंडव्हरटाईझर*, मार्च ७, १८९६]

अधीक्षकांनी दावा केला होता की त्यांच्या शिपायांनी 'अरब व्यापाऱ्याच्या वा इतर प्रतिष्ठित भारतीयांच्या रात्रीच्या हालचालीत कधीच अडथळा आणला नाही.' त्याचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की ही दोन मुलं या 'इतर प्रतिष्ठित भारतीयांत' येत नाहीत काय?

मी त्यांना आवाहन आणि विनंती करतो आणि विचारू इच्छितो की त्यांनी स्वतः या दोन मुलांना अटक केली असती काय? मी त्यांच्याच शब्दात सांगतो की 'त्यांची संपूर्ण फौज जर त्याच्यासारखीच सुस्वभावी असती तर काहीच अडचण निर्माण झाली नसती.'

'खऱ्या गाऱ्हाण्यांच्या' प्रकरणी आपली सहानुभूती ताबडतोब मिळेल असे *नाताळ मर्क्युरीनं* मागील प्रसंगी उद्‌गार काढले होते. हे प्रकरण 'खऱ्या गाऱ्हाण्याचं' नाही काय? गांधीजींनी विचारलं. ते पुढं म्हणाले की प्रतिष्ठित भारतीय तरुणांनी महापौरांचा परवाना काढण्यासंबंधी माझा सल्ला जेव्हा विचारला होता तेव्हा मला उत्तर देणं कठीण गेलं होतं. परंतु पहिला अर्ज नाकारण्यात आला असल्याकारणानं इतरांच्या उत्साहावर विरजण पडलं आहे. वृत्तपत्रं आपल्या मतांच्या प्रभावानं 'स्पष्टपणे प्रतिष्ठित दिसणाऱ्या लोकांना महापौरांचा परवाना

मिळायची प्रक्रिया एक तर सोपी करू शकतात वा पोलिसांना अशा प्रकारच्या अटकेची पुनरावृत्ती करणं अशक्य करू शकतात.' [*नाताळ मर्क्युरीला* गांधीजींचं पत्र दिनांक मार्च २, १८९६, प्रसिद्धी मार्च ६, १८९६]

गांधीजींच्या पत्रानं त्या दोन भारतीय तरुणांविषयी लोकांमध्ये व्यापक सहानुभूती निर्माण झाली व पोलीस अधिकाऱ्यावर कठोर टीका. वृत्तपत्रानं तीव्र टीका करत लिहिलं, 'पोलीस अधिकारी आपल्या पोलीस दलात सर्वश्रेष्ठ दैवी गुण असल्याचं वर्णन करताना थकत नाहीत. त्याचबरोबर मी असं म्हणेन की जेव्हा पोलीस एखाद्या खटल्यात पराभूत होतात तेव्हा त्यांनी सतत वृत्तपत्राकडे धाव घेत राहणं उचित नसते. मी जर चुकत नसेन तर महानगरपालिकेनं एकाहून अधिक वेळा यासंबंधीची नापसंती दर्शवलेली आहे.' [*नाताळ विटनेस*, मार्च ६, १८९६]

अधीक्षकांनी त्या दोन तरुणांचा उडाणटप्पू म्हणून जो उल्लेख केला होता त्याबद्दल अधीक्षकांना धारेवर धरत 'दर्शकानं' नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये लिहिलं : 'पोलीस अधिक्षकांचा हेतू काहीही असला तरी त्यांना अशा प्रकारचे उद्‌गार काढायचा अधिकार नक्कीच नाही.' आणि पत्राचा समारोप करत त्यांनी लिहिलं :

युरोपिअन लोकांना हातकड्या घालायचा अधिकार अधीक्षक आपल्या स्वतःसाठी सुरक्षित ठेवू इच्छितात तर भारतीयांना हातकड्या घालायचा अधिकार आपल्या माणसांसाठी सुरक्षित ठेवू इच्छितात व त्याबद्दल त्यांच्या माणसाला कोणतीच शिक्षा होऊ नये असं त्यांचं मत दिसतं. त्यांना आणि त्यांच्या एका शिपायाला एवढ्यातच दंड करण्याविषयीचा निकाल त्यांच्या दृष्टीनं चुकीचा आहे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च ७, १८९६]

परंतु वरवर पाहता पूर्वग्रहदूषित दृष्टीचे वाटणारे आणि ओबडधोबड पद्धत असलेले अधीक्षक आतून दयाळू, परोपकारी आणि कर्तव्यदक्ष असल्याची गांधीजींना जाणीव झाली होती. गांधीजींनी त्यांच्यातील सदिच्छेला जागवायचा सतत प्रयत्न केला. अधीक्षक अलेक्झँडर त्यांचे खंदे पुरस्कर्ते झाले आणि भारतीय समाजाचे ते एक उत्तम मित्र झाले.

५

लेडिस्मिथ लोकल बोर्डाची आपल्या मार्गात बदल करायची तयारी नव्हती. त्यांच्या नोकरांना जे लोक रंगीत आहेत असं वाटायचं त्यांच्याविरुद्ध ते, श्रीमती व्हिंडन यांचा संबंध येईपर्यंत, सतत हिंसक मार्गाचा अवलंब करायचे.

भारतातील मद्रासमधून आलेल्या श्रीमती व्हिंडन या शाळाशिक्षिका होत्या. लेडिस्मिथ येथील निवासी न्यायाधीशांच्या न्यायालयात दुभाष्या असलेले श्रीयुत डेव्हिड व्हिंडन हे त्यांचे पती होते. १५ डिसेंबर १८९५ला रात्री ऑल सेंट्स चर्चमधील प्रार्थना संपल्यानंतर त्या घरी परतत होत्या. त्यांच्या नणंदेला आणि त्यांच्याबरोबरच्या मुलाला काफिर पोलिसानं अडवलं. तिची मान पकडत त्यांनी तिच्याकडे परवान्याची मागणी केली. पडत असताना तिच्या पायातील एका जोडा निघाला. ती तो उचलायचा प्रयत्न करत असताना तिच्या अंगावरील कपड्यांच्या आधारे तिला वर उचलायचा प्रयत्न करण्यात आला व त्या झटापटीत तिचे कपडे फाटले. फ्रेंच ग्वायनात जन्मलेल्या एका निग्रोनं पोलीस स्टेशनच्या दारावर तिला आदळलं. ती मॅडम डेव्हिड आहे काय म्हणून तिला विचारण्यात आलं. तिच्याकडे कामावर असलेल्या एका नेटिव्हानं पोलीस स्टेशनच्या आतून तिला पाहिलं आणि ताबडतोब ओळखलं. तरीही तिला धसमुसळेपणानं काळोख्या खोलीत ढकलण्यात आलं व तिथं ती पडली. सुमारे वीसेक मिनिटांनंतर मुख्य जमादार विल्यम मॅकडोनाल्ड आले व ती कोण आहे हे कळल्यानंतर त्यांनी तिच्या सुटकेचा आदेश दिला. तिला भोवळ आलेली होती व तिला घरी नेण्यात येईपर्यंत ती शुद्धीवर आलेली नव्हती.

तिच्या जखमा तपासणाऱ्या डॉ. मोबर्ली यांनी तिला बिछान्यावर पडून आठ दिवस आराम करायला सांगितलं. तिच्या फाटलेल्या कपड्यांच्या आतून तिच्या गुडघ्यावर सूज आलेली दिसत होती व तिथं अतिशय वेदना होत होत्या. तिनं 'पाठ, छाती आणि इतरत्र' दुखत असल्याची तक्रार केली. त्यानंतर तिला अधूनमधून झटके यायचे.

श्रीमती व्हिंडन यांनी अवैध अटक आणि कोठडीत टाकल्यामुळे तिच्या शरीराला व मनाला झालेल्या इजांसाठी, तसंच मानहानीसाठी २०० पौंड नुकसानभरपाईचा लेडिस्मिथ येथील लोकल बोर्डावर दावा केला. तिच्या नणंदेनंही तेवढ्याच रकमेसाठी दावा केला.

सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण पीठासमोर हे प्रकरण आलं व वादीतर्फे श्रीयुत कार्टर वकील होते तर प्रतिवादीतर्फे श्रीयुत टॅथॅम आणि श्रीयुत रॉबिन्सन वकील होते. खटल्याच्या दरम्यान उघडकीस आलं की ज्या दिवशी महानगरपालिकेच्या लेडिस्मिथ बोर्डाकडे मागणीपत्र पाठवण्यात आलं होतं त्या दिवशी विल्यम मॅकडोनाल्ड हे डेव्हिड व्हिंडनकडे गेले आणि त्यांना धमकी देत म्हणाले की 'मी तुम्हाला या खटल्यात गुंतवू इच्छीत नाही परंतु तुम्ही खटला चालवायचं ठरवलं तर मला तुमच्याबद्दल काय माहीत आहे ते सरकारला सांगावं लागेल.'

उलटतपासणीच्या दरम्यान श्रीमती व्हिंडन यांच्या वकिलानं विल्यम मॅकडोनाल्ड यांना विचारलं :

प्रश्न : ज्या पोलिसांनी अटक केली त्यांनी फिर्यादींशी योग्य वर्तन केलं काय त्याची चौकशी करायचा तुम्ही काही प्रयत्न केला काय?

उत्तर : त्यांनी असं काही केलं आहे काय असं विचारण्याशिवाय वेगळं काही नाही. प्रश्न : व्हिंडनला तुम्ही जी धमकी दिली त्याची तुम्ही शासनाला काही माहिती दिली काय? उत्तर : अजून नाही. प्रश्न : मला वाटतं की ते जर खटला हारले तर तसं करायचं काही कारण उरणार नाही? उत्तर : मला त्याबद्दल विशेष काही माहिती नाही.

सर वाल्टर रॅंज : ही अटक करण्यात तुम्ही चूक केलेली आहे असं तुम्ही तुमच्या शिपायांना सांगितलं काय ?

साक्षीदार : मी तेव्हा सांगितलं नाही. पण त्यानंतर मी सांगितलं.

सर वाल्टर रॅग्ज : भारतीयांना आणि नेटिव्हांना उशिरा रात्री अटक करायची सवय आपल्याला लागलेली आहे. प्रश्न : तुम्ही अरबांना अटक करता काय? उत्तर : नाही. प्रश्न : का? उत्तर : असं दिसतं की त्यांना अटक करण्यात येऊ नये अशी वसाहतीत समजूत झालेली आहे. प्रश्न : अरबही रंगीत माणूस आहे - तुम्ही त्यांना का अटक करत नाही? उत्तर : ज्या कारणासाठी आम्ही व्हिंडनला अटक करत नाही त्याच कारणासाठी. प्रश्न : का? उत्तर : मला तो कुली आहे असं वाटत नाही.

सर वाल्टर : कुलीचा रंगाशी काही संबंध नाही. अरबांना का अटक करण्यात येत नाही?

साक्षीदार : कारण कायद्याच्या अर्थात तो बसतो असं मला वाटत नाही. प्रश्न : का? उत्तर: या गोष्टीचा निर्णय घेणं न्यायमूर्ती महोदय मी आपल्यावर सोडेन.... (हशा)

न्यायमूर्ती श्रीयुत मॅसन : मला असं वाटतं की तुम्ही मान्यवर लोकांशी व्यवहार करत नाही. आणि रंगीत असले तरी तुम्ही ज्यांना ओळखता असे कोण आहेत?

साक्षीदार : नाही.

प्रतिवादीच्या वकिलांनी दाखवायचा प्रयत्न केला की अन्याय दूर करून घ्यायचा हा प्रामाणिक प्रयत्न नाही; ज्या दोन बायांनी दावा केला आहे त्या 'केवळ कठपुतळ्या' आहेत, व 'सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत सर्व प्रकरण एक विनोदच आहे.' हे शक्य आहे की बोर्डाकडून 'लहानशी तांत्रिक चूक' झालीही असेल परंतु 'एका चिल्लर गोष्टीला फुगवून सर्वोच्च न्यायालयात आणण्यात आलं आहे.

निकाल देताना सरन्यायाधीशांनी १८६९च्या कायद्यान्वये 'रंगीत माणसाच्या' व्याख्येचा गंभीरपणे अर्थ लावायला नकार दिला. परंतु त्याचबरोबर 'माणूस केवळ रंगीत आहे एवढ्याच कारणासाठी त्याला दखलपात्र गुन्ह्याखाली अटक करण्यासाठी ते पुरेसं कारण आहे हे मान्य करायलाही त्यांनी नकार दिला.' जर नेटिव्ह रात्री बाहेर गेला असेल तर तो जेव्हा सकाळी

न्यायाधीशांसमोर येतो तेव्हा मी घरी जातो - मी माझ्या नेहमीच्या कामासाठी गेलो होतो व केवळ मी बाहेर गेलो होतो म्हणून माझ्याविरुद्ध पूर्वग्रह करून घेण्यात येऊ नये असं न्यायाधीशांना सांगायचा त्याला अधिकार असतो. न्यायालयासमोर असलेला कायदा हा जॉर्ज चौथे यांनी तयार केलेल्या परिनियमाची प्रत आहे व 'तो कायदा आळशी, दंगलखोर, बदमाष आणि उडाणटप्पू लोकांना शिक्षा करण्यासाठी असून' त्या कायद्याला 'नाताळच्या वसाहतीतील आळशी आणि दंगलखोर व उडाणटप्पू लोकांना शिक्षा करायचा कायदा' असं म्हणतात. हा कायदा 'विशिष्ट सवयी आणि जीवनपद्धतीच्या' विरोधात आहे. ज्या व्यक्तींना *'बाहेर भटकत राहायची व सार्वजनिक ठिकाणी बसून भीक मागायची सवय आहे वा तशी त्यांची जीवनपद्धती आहे'* त्यांच्यासाठी हा कायदा आहे. (तिरपी अक्षरं माझी). न्यायालयासमोरील प्रकरण 'कल्पनेला कितीही ताण दिला तरी या कायद्याच्या कक्षेत येत नाही.' महानगरपालिकेच्या नोकरांच्या वर्तनावर टीका करत 'बेलगामपणानं आणि कारण नसताना प्रतिष्ठित आणि निष्कलंक लोकांना, ज्यांच्या ओळखीबद्दल संशयाला काहीच जागा नव्हती, अटकेत ठेवायचं वर्तन अन्याय्य, कठोर आणि दडपशाहीचं आहे' असा न्यायालयानं ताशेरा हाणला आणि ते म्हणाले:

तिला अपमानित व्हावं लागलं, यातना सहन कराव्या लागल्या आणि तीव्र दुःख भोगावं लागलं आणि कोणत्याही व्यक्तीला थोड्याशा पैशासाठी प्रकाशित खोलीतून अंधार कोठडीत ढकललं जावं आणि तिथं किती तरी मिनिटांसाठी अडकून पडावं असं वाटणार नाही. ही काही मिनिटंदेखील अडकलेल्या पक्षाला किती तरी तासासारखी वाटतात आणि मनाचा क्षोभ होण्यासाठी व अटक करणाराविरुद्ध तिटकारा निर्माण करण्यासाठी पुरेशी असतात. [*नाताळ विटनेस*, मार्च २७, १८९६]

त्याचवेळी सन्माननीय न्यायमूर्तींचं मत होतं की नुकसान भरपाई वाजवीपेक्षा अधिक नसावी व त्यांनी २० पौंड नुकसान भरपाई द्यायचा आदेश दिला.

या मताशी सहमत होत सर वाल्टर रॅग्ज म्हणाले की वादी रंगीत व्यक्ती आहे व तिला १८६९च्या कायद्याच्या १५व्या कलमानुसार अटक करायचा अधिकार आहे असं सांगून बोर्डानं आपला प्रामाणिकपणा सिद्ध करायचा व आपल्या नोकरांच्या वर्तनाचं समर्थन करायचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे कायद्याच्या अर्थात श्रीमती व्हिंडन या रंगीत व्यक्ती आहेत की नाही हा न्यायालयासमोर सरळसरळ प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी या बाबतीत भूमिका घ्यायचं टाळलं परंतु त्यांची मात्र या बाबतीत ठाम भूमिका होती. श्रीमती व्हिंडन 'या कायद्याच्या अर्थानं रंगीत व्यक्ती नाहीत' हे त्यांचं या संबंधातील वैयक्तिक जरी असलं तरी मत होतं. उडाणटप्पूंविषयीच्या कायद्याचा शोध घेत त्यांनी दाखवलं की तो 'केवळ कुलीं' साठीच करण्यात आलेला आहे. श्रीमती व्हिंडन यांना कुली म्हणणं म्हणजे 'एखाद्या इंग्रज माणसाला फ्रेंच माणूस म्हणण्यात जशी घोडचूक होईल तशी घोडचूक करण्यासारखं आहे.' [*नाताळ विटनेस*, मार्च २७, १८९६]

याही पलीकडे विचार केला तर बोर्डानं आपल्या कृतीचं ज्या कायद्यांतर्गत समर्थन केलं आहे तो कायदा अशा व्यक्तींना अटक करावी असं कुठंच म्हणत नाही. केवळ त्याच्या आधीच्या परंतुकात तसं म्हणण्यात आलं आहे परंतु त्या परंतुकात असंही सांगण्यात आलं आहे की या 'परंतुकातील तरतूद संपूर्ण कायद्याला लागू होत नाही.' त्यामुळे श्रीमती व्हिंडन यांना अटक करताना बोर्डाच्या नोकरांनी कायद्यानं त्यांना दिलेल्या अधिकाराबाहेरील वर्तन केलेलं आहे.

बोर्डासाठी जे उपनियम तयार करण्यात आले त्यातच परवान्याची पद्धती सांगण्यात आली आहे. कायद्यात त्यासंबंधीचा काहीच उल्लेख नाही. नंतर तयार करण्यात आलेल्या पोटनियमातच बोर्डानं आपल्या नोकरांना वारंटशिवाय अटक करायचा अधिकार दिलेला आहे. या अर्थानं हे सर्व पोटनियम व १८६९चा कायदा क्रमांक १५मध्ये १८८४ साली करण्यात आलेली दुरुस्ती मूळ कायद्याशी विसंगत आहे की काय हा वादाचा मुद्दा आहे. परंतु कायद्याच्या अर्थानं त्या रंगीत व्यक्ती असल्या वा नसल्या तरी त्यांना करण्यात आलेल्या अटकेचं समर्थन करता

येऊ शकत नाही. मारिट्झबर्ग प्रकरणाचा उल्लेख करत ते म्हणाले की त्या प्रकरणी युरोपिअनाला (जॅकसन) न्यायालयानं २० पौंड दिले होते. त्यामुळे 'गोऱ्या माणसाच्या बरोबरीत ठेवण्यात आल्यानंतर श्रीमती व्हिंडन यांची काही तक्रार असू नये.' [*नाताळ विटनेस*, मार्च २७, १८९६]

निकालात खर्च आणि २० पौंड नुकसानभरपाई मान्य करण्यात आली. श्रीमती व्हिंडन यांच्या सावत्र बहिणीच्या बाबतीत १० पौंड नुकसान भरपाई मान्य करण्यात आली परंतु खर्च मान्य करण्यात आला नाही. सर वाल्टर यांनी त्याचबरोबर 'रंगीत'चा कायद्याच्या दृष्टिकोनातून जो अर्थ लावला त्यावर नाताळ विटनेसनं भाष्य करत लिहिलं की ही गोष्ट 'श्रीयुत गांधी यांच्या नजरेस आल्यावाचून राहणार नाही.' 'मुख्य न्यायाधीशांच्या मतेही' ह्या खटल्याचं 'खास महत्त्व होतं' कारण रंगीत माणूस जर रात्री बाहेर पडला व आपण का बाहेर आहोत याचं त्यानं 'व्यवस्थित कारणं सांगितलं' वा 'नीट स्पष्टीकरण दिलं' तर या खटल्याच्या निकालामुळे तो दखलपात्र गुन्हा होऊ शकणार नव्हता.

'रंगीत माणसांच्या स्वाभिमानाच्या रक्षणार्थ चाललेल्या लढ्यात श्रीमती व्हिंडन यांच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं दिलेला निर्णय एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरला व त्याचं स्वागत केवळ भारतीयांनीच केलं नाही तर आफ्रिकी लोकांनीही केलं. उडाणटप्पूपणा प्रतिबंधक कायदा हा भारतीय लोकांबरोबरच आफ्रिकी लोकांचीही दडपशाही करत होता. परंतु त्यांच्या लढ्याला काही विशेष यश आलेलं नव्हतं. रेल्वे स्टेशनवरून रविवारच्या रात्री घरी परतत असताना काही वर्षांपूर्वी दीक्षा घेतलेल्या आफ्रिकी धर्मगुरुंजवळ परवाना नसल्यामुळे ते कोण आहेत हे माहीत असतानाही त्यांना अटक करण्यात आली. ल्युटिली नावाच्या दुसऱ्या एका आफ्रिकी गृहस्थाला डरबन येथील निवासी न्यायाधीशांनी परवान्याशिवाय बाहेर न राहायच्या वेळेत बाहेर राहिल्याबद्दल ५ शिलींग दंड केला. त्यांनी डरबन न्यायाधीशांविरुद्ध वाल्टर रॅग्ज यांच्या न्यायालयात केलेलं अपील खारीज करण्यात आलं. त्यामुळे 'सूट मिळालेल्या नेटिव्हांमध्ये' फार मोठी क्रोधाची भावना निर्माण झाली. विरोधदर्शक सभा घेण्यात आल्या आणि यासंबंधी सर्वोच्च

न्यायालयात दाद मागता येईल का यासाठी वकिलांच्या एका फर्मकडून सल्ला घेण्यात आला. सर वाल्टर यांनी लावलेला अर्थ योग्य आहे व सर्वोच्च न्यायालयात जाऊन काही फायदा होणार नाही असा वकिलांकडून सल्ला मिळाला. 'रंगीतांच्या कायद्यापासून' आम्हाला मुक्त करण्यात यावं यासाठी फार मोठ्या जनसमूहाच्या सह्यांनिशी शासनाकडे एक अर्ज पाठवण्यात आला. परंतु विधानसभेत मांडण्यात आलेलं विधेयक दुसऱ्या वाचनानंतर मंजूर झाल्यानंतर काही कारणांनी रद्द करण्यात आलं. त्यामुळे आफ्रिकी लोकांमध्ये वैफल्य आणि कटुतेची भावना पसरली. ल्युटिली यांनी डरबन निवासी न्यायाधीशाविरुद्ध केलेल्या अपीलाच्या संदर्भात दोन वर्षांपूर्वी सर वाल्टर रंग यांनी व्यक्त केलेल्या अभिमतामुळे 'सूट मिळालेल्या नेटिव्हांच्या सामाजिक दर्जावर एक मोठा काळा ढग आलेला आहे' असं एस. निग्वाना यांनी *नाताळ विटनेस*मध्ये लिहिलं. 'वाघ आपली जागा बदलू शकत नाहीं असं त्या प्रकरणी सर वाल्टर म्हणाले होते. त्यांच्या म्हणण्याचा आशय हा होता की ल्युटिलीला जर नेटिव्ह कायद्यापासून मुक्त करण्यात आलं होतं तरी तो १८६९चा कायदा १५च्या अंतर्गत येत नाही कारण केवळ सूट मिळाल्यामुळे त्याचा रंग बदलू शकत नाही. एस. निग्वाना यांनी पुढं लिहिलं की जर 'श्रीमती व्हिंडन यांचा रंग बदलवणारा कायदा न्यायमूर्ती महोदयांच्या मनात असेल तर.... ते नक्कीच मान्य करतील की ल्युटिली यांचा रंग बदलवणारा कायदाही असायलाच हवा.' सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी रंगीत माणसाकडून निर्णय दिलेला असल्यामुळे आता 'अधीक्षक अलेक्झँडर आणि इतर लोकांनी लक्षात घ्यावं की केवळ रंगीत असणं हा दखलपात्र गुन्हा होऊ शकत नाही. ते म्हणाले की श्रीमती व्हिंडनबद्दल स्वाभाविकपणेच मला सहानुभूती वाटते आणि मी त्यांचा आभारी आहे. त्याच अशा आहेत की ज्यांनी कोठडीत टाकणाऱ्या गुन्हेगारांना न्यायासनासमोर खेचण्यासाठी हास्यास्पद सबबी शोधल्या नाहीत.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जून २, १८९६]

भारतीय लोकांचा आपल्या उद्धारासाठी जो संघर्ष चालू होता तो संघर्ष आफ्रिकी रंगीत लोकांच्या उद्धाराचाही पर्यायानं संघर्ष आहे हे त्यांच्या प्रथमच लक्षात आलं. भारतीयांचा संघर्ष

जसजसा वाढत गेला तसतशी त्यांची ही जाणीवही वृद्धिंगत होत गेली. भारतीयांनी शस्त्रांचा उपयोग न करता आपल्या लढ्यात जे यश मिळवलं होतं त्यातून संपूर्ण आफ्रिकेतील स्वातंत्र्य आंदोलनाला प्रेरणा मिळाली व ते आंदोलन काळ्या माणसाच्या स्वाभिमानाचं आणि अनेक देशात गमावलेल्या वारसासाठी चाललेल्या लढ्याचं पूर्वचिन्ह ठरलं.

६

नाताळच्या संसदेनं तिसऱ्या वाचनानंतर मतदान दुरुस्ती विधेयक १८९४ साली मंजूर केल्यानंतर तीन दिवसांनी ते राज्यपालांकडे पाठवण्यात आलं. त्याला एक परंतुक जोडण्यात आलं होतं. त्या परंतुकानुसार जोपर्यंत सम्राज्ञींची इच्छा ते अमान्य करावं अशी नाही असं राज्यपाल कळवत नाहीत तोपर्यंत त्या विधेयकाचं कायद्यात रूपांतर होणार नव्हतं. त्याचबरोबर सर जॉन रॉबिन्सन यांनी १० जुलै १८९४ला एक टिपणही पाठवलं होतं. ते असं होतं :

मंत्री नम्रतापूर्वक असं निदर्शनास आणून देऊ इच्छितात की ह्या उपायाला.... विधानसभेच्या दोन्ही सभागृहांची एकमतानं संमती मिळालेली आहे. आशियातील लोकांना मतदानाच्या हक्काचा स्वतंत्रपणे आणि बुद्धिमत्तापूर्वक उपयोग करायचा अनुभव आणि सवय नसल्यामुळे मतदानाच्या हक्कापासून त्यांना वंचित केलं नाही तर ते फार दूरवर नसलेल्या काळातच युरोपिअन मतदारांना गिळंकृत करतील असा वसाहतीत वास्तव्य करणाऱ्या सर्व युरोपिअनांचा विश्वास आहे.

'नेटिव्ह आणि वसाहतीत राहणाऱ्या लोकांच्या हिताकडे लक्ष देण्याची कळकळीची विनंती करण्यात आली होती. जोपर्यंत त्यांना 'मताधिकार मिळत नाही तोपर्यंत स्थानिक सरकार आणि संसद त्यांच्या हितरक्षणासाठी जबाबदार राहणार होते.' टिपणात पुढं लिहिण्यात आलं होतं:

सरकारचं असं मत आहे की वसाहतीसाठी या कायद्याशिवाय अन्य पर्याय नाही. *आमची खात्री आहे की हे असे उपाय आहेत ज्यांची जनता आपल्या हितासाठी* मागणी करत आहे आणि जनतेच्या उच्च दर्जाच्या हिताच्या दृष्टीनं त्यांचं समर्थन करता येऊ शकतं. (तिरपी अक्षरं माझी)

त्याच्या घटनात्मक अंगाकडे लक्ष वेधत महाधिवक्ता हॅरी एस्कॉम्ब यांनी १३ जुलैला लिहिलं : 'माझं असं मत आहे की या विधेयकाला संमती द्यायला काहीच हरकत नाही.'

नाताळच्या राज्यपालांनी हे विधेयक वसाहत मंत्र्यांना विधेयकाला मान्यता द्यायची विनंती करत पाठवलं. त्यांनी लिहिलं की ज्यांना मताधिकार आहे त्यांच्यातील कुणालाही, 'मग तो आशियायी असो वा नसो', मतदानाच्या अधिकारापासून वंचित करण्यात आलेलं नाही. याचा ज्यांच्यावर परिणाम झालेला आहे ते केवळ दुकानदार आणि त्यांचे कारकून वगैरे आहेत. त्यांची संख्या ४०० च्या दरम्यान आहे. कलकत्ता आणि मद्रास येथील हिंदू आणि तामिळ मजुरांचा आणि घरगुती नोकरांचा समावेश असलेल्या तसंच आधी बंधुआ मजूर असलेल्या व कराराची मुदत संपलेल्या व आता माळ्याची वगैरे कामं करणाऱ्या इतर बहुतेक आशियायी लोकांचे हितसंबंध आणि यांचे हितसंबंध यात काहीच साम्य नाही. यांच्यातील बहुतेकांचं संरक्षण खास कायद्यांद्वारे करण्यात आलेलं आहे व त्यांची मुदत संपताच आपल्या स्वतःच्या देशात जाण्यासाठी प्रवासखर्च मिळायचा त्यांना हक्क आहे. दुकानदार *हे स्वतःहोऊन आलेले आहेत.... आमंत्रणानंतर आलेले ते पाहुणे नाहीत. वसाहत त्यांच्याशिवायही राहू शकली असती परंतु तरीही तिनं त्यांना येऊ दिलं. वसाहतीचं केवळ एवढंच म्हणणं आहे की या देशातील शासनात त्यांनी हस्तक्षेप करू नये. यापुढे जे कोणी येतील त्यांना हे माहीत असेल की भविष्यात त्यांना मतदानाचा अधिकार मिळणार नाही.* (तिरपी अक्षरं माझी)

राज्यपालांनी आपल्या टिपणात पुढं लिहिलं की 'आशियायी लोकांना त्यांच्या देशात मताधिकार मिळतो की नाही हा प्रश्न नाही तर या वसाहतीच्या सरकारवर नियंत्रण मिळवू शकेल अशा प्रकारचा मताधिकार त्याला द्यावा काय हा प्रश्न आहे.' जसा कायदा आहे तसाच राहिल्यास

'नवीन येत राहिलेल्या आशियायी लोकांमुळे सध्याच्या आशियायी मतदारांची संख्या इतकी वाढेल की आशियायी मतदारांचा निवडणुकीत फार प्रभाव पडेल व परिणामी नाताळच्या हितसंबंधांवर *त्याचा गंभीर परिणाम होईल व दक्षिण आफ्रिकी गणराज्य कायम टिकवणं अशक्य होईल.'* जर या विधेयकाचं कायद्यात रूपांतर होऊ दिलं तर 'कुणावरही अन्याय न करता' हे संकट टाळता येऊ शकेल. (तिरपी अक्षरं माझी)

वसाहतीत स्थायी झालेल्या व साम्राज्याचे नागरिक असलेल्या राणीच्या भारतीय प्रजेच्या हितरक्षणाची जबाबदारी असलेल्या सम्राज्ञीच्या सरकारचं प्रतिनिधित्व करणाऱ्या माणसाकडून अशा प्रकारचं शिफारसपत्र जावं ही आश्चर्याची गोष्ट होती. परंतु नंतर नाताळ ॲडव्हरटाईझरनं जाहीर केल्याप्रमाणे 'कुंभाराच्या हातातील मातीप्रमाणे' [नाताळ ॲडव्हरटाईझर, जून २, १८९६] राज्यपाल महोदयाचे मंत्रिमंडळाशी संबंध होते. गांधीजींनी तयार केलेलं भारतीयांचं जे निवेदन मध्यंतरीच्या काळात राज्यपालांना सादर करण्यात आलं होतं त्या निवेदनावर सर जॉन रॉबिन्सन यांनी दिलेलं मत असं होतं :

सध्याच मतदार सूचीवर १०,००० मतदार आहेत. त्यात ८,८८८ अर्जदारांची इच्छा या क्षणी मान्य करण्यात आल्यास ते एकूण मतदारांच्या नऊदशांश होतील. आशियायी लोकांना मतदानाचा अधिकार देण्यात आल्यास संभाव्य धोका किती मोठा आहे याचाच हा पुरावा आहे.

सर जॉन रॉबिन्सन हे विधान कसं करू शकले ही गोष्ट कुणाच्याही आकलन शक्तीच्या पलीकडील ठरावी. नाताळच्या स्वयंशासित सरकारनं तयार केलेल्या घटनेनुसार मतदानासाठी संपत्तीची जी पात्रता ठरवण्यात आली होती तिच्यासाठी भारतीयांचा लहानसा वर्ग तर सोडाच पण सर्व गोरेही पात्र ठरू शकत नव्हते. त्यामुळे निवेदनावर स्वाक्षरी करणाऱ्या सर्वांची नावं मतदार सूचीत सामील होतील असा विचारच निरर्थक होता. ते गृहमंत्रालयाची जाणीवपूर्वक दिशाभूल करत होते हे राज्यपालांना माहीत असायला हवं होतं?

ते पुढं म्हणाले की तर्कशुद्ध निष्कर्ष तर हा आहे की 'सध्याच्या या मतदारांनाही अपात्र ठरवायला पाहिजे.' जखमेवर मीठ चोळत समारोप करताना ते म्हणाले, 'वसाहतीत जन्म घेतलेल्या भारतीयांच्या मुलांमध्ये त्यांच्या पूर्वजांच्या वंशाचे गुण येणार नाहीत असं म्हणण्यासारखं कोणतंच कारण नाही. आशियायी लोकांचा मताधिकार कायम ठेवण्यात आल्यास विविध वंशातील लोकांमध्ये यापुढे कटुता निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास ठेवण्यासाठी भरपूर कारणं आहेत.'

१८९४च्या जुलैच्या अखेरीस मतदान दुरुस्ती विधेयकाशी संबंधित सर्व कागदपत्रे लंडन येथे पाठवण्यात आली. ती कागदपत्रे मिळाल्यानंतरही लॉर्ड रिपन यांनी त्यासंबंधी मौन बाळगलं. परंतु डेली क्रॉनिकलला कुठून तरी या गोष्टीचा वारा लागला. त्यानं लिहिलं,

लॉर्ड रिपन यांनी अडथळा आणला नाही तर नाताळमधील पहिल्या जबाबदार मंत्रिमंडळानं स्वतःचा वेगळेपणा सिद्ध करायचं ठरवलेलं आहे असं दिसतं. अतिशय महत्त्वाचं असं त्यांचं मतदान दुरुस्ती विधेयक वसाहत मंत्रालयाच्या मान्यतेसाठी येत आहे आणि आम्ही अपेक्षा करतो की मान्यवर महोदय त्याला कचऱ्याची पेटी दाखवतील.

मतदानाचा जुनाच कायदा कायम राहिला तर भारतीय लोक युरोपिअन लोकांना मतदानात पराभूत करतील या भीतीबद्दल त्यांनी लिहिलं :

या दोन राष्ट्रातील लोकांची संख्या जवळपास समान आहे, परंतु बहुतांश भारतीयांची जी हलाखीची परिस्थिती आहे ती पाहता ही भीती अनावश्यक असल्याचं सिद्ध होतं. नाताळच्या महाधिवक्त्यांप्रमाणे आम्हाला 'या उपायात काही न्याय वा औचित्य असल्याचं दिसत नाही.' त्यासाठी जो युक्तिवाद करण्यात आला आहे तो जसा हास्यास्पद आहे तसाच अपमानकारकही आहे. भारतातील व्हाईसराय यांच्या मंत्रिमंडळात जर स्थानिक सदस्य आहेत तर नाताळच्या विधानसभेच्या आणि विधानपरिषदेच्या मतदार संघांनी जर भारतीयांना निवडून दिलं तर त्यांना

वाळीत टाकायचं काही कारण नाही. [*भारत*, सप्टेंबर १८९४, पृष्ठ २६५-६६] यावर भाष्य करत एफ. आर. एस. यांनी नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये लिहिलं

तुम्ही स्वतः भारतीयांना राजकीय हक्क नाकारता परंतु भारतीयांना वस्त्यांमध्ये राहायला भाग पडणारा कायदा रद्द करण्यासाठी ट्रान्सवाल सरकारवर साम्राज्याचं सरकार दडपण आणणार आहे असं तुम्ही ऐकता तेव्हा तुम्ही टाळ्या वाजवता. तुमच्या स्वतःच्या नेटिव्हांच्याबाबतीत बाह्य हस्तक्षेपाला तुम्ही आक्षेप घेता परंतु ट्रान्सवालमधील नेटिव्हांच्या प्रकरणी हस्तक्षेप करण्यासाठी साम्राज्याच्या सरकारला चिथावणी देता. हा भंपकपणा आहे काय? हा मूर्खपणा आहे काय? की ही चूक आहे की दोन्ही आहेत? ट्रान्सवालमध्ये हस्तक्षेपासंबंधी बोलण्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीमुळे नाताळमधील प्रकरणात दुर्बलता निर्माण होत नाही काय? [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर ६, १८९४]

सेवानिवृत्त अधिकारी सर विल्यम वेडरबर्न यांनी हे प्रकरण हाउस ऑफ कॉमन्समध्ये उचललं. त्यांच्या भावाच्या मृत्यूनंतर त्यांना कुटुंबाची संपत्ती आणि उमरावपद मिळालं होतं व ते सभागृहात निवडून आले होते. त्यांनी वसाहत मंत्र्यांना विचारलं की भारतीयांना मतदान हक्कापासून वंचित करणाऱ्या मतदान दुरुस्ती विधेयकाला विरोध करणारं नाताळमधील भारतीयांचं निवेदन वसाहत मंत्र्यांना मिळालं काय आणि ते विधेयक प्रतिगामी स्वरूपाचं आणि वांशिक भेदभावाच्या आधारावर अपात्रता ठरवणारं आहे या कारणासाठी वसाहत मंत्री ते विधेयक रद्द ठरवणार आहेत काय? त्याला उत्तर देताना उपमंत्री श्रीयुत बक्सटन दिनांक २३ ऑगस्टला म्हणाले की सन्माननीय सदस्यांनी उल्लेखिलेलं निवेदन मिळालेलं आहे आणि असं कळलं आहे की त्या मागोमाग दुसरं निवेदन येत आहे. परंतु हा कायदा मात्र सम्राज्ञींच्या सरकारच्या विचारार्थ नुकताच आलेला आहे. त्यामुळे या विषयावर सध्याच मी कोणतंच निवेदन करू शकत नाही.

कोणत्याही प्रकारचं निश्चित आश्वासन देणारं हे उत्तर नसल्यामुळे नाताळमधील वृत्तपत्रातून गोंगाटाला सुरुवात झाली. नाताळ विटनेसनं लिहिलं की उत्तराचा सूर असा काही आहे की जो 'आपल्याला अगदी आवडणार नाही.' परंतु याचा फार कमी परिणाम झाला. विल्यम वेडरबर्नसारख्या माणसानं केलेला विरोध असा नव्हता की ज्याची मनातून भीती वाटावी. 'ते जेव्हा भारतात होते तेव्हाही ते स्थानिक लोकांना मतदानाचा अधिकार द्यायच्या बाजूनं असलेल्या एका प्रगत विचारसरणीचे पुरस्कर्ते होते व सरकारमध्ये प्रवेश केल्यानंतरही कोणत्या तरी प्रकारच्या प्रातिनिधिक सरकारमध्ये काम करायच्या भारतीयांच्या पात्रतेविषयी त्यांनी आपली मतं बदललेली नव्हती.' 'लॉर्ड रिपन यांचं सरकार भारतात असताना त्यांच्या विचारामुळे बऱ्याच गोंधळाची आणि आंदोलनाची परिस्थिती निर्माण झाली होती व अशा प्रकारच्या आंदोलनांनी तुमच्या उद्दिष्टांची पूर्ती होणार नाही असं त्यांच्यानंतर आलेल्या लॉर्ड लँड्सडाऊन यांना त्या आंदोलकांना सांगावं लागलं होतं.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर १३, १८९४] त्या वेळच्या लॉर्ड रिपन यांचे विचार अजूनही आहेत काय याची त्यांना खरोखरी काळजी वाटत होती.

नाताळ विधेयक कदाचित दुरुस्तीसाठी परत पाठवण्यात येईल अशा प्रकारची एक अफवा पसरलेली होती. परंतु विधेयकाकडे महत्त्वाच्या शासकीय नियतकालिकांचं वा मंत्र्यांच्या इतर वृत्तपत्रांचं लक्ष गेलेलं नसल्यामुळे आणि संसद स्थगित असल्यामुळे वसाहत मंत्रालयाचं नेमकं मत काय आहे ते कळत नव्हतं. नाताळ मंत्रिमंडळानं तोंडी मूग धरल्यामुळे नाताळच्या गोऱ्यांची अस्वस्थता अजूनच शिगेला पोहोचली होती. मेच्या तिसऱ्या आठवड्यानंतर मंत्रिमंडळाला आपलं मौन तोडणं भाग पडलं. बेलियर येथे एका जाहीर सभेत बोलताना नाताळ विधान सभेचे सभापती स्टाईनबेक यांनी जाहीर केलं की 'जर विधेयकाच्या बाबतीत नकाराधिकार वापरण्यात आला तर येत्या सत्रात जवळपास त्याच स्वरूपात ते मंजूर करण्यात येईल' व 'तत्त्वाला मान्यता मिळेपर्यंत ते अजून कठोर स्वरूपात मंजूर करण्यात येईल.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर १३, १८९४ आणि सप्टेंबर २१, १८९४]

त्यावर नाताळ विटनेसनं सुचवलं की विधेयकाच्या बाबतीत नकाराधिकार वापरण्यात येतो की नाही याचा विचार न करता केपचे प्रधानमंत्री (१८७८-८१) सर जॉन गॉर्डन स्प्रिंग यांनी केप रजिस्ट्रेशन विधेयकाच्या वेळी जसं करायची धमकी दिली होती तसं करून विधेयकाच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात यावी. जर अफवा 'खरी असल्याचं सिद्ध होईल तर सूचना निर्धारानं परंतु नम्रपणानं नाकारण्यात यावी. मतदानाचा अधिकार कोणत्या वर्गाच्या लोकांना असावा हे ठरवायचा एकमेव अधिकार वसाहतीलाच असायला हवा.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर १३, १८९४] भारतीयांच्या निवेदनानं दक्षिण आफ्रिकेत उडालेल्या खळबळीमुळे आणि प्रसिद्धीमुळे धास्तावून त्यानं लिहिलं : 'आशियातील सूत्रधारांचा हेतू क्रांती करायचा आहे व त्यामुळे त्यांच्याकडून वा त्यांच्यावतीनं देण्यात आलेल्या कोणत्याही निवेदनाचा विचार करण्यात येऊ नये.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर १३, १८९४] आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी द टाईम्सनं केलेल्या भाष्यातील उद्धरण दिलं : 'काही तरी करण्यात आल्याशिवाय म्हणजे मतदान अधिकारावर निर्बंध आणण्यासारखं काही तरी करण्यात आल्याशिवाय वसाहतीची ब्रिटिश भारताच्या काफिर संस्थानात गणना व्हायला फारसा वेळ लागणार नाही आणि मग त्या परिस्थितीत कोणताही स्वाभिमानी युरोपिअन शासनाची जबाबदारी नाकारील' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर १३, १८९४]

वसाहतीला विश्वासात घेण्याबाबत नाताळ सरकारच्या निरुत्साहामुळे नाताळ ॲडव्हरटाईझरनं विनंती केली की 'जर विधेयकासाठी नकाराधिकार वापरण्यात आला तर सरकार तसंच दुसरं विधेयक आणील हे वसाहतीनं लोकांना सांगायला पाहिजे म्हणजे मंत्रिमंडळाला आपण लोकेच्छेच्या हातातील कळसूत्री बाहुली आहोत हे दाखवता येईल.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर १४, १८९४] *नाताळ ॲडव्हरटाईझर*नं त्यापुढं जाऊन सुचवलं की 'वसाहत मंत्र्यांनी विधेयकात काही परिवर्तन करायचं सुचवलं तर केप सरकारचं मन अशाच प्रकारचं विधेयक पुन्हा मान्य करण्यासाठी वळवण्यात यावं जेणेकरून दोन्ही वसाहतींना संयुक्त लढा देता येईल.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर १४, १८९४]

सेंट जेम्स बजेट ह्या वृत्तपत्रानं नाताळमधील गोऱ्यांना पाठिंबा मिळवून द्यायचा प्रयत्न सुरू केला. स्वयंशासित सरकारनं घटनात्मक पद्धतीनं व्यक्त केलेली इच्छा प्रतिगामी असल्यामुळे ती टाकाच्या एका फटकाऱ्यासरशी फेटाळण्यात यावी असं लॉर्ड रिपन यांना सांगितल्याबद्दल सर विल्यम वेडरबर्न यांना धारेवर धरत त्यानं विचारलं की ज्या वसाहतीनं स्वयंशासनाचा अधिकार मिळवला आहे त्या वसाहतीनं मंजूर केलेल्या विधेयकासाठी नकाराधिकार वापरायची अधिकारीवर्गाला सूचना देणं हे उदारमतवाद्याच्या प्रतिगामीपणाचं लक्षण नाही काय?' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर १४, १८९४] 'गोरे, काळे आणि तपकिरी रंग असलेल्या लोकातील सुसंवाद आणि विसंवादाची कारणं' या नावाच्या लेखात प्रसिद्ध चित्रकार व्हिसलर याच्या तैलचित्रात जे दाखवलं होतं त्याप्रमाणे ऱ्होड्सनं 'नेटिव्ह हे मानसिक दृष्टीनं मुलं आहेत अशी घोषणा केली होती.'

ज्या युरोपिअनांना मतदान अधिकाराचा उपभोग घ्यायचा युगायुगांचा अनुभव आहे त्यांच्या २१ वर्षाखालील मुलांना महाविद्यालयीन शिक्षणाचं कवच लाभलेलं असूनही मतदानाचा अधिकार देण्यात येत नाही त्यांच्याचप्रमाणे येणाऱ्या काही काळापर्यंत नाताळमधील आशियायी लोकांना सांसदीय मतदानाच्या अधिकाराच्या दृष्टीने या २१ वर्षाखालील युरोपिअन लोकांच्या बरोबरीत ठेवण्यात यावं व मतदानाच्या अधिकारासाठी ते अपात्र आहेत असं सर जॉन यांना जर गृहीत धरावं लागलं असेल तर त्यात काही आश्चर्य आहे काय? जोपर्यंत आपण विसावं शतक पूर्ण करून नवीन सहस्रकात पोहोचत नाही तोपर्यंत तरी काळ्यांना आणि तपकिरींना अल्पवयीन समजण्यात यावं अशी नाताळच्या गोऱ्यांची एकमुखानं मागणी आहे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर १४, १८९४ मध्ये सेंट जेम्स बजेट मधून उद्धृत]

'कुलींचा प्रश्न परत उद्भवण्यासाठी मुख्यत्वेकरून डरबनमध्ये वकिलीचा व्यवसाय करणाऱ्या एका भारतीयाचं आंदोलन जबाबदार आहे' असं नाताळ मर्क्युरीनं लिहिलं. त्यानं सूचित केलं की 'काही प्रमाणात वसाहत मंत्र्यावर त्या विधेयकाचं कायद्यात रूपांतर करण्यात येऊ नये म्हणून दडपण आलं आहे यात काही संशय नाही.' नाताळच्या लोकांना समाधानकारक

बातमी आम्ही एवढीच देऊ शकतो की 'श्रीयुत गांधींच्या विचारसरणीला फारसे पाठीराखे मिळालेले नाहीत.' प्रश्न स्पष्ट आहे. 'एक तर नाताळनं गोऱ्यांची वसाहत राहायला पाहिजे व तिचं सरकार गोऱ्यांचं असलं पाहिजे' वा तिनं 'भारतीय साम्राज्यांतर्गत असलेल्या संस्थानाचा दर्जा स्वीकारायला पाहिजे. आमचे समकालीन सांगतात की आज आपण या चौरस्त्यावर येऊन पोहोचलो आहोत. सम्राज्ञींच्या अनुमतीची वाट पाहत असलेल्या विधेयकाच्या वाटेनं जायचा हा एकच उपाय आहे असं त्यांचं मत आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, जानेवारी ११, १८९५] एका प्रख्यात प्रतिनिधीनं नुकतीच इंग्लंडला भेट दिली असता त्यानं गृहमंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याजवळ काढलेल्या उद्‌गारांचं पुनरुच्चारण करत नाताळ मर्क्युरीनं लिहिलं, 'विधेयक जर नामंजूर करण्यात आलं तर तशाच स्वरूपातील विधेयक परत येणार नाही तर त्याहून कठोर विधेयक परत येईल.' [*नाताळ मर्क्युरी*, जानेवारी ११, १८९५]

भारतीयांच्या डोक्यावरील राजकीय आकाश केवळ नाताळमध्येच ढगाळलेलं होतं असं नाही. केप, झुलूलँड आणि सनदप्राप्त वसाहतीतील वातावरणही तेवढंच निराशाजनक होतं. 'चर्च आणि सरकारमध्ये समता नाहीं' या तत्त्वानुसार डच गणराज्यांनी बर्गर सोडून इतर सर्वांचा मतदानाचा अधिकार काढून घेऊन आणि आफ्रिकी लोकांसाठी वेगळ्या चर्चची स्थापना करून 'रंगीतांचा प्रश्न' कायमचा सोडवला होता. केपमध्ये सेसिल ऱ्होड्सनी बाँडमधील डचांचं अनुकरण करत 'मतपत्र आणि मतदान अधिकाराच्या १८९२च्या कायद्यान्वये' संपत्तीची पात्रता वाढवून आणि शिक्षणविषयक चाचणी सुरू करून 'काफिरांना सरसहा' मतदानाचा जो अधिकार होता तो काढून घेतला होता. पुढील वर्षी त्यांनी वेगात हालचाल केली. डॉ. अब्दुर रहमान हे केप विभागातून निवडून यायची शक्यता होती. त्या विभागातील प्रत्येक मतदाराला चार मतं द्यायचा जो खास अधिकार होता त्यामुळे हे शक्य झालं होतं. ऱ्होड्सनं तो विशेषाधिकार काढून घेतला. १८९४च्या निवडणुकांनंतर त्यांनी, आफ्रिकेसाठी असलेला ग्लेन ग्रे कायदा केला. फेब्रुवारी १८९५मध्ये केपमधील सर्व महापौरांची केपटाऊन येथे एक परिषद भरवली. त्यात ज्या उपायांचा

विचार करण्यात आला होता त्यात 'नेटिव्ह, भारतीय कुली आणि चिनी या सर्व लोकांना वेगळ्या वस्त्यात राहायला लावणं, आशियायी लोकांच्या वसाहतीतील आयातीला प्रोत्साहन न देणं आणि त्यांच्या आगमनावर निर्बंध घालणं' या उपायांचा समावेश होता. [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी ४, १८९५] 'सरकारनं या लोकांची वसाहतीत आयात करण्यावर बंदी वा नियंत्रण' आणण्यासंबंधीची वेळ आलेली आहे असा प्रस्ताव काँग्रेसनं केला. परंतु ह्होड्सना स्वतःलाच काही भीती वाटत होती. केप संसदेत मोल्टेनोनं प्रश्न विचारला असता ह्होड्सनी उत्तर दिलं की साम्राज्याचं सरकार 'विशिष्ट वंशियांना भेदभावाची वागणूक देणाऱ्या कायद्याला मान्यता देणार नाही.' ते पुढं म्हणाले की नाताळनं या विषयावरील परिषदेत सहभागी होण्यासाठी केपला आमंत्रण दिलं होतं परंतु अशा प्रकारच्या परिषदेत सहभागी व्हायचा तुम्हांला काय अधिकार आहे असा त्यांनी प्रश्न उपस्थित केला असता. असं झालं असतं तर या लोकांविरुद्ध आपल्याला एक होऊन कृती करता आली असती. पण 'तसं न करता आल्यास हे लोक नाताळच्या मार्गानं इथं येतील.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे २०, १८९५]

हा संदर्भ होता संपूर्ण दक्षिण आफ्रिकेतील आशियायी लोकांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी नाताळनं प्रस्तावित केलेल्या कुली परिषदेचा. या परिषदेत गणराज्यांमधील तसंच दोन वसाहतीतील प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आलेलं होतं. 'ह्या प्रश्नाची सोडवणूक आधीच कायदा करून केलेली असल्यामुळे' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २९, १८९५] ऑरेंज फ्री स्टेटनं त्या परिषदेत भाग घ्यायला नकार दिला. त्यामुळे ती परिषद होऊ शकली नाही. राडचा अध्यक्ष म्हणून नाताळनं त्याबद्दल अतिशय कटू टीका केली आणि 'ऑरेंज फ्री स्टेटबरोबर कोणत्याही प्रकारच्या परिषदेत सहभागी व्हायला नकार दिला.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २९, १८९५] दुसरीकडे ट्रान्सवाल गणराज्याला वाटलं की डी व्हिलर्सनं त्यांच्या बाजूनं निर्णय दिलेला असल्यामुळे (पुढील प्रकरण पहा) त्यांना इतर कोणतीही वेगळी कृती करायची आवश्यकता नाही. परंतु त्यानंतर थोड्याच दिवसात *'नेटिव्ह' आणि भारतीयांना बाहेर काढून विशिष्ट वस्त्यात राहायला भाग पाडणारे आणि*

फुटपाथवर चालायला मनाई करणारे पोटनियम तयार करायची परवानगी ईस्ट लंडन नगरपालिकेला देऊन केपच्या विधानसभेला काही प्रमाणात आपलं ध्येय साध्य करता आलं.

एवढंच नाही तर झुलू लँडनंही भारतीयांशी भेदभाव करणारे पोटनियम तयार केले होते. (पुढील प्रकरण पहा.) केप टाईम्सच्या कथनानुसार सनद प्राप्त प्रदेशात स्थानिक युरोपिअन व्यापाऱ्यांना आशियायी आणि अरब व्यापाऱ्यांची 'भीती वाटायला' सुरुवात झालेली होती व त्यांनी त्यांना विरोध करायला सुरुवात केलेली होती. [*केप टाईम्स*, ऑक्टोबर २४, १८९५] एका भारतीय व्यापाऱ्याला नागरी आयुक्तांनी व्यापाराचा परवाना नाकारल्यानंतर त्यानं उच्च न्यायालयात दाद मागितली आणि अशा प्रकारे परवाना नाकारता येत नाही असा उच्च न्यायालयानं निर्णय दिला. त्यावर बुलेवायो चेम्बर ऑफ कॉमर्सनं आंदोलन केलं आणि अशा प्रकारे परवाने द्यायला विरोध करणारा एक ठराव सभेत पारित करण्यात येऊन तो ऱ्होड्स यांना पाठवण्यात आला. *साऊथ आफ्रिकन टाईम्सनं* केलेल्या वर्णनानुसार 'कोणत्याही चांगल्या अर्थानं ती सभा पुरेशी प्रातिनिधिक नव्हती' आणि ती खरोखरीच तशी असल्यास 'सॅलिसबरी रहिवाशांच्या नावात फारशी भर घालणारी नव्हती.' [*साऊथ आफ्रिका टाईम्स*, नोव्हेंबर ७, १८९५]

भवितव्य नैराश्यपूर्ण होतं. भारतीयांविरूद्धची परिस्थिती भयावह होती. गांधीजींनी राजकारणाच्या उंबरठ्यावर नुकतंच कुठं पाऊल ठेवलं होतं. त्यांना काहीच अनुभव नव्हता. त्यांना असा काही अधिकारही नव्हता की ज्यावर ते विसंबून राहू शकत होते. त्यावेळी एकच अधिकार चालत होता आणि तो अधिकार होता बळाचा. भारतीय समाजाजवळ हा अधिकार नव्हता. अहिंसा गांधीजींच्या दृष्टीच्या टप्प्यात अजून आलेली नव्हती. परंतु त्यांच्या तरुणाईची साम्राज्याच्या विवेकावर असीम श्रद्धा होती. ब्रिटिशांच्या स्वातंत्र्याच्या आदर्शावर, न्यायावर आणि युरोपिअनांनाही शक्य होऊ नये एवढ्या सश्रद्धपणे ख्रिश्चनत्वाच्या सिद्धान्ताप्रमाणे ते करत असलेल्या आचरणावर गांधीजींचा विश्वास होता. विश्लेषण केल्यानंतर गांधीजींनी निष्कर्ष काढला की दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांच्या वर्तणुकीचा जन्म द्वेषातून, भीतीतून आणि

अज्ञानातून जन्मलेल्या पूर्वग्रहातून झालेला आहे व त्यामुळे त्यांना त्यांच्याच आदर्शाच्या आणि त्यांच्या खऱ्या स्वार्थाच्या विरुद्ध वागावं लागत आहे. त्यांचा माणसाच्या मूलभूत स्वभावावर विश्वास होता. त्यांचं म्हणणं होतं की माणूस हा विवेकशील प्राणी आहे. आपण त्याला जे काही सांगतो आहोत ते केवळ सत्य आहे सत्याशिवाय काहीच नाही याची त्याला जाणीव करून द्यायला पाहिजे, आपल्या शब्दामागे असलेली मैत्रीची भावना त्यांच्या प्रत्ययास आणून दिली पाहिजे. तसंच ज्या आदर्शावर आणि मूल्यांवर त्याचं अंतःकरणापासून प्रेम आहे तेच आदर्श आपलेही आहेत ही गोष्ट त्याला कळकळीनं समजावून सांगायची आवश्यकता आहे. असं झालं की त्यांच्या वर्तनात परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही. आणि हे परिवर्तन कोणत्याही बाह्य दडपणाशिवाय उत्स्फूर्त आणि आणि अंतःकरणातून निर्माण झालेलं असल्यामुळे गोऱ्यांनाही त्याचं प्रेम वाटणं अपरिहार्य होऊन ते चिरस्थायी होईल.

इंग्लंडमध्ये आंदोलन केल्यामुळे होणाऱ्या लाभाचा फारसा उपयोग होणार नाही कारण त्यामुळे वसाहतीतील दोन समुदायातील लोकांतील संघर्ष अजूनच वाढेल. काही लाभ झालाही तरी तो तात्कालिक असेल. भारतीयांना चांगली वागणूक देण्यासाठी जोपर्यंत वसाहतीतील युरोपिअनांना प्रेरित करता येत नाही तोपर्यंत गृहमंत्रालयानं कितीही लक्ष ठेवलं तरी गणराज्यांच्या शासनात भारतीयांना अतिशय खडतर संकटांना तोंड द्यावं लागणार आहे. [नाताळ विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना आणि सन्माननीय विधानसभेला गांधीजींचं अनावृत पत्र, दिनांक डिसेंबर १८९४, (अभिसरण डिसेंबर १९, १८९४)]

७

हीच ती विचारसरणी होती की ज्यामुळे नाताळ इंडियन काँग्रेसचे सचिव म्हणून गांधीजींना काँग्रेसच्या पहिल्या वर्षातच नाताळ विधानसभेच्या आणि नाताळ विधानपरिषदेच्या सदस्यांना अनावृत पत्र पाठवायची प्रेरणा झाली आणि नंतर ते पत्र फार गाजलं. गांधीजींनी लिहिलं होतं की वसाहतीत भारतीयांकडे तुच्छ प्राणी म्हणून पाहिलं जातं. ज्या कुणाला डोळे

आहेत त्याला हे दिसेल. जर हा तिरस्कार भारतीयांच्या रंगावर आधारित असेल तर आशेला नक्कीच काही जागा नाही, *'मग भारतीय जेवढ्या लवकर ही वसाहत सोडतील तेवढं बरं. त्यानं काहीही जरी केलं तरी त्याला गोरी कातडी मिळू शकत नाही.'* (तिरपी अक्षरं माझी) परंतु तो तिरस्कार जर त्याच्या सर्वसामान्य स्वभावाविषयीच्या आणि सिद्धीविषयीच्या अज्ञानातून जन्माला आलेला असेल तर वसाहतीतील युरोपिअनांकडून त्याला योग्य आणि न्याय्य वर्तणूक मिळायची आशा आहे. ते लोक अंतःकरणातून चांगले व न्यायी आहेत अशी गांधीजींची त्यामागील धारणा होती. त्यांनी स्पष्टीकरण देत लिहिलं की नाताळ संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या तुम्हा आदरणीय सदस्यांना मी पत्र लिहीत आहे कारण तुम्ही जनमताचे प्रवक्ते आणि नेते आहात. तुम्ही ज्या विचाराची आणि वर्तनाची पायवाट पाडाल त्यावरूनच इतर लोक वाटचाल करतील.

गांधीजींनी त्यांना चार प्रश्नांचा विचार करायची विनंती केली :

(अ) भारतीयांनी वसाहतीत राहावं असं वाटतं काय ? (ब) ते काय आहेत? ट्रान्सवालच्या घटनेत गृहीत धरण्यात आल्याप्रमाणे ते असंस्कृत आदिवासी लोक आहेत की ज्या कुटुंबाचे युरोपिअन लोक सदस्य आहेत त्याच प्राचीन काळापासूनची परंपरा आणि संस्कृतीचा वारसा असणाऱ्या, ज्याची तुलना इतर कुणाशीच करता येत नाही अशा कुटुंबातील तेही सदस्य आहेत? (क) त्यांना मिळत असलेली वागणूक न्याय, नैतिकता आणि ख्रिश्चनत्वानं पुरस्कारिलेल्या जीवनशैलीशी सुसंगत आहे काय? (ड) वसाहतीतून भारतीयांना एकाएकी वा हळूहळू काढून टाकण्यात आल्यानं वसाहतीचा लाभ होणार आहे काय?

पहिल्या प्रश्नासंबंधी नाताळच्या ज्या लोकांना बोलायचा अधिकार होता त्यांनी मान्य केलं की वसाहतीच्या हितासाठी भारतीयांची उपस्थिती अपरिहार्य आहे. गोरे आणि काळे लोक जे काम करायला तयार नाहीत वा करू शकत नाहीत ते काम भारतीय चांगल्या रीतीनं करतात. भारतीयांना काढा आणि मग वसाहतीतील साखर व्यवसायाची काय वासलात लागते पाहा ! आणि नाताळच्या विपरीत दक्षिण आफ्रिकेतील गणराज्यांनी 'नेटिव्हांच्या बाबतीत कठोर

भूमिका घेतलेली असतानाच' तेथील 'भूमी दक्षिण आफ्रिकेपेक्षा अतिशय सुपीक असूनही उजाड पडलेली होती.'

भारतीय व्यापाऱ्यांविरुद्ध, ज्यांना चुकून अरब समजण्यात येत असे, आरोप करण्यात यायचा की ते अप्रामाणिकपणानं व्यापार करणारे आहेत आणि नादारीविषयीचा त्यांचा इतिहास फार वाईट आहे. गांधीजींनी लक्षात आणून दिलं की सत्य हे आहे की याबाबतीत ते इतर युरोपिअन व्यापाऱ्यांपेक्षा चांगलेही नाहीत आणि वाईटही नाहीत. 'कोणावरही आरोप न करता मी एवढंच म्हणेन की जे निष्पाप आहेत त्यांनीच पहिला दगड मारावा! कृपा करून नादारीच्या न्यायालयाच्या कागदपत्रांचा अभ्यास करा.'

गोऱ्या व्यापाऱ्याविरुद्ध भारतीयांनी मिळवलेलं यश ही त्यांच्याविरुद्धची तक्रार असू शकत नाही. ते त्याच्या मेहनतीचं, कौशल्याचं, काटकसरीचं व दारूसारख्या व्यसनापासून मुक्त असायचं फळ आहे. त्यानं त्याची भाकरी घाम गाळून मिळवलेली आहे. तो करत असलेल्या स्पर्धेमुळे जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमी राहतात आणि त्यामुळे 'गरीब गोऱ्यांसाठी' तो खऱ्याखुऱ्या वरदानासारखा आहे. ज्या भारतीय मजुरांवर युरोपिअन मध्यमवर्गीयांची आणि उच्च वर्गाची संपन्नता अवलंबून आहे त्या भारतीय मजुरांच्या गरजांची त्याला माहिती असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेल्या सर्व वस्तूंचा तो पुरवठा करतो. त्यामुळे तो त्यांच्यासाठी अपरिहार्य झालेला आहे. अशा रीतीनं भारतीय व्यापारी वसाहतीतील लोकांसाठी आवश्यक आणि उपयुक्तच नाही तर त्यांच्या स्वास्थ्यासाठीही त्याची नितांत आवश्यकता आहे.

भारतीयांवर अस्वच्छतेचा आरोप करण्यात येतो. 'अतिशय दुःखद अंतःकरणानं' गांधीजींनी हा आरोप काही प्रमाणात मान्य केला. परंतु 'कठोर आणि तरीही न्याय्य व क्षमाशील वृत्तीनं स्वच्छताविषयक कायद्यांची अंमलबजावणी करण्यात आल्यास या दोषावर परिणामकारक उपाययोजना करता येऊ शकते आणि तो दोष कायमचा दूर करता येऊ शकतो' असं गांधीजींचं मत होतं. 'अतिशय गरीब असल्यामुळे वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष न देऊ

शकणाऱ्या' बंधुआ मजुरांचा अपवाद सोडल्यास एक वंश म्हणून भारतीयांच्या सवयी घाणेरडेपणाच्या नाहीत. 'व्यापारी समाजाच्या धर्मामुळे त्यांच्यावर आठवड्यातून किमान एक वेळा आंघोळ करायचं बंधन आहे आणि प्रत्येक प्रार्थनेपूर्वी त्यांना विधिपूर्वक आंघोळ करावी लागत असते. त्यांनी दिवसातून चारदा नमाज पढावी अशी त्यांच्याकडून अपेक्षा करण्यात आलेली आहे.' ते काहीही असलं तरी वसाहतीतून त्यांना हाकलून लावण्यासाठी त्यांच्या अस्वच्छतेच्या सवयींचं भांडवल करता येऊ शकत नाही. त्या बाबतीत त्यांच्यात 'सुधारणा घडवून आणताच येऊ शकत नाही असं काही नाही.'

दुसऱ्या मुद्याच्या बाबतीत गांधीजींनी मांडलेले विचार असे आहेत : भारतीय लोक हे हलक्या प्रतीच्या वंशातून जन्माला आलेले आहेत व रानटी लोकांपासून ते जर वेगळे असतीलच तरी ते एका पावलापेक्षा त्यांच्यापुढे नाहीत अशी जी दक्षिण आफ्रिकेतील लोकांची भारतीयांबद्दल धारणा आहे व या धारणेमुळे त्यांच्यावर 'निम्मे अथवा तीन चतुर्थांश' हालअपेष्टा लादण्यात आलेल्या आहेत ती धारणाच चुकीची असल्याचं अनेक विद्वानांनी दाखवून दिलेलं आहे. त्यांचं म्हणणं आहे 'ग्रीक आणि रोमन यांचे तसंच इंग्रज आणि भारतीयांचे पूर्वज एकच होते व ते पूर्वी आशिया खंडात एकत्र राहत होते, एकच भाषा बोलत होते व एकाच देवाची पूजा करत होते.' इंडियन एम्पायरचे लेखक डॉ. हंटर यांचं म्हणणं आहे की 'व्यवहार धर्माच्या समस्यांबद्दल ब्राह्मणांनी जी उपाययोजना सुचवली त्यातून आध्यात्मिक जीवनात उद्भवणाऱ्या समस्यांचं अंतिम उत्तर मिळालेलं आहे; ब्राह्मण तत्त्वज्ञानानं ग्रीक आणि रोमन काळातील तसंच मध्ययुगीन विचारवंतांना आणि विज्ञान युगातील आजच्या माणसाला भेडसावणाऱ्या धर्मासंबंधीच्या सर्व बौद्धिक समस्यांच्या संभाव्य उत्तरांचा विचार केलेला आहे.' मॅक्समुल्लर यांनी हिंदूंच्या तत्त्वज्ञानाची स्तुती केलेली आहे. प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ शॉपेनहॉवर उपनिषदाबद्दल म्हणाले : 'माझ्या जीवनाचं ते समाधान आहे, व माझ्या मृत्यूचंही तेच समाधान असेल.'

भारतीयांच्या चारित्र्यासंबंधी आणि सामाजिक जीवनासंबंधी विचार करायचा तर जॉर्ज बर्डवुड यांनी साक्ष दिली आहे की 'मुंबईच्या सेठिया समाजाचं नैतिक सत्यता हे जसं वैशिष्ट्य आहे तसंच हे वैशिष्ट्य ट्युटॉनिक वंशाचं आहे.' [नाताळ विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना आणि सन्माननीय विधानसभेला गांधीजींचं अनावृत पत्र, दिनांक डिसेंबर १८९४, (अभिसरण डिसेंबर १९, १८९४), टीप क्र. ६८ ते ६९मधील सर्व उद्धरणांसाठी पहा अनावृत पत्र] सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांनी नोंदवलं आहे की भारतीय आईवडिलांचं मुलांविषयी आणि मुलांचं आईवडिलांविषयीचं जे प्रेम असतं त्याच्यासारखं प्रेम इंग्लंडमध्ये क्वचितच दिसून येतं. 'पूर्वेकडील देशात ज्या प्रमाणात अपत्यप्रेम आणि पितृप्रेम आढळून येतं त्याच प्रमाणात आपल्या देशात स्त्री-पुरुषातील वासना असल्याचं आढळून येतं.' फ्रेड्रिक पिंकट यांनी विचारपूर्वक निर्णय दिला आहे की 'सर्व प्रकारच्या सामाजिक विषयांच्या संबंधात भारतीयांच्या पायाजवळ बसून इंग्रजांनी शिक्षण घ्यावं एवढी भारतीयांची पात्रता आहे, मालक व्हायची नाही.'

एम. एस. मेन, अँड्रयू कार्नेगी, मन्रो आणि सर चार्ल्स ट्रॅव्हलन यांच्यासारख्या गणमान्य व्यक्तींचे विचार विस्तारानं उद्धृत करत गांधीजींनी दाखवलं की भारतीय माणूस असंस्कृत असणं ही तर दूरची गोष्ट आहे. उलट त्याऐवजी साहित्य, कायदा, गणित आणि खगोलशास्त्र, प्रशासन आणि राज्यशास्त्र यात तर भारतानं जगाचं नेतृत्व तर केलं आहेच शिवाय पाणिनीचं व्याकरणशास्त्र आणि तुलनात्मक भाषाशास्त्र व धर्मशास्त्र यांची भारतानं जगाला खास देणगी दिलेली आहे. आणि ही निर्मितीक्षमता केवळ भूतकाळातच होती असं नाही तर ती भारताची जिवंत परंपरा आहे. [गांधीजींनी ज्या बौद्धिक जागृतीचा उल्लेख केला ती आपोआप संपुष्टात आलेली नव्हती हे डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांच्या पुढील नोंदीवरून स्पष्ट होते : १८७७ साली ११९२ धार्मिक विषयांवरील आणि ५६ मानसिक आणि नैतिक तत्त्वज्ञानावरील पुस्तकं भारतीय भाषांमध्ये प्रकाशित झाली होती. १८८२ साली हा आकडा वाढून क्रमशः १५४५ आणि १३३ झाला. याच काळात भारतीय भाषांमध्ये प्रकाशित झालेल्या वैद्यकीय विषयांवरील पुस्तकांची संख्या १३० आणि २१२ होती. त्याशिवाय नंतरच्या काळात निसर्ग विज्ञानावर ८७ पुस्तकं प्रकाशित झाली होती]

समकालीन भारतानं ख्रिस्तोदास पॉलसारखे वृत्तपत्रकार, महमूद - सर सैय्यद अहमद यांचे पुत्र - यांच्यासारखे न्यायशास्त्री, सर मुथुस्वामी ऐय्यर आणि फिरोजशहा मेहता यांच्यासारखे वक्ते यांना जन्म दिलेला आहे.

असा होता भारत. गांधीजींनी मान्य केलं केलं की नाण्याला दुसरी बाजूही आहे. परंतु दोन्ही बाजू 'डॅनिअलच्या निःपक्षपातीपणानं' तपासल्या तर 'असं बरंच काही शिल्लक राहिलेलं आढळेल की जे अस्पर्थ्य आहे व भारत.... अगदी खऱ्या अर्थानं सुसंस्कृत देश आहे असं मान्य करायला तुम्हाला प्रेरणा मिळेल.'

भारताचा इतिहास किती गौरवशाली आहे म्हणून तुम्ही आम्हांला जे काही सांगताहात त्याच्याशी आम्हांला काही कर्तव्य नाही परंतु वसाहतीतील भारतीय कसे आहेत ह्याचं आम्हांला महत्त्व आहे अशा आशयाच्या आक्षेपाची कल्पना करून गांधीजींनी पुढं लिहिलं : 'असं म्हणण्यात येऊ शकेल की : 'तुम्ही जे म्हणता ते खरं असेल तर वसाहतीतील ज्या लोकांना तुम्ही भारतीय म्हणता ते भारतीय असू शकत नाहीत.... ते किती खोटारडे आहेत ते तुम्ही पाहा.' वसाहतीत भेटलेल्या प्रत्येकानं भारतीयांच्या 'खोटारडेपणाचं' वर्णन केलं होतं. त्यांनी तो आरोप काही प्रमाणात मान्य केला. परंतु त्यांनी पुन्हा सांगितलं की याबाबतीत वसाहतीतील भारतीय इतर वर्गांपेक्षा वेगळे नाहीत.

हे दाखवण्यात मला फार कमी समाधान मिळतं की.... वैशिष्ट्यानं या दुर्दैवी भारतीयांच्या परिस्थितीत इतर वर्गांना ठेवण्यात आलं तर इतर वर्ग या बाबतीत फारसे वेगळे असलेले आढळणार नाहीत. परंतु तरीही अशा प्रकारच्या युक्तिवादाचा मला आधार घ्यावा लागत आहे. माझी तर हीच इच्छा असेल की मला यापेक्षा ते वेगळे दिसावे. ते मानवी प्राण्यापेक्षा उच्च दर्जाचे नाहीत हे सिद्ध करणं माझ्या आवाक्याबाहेरील आहे हे मी मान्य करतो.

भारतीय लोकांमध्ये बंधुआ मजुरांचं प्रमाण फार मोठं होतं. त्यांना वसाहतीत उपासमार व्हावी एवढ्या कमी पगारावर आणण्यात आलं होतं. त्यांना अतिशय प्रतिकूल वातावरणात ठेवण्यात आलं होतं. भारत सोडल्यापासूनच त्यांना नैतिक वा धार्मिक असं कोणतंच शिक्षण मिळत नव्हतं. अशा प्रकारच्या परिस्थितीत ठेवण्यात आल्यानंतर 'लहानसा मोहाचा जरी क्षण आला तर त्यांना खोटं बोलायचा मोह व्हावा' यात काय आश्चर्य? 'अशा प्रकारे काही काळ खोटं

बोलत राहिल्यानंतर त्याची त्यांना सवय होते व तो रोग त्यांना जडतो. मग ते कारण नसतानाही खोटं बोलतात, भौतिक दृष्टीनं फायदा व्हायची शक्यता नसतानाही ते खोटं बोलतात. आणि असं करताना आपण काय करतो आहोत याचीही त्यांना जाणीव नसते.' अखेरीस ते अशा परिस्थितीत पोहोचतात की त्यांची नैतिक जाणीव पूर्णपणे बधीर झालेली असते.

परंतु खोटं बोलायचा 'एक अतिशय दुःखद प्रकारही आहे त्यासाठी त्यांच्यापेक्षा त्यांचे गोरे मालकच जबाबदार आहेत.

त्यांच्या बांधवाला अतिशय निघृण वागणूक मिळत असतानाही, त्यांना खरं बोलायची हिंमत होत नसते कारण त्यांच्या मालकाकडून त्यांचा छळ व्हायची भीती वाटत असते. त्यांच्या भत्त्यात अगदी उपासमार व्हावी एवढी कपात करण्यात आली वा त्यांना मारहाणीची शिक्षा करण्यात आली तरी त्या गोष्टीकडे समभावानं पाहण्याएवढे ते तत्त्वज्ञाच्या प्रवृत्तीचे नसतात. मग असे लोक घृणेला पात्र आहेत की दयेला?.... अशाच परिस्थितीत अशाच प्रकारचं वर्तन करणार नाही असा वर्ग जगात कुठं आहे काय ?

परंतु भारतीय व्यापाऱ्यांचं न्यायालयातील वर्तन पाहता तेही 'तेवढेच खोटारडे आहेत' असं सांगण्यात यायचं. गांधीजींनी मान्य केलं की हे सिद्ध झाल्यास भारतीय व्यापाऱ्यांवरील हा आरोप गंभीर ठरेल. परंतु हा आरोप निराधार होता. 'इतर व्यापारी वर्ग व्यापाराच्या वा कायद्याच्या संदर्भात जेवढं खोटं बोलतात' त्यापेक्षा भारतीय व्यापारी अधिक खोटं बोलणारे नव्हते. त्यांच्याबद्दल गैरसमज जास्त होता. न्यायालयातील आपल्या दैनंदिन अनुभवाच्या आधारे वास्तवात तिथं काय घडतं याचं त्यांनी शब्दचित्र रेखाटलं. गैरसमज निर्माण व्हायचं पहिलं कारण होतं भारतीय व्यापाऱ्यांना इंग्रजी बोलता येत नव्हतं व दुसरं कारण होतं त्याचा जो अनुवाद करण्यात यायचा तो अतिशय चुकीचा असायचा.

तो दुभाष्यांचा दोष नसायचा. दुभाष्यांकडून तामिळ, तेलगू, हिंदुस्तानी आणि गुजराती भाषेत अनुवाद करण्याची अपेक्षा करण्यात यायची.... एक अपवाद सोडला तर दुभाषे स्थानिक

हिंदुस्तानीत बोलायचे. ती तामिळ, गुजराती आणि इतर भारतीय भाषांचं विचित्र मिश्रण होती. त्यात हिंदुस्तानीच्या व्याकरणाचा अगदी चोळामोळा करण्यात आलेला असायचा. त्यामुळे साक्षीदाराला काय म्हणायचं आहे हे समजून घेण्यासाठी दुभाष्याला अनेक प्रश्न विचारावे लागायचे. हे सर्व चालू असताना न्यायाधीशाचा धीर संपायचा आणि त्यांना वाटायचं की साक्षीदार द्व्यर्थी भाषेत बोलत आहे. गरीब बिचाऱ्या दुभाष्याला त्याबद्दल विचारलं असता आपला दोष लपवण्यासाठी तो सांगायचा की साक्षीदार नीट उत्तरं देत नाही. गरीब बिचाऱ्या साक्षीदाराला आपली बाजू मांडायची संधीच मिळत नसे.... साक्षीदार काय म्हणतो त्यावर विश्वास ठेवायचा नाही याबद्दल न्यायाधीशांचा निर्णय झालेला असायचा व साक्षीदाराची खोटारड्याच्या वर्गात गणना व्हायची. [नाताळच्या सन्माननीय विधानपरिषदेला आणि सन्माननीय विधानसभेला गांधीजींचं 'अनावृत पत्र', दिनांक डिसेंबर १८९४, अभिसरण डिसेंबर १९, १९९४]

वसाहतीतील दुभाष्याच्या आणि अनुवादकांच्या उणिवेमुळे गरीब बिचाऱ्या भारतीय अशिलांना आणि साक्षीदारांना अशा प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावं लागायचं. त्यांची ही हलाखीची अवस्था पाहून गांधीजी कळवळले आणि काही दिवसांनी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात 'शपथबद्ध गुजराती अनुवादक' म्हणून नाव नोंदवण्यासाठी अर्ज करून एक विलक्षण पाऊल उचललं. वसाहतीतील शपथबद्ध अनुवादक बाहेर गेलेला असल्यामुळे गांधीजी वकील असलेल्या एका खटल्यात अनुवादासंबंधी अडचण निर्माण झाली. त्यावर सर वाल्टर रॅग्ज यांनी सुचवलं की गांधीजीच वास्तवात अनुवादकाचं काम करत असल्यामुळे त्यांनी ते काम अधिकृत अनुवादक म्हणून केलेलं बरं. परंतु श्रीयुत पिचर यांनी गांधीजींचा अर्ज सादर केला असता मुख्य न्यायाधीशांनी त्याबद्दल नापसंती दाखवली : 'जर श्रीयुत गांधींना व्यावसायिक रीतिभातीचा भंग करायचा असेल तर ते अनुवादक होऊ शकतात.' परंतु प्रतिष्ठेचा प्रश्न बाजूला ठेवत गांधीजींनी आपला अर्ज पुढं रेटल्यामुळे तो मान्य करण्यात आला. त्यामुळे एम. के. गांधी, अटर्नी, एजंट फॉर

एसोटेरिक ख्रिश्चन युनियन फॉर द लंडन व्हेजिटेरिअन सोसायटी बरोबरच नाताळ सर्वोच्च न्यायालयातील 'शपथबद्ध अनुवादक' ही झाले. [*नाताळ विटनेस*, जानेवारी २४, १८९६]

भारतीयांना मिळणारी वागणूक ही ब्रिटिशांच्या उच्च परंपरांप्रमाणे वा न्याय आणि नैतिकतेच्या तत्त्वानुसार आहे काय या तिसऱ्या प्रश्नासंबंधी विचार करायचा तर भारतीयावर रोज वृत्तपत्रातून होणारा शिव्यांचा भडिमार पाहिला आणि त्यांच्यावरील दररोज होणाऱ्या अन्यायाच्या कानावर येणाऱ्या वार्ता त्या पाहिल्या तर त्याचं उत्तर स्वतःलाच देता येईल.

रस्त्यावरील माणूस त्याचा तिरस्कार करतो, त्याला शिव्या घालतो, त्याच्यावर थुंकतो आणि फुटपाथवरून त्याला दूर ढकलतो.... ट्रामगाड्या भारतीयांसाठी नाहीत. रेल्वेचे अधिकारी भारतीयांना पशुप्रमाणे वर्तणूक देऊ शकतात. तो कितीही स्वच्छ दिसत असला तरीही त्यांचं दर्शनच वसाहतीतील गोऱ्या माणसांसाठी एवढं आक्षेपार्ह असतं की थोडा वेळसुद्धा भारतीय माणसाबरोबर डब्यात बसायला त्याचा आक्षेप असतो. हॉटेल त्याच्यासाठी आपली दारं बंद करतात. मला अशी उदाहरणं माहीत आहेत की जेव्हा प्रतिष्ठित भारतीयांना रात्रभरासाठीसुद्धा हॉटेलमध्ये जागा द्यायला नकार देण्यात आला. एवढंच नाही तर कितीही प्रतिष्ठित भारतीय असला तरी सार्वजनिक आंघोळीची ठिकाणंही भारतीयांसाठी उघडी नाहीत.

उडाणटप्पूपणाविरोधी कायदा विनाकारण दडपशाहीचा करण्यात आला. या सर्वांवर ताण म्हणजे भारतीयांना झोपडपट्टीसारख्या वस्त्यात राहणं भाग पाडायचे व जे भारतीय करार संपल्यानंतर अशा वस्त्यात न राहता वसाहतीत मुक्त भारतीय म्हणून राहायचं ठरवतील त्यांच्यावर जबर कर लावायचे प्रस्ताव आले. मेकॉलेच्या गाजलेल्या व्याख्यानातील उद्धरण देत ते म्हणाले : 'आम्ही स्वतंत्र आहोत, आम्ही सुसंस्कृत आहोत पण त्या स्वातंत्र्याचा आणि संस्कृतीचा वाटा मानवी समाजाला द्यायला आम्ही कुरकूर करत असू तर त्या स्वातंत्र्याला आणि संस्कृतीला फार कमी अर्थ असेल.' गांधीजी पुढं म्हणाले :

माणसाची उपासमार व्हावी अशा पगारावर त्याला इथं आणायचं, त्याला गुलामीत बांधून ठेवायचं व तो जेव्हा स्वातंत्र्याचं थोडसंही चिन्ह दाखवतो वा कमी दयनीय अवस्थेत राहण्यासारखी त्याची परिस्थिती होते अशा वेळी त्याला त्याच्या त्या घरी परत पाठवायची इच्छा करणं, जिथं तो तुलनात्मक दृष्टीनं अपरिचित झालेला असतो व कदाचित त्या ठिकाणी उपजीविका करायचं सामर्थ्यही त्याच्यात शिल्लक राहिलेलं नसतं. अशा प्रकारच्या वर्तनाला काही ब्रिटिशांच्या उच्च परंपरांप्रमाणे न्याय आणि नैतिकतेच्या तत्त्वानुसार असलेलं वर्तन म्हणता येऊ शकत नाही. जे लोक त्या ख्रिस्ताच्या शिकवणुकीप्रमाणे वागायचा दावा करतात ज्या ख्रिस्तानं आपल्याला 'आपल्या शत्रूंवर प्रेम करायला शिकवलं आणि ज्याला केवळ सदरा हवा आहे त्याला कोट द्यायला सांगितलं.... आणि ज्यानं ज्यू आणि ख्रिश्चन यांच्यातील अंतर नाहीसं केलं त्या ख्रिस्ताच्या अनुयायांसाठी तर हे वर्तन अत्यंत अशोभनीय ठरतं.'

वसाहतीतील भारतीयांना पूर्णपणे काढून टाकणं वसाहतीच्या हिताचं आहे काय या चौकशीच्या शेवटच्या भागाविषयी गांधीजींनी उत्तर दिलं, 'प्रयत्न करून का पाहत नाही?' ते म्हणाले की 'जर एकूणएका भारतीयाला वसाहतीतून निघून जायला सांगण्यात आलं तर कमीत कमी मला तरी वाईट वाटणार नाही.' परंतु गांधीजींनी त्यांना सावधगिरीची सूचना देत सांगितलं की 'त्या दिवसांबद्दल वसाहतीच्या लोकांना खेद करावा लागेल.... आणि तुम्ही तसं करणार नाही अशी मी अपेक्षा करतो. लहान लहान व्यापाऱ्यांचं आणि चिल्लर व्यवसायांचं काम युरोपिअन लोक करणार नाहीत व भारतीय करत असलेलं काम कोणीच न केल्यामुळे वसाहतीला भारतीयांकडून मिळणाऱ्या बऱ्याच मोठ्या महसुलाला मुकावं लागेल. त्यामुळे भारतीयांना जर ठेवायचं असेल तर न्याय हा आहे की 'त्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे आणि प्रामाणिकपणे काम करता येईल अशी वागणूक मिळायला पाहिजे.

समारोप करत गांधीजी म्हणाले की दैवानं इंग्रजांना आणि भारतीयांना एकत्रित आणलेलं आहे व इंग्रजांच्या हाती भारतीयांचं भवितव्य सोपवलेलं आहे. त्यामुळे प्रत्येक इंग्रज भारतीयांना

कशी वागणूक देतो यावर हे अवलंबून राहील. 'सहानुभूती, प्रेम आणि मुक्त साहचर्य यांच्यावर आधारित चिरंतन बंधन निर्माण करणारं वर्तन इंग्रज करतात की इंग्रजांजवळ भारतीयांना नियंत्रणात ठेवण्याएवढी पुरेशी साधनं आहेत आणि सौम्य स्वभावाच्या भारतीयांना परकीयांच्या जोखडाखालून मान काढण्यासाठी डिवचण्यात येत नाही तोवरच हे एकत्रित राहणं कायम राहील. इंग्रज कसं वर्तन करतात यावर हे सर्व अवलंबून राहील.'

ब्रिटिश सरकारच्या घोषणांची, ब्राईट, ग्लॅडस्टोन आणि रिपन, फॉसेट, वेडरबर्न आणि रे यांच्यासारख्या उदार विचारवंतांच्या व्याख्यानांची आणि लेखनाची आठवण करून देत गांधीजी म्हणाले की स्वातंत्र्य आणि लोकशाही याबद्दलच्या ब्रिटिशांच्या आदर्शाबद्दल आपल्या मनातील श्रद्धा अजूनही कायम आहे. फिरोजशहा मेहता या एका भारतीयाला प्रधानमंत्री लॉर्ड सॅलिसबरी यांच्या स्पष्ट विरोधानंतरही इंग्लंडमधील एका मतदार संघानं हॉउस ऑफ कॉमन्सवर निवडून दिलं होतं व त्या गोष्टीचं उदार आणि अनुदार विचारसरणीच्या वृत्तपत्रांनी सारखंच जोरात स्वागत केलं होतं. संसदेच्या दोन्ही सभागृहांनीही त्यांचं अतिशय उत्साहात स्वागत केलं होतं. या दोन्ही देशांचं मनोमीलन व्हावं अशी इंग्लंडमधील श्रेष्ठ लोकांची इच्छा असल्याचंच हे चिन्ह आहे असं गांधीजींचं मत होतं.

अनावृत पत्रासोबत जोडलेल्या सहपत्रातून युरोपिअनांच्या विविध वर्गांना - मग ते धर्मगुरू असोत, संपादक असोत, सार्वजनिक कार्यकर्ते असोत, व्यापारी असोत वा वकील आत्मावलोकन करायचं आवाहन करत ज्या आदर्शाचा पुरस्कार तुम्ही करता त्याच आदर्शानुसार पुढं मांडण्यात आलेल्या सूचनांचा विचार करायची आणि त्यावर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करायची गांधीजींनी विनंती केली. 'वसाहतीत भारतीयांना जशी वागणूक मिळायला पाहिजे तशी मिळत नसल्यामुळे ज्यांना त्यांच्याबद्दल सक्रिय सहानुभूती व दया वाटते अशा प्रकारच्या युरोपिअनांची संख्या किती आहे हे पाहण्यासाठी तुमची मतं आमंत्रित करण्यात येत आहेत.' असं

त्यांनी पुढे लिहिलं. [नाताळच्या सन्माननीय विधान परिषदेला आणि सन्माननीय विधान सभेला गांधीजींचं 'अनावृत पत्र', दिनांक डिसेंबर १८९४, अभिसरण डिसेंबर १९, १९९४, यासंबंधीच्या अनावृत पत्रातील उद्धरणासाठी हीच नोंद पाहा]

फार कमी युरोपिअनांनी उत्तर द्यायची फिकीर केली. त्या लेखांच्या प्रतींवर 'मूर्खपणा', 'अर्थशून्य' अशा प्रकारचे जे शेरे खरडण्यात यायचे व त्यांची इतरत्र जी पुनरावृत्ती करण्यात यायची त्यातून त्यांच्या चिडलेल्या प्रतिक्रियांची प्रतीती यायची. तरीही एकूण या सर्व गोष्टी विचारात घेता त्या विनवणीचा दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रांवर आणि इंग्लंडमधील सुजाण ब्रिटिशांवर सखोल परिणाम झाला असल्याचे आढळते. दक्षिण आफ्रिकेतील जवळपास प्रत्येक वृत्तपत्रानं त्याची सविस्तर दखल घेतली. गांधीजींनी मांडलेल्या तथ्यांना नाकारता येऊ शकत नव्हतं. गांधीजींचे निष्कर्ष खोडण्यासाठी त्यांना वितंडवादाचा आणि खास वकिली डावपेचांचा आधार घ्यावा लागला. या प्रक्रियेत कधीकधी ते परस्पर विरोधी युक्तिवादही करायचे, व काही वेळा तर स्वतःच्याच वृत्तपत्रातील स्तंभात जे लिहिण्यात आलेलं असायचं त्याचाच ते प्रतिवाद करायचे.

उदाहरणार्थ नाताळ विटनेसनं भारतीयांना खोटारडेपणाच्या आरोपातून मुक्त केलं व मान्य केलं की 'युरोपिअन आणि नेटिव्हही या बाबतीत निर्दोष नाहीत.... आणि श्रीयुत गांधी म्हणतात त्याप्रमाणे बहुतेक प्रकरणी भारतीय त्यांच्यापेक्षा वाईट नाहीत.' त्यानं हेही मान्य केलं की 'तो उत्कृष्ट मजूर आहे.' तरीही *नाताळ विटनेसचं* म्हणणं होतं की वसाहतीला त्याची गरज नाही आणि त्याच्यापासून मुक्त होणं आवश्यक आहे.

बंधुआ मजूर म्हणून त्याच्या सवयी पशुतुल्य आहेत. तो आजारपणाचं ढोंग करतो आणि अप्रामाणिकपणानं वागतो.... तो मुक्त असला तर कमी किमतीत माल विकून युरोपिअन व्यापाऱ्यांना बाजारातून हुसकावून लावतो; साध्याभोळ्या नेटिव्हांना बेसुमार व्याजानं पैसे देऊन वा नकली दारू विकून लुबाडतो. [*नाताळ विटनेस*, डिसेंबर २९, १८९४]

वसाहतीवर ज्या माणसाचं फार मोठं ऋण होतं त्या माणसाची बदनामी करणारा हा आरोप अतिशय क्रूरपणाचा होता. नाताळमधून चोहोकडून भारतीय मजुरांसाठी होणाऱ्या अधिकाधिक मागणीवरून त्याची उपयुक्तता सिद्ध होत होती. १८९४च्या भारतीय अहवालावरून दिसून येत होतं की १०,००० पौंडांची शासकीय मदत रद्द करण्यात आल्यामुळे पूर्वी मालकाला 'भारतीय तरुण पुरुष भारतीय मजुरासाठी' जो खर्च १७ पौंड १० शिलींग यायचा तो आता या नवीन व्यवस्थेत २२ पौंड १० शिलींग येऊ लागला. तरीही भारतीय मजुरांच्या मागणीवर कोणताच परिणाम झाला नाही. वास्तवात *नाताळ ॲडव्हरटाइझरनं* निदर्शनास आणून दिलं की 'मागणीएवढा पुरवठा नव्हता.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, डिसेंबर १३, १८९४] एवढंच नाही तर विटनेसला मान्य करणं भाग पडलं की यावरून असं आढळून येतं की 'मालकाला अधिक खर्च येत असूनही आप्रवासी भारतीय मजुरांना वसाहतीत आधीच उपलब्ध असलेल्या मजुरांपेक्षा अधिक मागणी आहे.' [*नाताळ विटनेस*, नोव्हेंबर १४, १८९४] त्याच्यापुढील वर्षी 'आप्रवासी कुलींची' मागणी अजूनच वाढली. इंडेंचर ट्रस्ट बोर्डाच्या १८९५च्या अहवालाप्रमाणे ती मागणी 'उपलब्ध आकडेवारीनुसार सर्वात मोठी होती. अहवालात पुढील उल्लेख होता

अजूनही २,०४६ मजुरांचा पुरवठा करायचा आहे. त्यामुळे मजुरांच्या मागणीसाठी १८९६ सालापर्यंत त्यांचा पुरवठा करता येईल असं वाटत नाही. त्यामुळे अजून काही महिने मजुरांच्या मागणीचे नवीन अर्ज स्वीकारून काही उपयोग होणार नाही.

भविष्यातील या धोक्याची कल्पना येऊन *नाताळ ॲडव्हरटाइझरनं* भाष्य केलं : 'वसाहतीच्या जीवनात कुली हा अपरिहार्य घटक झालेला आहे. ही गोष्ट रुचो वा न रुचो तिला तोंड देणं भाग आहे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर १८, १८९५]

भारतीयांच्या जागी 'नेटिव्हांना' नेमायचा एकच पर्यायी उपाय नाताळच्या मजूर समस्येवर *नाताळ विटनेसला* सुचवता आला. परंतु चहाच्या आणि ऊसाच्या गोऱ्या मळेवाल्यांना, जे वास्तवात मजुरांना कामावर लावायचे, आपलं हित कशात आहे ते माहीत होतं. नाताळमधील

चहा उद्योग रात्री दुप्पट आणि दिवसा चारपट गतीनं वाढत होता. त्या उद्योगानं एका हंगामात ८००,००० ते ९००,००० पौंड चहा निर्मितीला सुरुवात केलेली होती. परंतु चहाचा हंगाम जेव्हा जोरात असायचा तेव्हा भारतीय मजुरांच्या टोळीतील प्रत्येक माणूस सरासरीनं ४२ पौंड चहाची पानं तोडायचा तर नाताळ काफीराची सरासरी १९ पौंड असायची. चहा उत्पादक 'केवळ कुलींना कामावर लावतात कारण कुली हे नाताळला घडवणारे आहेत' असं स्पष्टीकरण सर्वात मोठ्या चहा उत्पादकानं आणि चहाच्या निर्यात करणाऱ्या डब्ल्यू. एच. हिंडसन अँड कंपनीच्या श्रीयुत हिंडसन यांनी केपच्या एका नियतकालिकाच्या प्रतिनिधीला दिलं.

'का?' त्यानं विचारलं.

तुमच्या केपचे शेतकरी आणि मालक नाताळच्या पुस्तकातील एखादं पान वाचतील आणि नाताळच्या संपन्नतेसाठी कारणीभूत असलेल्या कुली मजुराची आयात करतील काय? का? कारण, तुम्ही मला माफ करा पण तुम्ही थोडे बथ्थड डोक्याचे आहात. [नाताळ ॲडव्हरटाईझर, मार्च ७, १८९५]

हिंडसन मंडळी यशस्वी मळेवाले आणि व्यावसायिक होते. त्याचबरोबर ते सदय अंतःकरणाचे होते आणि त्यांची भारतीय मजुरांशी वागणूकही अतिशय माणुसकीची असायची व त्यांमुळे ते मजुरांत फार प्रिय होते. त्यांच्या चहाच्या मळ्यावर होणारा वार्षिक क्रीडासमारोह हे त्याचंच चिन्ह होतं. तत्कालीन वृत्तपत्रीय अहवालाप्रमाणे १९९५ सालच्या समारोहाचं वैशिष्ट्य होतं 'नेहमीप्रमाणे नाट्यप्रयोग', त्यानंतर 'कसरतीचे अत्यंत कौशल्यपूर्ण प्रयोग करण्यात आले' व 'क्लिफ्टन इस्टेट आणि नोनोटी पीक इस्टेटवरील १०-१० लोकांत रस्साखेचीची स्पर्धा' झाली. समारोहाच्या शेवटी 'श्रीमती हिंडसन यांनी भाग घेणारांना रोख बक्षिसं दिली आणि दुभाष्याच्या माध्यमातून त्या कुलींशी काही प्रेमाचे शब्द बोलल्या. कुलींमध्ये तांदळाचं वाटप करण्यात आलं आणि कुलींच्या मुलांना भरपूर प्रमाणात मिठाई देण्यात आली. सर्वांनी श्रीयुत आणि श्रीमती हिंडसन यांची अतिशय तारीफ केली व त्या क्रीडासमारोहात अंतःकरणपूर्वक भाग घेतला.'

परंतु हिंडसन हे ह्युलेट आणि मार्शल कॅम्पबेल यांच्याप्रमाणेच अठराशे नव्वदीतील नाताळमधील मालकांमध्ये अपवाद होते. आशियायी लोकांना कामावर लावणारे बहुतेक मालक कठोरहृदयी, स्वार्थी आणि हावरट होते व त्यात भर पडलेली होती त्यांच्या रंगद्वेषाची. *नाताळ मर्क्युरीनं* भाष्य करत लिहिलं, 'यानंतर श्रीयुत हिंडसन हे युरोपिअन आणि वसाहतीतील भारतीयांत सद्भावना निर्माण करणारे खरे गांधीवादी आहेत अशी त्यांना मान्यता मिळेल अशी आशा आहे. [*नाताळ मर्क्युरी*, जानेवारी १०, १८९५] नाताळमधील युरोपिअन आणि भारतीय यांच्यात ऐक्य निर्माण करायच्या गांधीजींच्या प्रयत्नाचा युरोपिअनांच्या मनावर कसा प्रभाव पडू लागला होता ते या टिप्पणीवरून लक्षात येतं.

आफ्रिकी लोक भारतीयांचा तिरस्कार करतात याविषयी 'नेटिव्हांचं' इंकॅनिसो हे वृत्तपत्र म्हणालं की गोऱ्या वृत्तपत्रांना वाटतं की 'कुत्र्याला मारण्यासाठी कोणतीही काठी योग्यच असते' आणि 'नेटिव्ह' आणि भारतीय यांच्या प्रश्नाचा विचार करताना 'जो कोणता युक्तिवाद सुचेल त्यानं आमच्यावर पहिल्यांदा हल्ला करायची त्यांना सवय असते, मग तो युक्तिवाद सुसंगत असो वा नसोः' दुसऱ्या दिवशी या वृत्तपत्रानं लिहिलं,

श्रीयुत गांधींनी आपल्या लोकांची बाजू घेणारं जे पत्र लिहिलं होतं त्यावर टीका करताना विटनेसनं भारतीय कराराची मुदत संपल्यानंतर भारतात न परतता वसाहतीतच राहत असल्याबद्दल शिव्या घातल्या. याच वृत्तपत्रात एक लेख वाचल्याचं आम्हाला आठवतं, ज्याला फार दिवसही झालेले नाहीत, एका भारतीयावर जोरदार शब्दांचा मारा करण्यात आला होता, आणि का? कारण त्यानं वसाहत सोडली. आणि आम्हाला आठवतं की त्यानं त्याचा सर्व पैसा घेऊन वसाहत सोडली. पण कोणीही अशी कल्पना करू शकतो काय की माणूस आपलं जे काही आहे ते सर्व घेतल्याशिवाय वसाहत सोडेल? एकदा भारतीयाला वसाहतीत राहण्याबद्दल दोष देण्यात येतो. दुसऱ्या दिवशी त्यानं आपलं सर्व काही घेऊन वसाहत सोडली तरी त्याला तेवढ्याच प्रमाणात दोषी धरण्यात येतं. आता असं दिसतं की कोणताही युक्तिवाद - जो कोणता

हाताशी असेल, मग तो कितीही विसंगत का असेना - आमच्यावर हल्ला करण्यासाठी त्यांना उपयुक्त वाटतो. आम्ही आळशी आहोत, काही कामाचे नाही अशा आम्हाला शिव्या घालण्यात येतात आणि आमच्याकडे तुच्छतेनं पाहण्यात येतं. परंतु आम्ही जेव्हा तेवढंच काम करू शकतो व तसं करायची आमची तयारी आहे असं दाखवून देण्यात येतं तेव्हाही आम्हाला तेवढ्याच शिव्या घालण्यात येतात. भारतीयांनी जायला पाहिजे परंतु त्यांची कमाई मागं सोडून. नेटिव्हांनी काम करायला पाहिजे पण यंत्र कामगार म्हणून नाही. हे न्याय्य आणि युक्तिसंगत आहे काय ?

[*इंक्वॅनिसो*, जानेवारी १९, १८९५]

*नाताळ ॲडव्हरटाइझर*नं लिहिलं की 'अनावृत पत्राच्या लेखकानं आपली बाजू मांडताना 'अतिशयोक्ती' केलेली आहे. वसाहतीतील भारतीयांचा छळ करण्यात येतो वा त्याच्यावर दडपशाही करण्यात येते या 'ध्वनित करण्यात आलेल्या आरोपाला कवडीचाही आधार नाही.' राहता राहिला प्रश्न मतदानाच्या अधिकाराचा. तर त्यांच्या देशातही तो त्यांना मिळत नाही कारण 'तिथलं शासन शुद्ध एकाधिकारशाहीचं आहे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जानेवारी १, १८९५] हा नेम नक्कीच निशाणाच्या पलीकडे जाणारा होता. या प्रश्नाच्या साम्राज्याच्या बाजूचं जेव्हा दर्शन झालं तेव्हा मळेवाल्यांच्या या मुखपत्राचे डोळे उघडले व त्यानं वेगळाच सूर आळवायला सुरुवात केली. व्हाईटहॉलकडून तशी सूचना आली होती.

गांधीजींच्या दृष्टिकोनाशी ते संमत असो वा नसो वा एकमेकात त्यांची संमती असो वा नसो परंतु त्या सर्वांनी निष्पक्षपातीपणा, संयम आणि आपली बाजू मांडण्याविषयीचं सामर्थ्य याविषयी गांधीजींचं अभिनंदन केलं. नाताळ मर्क्युरीनं लिहिलं, 'आम्ही मोकळेपणानं मान्य करतो की

श्रीयुत गांधी हे शांतपणानं आणि संयमानं लिहितात. कोणीही त्यांच्याकडून अपेक्षा करावी एवढे ते निष्पक्ष आहेत व ते प्रथमच या वसाहतीत आले असताना त्यांना जी वागणूक लॉ सोसायटीकडून मिळाली ती पाहता ते कदाचित थोडे अधिकच संयमी असावेत असं वाटतं.

श्रीयुत गांधी हे अतिशय संयमानंच लिहीत नाहीत तर ते जो युक्तिवाद करतात त्याची मांडणीही अतिशय कौशल्यानं करतात आणि हे अनावृत पत्र सर्वार्थानं त्यांना भूषणावह आहे. [*नाताळ मर्क्युरी*, जानेवारी ७, १८९५]

भारतीयांविरुद्ध पूर्वग्रह असल्याचं मान्य करत *नाताळ मर्क्युरीनं* लिहिलं की रंगद्वेषामुळे मात्र तसं नक्कीच नाही. 'भारतीयांविरुद्ध पूर्वग्रह होण्यासाठी भारतीयच कारणीभूत आहेत व ते दूर करणंही त्यांच्याच हाती आहे.' अथवा काही दिवसांनंतर *नाताळ मर्क्युरीनं* मांडल्याप्रमाणे जो माणूस वार्षिक १,००० पौंड मिळवतो परंतु त्याची राहणी मात्र ५० पौंड मिळवणाऱ्या माणसाप्रमाणे असेल तर 'त्याला त्याच्या खर्चाप्रमाणे सामाजिकदृष्ट्या मान मिळाल्यास आणि उत्पन्नाप्रमाणे न मिळाल्यास आश्चर्य वाटायला नको. माणूस जेव्हा रोममध्ये जातो तेव्हा त्यानं रोमनांप्रमाणे राहायला हवं.' 'कुली'कडून दगडाविटांच्या घरात राहायची आणि युरोपिअनांप्रमाणे जीवनमान ठेवायची अपेक्षा करता येत नाहीं' परंतु भारतीय व्यापाऱ्यांना सांगायला हवं की ते 'जर कुलीप्रमाणे राहणार असतील तर त्यांना वेगळ्या प्रकारच्या वागणुकीची अपेक्षा ठेवता येणार नाही.' [*नाताळ मर्क्युरी*, ऑगस्ट ३१, १८९५]

उत्तरात गांधीजींनी दाखवून दिलं की मोंबासा, झांजिबार आणि मुंबईसारख्या ठिकाणी भारतीय व्यापाऱ्यांनी भरपूर संपत्ती मिळवली आहे. तिथं त्यांनी राजवाड्यासारखे बंगले बांधले आहेत. एवढंच नाही तर काहींनी विलासगृहेही बांधली आहेत. डरबनमधील व्यापाऱ्यांनी असं केलं नसेल तर त्याचा अर्थ त्यांनी तेवढा पैसा मिळवला नाही असा आहे. परंतु 'सत्य हे आहे की वसाहतीत असा एकही भारतीय नाही की जो वार्षिक १,००० पौंड मिळवतो... त्यांच्यातील अनेकांचा व्यापार निश्चितच बराच मोठा आहे, परंतु नफा नाही, कारण त्यात अनेक भागीदार असतात.' त्यामुळे भारतीय व्यापारी १,००० पौंड मिळवतात व ५० पौंड मिळवणाऱ्याप्रमाणे राहतात या आरोपात काहीच तथ्य नाही.... 'तुम्ही या प्रश्नाचा जर खोलवर अभ्यास केला तर

तुम्हाला आढळेल की उद्या रडायची वेळ येणार नाही एवढी काळजी घेऊन या वसाहतीत ते शक्य तो सर्व खर्च करतात.'

'चांगलं उत्पन्न मिळवणारे भारतीयही आपल्या दुकानाच्या लादीवर झोपतात' हा जो मर्क्युरीनं आरोप केला होता त्याबद्दल गांधीजींनी खेळाडूपणानं त्या वृत्तपत्राला एक आव्हान दिलं : 'तुम्ही जर स्वतःची फसवणूक करून घेऊ इच्छीत नसाल आणि तुमच्या संपादकीय खुर्चीवरून खाली उतरायला तयार असाल तर मी तुम्हाला काही भारतीय दुकानांमध्ये घेऊन जाईन. मग कदाचित आता तुम्ही जेवढ्या कठोरपणे विचार करताहात तेवढा कदाचित करणार नाही.'

[*नाताळ मर्क्युरीला* गांधीजींचं पत्र दिनांक सप्टेंबर २, १८९५, प्रसिद्धी सप्टेंबर ५, १८९५]

काही दिवसांनंतर *मर्क्युरीला* बिनतोड उत्तर देण्यात आलं त्याच्याच एका स्तंभलेखकाकडून. एकमेकांना परिचित नसलेले दोन डरबन निवासी, एक इंग्रज आणि एक अरब एकाचवेळी इंग्लंडमध्ये गेले होते असं दिसतं. इंग्रज बसमधून प्रवास करत असताना त्याला बाजूनं लवाजम्यासहित एक घोडागाडी जाताना अ *आणि तो त्याच्याच डरबनमधील व्यापारी असल्याची त्याची खात्री झाली. परतल्यानंतर त्यांची वेस्ट स्ट्रीटवर भेट झाली तेव्हा त्या इंग्रजानं भारतीयाला आपण लंडनमध्ये भेटल्याचं सांगितलं. तो अरब ताबडतोब म्हणाला 'होय, मी तुम्हांला पेनी बसमध्ये* पाहिलं आहे!' *तुम्हांला लंडन कसं वाटलं असं विचारण्यात आलं असता तो एकदम भावनावेगात म्हणाला, 'सुंदर जागा, लंडन सुंदर जागा आहे. संसदेचे सदस्य हस्तांदोलन करतात; श्रीयुत तुम्ही कसे काय आहात असं विचारतात; या आपण सोबत जेवण करू या म्हणतात; नाट्यगृहातील उच्च वर्गाचं तिकीट देतात. खरंच लंडन फार सुंदर आहे. इथं नाताळमध्ये लोक पाहतात आणि म्हणतात 'हा कोण आहे ? अरे हा तर कुली आहे.'*

नाताळ मर्क्युरीमधील स्तंभलेखकानं यासंबंधात आपले विचार व्यक्त करत लिहिलं, 'दुखणं नेमकं इथंच आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, मार्च २१, १८९६]

अशा रीतीनं भारतीय व्यापाऱ्याला दोन्हीकडून मार बसत होता. तो जर काटकसरीनं राहिला तर त्याला 'कुली' म्हणून संबोधलं जायचं आणि त्याप्रमाणे त्याला वागणूक देण्यात यायची. उलट त्यानं अत्याधुनिक पद्धतीनं राहायला सुरुवात केली तर गोऱ्या वसाहतवाल्यांच्या मत्सराचा तो विषय व्हायचा. त्याचं एक उदाहरण आपण पाहू या. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत यायच्या काही दिवस आधी अरबांच्या फर्मचे अनेक मालक गोऱ्या मुलींना दुकानात सहाय्यक म्हणून कामाला लावत. ते देत असलेले पगार इतके आकर्षक असायचे की शहरातील मोठमोठ्या कापड दुकानातील अनेक मुली आपला स्वाभिमान व तथाकथित अपमान गिळून अरबांकडे काम करायला तयार असत. त्यावर *नाताळ विटनेसमध्ये* पुढील हकीगत आली :

श्रीमंत अरब ऐषआरामी होत आहेत. काल मी एक सुंदर दृश्य पाहिलं. पायघोळ झगे आणि पगड्या घातलेलं अरबांचं कुटुंब मोठ्या उघड्या बग्गीत तक्याला रेलून बसलेलं होतं आणि बग्गीला सुंदरपैकी घोड्याची जोडी जोडलेली होती. या शहरातील घरंदाज गोऱ्यांना गाडी हाकणारे म्हणूनच मजेत जीवन काढावं लागेल. लवकरच आपल्याला असं आढळेल की आपले अरब मित्र गोऱ्या लेकांना कामावर ठेवून त्यांना बूट, घंटा आणि पायांनी सुशोभित झालेल्या बग्गीच्या डब्याच्या जागी बसवतील. [*केप टाईम्स*, मे ११, १८८९]

लांडगा आणि कोकरू यांची ही जुनीच कहाणी होती. कोकरानं काहीही केलेलं असलं वा न केलेलं असलं तरी चूक त्याचीच असायची.

८

अनावृत पत्राच्या प्रकाशनामुळे भारतीयांच्या कामाबद्दल सहानुभूती निर्माण झाली व गांधीजींना अनेक मित्र मिळाले. यात गांधीजींच्या राजकीय कार्याला विरोध असणाऱ्या परंतु त्यांच्या उच्च प्रतिभेची जाण असलेल्या व गांधीजींना एक सद्‌गृहस्थ म्हणून ओळखणाऱ्या लोकांचाही समावेश होता. त्यामुळे भारत आणि भारतीयांबद्दलचे बरेच गैरसमज दूर झाले व

ज्यांचं अस्तित्वच आधी नाकारण्यात यायचं त्या अन्यायकारक गोष्टींकडे लक्ष केंद्रित झालं. गांधीजींना झालेल्या दोन कठोर सत्यांचं दर्शन ही सर्वात लाभदायक गोष्ट होती. त्यामुळे गांधीजींच्या राजकीय दृष्टिकोनावर आणि कार्यप्रणालीवर त्यानंतरच्या दोन वर्षात आमूलाग्र परिवर्तन करणारा परिणाम झाला. या दोन्ही गोष्टींची देणगी ट्रान्सवालच्या वृत्तपत्रांनी दिली होती.

इंग्रजी भाषिक युटिलँडरांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेल्या जोहान्सबर्ग येथील स्टार या वृत्तपत्रानं गांधीजींचा जवळपास संपूर्ण युक्तिवाद मान्य केला आणि त्यांच्या 'संयमाचं, निःपक्षपातीपणाचं आणि कौशल्याचं कौतुक करत लिहिलं की ज्या अनेक आत्मसंतुष्ट सद्गृहस्थांना वाटतं की केवळ गोरी कातडी ही सर्वसामान्य बुद्धिमत्तेपेक्षा उच्च बुद्धिमत्ता असायचं चिन्ह आहे व तशी बुद्धिमत्ता काळ्या कातडीत सामावूच शकत नाही त्यांना हे पत्र पाहून आश्चर्य वाटेल.'

श्रीयुत गांधींनी स्पष्टपणे सिद्ध केलं आहे की नाताळनं जी समृद्धी मिळवली आहे तिला भारतीयांची उपस्थिती फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे; कॉकेशिअन आणि भारतीय हे वांशिक दृष्टीनं जवळचे आहेत; आणि अनेक ख्यातनाम तज्ज्ञांनी निर्वाळा देऊन सांगितलं आहे की भारतीयांच्या राष्ट्रीय चारित्र्यात असं काहीच नाही की ज्यामुळे त्यांना राजकीय अधिकार नाकारण्यात यावे.... खऱ्या भारतीयात, ज्याला आपण नाताळमध्ये वा दक्षिण आफ्रिकेतील अन्य कोणत्याही भागात ओळखतो त्यांच्यात श्रीयुत गांधींनी उद्धृत केलेली दूषणं द्यावी असं काहीच नाही....

परंतु हा प्रश्न वांशिक वा तात्त्विक नाही तर राजकीय आणि वास्तव स्वरूपाचा आहे.

.....श्रीयुत गांधी यांच्यासारखीच पात्रता असलेले किती तरी भारतीय आहेत की जे कोणत्याही स्वयंशासित देशात मतदानाचा हक्क उपभोगण्यासाठी पूर्णपणे पात्र आहेत. परंतु.... वास्तवात जी समता अस्तित्वात नाही ती मान्य करणं ही गोष्ट नाताळसाठी आत्महत्या

करण्यासारखं होईल. व ती समता जरी अस्तित्वात असली तरीही ती मान्य करणं नाताळसाठी सुरक्षितपणाचं होणार नाही. हे खरं आहे की साम्राज्याच्या संसदेत एक भारतीय फिन्सबरीचं प्रतिनिधित्व करतो. हेही खरं आहे की त्यांच्या २५ कोटी देशबांधवांना ब्रिटिशांच्या हेतूंसाठी आणि फायद्यासाठी डांबून ठेवण्यात आलं आहे आणि ही दुसरी बाबच, पहिली नाही, भारतीयांचं जगातील स्थान ठरवणारी आहे हे श्रीयुत गांधींना निश्चितच माहीत आहे.... वसाहतीवर राज्य काळ्यांचं असावं की गोऱ्यांचं हा नाताळच्या, आणि याद्दष्टीनं दक्षिण आफ्रिकेतील सर्व सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या द्दष्टीनं एकमेव प्रश्न आहे. या प्रश्नाचं उत्तर 'गोऱ्यांचं', असं असेल तर भारतीयांना मतदानाच्या अधिकारापासून कठोरपणे दूर ठेवायलाच हवं.... या मुद्यावर युक्तिवाद करून काहीही पदरी पडणार नाही कारण कोणत्याही परिस्थितीत त्यात दुरुस्ती होणार नाही. घरातील सल्ला द्यायचं साहस जर आम्ही केलं तर आम्ही एवढंच म्हणू की श्रीयुत गांधींनी आपली सोजी थंड होईपर्यंत धीर धरावा. ते, आणि त्यांच्यासारखी माणसं सरकारविरुद्ध असंतोष भडकवू शकतील आणि कदाचित भडकवतीलही – परंतु त्यापेक्षा ते जास्त काहीही करू शकत नाहीत. ते जर शहाणे असतील तर अशक्य गोष्ट प्राप्त करायचा प्रयत्न सोडतील आणि संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत आपल्या बांधवांना न्याय्य आणि माणुसकीची वागणूक मिळावी म्हणून झटतील. असं जर ते करतील तर त्यांचे श्रम वाया जाणार नाहीत आणि प्रत्येक पूर्वग्रहदूषित नसलेल्या माणसाची सहानुभूती ते मिळवतील. [*स्टार*, डिसेंबर २६, १८९४ (ठळक अक्षरं माझी)]

मुत्सद्दीपणा न करणाऱ्या प्रत्येक विरोधकाबद्दल गांधीजींच्या मनात सन्मानाची भावना असायची. शर्करावगुंठन केलेले कटू सत्य सांगणाऱ्या द्व्यर्थी शब्दांपेक्षा गांधीजींना स्पष्ट शब्दातील कठोरपणा आवडत असे. *स्टार*च्या शब्दातील झणझणीतपणा काढला तर त्याचा युक्तिवाद या कसोटीवर उतरणारा होता. भारतीयांना ज्या अतिशय कठोर हालअपेष्टांना तोंड द्यावं लागत होत त्याविरुद्ध संघर्ष करताना ज्या इंग्रजांच्या वर्गाबद्दल स्टार बोलत होता त्या वर्गाचा पाठिंबा गोऱ्यांच्या सर्वश्रेष्ठत्वाला धक्का लावेल अशी कोणतीही जोखीम न पत्करता

मिळवणं शक्य होतं. मतदानाच्या हक्काद्वारे दक्षिण आफ्रिकेतील भारतीय गोऱ्यांना राजकीय दृष्टीनं नेस्तनाबूत करतील ही जी भीती स्टारच्या मनात होती तिचं निवारण गांधीजी आपल्या बाजूनं तपशीलवार माहिती आणि आकडेवारी देऊन करू इच्छीत होते. भारतीयांना अशी कोणतीच आकांक्षा नव्हती. आपल्याला योग्य आणि न्याय्य वागणूक मिळावी आणि आपला कायदेशीर व्यवसाय वर्णविद्वेषापासून मुक्त असलेल्या वातावरणात शांततेनं आणि स्वाभिमानानं करता यावा एवढीच भारतीयांना इच्छा होती. जोपर्यंत ब्रिटिशांच्या गुलामगिरीत भारतीय उपमहाखंड आहे आणि भारतावर ब्रिटिशांचं वर्चस्व आहे तोपर्यंत कितीही चांगला युक्तिवाद केला तरी त्याचा काहीच लाभ होणार नाही या विधानाचं गांधीजींनी स्वागत केलं. भारतीयांच्या न्याय्य मागण्या तेव्हाच मान्य करण्यात येतील जेव्हा भारतीय लोकांमध्ये असं सामर्थ्य येईल की ज्याला कोणतंच शस्त्र नमवू शकणार नाही हा निष्कर्ष यामुळे गांधीजींना काढणं भाग पडलं. यातून मार्ग शोधण्यासाठी गांधीजींना एक दशक लागलं.

जोहान्सबर्ग येथील *द क्रिटिक* या वृत्तपत्रातील *द लाईट ऑफ आशिया* नावाचा एक लेख प्रकाशित झाला. त्यामुळे गांधीजींना दक्षिण आफ्रिकेतील आपल्या सत्याग्रह संघर्षातील एक महत्त्वाचा सहकारी लाभला. या लेखात मान्य करण्यात आलं की जेव्हा भारत संस्कृतीची गंगोत्री होता व जीवनाच्या विविध क्षेत्रात त्यानं अतिशय प्रगती केलेलीही होती 'तेव्हा ब्रिटन, गॉल आणि ट्युटॉन रानटी अवस्थेतच पडलेले होते, रानटीपणाचा त्याच्यावर पक्का रंग चढलेला होता, हिंस्र पशुंची कातडी त्यांनी पांघरलेली होती.' परंतु लेखकाचं म्हणणं होतं की भारतीय मजूर वर्गात बहुतांश लोक 'खालच्या जातीचे' आहेत व हिंदूंच्या 'जातिव्यवस्थेमुळे' ते 'गुलामगिरीच्या वंशात' ढकलले गेले आणि त्यामुळे त्यांच्या दुःखद परिस्थितीचं कारण बाह्य नसून अंतर्गत आहे.

त्यामुळे जातिव्यवस्थेच्या अनुल्लंघनीय कायद्यामुळे त्यांच्या देशबांधवांवर जर हलकीसलकी कामं करणंच नशिबी आलं असेल तर आम्ही त्यांना मदत करू शकू अशी अपेक्षा तुम्ही (श्रीयुत गांधी) कशी काय करू शकता?....नाताळ आणि अन्य भाग हिंदूंच्या ज्या वर्गानं

व्यापले आहेत तो निश्चितपणे हिंदूंचा अगदी सर्वात खालचा वर्ग आहे. प्राप्त परिस्थितीत त्यांना त्यांच्या देशबांधवांकडूनच सन्मानाचं स्थान मिळू शकत नसल्यामुळे त्यांनी काहीही केलं तरी ते उच्च स्थानाला पोहोचूच शकत नाहीत. [*क्रिटिक*, जानेवारी ११, १८९५]

भारतीयांना करुणा आणि न्याय यांनी युक्त असलेल्या वागणुकीचा अधिकार निश्चितच आहे. परंतु त्याचबरोबर त्यांनी समाजाच्या हितासाठी असलेल्या आरोग्याच्या आणि इतर आवश्यक नियमांचं पालन केलं पाहिजे. 'चुकारपणा करणारांवर लक्ष ठेवणाऱ्या निरीक्षकाचा कठोर हात त्यांच्या कल्याणासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचेल अशी आपण अपेक्षा करू या. उच्चवर्णीयांचा अपवाद सोडल्यास, वैयक्तिक आणि सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत पौर्वात्य जाती अतिशय बेफिकीर आहेत.'

गांधीजींनी गोऱ्यांच्या ज्या अविवेकी वर्णविद्वेषाकडे लक्ष वेधलं होतं त्याचा निषेध करत *क्रिटिकनं* पुढं लिहिलं की हे खरं आहे की अनेक अमेरिकन आदिवासी रानटी आहेत! कारण अज्ञान हे नेहमीच आग्रही असतं, परंतु प्रत्येक सुशिक्षित माणसाला माहीत असतं की जसा इंग्रज निग्रो नाही तसाच भारतीय हा निग्रो नाही आणि काळ्या घोड्यात आणि काळ्या गायीत असते त्यापेक्षा त्यांच्यात व इथोपिअनांमध्ये जास्त सख्यही नाही. त्यांनी शेवटी लिहिलं की कोणत्याही प्रकारच्या अन्यायाविरुद्ध वा छळाविरुद्ध इंग्लंडमधील लोकमत अतिशय जागृत आहे. परंतु अनावृत्त पत्राच्या लेखकाला खरोखरच काही चांगलं काम करायचं असेल तर त्यानं आपल्या कामाची सुरुवात घरी करायला हवी आणि आपल्या देशबांधवांना व्याख्यानादी द्यायला पाहिजे.... ज्या कोणाला आपल्या बांधवांची परिस्थिती सुधारावयाची असेल त्यानं त्यांना त्यांचे दोष आणि अडचणी समजावून सांगण्यापासून सुरुवात करायला पाहिजे.... आशियाच्या दिव्याचा प्रकाश काळानुसार मंदावला आहे व त्याची साफसफाई करू शकणाऱ्याच्या मदतीची त्याला गरज आहे. याचा दक्षिण आफ्रिकेत काय परिणाम होतो ते श्रीयुत गांधींनी पाहायला हरकत नाही. [*क्रिटिक*, जानेवारी ११, १८९५] बाण गांधीजींच्या हृदयात खोलवर शिरला. भारतीय लोक

आपल्याच वर्गातील काही लोकांना दलितासारखी वागणूक जोपर्यंत देतील तोपर्यंत भारतमातेच्या पुत्रांनी देशाबाहेरही आपल्याला तशीच वागणूक मिळेल याची मानसिक तयारी ठेवायला हवी हे सत्य त्यांच्या मनावर ठसलं आणि एका नवीन जाणिवेनं त्यांच्या हृदयात प्रवेश केला. 'अस्पृश्यता' आणि 'अस्वच्छता' या दोन व्याधींची पाळंमुळं खणून काढायचा त्यांनी जणू काय विडा उचलला. 'अस्पृश्यांना' देण्यात येणाऱ्या वागणुकीमुळे गांधीजींचं अंतःकरण इतकं पोळलं होतं की प्रायश्चित्ताचं प्रतीक म्हणून त्यांनी अखेरीस भंगीकामाला सुरुवात केली आणि घोषित केलं की भारताचं स्वातंत्र्य वाट पाहू शकतं परंतु 'अस्पृश्यतेच्या' पापापासूनची मुक्ती वाट पाहू शकत नाही.

गांधीजींनी सुरू केलेल्या या आंदोलनाला जेमतेम सहा महिने होत नाहीत तोच नाताळमध्ये जे परिवर्तन घडून आलं ते केपच्या नजरेतूनही सुटलं नाही. येणाऱ्या काळाचं अशुभसूचक चिन्ह असा गांधीजींच्या अनावृत पत्राचा अर्थ लावत *केप टाईम्सनं* लिहिलं की आशियायी लोक इथं राहणार आहेत व दक्षिण आफ्रिकेतील त्यांच्या स्थानाचा निकट भविष्यात विचार करणं प्राप्त आहे. दोन डच गणराज्यात त्यांच्याविरुद्ध आधीच कार्यवाही करण्यात आलेली आहे. ऑरेंज फ्री स्टेटमध्ये त्यांच्यावर प्रतिबंधक कर लावण्यात आलेला आहे. ट्रान्सवालमध्ये भारतीयांना वस्त्यांमध्ये राहायला भाग पाडण्यात आलं आहे. केपटाऊन, किम्बर्ली, पोर्ट एलिझाबेथ आणि ईस्ट लंडन नगरपरिषदांच्या प्रतिनिधींनी दिलेल्या अहवालाप्रमाणे प्रत्यक्ष केपमध्येदेखील महापौर परिषदेनं मागणी केली होती की 'भारतीय, कुली आणि चिनी लोकांना' वेगळ्या वस्त्यात राहायला भाग पाडण्यात यावं. अजून उत्तरेकडे सनदप्राप्त कंपनीच्या नगरपालिकेच्या ठरावांनी देशातील नेटिव्ह आणि भारतीय आप्रवासी या दोघांनाही सारख्याच प्रमाणात लागू पडेल अशाप्रकारे वस्त्या तयार करायच्या आणि त्यांची देखरेख करायच्या योजनेचा विचार करत होती. केपच्या वृत्तपत्रानं लिहिलं :

भारतीय लोकांना गुलामगिरीचा धोका भेडसावत असणाऱ्या अशा परिस्थितीत त्यांना त्यातून मुक्ती देणाऱ्या भारतीय मोझेसचा अवतार झाला नाही तरच ती आश्चर्याची गोष्ट होईल. काळाच्या गरजेनुसार एम. के. गांधी, बॅरिस्टर यांच्या स्वरूपात असा माणूस आलेला आहे.... या देशातील अल्पकाळाच्या मुक्कामात श्रीयुत गांधी यांनी भारतीयांचा मतदानाचा जो अधिकार काढून घेण्यात येत आहे त्यासंबंधीच्या जोरदार आंदोलनात स्वतःला गुंतवून घेतलेलं आहे व त्यात त्यांना किती यश मिळतं हे लवकरच कळणार आहे.... श्रीयुत गांधींना हे भूषणावह आहे की त्यांनी इंग्लंडमध्ये सुरू व्हावयाच्या कोणत्याही प्रकारच्या आंदोलनात सहभागी व्हायची कल्पना झिडकारली आहे.... साम्राज्याच्या हस्तक्षेपामुळे जो काही लाभ होईल तो तात्कालिक असेल.... त्यामुळे लेखकानं युरोपिअनांच्या भावनांना आवाहन करायच्या प्रयत्नाला सुरुवात केलेली आहे. या अवघड कामाचा आवाका किती मोठा आहे ते नाताळच्या रीती आणि परंपरांची वरवर माहिती असणाराच्याही लक्षात येईल. [*केप टाईम्स*, जानेवारी २४, १८९५]

दक्षिण आफ्रिकेत राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समस्या निर्माण करणाऱ्या नको असलेल्या या घटकाला आणण्यासाठी नाताळमधील दूरदृष्टी नसलेला स्वार्थी आणि पैसा कमावण्याची हाव असलेला मालक जबाबदार आहे. या वर्गाला दोष देत या वृत्तपत्रानं पुढं लिहिलं :

नाताळमध्ये एक विचित्र दृश्य दिसते. ज्या वर्गाशिवाय नाताळचं भागू शकत नाही त्याच वर्गातील लोकांबद्दल नाताळमध्ये तीव्र घृणा भरलेली आहे. वसाहतीतून भारतीयांना काढून टाकण्यात आल्यास येथील व्यापारावर अपरिहार्यपणे पक्षाघाताचा कसा झटका येईल त्याची कल्पना करता येऊ शकते. आणि तरीही भारतीय माणूस आत्यंतिक घृणात्मक प्राणी ठरलेला आहे....

'काळ्यांची ही झुंड आपल्या राजकीय आणि व्यापारी श्रेष्ठतेच्या आड येणारी कायमची झंझट आहे' अशी भावना झालेल्या परिस्थितीत अशी भीती वाटत होती की 'ब्रिटिशांच्या सर्वोत्तम

परंपरांना' तसंच 'न्याय आणि नैतिकतेच्या तत्त्वांना' केलेल्या आवाहनाचा वसाहतीच्या लोकांवर फार कमी परिणाम होईल. यात काही संशय नाही की यावरही मात करणारे भारतीयांत असे काही गुण आहेत की ज्यामुळे ते व्यापारात यशस्वी झाले. 'नाताळच्या सेव्हिंग्ज बँकांचे हिशेब पाहिले तर लक्षात येईल की ते कंजूष आहेत; ते मद्यपान अगदीच करत नाहीत; ते जुगार खेळत नाहीत.' हे मान्य करायला पाहिजे की याबाबतीत त्यांनी असा आदर्श घालून दिला आहे की ज्याचं आधुनिक संस्कृतीत वरच्या पायरीवर असणाऱ्या इतरांनी अनुकरण करावं. परंतु स्पष्टपणे मान्य करण्यात आलं की हेच असे गुण होते की ज्यामुळे भारतीयांचा प्रश्न कठीण झालेला आहे. कारण याचमुळे गरीब गोऱ्यांशी त्याचा संघर्ष निर्माण झाला आहे. 'वसाहतीतील कोणताही उदारमतवादी माणूस श्रीयुत गांधींसारख्यांना नागरिकत्व नाकारणार नाही. परंतु नवीन देशात जुन्या देशांपेक्षाही परकीयांच्या लोंढ्यावर नियंत्रण ठेवणं आवश्यक असते'. 'याच साम्राज्याची प्रजा असलेल्या लोकांवर अन्याय होणार नाहीं असा मार्ग जर कुणालाही यातून शोधता आला तर 'दक्षिण आफ्रिका त्याबद्दल सर्वसामान्यपणे कृतज्ञ राहील.' [*केप टाईम्स*, जानेवारी २४, १८९५]

९

गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली नाताळ काँग्रेस शांतपणे काम करत होती. गांधीजींना गुप्तपणाची जरी घृणा होती तरी काँग्रेस कायम टिकायची शाश्वती वाटेपर्यंत ते तिची प्रसिद्धी टाळत होते. त्यामुळे तिच्या स्थापनेची औपचारिक घोषणासुद्धा करण्यात आली नव्हती. परंतु १८९५ साली अशी एक घटना घडली की ती प्रकाशझोतात आली.

१८९५च्या ऑगस्टमध्ये डरबन येथील निवासी न्यायाधीश कॅप्टन ल्युकास यांच्यासमोर एक खटला उभा राहिला. त्या खटल्यात पुन्नुस्वामी पाथेर व इतर तीन लोकांवर मुरूगस्वामी पिल्लेला मारहाण केल्याचा आरोप होता. अंतिम सुनावणीच्या आदल्या दिवशी कसाईकाम करणारा नाताळ इंडियन काँग्रेसचा सदस्य मोहम्मद इब्राहिम असगर (अस्गारा) याच्यावर साक्षीदार म्हणून निवासी न्यायाधीशांच्या न्यायालयात उपस्थित राहण्यासाठी समन्स

बजावण्यात आले. त्यानं सांगितलं की बारा ऑगस्टला मला महम्मद कमरुद्दीन यांनी मुसाच्या कार्यालयात पाठवलं होतं. मारहाणीची तक्रार करणाऱ्या पिल्लेकडून साक्ष देण्याचा तुझा विचार आहे काय आणि पुराव्यादाखल तू काय सांगणार आहेस असं कमरुद्दीन यांच्या उपस्थितीत दादा अब्दुल्ला, दाऊद इब्राहिम आणि इतर दोन वा तीन अनोळखी इसम यांच्यासमोर दुकानाचे कारभारी रंगास्वामी पदयाची मला विचारलं. प्रश्न विचारायच्या पद्धतीवरून मी पिल्लेकडून पुरावा देऊ नये अशी त्याची इच्छा असल्याचं माझ्या लक्षात आलं. मी पुरावा देऊ नये यासाठीच रंगास्वामीनं मला धमकी दिल्याचा त्यानं आरोप केला.

खटला सुरू असताना सांगण्यात आलं की लोकांची ये-जा सुरू असलेल्या सार्वजनिक रस्त्यावर मारहाण झाली होती. परंतु ज्या एकाच माणसाला पुराव्यासाठी बोलावण्यात आलं होतं त्यानं सांगितलं की मारहाण चालू असताना मी पाहिलं नाही परंतु 'सुरू असलेली वादावादी त्याला ऐकू आली.' त्याचबरोबर मारहाण कुठं झाली, कशी झाली वा कोणी केली हे सांगणारा कोणताच पुरावा नव्हता. परंतु पदयाची हा काँग्रेसचा एक उपाध्यक्ष होता. माजी सैनिक अधिकारी कॅप्टन ल्युकास यांनी सैनिकाप्रमाणे कायद्याच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करत त्यांनी अस्गाराच्या निराधार विधानावर विश्वास ठेवत नाताळ इंडियन काँग्रेस यात गुंतलेली असल्याचा आणि आरोपीला कायद्याच्या शिक्षेपासून वाचवत असल्याचा निष्कर्ष काढला. १३ ऑगस्टला त्यांनी सर्वांना शिक्षा सांगणारा निकाल घोषित केला.

प्रतिवादींनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यांचं म्हणणं होतं की न्यायाधीशांनी निराधार विधानांनी प्रभावित होऊन, ज्यांच्याबद्दल कोणताच पुरावा नव्हता वा साक्षीमध्ये जे विधान नोंदवण्यात आलेलं नव्हतं त्या गोष्टींच्या आधारानं निष्कर्ष काढला आहे.

यानंतर पोलीस न्यायाधीश वॅलर यांनी रंगास्वामी पदयाची यांच्यावर समन्स काढले. आधी सुनावणीसाठी १५ ऑगस्ट ही तारीख ठरली होती. परंतु आरोपीच्या वकिलाच्या

विनंतीवरून ती १९ ऑगस्टपर्यंत पुढं ढकलण्यात आली. आरोपीला २५ पौंड जमानतीवर सोडण्यात आलं.

या वेळी कॅप्टन ल्युकास यांनी, ज्यांचं आणि श्रीयुत वॅलर यांचं अधिकारक्षेत्र एकच होतं, हे प्रकरण आपल्याच हाती घ्यायचं ठरवलं. त्यांनी न्यायालयाच्या कोणत्याच समन्सशिवाय अस्गाराला बोलावणं पाठवलं, वॅलर यांना खटला मागे घेण्यात येत असल्याचं आणि संबंधित कागद पत्र कोर्ट ऑफ पीसला पाठवण्यासंबंधी लिहिलं आणि वॅलर यांच्या न्यायालयात रंगास्वामीनं दिलेल्या जबानीच्या आधारावर रंगास्वामी पदयाचीला नवीन समन्स पाठवले.

खटल्याला दुसऱ्यावेळी सामोरं जावं लागल्यामुळे पदयाची यांनी गांधीजींना नाताळ इंडियन काँग्रेसचे मानद सचिव म्हणून नव्हे तर वकील म्हणून खटल्यात हस्तक्षेप करायची विनंती केली. [सन्माननीय वसाहत मंत्री, पिटरमारिट्झबर्ग यांना गांधीजींचं पत्र दिनांक ऑक्टोबर २१, १८९५, वसाहत मंत्री कार्यालयातील रेकॉर्ड क्र. १७९, खंड १९२] त्यानुसार ४ सप्टेंबरला खटल्याची सुनावणी जेव्हा सुरू झाली तेव्हा श्रीयुत मिलर हे आरोपीकडील वकील म्हणून उभे राहिले तर श्रीयुत कॅंडलर सरकारी वकील होते. गांधीजीही न्यायालयात उपस्थित होते. कॅप्टन ल्युकास यांच्या न्यायालयात आधीच्या प्रसंगी गांधीजी उपस्थित राहिले असताना त्यांनी गांधीजींना पगडी काढायचा आदेश दिला होता, परंतु त्या आदेशानुसार न वागता गांधीजींनी न्यायालयाबाहेर निघून जाणं पसंत केलं होतं. तेव्हापासूनच श्रीयुत ल्युकास यांची गांधीजींवर वक्रदृष्टी होती. गांधीजींकडे कठोर दृष्टीनं पाहत त्यांनी गांधीजींना तुम्ही खटल्यात काम करत आहात काय असं विचारलं. गांधीजींनी उत्तर दिलं, 'नाही.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर १६, १८९५] सुनावणी १३ आणि १४ तारखेलाही सुरू होती.

सुनावणीच्या दुसऱ्या दिवशी पूर्वीप्रमाणेच गांधीजींना टिपणं घेताना आणि श्रीयुत मिलर यांना मदत करताना पाहून ल्युकास यांनी तुम्ही वकिलाचा पोषाख न घालता 'मिलरच्या कारकुनाप्रमाणे' काम करत काय बसला आहात असं अपमानजनक सुरात विचारलं. इंग्लिश बॅरिस्टर असूनही गांधीजी अशा प्रकारचं काम करत असल्याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केलं.

श्रीयुत गांधींना जर या खटल्यात काम करायचं असेल तर त्यांनी वकिलाचा झगा घालून यायला हवं आणि अटर्नीच्या जागेवर बसून काम न करता योग्य ठिकाणी बसायला हवं. हे काही इंग्लिश बॅरिस्टरचं काम नाही. श्रीयुत गांधींच्या या ठिकाणच्या उपस्थितीमागील वेगळं काही कारण असावं ज्यामुळे श्रीयुत गांधींना या ठिकाणी उपस्थित राहणं आवश्यक वाटतं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर १६, १८९५]

यावर 'श्रीयुत गांधींनी माझ्यासाठी कारकुनाचं काम केलं तर त्यात काही आक्षेपार्ह आहे काय' असं श्रीयुत मिलर यांनी विचारलं. न्यायाधीश उद्‌गारले, 'यातून मला सर्व काही स्पष्ट दिसू शकतं.'

नाताळच्या वकील मंडळाच्या सदस्याशी न्यायमूर्ती ल्युकास यांनी जे वर्तन केलं त्यामुळे काही युरोपिअनांनाही संताप आला. '*ऑनलुकर*'नं *नाताळ मर्क्युरीला* लिहिलं:

खुल्या न्यायालयात कॅप्टन ल्युकास यांनी श्रीयुत गांधी यांना ज्या प्रकारे प्रश्न विचारले ते न्यायाधीश म्हणून की सभ्यगृहस्थ म्हणून की सम्राज्ञींच्या सरकारमधील माजी सेवक म्हणून ते जाणून घ्यायची माझी इच्छा आहे.... मला आश्चर्य या गोष्टीचं वाटतं की श्रीयुत गांधींनी कॅप्टन ल्युकास यांना 'माझ्या भानगडीत लुडबुड करायचा अधिकार काय' असं विचारलं नाही. इंग्लंडमध्ये न्यायालयात बसलेल्या प्रत्येक बॅरिस्टरला....तो केवळ तिथं काही तरी लिहीत बसलेला आढळला असता आणि त्याला अशा प्रकारचे प्रश्न जर विचारण्यात आले असते तर मला वाटतं की इंग्रजी वृत्तपत्रांनी लगेच या प्रकरणी आरडाओरडीला सुरुवात केली असती.

त्यांनी आशा केली की 'श्रीयुत गांधी आपल्या व्यवसायाच्या प्रतिष्ठेसाठी हे प्रकरण असंच पडून राहू देणार नाहीत आणि योग्य ठिकाणी त्याची तक्रार करतील.' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर २३, १८९५]

या दोन खटल्यांना प्रसिद्धी मिळत नाही तोच दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रातून काँग्रेसवरील हल्ल्याला सुरुवात झाली. सप्टेंबर २१, १८९५ला *नाताळ ॲडव्हरटाईझर*नं लिहिलं:

वसाहतीतील भारतीयांत राजकीय स्वरूपाची फार मोठी संघटना अस्तित्वात असल्याचं दिसतं.... भारताशी आणि इंग्लंडशी राजकीय कारणांसाठी.... विशेषत्वानं या संघटनेच्या नेतृत्वपदी असणाऱ्या लोकांचा जो संपर्क आहे.... त्यामुळे अशा प्रकारच्या संघटनेचं अस्तित्व जाणवल्याशिवाय राहू शकत नाही. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २१, १८९५]

नाताळ ॲडव्हरटाईझरनं त्यावर लिहिलं की 'इंडियन काँग्रेसच्या अस्तित्वाचा केवळ योगायोगानं शोध लागला.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २१, १८९५] *नाताळ विटनेसनं* लिहिलं की हा शोध अतिशय योग्य क्षणी लागला आहे. केवळ या संधीचा सरकारनं योग्य फायदा घ्यायची आवश्यकता आहे. भारतीयांचा राजकीय प्रभाव वाढला तर वसाहतीत काय घडू शकेल हे तिनं आधीच दाखवून दिलं आहे.

जेव्हा केव्हा भारतीयांवरील खटला सुरू असतो तेव्हा न्यायालयाच्या धडधडीत अवमाननेच्या घटना घडत असल्याचं आढळून येतं.... आता आम्हांला असं आढळून आलं आहे की न्यायालयाच्या अवमाननेला एका सुंदर कलेचं आणि उपयुक्त मदतनिसाचं स्वरूप देण्यात येऊन त्या दृष्टीनं तिला विकसित करण्यात आलेलं आहे. एवढंच नाही तर देशभर शाखा असलेल्या एका संघटनेद्वारा तिचा उपयोग करण्याचा आदेशही देण्यात येतो. [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर २४, १८९५]

काँग्रेसची उद्दिष्टं काय आहेत हे शोधून ठेवण्यात 'कोणत्याही प्रकारची ढिलाई करण्यात येऊ नये' अशी त्यानं शासनाला विनंती केली. नाताळ विटनेसनं सुचवलं की 'योग्य प्रकारची काळजी घेऊन मेहनतीनं नीट' चौकशी करण्यात आल्यास *त्यांना आढळून येईल की अलीकडच्या काळात भारतीय आणि नेटिव्ह यांच्यात समझोता झालेला आहे. त्याची आतापर्यंत कल्पना नव्हती. त्यांच्या असंही लक्षात येईल की धूर्त भारतीय नेटिव्हांमध्ये असंतोष निर्माण करायचा प्रयत्न करत आहेत. आपल्या स्वतंत्र स्थानाच्या तुलनेत नेटिव्हांच्या आयुष्यभराच्या गुलामगिरीची ते जाणीव करून देत असतात.* [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर २४, १८९५]

शिव्यांचा हा भडिमार गांधीजींच्या वाचनात येताच हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे *ॲडव्हरटाईझरनं* झाडलेल्या ताशेऱ्यांचा अपवाद करत त्यांनी *ॲडव्हरटाईझरला* ताबडतोब पत्र लिहिलं. 'न्यायालयाची मानहानी व्हावयाची भीती नसती तर काँग्रेसला या खटल्यात कशा रीतीनं गोवण्यात आलेलं आहे त्यासंबंधी मी थोडंसं लिहिलं असतं. त्यामुळे खटल्याचा निकाल लागेपर्यंत त्यासंबंधी काही बोलायचं मी टाळणार आहे.' परंतु नाताळ इंडियन काँग्रेस ही गुप्त संघटना आहे या विधानाला आव्हान दिल्याशिवाय ते राहू शकत नव्हते.

काँग्रेस निर्मितीच्या अवस्थेत असतानाच ***नाताळ विटनेसनं*** *त्या घटनेला प्रसिद्धी दिली होती व मी चुकत नसेन तर त्यांनी प्रसिद्ध केलेल्या त्या बातमीचा परिच्छेद जसाच्या तसा तुमच्या वृत्तपत्रानंही प्रकाशित केला होता.... ती बातमी गुप्त ठेवायचा काहीच प्रयत्न करण्यात आलेला नव्हता. उलटपक्षी ज्या युरोपिअनांना सहानुभूती वाटते आणि जे संघटनेत सामील होऊ शकतील वा संघटनेच्या पाक्षिक सभांना हजर राहू शकतील असं संघटनेच्या संघटकांना वाटलं व त्याप्रमाणे त्यांनाही निमंत्रित करण्यात आलं होतं.* [*नाताळ ॲडव्हरटाईझरला* गांधीजींचं पत्र दिनांक सप्टेंबर २३, १८९५, प्रसिद्धी ... सप्टेंबर १८९५]

वृत्तपत्राच्या उद्‌गारांमुळे गैरसमज पसरू नये म्हणून गांधीजींनी संस्थेच्या उद्दिष्टांची माहिती देऊन नियमावलीची प्रत, पहिल्या वर्षातील सदस्यांची सूची आणि काँग्रेसचा २२ ऑगस्ट १८९५ला संपणाऱ्या वर्षाचा पहिला वार्षिक अहवाल आदी सर्व साहित्य वृत्तपत्रांना पाठवलं.

परंतु तरीही *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* आपले आरोप चालूच ठेवले. त्यानं मान्य केलं की काँग्रेस संघटनेच्या स्थापनेची माहिती वृत्तपत्रातून आली होती हे खरं असलं तरी संघटनेचं 'वास्तव स्वरूप' त्यावरून कळू शकत नव्हतं.

नाताळ इंडियन काँग्रेसचा आक्षेपार्ह भाग हा आहे की.... ती अनेक महिन्यांपासून काळोखात काम करत होती.... राजकीय संघटनेनं अनेक महिने काळोखात राहून काम करत राहणं कोणत्याही समाजासाठी हितावह नसते. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २६, १८९५]

ज्ञात माहिती आणि गांधीजींनी स्पष्टपणे नकार दिल्यानंतरही अशाप्रकारचं लेखन नाताळ मर्क्युरीला योग्य वाटलं नाही. २८ सप्टेंबरला त्यानं लिहिलं,

'आम्हांला वाटतं की नाताळ इंडियन काँग्रेसच्या अस्तित्वाविषयी पराचा फार मोठा कावळा करण्यात येतो आहे.' तिची स्थापना झाल्यापासूनच आम्हांला तिची माहिती आहे. आमची आठवण जर चुकत नसेल तर नाताळमधील सर्व वृत्तपत्रांतून, कमीतकमी एकापेक्षा अधिक वृत्तपत्रांतून त्यांसंबंधीचा उल्लेख आला होता. काँग्रेस आपलं काम शांतपणानं करत असेलही परंतु कोणत्याही अर्थानं घटनात्मक मार्गाचा अवलंब न करणारी ती गुप्त राजकीय संघटना असल्याचं आम्हांला आढळत नाही.' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर २८, १८९५]

त्यानं सावधगिरीची सूचना देत सांगितलं की त्यांच्यावरच काय पण वसाहतीवरही परिणाम करणाऱ्या राजकीय विषयावरील भाषण स्वातंत्र्यावर बंधनं आणण्यात आल्यास ब्रिटिश ध्वजांतर्गत राहणाऱ्या माणसांच्या, स्त्रियांच्या आणि मुलांच्या अत्यंत पवित्र अधिकारावर हल्ला करणं होईल. ते 'करायचा आपण विचारही करणार नाही.' वंश, धर्म वा वर्ण यांच्याबद्दल भेदभाव न करता सम्राज्ञींच्या प्रजेला समान दर्जा आहे. 'जोपर्यंत भारतीय देशद्रोह वा राजद्रोह करत नाहीत तोपर्यंत त्यांना त्यांच्या राजकीय संघटना उभारायचा सर्वार्थानं अधिकार आहे, आणि देशद्रोह वा राजद्रोहाला अडवायचा सर्वात चांगला उपाय भाषणस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य यांच्यावर कोणत्याही प्रकारचं बंधन न आणणं आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर २८, १८९५]

केप ऑरगसला काँग्रेसची स्थापना संकटमय वाटत असली तरीही कॅप्टन ल्युकास यांनी भारतीय राजकीय संघटनेवर हल्ला करण्यात चूक केलेली आहे असं सांगण्यात या वृत्तपत्रानं मागंपुढं पाहिलं नाही.

जोपर्यंत ते राजकारणापर्यंत स्वतःला बंदिस्त ठेवतात तोपर्यंत भारतीय अगदी बरोबर असतात आणि आपल्या शक्तीला घाबरून न्यायाधीशांनी आपल्याला नियंत्रित करायचा प्रयत्न केला आहे असं ते समजतील. [केप ऑर्गसमधून *नाताळ मर्क्युरी*मध्ये उद्धृत, ऑक्टोबर ११, १८९५]

परंतु वादळाची तीव्रता वाढतच होती. न्यायालयातील भारतीय दुभाष्या हाच 'इंडियन काँग्रेस नावाच्या संघटनेच्या' स्थापनेसाठी आणि वाढीसाठी जबाबदार आहे; याच व्यक्तीनं वास्तवात तिचे नियम तयार केले आहेत, सम्राज्ञींकडे निवेदन पाठवण्यातही याच व्यक्तीची प्रमुख भूमिका राहिली आहे, आणि याच 'कावेबाज दुभाष्या' च्या सूचनेनुसार 'श्रीयुत गांधींना वार्षिक ३०० पौंड पगारावर सचिव नियुक्त करण्यात आलं आहे' असं *नाताळ मर्क्युरीमध्ये* एच. नावाच्या एका स्तंभलेखकानं लिहायला सुरुवात केली. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर २८, १८९५]

हा डॅनिअल भारतीय आहे की युरोपिअन आहे हे कुणालाच माहीत नव्हतं. ['एच' म्हणून सही करून लिहिणारे गृहस्थ आर. एच. टॅथॅम असल्यास आश्चर्य वाटू नये. या अटकळीला रंग यायचं कारण असं की टॅथॅम यांनी द टाईम्समध्ये अगदी हाच युक्तिवाद याच भाषेत हिंदू आणि मुसलमानांचे कान भरण्यासाठी केला होता. परंतु हेही शक्य आहे की 'एच' हा कोणी भारतीय असेल व त्यानं सांगितलेल्या माहितीचा टॅथॅम केवळ पुनरुच्चार करत असावे. उदाहरणार्थ 'छोडो भारत' आंदोलनात सर रिचर्ड टॉटेनहॅम यांनी गांधीजी आणि काँग्रेसवर आरोप करताना अगदी तसाच आणि त्याच भाषेत युक्तिवाद केला होता ज्या भाषेत आणि जो युक्तिवाद त्यांच्या कार्यकारिणीचे सदस्य डॉ.एन. बी. खरे आणि डॉ. आंबेडकर करायचे] या निराधार आरोपाला खोडून काढत गांधीजींनी २५ सप्टेंबरच्या *नाताळ मर्क्युरीतून* निदर्शनास आणून दिलं की – 'काँग्रेसची स्थापना मुख्यत्वेकरून अब्दुल्ला हाजी आदम यांच्या प्रयासानं झाली आहे'; मी काँग्रेसच्या सर्व सभांना उपस्थित राहिलेलो आहे; संघटनेचे सर्व नियम तयार करायची जबाबदारी संपूर्णपणे माझी आहे आणि 'ते मुद्रित होऊन वाटले जाईपर्यंत कोणत्याही नागरी सेवेतील माणसानं ते पाहिलेले नाहीत वा ते तयार करण्यात कोणत्याही प्रकारचा सहभाग घेतलेला नाही.' [गांधीजींचं *नाताळ मर्क्युरीला* पत्र दिनांक सप्टेंबर २५, १८९५, प्रसिद्धी सप्टेंबर २७, १८९५] गांधीजी 'काँग्रेसचे पगारी सचिव' होते असं जे विधान करण्यात आलं होतं त्यासंबंधी स्पष्टीकरण देताना गांधीजींनी लिहिलं की याउलट सत्य असं आहे की इतर सदस्यांप्रमाणेच संघटनेला माझ्या अल्पशक्तीप्रमाणे मी वर्गणी दिलेली आहे. काँग्रेसच्या वतीनं मला कोणीही पगार देत नाही. काही भारतीय मला वार्षिक मेहनताना देतात..... काँग्रेसजवळ लपवण्यासारखं काहीच नाही. एवढंच आहे की ती तिची तुतारी वाजवत बसत नाही.' [गांधीजींचं *नाताळ मर्क्युरीला* पत्र दिनांक सप्टेंबर ३०, १८९५, प्रसिद्धी ऑक्टोबर ४, १८९५]

परंतु त्याचा काहीच उपयोग नव्हता. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारशी संघर्षाची तयारी करत आहे; भारतीय मजुरांना तक्रारीची दाद मागण्यासाठी ती हुसकावत आहे; त्यांना मदतीचं आश्वासन देऊन गांधीजींनी त्यांच्याकडून आणि भारतीय व्यापाऱ्याकडून पैसे उकळले आहेत व तो पैसा स्वतःच्या स्वार्थासाठी वापरला आहे अशा प्रकारच्या नवीन आरोपांचा त्यांच्यावर भडिमार करण्यात आला.

डरबन न्यायाधीशांसमोर चालू असलेल्या खटल्याच्या दैनंदिन सुनावणीमुळे भारतीयांमध्ये संतापाची तीव्र भावना खदखदू लागली होती. या वाढत्या लाटेला योग्य वाट करून देण्यासाठी गांधीजींनी नाताळ इंडियन काँग्रेसच्या वतीनं सभांमागून सभा घ्यायला सुरुवात केली. त्यातील एक सभा डरबन येथील पारसी रुस्तमजींच्या इमारतीत २८ सप्टेंबर १८९५ला झाली होती. तिथं जवळपास १,००० उपस्थितांना संबोधत गांधीजी म्हणाले की आता नाताळ इंडियन काँग्रेसच्या अस्तित्वाची सर्वांना चांगलीच माहिती झालेली असल्यामुळे लोकांनी संघटनेची वर्गणी देण्याबद्दल अधिक नियमित राहायला हवं आणि काँग्रेसची वर्गणी कमीतकमी ४,००० पौंडापर्यंत पोहोचवायला हवी. प्रत्येक व्यापाऱ्यानं १०० पौंड मालाच्या विक्रीवर ५ शिलींग देणगी दिल्यास हे उद्दिष्ट सहज साध्य करता येईल असं गांधीजींनी उपस्थितांना सांगितलं. त्यांनी पुढं सांगितलं की या वर्षाच्या शेवटी मी भारतात परतेन. त्यानंतर अनेक बॅरिस्टरांना नाताळमध्ये येण्यासंबंधी मी सुचवीन. अशा रीतीनं डरबन न्यायाधीशांच्या मुक्ताफळांमुळे नाताळ इंडियन काँग्रेसमध्ये नैराश्य येण्याऐवजी काँग्रेसच्या कामाला अजूनच जोर आला.

अकरा दिवसांच्या सुनावणीनंतर २ ऑक्टोबरला कॅप्टन ल्युकास यांनी आपला निकाल घोषित केला. त्यात त्यांनी आपला विश्वास व्यक्त करत लिहिलं :

कैदी आणि तक्रारकर्ता एकेकाळी ज्या संघटनेचे सदस्य होते त्या संघटनेकडून तक्रार करणारावर दडपण आणण्यात आलं होतं - ही संघटना म्हणजे नाताळ भारतीय काँग्रेस. वादीला मुसाच्या कार्यालयात बोलावण्यात आलं होतं यात काहीच संशय नाही. तिथं सर्व नाही तरी

काँग्रेसचे काही मुख्य लोक हजर होते. असं गृहीत धरायला हवं की ही संघटना राजकीय हेतूंसाठी स्थापण्यात आली आहे. तसं असल्यास या खटल्यात समोर आलेल्या पुराव्यानुसार संघटना आपल्या उद्दिष्टांपासून ढळली आहे. तिनं आपल्या प्रभावाचा आणि सामर्थ्याचा उपयोग करून न्यायाच्या कामात हस्तक्षेप करायचा आणि न्यायात अडथळा आणायचा प्रयत्न केला आहे. मी तर असंही म्हणेन की.... भारतीय काँग्रेसचं मूलभूत स्वरूपच कटकारस्थानं करायचं आहे आणि ती या वसाहतीतील सर्व समाजांसाठी, मग ते कोणत्याही वंशाचे असो, अपायकारक व धोकादायक आहे. कैदी संघटनेच्या हातातील केवळ बाहुलं मात्र असू शकतो परंतु त्यामुळे त्याच्या अपराधाचं गांभीर्य कमी होत नाही. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर ३, १८९५ (ठळक अक्षरं माझी)]

दहशत निर्माण करायच्या आरोपाखाली पदयाचीला सहा महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आणि त्यामुळे पदयाचीनं ताबडतोब सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली.

पदयाची प्रकरणातील निकालामुळे नाताळ इंडियन काँग्रेस गंभीर संकटात सापडली. *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं, 'कॅप्टन ल्युकास यांनी आरोपिल्याप्रमाणे काँग्रेस खरोखरी देशद्रोही आणि धोकेदायक संस्था असेल तर तिच्यावर कोणतीही उपाययोजना करण्यात आली तरी ती कठोर ठरणार नाही.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर ५, १८९५] तीन दिवसांनंतर त्यानं पुन्हा लिहिलं की जर 'नाताळ इंडियन काँग्रेस चुकीच्या आणि संशयास्पद मार्गांचा' अवलंब करत असल्याचं सिद्ध झालं तर त्वरित आणि निर्णायक कृती करून तिला दंडित करणं समर्थनीय होईल.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर ८, १८९५]

क्षणाचाही अवधी न दवडता गांधीजींनी आपली बाजू मांडली. सुकाणू आपल्या हाती घेत गांधीजींनी ॲडव्हरटाइझरमध्ये लिहिलं की काँग्रेसनं 'अप्रत्यक्षपणे जरी' साक्षीदाराच्या साक्षीत अडथळा आणायचा प्रयत्न केला असेल तर 'तिला दडपून टाकणंच न्यायोचित राहील.' परंतु यावेळी मी पुन्हा एवढंच सांगेन की काँग्रेसनं असा कोणताच प्रयत्न केलेला नाही. ज्या एकमेव

साक्षीदाराला खटला सुरू असताना यासंबंधी प्रश्न विचारण्यात आला होता त्यानं या प्रकरणाशी काँग्रेसचा कोणताही संबंध नसल्याचं सांगितलं होतं. 'संघटनेशी संबंधित असलेल्या लोकांनी केलेल्या वैयक्तिक कृत्याचं जनकत्व संघटनेच्या माथी मारण्यात आलं तर मी असं म्हणायचं साहस करेन की कोणत्याही संघटनेवर कोणत्याही प्रकारचा आरोप सिद्ध करता येईल. [गांधीजींचं *नाताळ ॲडव्हरटाईझरला* पत्र दिनांक ऑक्टोबर ९, १८९५ प्रसिद्धी ऑक्टोबर ४, १८९५]

नाताळ विटनेस आणि *द साऊथ आफ्रिकन टेलिग्राफ* तर याच्याही दोन पावलं पुढं गेले. *नाताळ विटनेस* उद्‌गारलं की कॅप्टन ल्युकास यांच्या ताशेऱ्यांमुळे 'श्रीयुत ॲडव्होकेट गांधी समाधानी असल्याचं विशेषत्वानं दिसत नाही. भारतीय समाजाकडून जो काही पैसा घ्यायचा असेल तो घेऊन ते आपल्या मायदेशात, गावात वा ब्रिटनमध्ये जेवढ्या लवकर काळं करतील तेवढं बरं होईल.' आता 'काळजीपूर्वक चौकशी केल्यानंतर न्यायदानाच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणारी एक संस्था आहे' असं न्यायाधीशांनी घोषित केल्यानंतर 'या प्रकरणाची सर्वंकश चौकशी करणं शासनाचं कर्तव्य आहे' आणि पदयाचीच्या खटल्याच्या दरम्यान करण्यात आलेल्या आरोपाच्या जवळपास कोणी पोहचत असल्याचं आढळलं तर *काँग्रेसला विलंब न करता भंग करण्यात यावं व कायद्याप्रमाणे तिच्या सदस्यांना कठोरतम शिक्षा करण्यात यावी. त्याचबरोबर श्रीयुत गांधींचे या संघटनेशी कोणते संबंध आहेत याबद्दल गांधींना स्पष्टीकरण मागणं लॉ सोसायटीचं कर्तव्य आहे. ॲडव्होकेट हा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकारी असतो आणि न्यायाच्या कामात हस्तक्षेपाशी त्याचा कोणत्याही प्रकारे संबंध असणं.... हे सहनशीलतेच्या पलीकडचं आहे. त्याही पलीकडची गोष्ट म्हणजे इंग्लंडमध्य ज्या इनचे श्रीयुत गांधी सदस्य आहेत त्या इनला या खटल्याची सर्व माहिती कळवण्यात येऊ त्यांना चौकशी करायला सांगण्यात यावं.* [*नाताळ विटनेस*, ऑक्टोबर ५, १८९५]

काँग्रेसवर बंदी आणण्यात यावी या मागणीला पाठिंबा देत *द साऊथ आफ्रिकन टेलिग्राफ*नं आपल्या एका वाचकाचं पुढील पत्र प्रकाशित केलं :

भारतीय रंगीत माणसं.... आफ्रिकी माणसांपेक्षा अधिक धोकादायक आहेत हे सत्य सर्वांना माहीत आहे. आपली रंगीत माणसं काही वेळा त्रासदायक होत असतात.... काही वेळा ते बंड करून उठतात व बंडाची गुप्तपणे तयारी करतात. परंतु बहुतेक वेळा ते उघडपणे आणि हिंमतीनं काम करतात. जेव्हा त्यांना कठोर शिक्षा करण्यात येते तेव्हा ते ती धैर्यानं सहन करतात व आपला पराभव मुकाट्यानं मान्य करतात. भारतीय असे नाहीत. चोरून काम करायच्या त्यांच्या स्वभावामुळे ज्या अधिकाऱ्यांसमोर ते नम्रपणानं वागत असल्याचं दाखवतात त्याच्याच विरोधात कट-कारस्थानाची आणि विश्वासघातकीपणानं वागायची त्यांना दुर्दम्य इच्छा होते.... आज आपल्यामध्ये अशा प्रकारचा समाज आहे, आणि भारतात त्यांनी जशी संकटं निर्माण केली आहेत तशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यायची वेळ आपल्यावर येऊ नये हे वेळीच पाहणं आपलं कर्तव्य आहे. [*साऊथ* आफ्रिका *टेलिग्राफ*, ऑक्टोबर ७, १८९५ (ठळक अक्षरं माझी)]

मध्यंतरीच्या काळात 'एच' नावानं लिहिणाऱ्या सद्‌गृहस्थाच्या कानावर 'मारिट्झबर्ग येथील एका प्रतिष्ठित गृहस्थाकडून' काही माहिती आली. आपल्या पूर्वीच्या विधानात अजून गरळ ओतत त्यांनी ६ ऑक्टोबरच्या नाताळ मर्क्युरीत लिहिलं की माझ्या पूर्वीच्या पत्रात उल्लेखिण्यात आलेल्या भारतीयांच्या आंदोलनात कटकारस्थान करणाऱ्या दुभाष्यानं सुरू केलेली 'भारतीयांची चळवळ यशस्वी झाली तर ऊस मळेवाल्यांच्या सोयीसाठी भारतीयांची आयात करून वसाहतीतील सर्व युरोपिअनांना मतदानात पराभूत करायचा तो प्रयत्न करणार आहे'; तो 'आपल्या पदाचा उपयोग करून शासकीय गोष्टींची काँग्रेसला माहिती देतो'. त्यामुळे त्याला सरकारी नोकर म्हणून त्याच्या पदावर ठेवण्यात येऊ नये आणि गांधीजी हे 'पगारी आंदोलक' आहेत आणि मानद सचिव ना. इ. क. अशी सही करून ते 'लोकांची दिशाभूल करत आहेत.'

आशा करू या की या वसाहतीतील केवळ आमदारच नाही तर गरज पडल्यास प्रत्येक युरोपिअन उठून उभा राहील आणि मेसर्स गांधी आणि कंपनी जी बोट वल्हवत पुढं न्यायचा प्रयत्न

करत आहेत त्या बोटीला पाण्यात बुडवायला मदत करील व भारतातील ज्या दलितांची वसाहतीच्या खर्चावर आयात करण्यात आली होती आणि या फर्मच्या हस्तक्षेपाशिवायही जे समाधानात होते त्यांना त्यांची जागा दाखवण्यात येईल.... या मुसलमान शिपायांचं त्यांच्या देशात तसंच मुंबई, मॉरिशस इत्यादी ठिकाणी यांच्याशी हाडवैर आहे तेच इथं एकमेकांशी किती उत्साहानं सहकार्य करत आहेत ते पाहिल तर धोक्याचं गांभीर्य लक्षात येईल. [*नाताळ मर्क्युरी*, ऑक्टोबर ६, १८९५]

पारसी रुस्तमजी यांच्या इमारतीतील ज्या सभेत गांधीजी बोलले होते तिचा उल्लेख करत 'एच' यांनी उद्‌गार काढले, 'श्रीयुत गांधींनी भारतीयांना आश्वासन दिलं आहे की मी तुमच्यासाठी अजून तीन भारतीय बॅरिस्टर आणीन. मग नाताळची काय अवस्था होईल?' [*नाताळ मर्क्युरी*, ऑक्टोबर ६, १८९५] त्यानंतर धमकी देत 'एच' पुढं म्हणाले की 'माझ्याजवळ सर्व पुरावे आहेत व आवश्यकता पडेल तेव्हा ते सर्व मी सरकारसमोर ठेवीन.' [*नाताळ मर्क्युरी*, ऑक्टोबर २५, १८९५]

गांधीजी द्विधा मनःस्थितीत होते. नाताळ इंडियन काँग्रेसची बदनामी करायचा हा जो सतत उद्योग सुरू होता त्याच्यातील धोका गांधीजींना दिसत होता. परंतु काँग्रेसला ज्या खटल्यात दोषी ठरवण्यात आलं होतं तो खटला न्यायप्रविष्ट असल्यामुळे गांधीजी या प्रश्नाची वृत्तपत्रातून सविस्तर चर्चा करू शकत नव्हते. काँग्रेसवर न्यायाधीशांनी केवळ ओघाओघात ताशेरे झाडलेले असल्यामुळे सर्वोच्च न्यायालय त्यासंबंधी संपूर्ण चर्चा न करण्याचीही शक्यता होती. बराच विचार केल्यानंतर २१ ऑक्टोबरला गांधीजींनी वसाहत मंत्र्यांना एक पत्र लिहिलं. वृत्तपत्रात जे उतारे प्रकाशित झाले होते व जे गांधीजींनी आपल्या पत्रासोबत जोडले होते त्याद्वारे गांधीजींनी दाखवलं की (अ) काँग्रेसनं अस्गाराला वा इतर कोणत्याही व्यक्तिला साक्ष देण्यापासून अडवण्यासाठी कधीच बोलावलं नव्हतं परंतु पीठासीन न्यायाधीशांनी जे उद्‌गार काढले 'त्यासाठी त्यांच्याजवळ कोणताही आधार नव्हता. अस्गारा या साक्षीदाराच्या तपासणीत, उलट तपासणीत आणि पुनर्तपासणीत काँग्रेसचा उल्लेखही करण्यात आलेला

नव्हता. साक्षीदाराची तपासणी संपल्यानंतर न्यायाधीशांनी काँग्रेससंबंधी प्रश्न विचारले.' (ब) ज्या आठवड्यात साक्षीदारावर दबाव आणण्यात आला म्हणून आरोप करण्यात आला त्या आठवड्यात काँग्रेसची सभाच झाली नसल्याचं प्रश्नोत्तरातून स्पष्ट झालं. (क) असं सांगण्यात आलं की काँग्रेसचे काही सदस्य उपस्थित असलेल्या मुसाच्या कार्यालयात १२ ऑगस्टला साक्षीदाराला बोलावण्यात आलं. मुसाच्या कार्यालयातील सभेला बोलावण्यात आल्याचं कोणतंच परिपत्रक त्याला मिळालं नाही. खटल्याच्या दरम्यान सादर करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार काँग्रेसच्या सभा काँग्रेस भवनात होत असतात. त्यातील कोणत्याच सभेला तो उपस्थित नव्हता.

न्यायाधीशांनी काढलेल्या निष्कर्षाला केवळ एकाच मुद्याचा आधार मिळू शकत होता. तो म्हणजे मुसाच्या कार्यालयात उपस्थित असलेल्या सहा-सात लोकांपैकी तीन लोक काँग्रेसचे सदस्य होते. परंतु इथंही काँग्रेस संघटनेचा साक्षीत ढवळाढवळ करायचा उद्देश असल्याचं कुठंच दाखवण्यात आलेलं नाही. पुनास्वामी आणि इतर तीन प्रतिवादींच्या खटल्यात प्रतिवादी हे काँग्रेसचे सदस्य होते व त्यांना काँग्रेसचा पाठिंबा होता असे जे न्यायाधीशांनी निकालामध्ये उद्‌गार काढले त्यांच्या पुष्ट्यर्थ कोणताही ठोस पुरावा देण्यात आला नाही.

मी नम्रपणे शासनाला आश्वासन देऊ इच्छितो की वसाहतीतील दोन्ही समुदायांना काँग्रेसचा लाभ व्हावा आणि भारतीयांच्या प्रश्नाविषयीच्या भावना शासनाला कळवून शासनाला मदत करण्यासाठी काँग्रेस सहाय्यभूत होईल असं स्वरूप काँग्रेसला द्यावं हा काँग्रेस संघटनेच्या मुळाशी हेतू आहे, शासनाला लज्जित करायचा, जर ती तसं करू शकतही असेल तरी, हेतू नाही.... मी आपल्याला सांगू इच्छितो की काँग्रेसनं भारतीयां-भारतीयांमधील न्यायालयीन प्रकरणात कधीच हस्तक्षेप केलेला नाही. काँग्रेसच्या नियमाप्रमाणे काँग्रेसच्या सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या मान्यतेशिवाय काँग्रेसचा कोणताही सदस्य काँग्रेसच्या, वतीनं वा

काँग्रेसच्या नावावर काहीही करू शकत नाही आणि काँग्रेसची सभा मानद सचिवाच्या लेखी सूचनेशिवाय बोलावली जाऊ शकत नाही.

समारोप करत त्यांनी लिहिलं : शासनाचा जर विश्वास असेल की काँग्रेसचा प्रस्तुत प्रकरणाशी काहीही संबंध नाही तर शासनानं तशा आशयाचं काही तरी जाहीर निवेदन करावं व जर शासनाला काही संशय असेल तर 'चौकशीचा माझा आग्रह आहे.' [गांधीजींचं पत्र माननीय वसाहत मंत्री, पिटरमारिट्झबर्ग यांना दिनांक ऑक्टोबर २१, १८९५]

हे पत्र पोहोचलं असेल नसेल तेवढ्यातच 'पुन्नास्वामी आणि इतर विरुद्ध रेगिना' ह्या खटल्यात देण्यात येणारी शिक्षा सर्वोच्च न्यायालयानं रद्दबातल ठरवली. कार्यकारी मुख्य न्यायाधीश श्रीयुत ब्यूमाँट म्हणाले की जो काही पुरावा आहे तो आरोप सिद्ध करणारा नाही. वादीची साक्ष 'थोड्याशा उलटतपासणीनंतर कोसळली.' त्यामुळे 'न्यायाधीशांनी अशा प्रकारच्या साक्षीच्या भरवशावर या चार व्यक्तींनी हल्ला केला असा निष्कर्ष काढावा ही गोष्ट जरा अलौकिकच वाटते.... *त्यांना वाटलं की खटल्याशी संबंधित नसलेल्या गोष्टीत न्यायाधीशांचं लक्ष केंद्रित झालेलं असावं* [नाताळ मर्क्युरी, ऑक्टोबर २३, १८९५, द स्टोन थ्रोईंग केस, (ठळक अक्षरं माझी)] हे प्रकरण उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपाची जोरदार मागणी करत आहे.

एका महिन्यानंतर २७ नोव्हेंबर १८९५ला सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायमंडळानं पदयाची खटल्यात झालेली शिक्षाही फेटाळून लावली. तसं करताना सरन्यायाधीश उद्‌गारले की 'ज्युरीला शिक्षेसंबंधी विचारावं असा यात पुराव्याचा लहानसा अंशही नाही.' [नाताळ मर्क्युरी, नोव्हेंबर २८, १८९५, द टाईम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या बिहार आणि मध्यभारतातील जंगलातील झाडांना रंग आणि केस लावायचा मे १८९४च्या तारेचा हा संदर्भ आहे त्यामुळे कॉलनल मॉलिसन आणि द स्पेक्टेटरला १८५७मधील उठावात आणण्यात आलेल्या चपात्यांच्या कटाची आठवण झाली. स्पेक्टेटरनं असा सिद्धान्त मांडला होता की टाकसाळी बंद करण्यात आल्यामुळे आणि चांदी चलनातून काढून घेतल्यामुळे तसंच रुपयाची किंमत घसरल्यामुळे जो तोटा होत होता तो भरून काढण्यासाठी गाजावाजा न करता सरकार शेतसारा वाढवायचा जो प्रयत्न करत होतं त्यामुळे जी व्यापक आणि सखोल आर्थिक हलाखीची परिस्थिती निर्माण झाली तिच्यामुळे विशेषतः पंजाबमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला होता. तो अशा प्रकारच्या उठावासाठी अनुकूल होता. याचा प्रतिकार करण्यासाठी भारताची किल्ली असलेल्या अलाहाबादच्या किल्ल्यातील शिबंदीचं सैनिकी रणगाड्यांतर्फे अतिशय काळजीपूर्वक रक्षण करणं आणि गरज पडताच

हिमालयापलीकडील वा ब्रह्मदेशातील सैन्य बोलावणं हाच होता. वृत्तपत्राचं म्हणणं होतं की ही दक्षता घेतली जायची शक्यता फार कमी होती. 'एकच गोष्ट निश्चित आहे की आशिया ब्रिटिशांच्या प्रभुत्वाला अनुकूल नाही आणि कधीही नव्हता. आणि आशिया आपल्या दीर्घ इतिहासात युरोपिअनांना बाहेर फेकून देण्यात यशस्वी ठरलेला आहे.' याचे प्रतिध्वनी दक्षिण आफ्रिकेतही पोहोचले. प्रेसनं विचारलं की खऱ्या ब्रिटिश सैनिकांना पराभव कधीच माहीत नसतो परंतु ते शीख आणि गुरखा आणि राजपुतांएवढे पराक्रमी आहेत काय जेवढे रिचर्डचे कवच घातलेले सैनिक सलाउद्दीनच्या सैनिकांच्या प्रमाणात पराक्रमी होते?' प्रेसनं शेवटी लिहिलं जेरुसलेममध्ये सलाउद्दीनच थांबला होता. (प्रेस, इंडियन स्केअर)] सर वाल्टर रॅग्ज उद्‌गारले की हा खटला अगदी सुरुवातीपासून अनियमिततेनं काठोकाठ भरलेला आहे. पीस ऑफ कोर्टाच्या कारकुनानं काढलेले समन्स 'अपुरे आणि कायद्याच्या दृष्टीनं चुकीचे होते.' न्यायाधीश श्रीयुत ब्यूमाँट म्हणाले की प्रत्येक गोष्ट 'रद्द करणं मला आवडेल.' सम्राज्ञींच्या वकिलाला विचारण्यात आलं असता त्यांनी निवासी न्यायाधीशांनी सुचवलेली कार्यवाही रद्द करायचा सल्ला दिला.

अपील मान्य करण्यात आलं आणि प्रतिवादींना निर्दोष म्हणून सोडण्यात आलं.

अशा रीतीनं नाताळ इंडियन काँग्रेसवर आलेल्या संकटातून ती सुखरूप बाहेर पडली व ज्यांनी तिच्या विनाशाची योजना आखली होती त्यांच्यावरच त्यांचा डाव उलटला. वसाहतीतील डरबन येथील सर्वोच्च न्यायालयानं निवासी न्यायाधीशावर जी कठोर टीका केली होती तिची सविस्तर बातमी आणि त्यावरील टीकाटिप्पणी यांना वृत्तपत्रातून फार विस्तृत प्रसिद्धी मिळाली होती आणि ज्यांनी काँग्रेसचं कधी नावही कधी ऐकलं नसतं त्यांच्यातही त्यामुळे काँग्रेस प्रसिद्धीला आली.

नाताळ इंडियन काँग्रेसच्या वाढीच्या महत्त्वाकडे लक्ष वेधणारात *केप टाईम्स* पहिलं होतं. पदयाची खटल्यावरील निकाल आणि २९ सप्टेंबरला डरबन येथील ज्या सभेत भारतीयांसमोर गांधीजींनी भाषण दिलं होतं त्या सभेचा वृत्तांत या दोन्हींवर भाष्य करत *केप टाईम्सनं* लिहिलं:

यावरून असं दिसून येतं की साम्राज्याला जबाबदार प्रशासन असलेल्या या वसाहतीत ज्यांच्यामुळे या भागात भारतीय मूल आलं होतं व ज्यांच्यावर त्याचं अस्तित्व अवलंबून होतं ते भारतीय मूल त्यांच्या कशाही प्रकारच्या गुलामगिरीत समाधानात राहायचा काळ आता निघून

गेलेला आहे. त्याचा असा दावा आहे की निर्णयशक्ती प्राप्त व्हायच्या वयात तो इथं आला आहे आणि या काळात त्याच्या राजकीय आणि सामाजिक आकांक्षाना मान्यता मिळायला हवी.... आमच्या बातमीदाराचं म्हणणं आहे की समाजानं इंग्लंडमध्ये जे चांगलं काम केलं त्याचा श्रीयुत गांधींनी रविवारच्या सभेत उल्लेख केला.... अशा रीतीनं भारतीय समाजाला या देशातील उगवती राजकीय शक्ती म्हणून ओळखावं लागेल.... त्या शक्तीच्या अज्ञानाचं ढोंग करणं चूक होईल. श्रीयुत गांधींच्या अनुयायांत सामर्थ्यशाली व्हायची क्षमता आहे, मग ते सामर्थ्य बऱ्यासाठी असो की वाईटासाठी. सुज्ञ राजकारणी त्याची नोंद घेतल्याशिवाय राहणार नाहीत. **(१२१)**

नाताळ इंडियन काँग्रेस ही आता भारतीय राष्ट्रीय काँग्रेसपेक्षा अधिक गुप्त संघटना राहिलेली नाही असं तिचं म्हणणं होतं. अशाच प्रकारे एका दशकापूर्वी मुंबईमध्ये काँग्रेसची सर्वप्रथम सभा झाली तेव्हा 'भारताच्या नवीन संसदेनं' आपलं 'काही स्वरूप उघड केलं आणि अनेक गोष्टी उघड करण्यात ती अपयशी ठरली आहे' असं मानण्यात येऊन संशय घेण्यात येत होता की 'वरवर दिसते आहे त्याहून काही वेगळ्या अशुभ हेतूंना काँग्रेसनं आश्रय दिलेला आहे.' अशाच प्रकारे नाताळ काँग्रेसविरुद्ध आरोपही निराधार असल्याचं सिद्ध होईल अशी केपच्या या वृत्तपत्रानं अपेक्षा व्यक्त केली.

....ही गोष्ट गुप्त ठेवण्यात यश मिळवायच्या पद्धतीत काही तरी भारतीयत्व आहे. जेव्हा वंगणानं माखलेल्या झाडांची बातमी इंग्लंडमध्ये पोहोचली तेव्हा उडालेला थरकाप आम्हा सर्वांना आठवतो. आणि गूढ चपात्या एकमेकात वाटून कशाप्रकारे बंडाचा उठाव करण्यात आला होता त्याच्याही अशुभ आठवणी आम्हांला येतात. वंगणानं माखलेल्या झाडांद्वारे करण्यात आलेला उठाव वाया गेला आणि आपण या गोष्टीलाही फारसं महत्त्व द्यायचं कारण नाही की नाताळमधील भारतीयांनी आपले पाय रोवले जाईपर्यंत आपला स्वतःचा वकील ठेवायचं ठरवलं आहे. **(१२२)**

एका वर्षाच्या आत काँग्रेसची सदस्यसंख्या २२८पर्यंत पोहोचली आणि एखाद डझन ठिकाणी काँग्रेसच्या शाखा काम करू लागल्या होत्या.

यावरून स्पष्ट दिसते की कुलींचा लहानसा वर्गसोडून इतर वर्गातील लोक काँग्रेसचे सदस्य झाले होते. मासिक वर्गणी किमान ५ शिलींग आहे आणि नुकत्याच संपलेल्या वर्षात काँग्रेसच्या कोशात ६१६ पौंड वर्गणीची भर पडली आहे. या एकूण आर्थिक परिणामाकडे पाहता दक्षिण आफ्रिकेतील युरोपिअन राजकीय संस्थांना मिळणारा नगण्य पाठिंबा त्या दृष्टीनं लाजिरवाणा वाटतो.... काँग्रेसला भक्कम पायावर उभं करण्यासाठी श्रीयुत गांधींची ४,००० पौंडांची मागणी आहे व त्यादृष्टीनं संपूर्ण वर्षाची वर्गणी आधीच भरायची आहे. स्पष्ट आहे की श्रीयुत गांधी त्यांच्या लोकांना ओळखतात. परंतु श्रीयुत ब्रिडॉन हेही दक्षिण आफ्रिकेच्या राजकीय संस्थांसाठी असंच काही करू शकत नाहीत काय ? [*केप टाईम्स*मधून *नाताळ विटनेस*मध्ये पुनर्मुद्रित, ऑक्टोबर १८, १८९५]

या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी तडजोड करायची सूचना करण्यात आली. १२ महिन्यांपासून मतदान दुरुस्ती विधेयक सिंहासनाच्या मान्यतेची वा नाकारलं जायची वाटपाहत पडून होतं. नकाराधिकार वापरण्यात आला असता तर नाताळच्या ज्या गोऱ्यांना आपलं प्रभुत्व कायम ठेवण्यासाठी मतदान दुरुस्ती विधेयक आवश्यक वाटत होतं त्यांच्यात तीव्र संतापाची भावना उसळणं अपरिहार्य होतं. त्यामुळे साम्राज्याचं सरकार खास अडचणीच्या परिस्थितीत सापडलं होतं.

संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यात आणि त्याच्या वसाहतीत भारतीय वंशाच्या लोकांना व्यापार आणि मजुरी करायचा अधिकार आहे असा भारतीयांचा दावा आहे. त्यामुळे त्यांना नाताळनं मतदानाचा अधिकार नाकारणं वा आप्रवासी भारतीय मजुरांना भारतात परतायला भाग पाडणं हा भारतीयांच्या या दाव्यावर कुठाराघात आहे असं त्यांना वाटतं. जवळपास सारख्याच संख्येत असलेल्या भारतीय लोकांना पाहून आमच्या नाताळच्या भावंडांना जो त्रास होतो आहे तो पाहून

आम्हांला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. परंतु भारतीयांनाही प्रत्युत्तर द्यायचा अधिकार आहे : 'तुम्ही आम्हांला इथं आणलं' आणि गेल्या अनेक वर्षात वसाहतीच्या औद्योगिक प्रगतीसाठी आमची उपस्थिती तुम्हांला आवश्यक वाटली.' आम्हांला मनापासून वाटतं की काही तरी तडजोड करण्यात यावी. तुम्ही एखाद्या माणसाचे अधिकार केवळ त्याच्या रंगामुळे उघडपणे आणि कशाचीही पर्वा न करता काढून घेता ही गोष्ट स्वातंत्र्यभावना आणि न्याय्यवर्तन यांच्या विरोधी आहे. आणि केवळ ब्रिटिश बेटच नाही तर ब्रिटिश साम्राज्यातही अशा प्रकारच्या वर्तनाला स्थान नाही असं इंग्लंड अभिमानानं सांगत असते. जोवर सांसदीय मतदानाच्या अधिकाराचा प्रश्न आहे तोवर गोऱ्यांच्या उदारमतवादाला थोडा धक्का लावून का होईना गोऱ्यांची हेतूपूर्ती होईल अशा रीतीनं संपत्ती आणि शिक्षणविषयक पात्रतेची अट टाकून गोऱ्यांचा हेतू सिद्ध करता येईल. अशा प्रकारचा द्वेष निर्माण करणारा भेदभाव न करण्याची दक्षता या वसाहतीत घेण्यात आली आहे. अशाच प्रकारच्या कोणत्या तरी उपायांनी ब्रिटिश आणि नाताळच्या सरकारच्या दृष्टीनं या पेचप्रसंगातून मार्ग काढता येणार नाही काय? [*केप टाईम्स*मधून *नाताळ विटनेस*मध्ये पुनर्मुद्रित, ऑक्टोबर १८, १८९५]

काँग्रेसनं ही तडजोड स्वीकारली असती. परंतु नाताळ सरकारनं आपला हेतू साध्य करण्यासाठी अप्रामाणिक आणि अशोभनीय उपायांचा अवलंब करायचा निर्धार केलेला होता. काँग्रेससमोर अजून एक आव्हान उभं होतं. त्याबद्दल नंतर.

प्रकरण २: 'जुन्या दिव्यांबद्दल नवे दिवे'

१

डरबनमध्ये गांधीजी राहत असलेली बीच ग्रोव्ह व्हिला, ही नजरेत न भरणारी, थोडी वेगळी पडलेली, दुमजली इमारत होती. तिच्यासमोरील बाजूला लोखंडी फाटक होतं. इमारतीच्या बाजूनं प्रवेशद्वार होतं व आत जाण्यासाठी खोल्यांमधून वाट होती. डरबनच्या उपसागराकडे तोंड करून असलेल्या झरोक्याखाली ओसरी होती. महाधिवक्ता हॅरी एस्कॉम्ब त्यांच्या शेजारी राहत होते. सर्व शेजारी युरोपिअन होते. विश्रांतीची खोली, बैठक, स्वयंपाकघर, न्हाणी आणि इतर गरजेच्या गोष्टी खालच्या मजल्यावर होत्या. मागील बाजूच्या अंगणात झोका आणि व्यायाम यांसाठी आडवे लोखंडी बार लावलेले होते.

ते घर खूप खर्च करून काही सजवण्यात आलेलं नव्हतं. विश्रांतीच्या खोलीत संपूर्ण जमिनीवर सतरंजी अंथरलेली होती. तिथं एक सोफा, दोन खुर्च्या, टेबल क्लॉथ टाकलेला एक टेबल आणि एक पुस्तकांचं कपाट होतं. टॉलस्टॉय, मॅडम ब्लाव्हात्स्की आणि एडवर्ड मेटलँड यांची पुस्तकं, एसोटेरिक ख्रिश्चन युनियन आणि व्हेजिटेरिअन सोसायटीची प्रकाशनं, कुराण, बायबल; ख्रिश्चन, हिंदू धर्मावरील तसंच इतर धार्मिक साहित्य व भारतीय राष्ट्रीय नेत्यांची चरित्रं इत्यादी साहित्य त्या कपाटात प्रामुख्यानं होतं. जेवणाच्या खोलीत आयताकृती टेबल, आठ बेंटवुडच्या खुर्च्या आणि कोपऱ्यात लहानसहान वस्तूंचं कपाट होतं. वरच्या माळ्यावरील पाचपैकी झोपायच्या दोन खोल्यात कपडे ठेवायची कपाटं होती. तिथं पडायला केवळ लाकडी तक्ते असलेले पलंग होते. त्या पलंगांना ना स्प्रिंग होते ना गाद्या. त्यावर केवळ लाकडी फळ्या होते.

नाताळ इंडियन काँग्रेसच्या स्थापनेला कारणीभूत असलेल्या प्राथमिक चर्चा इथंच झाल्या होत्या. प्रमुख भारतीय व्यापारी संध्याकाळी इथंच यायचे. केव्हाकेव्हा काही युरोपिअनही

यायचे. ओ. जे. आस्क्यू, ॲश लेनमध्ये मुख्यालय असलेले साऊथ आफ्रिकन मिशनचे पहिले सचिव डब्ल्यू. स्पेन्सर वाल्टन आणि गांधीजींना ख्रिश्चन धर्माकडे वळवू इच्छिणारे इतर मिशनरी इत्यादींचा गांधीजींकडे येणाऱ्या युरोपिअनांमध्ये समावेश असायचा.

या घरापासून फार दूर नसलेल्या अंतरावरच डरबनच्या हमरस्त्यावरील वेस्ट स्ट्रीटच्या कोपऱ्यावर दादा अब्दुल्ला अँड कंपनीचं दुकान होतं. बेंजामिन ग्रीनएकर यांच्या मालकीच्या हार्वी ग्रीनएकर कंपनी या प्रतिष्ठानाच्या ते अगदीच शेजारी होतं. डरबनमधील ते प्रमुख व्यावसायिक प्रतिष्ठान होतं. बेंजामिन ग्रीनएकर हे डरबनमधील अगदी सुरुवातीचे महापौर होते व काही काळानंतर ते पद त्यांच्या मोठ्या मुलानं, वाल्टर ग्रीनएकर यांनी भूषवलं होतं. व्यापारी कामकाज तळमजल्यावर व्हायचं. वरचा मजला राहण्यासाठी उपयोगात यायचा. पहिल्या माळ्यावरील मोठाले हॉल पौर्वात्य पद्धतीच्या किमती फर्निचरनं सजवलेले होते. त्याचा उपयोग पाहुण्यांचं स्वागत करण्यासाठी व्हायचा. भारतीय शैलीनं गाद्या घातलेल्या तिथल्या बैठकीवर तक्क्याला रेलून पाहुणे आराम करायचे.

वेस्ट स्ट्रीट कॉर्नरच्या हाकेच्या अंतरावर गांधीजींच्या खोल्या होत्या. तिथं काही कारकुनांच्या मदतीनं गांधीजी कायद्याच्या व्यवसायाचं काम करायचे. दोन्ही जागांचा आणि त्या जागी काम करणाऱ्या मदतनीसांचा काँग्रेसच्या कार्यासाठीही उपयोग व्हायचा. गांधीजींचं काम करणारा त्यांच्या विश्वसातील कारकून होता तामिळ भाषी ख्रिश्चन व्हिन्सेंट लॉरेन्स. ते नंतर त्यांच्या कुटुंबियाप्रमाणे बीच ग्रोव्ह व्हिला येथे साडेचार वर्ष राहिले होते. ते आणि त्यांची बायको हे दोघंही बर्घरमध्ये नोंदणी केलेले सदस्य होते. रोमन कॅथॉलिक पंथाच्या सेंट फॅन्सिस थर्ड ऑर्डर श्रेणीचे ते निष्ठावंत भक्त होते आणि चर्चच्या सेवेसाठी पोप जॉन २३कडून त्यांना सुवर्णपदक मिळालेलं होतं. ९३ वर्षाच्या वयात ते बिछान्याला खिळून असले तरी त्यांची इच्छाशक्ती दांडगी आहे, स्मरणशक्ती तेवढीच तल्लख आणि स्पष्ट आहे, आणि ते अजूनही नीटनेटक्या आणि

वळणदार अक्षरात लिहितात. ते इतक्या बारीक अक्षरात लिहू शकतात की ते वाचण्यासाठी मोठी अक्षरं दिसणाऱ्या भिंगाचा उपयोग करावा लागावा.

मुक्त भारतीय आईवडिलांच्या पोटी वसाहतीत जन्मलेले ख्रिश्चन तरुण जोसेफ रॉयप्पन यांच्याकडे काँग्रेसच्या कार्यालयाचा कारभार होता. नाताळ इंडियन काँग्रेसच्या पहिल्या काही सदस्यातील एक रॉयप्पन यांनी आपल्या कार्यक्षमतेमुळे आणि भक्तिमुळे अगदी तरुणाईच्या उंबरठ्यावर असतानाच गांधीजींचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतलं होतं. गांधीजींनी त्यांना इंग्लंडला जायला, कायद्याचा अभ्यास करायला आणि बॅरिस्टरची पदवी पदरी पाडून परतायला मदत केली होती. सत्याग्रहाचं आंदोलन सुरू झालं असताना त्यांनी आपला व्यवसाय सोडला आणि त्या लढ्यात स्वतःला झोकून दिलं. ते उंच आणि ग्रॅनाईटच्या खांबाप्रमाणे ताठ होते आणि त्यांच्या आवाजात असं काही माधुर्य होतं की ते जेव्हा गायचे तेव्हा इंग्रजही मंत्रमुग्ध होऊन जागीच खिळून उभे राहायचे. त्यांच्या निष्ठेत कधीच अंतर पडलं नाही. त्यांना 'शुद्ध रॉयप्पन' असं टोपण नावच पडलं होतं. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात साबरमती आश्रमात गांधीजींना भेटायला ते जेव्हा आले तेव्हा त्यांनी त्या विशेषणाला पूर्णपणे सार्थ ठरवलं होतं. ते जून १९६० साली वारले.

विविध प्रकारच्या कामांमुळे गांधीजींना घरातील कामाकडे बघायला क्वचितच वेळ सापडायचा. फार कशाला स्वतःच्या स्वास्थ्यासाठी आवश्यक असलेला सकाळसायंकाळचा फेरफटका मारायला वेळ देणंही त्यांना कठीण व्हायचं. घरातील कामकाजात सर्वत्र साधेपणा होता. काटेकोर शाकाहारी असल्यामुळे जेवण अगदी साधं असायचं. परंतु अनेकदा युरोपिअन पाहुणे असायचे. गांधीजींच्या तत्कालीन कल्पनेप्रमाणे भारतीय बॅरिस्टरच्या प्रतिष्ठेप्रमाणे त्यांचं स्वागत व्हावं अशी त्यांची इच्छा असायची. त्यामुळे घरखर्च बराच यायचा. अशा प्रकारच्या काळज्यातून मुक्त होण्यासाठी त्यांनी आपला बालमित्र शेख मेहताब याला बोलावलं. तो राजकोटहून आल्यनंतर त्याच्याकडे घरातील प्रत्येक गोष्टीचा कारभार सोपवण्यात आला आणि

त्यासोबतच त्याला त्याच्या खर्चासाठी काही पैसेही देण्यात यायचे. त्याला त्यापेक्षा अजून कशाची गरजही नव्हती आणि त्यानं तशी काही मागणीही केली नव्हती. तो सुधारला आहे असं समजून गांधीजींनी त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकला.

परंतु मेहताब बदलला नव्हता. ऑफिसमधील एका कारकुनाबद्दल त्याला मत्सर वाटत होता व त्याच्याविरुद्ध त्यानं गांधीजींचे कान भरायला सुरुवात केली. आपल्याबद्दल अविश्वास आहे असं लक्षात आल्यानं त्या गरीब बिचाऱ्या माणसानं दुःखी होऊन नोकरी सोडली. तरीही गांधीजी आपल्या बालमित्रावर आंधळेपणानं विश्वास ठेवतच होते.

आठवड्यातील कामकाजाच्या दिवशी गांधीजी ९ वाजताच्या दरम्यान न्यायालयात जायचे आणि जेवणासाठी दुपारी एक वाजता परतायचे. सुटीवर गेलेल्या गुजराती स्वयंपाक्याच्या जागी ठेवलेल्या एका माणसानं एके दिवशी त्यांना न्यायालयातून बाहेर बोलावलं आणि तो म्हणाला :

'ताबडतोब कृपा करून घरी चला. तिथं एक आश्चर्य तुमची वाट पाहत आहे.'

आपल्या सवयीप्रमाणे गांधीजी त्याला आपल्या कुटुंबियाप्रमाणेच समजायचे. ते म्हणाले, 'का, काय झालं? मला चटकन सांग. तुला कळत नाही काय की ही काही घरी जायची माझी वेळ नाही.'

'कृपा करून या, नाही तर तुम्हाला पश्चात्ताप करावा लागेल.'

गांधीजी त्याच्यासोबत घरी गेले.

ते घराच्या पायऱ्या चढू लागले तेव्हा त्या माणसानं शेख मेहताबच्या खोलीकडे बोट दाखवलं आणि म्हणाला : 'आत काय चालू आहे ते पाहा.'

दार बंद होतं आणि त्याला आतून कडी होती.

मी ते पाहिलं. मी दार वाजवलं. कोणतंच उत्तर नाही. मी इतक्या जोरात दार ठोठावलं की घराच्या भिंती हादरल्या. दार उघडलं गेलं. मला आत वेश्या दिसली. मी तिला घरातून निघून जायला आणि कधीच न परतायला सांगितलं.

तिच्या साथीदारालाही निरोप घ्यायला सांगण्यात आलं. मेहताब उर्मटपणा करू लागला. 'मी तुझी अंडीपिल्ली बाहेर काढेन.' त्यानं गर्जना केली.

गांधीजी संतापून म्हणाले, 'तुला हवं ते तू करू शकतोस. लपवण्यासारखं माझ्याजवळ काहीही नाही. पण आताच्या आत्ता तू बाहेर नीघ.'

मेहताब त्यांना मारायच्या बेतात असतानाच व्हिन्सेंट लॉरेन्स आला आणि त्यानं मेहताबला मागून पकडलं. गांधीजींनी त्या दोघांना सोडवून वेगळं केलं.

मेहताब चपापला आणि त्यांच्याकडे रोखून पाहू लागला.

लॉरेन्सकडे वळत गांधीजी म्हणाले, 'कृपा करून पोलीस अधीक्षकांकडे जा. त्यांना माझा नमस्कार सांग आणि त्यांना सांग की माझ्याकडे राहणाऱ्या माणसानं गैरवर्तन केलं आहे आणि त्याला जायला सांगितल्यानंतरही तो माझ्या घरातून जायला तयार नाही.'

आता खेळ संपला असं लक्षात येताच मेहताबनं माफी मागितली आणि गयावया करत पोलिसांत तक्रार न करायची त्यानं गांधीजींना विनवणी केली व तो घर सोडून निघून गेला.

स्वयंपाक्यानंही परवानगी मागितली. 'मी तुमच्यासोबत राहू शकत नाही. तुम्ही भोळसट आहात आणि तुमची सहज दिशाभूल करता येऊ शकते. हे ठिकाण काही मी राहण्यायोग्य नाही.'

त्याला त्याची चूक कळावी म्हणून गांधीजींनी त्याला जाऊ दिलं. त्यांचे डोळे उघडण्यासाठीच नशिबानं जणू त्याला पाठवलं होतं. मेहताबनं कोणत्यातरी भारतीय व्यापाऱ्याकडे नोकरी धरली व त्यानंतर त्यानं गांधीजींचा उंबरठा कधीच ओलांडला नाही. परंतु

त्याची त्यांच्यावरील भक्ती कायम राहिली आणि त्यांच्याशी तो एकनिष्ठ राहिला. नंतर त्यानं लग्न केलं आणि त्याच्या बायकोनं सत्याग्रह संघर्षात भाग घेतला. त्याच्या दोन तीव्र इच्छा होत्या. एक व्याख्यानं द्यायची आणि दुसरी उर्दूत कविता करायची. सत्याग्रह संघर्षाच्या दरम्यान भारतीय भाषेतील उत्कृष्ट राष्ट्रभक्तीपर कवितेसाठी बक्षिसपात्र असलेल्या स्पर्धेसाठी त्यानं पाठवलेली कविता गांधीजींनी *इंडियन ओपिनियन* मध्ये प्रकाशित केली होती.

२

गांधीजींनी व्यवसाय सुरू करून जेमतेम चार महिने होत नाही तोच एके दिवशी फाटलेल्या कपड्यातील एक गरीब तामिळ मनुष्य गांधीजींच्या कार्यालयात थरथर कापत आणि रडतरडत येऊन उभा राहिला. आपल्या हातात पगडी धरून विनवणी करत तो उभा होता. त्याच्या समोरच्या दातातील दोन दात जवळपास तोडण्यात आले होते व ओठांना फाडून ते बाहेर डोकावत होते. त्यातून वाहणाऱ्या रक्तानं त्याची पगडी भरून गेलेली होती.

तो बालसुब्रमण्यम नावाचा बंधुआ मजूर होता. त्याच्या युरोपिअन मालकाचा पारा भडकला होता व त्या भरात त्यानं त्याची पिटाई केली होती. कांग्रेसनं अजून मजूरांमध्ये कामाला सुरुवात केलेली नव्हती व अनेक मजुरांना तिची माहितीही नव्हती. अडचणीच्या वेळी कुठं जावं हे माहीत नसल्यामुळे जखमी अवस्थेतील तो माणूस प्रोटेक्टरकडे गेला. त्याचं घर त्याच्या मालकाच्या घराजवळच होतं. त्याला दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये बोलावण्यात आल्यामुळे प्रोटेक्टर आपल्याला पुन्हा जुन्या तापट मालकाकडे जायला भाग पाडेल असं त्याला वाटलं. तो घाबरलेला असल्यामुळे व त्यानं गांधीजींचं नाव ऐकलेलं असल्यामुळे तो गांधीजींकडे धावत आला. त्याला त्याच्या भाषेत तक्रार लिहायला गांधीजींनी सांगितलं आणि त्याच्या जखमांबद्दलचा दाखला मिळवण्यासाठी डॉक्टरकडे पाठवलं. त्या दिवसात केवळ गोरे डॉक्टरच असायचे. परंतु त्या डॉक्टरनं मात्र रंगभेदाचा कोणताही परिणाम आपल्यावर न होऊ देता आपलं कर्तव्य पार पाडलं. वैद्यकीय दाखला घेऊन गांधीजी बालसुब्रमण्यमला न्यायाधीशाकडे घेऊन

गेले. न्यायाधीश त्याची ती अवस्था पाहून कळवळले आणि त्यांनी त्याला उपचारासाठी दवाखान्यात पाठवलं. त्याची पगडी त्यांनी पुरावा म्हणून न्यायालयात ठेवून घेतली.

काही दिवसांनी बरा झाल्यानंतर तो माणूस सरळ गांधीजींच्या ऑफिसमध्ये आला. त्यानं मालकाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करायची विनंती केली. करार रद्द केला जावा अशी अशी त्याची इच्छा होती.

'तुझी बदली दुसऱ्या मालकाकडे केली तर चालेल काय?' गांधीजींनी विचारलं. जखमांमुळे अजूनही बोलू शकत नसल्यामुळे त्यानं होकारार्थी मान हलवली. त्यानंतर त्याच्या मालकाशी संपर्क करण्यात आला. आधी त्याची कबुली नव्हती परंतु नंतर बालसुब्रमण्यमचा करार बदलून द्यायला तो माणूस तयार झाला.

गांधीजींनी बालसुब्रमण्यमला प्रोटेक्टरकडे पाठवलं. त्यानं त्या माणसाला ऑफिसमध्येच राहू द्यायला सांगितलं आणि आपल्याला जे काही करता येणं शक्य आहे ते आपण करू असं आश्वासन दिलं.

मधल्या वेळेत मालक प्रोटेक्टरकडे गेला आणि सांगितलं की माझा विचार आता बदलला आहे. 'माझ्या बायकोला हा कुली किंमती वाटतो आणि ह्याच्या सेवेला मुकायची तिची तयारी नाही.'

प्रोटेक्टरनं मालकालाच संरक्षण दिलं. त्यांनं गांधीजींना लिहिलं, 'कुलीनं तडजोड केलेली आहे. आपली काहीच तक्रार नाही असं सांगणाऱ्या कागदावर कुलीनं सही केलेली आहे. अशा अवस्थेत मी काहीच करू शकत नाही.

गांधीजींना धक्काच बसला. त्या गरीब माणसाकडून अशाप्रकारचा कागद मिळवायचा त्याला काय अधिकार होता ?

गांधीजी त्या धक्क्यातून सावरत नाहीत तोच तो माणूस गांधीजींच्या ऑफिसमध्ये रडत आला. प्रोटेक्टर माझी बदली करायला तयार नाही तो म्हणाला. गांधीजी लगेच प्रोटेक्टरच्या ऑफिसमध्ये गेले. प्रोटेक्टरनं सही केलेला कागद दाखवला. तो म्हणाला की ही या माणसाची चूक आहे. यानं या कागदावर सही करायला नको होती. उत्तरात गांधीजी एवढंच म्हणाले की मी याला न्यायाधीशांकडे तक्रार करायला जायला सांगत आहे. प्रोटेक्टर म्हणाला की यानं दिलेल्या प्रतिज्ञापत्रानंतर त्याचा काही लाभ होणार नाही. त्यामुळे प्रकरण संपवायचा त्यानं गांधीजींना सल्ला दिला.

दुःखी अंतःकरणानं गांधीजी घरी परतले आणि त्याच्या बदलीची मागणी करणारं पत्र त्याच्या मालकाला लिहिलं. त्यानं त्या गोष्टीला नकार दिला. त्यामुळे गांधीजींनी जखमी माणसाला न्यायाधीशांकडे नेलं आणि तिथं रीतसर तक्रार नोंदवण्यात आली व वैद्यकीय दाखलाही सादर करण्यात आला. न्यायाधीशांनी त्या माणसाला रक्तबंबाळ अवस्थेत पाहिलेलं असल्यामुळे त्यांचा फार संताप झाला आणि त्यांनी मालकाला समन्स पाठवले.

मालकाला शिक्षा व्हावी अशी गांधीजींची इच्छा नव्हती. त्यांना बालसुब्रमण्यमची त्याच्यापासून केवळ सुटका करायची होती. अखेरीस त्यालाच त्याच्या हातून यातना सहन कराव्या लागल्या होत्या. त्यामुळे मालक जर बालसुब्रमण्यमची बदली करायला तयार असेल तर आपण तक्रार मागं घ्यायला तयार आहो असं गांधीजींनी सांगितलं. मालकानं मारल्याचं कबूल केलं परंतु आपल्याला भडकवण्यात आल्याचं त्यानं सांगितलं. बालसुब्रमण्यमनं ते नाकारलं.

कायदा आपल्या हातात घेण्याबद्दल आणि त्या गरीब माणसाला एखाद्या जनावराप्रमाणे मारल्याबद्दल मालकावर ठपका ठेवत न्यायाधीश मालकाला म्हणाले की जर ही तडजोड तू मान्य केली नाहीस तर परिणाम गंभीर होतील. त्यानंतर विचार करण्यासाठी मालकाला एक

दिवसाचा अवधी देऊन न्यायाधीशांनी त्या दिवसाचं कामकाज थांबवलं. शांतपणे विचार केल्यानंतर मालकाला वस्तुस्थितीची जाणीव झाली.

परंतु प्रोटेक्टरनं अडचण उभी केली. त्यानं गांधीजींना पत्र पाठवलं की जोपर्यंत कोणी तरी या माणसाला आपल्याकडे घ्यायला तयार नसेल तोपर्यंत मी या माणसाची बदली मंजूर करू शकत नाही. ईश्वराच्या उत्तम सेवकाकडे म्हणजे श्रीयुत ओ. जे. आस्क्यू यांच्याकडे गांधीजी त्याला घेऊन गेले व त्यांनी आनंदानं बालसुब्रमण्यमची सेवा आपल्याकडे घ्यायला मान्यता दिली. मालकाला गुन्हेगार ठरवत न्यायाधीशांनी बंधुआ मजुराचा मालक बदलवत असल्याची नोंद केली.

बालसुब्रमण्यम गांधीजींच्या ऑफिसमध्ये पगडी हातात धरून गेला. बंधुआ मजूर वा कोणी अनोळखी भारतीय दिसला की गोरे मालक असं करायला लावतं.

'दोन्ही हातांनी केलेला नमस्कार पुरेसा नसायचा. बालसुब्रमण्यमला वाटलं की माझ्याबरोबरही त्याच प्रघातानुसार वागायला पाहिजे.... मला संकोच वाटला आणि मी त्याला पगडी बांधायला सांगितली. त्यानं तसं केलं. पण तसं करताना तो संकोचल्याशिवाय राहू शकला नाही. परंतु त्याच्या चेहऱ्यावरील आनंद माझ्या नजरेतून सुटला नाही.'

त्यामुळे गांधीजींचं हृदय कळवळलं. 'लोकांना आपल्या बांधवांच्या अपमानातून आनंद कसा मिळू शकतो हे माझ्यासाठी नेहमीच गूढ राहिलं आहे.' [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १५५]

३

नाताळमध्ये हजारो बालसुब्रमण्यम होते आणि इतर ब्रिटिशांच्या वसाहतीत तर त्याहूनही किती तरी पट होते. कोणत्याही प्रकारच्या मदतीची वा सुटकेची कल्पना न करता बंधुआ मजुरांना आपल्या मालकाच्या पायावर लोटांगण घालून पडून राहावं लागायचं.

बालसुब्रमण्यमच्या सुटकेची बातमी एका वसाहतीतून दुसऱ्या वसाहतीत वाऱ्यासारखी पसरली. ज्या मद्रासमधून बंधुआ मजुरांची भरती करण्यात यायची त्या मद्रासमध्येही त्या बातमीचे प्रतिध्वनी पोहोचले होते. गोऱ्या मालकाविरुद्ध कोणी तरी उभा राहायला तयार आहे हे कळल्यानंच त्यांची अंतःकरणं आश्चर्यमिश्रित आनंदानं भरून आली आणि त्यांच्यात चैतन्य निर्माण झालं. गांधीजींच्या कार्यालयात बंधुआ मजुरांचा एक नियमित प्रवाह सुरू झाला. त्यांची सेवा करायची संधी मिळाल्यानं गांधीजींना अतीव समाधान मिळायचं. भारतीय बंधुआ मजुरांना कामावर घेणारात सर्वात मोठा वाटा होता नाताळ सरकार रेल्वेचा. अतिशय कष्ट आणि असह्य छळ यांनी त्रस्त होऊन रेल्वेत काम करण्यापेक्षा अनेकदा मजूर तुरुंगात खडी फोडणं पसंत करायचे. गांधीजी त्यांच्या मदतीला धावून जाईपर्यंत त्यांची बाजू घेणारं कोणीच नव्हतं. त्यामुळे ते आपली गाऱ्हाणी कुणालाच सांगू शकत नसत. व अन्यायाची दाद मागता येते याचीही त्यांना जाणीव नसायची. एप्रिल १८९५मध्ये त्यांच्यातील ७१ लोकांना पोलिसांना झोडपायच्या आरोपाखाली डिल्लॉन यांच्या न्यायालयात उभं करण्यात आलं होतं. खर्च वाचवण्यासाठी त्यांना लाकडाऐवजी कोळसा देण्यात यावा असा आदेश रेल्वे अधिकाऱ्यांनी दिला असावा. लाकडाशिवाय कोळसा पेटवणं कठीण होत असल्यामुळे त्या गरीब बिचाऱ्या बंधुआ मजुरांना स्वयंपाक करण्यासाठी मोठ्या पहाटे तीन वाजताच उठावं लागायचं. त्यांनी त्याबद्दल तक्रार केली, परंतु तिकडे दुर्लक्ष करण्यात आलं. त्यामुळे ते परवानगीशिवायच इंधन शोधत भटकू लागलें व जिथून जे जळण मिळेल ते उचलून आणू लागले.

मे १७, १८९५ला ते जेव्हा इंधनाच्या मोळ्या घेऊन जात होते तेव्हा 'नेटिव्ह' पोलिसानं त्यांना अडवलं आणि अटक केली. त्यानंतर त्यांच्यातील सात लोक 'मागं वळले आणि हातातील काठ्यांनी पोलिसांना त्यांनी झोडपलं असा आरोप करण्यात आला.' त्यानंतर पी. सी. मॅडन नावाचा युरोपिअन पोलीस तिथं एकटाच गेला आणि कोणताही प्रतिकार न होता त्यानं त्या सर्वांना अटक केली.

सुनावणीच्या वेळी रेल्वे विभागाच्या श्रीयुत हॅमंड यांनी रेल्वे अधिकाऱ्यांच्या वर्तनाचं समर्थन केलं आणि सांगितलं की सरकारनं कुलींना कोळसा व थोडीशी लाकडं द्यायचं ठरवलं आहे व त्या दृष्टीनं त्यांच्या घरांत चुलीही तयार करण्यात आल्या आहेत. 'त्यांच्या करारात सरकारनं त्यांना इंधन पुरवायला पाहिजे असं कुठंच नाही व सरकार जे इंधन पुरवत आहे ती त्यांना देण्यात आलेली सूट आहे.'

याला तीव्र विरोध करत आप्रवाशांच्या प्रोटेक्टरनं (संरक्षकानं) सांगितलं की मी मजुरांच्या वस्तीला भेट दिली आहे आणि त्या चुलीवर स्वयंपाक करणं त्यांच्यासाठी अशक्य आहे. या लोकांनी त्याबद्दल सतत तक्रार केली होती. त्याबद्दल रेल्वेचे वरिष्ठ व्यवस्थापक श्रीयुत हंटर यांना मी लिहिलं होतं व त्याकडे ताबडतोब लक्ष पुरवण्यात येईल असं उत्तरही लगेच आलं होतं. 'सतरा दिवसांपासून या लोकांजवळ स्वयंपाकाची सोय नाही आणि माझ्या मते या लोकांकडे अगदीच लक्ष देण्यात आलेलं नाही.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे २०, १८९५]

निकाल घोषित करत ना न्यायाधीशांनी सांगितलं की पुराव्यावरून दिसून येतं की या माणसांनी 'ज्यावर त्यांचा अधिकार नाही ते घ्यायचा अपराध केलेला आहे आणि त्यानंतर त्यांनी पोलिसांशी गैरवर्तन केलेलं आहे.' परंतु पुढं त्यांनी लिहिलं की:

मला प्रकर्षानं वाटतं की मजुरांना अतिशय वाईट वागणूक देण्यात आहे. प्राचीन काळी गवताची काडीही न वापरता विटा बनवायचा फरोहानं जो आदेश दिला होता त्याचं पालन करून घेण्यासाठी ज्यूंना जेवढी वाईट वागणूक देण्यात यायची तशीच वागणूक यांना देण्यात येत आहे. मी त्यांना कोणत्याही प्रकारची शिक्षा ठोठावू शकत नाही आणि ते जाऊ शकतात. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे २०, १८९५]

सुनावणी सुरू असताना गांधीजी न्यायालयात उपस्थित होते. त्यामुळे दोन दिवसांनंतर न्यायालयाच्या कामकाजाचा वृत्तांत नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये पुढील स्वरूपात प्रकाशित झालेला पाहून त्यांना धक्काच बसला:

कामाच्या ठिकाणाच्या फाटकावर पहारा करायचं काम करणाऱ्या पोलिसांना शुक्रवारी रात्री भारतीयांची फार मोठी तुकडी स्लीपरची लाकडं आपल्या डोक्यावर घेऊन जात असल्याचं आढळून आलं. त्यांना अटक करायचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांच्यातील ७१ लोक हातात काठ्या, लोखंडी पत्रे, लोखंडाच्या सळया आणि स्वयंपाकाची भांडी घेऊन मागं वळले व त्यांचा पोलिसांवर त्यांनी मुक्तपणे भडिमार केला. पी. सी. मॅडन हे त्यानंतर अजून पोलीसबळ घेऊन गेले व त्या टोळक्यातील सात म्होरक्यांना त्यांनी अटक केली व त्यांना शनिवारी सकाळी श्रीयुत डिल्लॉन यांच्या न्यायालयात हजर करण्यात आलं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे २०, १८९५]

गांधीजींनी ताबडतोब *नाताळ ॲडव्हरटाईझर*ला पत्र लिहिलं आणि दाखवलं की त्यातील प्रत्येक विधान हे केवळ सत्याशीच विसंगत नाही तर साक्षीदारांनी न्यायालयात ज्या साक्षी दिल्या त्यांच्याशीही विसंगत आहेत. 'कुली' स्लीपरचा जो गठ्ठा आपल्या डोक्यावर घेऊन जात होते असा आरोप करण्यात आला आहे तो न्यायालयात कधीच दाखवण्यात आला नाही. साक्षीमध्ये 'लोखंडाच्या सळया आणि स्वयंपाकाची भांडी' यांच्याबद्दल शब्दही उच्चारण्यात आलेला नाही. आणि त्या 'सर्वांच्या डोक्यांवर जर लाकडाच्या मोळ्या होत्या तर' त्यांच्या हाती भांडी वगैरे कशी आली हे सहज कळू शकत नाही. '७१ लोक' मागं वळले आणि पोलिसांना झोडपलं याऐवजी *'साक्षीदारांनी सांगितलं की ज्या सात लोकांना आरोपी करण्यात आलं आहे ते सात लोक काठ्या घेऊन मागं वळले आणि व त्यांच्यातील दोघांनी प्रतिकार करायचा प्रयत्न केला. आधी तिथं एकच पोलीस होता आणि तो नेटिव्ह पोलीस होता. त्यानंतर घटनास्थळी पी. सी. मॅडन एकटाच आला. आपल्याला प्रतिकार करण्यात आला असं नेटिव्ह पोलिसांनी जेव्हा सांगितलं तेव्हा पी. सी. मॅडन यानी सांगितलं की मला मुळीच प्रतिकार करण्यात आलेला नाही.'*
[*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे २२, १८९५]

त्यानंतर वृत्तांतात सांगण्यात आलेलं आहे की :

त्यात इतर काही लोकांची भर पडून जवळपास शेसव्वाशे लोकांचा समुदाय न्यायालयाबाहेर वाट पाहत होता आणि आमच्या साथीदारांना जोपर्यंत सोडण्यात येत नाही तोपर्यंत आम्ही इथून जाणार नाही असं म्हणत होता. तोंडावर जखमा झालेले कपडे फाटलेले तीन वा चार पोलीस न्यायालयात आलेले होते. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे २०, १८९५]

गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं की 'आपण काय बोलतो आहोत हे चांगलं माहीत असलेले' संरक्षक श्रीयुत मॅसन यांची साक्ष सांगते की 'इतर लोक' अटकेत होते व त्यांच्यावर 'पळून जायच्या आरोपाखाली खटला भरण्यात येणार आहे. ते आता परत दुसऱ्यांदा श्रीयुत मॅसनकडे आपली उपासमार होत असल्याची तक्रार करायला गेलेले आहेत.

जखमी चेहऱ्यानं आणि फाटलेल्या कपड्यांनी तीन वा चार पोलीस न्यायालयात हजर राहिल्याबद्दल बोलायचं तर, *'सत्य हे आहे की तिथं केवळ एकच नेटिव्ह पोलीस शिपाई होता. त्यानं आपल्याला काठीनं मारहाण झाल्याचा आरोप केला होता. जेव्हा त्याला त्याच्या खुणा दाखवायला सांगण्यात आलं तेव्हा डोक्यात कुठं तरी त्या असतील असं तो म्हणाला. परंतु त्या कुणालाच दिसू शकल्या नाहीत. त्याच्यावर जखमांच्या खुणा कुठेच नव्हत्या. त्याचे कपडेही फाटलेले नव्हते आणि त्यानं तशी तक्रारही केलेली नव्हती.... अजून साक्ष देणारा पी. सी. मॅडन हा एकच पोलीस होता. पण त्याच्या कामात कोणताच अडथळा आणण्यात आला नव्हता व नेटिव्ह पोलिसाला मारहाण झाल्याची त्याला स्वतःला माहिती असल्याचा कोणताच पुरावा तो देऊ शकला नाही.*

गांधीजींनी शेवटी लिहिलं की तुमच्या वृत्तपत्रात आलेल्या बातमीत तथ्यांची चुकीची माहिती देणं वा त्यांची मोडतोड करणं वा त्यांची अतिशयोक्ती करणं असा प्रकार व्हायची ही काही पहिली वेळ नाही. आणि मला सांगताना दुःख होतं की जेव्हा केव्हा असा प्रकार होतो तेव्हा ती जी चुकीची वा मोडतोड केलेली वा अतिशयोक्त माहिती देण्यात आली असते तेव्हा ती भारतीय समाजाला हानिकारक होईल अशाच रीतीनं देण्यात आलेली असते.

अॅडव्हरटाइझरनं गांधीजींचं निवेदन दिलगिरीसह प्रकाशित केलं.

'श्रीयुत गांधींनी ध्वनित केलं आहे की चुकीच्या बातम्या वा अतिशयोक्त बातम्या या आमच्या वाचकाच्या मनात जाणीवपूर्वक भारतीय समाजाविषयी गैरसमज पसरवण्यासाठी प्रकाशित करण्यात येतात. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. असं जर काही घडलंच असेल तर ते अगदी अजाणता घडलेलं आहे.... एका वा दुसऱ्या बाजूबद्दल गैरसमज पसरवायचा त्यामागे अगदीच हेतू वा इच्छा नाही.' [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, मे २२, १८९५]

नंतर जूनमध्ये नाताळ रेल्वेच्या २५५ मजुरांनी अजून काम थांबवलं. आपल्याला अपुरा शिधा मिळतो अशी त्यांची तक्रार होती. कराराप्रमाणे त्यांना दररोज दीड पौंड तांदूळ वा त्याऐवजी आठवड्यातून तीनदा दीड पौंड तांदुळाऐवजी दोन पौंड मका वा पीठ द्यायला पाहिजे होतं. त्यांचं म्हणणं होतं की आमचं मुख्य जेवण भाताचं असल्यामुळे आम्ही मका वा आटा घेऊ शकत नाही. परंतु गत दोन आठवड्यांपासून त्यांना ६ पौंड तांदूळ आणि ६ पौंड मका वा आटा नेहमीच्या डाळीबरोबर देण्यात येत होता.

ते संरक्षकाच्या कार्यालयात तक्रार करायला गेले. परंतु त्यांची तक्रार ऐकली जाण्याऐवजी त्यांना अटक करण्यात येऊन त्यांच्यावर १८९१च्या कायदा क्रमांक २५च्या परिच्छेद १०१नुसार खटला भरण्यात आला. या कायद्यानुसार नोकरांवर सामुहिकपणे काम सोडण्यावर बंदी होती. या अपराधासाठी अधिकाधिक २ पौंड दंड वा दोन महिन्यांपर्यंतचा कारावास अशी कोणतीही शिक्षा होऊ शकत होती.

मजुरांकडून उपस्थित होत गांधीजींनी तडजोड करायला अवधी मिळावा म्हणून खटल्याच्या सुनावणीसाठी आठ दिवसांची स्थगिती मागितली. परंतु रेल्वे विभागाचे श्रीयुत हॅमंड म्हणाले की आरोप मागे घ्यायचा विचार आम्ही करू असं मला वाटत नाही. आणि पीठासीन न्यायाधीश कॅप्टन ल्युकास म्हणाले की संबंधित लोकांना माझ्यासमोर कायद्याचा भंग केल्याच्या आरोपाखाली आणण्यात आलेलं असल्यामुळे मी कायद्याच्या पलीकडे जाऊ शकत नाही.

गांधीजींनी युक्तिवाद केल्यानंतर गुन्हा मान्य असल्याचं नोंदवण्यात आलं. मध्यंतरीच्या काळात मजुरांना ६ पौंड तांदूळ आणि ६ पौंड आट्याऐवजी ८ पौंड आटा देण्याएवढी रेल्वे अधिकाऱ्यांजवळ व्यवस्था झाली होती. मजुरांना याची माहिती देत न्यायाधीशांनी त्यांना सांगितलं की तुम्ही 'कायद्याचा उघडउघड' भंग केलेला आहे व त्यामुळे कायद्यानुसार कार्यवाही करणं मला भाग आहे. त्यांनी त्यांना प्रत्येकी १ शिलींग दंड वा दंड न दिल्यास तीन दिवसांच्या कैदेची शिक्षा सुनावली.

त्यातील प्रत्येकानं दंड भरायला नकार दिला व ते सर्वच्या सर्व 'मोठ्या मिरवणुकीत तुरुंगात गेले.' परंतु त्यांच्या मित्रांनी त्यांना समजावून सांगितलं की तुम्ही ज्या मुद्यावर काम बंद पाडलं होतं तो मुद्दा आप्रवासी कायद्यातील कलम १०१मध्ये येत नाही तर अपुऱ्या शिधापुरवठासंबंधीच्या कलमात येतो. त्यानुसार तुम्हाला मान्य असणारी तडजोड कदाचित स्वीकारण्यात येऊ शकेल. याचा नवीन मुद्दा करणं योग्य होणार नाही. तुम्हाला जर यासंबंधी लढायचंच असेल तर अधिकाऱ्यांना त्याची रीतसर सूचना दिल्यानंतर आणि सर्वप्रकारे अर्ज केल्यानंतरही त्याचा काहीच लाभ झाला नाही असं दाखवल्यानंतरच त्या मुद्यावर तुम्हांला वेगळी लढाई करता येईल. परिणामी मजुरांनी दंड भरला आणि ते आपल्या कामावर परतले. बंधुआ मजुरांना त्यांच्यावरील जो अन्याय वाटत होता त्याच्यासमोर मुकाट्यानं मान तुकवण्याऐवजी त्यांनी मोठ्या शिस्तबद्ध मिरवणुकीनं तुरुंगात जाणं पत्करलं आणि विशिष्ट तक्रारीसंबंधी तडजोड झाल्यानंतर त्यांनी प्रतिकार मागे घेतला. यातून भविष्यकाळाच्या पावलांचं सूचक दर्शन झालं.

तडजोड झाल्यानंतर लगेच गांधीजींनी नाताळ सरकार रेल्वेच्या मुख्य व्यवस्थापकांना पत्र लिहिलं व त्या अधिकाऱ्यांनीही गांधीजींचे आभार मानले:

मक्याचा आणि आट्याचा प्रश्न समजावून सांगण्यासाठी, तसंच विभागाच्या भारतीय नोकरांना समजावण्याची तुम्ही जी इच्छा व्यक्त केली व त्यासाठी तुम्ही ज्या पद्धतीनं भारतीय नोकरांचं

समाधान करण्यासाठी प्रयत्न केले त्यासाठी मी आपला आभारी आहे. [व्यवस्थापकांचं पत्र क्रमांक जी. एम. २४४०/१८९५ दिनांक जुलै १, १८९५, साबरमती आश्रम संग्रहालय फोटोप्रत क्रमांक ४१-४३]

४

गांधीजी बंधुआ मजुरांच्या कायद्याचा आणि त्याच्या कार्यपद्धतीचा जसजसा अभ्यास करत गेले तसतसं मृत्यूच्या जबड्यातील कुलींच्या जीवनाचं गांधीजींना भयावह दर्शन होत गेलं. जुलमी लोकांनी त्याला ज्या निकृष्ट अवस्थेत नेलं होतं त्यामुळे त्याचा आत्मा संवेदनशून्य झाला होता आणि मानव प्राणी म्हणून आपल्याला काही प्रतिष्ठा आहे याविषयीची त्याची जाणीव लोपली होती. भरती करण्यात यायच्या क्षणापासून तर दयाळू मृत्यूनं मध्येच सुटका केली नाही तर कराराच्या शेवटच्या दिवसापर्यंत बंधुआ मजुराचं जीवन म्हणजे एक शोकांतिकाच असायची. निर्दयपणे छळवणूक करणारांच्या तावडीत सापडलेल्या आणि मूकपणे यातना सहन करणाऱ्या सावजाच्या जीवनासारखी त्याची अवस्था होती. भरती करायची व्यवस्था दुष्टपणाची होती आणि त्यानंतर 'कुली' ला मिळणारी वागणूक मानवतेला काळिमा फासणारी होती.

ब्रिटिशांच्या समुद्रापलीकडील वसाहतींना बंधुआ मजुरांचा सतत आणि नियमित पुरवठा व्हावा म्हणून ब्रिटिश वसाहतीच्या आप्रवासी प्रतिनिधींनी व्यावसायिक लोकांची नियुक्ती केली होती. त्यांना दलाल म्हणत असत. परंतु भरती करायचं खरं काम करत होते वारंवार पडणारे दुष्काळ आणि भारतीय समाजाचं अज्ञान आणि दारिद्र्य. हे दलाल कावेबाजपणे नीतिअनीतीचा विचार न करता ज्या गावातील पीक बुडालं आहे त्या गावात शिरायचे. तसंच जिथं अशिक्षित गरीब लोक हजारोंच्या संख्येत गोळा व्हायचे तशा तीर्थस्थळी जायचे. ही ठिकाणं त्यांच्या नीचपणाच्या शिकारीसाठी फार सोयीस्कर होती. आपल्या कावेबाजपणानं सावजाला भुलवून तथाकथित कायदेशीर कार्यवाही पूर्ण करण्यासाठी ते त्याला भरती करायच्या ठिकाणी घेऊन जायचे. तिथं भरती करणाराला भरती केलेल्या प्रत्येक माणसासाठी ४५ रुपये आणि स्त्रीसाठी ५५ रुपये बक्षिसी मिळायची. ज्या पद्धतीनं तो त्यांच्या अज्ञानाचा फायदा घ्यायचा, आपला हेतू

सिद्ध करण्यासाठी ज्या हिंसक आणि भ्रष्ट मार्गाचा अवलंब करायचा, आणि त्यामुळे त्याच्या भूलथापांना बळी पडलेल्या सावजाला अतिशय उशिरा आपली निराशाजनक अवस्था यायची. या अवस्थेचं वर्णन करणं कठीण आहे. उत्सुकता असणारा यासंबंधीचा अधिकृत अहवाल पाहू शकतो. [पहा परिशिष्ट ११]

या मानवी मालाच्या वाहतुकीची व्यवस्थाही लाजिरवाणी होती. 'कुली जहाजात' बाया, माणसं आणि मुलं या सर्वांना डेकखालील खास खोल्यात कोंबण्यात यायचं. तसं करताना त्याच्या वयाचा कोणताच विचार करण्यात येत नसे. त्या खोल्यांना तारेचं कुंपण केलेलं असायचं. जहाजाच्या मागील भागावरील डेक स्त्रियांसाठी राखीव असायचं. प्रवासात देण्यात येणारं अन्न निकृष्ट प्रतीचं आणि अपुरं असायचं. परिणामी त्यांना ताप, बेरीबेरी, स्कर्व्ही, हगवण आणि श्वसोच्छ्वासाचे विकार आदी विविध रोग व्हायचे व ते आपली जबर किंमत वसूल करायचे. प्रवासात जे मरायचे त्यांचे देह समुद्रात फेकून देण्यात यायचे. [पहा परिशिष्ट ११]

या आप्रवाशांना वसाहतीतील मळ्यांवर कोणत्या परिस्थितीत राहायचं आणि काम करायचं आहे याची यत्किंचितही कल्पना नसायची. करारात कामाच्या स्वरूपाचा कोणताच उल्लेख नसायचा. तसंच कामाचं वातावरण असह्य आहे असं बंधुआ मजुराला आढळल्यास करारातून मुक्त व्हायचा कोणताच मार्ग त्याला उपलब्ध नसायचा. आपल्याला कोणत्या मालकाकडे काम करायचं आहे हेही त्याला माहीत नसायचं अथवा संरक्षक त्याच्यासाठी जो मालक निवडायचा त्याच्यासाठी त्याची संमती घेतली जात नसे. त्याला करारातून माघार घ्यायचा अधिकार नसायचा. एकदा त्याला मालकाकडे सोपवण्यात आलं की त्याचं भवितव्य ठरून जायचं. तो पूर्णपणे त्याच्या दयेवर अवलंबून असायचा व त्या शिक्षेतून सुटकेचा वा तिच्यातून स्थगिती मिळवायचा कोणताच उपाय त्याला उपलब्ध नसायचा.

बंधुआ मजुरांच्या करारासाठी खास प्रकारचा कायदा होता. तो करार देशातील सर्वसामान्य कायद्यांच्या कक्षेत येत नव्हता. त्यासाठी विशेष कायदा तयार करण्यात आलेला

होता. सर विल्यम हंटर यांनी बंधुआ मजूर व्यवस्थेचं वर्णन 'गुलामगिरीसमान' व्यवस्था असं केलं होतं. हे वर्णन यासाठी उचित ठरत होतं की या कायद्यातील तरतुदींचा थोडासा जरी भंग झाला तरी ती गोष्ट बंधुआ मजुरासाठी दखलपात्र गुन्हा समजण्यात यायची. सामान्यपणे अशा प्रकारचा करारभंग हा दिवाणी कायद्याच्या कक्षेत येत असतो. १८९१च्या आप्रवासी बंधुआ मजुरांसंबंधीच्या कायद्याच्या परिच्छेद ३०प्रमाणे करारातील आप्रवासी भारतीय मजूर लेखी परवानगीशिवाय जर मालकाच्या घरापासून एक मैलापेक्षा अधिक अंतरावर आढळला आणि आपण विभागीय न्यायाधीशांकडे वा संरक्षकाकडे तक्रार करायला जात होतो हे त्याला सिद्ध करता आलं नाही तर त्याला अटक करून त्याच्या मालकाकडे परत पाठवण्यात यायचं. या प्रक्रियेत आलेला सर्व खर्च त्याच्या पगारातून वसूल करण्यात यायचा. जो कोणी त्याला आश्रय द्यायचा वा त्याला खायला द्यायचा त्याच्यावर बेकायदेशीरपणे अशा माणसाला आश्रय दिल्याबद्दल खटला भरला जाऊ शकायचा व त्यासाठी त्याला १० पौंडांपर्यंत दंड होऊ शकायचा. त्याशिवाय 'कुली' त्याच्या मालकाच्या कामावरून जेवढे दिवस गैरहजर असायचा तेवढ्या दिवसांचे दर दिवसाला ८ शिलींग याप्रमाणे त्याला मालकाला दंड द्यावा लागायचा. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर १६, १८९६]

चौकशीनंतर न्यायाधीशाला जर वाटलं की 'खोटी तक्रार' नोंदवण्यात आली आहे तर त्या प्रकरणीही कुलीला अशाच प्रकारची शिक्षा व्हायची. दंडाची रक्कम त्याच्या मासिक पगाराच्या निम्मेपेक्षा अधिक नसावी एवढाच त्याबाबतीत निर्बंध होता. अनेकदा असं घडायचं की लेखी परवानगी असलेल्या बंधुआ मजुराला पोलीस अटक करायचे आणि त्याच्याजवळ असलेला लेखी परवानगीचा कागद फाडून टाकायचे. त्या दिवसात 'मालकाला सोडून' 'पळून जाणाऱ्या गुलामाला' पकडण्यासाठी बक्षीस असायचं म्हणून ते असं करायचे.

कलम ३१अन्वये संरक्षकाला, कोणत्याही न्यायाधीशाला वा 'जस्टिस ऑफ पीस'ला अथवा पोलीस शिपायाला वा कोणत्याही जमिनीच्या मालकाला वा त्या जमिनीवरील इमारतीत

राहणाऱ्या माणसाला (यात त्याच्या नोकराचाही समावेश आहे) त्याला मुक्त झाल्याचा दाखला वा सुटीचं लेखी परवानगीचं पत्र मागायचा अधिकार होता. प्रत्येक आप्रवासी भारतीय, मग तो मुक्त असो वा बंधुआ मजूर, पळपुट्याच असतो हे त्यामागील अध्याहृत तत्त्व होतं. त्याला जर कागदपत्र दाखवता आले नाहीत तर त्याला सरळ नजिकच्या न्यायाधीशाकडे नेण्यात यायचं. आप्रवाशाजवळ करारातून मुक्त झाल्याबद्दलचा दाखला वा सुटीचं लेखी परवानगीचं पत्र असल्याबद्दल न्यायाधीशाचं जर समाधान झालं नाही तर न्यायाधीश त्याला पहिल्या गुन्ह्यासाठी १० शिलींग - म्हणजे अंदाजे त्याच्या महिन्याच्या पगाराएवढा - दंड करायचे वा त्याला सश्रम कारावासाची १४ दिवसांची कैदेची शिक्षा द्यायचे आणि त्यानंतरच्या प्रत्येक गुन्ह्यासाठी त्याला ३० दिवसांची शिक्षा व्हायची. शिक्षा संपल्यानंतर त्याला मालकाकडे परत पाठवण्यात यायचं, अर्थात त्याच्या खर्चानं.

या कायद्यातील सर्वात धक्कादायक कलम कदाचित क्रमांक १०१ हे असावं. या कलमान्वये मालकाच्या मळ्यावर वा इस्टेटीवर काम करणारे सर्व वा बहुतांश बंधुआ मजूर 'मालकाच्या कामावरून सुटीशिवाय मालकाविरुद्ध तक्रार करायच्या कारणासाठी' जर गैरहजर राहिले तर त्यांच्यावर कोणत्याही न्यायालयात कायदेशीर कारवाई होऊ शकत होती. *ती तक्रार साधार आहे की निराधार व टिकू शकणारी आहे की नाही याचा विचार करायची आवश्यकता नसे.* आरोप सिद्ध झाल्यानंतर त्यांना 'दोन पौंड दंडापर्यंतची शिक्षा होऊ शकत होती. ती त्यांच्या मासिक पगाराच्या तीन ते चारपट असू शकत होती. 'दंड न भरल्यास जास्तीत जास्त साधी वा सश्रम कारावासाची दोन महिन्यापर्यंतची शिक्षा होऊ शकत होती.'

या तरतुदीचं वर्णन सर्वाधिक लज्जास्पद असं करत *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं :

याचा अर्थ असा होतो की अनेक भारतीय बंधुआ मजुरांनी दुष्टपणाच्या वागणुकीसाठी आपल्या मालकाविरुद्ध सामायिक तक्रार संरक्षकाकडे केली व त्यात यश मिळून त्यांना नुकसान भरपाई आणि न्याय मिळाला तरी त्यांनी परवानगीशिवाय न्याय मिळवायचं साहस

केल्याबद्दल त्यांना दोन महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा होऊ शकते!.... ज्या अन्यायी मालकाविरुद्ध ते तक्रार करू इच्छितात त्याच्याचकडे त्यांनी त्यासाठी परवानगी मागावी?.... आणि त्यानं परवानगी दिली नाही तर शांतपणे त्यानं तो सहन करत राहायला हवा ? हे एकच कलम संपूर्ण कायद्याला बदनाम करायला पुरेसं आहे. [हेन्री एस. एल. पोलक : *द इंडियन्स ऑफ साऊथ आफ्रिका, हेलॉट्स विदीन द एम्पायर अँड हाऊ दे आर ट्रीटेड*, जी. ए. नटेसन अँड कंपनी, मद्रास, (१९०९), पृष्ठ २८]

त्या व्यवस्थेला क्रौर्याचा आणि अन्यायाचा भपकारा येत होता. कामापासून प्रत्येक दिवसाच्या बेकायदेशीर अनुपस्थितीसाठी मासिक पगारातून मासिक पगारापेक्षा जास्त होणार नाही एवढी रक्कम कापून घ्यायचा मालकाला अधिकार होता. त्याशिवाय अशा प्रकारची अनुपस्थिती कोणत्याही वर्षात २५ दिवसांपेक्षा जास्त असल्यास त्याच्या दुप्पट दिवसांची कराराच्या मुदतीत वाढ करण्यात यायची व त्याशिवाय तो करार संपू शकत नसे. हजेरीच्या वेळी हजर नसणे, 'कामाकडे दुर्लक्ष', अवज्ञा', 'चढेलपणा', फसवणूक आणि मालकाच्या संपत्तीची नासधूस अशा प्रकारच्या अपराधांसाठी कडक शिक्षेची तरतूद होती.

आजाराच्या परिस्थितीत मालकाला कराराच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षी दर दिवसाच्या अनुपस्थितीसाठी पगारातून ४ पेन्स आणि उरलेल्या वर्षात ६ पेन्स कापायचा अधिकार होता. परंतु मालक अनेकदा दर दिवसाचे सहा पेन्स कितीही वर्ष नोकरी झालेली असली तरी कापत असत. तसंच नैतिकतेची चाड नसलेले काही मालक आजारी मजुरांची काळजी घ्यायची जबाबदारी टाळण्यासाठी आणि मासिक पगारातील मोठा लचका तोडण्यासाठी व त्याचबरोबर शासनावर त्याचा खर्च ढकलून स्वतःचा फायदा व्हावा म्हणून प्रत्यक्षात आजारी असलेल्या माणसाला वा स्त्रीला परवानगीशिवाय गैरहजर राहिल्याबद्दल अटक करायला लावायचे.

परिणामी आजारी, जखमी आणि दीर्घ काळापासून आजारी मजूर दवाखान्यात पोहोचायचे तेव्हा दुरुस्त होण्याच्या दृष्टीनं त्यांना फार उशीर झालेला असायचा. काही वेळा तर ते जणू काय मरण्यासाठीच तिथं जायचे. या गोष्टीचा एवढा गवगवा झाला की अखेरीस

सरकारला कायदा बदलवणं भाग पडलं. खटला चालू असलेल्या भारतीय बंधुआ मजुराला न्यायाधीशांनी तुरुंगात पाठवण्याऐवजी दवाखान्यात पाठवलं तर तुरुंगाधिकाऱ्याला त्या भारतीय बंधुआ मजुराला दवाखान्यात पाठवायचा आणि त्याचा खर्च मालकाकडून वसूल करायचा अधिकार राहील अशी तरतूद करावी लागली. महाधिवक्त्यांनी स्पष्ट केलं की 'चिल्लर कारणासाठी आजारी भारतीय बंधुआ मजुराला तुरुंगात पाठवून तुरुंगाचा दवाखाना होऊ नये हा या कायद्यामागील हेतू आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, मे ९, १८९५]

बंधुआ 'कुली' मजुराचं मळ्यावरील जीवन एखाद्या भयाण दुःस्वप्नासारखं होतं. त्याला सकाळपासून तर सायंकाळपर्यंत जीव जाईपर्यंत काम करावं लागायचं. काही मालक स्त्री-मजुरांना पसंत करायचे कारण त्यांना मजुरी कमी द्यावी लागायची, त्यांच्याकडून शिक्षेची भीती नसल्यामुळे त्यांचा जास्त छळ करता यायचा आणि माणसं जेवढं काम करायचे त्याच्या दोनतृतीयांश काम त्या करायच्या. १८९१च्या २५ क्रमांकाच्या कायद्याप्रमाणे स्त्रियांना व तरुण मुलांना एखाद्या मालकाच्या ताब्यात देताना ती 'स्त्री वा मुलगा जे काम करू शकतात तसं काम त्या मालकाकडे आहे की नाही हे पाहावं' अशी तरतूद होती. ऊस कापणं, ऊसाचे ओझे उचलून ते ट्रक वा वॅगनमध्ये भरणं ही कामं काही 'स्त्रियांची' नव्हती. परंतु या नियमाचं पालन होण्यापेक्षा त्याचा भंग करण्यासाठीच त्याचा अधिक उपयोग व्हायचा. डोक्यावरील जड ओझ्यानं अडखळत येणाऱ्या बाया गोदामाजवळ जेव्हा यायच्या तेव्हा वजनाच्या काट्याजवळ मालक वा दिवाण दिसायचा. त्यांच्या गठ्ठ्यात २-४ पौंड जरी कमी असले तरी त्यांच्या उघड्या डोक्यावर वा खांद्यावर चाबकाचे फटके बसायचे आणि वरून शिव्यांची लाखोली वाहिली जायची. बायांवर ओरडल्याशिवाय त्या कामच करू शकत नाहीत अशी त्या लोकांची धारणाच असावी. [हेन्री एस. एल. पोलक : *द इंडियन्स ऑफ साऊथ आफ्रिका, हेलॉट्स विदीन द एम्पायर अँड हाऊ दे आर ट्रीटेड*, पृष्ठ ४५]

या व्यवस्थेचं सर्वात घृणास्पद असं अजून एक वैशिष्ट्य होतं. ते म्हणजे पुरुष आणि स्त्रियांसाठी १००ला ४० असं प्रमाण ठेवण्यात आलं होतं. स्त्रिया या मजुरांच्या बायका वा

नातेवाईकच असायच्या असं नाही. ह्या आणि ज्या इतर परिस्थितीत त्यांना राहावं लागत होतं त्यामुळे त्यांच्या मनावर जी धार्मिक आणि नैतिक नियंत्रणं होती ती सगळी इतकी मोडकळीस आली की अखेरीस रखेली आणि पत्नी यातील अंतरही पुसलं गेलं. प्रक्रिया अगदी साधी होती. विवाहित कुटुंबियांना इतरांपासून वेगळं केल्यानंतर 'दिवाण' एकेकट्या असलेल्या स्त्रियांना सर्व माणसांच्या ताब्यात द्यायचा. दिवाणानं सांगितलेल्या प्रत्येक बाईला तीन, चार वा पाच माणसांसोबतही राहावं लागायचं. 'शांतता टिकवण्यासाठी' हे आवश्यक आहे, तसं न करण्यात आल्यास 'गोंधळ निर्माण होईल' असं 'दिवाणाचं' म्हणणं होतं. अशा रीतीनं 'कुली मेरीज' हा प्रकार दक्षिण आफ्रिकेत अस्तित्वात आला.

करार संपायच्या आधी, आणि अनेकदा त्यानंतरही, भारतीयांनी धार्मिक पद्धतीनं केलेल्या विवाहांना, जर ते संरक्षकाकडे नोंदवलेले नसले तर मान्यता नव्हती. आणि अशा प्रकारे नोंदणी करूनही कोणतंही संरक्षण मिळत नव्हतं. बंधुआ मजुरासाठी कराराचा जो कायदा होता त्यानुसार पतिपत्नीला वा आईवडिलांपासून मुलांना वेगळं करायला मनाई होती. पंरतु एकदा वाटणी झाल्यानंतर लग्न झाल्यास विभागणी थांबवण्यासाठी कायद्यात कोणतीच तरतूद करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे बंधुआ मजुरात नैतिकता अतिशय निंदनीय स्तराला पोहोचली होती आणि लैगिक विकारांनी त्यांच्यात हैदोस माजवलेला होता यात काही आश्चर्य नाही.

कुली इस्टेटीवरील अर्भक, शिशू आणि बालक यांचा मृत्यूदर फार मोठा होता. संरक्षकानं १८९४च्या अहवालात लिहिलं की उम्झिंटो सर्कलमध्ये 'आयांना बरेच तास कामावर मुलांपासून दूर राहावं लागतं. त्यामुळे मुलांना उघड्यावर राहावं लागत असल्यामुळे असं घडलेलं आहे यात काही संशय नाही.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, डिसेंबर १३, १८९४] एका इस्टेटीवरील भारतीय वैद्यकीय अधिकाऱ्याला आजाराची माहिती कळवत असतानाच 'व्यवस्थापक त्याच्याकडे मृत्यूच्या दाखला देण्याविषयी विनंती करायचा.' [हेन्री एस. एल. पोलक : *द इंडियन्स ऑफ साऊथ आफ्रिका, हेलॉट्स विदीन द एम्पायर अँड हाऊ दे आर ट्रीटेड*, पृष्ठ ४५]

या व्यवस्थेत मालक-नोकरात अशा कोणत्याही प्रकारचे संबंध नसायचे की ज्यांचं वर्णन दूरान्वयाने का होईना 'मानवतापूर्ण' असं करता येईल. काही मालक तर वास्तवात भारतीय बंधुआ मजुरांना चांगल्या पशूपेक्षाही कमी प्रतीचं मानायचे. कारण जनावराच्या जागी दुसरं जनावर आणण्यासाठी बरेच पैसे मोजावे लागत असत. उलट बंधुआ मजूर मात्र स्वस्तात मिळू शकायचा. जानेवारी १८९५मध्ये श्रीयुत डिलाँसमोर एका तरुण भारतीयाला भीक मागायच्या आरोपाखाली आणण्यात आलं होतं. न्यायाधीशांच्या लक्षात तो पूर्ण आंधळा असल्याचं आलं. त्याची विचारणा करण्यात आल्यानंतर त्यानं सांगितलं की तो एका शेतकऱ्याकडे बंधुआ मजूर होता आणि गवताला लागलेली आग विझवायच्या प्रयत्नात त्याचे डोळे गेले. त्याच्या मालकाच्या जेव्हा लक्षात आलं की आता याचा काही उपयोग नाही तेव्हा त्यानं कोणतीही नुकसान भरपाई न देता त्याला कामावरून काढून टाकलं. त्यानंतर त्याला भीक मागावी लागत होती. [*नाताळ मर्क्युरी*, जानेवारी २८, १८९५]

मालकाच्या प्रभावामुळे आपल्याला कोणतीच नुकसान भरपाई मिळू शकणार नाही हे कळल्यामुळे त्या मजुराच्या नैराश्यात अजूनच भर पडली. मालकाला लहानसहान दंड करून सोडून देण्यात आलं असतं. मे १८९५मध्ये डरबन येथील रॉयल हॉटेलच्या एफ. जे. जॉनसन, ज्युनियर यांनी एका भारतीय कुली वेटरला भांडी वगैरे ठेवायच्या खोलीतून एक ट्रे आणायला सांगितला. परंतु तो ट्रे कुठं आहे हे माहीत नसल्यानं त्या वेटरला थोडा वेळ लागला. त्यावर मालक त्याच्या अंगावर गेला आणि त्यानं त्याचा हात मुरगळला व त्याला बरेच ठोसे मारले. रक्तानं भरलेला एक रुमाल व अगदी चिंध्याचिंध्या झालेला कोट न्यायालयात सादर करण्यात आले. प्रतिवादीनं वेटरचा हात मुरगळल्याचं मान्य केलं. परंतु वर्णन केल्याप्रमाणे मारहाण केल्याचं नाकारलं आणि जे. ब्राऊन या गृहस्थांना आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ साक्ष द्यायला आणलं. न्यायाधीशांनी मान्य केलं की, *'या प्रकरणाला फार मोठं स्वरूप देण्यात आलं आहे. झोंबाझोंबीत वादी नाकावर आदळला आणि आपली तक्रार खरी करण्यासाठी रक्ताचा प्रत्येक*

थेंब आपल्या पगडीत सांभाळला.' प्रतिवादीला मारहाणीसाठी 'तांत्रिकदृष्ट्या अपराधी ठरवत न्यायाधीशांनी त्याला 'एक पेनी' दंड केला! [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे ३, १८९५]

तक्रार करणारानं खोटी शपथ घेतली असं सिद्ध करून काही वेळा तर मालक त्याला अपराधी ठरवायचा. आपल्या निर्दयी मालकाकडे परतण्यापेक्षा मजूर वारंवार दंड भरायला आणि तुरुंगात जायला तयार व्हायचे. एवढंच नाही तर बंधुआ मजूर म्हणून मालकाकडे काम करण्याऐवजी काही वेळा तर ते मरण पत्करायलाही तयार असत. आप्रवासी बंधुआ मजुराच्या कायद्याचं पालन करून घ्यायची जबाबदारी असलेल्या काही न्यायाधीशांना तर आपल्या कामाचा वीट यायचा. जून १८९५मध्ये एका आप्रवासी भारतीय बंधुआ मजुराला डरबन ब्युरो पोलीस न्यायालयाचे न्यायाधीश श्रीयुत डिलॉं यांच्यासमोर आणण्यात आलं. कामावर जायला नकार देत असल्यामुळे त्याला दोन वर्षांपासून तुरुंगात ठेवण्यात आलेलं होतं. तो म्हणाला की या मालकाकडे परत जाण्यापेक्षा तुरुंगात मरणं मला परवडेल. तू संरक्षकाकडे तक्रार केली का असं त्याला विचारलं असता तो म्हणाला की काम करताना माझा जो छळ व्हायचा त्याबद्दलची तक्रार करायला मी वारंवार संरक्षकाकडे गेलो परंतु काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे न्यायाधीशांना पुढील उद्‌गार काढावे लागले :

'ही अशी एक गोष्ट आहे की ज्यामुळे अपराधासंबंधीच्या न्यायालयात मला बसावंसं वाटत नाही. या कुलीसारखी इथं अशी माणसं आहेत की जे सांगतात की ते काम करत असलेल्या ठिकाणी त्यांचा छळ होतो - याचा सर्वात चांगला पुरावा हा आहे की मालकाकडे परतण्यापेक्षा ते तुरुंगात राहणं पसंत करतात.... माझे हात बांधलेले आहेत. मला केवळ कायद्याची अंमलबजावणी करायची आहे आणि या माणसाला ३० दिवसांची शिक्षा देणं मला भाग आहे.'

[*नाताळ मर्क्युरी*, जून १७, १८९५]

यावर भाष्य करत नाताळ मर्क्युरीनं लिहिलं : 'स्वाभाविक निष्कर्ष हा निघतो की काही तरी कुठं तरी चुकत आहे.... हे असं प्रकरण हे की ज्याची चौकशी व्हायला पाहिजे.... जर कुलीचा

छळ झाला असेल तर असं म्हणतात की तो न्यायाधीशांकडे तक्रार करू शकतो. परंतु कोणत्याही कुलीसाठी ती सोपी गोष्ट नसते. हे काम आप्रवासी बंधुआ मजुरांच्या संरक्षकाचं आहे. त्यानं चौकशी करून यातून शक्य असेल तर उपाय शोधायला पाहिजे.' [*नाताळ मर्क्युरी*, जून १३, १८९५]

परंतु ज्या कायद्याची संरक्षकाला अंमलबजावणी करायची होती त्या कायद्यांतर्गत संरक्षक फारसं काही करू शकत नव्हता. त्यानंतर संरक्षक ह्या नावालाच काही अर्थ उरू नये अशा प्रकारे लवकरच तो कायदा बदलवण्यात आला.

या गरीब आणि असहाय लोकांना या नरक यातनेतून सुटायचा एकच मार्ग होता व तो होता आत्महत्येचा. १८९४ साली आत्महत्येची संख्या दर दहा लाखाला १०८० एवढी मोठी होती.

५

वसाहतीत पस्तीस वर्षांपूर्वी आप्रवासी बंधुआ मजुरांची व्यवस्था सुरू झाल्यापासून भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांना अशा प्रकारच्या दुःसह वातावरणात राहावं लागत होतं. कराराचा काळ संपल्यानंतर कोणता तरी व्यवसाय स्वतंत्रपणे करायचा आणि प्रामाणिकपणे भाकरी कमवायची व तुलनात्मकदृष्ट्या शांत आणि सुखाचं जीवन व्यतीत करावं आणि आपल्याला आपल्या दुर्दैवानं जी संधी मिळू शकली नाही ती आपल्या मुलांना तरी मिळावी एवढी एकच गोष्ट अशी होती की ज्याबद्दल बंधुआ मजूर भविष्याबाबत आशा बाळगू शकत होते. लंडन येथे सम्राज्ञींच्या मान्यतेसाठी गेलेल्या मतदान दुरुस्ती विधेयक आणि प्रस्तावित आप्रवासी कायदा यांच्याद्वारे त्याच्या मनाला वाटणारा हा दिलासाही काढून घेण्यात येत होता.

आपल्याला आठवत असेलच की भारत सरकारनं जानेवारी-फेब्रुवारी १८९४मध्ये नाताळमधील भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांनी कराराचा काळ पूर्ण केल्यानंतर त्या कराराचं जर नूतनीकरण केलं नसेल तर त्यांना भारतात परतणं आवश्यक करण्याच्या कराराला मान्यता दिली होती. अशा प्रकारे कोणी परतणार नसेल तर तो कराराचा भंग गुन्हेगारी कायद्याखाली न

येता दिवाणी कायद्याखाली यावा एवढीच सूट सरकारला त्यातून मिळवता आली होती. 'आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांना परतायला भाग पाडण्यासाठी मुदत संपलेल्या भारतीय आप्रवाशांवर 'खास कर' लावायचा सोपा उपाय लॉर्ड एल्गिन यांनी वसाहत मंत्र्याला सुचवून ती सवलतही निरर्थक ठरवली होती. या प्रस्तावामुळे नाताळमधून सम्राज्ञींच्या प्रजेच्या एका वर्गाला वगळण्यात येणार असल्यामुळे गृह मंत्र्यांनी निर्णय घेण्याआधी हे प्रकरण सल्ल्यासाठी वसाहत-मंत्र्याकडे पाठवलं :

आप्रवासी भारतीय बंधुआ मजूर कराराची मुदत संपल्यानंतरही कराराचा भंग करून वसाहतीत राहणार असतील तर त्यांच्यावर खास कर लावण्यात यावा यावर गंभीर विचार करणं आवश्यक आहे असं दिसतं. एकदा असा कर लावण्यात आला की मग तो कर इतर भारतीयांवरही - जे स्वखर्चानं आणि कोणत्याही प्रकारच्या अटीशिवाय व्यापाराच्या उद्देशानं आले असतील - हा खास कर लावल्या जायचा गंभीर धोका राहील. [भारत कार्यालय, पत्र क्रमांक ७२ (सार्वजनिक) दिनांक ऑगस्ट २, १८९४, महसूल आणि कृषी विभाग, भारत सरकार, फाईल क्रमांक १८/१८९४, कलकत्ता अभिलेखागार, अभिलेख क्रमांक २ (ठळक अक्षरं माझी)]

भारतातील कुलींनी कराराचा भंग केला तर एक प्रकारे अशा प्रकारचा कर हा त्यांच्यावरील दंड असेल आणि त्यामुळे कराराचं पालन करायला लावायला मदत होईल आणि त्या दृष्टीनं त्याचं समर्थनही करता येईल असं लॉर्ड रिपन यांना वाटत असलं तरी त्यांनी परत लिहिलं :

नाताळमधील भारतीय मुक्त आप्रवाशांवर खास कर लावायच्या अशा प्रकारच्या उपायामुळे कायद्याचा भंग करण्यावर प्रतिबंध येईल. लॉर्ड रिपन गृहीत धरतात की नाताळ सरकारला सध्याच्या अटींमध्ये दुरुस्ती करायला संमती असल्याचं कळवताना भारत सरकार अशा प्रकारचा कर लावायला संमती असल्याचं कळवणार नाही व वसाहतीच्या सरकारवर हा मुद्दा उपस्थित करायची जबाबदारी सोडून देईल. [वरीलप्रमाणे]

२ ऑगस्ट १८९४ला वसाहत मंत्री एच. एच. फौलर यांनी लॉर्ड एल्गिन यांना या आशयाचं पत्र लिहिलं. परंतु घोडा चोरीला गेल्यानंतर पागेला कुलूप लावण्यासारखं हे होतं. कारण भारत सरकारनं खास कराच्या तत्त्वाला आधीच मान्यता दिलेली होती आणि जरी लेखी हमी देण्यात आली नव्हती तरी नाताळ सरकारनं अशा प्रकारचा कर लावल्यास भारत सरकार त्यावर कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेणार नाही असं भारत सरकारच्या अधिकाऱ्यांनी नाताळच्या प्रतिनिधींना नाताळमध्ये परतल्यानंतर सरकारला सांगायला सांगितलं होतं.

सप्टेंबर १७, १८९४ला लॉर्ड एल्गिन यांनी नाताळ सरकारला 'भारतीय आप्रवासी विधेयक १८९१' यात पुढील प्रमुख दुरुस्त्या करण्यात आल्यास आपली औपचारिक मान्यता कळवली :

१. मजुराची प्रथमच भरती करताना केलेल्या करारातील अटीप्रमाणे कराराची मुदत संपल्यानंतर मजूर परत नव्यानं त्याच अटीवर करार करायला तयार नसल्यास नाताळ सरकारनं प्रवासखर्च दिल्यानंतर भारतात परतणं त्याला बंधनकारक राहील.

२. जर त्याची वसाहतीत राहायची इच्छा असेल तर त्याला पुन्हा त्याच अटीवरील करार करावा लागेल. आणि कराराचा हा नवीन कालखंड संपल्यानंतर त्याला पुन्हा २ वर्षांचा नवीन करार करायचं स्वातंत्र्य असेल. पहिल्या कालखंडानंतर त्याला आपला मालक निवडायचा अधिकार असेल. दुसऱ्या कालखंडासाठी पहिल्या वर्षी १६ शिलींग आणि दुसऱ्या वर्षासाठी १७ शिलींग दरमहा पगार असेल. तिसऱ्या कालखंडासाठी पहिल्या वर्षासाठी १८ शिलींग आणि दुसऱ्या वर्षासाठी १९ शिलींग दरमहा पगार असेल व त्यानंतर तो २० शिलींगवर स्थिरावेल.

३. गंभीरपणे केलेल्या करारातील अटीप्रमाणे करारात ठरलेल्या कालखंडानंतर भारतात परतायच्या अटीचा भंग करण्यात आल्यास तो दखलपात्र गुन्हा नसेल.

४. भरती करावयाच्या मजुरात प्रत्येक १०० पुरुषांमागे सध्याच्या ४० स्त्रियांच्या प्रमाणाऐवजी ३० स्त्रिया असं प्रमाण करण्यात यावं ही प्रतिनिधी मंडळानं केलेली सूचना आधीच

'वसाहतीतील भारतीय स्त्री मजुरांची संख्या ४५ टक्केच आहे' असं सांगून भारत सरकारनं फेटाळली. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर १५, १८९४]

त्यानुसार नाताळ सरकारनं आप्रवासी भारतीय कायदा १८९१मध्ये दुरुस्ती करणारं विधेयक तयार केलं. ते २ एप्रिल १८९५च्या राजपत्रात प्रकाशित झालं आणि दोन दिवसांनंतर नाताळच्या राज्यपालांनी ते वसाहत मंत्र्यांकडे पाठवलं.

६

भारतीयांच्या प्रश्नावर विचार करणारे नाताळमध्ये तीन गट होते. पहिला गट मळेवाल्यांचा. हा बंधुआ मजुरांना कामावर लावणारा गट होता. बंधुआ मजुरांनी नाताळमध्ये मजूर म्हणून राहावं आणि व्यापारी अथवा मुक्त भारतीय म्हणून राहू नये असं या गटाला वाटत होतं. मंत्रिमंडळानं आप्रवासी बंधुआ मजुरांच्या आयातीसाठी देण्यात येणारं अनुदान बंद केल्याबद्दल त्याची नाराजी होती. भारतीयाच्या प्रश्नासंबंधीची साम्राज्याची बाजू त्याला मान्य होती व वांशिक भेदभावावर आधारित कायदा करायला त्याचा विरोध होता आणि शिक्षण आणि संपत्तीविषयक मतदानाच्या अधिकारावर बंधन आणायच्या बाजूनं तो होता. या गटाचं प्रतिनिधित्व नाताळ ॲडव्हरटाईझर करत होता.

व्यापारी म्हणून वा मजूर म्हणून नोकरदारांना भारतीय नको होते. भारतीयांना चंबूगबाळे आटोपून सरसकटपणे परत पाठवायची त्यांची इच्छा होती. त्यांचं मुखपत्र म्हणून नाताळ विटनेसनं आप्रवासी भारतीय मजुरांच्या आयातीवर पूर्णपणे निर्बंध घालायची मागणी केली. ब्रिटिश सरकार भारतीयांना साम्राज्यातील नागरिकत्वाचे अधिकार नाकारू शकत नसल्यामुळे जोपर्यंत वसाहत आप्रवासी भारतीय मजुरांवर अवलंबून राहील तोपर्यंत ब्रिटिश सरकार भारतीयांना कशा प्रकारची वागणूक द्यावी यासंबंधीच्या आपल्या अटी लादत राहील असं त्या वृत्तपत्राचं म्हणणं होतं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, फेब्रुवारी २२, १८९५]

या दोघांच्यामध्ये कुठंतरी मंत्रिमंडळ होतं. त्याचे एक सदस्य महाधिवक्ता हॅरी एस्कॉम्ब होते. मंत्रिमंडळात जेव्हा त्यांचा समावेश व्हायचा होता तेव्हा त्यांच्या अशिलात दादा अब्दुल्लासह नाताळमधील सर्व श्रीमंत भारतीयांचा समावेश होता. जे भारतीय नाताळमध्ये आधीच वास्तव्य करून आहेत त्यांना आधीच मिळालेल्या हक्कांचं संरक्षण प्रामाणिकपणे करायला पाहिजे या मताचे ते होते व हे त्यांचं मत सर्वपरिचित होतं. मंत्रिमंडळाला जरी मालक वर्गाच्या पक्षाबद्दल सहानुभूती होती तरी ते नोकरदार वर्गाला नाराज करू इच्छीत नव्हतं कारण नोकरदारांच्या वाढत्या संख्येमुळे ते महत्त्वपूर्ण राजकीय सत्ता होत होते. या परस्परविरोधी विचारसरणीला अभिव्यक्त करत *नाताळ विटनेसनं* स्वतः होऊन लिहिलं :

नेटिव्हांच्या प्रश्नाच्या उत्तरातच भारतीयांच्या प्रश्नाचं उत्तर सामावलेलं आहे. पहिलं कारण आहे आणि दुसरा परिणाम आहे. पहिल्याच्या मुळाशी जा आणि ती कापून काढा की दुसरं आपोआपच नाहीसं होईल. [*नाताळ मर्क्युरी*, डिसेंबर १४, १८९४]

त्यानं नेटिव्हांना 'श्रमप्रतिष्ठा' शिकवायचा सल्ला दिला. त्यामुळे 'दायित्वा'चं रूपांतर 'भांडवलात' करता येईल असं त्याला वाटत होतं.

मळेवाले आणि नोकरदार वर्ग या दोन पक्षांच्या हितसंबंधात अनेकदा विरोध निर्माण व्हायचा आणि काही वेळा तर वेगवेगळ्या कारणांसाठी का होईना एकाच वेळी ते मंत्रिमंडळावर तुटून पडायचे. परंतु गोऱ्यांची सर्वश्रेष्ठता कायम असावी आणि भारतीयांना समान राजकीय हक्क देण्यात येऊ नये या बाबतीत मात्र ते एक होते. अंतर होतं ते केवळ प्रमाणाचं आणि पद्धतीचं.

नाताळ आणि त्याच्या भगिनी-वसाहतीत भारतीयांच्या प्रश्नाच्या बाबतीत घनिष्ट सहकार्य असावं असं *नाताळ ॲडव्हरटाईझरचं* मत होतं आणि आपण आधीच पाहिल्याप्रमाणे सेसिल ऱ्होड्स या भावनेशी सहमत होते. आशियायी प्रश्नाबाबत आपल्याला मुक्त हस्तानं कार्यवाही करता येईल अशा प्रकारे ब्रिटिश सरकारवर दडपण आणता यावं अशा प्रकारच्या सामान्य

धोरणाचा अवलंब करायची ऱ्होड्सची तयारी होती. दुसरीकडे *नाताळ विटनेसनं* जाहीर भूमिका घेतली की ब्रिटिश वसाहतींनी दोन डच गणराज्यांशी हातमिळवणी करावी आणि मनस्ताप देणाऱ्या भारतीयांच्या प्रश्नाबाबत संपूर्ण दक्षिण आफ्रिकेत अवलंबिता येऊ शकेल असा काही तरी सामान्य उपाय शोधून काढावा.

आप्रवासी भारतीयाविषयीच्या कायद्याचा उल्लेख करत विटनेसनं लिहिलं : जर बंधुआ मजूर हा शेजारच्या राज्यांसाठी आणि वसाहतींसाठी पाप असेल तर तो स्वतःचा मालक झाल्यानंतर त्यापेक्षा कमी नाही तर अधिकच तापदायक होणार आहे.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर १३, १८९४] नंतर येणाऱ्या जूनमध्ये त्यानं पुन्हा विनंती केली की साम्राज्याच्या सरकारच्या वतीनं भारत सरकारनं जर यापुढे भारतीय बंधुआ मजुरांच्या आयातीवर पूर्ण बंदी घातली तर नाताळ मंत्रिमंडळानं या आव्हानाचा स्वीकार करायला पाहिजे आणि भारतीय बंधुआ मजुरांशिवाय काम भागवायची तयारी ठेवायला पाहिजे. 'साम्राज्याच्या सरकारजवळ जर हुकुमाची पानं असतील तर आपल्याजवळ हुकुमाचा एक्का असायला पाहिजे. आणि यासाठी

केप आणि ट्रान्सवालच्या विधानमंडळांचा आणि शासनांचा प्रत्यक्ष पाठिंबा मिळवावा लागेल.... त्यासाठी विधानसभेच्या येत्या अधिवेशनात त्यांनी अशाच प्रकारचे कायदे करावे अशी विनंती करायला नाताळ सरकारनं केप आणि ट्रान्सवाल सरकारकडे ताबडतोब जायला पाहिजे. [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५]

इंग्लंडमधील पुराणमतवादी जागृत साम्राज्यवादाचं मुखपत्र असलेल्या *नाताळ ॲडव्हरटाईझरच्या* भाषेत मागील प्रकरणात सांगितलेल्या कारणांसाठी हळूहळू बदल होऊ लागलेला होता. १८९४ सालचा शेवट जसजसा जवळ येऊ लागला तसतशी भारतीय प्रश्नाविषयीच्या शुद्ध स्थानिक दृष्टिकोनाऐवजी साम्राज्यवादी दृष्टिकोनाची त्याची जाणीव तीव्रतर होत असलेली दिसू लागली. या दोन गणराज्यांनी स्वीकारलेल्या पद्धतीनुसार आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांची आयात थांबवली तर मळेवाल्यांच्या वर्गावर जे आर्थिक अरिष्ट ओढवेल त्याच्या

कल्पनेनं घाबरून त्यानं वसाहतीला सावध करत लिहिलं की 'भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांच्या आयातीवर 'निर्बंध आणायच्या दृष्टीनं कायदा करायच्या बाबतीत आपण त्यांच्या समपातळीत नाही हे विसरू नये. डच त्यांना हवं ते करू शकतात परंतु साम्राज्याच्या नियंत्रणात असलेल्या वसाहती तसं करू शकत नाहीत.

ब्रिटिश साम्राज्यावर अवलंबून असल्यामुळे आपल्याला जसे त्याचे लाभ होतात तशाच काही हानिकारक गोष्टीही स्वीकाराव्या लागतात.... भारतीय लोकांच्या भवितव्याबाबत आपण जवळपास गृहीत धरायला पाहिजे की साम्राज्याचं सरकार भारताच्या अतिरिक्त लोकसंख्येला बाहेर काढायच्या दृष्टीनं केलेल्या कायद्यासाठी आपल्या ताब्यातील वसाहतींना कोणत्याही परिस्थितीत सहजपणे परवानगी देणार नाही;.... साम्राज्याचा फायदेशीर भाग म्हणून भारताला टिकवायचं असेल तर भारताच्या अतिरिक्त लोकसंख्येला अन्यत्र कुठं तरी पाठवायचा मार्ग त्यांना शोधावाच लागेल.... अशा रीतीनं.... ब्रिटिशांच्या वसाहतीतील कुलींच्या आगमनाचा प्रश्न असा आहे की जो साम्राज्याच्या पायाच्या मुळाशी पोहोचतो.... त्या महान भागाचा ब्रिटिश साम्राज्यात अंतर्भाव असणं वा नसणं असाही त्याचा अर्थ होऊ शकतो. या प्रश्नाची साम्राज्याच्या दृष्टिकोनातील ही बाजू आहे. आणि ही अशी बाजू आहे की भारतीय आप्रवाशांच्या आगमनावर निर्बंध घालण्यासंबंधी साम्राज्याच्या इतर भागात उठाव होऊ नये म्हणून साम्राज्याच्या सरकारला आपल्या सामर्थ्यात जे काही असेल ते सर्व करायची इच्छा व्हावी.

त्यानं शेवटी लिहिलं की स्थानिक दृष्टीनंसुद्धा भारतीय आप्रवाशांच्या आगमनावर पूर्णपणे निर्बंध घालण्यासाठी चालू असलेल्या आक्रोशालाही काहीच अर्थ नाही.

कुलीच्या अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या आपल्याला आवडत नाहीत. परंतु आपल्याला असं दाखवावं लागेल की त्याची येथील हानिकारक उपस्थिती नसती तर या वसाहतीची परिस्थिती अधिक चांगली राहिली असती. आमच्या मते असं करणं काहीसं कठीणच होईल. स्थानिक परिस्थितीत वसाहतीतील शेतीच्या कामासाठी ज्या प्रकारच्या मजुराची गरज आहे त्या

शेतकामासाठी कुली अतिशय योग्य आहे यात काही शंका नाही. अशा प्रकारचं काम.... गोरे लोक कधीच करू शकत नाहीत, आपल्या नेटिव्हांमध्ये ते काम करायची प्रवृत्ती आहे वा तशी त्यांची मनोरचना आहे असं वाटत नाही. अशा रीतीनं कुली शेतमजुरांमुळे कोण बाहेर घालवला जातो? कोणीच नाही.... पुन्हा सरकारनं कुलींची मोठ्यासंख्येत भरती केलेली आहे, विशेषतः रेल्वे विभागात. त्याला तिथं ठेवायचा काय हेतू आहे? असं म्हणता येईल की तो तिथं गोऱ्या माणसाची जागा घेतो आहे. परंतु खरंच का तसं आहे?.... शिवाय शहराजवळील भूखंडावर शेती करून भाजीपाला, कोंबड्या, अंडी यांचा कुली जो पुरवठा करतो त्यावर नाताळमधील शहरं जवळपास पूर्णपणे अवलंबून आहेत. या दृष्टीनं कुली कोणाच्या कामात अडथळा आणतो? गोऱ्या लोकांच्या निश्चितच नाही. आपल्या शेतकऱ्यांना एक समूह म्हणून स्वयंपाकाच्या दृष्टीनं शेती करून तिच्यातील उत्पादनाचा बाजारात भरपूर पुरवठा करण्याएवढी चटक अजून त्याला लागलेली नाही. तसंच नेटिव्हांच्या कामांतही तो अडथळा आणत नाही कारण नेटिव्ह आळशीपणाचं मूर्तिमंत रूप असल्यामुळे ते स्वतःसाठी मिली पिकवण्याशिवाय अधिक त्रास घ्यायला तयार नसतात.

आप्रवासी भारतीय बंधुआ मजूर गोऱ्यांना हानिकारक होईल अशी स्पर्धा तर करत नाहीतच उलट त्यांची उपस्थिती गोऱ्यांसाठी हितावह ठरलेली आहे.

गोऱ्या लोकांवर काळ्या मजुरांचं जे कर्ज आहे ते हे - समाजातील सर्वात खालच्या स्तरावरील स्थान स्वीकारून ते गोऱ्या माणसाचा समाजातील दर्जा एका पायरीनं वर उचलतात. तो जर नसता तर युरोपिअन माणसाला मजुराचं काम करावं लागलं असतं. उदाहरणार्थ आज जो गोरा माणूस कुलींच्या टोळीच्या अधिकाऱ्याचं काम करतो, काळे मजूर नसते तर त्याला स्वतःलाच मजुराच्या टोळीत भरती व्हावं लागलं असतं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, फेब्रुवारी २, १८९५]

मध्यम मार्गाचा पुरस्कार करत नाताळ मर्क्युरीनं सुचवलं की मुक्त भारतीयांचा राजकीय घटक म्हणून मताधिकार काढून घेऊन आणि आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांच्या कराराचा

कालावधी संपल्यानंतर पुन्हा करार केल्याशिवाय त्यांना वसाहतीत राहणं अशक्य होईल अशा प्रकारची उपाययोजना करून ह्या समस्येची सोडवणूक करता येऊ शकेल. आशियायी लोकांचा मतदानाचा अधिकार काढून घेतल्यामुळे नोकरदार वर्गाचं समाधान होऊ शकेल, कुलींना पुन्हा करार करता येण्याच्या तरतुदीमुळे आणि नवीन बंधुआ मजुरांचा सतत पुरवठा होत राहील अशा प्रकारची व्यवस्था केल्यामुळे मालक आणि मालमत्ता असणाऱ्या वर्गाची स्वस्त मजुराची गरज जुन्या दिव्यांऐवजी नवीन दिवे मिळाल्यामुळे भागेल ! मर्क्युरीनं अप्रत्यक्षपणे ध्वनित केलं की खरा गुन्हेगार मुक्त भारतीय आहे. ते सिद्ध करण्यासाठी *मर्क्युरीनं* सहायक संरक्षक श्रीयुत मॅनिस्टी यांना उद्धृत केलं :

करार संपलेले भारतीय ग्रामीण भागातील मालकासाठी अतिशय त्रासदायक होत असतात..... ते ह्या ना त्या निमित्तानं त्या प्रदेशात भटकत असतात आणि ***बंधुआ मजुरात असमाधानाचं बीजारोपण करून त्यांना पळून जायला प्रवृत्त करत असतात. शेतकऱ्यांनी भरपूर पगार दिला नाही तर शेतकऱ्यांकडे काम करण्यावर त्यांचा आक्षेप असतो.*** (ठळक अक्षरं माझी)

मर्क्युरीनं सांत्वन करत पुढं लिहिलं, 'कराराचा काळ संपलेल्या आमच्यामधील आशियायी लोकांची फार मोठी आणि वाढती लोकसंख्या समाधानकारकपणे नियंत्रणात ठेवण्यासाठी' योग्य पद्धतीचा अवलंब करून सरकार ही समस्या सोडवायचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे 'कुलींच्या आयाती'ला असलेला विरोध बराचसा कमी होईल. [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी १४, १८९४]

विधेयक हवं तेवढं पुढे गेलेलं नाही असं म्हणून अपेक्षेप्रमाणे नोकरदारांच्या पक्षानं विधेयकावर तीव्र हल्ला केला. नाताळ विटनेसनं लिहिलं की निवासी करामुळ भारतीयांच्या संख्येवर पुरेसं नियंत्रण येणार नाही.... भारतीय वसाहतीत राहायची निवड करील. त्याचं कुटुंब असेल वा नसेलही. जर नसलं तरी ते निर्माण व्हायला फार काळ लागणार नाही. ते काहीही

असलं तरी त्याच्या कुटुंबाच्या मजुरीमुळे थोड्याच दिवसात त्याला हा कर सहज भरता येईल. [*नाताळ विटनेस*, एप्रिल १२, १८९५]

त्याशिवाय ब्रिटिश सरकारची या विधेयकाला मान्यता आहे की नाही हेही या विधेयकाच्या प्रकाशनाच्या आधी सांगण्यात आलेलं नाही. 'अधिवेशनामागून अधिवेशनात उपाययोजना करत जायचं आणि तिला मान्यता मिळू नये.... याला काहीच अर्थ नाही.' याहूनही तीव्र आक्षेप होता *आप्रवासी भारतीय बंधुआ मजूर वसाहतीला जीवनाची किती तरी वर्षं देतो परंतु* ***त्याच्या वंशजांकडून वसाहतीचा कोणता लाभ होणार आहे? आपल्याला जर हे नियंत्रण जाणवेल एवढं कठीण करायचं असेल तर आपण ते एका पिढीच्या पलीकडे न्यायला पाहिजे आणि भारतीयांच्या प्रत्येक मुलासाठी हा कर असायला पाहिजे.*** [*नाताळ विटनेस*, एप्रिल १२, १८९५] (ठळक अक्षरं माझी)

त्यामुळे चाकरमान्यांच्या पक्षाच्या या वृत्तपत्रानं विनंती केली की भारतीयांच्या प्रश्नाकडे सर्व दृष्टीनं पाहिलं स्पष्ट होईल की आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरासंबंधीच्या विधेयकामुळे 'मदत होणार असली तरी आपली समस्या सोडवायच्या दृष्टीनं ती अतिशय अल्प असेल. सरकारनं आप्रवासी भारतीय बंधुआ मजूरांसोबतच आप्रवासी व्यापाऱ्यांनाही हात लावावा.' [*नाताळ विटनेस*, एप्रिल १२, १८९५]

७

भारतीय आप्रवासी दुरुस्ती विधेयक नाताळ विधानसभेत मेच्या पहिल्या आठवड्यात सादर करण्यात आल्यानंतर गांधीजींनी तयार केलेला विनंती अर्ज अब्दुल्ला हाजी आदम आणि इतर अनेकांच्या सह्यांसह नाताळ विधानसभेच्या सन्माननीय अध्यक्षांना आणि विधानसभेच्या सदस्यांना सादर करण्यात आला. कराराच्या काळातील वाढीसंबंधीचं त्यातील कलम ब्रिटिश घटनेच्या 'मूलभूत तत्त्वाच्या विरोधात आहे' असं त्यात वर्णन करण्यात आलं होतं:

गुलामगिरीचा ढोबळ प्रकार असलेल्या वेठबिगारीद्वारे बळजबरीनं काम करून घ्यायच्या पद्धतीलाही ब्रिटिश परंपरा किळसवाणी मानत राहिली आहे.... अगदी काही वेळेपूर्वीसुद्धा

वेठबिगारीवरील काम (आसामच्या चहामळ्यावरील) हे पाप आहे, महत्त्वाच्या उद्योगांना आधार देण्यासाठी अत्यावश्यक असेल तेव्हाच त्याचा अवलंब करण्यात यावा व पहिली संधी मिळताच ते बंद करण्यात यावं असं सम्राटांच्या सरकारनं मान्य केलं होतं.

अशा प्रकारे प्रस्तावित विधेयकातील करारात कालावधी वाढवण्याची जी तरतूद आहे ती जर अन्याय्य, अनावश्यक आणि ब्रिटिश घटनेच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असेल तर बंधुआ मजुराने कराराचा कालावधी पूर्ण केल्यानंतर आणि करार करणाऱ्या मजुरातील सर्व काही उत्तम शोषून घेतल्यानंतर त्याला परत जाणं भाग पडावं म्हणून खास कर लावायची तरतूद करायचा प्रस्ताव त्याहूनही अन्याय्य आहे.

कर हे केवळ महसुलासाठी असतात हे ध्रुवसत्य दीर्घ काळापासून मान्य करण्यात आलं आहे.... भारतीयांनी आपल्या कराराचा कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना वसाहतीतून जायला भाग पाडणं हा प्रस्तावित कराचा स्पष्ट उद्देश आहे. त्यामुळे तो प्रतिबंधक कर होईल.... त्यामुळे.... भारतीय बंधुआ मजुरावर असमर्थनीय अन्याय्य कर लादला जाईल. बंधुआ भारतीय मजूर भारतातील आपले सर्व संबंध तोडून वसाहतीत आलेला असतो. यानंतर त्यानं भारतात परतून तिथं आपली उपजीविका करणं अगदी अशक्य आहे. अशी आशा करणंच अवास्तव आहे.... एक नियम म्हणून असं सांगता येईल की ज्या भारतीयांना भारतात आपली उपजीविका मिळवून देह आणि आत्मा यांना एकत्रित ठेवणं शक्य होत नव्हतं तेच वसाहतीत बंधुआ मजूर म्हणून आलेले आहेत. भारतीय समाजाचा पोतच असा आहे की भारतीय माणूस शक्य तोवर आपलं घर सोडत नाही आणि एकदा त्याला तसं करणं भाग पडलं की मग भारतात परतून संपत्ती मिळवायची गोष्ट तर सोडाच पण आपलं पोट भरायची त्याच्याकडून अपेक्षा करणंही अगदी चूक आहे.... हे विधेयक वर्गावर्गात भेदभाव करणारं आहे.... ज्या भारतीय बंधुआ मजुरांचा वसाहतीच्या संपन्नतेला हातभार लावण्यात ठोस सहभाग आहे त्यांचा याहून चांगला विचार व्हायला ते पात्र आहेत. [अब्दुल हाजी आदम आणि इतर अनेकांनी नाताळ विधान सभेला निवेदन, *नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये* प्रकाशन मे ५, १८९५]

मे आठला नाताळ विधानसभेत विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाचा प्रस्ताव करत महाधिवक्ता म्हणाल: 'या भारतीयांना वसाहतीत स्थानिक उद्योगांना मजूर मिळावे म्हणून आणण्यात आलं होतं आणि विविध राज्यांमधून ज्या दक्षिण आफ्रिकेची उभारणी होते आहे त्या *दक्षिण आफ्रिकेचा एक भाग बनवण्यासाठी त्यांना आणण्यात आलेलं नव्हतं.* (ऐका, ऐका)' (तिरपी अक्षरं माझी.) या विधेयकानुसार भारतीयानं पुन्हा करार केला नाही आणि तो भारतात परतलाही नाही तर त्याला 'दुप्पट दंड' करायची तरतूद आहे. परतीचा प्रवासखर्च मिळवायचा अधिकार तर तो गमावेलच शिवाय त्याला वार्षिक ३ पौंड 'दंड' करायचा शासनानं निर्णय घेतलेला आहे. भारतीयानं भारतात परत जायला नकार दिला तर त्याच्यावर दखलपात्र गुन्ह्याच्या कायद्याखाली कार्यवाही करण्यावर आपला आक्षेप असल्याचं भारत सरकारनं स्पष्टपणे सांगितलं आहे. महाधिवक्ता स्पष्ट करत म्हणाले,

जर भारतीयानं परतायला नकार दिला तर त्याच्याविरुद्ध गुन्हेगारी विषयक कायदा अमलात आणून त्याला बळजबरीनं जहाजात बसवणं शक्य होणार नाही, *परंतु तो निर्बंध त्याच्या लक्षात न आल्यास कराराचं पालन त्यानं करायलाच पाहिजे हे त्या माणसाला त्याच्यावर रास्त कर लावून दाखवायला पाहिजे आणि त्यानं कराराचा भंग केला तर सार्वजनिक महसुलात त्यानं भर घालायला पाहिजे.* [*नाताळ मर्क्युरी*, मे ९, १८९५] (ठळक अक्षरं माझी)

श्रीयुत ह्युलेट, मेडन आणि बिन्स हे प्रस्तावाच्या बाजूनं बोलल्यानंतर श्रीयुत टॅथम व्यासपीठावर आले. दंड लावण्याबद्दल ते म्हणाले की मला तर हा दंड आहे असं दिसतच नाही. [*नाताळ मर्क्युरी*, मे ९, १८९५] कारण तुम्ही हा वसूल कसा करणार आहात? माणसानं जर कर चुकवला तर त्याला शिक्षा व्हावी अशी तरतुद या विधेयकात कुठं आहे? गुन्हेगारी कायद्याखाली शिक्षा व्हायच्या नियमांतर्गत कोणत्याही प्रकारची भारतीयांना शिक्षा होणार असेल तर त्याला इथं येऊ देण्यास भारत सरकारनं मान्यता द्यायला नकार दिला तर काय करावं याचा कोणताही उल्लेख विधेयकात करण्यात आलेला नाही असं महाधिवक्ता उत्तर देताना म्हणाले. परंतु कोणताही

भारतीय या वसाहतीत जर पाच वर्ष राहिला असेल व तो या देशातून परतू इच्छीत नसेल तर त्याच्याजवळ ३ पौंडाची मालमत्ता असलीच पाहिजे व नागरी कायद्याच्या प्रक्रियेनुसार ती जप्त करणं काही कठीण नाही. त्यांच्या ह्या उद्‌गाराचं स्वागत करताना टाळ्यांचा जो कडकडाट झाला त्याचा फायदा घेत ते पुढं म्हणाले : 'त्यांच्या वसाहतीत राहण्यावर तुमचा आक्षेप असल्यामुळे तुम्ही गुन्हेगारीविषयक शिक्षा सुचवाल तर तुम्ही तुम्ही स्वतःसाठी अडचणीची परिस्थिती निर्माण कराल.'

त्यानंतर विधेयकाचं दुसरं वाचन झालं.

नाताळच्या गोऱ्यांचं तरीही समाधान झालं नव्हतं. त्यांच्या दृष्टिकोनाला अभिव्यक्ती देत *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं :

अडचणीतून मार्ग काढायच्या दृष्टीनं आपण काही वाटचाल केली की नाही याबद्दल शंकाच आहे.... कुलींना बाहेर काढण्याएवढ्या कराच्या ओझ्याचा विधेयकात

समावेश असेल तर साम्राज्याचं सरकार ते फेटाळून लावील आणि विधेयकाला मान्यता मिळावी म्हणून जर केवळ सौम्य कर लावण्यात आला असेल तर त्यामुळे देशातील कुलींचं वास्तव्यही कायम राहील. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे ९, १८९५]

भाकरी वाचवायची आणि ती खायचीही इच्छा असलेल्या माणसाप्रमाणे द्विधा मनःस्थितीतील नाताळचे गोरे अगदी विकृत माणसाप्रमाणे वागत होते. त्यांना माहीत होतं की ज्या माणसाचा त्यांना आत्यंतिक तिटकारा आहे त्याच्याशिवाय त्यांचं भागू शकत नाही. *कॅपिटलनं लिहिलं* :

नाताळच्या लोकांना कुलीच्या सेवा हव्या आहेत परंतु त्याची उपस्थिती नको आहे. या समस्येनं अतोनात त्रस्त होऊन राजकीय दृष्टीनं ते आजारी झाले आहेत. कराराचा कालावधी संपल्यानंतर वसाहत न सोडून कुली त्यांना चीड तर आणतोच पण तो परत जाताना आपल्या सेवाही घेऊन

जाईल या भीतीनं तो जाऊ नये असंही त्यांना वाटतं असतं. त्यामुळे त्याची त्यांना अजूनच चीड येते. परंतु तरीही कुली जाणार नाही म्हणून गोरा त्याच्यावर भुंकत असतो ! [*नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये* कॅपिटलमधून उद्धृत, जून १९, १८९५]

आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांच्या आयातीसाठी जे उपादान होतं ते बंद करायच्या मंत्रिमंडळाच्या अपराधाला मनातून क्षमा न केलेल्या मळेवाल्यांच्या वतीनं या वादावादीत थोडासा भाग घेत *नाताळ ॲडव्हरटाईझरच्या* स्तंभलेखकानं मल्लीनाथी करत लिहिलं : *'हा कर अगदी उघडपणे वर्गभेद करणारा आहे आणि तो शिक्षा करायच्या दृष्टीनं लादण्यात आलेला असल्यामुळे भारत सरकारनं स्पष्टपणे त्याला आपला विरोध व्यक्त केलेला आहे व त्यामुळे ब्रिटिश सरकार हा कर लावण्यावर आक्षेप घेईल अशी मी कल्पना करतो.'* [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १०, १८९५] (तिरपी अक्षरं माझी) ज्यांनी वसाहतीला संपन्न बनवण्यासाठी हातभार लावलेला आहे अशा एकाच साम्राज्याचीच प्रजा असलेल्या लोकांशी स्पष्टपणे दिसणाऱ्या अन्याय्य आणि भेदभावाच्या वागणुकीकडे लक्ष वेधत *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* काही दिवसांनंतर लिहिलं :

इथं वास्तव्य करू इच्छिणाऱ्या कुलींवर खास कर लावायच्या या प्रस्तावामुळे.... एक व्यापक प्रश्न उभा राहिला आहे. अशा प्रकारचा भेदभाव साम्राज्याच्या दुसऱ्या भागातून येणाऱ्या कुलींच्या बाबतीत करण्यात येणार असेल तर मग या व्यवस्थेची कार्यकक्षा युरोपिअनेतर वंशाच्या अशा लोकांपर्यंत वाढवायला पाहिजे की ज्यांचा ब्रिटिश साम्राज्याशी संबंध नाही.... अशा प्रकारे केवळ कुलीची खास निवड करणं आणि इतर सर्व परदेशी लोकांना निर्भयपणे इथं वास्तव्य करायची अनुमती देणं ही काही समतेची वागणूक नाही. *परदेशी लोकांवर कर लावायचा असेल तर त्याची सुरुवात ज्यांची मातृभूमी ब्रिटिश ध्वजांतर्गत येत नाही त्यांच्यापासून करायला पाहिजे, जे आपल्याप्रमाणेच याच साम्राज्याचे प्रजाजन आहेत त्यांच्यापासून नाही.* अपवादात्मक परिस्थितीत निर्बंध घालायचेच असतील तर यांचा क्रमांक शेवटचा लागायला पाहिजे पहिला नाही. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १६, १८९५]

परंतु सर्वसामान्य नाताळच्या माणसाच्या हितसंबंधांचा साम्राज्याच्या हितसंबंधाशी विरोध यायचा तेव्हा साम्राज्याच्या हितसंबंधाचं त्याला फारसं महत्त्व वाटत नसे. त्याच्या या वृत्तीचं दर्शन नाताळ मर्क्युरीत आलेल्या एका लोकप्रिय विडंबनातून होतं :

नव्हते तेव्हा वसाहतीत
कंगाल आणि घाणेरडे कुली,
खोटारडे आणि कावेबाज,
आणि नव्हती अरब दुकानदारांच्या
घाणेरड्या दुकानांनी
कुरूप झालेली वेस्ट स्ट्रीट तेव्हा.
होता काफिरांचा व्यापार गोऱ्यांच्या हाती
आणि होता तो मालक आपल्या दुकानांचा
हरवले ते दिवस आता भूतकाळात.

आणि आता हिंदू घेतो रोख आमच्याकडून
आणि काढतो दिवाळं, हसतो हा हा हू हू करत
जायलाच हवं आता रामास्वामीला
केलं फार दिवस सहन आम्ही त्याला
पाहतो आहोत घोरपडीसम या कुलीला
आमच्या लहानपणापासून. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर २४, १८९४]

आपणच बरोबर आहोत या भावनेच्या उन्मादात नाताळ मर्क्युरीनं लिहिलं :

विधानसभेकडे आप्रवासी विधेयकासंबंधी निवेदन देणाऱ्या डरबनमधील प्रमुख भारतीयांच्या भावी काळाबद्दल काही चमत्कारिक कल्पना आहेत.... भारतात ते अगदी तळच्या

अवस्थेत होते.... नाताळनं भारतीयांना वर उचललं आहे.... त्याच्या मोबदल्यात भारतीयांना लोण्याचा गोळा हवा आहे. त्यामुळे करारानुसार त्याच्यावर जी पवित्र जबाबदारी आलेली आहे ती त्याला ठोकरून द्यायची आहे. आणि योग्यायोग्यतेच्या कोणत्याही तत्त्वाचा विचार न करता त्याला इथं राहायचं आहे. आम्ही त्याच्यासाठी वरदान आहोत आणि पण आता तो आम्हांला शापरूप होत आहे.... या मवाळ हिंदूची वागायची आणि विचार कराची पद्धती नक्कीच आगळी आहे. [*नाताळ मर्क्युरी*, मे २१, १८९५]

नाताळच्या माणसाला कळलं असतं तर त्याला वाटलं असतं की आपण हा सर्व बाऊ विनाकारण करतो आहोत. ज्याची मागणी करायचा कोणत्याही वसाहतीला धीर झाला नसता ती मागणी पूर्ण करायला व्हाईसराय यांच्या कार्यकारी मंडळाची व भारत सरकारची तयारी आहे. नाताळचं प्रतिनिधी मंडळ भारतात असतानाच आप्रवासी प्रतिनिधी, नाताळ, सर चार्ल्स मायकेल यांनी सुचवलं की 'कालावधी संपून' परत करार करून कालावधी न वाढवणाऱ्या कुलीनं परतायला नकार दिल्यास त्याला शिक्षा व्हायलाच पाहिजे. त्यावर जबरदस्त व्यक्तिमत्वाच्या इ. सी. बक यांनी नोकरशाहीला कायद्याच्या त्रासदायक चौकटीबद्दल वाटणाऱ्या घृणेतून अशा कुलींना ताबडतोब परत पाठवायची सूचना केली. ही गोष्ट मान्य करायला आधी भारत सरकार लाजत होतं आणि नंतर नाताळ सरकारच्या महाधिवक्त्यांनीही ही गोष्ट शक्य नसल्याचं सांगितलं. सर चार्ल्स मायकेल यांच्या प्रस्तावाचा उल्लेख करत ते उद्‌गारले :

परंतु हे आवश्यक आहे काय? आठ वर्षांनंतर जर प्रवासखर्च देण्यात येणार असेल आणि भरती व्हायच्या वेळी आठ वर्षांनंतर आपल्याला परत पाठवण्यात यावं असं कुलीनं मान्य केलेलं असलं तरी (त्यानं कराराचं नूतनीकरण केलेलं नसेल तर) ज्याप्रमाणे त्याच्या कराराच्या अवधीत तो ज्या मालकाकडून पळून आला असेल त्या मळेवाल्या मालकाकडे परतायला त्याला भाग पाडता येतं त्याप्रमाणे कराराच्या या भागाची परिपूर्ती करण्यासाठी त्याला परतीच्या जहाजावर बसवून परतायला भाग पाडता येईल काय? (पाहा नाताळ अध्यादेश १८९१ चा

अध्यादेश क्रमांक २५, कलम ३१) [महसूल आणि कृषी विभाग, भारत सरकार, कलकत्ता अभिलेखागार, फाईल क्रमांक १८/१८९४ (नोंद पृष्ठ ९)]

नाताळ विधान सभेनं आप्रवासी विधेयक जेव्हा समितीकडे पाठवलं तेव्हा समितीनं मे १४, १८९५ला 'कर' या शब्दाच्या ठिकाणी 'परवाना' वा 'परवाना शुल्क' हे शब्द घालून त्यात दुरुस्ती केली. *नाताळ मर्क्युरीनं* सावध करत सांगितलं की *'विधेयकाची शब्दरचना अतिशय काळजीपूर्वक करायला हवी. तसं न करण्यात आल्यास त्यात मान्य करण्यात आलेल्या तरतुदींना ब्रिटिश सरकार नाकारायचा धोका आहे.'* [*नाताळ मर्क्युरी*, मे ९, १८९५] (तिरपी अक्षरं माझी) संकटात असलेल्या आप्रवासी बंधुआ मजुरांवर याचा फार कमी परिणाम होणार होता. नाव बदलल्यामुळे माथी मारण्यात आलेली शिक्षा काही सौम्य होणार नव्हती. गांधीजींनी निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे हा कायदा तयार करणारांना पूर्णपणे माहीत होतं की वसाहतीतील विशेष वर्गाच्या लोकांवर प्रति माणसी खास कर हा ब्रिटिशांच्या न्यायाच्या कल्पनेशी पूर्णपणे विसंगत होता. [भारतीय समाजातर्फे मान्यवर महोदय जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, दिनांक ऑगस्ट ११, १८९५]

कराराचा कालावधी संपल्यानंतर प्रत्येक भारतीय बंधुआ मजुरानं वसाहतीत राहण्यासाठी वार्षिक ३ पौंड भरून 'परवाना' घ्यावा लागेल अशा प्रकारची दुरुस्ती महाधिवक्ता यांनी सुचवल्यानंतर श्रीयुत बेल यांनी सुचवलं की 'हा पैसा अविलंब गोळा करायला पाहिजे.' महाधिवक्ता यांनी ती सूचना मान्य केली. परिणामी ह्या तरतुदीनंतर कलम क्रमांक ३ असं झालं:

प्रत्येक आप्रवासी भारतीय बंधुआ मजूर.... जर भारतात परत जायला नकार देत असेल अथवा नाताळमध्ये पुन्हा बंधुआ मजूर म्हणून काम करायला तयार नसेल तर वसाहतीत राहण्यासाठी त्याला दरवर्षी परवाना घ्यावा लागेल.... आणि त्यासाठी त्याला वार्षिक ३ पौंड शुल्क द्यावं लागेल जे अविलंब प्रक्रियेद्वारे वसूल करण्यात येऊ शकेल. [वरीलप्रमाणे]

प्रस्तावित विधेयकाच्या मसुद्यात कराचा निश्चित उल्लेख करण्यात आलेला नव्हता. परंतु हे सर्वांना माहीत होतं की नाताळच्या प्रतिनिधीमंडळानं करारातून मुक्त झालेल्या प्रत्येक

भारतीयासाठी २५ पौंड कर सुचवला होता. ही रक्कम ३ पौंडावर कशी आली याचं वर्णन गांधीजींनी आपल्या आत्मकथेत केलेलं आहे.

आम्ही या करविरुद्ध जोरदार मोहीम उघडली. नाताळ इंडियन काँग्रेस या विषयावर मूग गिळून बसली असती तर व्हाईसराय (लॉर्ड एल्गिन) यांनी २५ पौंड कराला मान्यताही दिली असती. २५ पौंडापासून ३ पौंडापर्यंत हा कर यायला काँग्रेसचं आंदोलनच पूर्णपणे कारणीभूत होतं. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १५७ भारताच्या अभिलेखागारात तसंच ब्रिटिश म्युझियममध्येही ह्या दस्तावेजांचा मला शोध लागू शकला नाही. प्रिटोरिया अथवा पिटरमारिट्झबर्ग येथील शासकीय अभिलेखागारात कदाचित ते असू शकतील]

८

२५ जूनला नाताळ विधान परिषदेत जेव्हा हे विधेयक मांडण्यात आलं तेव्हा भारतीयांनी विधानपरिषदेला अजून एक निवेदन दिलं. त्या विधेयकाविरुद्ध करण्यात आलेला मुख्य युक्तिवाद असा होता:

१. श्रीयुत बिन्स आणि श्रीयुत मॅसन यांनी नोंदवलं आहे की कोणत्याही देशात आप्रवासी 'कुलींची' आयात करताना त्याच्या कराराच्या दुसऱ्या कालावधीसाठी भारत सरकारला परवानगी मागूनही भारत सरकारनं ती दिलेली नाही आणि कोणत्याही परिस्थितीत कराराचा कालावधी संपल्यानंतर बळजबरीनं त्या कुलीला मायदेशी परतायला भाग पाडणंही भारत सरकारला मंजूर नाही. त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यात यासंबंधी जो काही व्यवहार करण्यात येतो त्यापासून 'या विधेयकातील कलमांमधून करण्यात आलेल्या तरतुदी अगदी वेगळ्या आणि वाईट आहेत.'

२. असं गृहीत धरण्यात आलं की वसाहतीत येणाऱ्या आप्रवासी बंधुआ मजुराचं वय २५ वर्ष आहे. ज्या कलमाप्रमाणे त्यानं १० वर्ष बंधुआ मजूर म्हणून काम करावं अशी अपेक्षा आहे त्याप्रमाणे त्यानं काम केल्यास त्याच्या 'जीवनातील उमेदीचा सर्व काळ गुलामगिरीच्या अवस्थेत

संपेल.' सलग १० वर्ष इथं मुक्काम केल्यानंतर त्याचं भारतात परतणं 'केवळ मूर्खपणाचं ठरेल. त्याचे सर्व जुने धागेदोरे तुटलेले असतील.' त्याच्या जन्मभूमीतच 'तुलनात्मक दृष्ट्या तो परका झालेला असेल.' भारतात त्याला काम मिळणं जवळपास अशक्यप्राय होणार आहे.

३. संपूर्ण १० वर्षाचा त्याचा पगार ८७ पौंड होतो. भारतीय बंधुआ मजुरानं यातून ५० पौंडही वाचवले, जी गोष्ट बहुतेक प्रकरणी अशक्यप्राय आहे, तरी एवढ्या रकमेच्या व्याजावर भारतासारख्या गरीब देशातही देह आणि आत्मा यांना एकत्रित सुरक्षित ठेवणं अशक्य आहे.

४. परवान्यासाठी ३ पौंड कराच्या कलमाबद्दल बोलायचं तर सम्राज्ञींच्या सरकारच्या प्रजेच्या एका वर्गाला, आणि तोही असा वर्ग की 'जो वसाहतीसाठी अतिशय उपयुक्त आहे', अशा प्रकारच्या करासाठी वेगळं काढण्यात यावं ही गोष्ट अनाकलनीय आहे. 'एखाद्या माणसानं वसाहतीत गुलामगिरीत १० वर्ष घालवल्यानंतर त्याला इथं मुक्त माणूस म्हणून राहता येण्यासाठी चुकवावी लागणारी किंमत ही न्याय आणि समतेच्या अगदी साध्या तत्त्वांशीही विसंगत आहे.'

५. ह्या विधेयकाचं कायद्यात रूपांतर झाल्यानंतर जे भारतीय इथं येतील त्यांच्यासाठीच ही कलमं लागू होतील कारण ते कोणत्या अटींखाली इथं येतात ते त्यांना माहीत असेल असा युक्तिवाद करण्यात येतो. परंतु आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांसाठी ही गोष्ट अतिशय अन्याय्य आहे *कारण करार करणाऱ्या दोन्ही पक्षांना.... समान कृतिस्वातंत्र्य असायला पाहिजे. दारिद्र्याच्या वेदनांनी तडफडणाऱ्या आणि आपल्या कुटुंबाचं पालनपोषण न करू शकणारा भारतीय जेव्हा बंधुआ मजुर होण्यासाठी करारावर सही करतो तेव्हा तो सही करणारा स्वतंत्र माणूस आहे असं आपण क्वचितच म्हणू शकतो. तात्कालिक अडचणींमधून सुटका करून घेण्यासाठी माणसं अनकेदा भयानक गोष्टींना कबुली देत असतात.* [अब्दुल हाजी आदम आणि इतर अनेकांनी नाताळ विधान परिषदेला दिलेलं निवेदन, *नाताळ मर्क्युरीमध्ये* प्रकाशन जून २६, १८९५]

जोपर्यंत विधानपरिषदेचा प्रश्न होता तोपर्यंत प्रस्तावाचा निष्कर्ष निश्चित होता. दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ जूनला विधेयकाचं दुसरं वाचन कोणत्याही विरोधाशिवाय पूर्ण झालं.

नाताळ विधानपरिषदेनं विधेयकाला ११ ऑगस्टला मंजुरी दिल्यानंतर गांधीजींनी दुसरं निवेदन चेम्बर्लेन यांना सादर करण्यासाठी तयार केलं. श्रीयुत बिन्स आणि श्रीयुत मॅसन, श्रीयुत साँडर्स, सर मायकल गालवे, लॉर्ड एल्गिन आणि इतरांची विधानं विस्तारानं उद्धृत करत गांधीजींनी दाखवलं की भारतीय बंधुआ मजुरांनी वसाहतीची जी सेवा केली तिचं बक्षीस म्हणून त्यांच्यावर ही जी बंधनं घालण्यात येत आहेत त्यात कोणताही न्याय नाही. 'भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांमुळे उद्योगांना जे संरक्षण मिळालं आहे व ते नसले तर जो वाईट परिणाम होईल त्याकडे पाहता त्यांच्या कराराचा कालखंड ५ वर्षांपासून अनिश्चित काळापर्यंत वाढवणं अतिशय अन्याय्य आणि अनावश्यक आहे.'

'वसाहतीत राहणारे भारतीय हे संपन्न, साहसी आणि कायद्याचं पालन करणारे लोक आहेत' असं बंधुआ मजुरांच्या संरक्षकानं आपल्या १८९४च्या वार्षिक अहवालात वर्णन केलं होतं. सर न्यायाधीश सर मायकेल गालवे यांनी सांगितलं होतं की भारतीय आप्रवाशांनी 'गोऱ्या आप्रवाशांच्या.... अपयशावर बऱ्याच प्रमाणात पांघरूण घातलं आहे.' आणि त्या कारणानं 'आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांना वसाहतीत आणण्यासाठी असलेल्या कायद्यांमध्ये कोणत्याही प्रकारे बदल करायला त्यांनी विरोध केला.' संरक्षकानं आपल्या अहवालात पुढं लिहिलं:

थोड्या वेळेसाठीसुद्धा जर संपूर्ण भारतीय लोकांना वसाहतीतून काढून टाकणं शक्य झालं असतं तर मला खात्री आहे की काही अपवाद वगळल्यास वसाहतीत सुरू असलेल्या व्यवसायातील प्रत्येक व्यवसाय केवळ विश्वसनीय मजूर मिळत नाहीत म्हणून कोलमडून पडल्याशिवाय राहणार नाही.... संपूर्ण वसाहतीत सामान्यपणे मान्य करण्यात येतं की भारतीय

मजुरांशिवाय कोणताही उद्योग, व्यवसाय वा शेती यशस्वीपणे करता येऊ शकत नाही. [भारतीय समाजातर्फे मान्यवर महोदय जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, दिनांक ऑगस्ट ११, १८९५]

साम्राज्याच्या सरकारला घाबरवण्यासाठी केवळ 'गर्दी'चा मुद्दा उपस्थित करण्यात येत होता. ज्या देशाची दारं नुकताच उघडली आहेत आणि 'मोठा भूप्रदेश आणि लागवडीखाली न आणली गेलेली जमीन विकसित न होता मोकळी पडलेली आहे' त्या देशासंबंधी 'गर्दी'चा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. आप्रवासी भारतीयांच्या संरक्षकानं १८९४ सालच्या वार्षिक अहवालात सांगितलं की बिन्स आणि मॅसन यांनी मान्य केलं आहे की 'गांभीर्यानं विचार करावा एवढा युरोपिअनांच्या स्पर्धेत 'कुली' कुठंच येत नाही.' भारतीयांना बाहेर काढण्यासाठी जो गोंगाट चालू होता त्यामागील खरं कारण राजकीय होतं. संरक्षकाच्या अहवालात सांगण्यात आलं होत :

व्यापारी आणि दुकानदार यांच्यात अरबांविरुद्ध तीव्र भावना होती कारण ते सर्व व्यापारी आणि दुकानदार होते. परंतु ते सर्व ब्रिटिश प्रजा असल्यामुळे व वसाहतीत कोणत्याही कराराद्वारे आलेले नसल्यामुळे त्यांच्या कामात अडथळा आणता येऊ शकत नाही हे पूर्वीच लक्षात आलेलं होतं.

आणि पुन्हा

जे भारतीय मजूर वसाहतीत स्थायी निवासी झाले आहेत त्यांचा.... आतापर्यंत तरी वसाहतीला फार मोठा लाभ झालेला आहे असं आमचं निश्चित मत आहे. तसंच नेटिव्हांच्या समस्येला तोंड देण्यात आणि ती सोडवण्यात आपल्याला अजून यश मिळालेलं नसल्यामुळे निर्माण झालेली चिंता लक्षात घेऊन भविष्याचा विचार करता त्यांना आपण टाळू शकत नाही. फार मोठ्या प्रमाणात कुलींनी परतीच्या प्रवास खर्चाच्या संधीचा फायदा घेतला असता तर भीतीचं फार कमी कारण उरलं असतं. [वरीलप्रमाणे]

त्यामुळे त्यांच्यावर प्रतिबंध आणायच्या प्रस्तावित उपायांचं समर्थन करणाऱ्या कारणाच्या अगदी विरुद्ध गोष्ट सिद्ध होत होती. कारण 'कोणत्याही प्रकारचा करार न करता वसाहतीत गेलेल्या'

भारतीय व्यापाऱ्यांच्या कामात कोणत्याच प्रकारचा जर अडथळा आणता येऊ शकणार नसेल तर 'असं म्हणता येईल की ज्या आप्रवासी बंधुआ मजुरांना आपण वसाहतीत आमंत्रित केलं आहे आणि.... जे तेवढ्याच प्रमाणात ब्रिटिश प्रजा आहेत त्यांचा वसाहतीच्या सदिच्छेवर आणि काळजी घेण्यावर विशेष अधिकार आहे' [वरीलप्रमाणे] असं निवेदनात दाखवण्यात आलं होतं.

नाताळ मर्क्युरीचं तरीही म्हणणं होतं की ३ पौंड पोल कर लावणं 'क्रूरपणाचंही नाही आणि विषमता निर्माण करणारंही' नाही. 'जे लोक वसाहतीच्या कल्याणासाठी आवश्यक आहेत असं मान्य करण्यात आलं आहे त्यांनी एक तर कायम गुलामगिरीत राहावं अथवा *नाताळ मर्क्युरीच्या* म्हणण्याप्रमाणे वार्षिक ३ पौंड भरून आपलं 'स्वातंत्र्य विकत घ्यावं' असं म्हणणारा हा '३ पौंडाचा कर क्रूरपणाचंही नाही आणि विषमता निर्माण करणारंही' या शब्दांवर सम्राज्ञींचं सरकार कसा काय विश्वास ठेवू शकते' असं भारतीयांनी विचारलं. कराराचं नूतनीकरण केलेल्या भारतीयांना बळजबरीनं परत पाठवणं ढळढळीत अन्यायाचं कसं आहे हे दाखवताना पुढं लिहिण्यात आलं की आज जे लोक विधेयकाचं समर्थन करत आहेत त्यांनीच १८८५च्या नाताळ आप्रवासी आयोगासमोर अगदी वेगळा दृष्टिकोन आणि मतं मांडली होती. जे. आर. साँडर्स म्हणाले होते:

भारतीयांचा कराराचा कालखंड संपल्यानंतर त्यांना भारतात परत जायला वा दुसरा करार करायला भाग पाडण्यासाठी कायदा करायच्या विषयासंबंधी आयोगानं कोणत्याही प्रकारची शिफारस केलेली नसली तरी अशा प्रकारच्या कोणत्याही कल्पनेचा मी तीव्र निषेध करू इच्छितो. जे अनेक लोक अशा प्रकारच्या कल्पनेचा पुरस्कार करतात त्यांना ते काय करतात याचा अर्थ जेव्हा कळेल तेव्हा ज्या तीव्रतेनं याचा ते पुरस्कार करत आहेत तेवढ्याच जोमानं ते याचा विरोध करतील असा माझा विश्वास आहे. भारतीय आप्रवाशांना थांबवा आणि होणारे परिणाम भोगा. परंतु जी चूक आहे म्हणून मी आज तुम्हाला सांगतो आहे ते करायचा प्रयत्न करू नये.

बंधुआ मजुराच्या उमेदीच्या काळातील सर्व काही घ्यायचं (चांगलं आणि वाईटही) आणि नंतर त्याला त्याचं फळ नाकारायचं! आणि त्यांनी स्वतःच्या उमेदीचा उत्तम काळ आपल्या कल्याणासाठी घालवल्यानंतर आपल्याला शक्य असलं तर त्यांना परतायला आपण भाग पाडू इच्छितो, परंतु ते शक्य. नाही. कशासाठी? ज्या उपासमारीतून वाचण्यासाठी त्यांनी आपल्या तरुणपणी प्रयत्न केला होता त्याच उपासमारीत परत ढकलायला? शायलॉकप्रमाणे एक पौंड मास घ्यायचा प्रयत्न करायचा - परंतु शायलॉकप्रमाणेच आपल्याला बक्षीस मिळेल हे लक्षात ठेवावं लागेल.

आपल्याला शक्य असेल तर आप्रवासी भारतीयांच्या आगमनावर आपण बंदी घालू या; जर आता रिकामी घरं फार शिल्लक नसतील तर निम्म्यापेक्षा कमी वसाहत असलेल्या या देशातील लोकांच्या निर्मितिक्षमतेत आणि उपभोगक्षमतेत भर घालणाऱ्या अरबांना आणि भारतीयांना ते राहत असलेल्या घरातून बाहेर काढू. परंतु आपण परिणामांचा शोध घेऊ या.... या आणि इतर गोष्टींच्या परिणामांचं गणित करणं कठीण आहे. परंतु आपण त्यांना तोंड देऊ या. आंधळ्या वंशवादाची वा मत्सराची भावनाच प्रभावी ठरणार असेल तर ठीक आहे तसं होऊ द्या. लोकप्रियतेच्या मागे लागलेल्या लोकांच्या इच्छेपेक्षाही वसाहत भारतीय आप्रवाशांना अधिक चांगल्या प्रकारे थांबवू शकते आणि तेही अतिशय सहजपणानं आणि नेहमीसाठी. परंतु या लोकांना त्यांच्या सेवेचा कालखंड संपल्यानंतर बाहेर जायला भाग पाडायचं काम ही वसाहत करू शकत नाही. आणि मी विनंती करतो की असं करायचा प्रयत्न करून वसाहतीनं आपल्या चांगल्या नावाला बट्टा लावू नये. [वरीलप्रमाणे]

हॅरी एस्कॉम्ब यांनी आपल्या साक्षीत सांगितलं :

कराराचा काळ संपलेल्या भारतीयांच्या संदर्भात बोलायचं तर कोणत्याही माणसाला, अपराधाच्या कारणासाठी हद्दपार करायचं कारण सोडून, जगातील कोणत्याही भागात जायला भाग पाडणं उचित आहे असं मला वाटत नाही; या प्रश्नाबद्दल मी बरंच ऐकलं आहे आणि मी

वेगळा दृष्टिकोन स्वीकारावा असंही मला सांगण्यात आलं आहे, परंतु तसं करणं मला शक्य झालेलं नाही. एखाद्या माणसाला तांत्रिक दृष्ट्या त्याच्या इच्छेनं परंतु वास्तवात अनेकदा त्याच्या इच्छेविरुद्धच त्याला आपण इथं आणतो. आपल्या आयुष्याच्या उमेदीची सर्वोत्तम पाच वर्षं तो इथं घालवतो, इथं त्याचे नवे संबंध निर्माण होतात, जुने विसरले जातात आणि तो इथं घर वसवतो. माझ्या विवेकाप्रमाणे त्याला परत पाठवता येऊ शकत नाही. त्यांच्याकडून शक्य ते काम घ्यायचं आणि नंतर त्याला परतायला भाग पाडणं यापेक्षा बंधुआ मजुरांची यापुढे आयात एकदम बंद करणं अधिक चांगलं आहे. असं दिसतं की वसाहतीला वा वसाहतीच्या काही भागाला भारतीय हवे आहेत, परंतु आप्रवासी भारतीयांच्या वास्तव्यामुळे होणारे परिणाम नको आहेत. जोपर्यंत माझी माहिती आहे भारतीय लोक त्रासदायक नाहीत, काही बाबतीत ते अतिशय चांगलं काम करतात. ज्या माणसानं पाच वर्ष उत्तम वर्तन केलं आहे त्या माणसाला घालवायचं समर्थन करू शकणारा युक्तिवाद मी अजून ऐकलेला नाही. भारतीयानं पाच वर्ष नोकरी केल्यानंतर तो गुन्हेगार असल्याशिवाय पोलिसांच्या निगराणीखाली त्याला ठेवणं मला उचित वाटत नाही. अरब व्यापाऱ्यांवर युरोपिअन व्यापाऱ्यांपेक्षा अधिक निगराणी का ठेवण्यात यावी ते मला कळत नाही. काही अरबांच्या बाबतीत ही गोष्ट अतिशय हास्यास्पद ठरते. मोठी संपत्ती असलेले, मोठे संबंध असलेले ते लोक आहेत आणि त्यांचा योग्य पद्धतीनं उपयोग करण्यात आल्यास इतर गोष्टींपेक्षा ही गोष्ट अतिशय लाभदायक ठरू शकते.

सर्व भारतीय बंधुआ मजुरांना त्यांचा कराराचा कालावधी संपल्यानंतर भारतात परतायला भाग पाडायच्या कल्पनेचं वर्णन 'भारतीय लोकांसाठी सर्वाधिक अन्यायकारक' असं करत एम. एच. बिन्स म्हणाले की 'भारत सरकारनं तिला कधीच मान्यता देऊ नये.'

माझ्या मते मुक्त भारतीय लोक वसाहतीतील सर्वात अधिक लाभदायी वर्गापैकी एक आहेत.... मुक्त भारतीय लोक असण्यापूर्वी पिटरमारिट्झबर्ग आणि डरबनसारख्या शहरांना फळं,

भाजीपाला आणि माशांचा पुरवठा नव्हता.... आणि आता पिटरमारिट्झबर्ग आणि डरबनसारख्या शहरांतील बाजार १० वर्षांपूर्वीप्रमाणेच ओस पडतील. [वरीलप्रमाणे]

अशा लोकांवर कायम गुलामगिरी लादणं वा त्यांना वार्षिक ३ पौंड द्यायला लावणं 'मग त्यांना तो देणं परवडू शको वा न परवडू शको, ही गोष्ट कमीतकमी तीव्र शब्दात सांगायचं तर अतिशय एकतर्फी आणि स्वार्थीपणाची आहे.

अखेरीस विधेयकाचं रूपांतर कायद्यात झाल्यास आप्रवासी बंधुआ मजुरांचा आयातीचा हेतूच विफल होईल. जर या विधेयकाचा अंतिम हेतू भारतीयांच्या भौतिक परिस्थितीत सुधारणा करणं असेल तर त्यांना कायम गुलामगिरीत ठेवून तो पूर्ण होऊ शकत नाही. जर त्याचा उद्देश भारताच्या गर्दीच्या भागातील गर्दी कमी करणं असेल तर तोही उद्देश या विधेयकानं पूर्ण होऊ शकत नाही, कारण या विधेयकाचा हेतू भारतीयांची इथली संख्या वाढवणं नाही तर नवीन कराराचं ओझं वाहायला असमर्थ असलेल्या थकल्याभागल्या 'कुलीं ना परत पाठवून त्यांच्या जागी नवीन भारतीयांना आणायचा आहे. यामुळे तर आधीपेक्षाही परिस्थिती अजूनच वाईट होईल.

कारण गर्दी झालेल्या जिल्ह्यांच्या भागांतील गर्दी तेवढीच राहील. भारतीयांना सामावून घेणाऱ्या नाताळसारख्या भागांचा विचार केला तर येथून जाणाऱ्या लोकांचं प्रमाण तेवढंच राहील आणि ज्यांना आपल्या इच्छेविरुद्ध परतावं लागेल तेही अतिरिक्त काळजीचा आणि समस्येचा विषय होण्यापेक्षा वेगळे काहीच होणार नाहीत. त्यांना कोणतंही काम मिळायची शक्यता नसल्यामुळे आणि स्वतःची उपजीविका करण्याएवढं भांडवल त्यांच्याजवळ नसल्यामुळे सार्वजनिक खर्चावर निर्वाह करायची त्यांच्यावर वेळ येईल.

भारतीय लोक आनंदानं हा वार्षिक कर देतील असं या युक्तिवादाच्या विरोधात म्हणता येईल. गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं की या कराचा हेतू महसूल गोळा करणं आहे असं

कुठेच नमूद करण्यात आलेलं नसल्यामुळे अशा प्रकारचा युक्तिवाद करण्यात आल्यास करार पुन्हा करण्याविषयीची आणि करासंबंधीची विधेयकातील तरतूद पूर्णपणे निरुपयोगी आहे असं सिद्ध होईल.

समारोप करत निवेदकांनी प्रार्थना केली की जर वसाहत भारतीयांबरोबर राहू शकत नसेल तर नाताळमध्ये यापुढे आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांची आयात बंद करण्यात यावी

कमीतकमी काही काळासाठी तरी. आपले निवेदक नम्रपणे परंतु ठामपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितात की एका पक्षाला सर्व लाभ द्यायला आणि दुसऱ्या गरजवंत पक्षाला किमान लाभ द्यायला आमचा प्रखर विरोध आहे. [वरीलप्रमाणे]

इतकंच नाही तर ट्रान्सवालसारख्या परकीय राज्यातही जे भारतीय आपल्या खर्चानं स्वतः होऊन गेले त्यांच्यावर असा कर लावायचं साहस ट्रान्सवाल सरकारनं केलेलं नाही. तिथं केवळ एकदाच ३ पौंड १० शिलींग भरून परवाना घ्यावा लागतो आणि ही तरतूदही सम्राज्ञींच्या सरकारच्या विचाराधीन आहे. उलटपक्षी 'नाताळमधील परवाना शुल्क' वार्षिक आहे आणि त्या कराला बळी पडणारांच्या क्षमतेचा त्यात अगदीच विचार करण्यात आलेला नाही. तसंच तो कर वसूल न झाल्यास तातडीची सुनावणी करून करदात्याची संपत्ती जप्त करायची त्यात तरतूद आहे. अशा रीतीनं 'ही सर्व दुरुस्ती अतिशय किळसवाणी आहे.' परवान्याचं कलम स्पष्टपणे दंडाच्या स्वरूपाचं असल्यामुळे 'व्हाईसराय यांच्या १७ सप्टेंबरच्या पत्राच्या सीमेपलीकडे ही तरतूद जाणारी आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या जुलमी आणि अन्याय्य कलमांना मान्यता न द्यायची निवेदकांनी सम्राज्ञींच्या सरकारला प्रार्थना आणि विनंती केली.

याच वेळी भारतीयांनी भारताच्या व्हाईसरायनाही निवेदन पाठवलं. विधेयकातील दंडात्मक कलमाकडे लक्ष वेधत त्यांनी विनंती केली की जर परत पाठवायच्या सक्तीच्या कलमाचं पालन करण्यात आलं नाही व जर गुन्हेगारी कायद्याखाली कार्यवाही करायची अनुमती

नसेल तर करारातील अशा प्रकारच्या कलमाचा अंतर्भाव 'अगदीच हानिकारक जरी ठरणार नसेल तरी निरुपयोगी मात्र ठरेलच.' कारण त्यामुळे करार करणाऱ्या पक्षाला करारभंग करायचा मोह होईल आणि कायद्याला तिकडे दुर्लक्ष करावं लागेल. 'आणि अशा प्रकारची आत्यंतिक काळजी करारातील अन्याय गृहीत धरत असल्यामुळे आपले निवेदक आपल्याला विनंतीपूर्वक सांगू इच्छितात की ही बंधनं आणण्यासाठी जी कारणं सांगण्यात आली आहेत ती पूर्णपणे अपर्याप्त आणि असमर्थनीय आहेत.

वसाहतीचे लोक या लोकांचा आधीच जास्तीत जास्त लाभ घेत आले आहेत. अजूनही आपल्या लहरीनुसार आणि इच्छेनुसार शक्य असेल तेवढा आणि कोणताही मोबदला न देता या लोकांचा अधिकात अधिक फायदा वसाहतीच्या लोकांना घ्यायचा आहे. तसा तो घेता यावा म्हणून सम्राज्ञींच्या सरकारच्या प्रजेला वास्तवात गुलामगिरीत ठेवणाऱ्या आणि त्यांच्यावर 'खास तिरस्करणीय परवाना कर' लावणाऱ्या तरतुदींविरुद्ध आपला विरोध नोंदवत निवेदकांनी सांगितलं की 'अशा प्रकरणी भारत सरकारनं आपला निर्णय घेताना 'वसाहतीच्या इच्छेचा' आपल्यावर प्रभाव पडू देऊ नये. समुद्रापलीकडील आपल्या प्रजेच्या हिताची जपणूक आधी करायला हवी.'

'पाच वर्षाच्या कराराचा काळ.... व्यतीत करायच्या दृष्टीनं फार मोठा असतो. तो पुन्हा अनिश्चित काळापर्यंत वाढवायचा अर्थ होईल जो भारतीय ३ पौंड परवाना कर देऊ शकणार नाही वा भारतात परतू इच्छिणार नाही त्यानं कायम गुलामगिरीत राहायला पाहिजे, आपल्या परिस्थितीत कधीही सुधारणा करायची त्यानं अपेक्षा करायला नको, आपल्या झोपडीत, तटपुंज्या उत्पन्नात, फाटक्या कपड्यात बदल करून चांगल्या घराचा, सुग्रास जेवणाचा आणि नीटनेटक्या कपड्यांचा विचारसुद्धा त्यानं कधीच करू नये. त्यानं आपल्या इच्छेप्रमाणे मुलांना शिक्षण द्यायचा अथवा आपल्या बायकोला थोडं सुख द्यायचा वा तिची करमणूक करायचा विचार करू नये. आपले निवेदक विनंती करू इच्छितात की यापेक्षा भारतातील उपासमार होऊ

शकायची अवस्था असलेल्या परंतु नातेवाईक आणि मित्र यांच्यामधील त्याचं स्वतंत्र जीवन केव्हाही इष्ट राहील. त्या परिस्थितीत भारतीयाला आपलं जीवन कधी तरी सुधारण्याची अपेक्षा करता येईल, परंतु या परिस्थितीत कधीच नाही.' [सन्माननीय महोदय लॉर्ड एल्गिन, व्हाईसराय आणि गव्हर्नर जनरल भारत यांना नाताळमधील भारतीय समाजाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या अब्दुल हाजी आदम आणि इतर अनेकांतर्फे निवेदन, दिनांक ऑगस्ट ११, १८९५] अशा प्रकारचा हेतू आप्रवासाला कधीच उत्तेजन देऊ शकत नाही.

अखेरीस त्यांनी प्रार्थना केली की अशा प्रकारच्या आक्षेपार्ह व्यवस्थेशिवाय आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांना वसाहत मान्यता देऊ इच्छीत नसेल तर व्हाईसरायनी नाताळमध्ये आप्रवासी भारतीय बंधुआ मजूर पाठवणं कायमचं बंद करावं.

ही प्रार्थना पालथ्या घागरीवरील पाण्यासारखी झाली. नाताळमध्ये नवीन आप्रवासी विधेयक मांडण्यात आल्यानंतर भारत मंत्र्यांनी मे २३, १८९५ला ते विधेयक भारत सरकारकडे मतप्रदर्शनार्थ पाठवलं. भारत सरकारच्या सप्टेंबर १७, १८९४च्या पत्रातील अटींचा ढोबळमानानं विधेयकात समावेश करण्यात आलेला आहे असं भारत सरकार आणि त्याच्या अधिकाऱ्यांचं मत होतं असं आढळून येतं. परंतु व्हाईसराय यांच्या कार्यकारिणीचे सदस्य सर ऑर्थर मॅकेन्झी यांनी 'मालक वर्गानं निवडलेल्या मंडळाकडे संरक्षकाचं काम सोपवायची विधेयकात जी तरतूद होती' तिच्यावर जोरदार आक्षेप घेतला. इतर अधिकाऱ्यांचं त्याउलट मत होतं. उलटपक्षी एका अधिकाऱ्याचं मत होतं की 'दोन्ही प्रकारच्या अधिकरणांची निवड नाताळच करत असल्यामुळे' प्रस्तावित विधेयकाला विरोध करायचं काही कारण नाही. परंतु सर ऑर्थर मॅकेन्झी यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केलं की 'या तरतुदीशिवाय इतर सर्व तरतुदी आपल्याला मान्य आहेत असं आपण वसाहत मंत्र्यांना लिहू शकतो.'

विधेयकाच्या मसुद्यातील कलम सहामधील खास कराविरुद्ध कोणीच आवाज उठवला नाही. 'वसाहत मंत्र्यांची इच्छा आपण ही योजना सुचवू नये अशी जरी होती तरी आपण स्वतःच

ती सुचवली आहे. त्यामुळे या कराच्या तत्त्वाला आपण विरोध करावा असं माझं मत नाहीं' अशी एका अधिकाऱ्यानं त्यावर नोंद केली.

याच अधिकाऱ्यानं मत दिलं की 'मुक्त भारतीय म्हणून वसाहतीत राहणं परवडणारं नाही असं कुलीला वाटावं असा या कराचा उद्देश असल्यामुळे कराच्या रकमेची आपण चौकशी करत बसू नये.' एक सूचना अशी करण्यात आली होती की यासंबंधी बंगाल आणि मद्रास सरकारचं मत घेण्यात यावं. परंतु 'या तत्त्वाला आधीच त्यांनी संमती दिली आहे' असं म्हणून सर ऑर्थर यांनी ती फेटाळून लावली.

भारत मंत्री लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांना जुलै ३०, १८९५ला भारत सरकारनं पाठवलेल्या पत्रात या विषयाबाबत मौन पाळण्यात आलं होतं. परंतु आप्रवाशांच्या संरक्षकाकडे असलेले काही अधिकार आणि कर्तव्य काढून घेऊन ते आप्रवासी विश्वस्त मंडळाकडे सोपवायच्या विधेयकातील प्रावधानाला त्यातून जोरदार विरोध करण्यात आला होता.

१८७४च्या आप्रवासी विश्वस्त कायद्यानुसार विश्वस्त मंडळाच्या कार्याची संपूर्ण जबाबदारी आप्रवासी भारतीयांच्या निधीकडे लक्ष पुरवणाऱ्या प्रशासनावर होती असं आढळून येतं. आप्रवासी कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करायची जबाबदारी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करून त्याच्याकडे सोपवण्यात यावी तसंच इस्टेटीसाठी वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी असं १८९१च्या कायदा क्रमांक २५अन्वये ठरवण्यात आलं. त्याचबरोबर राज्यपालांच्या संमतीनं काही नियमात परिवर्तन करायचा वा नवीन नियम करायचा अधिकारही त्यांना देण्यात आला. अशा रीतीनं या प्रस्तावित विधेयकातील काही कलमातील तरतुदीनुसार काही अधिकार आणि कर्तव्ये संरक्षकाकडून काढून घेतले जाऊन ते विश्वस्त मंडळाकडे जातील. त्यामुळे आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांच्या कल्याणावर विपरीत परिणाम होईल.

त्याशिवाय १८७४चा कायदा क्रमांक २०अन्वये मंडळात आप्रवासी संरक्षक आणि राज्यपालांतर्फे निवडलेले दोन सदस्य असत. यातील एक शासकीय अधिकारी असणं

आवश्यक होतं. त्या कायद्यावर भारत सरकारनं आक्षेप घेतल्यामुळे त्या कायद्यात १८८०चा कायदा क्रमांक ३६ आणि १८९४ चा कायदा क्रमांक ३७नुसार दुरुस्ती करण्यात आली होती. 'त्यासंबंधी आमचा सल्लाही घेण्यात आला नव्हता आणि त्यांच्या प्रतीही आम्हाला पाठवण्यात आल्या नव्हत्या.' आता त्यातही दुरुस्ती सुचवण्यात येत आहे. या दुरुस्तीनुसार आप्रवासी बंधुआ मजुरांच्या मालकांकडूनच आप्रवासी विश्वस्त मंडळाचे सदस्य निवडल्या जातील.

अशा रीतीनं तयार करण्यात आलेल्या मंडळाकडे मागील परिच्छेदात उल्लेखिण्यात आलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य सोपवायला आमचा तीव्र विरोध आहे आणि त्यामुळे विधेयकाच्या मसुद्यातील आप्रवाशांच्या संरक्षकाच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य यांच्या संबंधित असलेल्या वरील परिच्छेदांना मान्यता द्यायला आम्ही असमर्थ आहोत. [भारत सरकार, सिमला अभिलेखागार, फाईल क्रमांक ३४/१८९५, महसूल आणि कृषी विभाग, आप्रवासाचा कार्यक्रम क्रमांक ५ आणि ६, ऑगस्ट]

उंट गिळल्यानंतर चिलटाबद्दल काळजी करत बसण्यासारखं हे होतं. या आक्षेपाकडे दुर्लक्ष करण्यात आलं.

लंडन येथील स्टारनं आप्रवासी कायद्यात दुरुस्ती सुचवणाऱ्या नवीन विधेयकाचा निषेध करत लिहिलं की या विधेयकामुळे 'आप्रवासी भारतीय वास्तवात गुलामगिरीत ढकलले जाणार आहेत' आणि 'ब्रिटिश भारतीय प्रजेचा घृणास्पद पद्धतीनं छळ करण्यात येतो.... ही गोष्ट राक्षसी आहे, तो ब्रिटिश प्रजेचा अपमान आहे, आणि ते तयार करणारांसाठी ती लज्जास्पद गोष्ट आहे आणि आपलाच उपमर्द करणारं हे विधेयक आहे.' [गांधीजींनी ऑक्टोबर २६, १८९६ ला मद्रास येथील महाजन सभेतील भाषणात उद्धृत केलं.] *द टाईम्सनं* भारतीयांच्या प्रार्थनेला पाठिंबा देत लिहिलं की 'आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांच्या सध्याच्या कल्याणाविषयी आणि भविष्यकालीन दर्जाविषयी आवश्यक आश्वासन मिळेपर्यंत भारत सरकारनं ब्रिटिश साम्राज्यांतर्गत नसलेल्या इतर राष्ट्रांमध्ये आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांना पाठवणं ज्याप्रमाणे स्थगित केलं त्याप्रमाणे दक्षिण

आफ्रिकेत भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांना पाठवणं स्थगित करावं.' दोन्ही बाजूंनी 'सामंजस्याचं आणि तडजोडीचं वर्तन करावं' म्हणून द टाईम्सला पुढं लिहिणं भाग पडलं की:

.... परंतु ब्रिटिश प्रजेला असलेल्या हक्काप्रमाणेच भारतीय वंशाच्या लोकांनाही साम्राज्याच्या सर्व भागात व्यापाराचा आणि काम करायचा अधिकार आहे ह्या तत्त्वाला इंग्लंडमधील सम्राज्ञींच्या सरकारनंही स्पष्टपणे मान्यता दिलेली आहे आणि याच तत्त्वानुसार भारतातील प्रत्येक वर्गाकडून व्यापक प्रमाणात करण्यात येणाऱ्या मागणीप्रमाणे उपाययोजना करण्यासाठी भारत सरकारवर दडपण येऊ शकतं. [गांधीजींनी ऑक्टोबर २६, १८९६ ला मद्रास येथील महाजन सभेतील भाषणात उद्धृत केलं]

त्यावेळी भारत सरकारची अशी काही घडण झालेली होती की भारत सरकारकडून अशी अपेक्षा करणं व्यर्थ होतं. नाताळमधील भारतीयांनी आप्रवासी कायदा दुरुस्ती विधेयकावर घेतलेल्या आक्षेपासंबंधी केलेल्या निवेदनावर विचार करण्यासाठी वेळ देत नोव्हेंबर १४, १८९५ला वसाहत मंत्र्यांनी लॉर्ड एल्गिन यांना भारत सरकारनं विधेयकासंबंधी घेतलेल्या भूमिकेचा पुनर्विचार करण्यासाठी लिहिलं. मध्यंतरीच्या काळात व्हाईसरायना कळवण्यात आलं की सम्राज्ञींच्या अनुमतीसाठी आलेल्या विधेयकावरील विचार स्थगित करण्यात आलेला आहे. २२ जानेवारी १८९६ला लॉर्ड एल्गिन यांनी दिलेल्या उत्तरानंतर पुढील विचारासाठी कोणताच वाव ठेवला नव्हता. भारत सरकारनं आपल्या आधीच्याच भूमिकेवर स्थिर राहत लिहिलं :

ज्या भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांना नाताळमध्ये कायम वास्तव्य करायचं असेल त्यांच्यावर कर लावायच्या तत्त्वाला संपूर्ण परिस्थितीचा विचार करून मान्यता देण्यात आली होती आणि त्यावर पुनर्विचार करायची आम्हाला अगदीच आवश्यकता वाटत नाही. सम्राज्ञींच्या प्रजेला साम्राज्यातील कोणत्याही भागात राहण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी काही कर द्यावा लागावा की लागू नये या प्रश्नाचा विचार करायचं काम आमच्यापेक्षा सम्राज्ञींच्या सरकारचं आहे असं आमचं मत आहे.

पत्रात पुढं लिहिण्यात आलं होतं :

आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांचा कराराचा काळ संपल्यानंतर त्यांना जवळपास बळजबरीनं भारतात पाठवण्यात आल्यामुळे भारताच्या भूमीवरील अतिरिक्त लोकसंख्येच्या ओझ्याच्या समस्येला उत्तर मिळणार नाही हे खरं आहे. परंतु दुसऱ्या बाजूनं विचार करता अशा प्रकारचे भारतीय वसाहतीत कायम वास्तव्य करू लागले तर त्यांनी वाचवलेला पैसा भारतात येण्याऐवजी वसाहतीतच राहील; वसाहतीत जन्मणाऱ्या भारतीयांमुळे आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांची मागणी कमी व्हायची प्रवृत्ती राहील आणि त्यामुळे या देशातील लोकसंख्येचा प्रश्न सोडवण्यासाठी जी मदत होईल ती तात्पुरती राहील; उलटपक्षी जे भारतीय भारतात परततील ते सामान्यपणे बऱ्या परिस्थितीतील असतील आणि भविष्यात ते आपल्या जन्मभूमीवर ओझं होणार नाहीत आणि या वसाहतीला भारभूत झालेल्या बंधुआ मजुरांची जागा नव्यानं आलेले बंधुआ मजुर घेतील.

व्हाईसरायच्या पत्राचा समारोप असा करण्यात आला होता :

वास्तव्य करू इच्छिणाऱ्या आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांवरील प्रस्तावित वार्षिक कराला पर्याय एकच आहे आणि तो म्हणजे भारतातून नाताळमध्ये आप्रवासी बंधुआ मजूर पाठवणं पूर्णपणे बंद करणं. ही गोष्ट या देशासाठी अजूनच हानिकारक होईल असा आमचा विश्वास आहे. [भारताच्या गव्हर्नर जनरल यांनी वसाहत मंत्र्यांना पाठवलेलं पत्र क्रमांक ५, कलकत्ता, जानेवारी २२, १८९६]

संपूर्ण देशात आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांची मागणी सतत वाढत असल्याची भारत सरकारला कल्पना होती तसंच भारत सरकारनं बंधुआ मजुरांची निर्यात पूर्णपणे बंद केल्यास नाताळची अर्थव्यवस्था डबघाईस येईल अशी भीती सर्वत्र व्यक्त केली जात असतानाही हे विधान करण्यात आलं होतं !

ऑगस्ट १८, १८९६ला नवीन आप्रवासी भारतीय कायदा दुरुस्ती विधेयकाला सम्राज्ञींची मंजुरी मिळाल्यानंतर तो कायदा झाल्याचं घोषित करण्यात आलं.

९

भारतीय आप्रवासी विश्वस्त मंडळाची कार्यकक्षा वाढवणाऱ्या विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाची नाताळ विधान परिषदेत सुरुवात करताना महाधिवक्ता म्हणाले,

'संरक्षकाला अतिरिक्त अधिकार मिळणार असल्यामुळे त्याचा मंडळाशी अगदीच संबंधित नसणं ही गोष्ट सर्व पक्षांच्या हिताची आहे.... संरक्षकावर संपूर्ण वसाहतीची जबाबदारी आहे, केवळ एखाद्या विशिष्ट वर्गाची नाही. तो देशाला जबाबदार आहे, केवळ मंडळाला नाही, तो भारत सरकारला जबाबदार आहे, केवळ विश्वस्त मंडळाला नाही. त्याच्यावर या वसाहतीत येणाऱ्या भारतीय प्रजेच्या हिताचं रक्षण करून वसाहतीत आणि भारत सरकार यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करायची जबाबदारी आहे. [*नाताळ मर्क्युरी*, जुलै ७, १८९४]

परंतु मुळातच अमानवीय असलेल्या व्यवस्थेला कोणतीही उपाययोजना केली तरी मानवीय बनवता येऊ शकत नाही. आप्रवासी बंधुआ मजुरांविषयीचा कायदा आणि त्यातील अनेक तरतुदी मुळातच अशा होत्या की संरक्षक कितीही परोपकारी आणि दयाळू असला तरी त्याला आपल्या विवेकानुसार आपली जबाबदारी पार पाडता येऊ शकत नव्हती. त्यामुळे महाधिवक्ता यांनी उच्चारलेले शब्द केवळ शब्दच राहिले.

संरक्षकाची जबाबदारी जर भारत सरकारप्रती होती तर मग महाधिवक्ता म्हणाल्याप्रमाणे 'वसाहतीत यायची परवानगी दिलेल्या सर्व भारतीय प्रजेच्या कल्याणाची काळजी घेऊन भारत सरकारशी उत्तम संबंध ठेवणं हे त्याचं कर्तव्य ठरलं असतं.' तसं होतं तर मग एखाद्या भारतीय नागरिकाची वा भारत सरकारनं नामित केलेल्या अधिकाऱ्याची निवड या पदासाठी करणं महाधिवक्त्यांचं कर्तव्य ठरत होतं. आपल्या पदाशी न्याय करता येण्यासाठी संरक्षकाला त्याच्या

संरक्षणाखाली असलेल्या लोकांच्या भाषा येणं वा त्यांच्याशी परिचित असणं आवश्यक होतं. परंतु उलटपक्षी व्यक्तिशः मनमिळाऊ असलेले संरक्षक श्रीयुत मॅसन हे दक्षिण आफ्रिकी गोरे होते. नाताळ सरकारनं नियुक्ती केलेले आणि आपल्या संरक्षणाखाली असलेल्या लोकांची हिंदुस्तानी वा तामिळ वा अन्य कोणत्याही भारतीय भाषेशी पूर्णपणे अपरिचित असलेले श्रीयुत मॅसन हे बूट आयोगाचे सदस्य होते. भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांसाठी कठोर कायद्याची उपाययोजना करायला भारत सरकारनं संमती द्यावी म्हणून भारत सरकारला समजावण्यासाठी या आयोगाला भारतात पाठवण्यात आलं होतं ! एक शल्यचिकित्सक बंधुआ मजुरांचे अधीक्षक होते. त्यांनी सुचवलं की 'संरक्षकाकडे अगदी कमीतकमी प्रतीच्या कुलीलाही सहजपणे जाता यायला हवं.' परंतु इस्टेटींवरील लोकांना कशा प्रकारची वागणूक मिळते हे पाहायला आणि त्यांच्या तक्रारी ऐकायला जेव्हा संरक्षक जायचे तेव्हा ते अनेकदा तिथल्या मालकाचं आतिथ्य स्वीकारायचे. 'एखाद्या गुन्हेगारावर खटला चालवणाऱ्या न्यायाधीशानं त्या गुन्हेगाराकडील आतिथ्याचा स्वीकार करण्यासारखं हे होतं' असं गांधीजींनी याचं वर्णन केलं होतं. [एम. के. गांधी, *द ग्रिव्हांसेस ऑफ द ब्रिटिश इंडियन्स इन साऊथ आफ्रिका* (भारतीय जनतेला विनंती), राजकोट येथून प्रकाशित, ऑगस्ट १४, १८९६]

विभागीय न्यायाधीशांसंबंधी जेवढं बोलावं तेवढं कमीच ठरेल. तुलनात्मकदृष्ट्या बोलायचं तर संरक्षक हा मालकांपासून स्वतंत्र तरी होता परंतु न्यायाधीश हा गुलामगिरीसम परिस्थितीचं समर्थन करणाऱ्या वातावरणात वाढलेला आणि वसाहतीच्या पूर्वग्रहांनी भरलेला होता. एवढंच नाही तर तोसुद्धा बंधुआ मजुराचा मालक असू शकत होता. बंधुआ मजुरानं ज्याच्या विरोधात तक्रार केलेली आहे अशा प्रकारच्या मालकाचा तो मित्र असू शकत होता. तो मालक त्या भागातील प्रभावी व्यक्ती असू शकत होता आणि न्यायाधीशावर तो सामाजिक दडपण आणू शकत होता.

ज्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्याला नेमण्यात आलं होतं त्या कायद्याची अंमलबजावणी तो एवढ्या जुलमीपणानं आणि बेफिकीर वृत्तीनं करायचा की त्यावर विश्वास

बसू नये. अनेकदा तसं करताना त्याचा संरक्षकाशी संघर्ष व्हायचा. संरक्षकाचे अधिकार अतिशय मर्यादित होते आणि त्यांची नीट व्याख्याही करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे संरक्षकाची परिस्थिती अतिशय विचित्र व्हायची.

उदाहरणार्थ उम्झिंटो येथे डी-हॉटमन या नावाचा एक कार्यकारी न्यायाधीश होता. माणसाच्या 'नैतिक सुधारणेसाठी' फटक्याच्या शिक्षेच्या शक्तीवर – 'विशेषतः त्या शिक्षेचा तपकिरी कातडीवर उपयोग करताना' – [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर १९, १८९६], त्यांची एवढी असीम श्रद्धा असायची की तिला गूढतेचं वलय आलं. एका नेटिव्हाचा जुना सदरा दुसऱ्या नेटिव्हानं चोरल्याबद्दल त्याला १० फटके आणि १ महिन्याची शिक्षा त्यांनी सुनावली होती. जुन्या जोड्यांचा जोड चोरल्याबद्दल एकाला आणि मालकाचा साबण चोरल्याबद्दल दुसऱ्याला त्यांनी तशीच शिक्षा सुनावली होती. त्याच्या शिक्षा ठोठावण्याच्या राक्षसी प्रकारानं धक्का बसून 'अशा प्रकरणी गुन्हेगार गोरा माणूस वा मुलगा असता तरीही अशीच शिक्षा करण्यात आली असती काय' असं नाताळ मर्क्युरीलाही विचारणं भाग पडलं होतं. अति उत्साही न्यायाधीश महोदय, आपण 'न्यायाधीश म्हणून आपल्या अधिकाराचा कसा उपयोग करतात यावर जनता बारकाईनं लक्ष ठेवते आहे हे ध्यानात घ्यावं असंही त्यांना सांगण्यात आलं. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर १९, १८९६]

स्मिथ स्ट्रीटवर राहणाऱ्या ए. पॉटर नावाच्या बेकरनं एका टांगेवाल्याविरुद्ध तो फरारी झाल्याबद्दल सप्टेंबर ७, १८९६ला न्यायाधीशांकडे तक्रार केली. टांगेवाल्यानं आपल्या मालकाविरुद्ध संरक्षकाकडे तक्रार केली होती. संरक्षकानं ती तक्रार पीस ऑफ ॲक्शनच्या क्लर्ककडे पाठवली. तक्रार नोंदवल्यानंतर त्या माणसाला आपल्या मालकाकडे परतायचा आदेश देण्यात आला. त्यानं नकार दिला. तो म्हणाला की मी जर माझ्या मालकाकडे परत गेलो तर माझा मालक मला चोरीच्या आरोपाखाली गुंतवील. संरक्षकाच्या कारकुनानं त्याला परवाना दिला आणि त्याची मुदत तीन दिवसांसाठी वाढवण्यात आली.

अनेकदा घडतं त्याप्रमाणे पीस ऑफ ॲक्शनच्या क्लर्कनं त्याच्यावर तीन दिवस कोणतीच कार्यवाही केली नाही. मध्यंतरीच्या काळात परवानगीशिवाय अनुपस्थित असल्याच्या कारणासाठी मालकानं नोकराला अटक करायला लावली.

श्रीयुत डी-हॉटमन यांच्यासमोर आरोपीला उभं करण्यात आल्यानंतर आरोपीनं आपण फरारी झाल्याचं मान्य केलं परंतु त्याचबरोबर त्यानं हेही सांगितलं की मालकानं मला मारहाण केली आणि त्याच्याकडे नोकरी करायची आता मला भीती वाटते. न्यायाधीशानं मालकाला मारहाणीच्या कारणासाठी 'तांत्रिकदृष्ट्या' अपराधी ठरवलं आणि त्याला ५ शिलींग दंड केला. त्यानंतर मालकानं नोकराविरुद्ध केलेली तक्रार विचारार्थ घेण्यात आली.

संरक्षक न्यायालयात हजर झाला आणि त्यानं भारतीयाच्या बाजूनं साक्ष दिली. त्यानं सांगितलं की आरोपीला अटक होऊ नये म्हणून मी त्याला तीन दिवसांचा परवाना दिला होता. त्यामुळे मालकाच्या कामावर उपस्थित न राहण्याबद्दल आरोपीला अटक करायच्या हुकुमाची अंमलबजावणी त्याच्या तक्रारीचा निकाल लागेपर्यंत करण्यात आली नाही आणि पोलिसांना संरक्षकाच्या कार्यालयाच्या आवारात त्याला अटक करायचा अधिकार नव्हता.

न्यायाधीशांनी निर्णय दिला की संरक्षकाला परवाने द्यायचा कोणताच अधिकार नाही व जो परवाना द्यायची त्यानं सूचना दिली होती तो परवाना कैद्याच्या अनुपस्थितीला लागू होत नाही. त्यांनी कैद्याला अपराधी ठरवलं परंतु सर्व परिस्थितीचा विचार करून त्याला केवळ ताकीद देऊन सोडून दिलं. कैद्याला मालकाकडे परत जाऊन कामावर जायचा हुकूम देण्यात आला.

पेचात सापडल्यामुळे संरक्षकानं कार्यकारी न्यायाधीशाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. संरक्षकाच्या अधिकारक्षेत्राविषयी ही जी विचित्र अवस्था निर्माण झाली होती तिच्यावर भाष्य करताना नाताळ मर्क्युरीनं लिहिलं:

त्यानं जर भारतीय बंधुआ मजुरांच्या तक्रारी ऐकायला नकार दिला तर सर्व लोक त्याला अमानुष म्हणतील व जर त्यानं कुलींची बाजू घेतली तर त्यानं आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर काम केलं असा न्यायमंडळाकडून त्याच्यावर जोरदार ठपका ठेवण्यात येतो. [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर २, १८९६]

चुकीच्या कलमाखाली आरोप करण्यात आलेला असल्यामुळे शिक्षा रद्द करावी असा सर न्यायाधीशांनी निर्णय दिला. त्यांचे सहकारी सर वॉल्टर रॅग्ज यांनी संरक्षकाच्या कृतीचं वर्णन 'अधिकारबाह्य, अरेरावीचं' आणि 'न्यायालयाच्या न्यायप्रक्रियेत बाधा आणणारं' असं केलं आणि सांगितलं की कायद्यानं संरक्षकाला भारतीयाला परवाना द्यायचा अधिकार दिलेला नाही व त्यामुळे त्यानं केलेली कृती बेकायदेशीर आहे. न्यायाधीश श्रीयुत टर्नबुल यांनी या मताला सहमती दर्शवली.

याप्रमाणे टांगेवाल्याला देण्यात आलेली शिक्षा रद्द करण्यात आली. परंतु त्याला आणि त्याच्याबरोबर काम करणाराला मालकाकडे परतायचा आदेश देण्यात आला. मालकाच्या कोपापासून टांगेवाल्याला वाचवण्यासाठी संरक्षकानं मालकाला कळवलं की १८९१ कायदा क्रमांक ९५च्या ९४व्या कलमान्वये राज्यपालांच्या संमतीनं मी दोन बंधुआ मजुरांची तुमच्याकडील सेवा करायचा करार रद्द करून दुसऱ्या मालकाकडे त्यांची बदली करतो आहे. त्यानुसार मारहाण झालेल्या मजुरानं काम सोडलं. दुसरा माणूस आधीच पळून गेलेला होता. त्याला पकडून फरारी होण्यासाठी एका आठवड्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

राज्यपालांच्या विशेषाधिकाराचा आधार घेऊन या प्रकरणी संरक्षक आपल्या संरक्षणातील एकाला वाचवू शकला होता. परंतु हे करणंही त्याला प्रत्येक प्रकरणी शक्य होत होतंच असं नाही. आप्रवासी कायद्याची चुकीच्या अंलबजावणीची वाढती प्रकरणं पाहून सर्वोच्च न्यायालयही स्तंभित झालं होतं.

१८९६च्या नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात इ.ए. हॉकरवर्थ यांच्या बेनेव्हा इस्टेटीवरील गप्पी गौनडन, नाराण सामी आणि अनेक भारतीयांना सामुहिकपणे काम बंद करून उम्झिंटो येथे जाण्यासाठी ऑक्टोबर ४ला अटक करण्यात येऊन उम्झिंटो न्यायालयाच्या श्रीयुत मॅकलॉरिन यांच्यासमोर १८९१च्या कायदा क्रमांक २५च्या कलम १०१चा भंग करायच्या आरोपाखाली उभं करण्यात आलं.

आरोपाला उत्तर देताना त्यांनी सांगितलं की आम्ही आमच्याबरोबर काम करणाऱ्या एका सहकाऱ्याच्या शवयात्रेसाठी गेलो होतो. न्यायाधीशांनी गुन्हा मान्य अशी नोंद केली आणि त्यातील पहिल्या दोघांना दोन महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा केली आणि इतरांना प्रत्येकी १० शिलींग दंड केला.

शिक्षा करायचं कारण सांगताना न्यायाधीश म्हणाले की 'सामुहिकपणे इस्टेट सोडून संरक्षकाकडे तक्रार नोंदवण्यासाठी जायच्या आरोपाखाली प्रतिवादींना इथं आणण्यात आलं आहे.' त्याच्या आदल्या दिवशी भारतीय बंधुआ मजुरांनी इस्टेटीवर मालकाचा हुकूम मानला नव्हता आणि सरदारला मारहाण करण्यासाठी दोघांना अटक करण्यात आली होती. 'बंधुआ मजूर जरी वेगळ्या कामासाठी आपण गेलो होतो असं दाखवत असले तरी न्यायाधीशांच्या कार्यालयात तक्रार करण्यासाठी ते मोठ्या संख्येत गेले होते यात काही संशय नाही.' [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर १२, १८९६]

भारतीयांनी पुढील कारणासाठी सर्वोच्च न्यायालयात निकाल बदलवण्यासाठी अर्ज केला:

(अ) कलम १०१ खाली आरोप करण्यात आला असेल तर आरोप चुकीचा आहे. ४ ऑक्टोबर रविवार असल्यामुळे भारतीय बंधुआ मजुरांना कामावरून सुटी होती. त्यामुळे अशा दिवशी ते कामावरून 'गैरहजर असल्याचा आरोप करता येऊ शकत नाही; (ब) आरोपी आपल्या मालकाविरुद्ध तक्रार करण्यासाठी कामावरून गैरहजर होता वा तक्रार करायच्या निमित्तानं

कामावरून गैरहजर होता अशी तक्रारही नाही आणि तसं पुराव्यावरूनही आढळून येत नाही आणि त्यामुळे तो कलम १०१ अन्वये अपराधी ठरू शकत नाही; (क) आरोपी उम्झिंटो येथे आपल्या एका सहकाऱ्याच्या शवयात्रेसाठी गेले होते हे सत्य न्यायाधीशांनी नोंदवायला पाहिजे होतं; (ड) आणि अपराध केल्याचं मान्य करणं याचा साधा अर्थ केवळ इस्टेटीवरून गैरहजर होतो व ह्या अपराधासाठी कलम ३१ अन्वयेच कार्यवाही करता येऊ शकते. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर १२, १८९६]

मालकाचे वकील श्रीयुत पिचर यांनी युक्तिवाद केला की 'न्यायाधीशांनी निष्कर्ष काढताना आपल्या अशा काही माहितीचा उपयोग केला की जिची नोंद त्यांनी केलेली नाही' आणि 'कार्यवाही कलम ३१ अन्वये केली हे न दाखवायची त्यांच्याकडून चूक झालेली आहे.' आश्चर्यचकित होऊन सर वॉल्टर रॅग्ज उद्‌गारले:

'धक्कादायक! तुम्ही अशी नोंद कुठं पाहिली आहे काय?'

सर न्यायाधीश : 'श्रीयुत हाक्सवर्थ यांनी आरोपाच्या पुष्ट्यर्थ कोणताच पुरावा दिलेला नाही.'

श्रीयुत पिचर : 'त्यांनी अपराध मान्य आहे म्हणून सांगितलं होतं.'

सर न्यायाधीश : अशा कोणत्या तरी गोष्टीसाठी की जो गुन्हा आहे.

श्रीयुत मॉरकॉम : त्यांनी सांगितलं होतं की रजेशिवाय आम्ही अनुपस्थित होतो आणि श्रीयुत हाक्सवर्थ यांनी त्याबद्दलच तक्रार केली होती.

सर वाल्टर रॅग्ज : समूहानं इस्टेट सोडणं हा काही अपराध नाही. ते बलूनमधून गेले असाही तुम्ही आरोप कराल.

सर न्यायाधीश : अनेक भारतीयांनी अपराध मान्य करावा ही त्यातही विचित्र गोष्ट आहे.

सर वाल्टर रॅग्ज : न्यायाधीशांनी केवळ चुकीचं कलमच लावलेलं नाही तर ते कलम चुकीच्या पद्धतीनं उद्धृत करून चूक केलेली आहे.

न्यायाधीश श्रीयुत मॅसन : त्यांनी तडकाफडकी सुनावणीला मान्यता दिल्याचंही त्यात नोंदवण्यात आलेलं नाही.

सर वाल्टर रॅग्ज : या लोकांना १५ दिवसांपासून अटकेत ठेवण्यात यावं ही भयानक गोष्ट आहे. न्यायाधीशाची चूक ही आहे की अशा प्रकारची प्रकरणं हाताळताना ते त्यांच्या कायद्याच्या पुस्तकाकडे पाहत नाहीत. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर १२, १८९६]

१०

एक असा क्षण येतो की ज्यानंतर चाबकाच्या फटक्यांचा धाकही निघून जातो. शिक्षेची कठोरता प्रत्यही वाढत असताना फरारी व्हायच्या प्रकरणात वाढच होत होती व त्याला तोंड देण्यासाठी ज्या रानटीपणाचा अवलंब करण्यात येत होता त्यामुळे तर युरोपिअनांनाही कसंसंच वाटायला लागलं होतं.

सप्टेंबर १८९६मध्ये डरबनमधील स्मिथ स्ट्रीटच्या रहिवाशांनी 'एका दयनीय कुलीला सर्व बळ एकवटून' दोन धष्टपुष्ट 'नेटिव्ह' पोलिसांच्या पकडीतून सुटका करून घ्यायची धडपड करताना पाहिलं. त्याला बळजबरीनं 'चार्लीच्या कोठडीवर' नेण्यात येत होतं. तिथं जायची त्याला भीती वाटत होती. ते दृश्य पाहणाऱ्या एका युरोपिअनानं नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये त्याचं वर्णन करत लिहिलं की ज्या पद्धतीनं ते 'क्रूर राक्षस' त्या कुलींना हाताळत होते ती पद्धती १९व्या शतकाच्या जागृतीच्या युगासाठी लज्जास्पद गोष्ट आहे. कुली *ओरडत आणि रडत होता व धडपडत होता आणि त्याला पकडणारांना सोडून द्यायची विनंती करत होता.... (तो) उड्या मारत सुटकेचा व्यर्थ प्रयत्न करत होता आणि अखेरीस थकून पडत होता. कायद्याचे ते दूत त्याला उभं करायचे आणि पुढं ढकलायचे - असं दिसत होतं की त्याला थोडाही विसावा घेऊ देणं त्यांच्या*

कार्यक्रमात बसत नव्हतं. 'चार्लीच्या त्या खास कोठडीवर' जायची कुलीला.... धास्ती वाटत होती हे पाहून नवल वाटेल. परंतु तिथं असं काही तरी भयानक असलं पाहिजे आणि हे काही तरी जोपर्यंत दूर होणार नाही तोपर्यंत कुलींचं फरारी होणं चालूच राहणार आहे.... [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, सप्टेंबर ४, १८९६]

असं दिसत होतं की तो मजूर तक्रार नोंदवायला आला होता. त्यानं मागितलेली मदत त्याला मिळाली नाही उलट त्याच्या तक्रारीची चौकशी सुरू असतानाच त्याला बळजबरीनं त्याच ठिकाणी जायला भाग पाडण्यात येत होतं जिथं जायचा त्यानं धसका घेतलेला होता. पत्र लेखकानं विचारलं की अशा अवस्थेत त्या माणसानं जर आत्महत्या केली तर 'जबाबदारीचं ओझं कोणाच्या खांद्यावर राहील?'

पुढील महिन्यात घडलेल्या एका दुःखद घटनेनं डरबनला पुन्हा एक जबर हादरा दिला. उम्झिंटो येथील रेनॉल्ड आणि कंपनीच्या ऊसाच्या मळ्यावर काम करणाऱ्या अनेक भारतीय बंधुआ मजुरांचा जो छळ होत होता त्याबद्दल ते आपला मालक आणि दिवाण यांच्याविरुद्ध तक्रार करण्यासाठी आले. संरक्षकानं त्यांच्या तक्रारी ऐकल्यानंतर त्यांना सम्राटांच्या वकिलाकडे पाठवलं. उम्झिंटो येथे उपस्थित राहण्याबद्दल त्यांच्यावर समन्स बजावण्यात आल्यानंतर उम्झिंटो येथे आपण गेलो तर आपल्याला परत त्याच इस्टेटीवर पाठवण्यात येईल अशी धास्ती वाटत असल्यामुळे त्यांनी समन्सला उत्तर द्यायचं नाकारलं. ऑक्टोबर सातला संरक्षक कार्यालयातील मुख्य कारकून श्रीयुत डेनिंग हे अनेक पोलीस शिपायांसह अटकेचा हुकूम घेऊन त्यांना उम्झिंटो न्यायालयात घेऊन जाण्यासाठी आले. ते अलिवाल स्ट्रीटवरील संरक्षकाच्या आवारात शिरत नाहीत तोच त्या सर्वांना एकत्र गोळा करण्यात येऊन किनाऱ्यावरील वाहनात पोहोचवण्यासाठी त्यांची गठडी बांधायला सांगण्यात आलं.

त्यांच्यातील आठ माणसांनी आपल्या कंबरेच्या लुंग्या सोडल्या व त्या गळ्याला बांधून पोलिसांच्या लक्षात यायच्या आधीच आवारातील झाडाच्या फांदीला अडकवल्या. त्यांच्या

लटकायच्या दृष्टीनं झाडाची फांदी फार खाली होती आणि तरीही त्यांनी जेव्हा तिच्यावर लटकायचा प्रयत्न केला तेव्हा भयानक दृश्य निर्माण झालं. त्यांची डोळ्याच्या खाचेतून बुबुळं बाहेर निघालेली होती, जिभा तोंडाबाहेर लोंबकळत होत्या. त्यांच्यातील बाया त्यांच्याभोवती किंचाळत आणि रडत गोळा झाल्या. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर ४, १८९६]

पण तेवढ्यातच संरक्षकाचा कारकून तिथं धावतच गेला आणि काही विपरीत घडायच्या आधीच त्यानं त्यांच्या गळ्याभोवतीचे फास सोडवले. पोलिसांनी त्यांना पकडून हातकड्या घालून न्यायचा प्रयत्न केला. 'भारतीयांनी स्वतःला जमिनीवर झोकून दिलं आणि ते एवढ्या जोरात रडू आणि धडपडू लागले की त्यांना हातकड्या घालायला काही वेळ लागला.' मध्यंतरीच्या काळात संरक्षकाच्या आवारात गर्दी गोळा झाली.

भारतीयांना काही शिव्या घालत होते तर काही त्यांच्याबद्दल कळवळा व्यक्त करत होते. अखेरीस त्या दोघांना जेव्हा एकत्रित हातकड्या घालण्यात आल्या तेव्हा चार नेटिव्ह पोलिसांनी त्यांना रेल्वे स्टेशनकडे न्यायचा प्रयत्न सुरू केला. त्यावेळी एक भारतीय एकीकडे ओढत होता तर दुसरा दुसरीकडे. त्यावेळी बाजूला उभा असलेला एक दर्शक ओरडला, 'तुम्ही याचं मनगट तोडून टाकाल.' भारतीयांना आवाराबाहेर नेल्यानंतरही त्यांची धडपड सुरूच होती आणि उचलून न्यायला अतिशय जड वाटल्यानं पोलिसांनी त्यांना तिथंच रस्त्यावर टाकून दिलं. रस्त्यावरील अणकुचीदार दगडांवर ते उघड्या पाठीवर आदळल्यामुळे ते अजूनच जोरात किंचाळू लागले. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर ४, १८९६]

त्यांना 'अर्धवट उचलत अर्धवट ढकलत' पोलीस स्टेशनसमोरून न्यायचा प्रयत्न सुरू असतानाच अधिक्षक अलेक्झँडर यांना ते दृश्य दिसलं. त्यांनी पोलिसांना 'अमानुष वर्तणूक' देणं थांबवायला सांगितलं. त्यांनतर त्या भारतीयांना रिक्षात बसवून रेल्वेनं उम्झिंटो येथे पाठवण्यात आलं.

अनेकदा परिस्थिती अतिशय चिघळल्यानंतरच तिच्यात परिवर्तन व्हायला सुरुवात होते. भारत सरकारनं नाताळमध्ये वास्तव्य करणाऱ्या माजी भारतीय बंधुआ मजुरावरील २५ पौंड निवासी कराला मान्यता द्यायला नकार दिला. परंतु नाताळ सरकारनं दरडोई ३ पौंड कर बसवून त्या सूचनेला बगल दिली. यामुळे नवरा, बायको आणि मुलं मिळून ८ लोकांच्या कुटुंबाला वार्षिक २४ पौंड कर द्यावा लागत होता. आणि हीच या प्रकरणाच्या शेवटाची सुरुवात ठरली. आता आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांना वाचा फुटली होती. त्याच्या आक्रोशाला दाबून टाकणं आता शक्य नव्हतं. क्रौर्याची प्रकरणं जसजशी बाहेर येऊ लागली तसतसे भारतातील आणि इंग्लंडमधील जनतेच्या विवेकाला हादरे तर बसू लागलेच पण दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांच्या वेदनाही त्यामुळे वाढू लागल्या. १९ वर्ष अविरत कठोर संघर्ष केल्यानंतर ३ पौंडांचा कराचा कायदा रद्द करण्यात आला. त्यानंतर बंधुआ मजुरांची व्यवस्था पूर्णपणे बंद करण्यासाठी भाग पाडायला भारत आणि इंग्लंडमधील आंदोलकांना सहा वर्ष लागली.

११

संघर्षात व्यस्त असतानाच बोअर गणराज्य, केप, झुलूलँड आणि अन्यत्र असलेल्या आपल्या लोकांच्या संपर्कात गांधीजी होते. जेव्हा केव्हा गरज पडायची तेव्हा त्यांच्या सेवेसाठी ते सदैव तत्पर असायचे.

दक्षिण आफ्रिकी गणराज्यानं १८८५चा कायदा क्रमांक ३ मंजूर केल्यापासूनच तिथं वास्तव्य करणारे ५,००० भारतीय व्यापारी, दुकानदार, गाडीवाले, फेरीवाले, स्वयंपाकी, वेटर आणि गणराज्यातील मजूर आदींचं भवितव्य धोकादायकपणे अधांतरी लटकत होतं. त्यांच्यातील बहुतेक जोहान्सबर्ग आणि प्रिटोरिया येथे होते. त्यापैकी २०० व्यापारी होते.

तीन भारतीय पेठा इंग्लंड, डरबन, पोर्ट एलिझाबेथ, भारत आणि इतर ठिकाणाहून सरळ माल मागवायच्या. जगातील इतरत्र असलेल्या त्यांच्या शाखा ट्रान्सवालमधील व्यापारावर

अवलंबून होत्या. किरकोळ विक्री करणाऱ्या दुकानदारांच्या विविध ठिकाणी शाखा असायच्या. जवळपास २००० फेरीवाले ठोक व्यापाऱ्यांकडून माल आणायचे आणि ठिकठिकाणी फिरून तो विकायचे. युरोपिअनांच्या घरात किरकोळ कामासाठी १५०० लोक नोकरीला होती. त्यातील जोहान्सबर्गमध्येच १००० लोक होते.

आपल्याला आठवतच असेल की ब्रिटिश सरकारनं आणि ट्रान्सवाल सरकारनं १८८५चा कायदा क्रमांक ३चा, ज्यात १८८६ साली दुरुस्ती करण्यात आली होती, वेगवेगळा अर्थ लावला होता. गणराज्यात भारतीयांना नागरिकत्वाचे अधिकार धारण करण्यापासून, स्थावर मालमत्ता मिळवण्यापासून वंचित करण्यात आलं होतं तसंच 'स्वच्छतेच्या कारणासाठी त्यांच्यासाठी ठरवण्यात आलेल्या वस्त्या, मोहल्ले आणि रस्तेसोडून इतरत्र राहण्यासाठी मनाई करण्यात आलेली होती.' या समस्येची सगळी निरगाठ होती 'नेटिव्ह' या शब्दाच्या अर्थात. प्रिटोरिया परिषदेत परिच्छेद २६मध्ये डच भाषेतील inborlingen हा जो शब्द वापरण्यात आला होता त्याचा अर्थ होत होता ट्रान्सवालमधील मूळचे रंगीत लोक. च्र्ह्ळद्ध bewoning या शब्दाचा डचांना 'निवास' असा अर्थ जाणवायचा, व्यापारातील देवघेव नाही.

ब्रिटिश सरकारचं म्हणणं होतं की कायदा क्रमांक ३ हा जरी लंडन परिषदेच्या घोषणेच्या परिच्छेद क्रमांक १४चा भंग करणारा होता तरी आम्ही त्या गोष्टीवर भर दिलेला नव्हता. आम्ही दुरुस्त केलेला कायदा 'स्वच्छता विषयक उपाययोजना' म्हणून मान्य केला होता. त्यामुळे ज्या व्यक्तींच्या बाबतीत स्वच्छताविषयक प्रश्न उपस्थित होत नव्हता त्यांना खास विभागात पाठवण्यासाठी तो कायदा लागू होत नाही. त्यामुळे उच्च जीवनमान असलेल्या ब्रिटिश भारतीय प्रजेच्या व्यापारी प्रतिष्ठानाच्या व निवासी जागांच्या बाबतीत या कायद्यातून सूट मिळायला हवी.

उलट दक्षिण आफ्रिकी गणराज्यानं तो कायदा 'आशियायी वंशाच्या सर्व लोकांना लागू केला. त्यामुळे त्यात 'तथाकथित कुली', अरब, मलय, चिनी, आणि तुर्कस्तानच्या साम्राज्यातील मुसलमानांचाही समावेश करण्यात आला. त्यांचं म्हणणं होतं की 'निवास' शब्दाच्या व्याख्येत

व्यापाराच्या जागेचा तसंच राहायच्या जागेचाही समावेश होतो. त्यामुळे सर्व भारतीयांनी कोणत्या वस्तीत राहावं अथवा व्यापार करावा हे सांगायचा आपल्याला अधिकार आहे.

सर हर्क्युलस रॉबिन्सन यांचाही ट्रान्सवाल सरकारच्या कार्यकारिणीसारखाच दृष्टिकोन होता. परंतु त्यांच्यानंतर आलेले सर हेन्री लॉच यांनी सर हर्क्युलस रॉबिन्सन

आणि सर डर्बी यांनी पाठवलेल्या पत्रव्यवहाराकडे दुर्लक्ष करत प्रिटोरिया परिषदेतील परिच्छेद २६चा मूळ मुद्दा पुन्हा उपस्थित केला. इस्माईल सुलेमान अँड कंपनीसंबंधी ट्रान्सवाल उच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाबद्दल दोन सरकारांमध्ये दीर्घ पत्रव्यवहार सुरू होता. परंतु कोणतीही तडजोड होऊ शकली नव्हती. या सर्व काळात आधीच सांगितलेल्या कारणांमुळे भारतीय व्यापाऱ्यांच्या नियंत्रणात परिस्थिती होती. सप्टेंबर ४, १८९३ला ट्रान्सवाल व्होल्क्सराडनं १८८६मध्ये दुरुस्त करण्यात आलेला १८८५चा जो कायदा क्रमांक ३ होता त्याला प्रभावित करणारा एक ठराव मंजूर केला. त्या ठरावानुसार 'या कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या सर्व आशियायी लोकांना *व्यापार आणि निवास या दोन्ही बाबतीत निर्धारित केलेल्या* वस्त्यांमध्येच राहायला लावण्यात येऊन त्या कायद्याचं काटेकोर पालन करण्यात यावं' असं म्हणण्यात आलं होतं. (तिरपी अक्षरं माझी) ज्यांनी वस्त्या निर्धारित व्हायच्या आधीच भाड्याच्या जागेचा विशिष्ट कालावधीसाठी करार केलेला असेल त्यांना त्यांचा कराराचा कालावधी संपेपर्यंत त्यातून वगळण्यात आलेलं होतं. त्यानंतर येणाऱ्या डिसेंबरमध्ये एका परिपत्रकाद्वारे हा ठराव सर्व राज्यपालांकडे पाठवण्यात आला.

भारतीय व्यापाऱ्यांच्या अस्तित्वावरच घाला घालण्यात आल्यामुळे त्यांनी ब्रिटिश सरकारकडे हस्तक्षेप करायची विनंती केली. व्होल्क्सराड सरकारनं केलेल्या कायद्याचा जो अर्थ लावला होता त्याला ब्रिटिश सरकारनं मान्यता द्यायला नकार दिलेला होता. अखेरीस त्यांनी १८८५चा कायदा क्रमांक ३, त्यात करण्यात आलेली दुरुस्ती व या सर्वांचा लावण्यात आलेला

अर्थ यांची वैधता ठरवण्यासाठी हा प्रश्न ऑरेंज फ्री स्टेटचे सर न्यायाधीश मेलियर्स डी व्हिलर्स यांच्या लवादाकडे सोपवायचं ठरवलं.

भारतीयांना व युरोपिअनांना समान हक्क देण्यात आल्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील लोकांच्या मनात सामान्यपणे भारतीयांबद्दल दुजाभाव होता आणि सर न्यायाधीशही त्याच मताचे असल्याचं सर्वांना माहीत होतं. त्यांनी ती गोष्ट कधीच लपवली नव्हती. ज्या ब्रिटिश भारतीय प्रजेचे हित धोक्यात आलेले होते त्यांचं या बाबतीत कोणतंच मत विचारात घेण्यात आलेलं नव्हतं. त्यामुळे त्यांनी लवादाचं तत्त्व आणि लवादासाठी निवडण्यात आलेली व्यक्ती या दोन्ही गोष्टींवर आधी प्रिटोरिया येथील ब्रिटिश प्रतिनिधीकडे मौखिक आणि नंतर केपटाऊन येथील उच्चायुक्तांकडे लेखी आक्षेप घेतला. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं.

भारतीयांच्या प्रश्नाच्या बाबतीत ब्रिटिशांनी जी परस्परविरोधी भूमिका घेतली होती त्याबद्दल वृत्तपत्रातून बरीच टीकाटिप्पणी झाली. नाताळ ॲडव्हरटाईझरच्या स्तंभलेखकानं मार्च ३, १८९५ला लिहिलं : आमच्या मते ट्रान्सवाल सरकारचा जो दृष्टिकोन आहे तसाच निर्णय घेतला गेला तर ब्रिटिश सरकारला खेद होणार नाही. या प्रश्नात भारत सरकारला रस आहे, वसाहतीच्या कार्यालयाला नाही. त्यामुळे लवादाकडे प्रश्न सोपवून आम्ही आमच्याकडून शक्य ते सर्व केलं आणि यापलीकडे आम्ही आता काही करू शकत नाही असं म्हणणं वसाहत कार्यालयाला सोयीस्कर वाटत असावं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च ३०, १८९५]

एप्रिल २, १८९५ला लवादानं आपला निर्णय दिला. त्यातून त्यांनी दोन्ही पक्षांचे दावे फेटाळून लावले. [लवादाकडे संबंधित पक्षांनी केलेले दावे असे होते : सम्राज्ञींच्या सरकारनं दावा केला की (अ) भारतीय आणि इतर आशियायी व्यापारी ब्रिटिश प्रजा असल्यामुळे त्यांना दक्षिण आफ्रिकेतील शहरात राहायची परवानगी देण्यात यावी. त्यासाठी स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून असे भाग ठरवता येऊ शकतील. (ब) त्यांना शहरातील कोणत्याही भागात दुकान लावून त्यांचा व्यापार अथवा व्यवसाय करू द्यायची परवानगी असावी. दक्षिण आफ्रिका सरकारचं म्हणणं होतं की (अ) दक्षिण आफ्रिकी गणराज्य सरकारला 'कुली, अरब, मलय आणि तुर्कस्तान साम्राज्याच्या मुसलमान प्रजेच्या' बाबतीत योग्य वाटेल त्याप्रमाणे नियम तयार करायचा पूर्ण अधिकार आहे. (ब) दक्षिण आफ्रिकी गणराज्य सरकारनं जेव्हा 'कुली, अरब, मलय आणि तुर्कस्तान साम्राज्याच्या मुसलमान प्रजेला' त्यांच्यासाठी

नियोजित केलेल्या वस्त्यांव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शहरात वा गावात दुकानं वा व्यापारी प्रतिष्ठानं उभारायची मनाई करायचा पूर्ण अधिकार आहे व त्यावर आक्षेप घ्यायचा सम्राज्ञींच्या सरकारला कोणताच अधिकार नाही. ट्रान्सवाल ब्लु बुक क्रमांक सीडी२२३९ (सीडी १६८४ च्यापुढे) पृष्ठ ३९, ऑगस्ट १९०४ मध्ये प्रकाशन : ब्रिटिश भारतीयांच्या ट्रान्सवालमधील स्थानाबद्दल पत्रव्यवहार, क्रमांक ४ : लिटलटनकडून व्हिस्काऊंट मिल्नर यांना दिनांक जुलै २०, १९०४] कायद्याचा अर्थ लावायचा अधिकार सम्राज्ञींच्या सरकारला आहे असं मार्च ३, १८९०च्या पत्रान्वये सर हेन्री लॉच यांनी जे मत मांडलं होतं ते लवादानं फेटाळलं. त्याचबरोबर व्होल्क्सराडचा सप्टेंबर ८, १८९३च्या प्रस्तावाचं जे परिपत्रक डिसेंबर १८९३ मध्ये राज्यपालांमध्ये वितरित करण्यात आलं होतं त्यावरही आक्षेप घेतला.

लवादाचं म्हणणं होतं की दक्षिण आफ्रिकी गणराज्याला १८८५चा कायदा अमलात आणायचा अधिकार आहे कारण इतर कारणं बाजूला ठेवली तरी त्यात करण्यात आलेल्या दुरुस्तीला ब्रिटिश सरकारनं 'कोणत्याही प्रकारच्या अटी आणि बंधनं यांच्याशिवाय' मान्यता दिलेली आहे. जेव्हा तो प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवण्यात आला होता तेव्हा त्या प्रस्तावावर आक्षेप घेता आला असता 'परंतु एकदा त्याला मान्यता देण्यात आल्यानंतर देशातील विधिमंडळांनी केलेल्या कोणत्याही कायद्याचा अर्थ लावायचा अधिकार त्या देशातील न्यायव्यवस्थेचा असतो या निर्विवाद तत्त्वाप्रमाणे ब्रिटिश सरकारवर तो कायदा मान्य करणं बंधनकारक आहे.' त्याचबरोबर ट्रान्सवाल सरकारवरही तो कायदा जसा आहे तसाच ठेवणं आणि त्यात कोणत्याही प्रकारचा बदल करणं वा त्याचा अर्थ न लावणं बंधनकारक आहे.

अशा प्रकारे व्होल्क्सराडचा १८८६चा ठरावही त्या निर्णयामुळे फेटाळला गेला. १८९३च्या ठरावाला वा दक्षिण आफ्रिकी सरकारनं त्या ठरावात बदल करण्यासाठी नेमलेल्या एखाद्या न्यायासनानं त्यात काही बदल केल्यास ब्रिटिश सरकारनं त्या ठरावाला वा बदलाला मान्यता दिलेली नसल्यामुळे आक्षेप घ्यायचा अधिकार आहे असा लवादानं निर्णय दिला. परंतु १८८५चा कायदा अमलात आणायचा तसंच दक्षिण आफ्रिकी गणराज्याच्या न्यायासनांनी त्या कायद्याचा जो अर्थ लावला तो ब्रिटिश सरकारनं मान्य करणं आवश्यक आहे. दोन्ही सरकारांना कायदा क्रमांक ३चा अर्थ लावायचा अधिकार नाही. तो विशेषाधिकार ट्रान्सवाल उच्च न्यायालयाचा

आहे. दुरुस्त करण्यात आलेल्या कायद्यानुसार ट्रान्सवाल सरकारचं कामकाज आहे की नाही हे पाहणं गणराज्याच्या उच्च न्यायालयाचं आहे. [*नाताळ मर्क्युरी*, डिसेंबर १२, १८९५]

आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार या परिस्थितीला आव्हान देता येऊ शकत नव्हतं. परंतु लवादाचा हा निर्णय कायदेशीर आणि तांत्रिकदृष्टीनं टिकाव धरू शकत असला तरी गांधीजींचं म्हणणं होतं की तो उघडउघड अतिशय अन्याय्य आहे आणि त्यामुळे हा प्रश्न मुत्सद्देगिरीच्या पातळीवर सोडवायची गांधीजींनी सम्राज्ञींच्या सरकारला विनंती केली. ब्रिटिश सरकारची जर इच्छा असेल तर भारतीयांसाठी अजूनही न्याय मिळवता येईल असं गांधीजींचं म्हणणं होतं.

परंतु नाताळ ॲडव्हरटाईझरची अटकळ बरोबर असेल तर हा 'जर' फार मोठा होता. निर्णय प्रकाशित झाल्यानंतर या वृत्तपत्रानं लिहिलं :

ब्रिटिश सरकारला लवादाच्या या निर्णयाचा खेद झाला नसण्याची शक्यता बरीच जास्त आहे. त्यामुळे त्यांची सर्व जबाबदाऱ्यातून सुटका होते आणि आता ते भारत सरकारला सांगू शकतात की या प्रकरणी आम्हाला शक्य होतं ते सर्व आम्ही केलं आणि आता दक्षिण आफ्रिकेत जे काही घडतं ते घडत राहू द्यायला हवं. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल ११, १८९५]

परंतु ब्रिटिशांच्या सौजन्यावरील गांधीजींच्या विश्वासाची ती पहाट होती. सैतानाच्या आगमनाच्या भाकिताला न घाबरता निर्णय जाहीर होताच प्रिटोरिया येथील ब्रिटिश प्रतिनिधी सर जॅकोबस डी वेट यांना या निर्णयाच्या वैधतेला आव्हान देणारं एक निवेदन गांधीजींनी दिलं. लंडनशी संपर्क करून निवेदनात घेण्यात आलेल्या आक्षेपांच्या दृष्टिकोनातून सम्राज्ञींचं सरकार या निर्णयाला मूक संमती देणार आहे काय असं विचारायची गांधीजींनी त्यांना विनंती केली. [सम्राज्ञींच्या सरकारचे प्रतिनिधी सर जॅकोबस डी वेट, के. सी. एम. जी. प्रिटोरिया यांना तैय्यब हाजी खान महम्मद, अब्दुल गनी आणि हाजी हबीब हाजी दादा यांच्याकडून निवेदन, दिनांक एप्रिल १६, १८९५]

त्यानंतर लगेच त्यांनी ब्रिटिश सरकारकडे अर्ज केला. ह्या अर्जात कायदा क्रमांक तीनशिवायही भारतीयांना सहन कराव्या लागणाऱ्या सर्व भयानक अडचणींची नोंद करण्यात

आलेली होती. तो अर्ज १४ मेनंतर सादर करण्यात आला होता व सर जॅकोबस डी वेट यांनी तो अर्ज केपटाऊन येथील उच्चायुक्तांना मे ३०, १८९५ला पाठवला. त्यात निर्णयाच्याबाबतीत पुढील मुद्यांवर आक्षेप घेतला होता.

१. ऑरेंज फ्री स्टेटचे मुख्य न्यायाधीश यांचा भारतीयांविरुद्धचा आकस प्रसिद्ध आहे. त्यामुळे त्यांनी प्रयत्न जरी केला असता तरी यापेक्षा ते वेगळं काही करू शकले नसते. या प्रश्नासंबंधी न्याय्य आणि समतोल भूमिका घेण्यासाठी प्रकरणातील तथ्यांचं योग्य आकलन होणं आवश्यक आहे. 'आपल्या पूर्वज्ञानाचा खटल्याच्या निकालावर अनाहूतपणे परिणाम होऊ नये म्हणून खटल्याचं पूर्वज्ञान असल्यास न्यायाधीश खटल्यापासून दूर राहायचा प्रयत्न करत असतात.' [सम्राज्ञींच्या सरकारचे वसाहत विभागाचे मुख्य सचिव मान्यवर महोदय मार्क्विस ऑफ रिपन यांनी ब्रिटिश भारतीयांच्या वतीनं मे १८९५ मध्ये दिलेलं निवेदन]

२. निर्णय अवैध आहे कारण लवादानं आपलं काम दुसऱ्याकडे हस्तांतरित केलं आहे. 'तसं करायचा अधिकार जगातील कोणत्याही लवादाला नाही.' दुसरी गोष्ट अशी आहे की लवादाला ज्या गोष्टीचा निर्णय करायला स्पष्टपणे सांगण्यात आलं होतं तो प्रश्न त्यांनी तसाच अधांतरी राहू दिलेला आहे. [सम्राज्ञींच्या सरकारच्या वतीनं लवादाकडे संदर्भित करण्यात आलेली गोष्ट अशी होती : सम्राज्ञींच्या सरकारनं केलेला दावा मान्य करायचा की दक्षिण आफ्रिकी गणराज्य सरकारचा दावा मान्य करायचा हे त्यासंबंधी झालेला पत्र वाचून योग्य वाटेल तो निर्णय घ्यायचं लवादाला स्वातंत्र्य असेल. टीप क्रमांक ७६ आणि ७७मधील सर्व उद्धरणासाठी टीप क्रमांक ७५ पहा] लवादाकडे संदर्भित करण्यात आलेल्या प्रश्नाप्रमाणे लवादानं दोन सरकारांपैकी कोणत्या एका सरकारचा दावा योग्य आहे हे ठरवायला पाहिजे होतं अथवा या प्रश्नासंबंधी जो पत्रव्यवहार झाला तो लक्षात घेता अध्यादेशाचा लवादाला कोणता अर्थ योग्य आहे असं वाटतं ते लवादानं सांगायला हवं होतं. परंतु अशा प्रकारे अर्थ लावण्याऐवजी विद्वान न्यायाधीशांनी अर्थ लावायची जबाबदारी इतरांवर सोपवली आहे. आणि ती जबाबदारी सोपवतानाही 'त्या जबाबदारीला अशा व्यक्तीपर्यंत मर्यादित ठेवलं आहे की ज्यांच्या सामाजिक स्थानामुळे त्यांना या कामासाठी आवश्यक असलेली कार्यपद्धती आणि पुरावे उपलब्ध होऊ शकत नाहीत. ते एरव्ही इतरांना

सहज उपलब्ध होऊ शकले असते. एवढंच नाही तर लवादानं स्पष्टपणे ते उपलब्ध करून द्यायला आणि या अध्यादेशाचा काटेकोर कायदेशीर जरी नाही तरी न्याय्य आणि योग्य अर्थ लावायला सांगितलं आहे.' अशा रीतीनं लवादाचा निर्णय त्यांच्याकडे संदर्भित केलेल्या प्रश्नाप्रमाणे नसल्यामुळे अवैध आहे आणि तो सम्राज्ञींच्या सरकारवर बंधनकारक होऊ शकत नाही.

३. ज्या हेतूसाठी लवाद नेमण्यात आला होता त्याच हेतूची लवादानं गळचेपी केलेली आहे. लवादाचा हेतू न्यायालयाप्रमाणे कायद्याचा अर्थ लावावा असा नव्हता तर हा प्रश्न कायम संपवायचा मार्ग लवादानं सुचवावा हा होता. जो प्रश्न मुत्सद्देगिरी आणि राजकीय देवघेवीद्वारेच सोडवता येऊ शकतो त्याला अशा व्यक्तीकडे सोपवण्यात आलं की ज्या व्यक्तीनं भारतीयांच्या दाव्याच्या विरोधात आधीच भूमिका घेतलेली होती. व्यापाऱ्यांच्याच प्रश्नाबद्दल बोलायचं तर ट्रान्सवाल सरकारनं घेतलेली भूमिका मान्य केली तर त्याचा अर्थ होईल भारतीय व्यापाऱ्यांचा सर्वनाश. जो प्रश्न सम्राज्ञींच्या हजारो नागरिकांना स्पर्श करणारा आहे आणि ज्याच्या तांत्रिक सोडवणुकीमुळे शेकडो भारतीयांना बेघर आणि निर्धन व्हावं लागेल त्याचा निर्णय न्यायालयात करता येत नसतो. कारण न्यायालयात 'प्रत्येकाचे हात बांधलेले असतात आणि अशा प्रकाराच्या विचारांना तिथं स्थान नसतं.'

४. दक्षिण आफ्रिकेच्या गणराज्य सरकारशी झालेल्या पत्रव्यवहारात सम्राज्ञींच्या सरकारनं स्पष्ट केलं होतं की कायदा क्रमांक तीन हा लंडन परिषदेच्या घोषणेशी विसंगत आहे आणि तसं असतानाही त्या परिषदेच्या परिच्छेद चौदातील दुरुस्ती 'जनतेच्या आरोग्याच्या रक्षणासाठी आवश्यक असल्यामुळेच आम्ही मान्य करत आहोत.' गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं की हा प्रश्न आता उरलेलाच नाही. त्यामुळे परिषदेच्या चौदाव्या कलमात केलेल्या दुरुस्तीसाठी कोणतंच समर्थन शिल्लक नाही.

भारतीयांची जीवनपद्धती गलिच्छ आहे आणि त्यामुळे युरोपिअन समाजातील त्यांच्या उपस्थितीला सर्व बर्घरांचा आणि युरोपिअनांचा आक्षेप आहे ह्या युक्तिवादाला निर्णायक उत्तर

देता यावं म्हणून गांधीजींनी मे पाचलाच महम्मद कासीम कमरुद्दीन यांना पत्र लिहून भारतीय सोडून युरोपिअनांच्या आणि शक्य तेवढ्या डचांच्या सह्या भारतीयांच्या अर्जाच्या समर्थनार्थ घेण्यासाठी कळवलं होतं. त्यासाठी आफ्रिकान भाषेत अर्जाचा अनुवाद मुद्दाम करवून घेण्यात आला होता. [गांधीजींचं कमरुद्दीन यांना पत्र, दिनांक मे ५, १८९५] दोन दिवसांनंतर कमरुद्दीन यांनी कळवलं की एकही सही त्यांना मिळवता आलेली नाही. [गांधीजींना कमरुद्दीन यांचं पत्र, दिनांक मे ८, १८९५] परंतु गांधीजींनी या अडचणीनंतरही चिकाटीनं प्रयत्न करत राहायला सांगितलं आणि अर्ज सादर करायची वेळ येईपर्यंत डच अर्जावर ४८४ बर्घरांच्या आणि युरोपिअनांच्या अर्जावर १,३४० युरोपिअनांच्या सह्या गोळा झाल्या होत्या. प्रथितयश युरोपिअन डॉक्टरांनी लेखी दिलं होतं की उच्चवर्गीय भारतीयांची जीवनपद्धती 'युरोपिअनांच्या जीवनपद्धतीपेक्षा आरोग्याच्या दृष्टिकोनातून कोणत्याही अर्थानं कमी प्रतीची नाही.' त्यांच्यातील एक डॉक्टर एच. प्रायर व्हील यांनी दाखला दिला की सामान्यपणे त्यांची राहणी स्वच्छतेची असल्याचं आणि घाणेरड्या सवयींमुळे होणाऱ्या रोगांपासून ते मुक्त असल्याचं मला आढळलं आहे. 'वर्ग म्हणून विचार करायचा तर.... अगदी तळचा भारतीयांचा वर्ग त्याच वर्गातील युरोपिअनांपेक्षा अधिक चांगल्या पद्धतीनं राहतो, त्याचं राहतं घर अधिक स्वच्छ असतं आणि स्वच्छतेच्या नियमांबद्दल तो अधिक आदर बाळगत असतो.' त्याहीपलीकडे जाऊन सांगायचं तर 'शहरात आणि जिल्ह्यात जेव्हा देवीची साथ होती तेव्हा प्रत्येक देशातील कोणाला ना कोणाला देवीचा रोग झालेला असताना एकाही भारतीयावर मात्र त्या रोगाचा हल्ला झालेला नव्हता.' जोहान्सबर्ग येथील अजून दोन डॉक्टरांनी सांगितलं की 'एकाच वर्गातील भारतीय आणि युरोपिअनांची तुलना केली तर भारतीय कोणत्याही प्रकारे कमी प्रतीचे असल्याचं आढळत नाही.'

न मागताही एक साक्ष मिळाली स्टँडर्ड बँकेचे सह व्यवस्थापक श्रीयुत मायकेल यांनी तत्कालीन उच्चायुक्त सर हर्क्युलस रॉबिन्सन यांना लिहिलेल्या पत्रातून. त्यांनी लिहिलं होतं की, 'माझ्या माहितीप्रमाणे भारतीय व्यापारी सर्वार्थानं शिस्तशीर, मेहनती आणि सन्माननीय लोक

आहेत.' जोहान्सबर्ग येथील अंदाजे ३५ प्रतिष्ठित व्यापारी प्रतिष्ठानांनी घोषित केलं की भारतीय व्यापारी आपल्या व्यापाराची तसंच राहायची ठिकाणं स्वच्छ आणि आरोग्यासाठी हितावह होईल अशाच अवस्थेत ठेवत असतात आणि 'वास्तवात ते युरोपिअनांप्रमाणेच त्यांना स्वच्छ ठेवत असतात.' 'या लोकांना 'कुली' म्हणून वा भारतातील 'सर्वात खालचा वर्ग' म्हणून संबोधण्यामुळे स्पष्टपणे 'चूक' होत असल्याची असल्याबद्दलही त्यांनी तक्रार केली.

अनेक बर्घरांनी सही केलेल्या अर्जातून सांगितलं होतं की भारतीयांनी राज्यात रहायला आणि व्यापार करायला आमचा विरोध तर नाहीच उलट आम्हांला त्यांच्यात शांततापप्रेमी आणि नियमाचं पालन करणाऱ्या माणसाचं दर्शन होतं व त्यामुळे तो वर्ग 'वसाहतीत राहावा' असं आम्हाला वाटतं.

गरिबांसाठी ते खऱ्याखुऱ्या वरदानासारखे आहेत.... आम्ही हे सांगायचं साहस करू इच्छितो की त्यांना राज्यातून निघून जायला भाग पाडण्यात आल्यास आम्हांला सरळसरळ संकटाला बळी पडावं लागेल, वैशिष्ट्यानं आमच्यातील त्या लोकांना जे व्यवसायाच्या ठिकाणापासून दूरदूर राहतात. ते भारतीयांवर आपल्या दैनंदिन गरजांसाठी अवलंबून असतात.... व्यापाऱ्यांच्या आणि फेरीवाल्यांच्या स्वातंत्र्यावर बंधनं आणणाऱ्या आणि अंतिमतः त्यांना या देशातून घालवून लावण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनेमुळे.... आमच्या सुखासमाधानाची निश्चितपणे हानी होणार आहे. [परिशिष्ट ५ पहा]

त्यामुळे त्यांनी प्रार्थना केली की सरकारनं असं कोणतंही पाऊल उचलू नये की ज्यामुळे भारतीयांना घाबरून ट्रान्सवालमधून निघून जावंसं वाटेल.

गणराज्यातील युरोपिअन रहिवाशांनी सह्या केलेल्या अजून एक अर्जातून निवेदन करण्यात आलं होतं की आमचा पूर्ण विश्वास आहे की भारतीयांच्या विरोधात चालू असलेल्या आंदोलनाचं मूळ 'अस्वच्छतेच्या हानिकारक सवयीत नाही तर व्यापारातून निर्माण झालेल्या

मत्सरात आहे.... त्यांना वेगळ्या वस्त्यात राहायला वा व्यापार करायला लावण्यासाठी कोणतंही सार्थ कारण आम्हाला दिसून येत नाही.'

५. केवळ युक्तिवादासाठी जरी मान्य करण्यात आलं की लवादाचा निर्णय हा योग्य आणि अंतिम आहे तरी स्वच्छतेच्या नावाखाली ब्रिटिश भारतीय प्रजेला स्वच्छता पाळणं अशक्य व्हावं आणि शहरांपासून अतिशय दूर असल्यामुळे जिथं व्यापार करणं वा चांगल्या पद्धतीनं राहणं अगदी अशक्य होईल अशाप्रकारच्या गल्ल्यांमध्ये राहायला भाग पाडणं याचं कोणतंही समर्थन असू शकत नाही. १८९३मध्ये मलय लोकांसंबंधी अगदी असंच घडलं होतं. त्यांना अशा ठिकाणी जायला भाग पाडण्यात आलं होतं. त्याचं वर्णन ब्रिटिश प्रतिनिधीनं 'ती जागा लहानशी होती व तिचा उपयोग शहरातील घाण टाकण्यासाठी व्हायचा. तिथं पाणीपुरवठ्याची कोणतीही सोय नव्हती आणि तिथं केवळ एक ओहळ वाहत होता. तो शहराच्या गल्लीतील घाण पाण्याच्या निचऱ्यानं घाणेरडा झालेला होता. इशारेवजा सूचना देत ब्रिटिश प्रतिनिधीनं पुढं सांगितलं, 'त्यामुळे अतिशय घातक तापाची आणि इतर आजारांची साथ सुरू सुरू होणं अपरिहार्य आहे. त्यामुळे त्यांच्या जिवाला आणि शहराच्या आरोग्याला धोका निर्माण व्हायची शक्यता आहे.' त्यामुळे 'लवादानं निर्णय दिलेलाच नाही असं समजून' सम्राज्ञींच्या सरकारला हस्तक्षेप करायला इथं फार मोठं कारण आहे.

६. मार्च २१, १८९४च्या आपल्या पत्रात उच्चायुक्तांनी सांगितलं होतं की 'सम्राज्ञींच्या सरकारनं गृहीत धरलं होतं की आशियायी मूळ वंशांच्या ब्रिटिश लोकांसाठी लवाद आहे.' ट्रान्सवालमध्ये कोणी 'आशियायी मूळ' असलेले लोक आहेत काय? अर्जदारांनी विचारलं की सर्वच आशियायी लोकांना त्याप्रमाणे समजायला हवं. केवळ हीच गोष्ट निकालाचाच नाही तर लवादाच्या संपूर्ण प्रक्रियेचा निषेध करण्यासाठी पुरेशी आहे.

७. स्वच्छतेच्या कारणाचा लवादानं मुखवटा चढवलेला आहे परंतु खरं कारण आहे - वंशांबद्दलचा पूर्वग्रह. संपत्ती धारण करायचा अधिकार, रेल्वेतून पहिल्या वा दुसऱ्या वर्गानं प्रवास

करायचा अधिकार नाकारण्यातून तसंच तीन पौंड नोंदणीशुल्क भरायला लावणं आणि परवान्याचा कायदा आदी भारतीयांवर घालण्यात आलेल्या सर्व बंधनातून त्याची अभिव्यक्ती होते. शेजारच्या डेलागोआ राज्यात भारतीयांचा एवढा आदर करण्यात येतो की भारतीयांना रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाचं तिकीट काढणं तिथं शक्य होत नाही आणि तिथं त्यांना परवान्याचीही गरज पडत नाही. त्या राज्यातून ट्रान्सवालमध्ये प्रवेश करताच त्यांच्या स्वच्छतेविषयक सवयीत एकदम बदल होतो काय? वांशिक विद्वेषात आमचा बळी पडणार नाही अशी अपेक्षा अर्जदारांनी व्यक्त केली.

८. ट्रान्सवालमधील भारतीयांच्या स्थानाचा प्रश्न हा केवळ स्थानिक प्रश्न नाही. ट्रान्सवाल सरकार जे करील त्याचा प्रभाव शेजारच्या राज्यांमध्ये पडणं अपरिहार्य आहे.

दक्षिण आफ्रिकेत भारतीयांविरुद्ध जेव्हा एवढी तीव्र भावना आहे, जेव्हा अशा प्रकारच्या भावनेचं मूळ हितसंबंधीयांनी केलेल्या आंदोलनात दडलेलं दिसून येतं.... आणि दक्षिण आफ्रिकेत संपत्ती गोळा करण्यासाठी सर्वांची एवढी धडपड चालू असताना असं आढळून येतं की या भावनेत कोणत्याही अर्थानं सर्व युरोपिअन सहभागी नाहीत..... जेव्हा भारतीयांच्या स्वच्छताविषयक सवयींबद्दल गैरसमज निर्माण करण्यात येऊन त्यांच्यासाठी खास कायदा करण्यात येतो तेव्हा.... माननीय महोदय तुमच्या अर्जदारांविरुद्ध करण्यात आलेली विधानं आणि भारतीयांचा प्रश्न सोडवण्यासाठी करण्यात आलेल्या सूचना अतिशय काळजीपूर्वक तपासून पाहाव्या असं आम्ही म्हणालो तर फार होणार नाही अशी आशा आहे.

१८५८च्या घोषणेद्वारे सम्राज्ञींच्या प्रजेला सम्राज्ञींच्या इतर प्रजेच्या 'बरोबरीच्या नात्यानं वागवल्या जायचा हक्क आहे.' त्यामुळे या प्रश्नाकडे मुख्यत्वेकरून साम्राज्याचा प्रश्न म्हणून पाहायला पाहिजे आणि तसाच तो आहेही. जे लोक दक्षिण आफ्रिकेतील रहिवासी झाले आहेत त्यांच्यासाठी हा जीवनमरणाचा प्रश्न आहे.

सातत्यानं मिळणाऱ्या वाईट वर्तणुकीमुळे त्यांची अधोगती होण्याशिवाय दुसरं काहीच घडू शकत नाही. एवढंच नाही तर आपल्या सुसंस्कृत सवयी सोडून नेटिव्ह आदिवासींच्या सवयींकडे त्यांची अधोगती होऊ शकेल.... आप्रवाशांच्या मूळ हेतूलाच त्यामुळे धक्का लागेल. भारतातील सर्व साहसच गुदमरून जाईल.

युनियन जॅकच्या अंतर्गत अशा प्रकारची दुःखद घटना व्हायच्या शक्यतेकडे सम्राटांची सत्ता शांतपणे पाहत बसू शकत नाही.

अर्जदारांनी आव्हान आणि आवाहन करत समारोप केला. जर दाखवण्यात आल्याप्रमाणे ट्रान्सवालमधील ब्रिटिश भारतीय प्रजेच्या स्वच्छतेविषयक सवयी युरोपिअन समुदायाच्या आरोग्यासाठी हानिकारक नसतील, आणि जर भारतीयांविरुद्धच्या भावनेमागे व्यापारातील असूया आहे हे खरं असेल आणि ती भावना गोऱ्यांच्या विशिष्ट वर्गापर्यंतच मर्यादित असेल आणि त्या विशिष्ट वर्गातील गोरे जर आपल्या संकुचित स्वार्थासाठी तिचा दुरुपयोग करत असतील तर सम्राज्ञींच्या सरकारवर ऑरेंज फ्री स्टेटच्या मुख्य न्यायाधीशांच्या निर्णय बंधनकारक राहावा असा कोणताच आधार उरत नाही. परंतु वसाहत मंत्र्यांना जर या अर्जातील विधानांबद्दल संशय असेल तर मग 'एखादी निःपक्ष चौकशी समिती बसवून दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या स्थानाविषयीच्या संपूर्ण प्रश्नाची तपासणी करणंच न्यायोचित होईल.' [सम्राज्ञींच्या सरकारचे वसाहत विभागाचे मुख्य सचिव मान्यवर महोदय मॉक्विस ऑफ रिपन यांनी ब्रिटिश भारतीयांच्या वतीनं मे १८९५ मध्ये दिलेलं निवेदन. कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड १, पृष्ठ २०३]

भारतीयांच्या अर्जाला पाठिंबा देत लंडन येथील टाईम्सनं संतापून विचारलं:

सम्राज्ञींच्या भारतीय प्रजेला मित्र सरकारांकडून मानहानीची आणि जातीबाहेर टाकणारी वर्तणूक मिळणं योग्य आहे की इतर ब्रिटिश प्रजेला जी प्रतिष्ठा आणि हक्क मिळतात तेच भारतीयांनाही मिळायला पाहिजे? जे मुख्य मुसलमान व्यापारी मुंबईच्या विधानपरिषदेत बसतात

त्यांना दक्षिण आफ्रिकेच्या गणराज्यात मानहानीची आणि मानसिक त्रास होईल अशी वागणूक मिळणं योग्य आहे काय? [*नाताळ मर्क्युरी*, जुलै २४, १८९८]

जेव्हा वर्णविद्वेषाची कसर केपमध्ये खोलवर पोहोचलेली नव्हती तेव्हा ट्रान्सवालमध्ये भारतीयांविरुद्ध जी ओरड सुरू होती त्याबद्दलचं सत्य क्वचितच आढळणाऱ्या स्पष्टपणानं दक्षिण आफ्रिकेतील प्रमुख वार्ताहर श्रीयुत सेंट लेगर यांनी केप टाईम्समधील एप्रिल १३, १८८९ला प्रकाशित झालेल्या मुख्य लेखातून मांडलं होतं.

जीवनात केव्हा केव्हा अशी वेळ येते जेव्हा माणसाला निर्णायकपणे न्याय आणि स्वार्थ यांच्यातील एकाची निवड करावी लागते. ज्या माणसांचा कल सन्मानाकडे असतो त्यांच्यासमोरील समस्या.... त्या लोकांपेक्षा किती तरी अधिक कठीण असतात. त्यांनी आपल्या कठोर जीवनात कधी तरी मिळालेल्या विवेकबुद्धीच्या विधिनिषेधाच्या देणगीला कधीचंच समुद्रात ढकलून दिलेलं असतं. सडलेल्या कंपन्यांची वारेमाप स्तुती करून त्यांना तत्क्षणीच ती विकणाऱ्या माणसातील स्वार्थच प्रभावी राहील. यापेक्षा वेगळी अपेक्षा त्यांच्याकडून करणं हास्यास्पद होईल. परंतु सर्वसामान्य व्यापाऱ्यांच्या जीवनात नैतिकतेच्या संघर्षामध्ये न्यायाचाच विजय होत असतो. [*केप टाईम्स*, एप्रिल १३, १८८९]

भारतीय व्यापाऱ्यांचं वर्णन 'सन्माननीय, परिश्रमी, ज्यांच्या स्थानाबद्दल गैरसमज आहेत आणि ज्यांच्या मूळ राष्ट्रीयत्वाकडेच दुर्लक्ष करून त्यांना कुली म्हणून संबोधण्यात येत आहे (कुली व्यापारी) आणि ज्यामुळे त्यांच्या बांधवांच्या दृष्टिकोनातून त्यांना अतिशय हलक्या दर्जाचं लेखण्यात येत आहे', असं करत सेंट लेगर पुढं लिहितात :

त्यांच्या आर्थिक व्यवहाराकडे, त्यांनी मिळवलेल्या यशाकडे - ज्याचा अनेक निंदकांना हेवा वाटतो - पाहता त्यांना अर्धसंस्कृत नेटिव्हांच्या बरोबरीत ठेवून वस्त्यात बंद करण्यासाठी त्यांच्याविरुद्ध आंदोलन का सुरू आहे आणि ट्रान्सवालच्या काफिरांना लागू असलेले कठोर

नियम त्यांनाही लागू करायचा प्रयत्न का करण्यात येत आहे ते कळत नाही. शांत आणि निरुपद्रवी अरब दुकानदार आणि तेवढेच निरुपद्रवी भारतीय फेरीवाले, जे आपल्या पाठीवर सुंदर वस्तूंचं ओझं घेऊन घरोघरी जातात, ते 'कुली असल्याबद्दलचा सार्वत्रिक ठसा ट्रान्सवाल आणि या वसाहतीत उमटलेला आहे. त्याला कारण ते कोणत्या वंशातून आले आहेत यासंबंधीची माहिती करून घेण्याबाबतचा आळशीपणा आहे. आपण जेव्हा चिंतन करतो तेव्हा आपल्या लक्षात येतं की आपल्या काव्यमय आणि गूढ पौराणिक कथांसह ब्राह्मणी तत्त्वज्ञानानं याच 'कुली व्यापाऱ्याच्या' भूमीत जन्म घेतला होता, चोवीस शतकांपूर्वी जवळपास ईश्वरी अंश असलेल्या बुद्धानं स्वार्थत्यागाच्या तत्त्वज्ञानाची शिकवण याच भूमीत दिली होती आणि याच प्राचीन आणि गूढ देशाच्या पर्वतराईतून आणि सखल प्रदेशातून आपण जी भाषा बोलतो तिची मूलतत्त्वं शोधून काढण्यात आली होती. अशा प्रकारच्या भूमीतून जन्माला आलेल्या वंशातील मुलांना काळ्या असंस्कृत प्रदेशातील मुलांच्या बरोबरीनं वागवण्यात यावं याचं दुःखं झाल्याशिवाय राहू शकत नाही. जे काही वेळ भारतीय व्यापाऱ्याबरोबर राहिले आहेत आणि त्यांच्याशी बोलले आहेत त्यांच्या लगेच लक्षात येईल की ते एका सुसंस्कृत आणि विद्वान माणसांशी बोलत आहेत.... आणि त्याच प्रकाश देणाऱ्या भूमीच्या पुत्रांचा 'कुली' म्हणून आपण तिरस्कार करतो व 'काफिर' म्हणून त्यांना वागवतो.

जे लोक भारतीय व्यापाऱ्यांविरुद्ध ओरड करतात त्यांना ते कोण आणि काय आहेत हे दाखवून द्यायची वेळ आता आलेली आहे. त्याची अतिशय निंदा करणारे लोक ब्रिटिश प्रजाजन आहेत. ते या वैभवशाली समाजातील सर्व अधिकारांचा आणि विशेषाधिकारांचा उपभोग घेत आहेत. अन्यायाचा द्वेष आणि न्याय्य वागणूक हे भारतीयांचे अंगभूत गुण आहेत. ते परदेशात असो की स्वदेशात, अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा आग्रह धरायची त्यांची स्वतःची एक पद्धती आहे. त्यांच्या कदाचित हे लक्षात आलेलं नसावं की भारतीय व्यापारीही ब्रिटिश प्रजा आहेत आणि त्यामुळे मिळणाऱ्या अधिकारांचा, हक्कांचा आणि न्यायाचा ते दावा करत आहेत. अगदी

थोडक्यात सांगायचं तर आणि पामरस्टनच्या दिवसातील वाक्प्रचार वापरायची आम्हाला परवानगी असली तर जे अधिकार आपण इतरांना देऊ शकत नाही त्यांची मागणी करणं इंग्रजी परंपरेच्या विरोधी आहे. एलिझाबेथच्या काळातील एकाधिकाराचा जमाना संपल्यानंतर व्यापाराचा समान अधिकार हा इंग्रजांच्या घटनेचा जवळपास एकप्रकारे भागच झालेला आहे आणि कोणी त्या अधिकारात जर ढवळाढवळ करत असेल तर ब्रिटिश नागरिकत्वामुळे मिळणाऱ्या विशेषाधिकारांचा लगेच उल्लेख करण्यात येईल. इंग्रज व्यापाऱ्यांपेक्षा भारतीय काटकसरीनं राहत असल्यामुळे ते स्पर्धेत अधिक यशस्वी होतात हा युक्तिवाद अतिशय दुबळा आहे. इंग्रजांच्या व्यापाराचा पायाच इतर राष्ट्रांपेक्षा स्पर्धेत अधिक टिकाव धरू शकणं हा आहे. राज्यानं हस्तक्षेप करून आपल्या अधिक यशस्वी स्पर्धकांपासून आपल्याला संरक्षण द्यावं अशी इंग्रज व्यापारी जेव्हा मागणी करतात तेव्हा संक्षणवादाला वेडेपणाचं स्वरूप नक्कीच आलेलं असतं. भारतीय लोक व्यापारात यशस्वी होत आहेत एवढ्याच कारणासाठी त्यांना नेटिव्ह म्हणून वागवण्यात एवढा ढळढळीत अन्याय आहे की माणसाला आपल्याच देशबांधवांची लाज वाटू लागते. सत्ताधारी वंशाच्या स्पर्धेतही ते व्यापारात यशस्वी होत आहेत हीच गोष्ट मुळी मानहानिकारक पातळीपासून त्यांना वर उचलण्यासाठी पुरेशी आहे.... वृत्तपत्रांनी, डचांनी आणि प्रिटोरियातील निराश झालेल्या व्यापाऱ्यांनी भारतीय व्यापारी हा कुलीपेक्षा काहीशाच वरच्या दर्जाच्या आहे हे बोलणं फार झालं. [*केप टाईम्स*, एप्रिल १३, १८८९]

केवळ अमूर्त विवेकाला आवाहन करून स्वार्थाच्या या बाजारात माणूस फार दूरवर पोहोचू शकत नाही हे गांधीजी हळूहळू शिकत होते. त्याला कोणत्यातरी प्रभावी आधाराची गरज होती. त्या आधाराचं रहस्य अजून भारतीयांना कळलेलं नव्हतं. ते चाचपडत होते. अर्ज-विनंत्या हा त्या चाचपडण्याचाच भाग होता. त्यामुळे सत्याग्रहासाठी लागणाऱ्या ध्येयसिद्धीसाठी आवश्यक असलेली शिस्त आणि सत्याच्या शोधासाठी चिकाटीपूर्वक मेहनत करायची प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण झाली. त्याचबरोबर आपली बाजू अतिशय नम्रपणानं भावविवश न होता आणि

आंधळ्यालाही त्यातील न्याय दिसेल अशाप्रकारच्या बिनतोड पुराव्यानिशी मांडणं ही गोष्ट ते शिकले. न्यायाला सिंहासनावर बसवण्यासाठी अज्ञानाला बाजूला सारणं आवश्यक असतं. अर्ज-विनंत्या अज्ञानाला बाजूला सारण्यासाठी होत्या. वासनांच्या, पूर्वग्रहांच्या आणि अज्ञानातून निर्माण झालेल्या स्वार्थाच्या कचाट्यातून विवेकाला सोडवण्यासाठी फार मोठ्या तपश्चर्येची आवश्यकता होती.

लॉर्ड रिपन यांच्याकडे पाठवलेल्या अर्जासोबतच भारतीयांनी भारताचे व्हाईसराय लॉर्ड एल्गिन यांच्याकडेही एक अर्ज पाठवला. सम्राज्ञींच्या सरकारनं लंडन परिषदेच्या घोषणेत परिवर्तन करायला आणि स्वच्छतेच्या कारणासाठी 'मान्यवर महोदय, आपल्या आधी या पदावर जे होते त्यांच्याशी सल्लामसलत न करता' संमती दिलेली असल्यामुळे त्यांनी दिलेली संमती भारत सरकारवर बंधनकारक नाही अशी त्यांनी त्या अर्जातून प्रार्थना केली.

भारत सरकारशी यासंबंधात सल्लामसलत करणं आवश्यक होतं हे स्पष्ट आहे.... मान्यवर महोदय, या वेळी आपल्या अर्जदारांच्या वतीनं केवळ या कारणासाठी आणि यावेळी हस्तक्षेप करायला आपण अनुकूल नसाल तरी ही संमती ज्या कारणासाठी देण्यात आली ती कारणंच अस्तित्वात नसल्यामुळे आणि वास्तवात सम्राज्ञींच्या सरकारची याबाबतीत दिशाभूल करण्यात आलेली असल्यामुळे आपले अर्जदार आपल्याला नम्रपणे विनंती करू इच्छितात की आपण हस्तक्षेप करण्यासाठी आणि आपल्या अर्जदारांची विनंती मान्य करण्यासाठी हे कारण पुरेसं आहे असं आम्ही समजतो.

परंतु गोऱ्या भावंडातील रक्ताचं नातं हे 'एकाच साम्राज्याच्या नागरिकत्वाच्या नात्याच्या' पाण्यापेक्षा घट्ट असल्याचं दिसून आलं. 'एकाच साम्राज्याच्या नागरिकत्वाच्या नात्याच्या' काठीचा उपयोग जेव्हा क्रुगरच्या राजवटीला झोडपायचं होतं तेव्हाच केवळ एक निमित्त म्हणून करण्यात आला. जून १८९५मध्ये सम्राज्ञींच्या सरकारनं तारेद्वारे लवादाच्या निर्णयाला मान्यता दिली. मान्यता देताना व्होल्क्सराडनं सप्टेंबर ८, १८९३चा प्रस्ताव मागं घ्यावा आणि न्यायालयांना

बंधनमुक्त होऊन १८८५च्या दुरुस्त केलेल्या कायद्याचा अर्थ लावता यावा म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या गणराज्य सरकारनं डिसेंबर १८९३चं परिपत्रक रद्द करावं एवढीच अट घालण्यात आली होती.

त्यानंतर लगेच वजनदार लोकांचं एक प्रतिनिधिमंडळ वसाहत कार्यालयात चेम्बर्लेन यांना ऑगस्ट २९ला भेटायला गेलं. त्यात श्रीयुत डब्ल्यू. सी. बॉनर्जी [गांधीजींचासुद्धा विश्वास होता की डब्ल्यू. सी. बॉनर्जी हे ख्रिश्चन होते. परंतु माणिकलाल मुखर्जी आपल्या डब्ल्यू. सी. बॉनर्जी, देशबंधू बुकडेपो, कलकत्ता या पुस्तकात पृष्ठ ३६ वर लिहितात : 'अतिशय आश्चर्याची गोष्ट ही आहे की आपल्या देशातील बरेचसे लोकच नाही तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये उच्च पदावर असणारे लोकही त्यांना ख्रिश्चन समजतात. त्यासाठी त्यांना कदाचित दोषही देता येणार नाही कारण त्यांच्या अनेक मुलामुलींनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेला आहे एवढंच नाही तर त्यांच्या मृत्यूच्या काही काळ आधी त्यांच्या पत्नीनंही ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेला होता. परंतु आपल्या देशातील लोकांना माहीत असायला हवं की श्रीयुत बॉनर्जी हिंदू म्हणून जगले आणि हिंदू म्हणून मरण पावले.' हरदेवराम एन. हरिदास हे सुरत जिल्हा काँग्रेस कमेटीचे सचिव होते.], हरदेवराम एन. हरिदास, पार्वती सी. राय आणि टी. एम. नायर, एम. ए. घनी, जे. मिर्झा, आणि संसद सदस्य भॉवनग्री यांचा समावेश होता व त्यांचं नेतृत्व दादाभाई नौरोजी करत होते. वसाहत मंत्र्यांसोबत संसद सदस्य टी. एच. कॉक्रेन, सी. बी., आणि एच. एफ. विल्सन (स्वीय सचिव) होते. प्रतिनिधिमंडळानं त्यांच्यासमोर केवळ ट्रान्सवालच्याच नाही तर ऑरेंज फ्री स्टेट, केप कॉलनी, आणि नाताळमधील भारतीयांच्या तक्रारी मांडल्या. त्यापैकी प्रमुख होत्या : १. स्थावर संपत्ती विकत घेण्यावर प्रतिबंध, २. मतदानाच्या अधिकाराला बंदी, ३. रेल्वेनं दिवसा आणि रात्री मुक्तपणे प्रवास करण्यावर निर्बंध, ४. व्यापाराच्या परवान्याला मज्जाव, ५. निवास आणि व्यापाराचं ठिकाण निवडण्यावरील बंधनं.

चेम्बर्लेन यांनी आपल्या उत्तरात ऑरेंज फ्री स्टेटला पूर्णपणे वगळलं. [*भारत*, ऑक्टोबर १८९५, पृष्ठ ३०१-४] ट्रान्सवालच्या संबंधात त्यांनी १, ३, आणि ५ क्रमांकाच्या तक्रारी वगळल्या. केप कॉलनीच्या संबंधात त्यांनी १,३,४ आणि५ क्रमांकाच्या तक्रारी वगळल्या. नाताळसंबंधीसुद्धा त्यांनी १,३,४, आणि ५ क्रमांकच्या तक्रारी वगळल्या.

केप कॉलनीमधील ब्रिटिश भारतीयांना मतदान हक्कापासून वंचित करण्यासंबंधी बोलताना त्यांनी मान्य केलं की मतदान अधिकारासाठी तिथं घालण्यात आलेल्या अटी अशा आहेत की त्यांच्यामुळे 'इतर राष्ट्रातील लोकांपेक्षा आशियायी लोकांना मतदान अधिकारातून वगळण्यात येतं.' आणि त्यामुळे 'त्या निमित्तानं सम्राज्ञींच्या प्रजेला वगळण्यात येत असेल तर त्याविरुद्ध तक्रार करणं अजूनच कठीण होतं.' खेद व्यक्त करत ते पुढं म्हणाले की 'परंतु आपण हे लक्षात ठेवायला हवं की या ठिकाणी आपला संबंध स्वायत्त वसाहतीशी येत आहे.'

यातून नाताळमधील भारतीयांच्या मतदान अधिकारासंबंधी काय दृष्टिकोन राहील याचं सूतोवाच झालं. परंतु त्यासंबंधी नंतर.

ट्रान्सवालसंबंधी प्रतिनिधी मंडळानं विनंती केली की डी व्हिलर्स यांच्याकडे जो विवादाचा मुद्दा निर्णयासाठी सोपवण्यात आलेला होता तो त्यांनी तसाच सोडलेला असल्यामुळे हे प्रकरण वादाच्या मुद्याचा निर्णय करण्यासाठी लवादाकडे परत पाठवण्यात यावं आणि त्यांनी तसं न केल्यास १८८५चा दुरुस्त करण्यात आलेला कायदा रद्द करण्यासाठी पावलं उचलण्यात यावी. उत्तरात चेम्बर्लेन म्हणाले की मी लवादाच्या मागे जाऊ शकत नाही. 'त्यामुळे लवादाच्या तत्त्वालाच धक्का लागेल.' चेम्बर्लेन यांनी उच्चायुक्तांना आधीच लवादाचा निर्णय सम्राज्ञींच्या सरकारच्या भारतीय प्रजेच्यावतीनं काही अटींसह मान्य असल्याचं कळवलं होतं. परंतु 'ज्यामुळे निश्चितपणे दुःख निर्माण होईल अशा प्रकारचा नियम कायम ठेवणं ट्रान्सवाल सरकारला कदाचित अनावश्यक वाटेल अशा आशेनं' या विषयासंबंधी आपण तरीही ट्रान्सवाल सरकारशी बोलू आणि हा मुद्दा त्यांच्यासमोर वारंवार विचारार्थ मांडू असं त्यांनी सांगितलं. त्यांनी सांगितलं की यासंबंधी माझ्या वैयक्तिक भावना काहीही असल्या तरी यापलीकडे मी जाऊ शकत नाही. लॉर्ड रिपन यांनी निर्णय आधीच मान्य केलेला आहे. ते म्हणाले की तुम्ही हे विसरू नये की मला 'मैत्रीचे संबंध असलेल्या परराष्ट्राशी व्यवहार करावा लागत आहे.' [*भारत*, ऑक्टोबर १८९५, पृष्ठ ३०१-४]

प्रतिनिधिमंडळातील एक व्यक्ती म्हणाली होती की तुम्हांला आमच्या मागण्या कदाचित अवास्तव अधिक आणि वास्तव कमी वाटतील. या उद्गाराचा उल्लेख करत ते म्हणाले की या बाबतीत तुमच्या मागण्या अवास्तव अधिक आणि वास्तव कमी आहेत असं मी म्हणणार नाही. 'माझं असं मत आहे की या तक्रारी वास्तव आहेत परंतु त्या भौतिक असण्याऐवजी *भावनात्मक*, नैतिक आहेत. असं असलं तरीही त्यांचं महत्त्व कमी होत नाही (तिरपी अक्षरं माझी). स्पष्ट आहे की स्थावर संपत्ती विकत घ्यायच्या अधिकारावरील बंधनं, भारतीयांना व्यापाराचे परवाने देण्यासंबंधीचे निर्बंध, झोपडपट्टीसारख्या वस्त्यांमध्ये व्यापार आणि निवासासाठी राहायला लावणं या गोष्टी वसाहत मंत्र्यांना भावनात्मक वाटत होत्या!

काही अटींसह निर्णय मान्य आहे असं कळवणारं सप्टेंबर ४, १८९५ला त्यांनी पत्र पाठवलं. ट्रान्सवाल गणराज्यात राहणाऱ्या आशियायी लोकांवर त्यांच्या राहायच्या ठिकाणासंबंधी, हालचालीसंबंधी वा जीवनपद्धतीसंबंधी कोणतेच निर्बंध घालता येणार नाहीत अशा प्रकारची शब्दरचना प्रिटोरिया आणि लंडन येथील परिषदेत झालेल्या निर्णयाची आहे. त्यात त्यांनी या मुद्यावर भर दिला. तरीही त्यांनी पुनरुच्चार करत लिहिलं,

'त्यांची काय कारणं असतील हे त्यांनाच माहीत असू शकेल, आणि ती मला जाणूनही घ्यायची नाहीत वा त्यासंबंधी प्रश्नही उपस्थित करायचा नाही. परंतु माझ्या दोन पूर्ववर्ती मंत्र्यांनी परिषदेत ठरलेल्या गोष्टींमध्ये स्थानिक कायद्याद्वारे परिवर्तन करायला मान्यता दिली आणि त्यानुसार १८८५चा जो कायदा १८८६मध्ये दुरुस्त करण्यात आला त्यात ती तरतूद करण्यात आलेली आहे. तो कायदा आता दक्षिण आफ्रिका गणराज्याच्या कायद्याचा एक भाग झालेला आहे व जे ब्रिटिश भारतीय तिथं राहतात त्यांच्यावर तो बंधनकारक आहे व कोणत्याही पदावर असलेल्या मंत्र्याला त्यावर आक्षेप घ्यायचा अधिकार नाही.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, डिसेंबर ११, १८९५]

ज्या विविध मुद्यांच्या आधारानं भारतीय निवेदकांनी लवादाच्या निर्णयावर आक्षेप घेतला होता त्याबद्दल चेम्बर्लेन यांचं म्हणणं होतं की हे प्रकरण लवादाकडे 'व्यापक दृष्टीनं सोपवण्यात

आलं होतं आणि त्यात 'विशिष्ट मुद्यावर' विचार करायला सांगण्यात आलेलं नव्हतं आणि लवादानं दोन्ही पक्षांचा दावा फेटाळून लावला आहे आणि सत्य आणि न्यायाच्या दृष्टीनं लवादानं आपलं मत दिलेलं आहे. श्रीयुत चेम्बर्लेन समजावणीच्या सुरात म्हणाले की 'त्यांना तसं करायचा अधिकार होता.' [सीडी२२३९ (सीडी १६८४ च्या पुढे) ट्रान्सवाल ब्लु बुक क्रमांक सीडी२२३९ (सीडी १६८४ च्यापुढे) पृष्ठ ३९, ऑगस्ट १९०४ मध्ये प्रकाशन : ब्रिटिश भारतीयांच्या ट्रान्सवालमधील स्थानाबद्दल पत्रव्यवहार, क्रमांक ४: लिटलटनकडून व्हिस्काऊंट मिल्नर यांना दिनांक जुलै २०, १९०४]

मंत्री महोदयांच्या तोंडातील कायद्याची ही भाषा विचित्र वाटत होती. कारण याच वेळी ते युटिलँडरांच्या संशयास्पद दाव्यासाठी शेजारच्या राष्ट्रावर हल्ला करण्यासाठी चाललेल्या कटाकडे केवळ कानाडोळाच करत नव्हते तर त्याला प्रोत्साहनही देत होते. स्पष्ट आहे की जी गोष्ट युटिलँडरांसाठी चांगली होती ती भारतीयांसाठी मात्र चांगली नव्हती!

अशा रीतीनं आपले हात मोठ्या प्रमाणात बांधले गेले असल्याचं मान्य करत श्रीयुत चेम्बर्लेन यांनी सांगितलं की भारतीयांच्या अर्जाला यापेक्षा अधिक प्रोत्साहनपर उत्तर मी देऊ शकत नाही याचा मला अतिशय खेद वाटतो....

अर्जदारांबद्दल मला सहानुभूती वाटते. ते शांत, नियमांचं आचरण करणारे लोक आहेत असा माझा विश्वास आहे. मेहनत, हुशारी आणि धीर न सोडणारी चिकाटी इत्यादी गुण त्यांच्यात निःसंशयपणे आहेत. प्राप्त परिस्थितीला ते या गुणांच्या आधारे तोंड देऊ शकतील आणि आपल्या व्यवसायाचा मार्ग शोधून काढू शकतील एवढीच आशा मी करू शकतो. [वरीलप्रमाणे]

ढोंगीपणानं पत्राचा समारोप करत लिहिण्यात आलं होतं की 'भारतीयांना अधिक उदारपणाची वागणूक देणं तसंच गणराज्यातील प्रशासक वर्गातून नव्हे तर व्यापारातून जो मत्सर निर्माण झालेला दिसतो आहे, आणि असा विश्वास ठेवायला कारणं आहेत, त्यातून मुक्त होणं गणराज्यातील बर्घरांच्या हिताचं होणार नाही काय?' काही 'नवीन दृष्टिकोनातून'

गणराज्याशी या संबंधात विचारविनिमय करायचं आणि 'या गोष्टीबद्दल भविष्यात मैत्रीपूर्ण विरोध करायचं स्वातंत्र्य वसाहत मंत्री राखून ठेवत आहेत.'

अशा रीतीनं त्यांच्याकडे सोपवण्यात आलेला प्रश्न त्यांनी तसाच अधांतरी ठेवला. त्या प्रश्नाचं उत्तर एखाद्या चाचणी खटल्याच्या निकालानंतरच सापडू शकणार होतं. गांधीजींनी प्रिटोरिया येथील ब्रिटिश प्रतिनिधीला लिहिलं की ब्रिटिश सरकारनं लवादाचा निर्णय मान्य करायचा हा स्वाभाविक परिणाम आहे. त्यामुळे खटला जरी भारतीय समाजाच्या एखाद्या माणसाच्या नावानं दाखल करण्यात येणार असला तरी त्यासाठी येणारा खर्च हा फार मोठा असेल व त्यामुळे सम्राज्ञींच्या सरकारनं तो सहन करणं उचित होईल. १८८४च्या परिषदेच्या चौदाव्या कलमानुसार देण्यात आलेल्या संरक्षणानंतरही ट्रान्सवालमध्ये ब्रिटिश भारतीयांना अवनतीत ढकलायचा आणि बंधनात अडकवायचा जो प्रयत्न करण्यात येत आहे त्याविरुद्धच्या संघर्षात त्यांनी बराच खर्च केलेला आहे.

परंतु ही विनंती ब्रिटिश सरकारकडून फेटाळण्यात आली. चाचणी खटला १८९८पर्यंत सुनावणीसाठी आला नाही. त्यावेळी त्याचा निकाल भारतीयांविरुद्ध लागला. परंतु तो काही प्रकरणाचा शेवट नव्हता.

नाताळच्या कामाच्या मध्येच उभा राहिलेला ट्रान्सवालमधील भारतीयांचा हा प्रश्न त्यावेळी गांधीजींना तात्कालिक वाटत होता. हा प्रश्न लवकरच त्यांच्या कामाचा मुख्य भाग होईल व एकाहून अधिक देशातील इतिहासावर परिणाम करणारा घटनाक्रम त्यातून निर्माण होईल अशी गांधीजींनी त्यावेळी स्वप्नातही कल्पना केलेली नव्हती.

क्लू-क्लूच्या हातानं पांडाचा मृत्यू झाल्यानंतर सेटोवायो हा स्वतःच झुलूलँडचा राजा झाला. चाकाची सैनिकी परंपरा पुनरुज्जीवित करायच्या त्याच्या प्रयत्नामुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांशी त्याचा खटका उडाला. १८७९ साली त्याच्या सैन्याचा पराभव झाल्यानंतर त्याला सिंहासनावरून काढून टाकण्यात येऊन इंग्लंडला पाठवण्यात आलं. झुलूलँडला तेरा भागात विभागण्यात आलं व त्या प्रत्येकावर नेटिव्हाला प्रमुख नेमण्यात आलं. प्रत्येक भागावर ब्रिटिश निवासी अधिकारी नेमण्यात आला होता. नाताळला तो ब्रिटिश सरकारच्या कानांचं आणि डोळ्यांचं काम करत असे. नंतर ही व्यवस्था जेव्हा मोडकळीस आली तेव्हा सेटोवायोला परत आणण्यात आलं आणि काटछाट केलेल्या राज्यावर अधिकारात कपात करून त्याला परत सिंहासनावर बसवण्यात आलं. परंतु खटके सुरूच राहिले.

काही काळापासून नाताळ झुलूलँडला खालसा करायची परवानगी मागत होता व तसं त्वरित करायचा आग्रह धरत होता. परंतु सम्राज्ञींच्या सरकारनं नाताळला तो अधिकार द्यायचं नाकारलं. त्यामुळे ट्रान्सवालला लंडन परिषदेनं नाकारलेली संधी मिळाली. झुलूलँडमध्ये काही बोअर राहत होते. त्यांनी दोन गणराज्यातील आणि ब्रिटिश वसाहतीतील अंदाजे ३०० लोकांशी संगनमत केलं. या लोकांनी स्वतःच आपल्या राज्याच्या नागरिकत्वाचा त्याग केल्याची घोषणा केली व ऱ्हायहिडला राजधानी करून त्यांनी आपल्या 'नवीन गणराज्याची' स्थापना केली. लवकरच ट्रान्सवालमध्ये त्याचं सामिलीकरण होणार होतं. दक्षिण आफ्रिकेच्या ज्योबर्टला अध्यक्ष होण्यासाठी पाचारण करण्यात आलं व राज्याच्या सीमा ठरवण्यासाठी व त्यात सेंट ल्युसिया बेचा अंतर्भाव करायच्या दृष्टीनं जमिनीचं मोजमाप करणारांना पाठवण्यात आलं. या मोजमाप करणारात तरुण बोथाचाही समावेश होता. काही काळानंतर हाच बोथा दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात महत्त्वाची भूमिका वठवणार होता. ती स्मट्सच्या बरोबरीची जरी नसली तरी किंचितच कमी असणार होती. याच वेळी ट्रान्सवालच्या सेवेत असणाऱ्या एका जर्मन गृहस्थानं 'नेटिव्ह' राजाकडून मोठा मुलूख खालसा करायचा करार केला होता.

किनाऱ्यावर नवीन विरोधी गणराज्य निर्माण झालं. त्याला मान्यताही देण्यात आली. परंतु नंतर त्यातील धोका ब्रिटिशांना जाणवला व त्यांनी १८८७मध्ये ते गणराज्य रद्द करण्यात आलं.

अशा रीतीनं झुलूलँड इंग्रजांची वसाहत झाली. तिच्यात थोडेसेच युरोपिअन आणि बरेचसे नेटिव्ह (काफिर) राहत होते आणि राणीच्या नावानं नाताळचे राज्यपाल त्या वसाहतीचा कारभार पाहत होते. नाताळच्या मंत्रिमंडळाला वा नाताळच्या राज्यपालांचा नाताळचे राज्यपाल म्हणून त्याच्याशी काहीच कर्तव्य नव्हतं. पहिल्यांदाच वसवण्यात आलेल्या मेलमॉथ या शहरात भारतीयांनी १८८८ मध्ये अंदाजे २००० पौंड किंमत असलेले काही भूखंड विकत घेतले होते. एशौ या शहराची घोषणा १८९१ साली, नांदवेनी या शहराची घोषणा १८९६ साली करण्यात आली. या दोन्ही शहरात जमीन विकत घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नियमाप्रमाणे जन्मानं आणि वंशानं युरोपिअन असणारांनाच जमीन विकत घ्यायचा अधिकार देण्यात आला होता. [एम. के. गांधी, नोट्स ऑन द ग्रिव्हांसेस ऑफ द ब्रिटिश इंडियन्स इन साऊथ आफ्रिका राजकोट, ऑगस्ट २२, १८९६]

मागील काळात अशा अनेक गोष्टी दुर्लक्षित झाल्या होत्या. परंतु जागृत आदमजी मियाखान यांनी ती गोष्ट नाताळ काँग्रेसच्या लक्षात आणून दिली. गांधीजींनी निवेदन तयार केलं आणि ते फेब्रुवारी २६, १८९६ला अब्दुर करीम हाजी आणि इतर ३९ जणांच्या सह्या घेऊन सादर करण्यात आलं.

फेब्रुवारी २७ला झुलूलँडच्या कार्यकारी सूचिवांनी नियमांचं समर्थन करणारं उत्तर दिलं. त्यांचं म्हणणं होतं की त्यांच्या पूर्वसुरींनी '२८ सप्टेंबर १८९१ला एशौ शहरासाठी जसे नियम तयार केले होते तसेच हे आहेत.' [नाताळमधील भारतीय समाजाच्या वतीनं सन्माननीय महोदय सम्राज्ञींचे वसाहत मंत्री जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, मार्च ११, १८९६]

एवढंच नाही तर सामान्यपणे भारतीयांच्या विरोधात असलेल्या नाताळ मर्क्युरीलाही त्या गोष्टीचा संताप आला. त्यानं फेब्रुवारी २९ला लिहिलं 'लवकरच झुलूलँडमध्येही भारतीयांचा प्रश्न निर्माण होईल असं दिसतं.

झुलूलँड अजूनही सिंहासनाची वसाहत आहे व त्यामुळे साम्राज्याच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली ती सरळ येते. अशा प्रकारचे नियम कशाप्रकारे लादले जाऊ शकतात ते आम्हांला कळू शकत नाही.... ही वसाहत साम्राज्याधीन असलेली वसाहत आहे आणि त्यामुळे जसे नियम नाताळसारख्या स्वायत्त राज्यातही करायची परवानगी नाही तसे नियम तिथं करण्यात येत आहेत ही आश्चर्याची गोष्ट आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी २९, १८९६]

मार्च ४, १८९६ला गांधीजींनी मान्यवर महोदयांना निवेदकांच्या वतीनंपत्र लिहिलं आणि दोन्ही शहरांसाठी जे नियम आणि परिनियम तयार करण्यात आले होते त्यात रंगभेद नाहीसे करायच्या दृष्टीनं बदल वा दुरुस्ती करायची विनंती केली. 'अशीच परिस्थिती दक्षिण आफ्रिकेत भारतीयांसाठी सर्वत्र निर्माण करण्यात येत असल्यामुळे ही बाब महत्त्वाची आहे' हेही गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं. [गांधीजींचं श्रीयुत सी. वॉल्श, कार्यकारी सचिव, झुलूलँड यांना पत्र, दिनांक मार्च ४, १८९६ (वसाहत कार्यालय लेखागार, क्रमांक ४२७, खंड २४)]

ही विनंतीही फेटाळण्यात आली. त्यानंतर लगेच गांधीजींनी दादाभाई नौरोजी यांना पत्र लिहून कळवलं, 'मी आता गृमंत्रालयासाठी निवेदन तयार करत आहे.' [गांधीजींचं दादाभाई नौरोजी यांना पत्र, दिनांक मार्च ७, १८९६]

निवेदनातून, ज्यावर मार्च ११ ही तारीख होती, प्रार्थना करण्यात आली की १८८९ सालीच मेलमॉथ शहराची घोषणा करून तिथली जमीन जेव्हा विकण्यात आली होती तेव्हाच भारतीय समाजाच्या लोकांनी २,००० पौंड गुंतवून जमीन विकत घेतली होती. त्यांना झुलूलँडमध्येही जमीन विकत घ्यायची मोकळीक असावी.

त्यांनी केलेला खर्च भरून काढता यावा.... आणि नफा मिळवता यावा यासाठी तरी.... जर साम्राज्याची वसाहतही सम्राज्ञींच्या प्रजेच्या एका भागाचा संपत्तीचा अधिकार हिरावून घेणार असेल तर दक्षिण आफ्रिकेतील गणराज्यांची सरकारं आणि ऑरेंज फ्री स्टेट यांनी जर असं पाऊल उचललं तर त्यांचं समर्थन मोठ्या प्रमाणात ते करतील एवढंच नव्हे तर ते याही

पलीकडील पाऊल उचलतील. [नाताळमधील भारतीय समाजाच्या वतीनं सन्माननीय महोदय सम्राज्ञींचे वसाहत मंत्री जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, मार्च ११, १८९६]

मध्यंतरीच्या काळात लंडनमध्ये दादाभाई नौरोजी आपल्या बाजूनं कामाला लागले होते. लंडनमधील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या ब्रिटिश कमेटीनं हे प्रकरण हाती घेतलं. लंडन टाईम्सनं त्यासाठी जवळपास दोन स्तंभांची जागा दिली. जेम्सन रेडच्या प्रकरणात चेम्बर्लेनही सहभागी असावे अशा संशयामुळे हेन्री ड्यू प्री लबोचरही चेम्बर्लेनवर संतापलेले होते. त्यामुळे त्यांनी तर या प्रकरणाला अजूनच जोर लावला. त्यांनी आपल्या ट्रुथ या नियतकालिकात लिहिलं :

ट्रान्सवालमधील 'बाहेरच्या' लोकांच्या ज्या तक्रारी आहेत त्यांच्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील इतर भागात राहणाऱ्या लोकांच्या तक्रारी विसरल्या जात आहेत. सम्राज्ञींच्या भारतीय प्रजेला सम्राज्ञींच्या दक्षिण आफ्रिकेतील वसाहतीत आणि संस्थानात ज्या बंधनांखाली वावरावं लागत आहे त्यात *नाताळ सरकारच्या राजपत्रातील* सूचनेनं अजून भर पडलेली आहे.

त्यांनी शेवटी लिहिलं की श्रीयुत चेम्बर्लेन झुलूलँडच्या राज्यपालांना 'भारतीय समाजाच्या सरळसरळ विरोधात असलेले राक्षसी नियम मागं घ्यायची सूचना देतील अशी आम्ही आशा करतो.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १, १८९५]

झुलूलँडच्या अधिकाऱ्यांच्या परंपरेला जागत, आणि असं दिसतं की स्थानिक गोऱ्यांच्या संगनमतानं, वसाहतीच्या कार्यालयाला या प्रकरणाच्या संपूर्ण सत्यापासून अंधारात ठेवण्यात आलं होतं. दादाभाई नौरोजी यांच्या ठिकाणी हाउस ऑफ कॉमन्सचे सदस्य झालेले मंचरजी एम. भोवनग्री यांनी विचारलेल्या प्रश्नाला एप्रिल १०, १८९६ला उत्तर देताना चेम्बर्लेन यांनी धक्कादायक माहिती उघड केली. ते म्हणाले, 'हे खरं आहे की जे युरोपिअन नाहीत वा युरोपिअन वंशाचे नाहीत त्यांना एशौ आणि नॉंदवेनी शहरात जमीन विकत घ्यायच्या वा धारण करायच्या अधिकारातून वगळण्यात आलेलं आहे. परंतु ब्रिटिश भारतीयांनी मेलमॉथमध्ये जमीन विकत घेतल्याची माहिती वसाहत कार्यालयाला कळवण्यात आलेली नाही असं दिसतं.' [*इंडिया*, मे १८९६,

पुरवणी, पृष्ठ २८] त्यांनी आश्वासन दिलं की भारतीयांचं निवेदन जेव्हा येईल तेव्हा त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्यात येईल.

दैव भारतीयांच्या बाजूनं होतं. जेम्सन रेडच्या प्रकरणानंतर टीकेच्या भडिमार सुरू असल्यामुळे क्रुगरला युटिलँडरांच्या प्रश्नावर प्रचाराची संधी मिळेल असं धोरण झुलूलँडच्या अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून ब्रिटिश सरकार अवलंबू इच्छीत नव्हतं.

१३

प्रत्येक बर्घराला सैनिकी शिक्षण आवश्यक करणाऱ्या व्यवस्थेचं वर्णन आधीच करण्यात आलेलं आहे. १८९४ साली ट्रान्सवालमध्ये निर्माण झालेला उठाव दडपण्यासाठी दक्षिण आफ्रिकी गणराज्यातील ब्रिटिशांना बर्घरांसोबत सैन्यात काम करायचा आदेश देण्यात आला. तेव्हा त्यांनी त्याला विरोध केला. त्यांचं म्हणणं होतं की बर्घरांना असलेले सर्व अधिकार आम्हांला नाहीत. त्याबरोबर गणराज्यात आमच्यावर अनेक बंधनं लादण्यात आलेली आहेत. त्यामुळे आमच्यावर सैन्यात काम करायची जबाबदारी येऊ शकत नाही. [नाताळमधील भारतीय समाजाच्या वतीनं सन्माननीय महोदय सम्राज्ञींचे वसाहत मंत्री जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, नोव्हेंबर २६, १८९५] जनमताच्या दडपणामुळे ब्रिटिश सरकारला मध्यस्थी करावी लागली आणि डिसेंबर १८९४मध्ये एक तात्पुरता करार ब्रिटिश उच्चायुक्त सर हेन्री लॉच आणि अध्यक्ष क्रुगर यांच्यात झाला. त्यानुसार दक्षिण आफ्रिकी गणराज्यात राहणाऱ्या सर्व ब्रिटिश प्रजेला सक्तीच्या सैन्य भरतीतून व्यक्तिशः मुक्त करण्यात आलं होतं. त्याला मंजुरी देताना व्होल्क्सराडनं आडमार्गानं जाऊन आपल्या ऑक्टोबर सातच्या ठरावात 'घोषित केलं की ब्रिटिश प्रजा म्हणजे केवळ गोरी प्रजा.

त्यानंतर लगेच नाताळ इंडियन काँग्रेससारखीच ट्रान्सवालमध्ये ब्रिटिश भारतीय संरक्षण समिती होती. तिनं २२ ऑक्टोबरला तारेनं लंडनला घृणास्पद वांशिक भेदभावाबद्दलचा आपला विरोध कळवला आणि पाठोपाठ निवेदन पाठवत असल्याचंही कळवलं.

या तारेचा मसुदा मिळाल्याची पोच देताना संसद सदस्य एच. ओ. अर्नोल्ड फॉस्टर यांनी दुसऱ्या दिवशी जोहान्सबर्ग येथील ब्रिटिश भारतीय संरक्षण समितीच्या सचिवांना लिहिलं :

तुमच्या तारेत संदर्भित केलेल्या निवेदनाची मी वाट पाहीन.... त्याचबरोबर मी परत म्हणेन की बोअरांनी ट्रान्सवालमधील ब्रिटिश भारतीयांच्या बाबतीत केलेली कार्यवाही ढळढळीत अपमानास्पदच नाही तर अनेक गंभीर प्रश्न निर्माण करणारीही आहे व त्यांचं क्षेत्र बोअर राज्याच्या सीमेपलीकडे पसरलेलं असेल. [एच. ओ. अर्नोल्ड फॉस्टर यांचं ब्रिटिश इंडियन डिफेन्स कमेटी, जोहान्सबर्गच्या सचिवांना पत्र, दिनांक ऑक्टोबर २३, १८९५]

गांधीजींनी तयार केलेलं निवेदन १३० लोकांच्या सह्यांसह ब्रिटिश सरकारला मे चौदाला पाठवण्यात आलं. सह्या करणारात एम. सी. कमरुद्दीन, अब्दुल गनी आणि महम्मद इस्माईल या दक्षिण आफ्रिकी गणराज्यातील व्यक्तींचा समावेश होता. सैनिकी करारात मुळातच 'ब्रिटिश प्रजा' असे शब्द नाहीत याकडे लक्ष वेधत निवेदनातून प्रार्थना करण्यात आली की हा ठराव कराराच्या अटीत बदल करणारा असल्यामुळे आणि त्यातून कराराला शब्दशः मान्यता देण्यात आलेली नसल्यामुळे या बदललेल्या स्वरूपाला इतर काहीही कारण नसलं तरी केवळ याच कारणासाठी सम्राज्ञींच्या सरकारनं मान्यता देऊ नये.

दंगल सुरू असताना गणराज्यातील युटिलँडर लोकांना जर नागरिकाप्रमाणे वागवण्यात आलं व त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला तर ते मेलॉबाख आघाडीवर आनंदानं काम करतील असं उघडपणे मान्य करण्यात आलं होतं. त्यामुळे जर युरोपिअन अथवा प्रस्तावात लिहिण्यात आलेलं आहे त्याप्रमाणे 'गोऱ्या' ब्रिटिश प्रजेला राजकीय अधिकार नसल्यामुळे बंधनाच्या अवस्थेत राहावं लागतं आणि त्यामुळे जर त्यांना सूट देण्यात आलेली असेल तर आम्ही नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की ब्रिटिश भारतीय प्रजेला दक्षिण आफ्रिकी गणराज्यात राजकीय अधिकार तर नाकारण्यात आलेले आहेतच पण त्याचबरोबर त्यांना चल संपत्तीपेक्षा किंचतच चांगली वागणूक देण्यात येत असल्याचं या ठरावातून पुन्हा

एकदा दिसून आलेलं आहे. [नाताळमधील भारतीय समाजाच्या वतीनं सन्माननीय महोदय सम्राज्ञींचे वसाहत मंत्री जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, नोव्हेंबर २६, १८९५]

दक्षिण आफ्रिकेत सर्वत्र भारतीयांचा जो छळ होत होता त्यात भारतीयांच्या स्वातंत्र्यावर झालेल्या या नवीन हल्ल्यामुळे सम्राज्ञींच्या सरकारला अजूनच उत्तेजन मिळालं.

हे निवेदन चेम्बर्लेनकडे पाठवताना दादाभाई नौरोजींनी लिहिलं की दक्षिण आफ्रिकी सरकारनं ब्रिटिश प्रजेची व्याख्या केवळ 'गोरी प्रजा' अशी केल्यामुळे 'सम्राज्ञींच्या सरकारला आपल्या प्रजेसाठी सैन्यभरतीपासून मिळणाऱ्या सूटीचं जे संरक्षण आवश्यक आहे असं वाटतं ते संरक्षण ट्रान्सवालमधील सर्व ब्रिटिश भारतीय प्रजेला मिळू शकणार नाही.' दादाभाई नौरोजींनी आशा व्यक्त करत लिहिलं की 'आपल्या लहरीप्रमाणे 'ब्रिटिश प्रजा' या शब्दाचा अर्थ मर्यादित करणारा हा ठराव' गृहमंत्रालय फेटाळून लावील अशी अपेक्षा आहे. [*इंडिया*, जानेवारी १८९६, पृष्ठ ६]

फेब्रुवारी ११, १८९६ला चौदाव्या संसदेच्या दुसऱ्या सत्राचं राणी व्हिक्टोरियानं उद्घाटन केलं तेव्हा बोअर आणि ब्रिटिश यांच्यातील संघर्ष अटळ झाला. विरोधीपक्ष रेडच्या संपूर्ण प्रकरणाची आणि त्याबाबतीत वसाहत कार्यालयाच्या भूमिकेच्या चौकशीची जोरदार मागणी करत होता. राणीनं केलेल्या भाषणात दुरुस्ती सुचवणारा जो प्रस्ताव हेन्री ड्यू प्री लॅबॉचर यांनी मांडला होता त्याला फेब्रुवारी १३ला अर्नोल्ड फॉस्टर यांनी पाठिंबा दिला. हेन्री ड्यू प्री लॅबॉचर यांनी मांडलेला दुरुस्ती प्रस्ताव असा होता: *'दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच ज्या घटना घडल्या आहेत त्यांच्या चौकशीची कक्षा जोपर्यंत दक्षिण आफ्रिकेतील सनदप्राप्त कंपनीच्या आर्थिक आणि राजकीय व्यवहारापर्यंत वाढवण्यात येणार नाही तोपर्यंत चौकशी पूर्ण होणार नाही.'* प्राप्त परिस्थितीत क्रुगरच्या राजवटीच्या 'तुष्टीकरणाचा' विचारही करता येऊ शकत नाही. वातावरणाचा रंग पाहून *टाईम्सनं* व्होल्क्सराडच्या प्रस्तावाच्या संदर्भात लिहिलं :

ह्या गोष्टीकडे पाहताच ती राक्षसी असल्याचं दिसून येतं. ब्रिटिश सैन्याच्या बंदुकांच्या विरोधातही ट्रान्सवाल बंदुकीच्या धाकावर ब्रिटिश भारतीय प्रजेला कशा प्रकारे धमकावत आहे ते दिसून येतं. [गांधीजींचं मुंबईत भाषण, सप्टेंबर २६, १८९६]

अशा रीतीनं दडपण आल्यानंतर चेम्बर्लेन यांनी खंबीर भूमिका घेतली. सैन्यभरतीसंबंधीच्या कराराला मान्यता देणाऱ्या व्होल्क्सराडच्या प्रस्तावात भेदभाव करणारं जे कलम आहे त्याकडे आपलं लक्ष वेधण्यात आलं आहे काय असा प्रश्न फेब्रुवारी १४, १८९६ला भोवनग्री यांनी हाउस ऑफ कॉमन्समध्ये विचारला असता त्या प्रश्नाला उत्तर देताना चेम्बर्लेन म्हणाले की 'रंगामुळे भेदभाव करायला मज्जाव करण्यासाठी पावलं उचलण्यात येत आहेत.' [*इंडिया*, मार्च १८९६, पुरवणी पृष्ठ ४]

१४

या सार्वजनिक कार्याच्या घाईगडबडीतही गांधीजी आपले छंद विसरले नव्हते - शाकाहारवाद आणि एसोटेरिक ख्रिश्चन ब्रदरहुड. एसोटेरिक ख्रिश्चन ब्रदरहुडच्या संदर्भातील त्यांचं काम आधीच नजरेत यायला लागलं होतं. गांधीजी एकीकडे अतिशय व्यवहारी होते. परंतु त्याचबरोबर ते एक महान स्वप्नद्रष्टे होते आणि भव्योदात्त स्वप्न पाहायची त्यांना सवय होती. त्यांच्यात वास्तव आणि गूढाचं जे संमिश्रण झालं होतं त्यामुळे त्यांचं व्यक्तिमत्व आगळंच झालं होतं. शाकाहारवादात आणि एसोटेरिक ख्रिश्चन ब्रदरहुडच्या तत्त्वज्ञानात - ज्यात शाकाहाराला आध्यात्मिक जीवनाचा आंतरिक भाग मानण्यात आलं होतं - सुवर्णयुग परत आणायची किल्ली आहे असं त्यावेळी गांधीजींना वाटत होतं. त्यामुळे गांधीजींच्या जीवनात त्यांना एक विशेष स्थान मिळालेलं होतं. नव्या उत्साहाच्या भरात त्यांना वाटत होतं की सर्व प्रश्नांच्या - भौतिक आणि आधिभौतिकही, ज्यात ते हाताळत असलेल्या राजकीय प्रश्नांचाही समावेश होता - उत्तरांची किल्ली यांच्यातच आहे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेत शाकाहारी असलेल्या ट्रॅपिस्ट मिशनऱ्यांच्या अनेक वस्त्या असल्याचं त्यांना जेव्हा कळलं तेव्हा त्यांना अतिशय आनंद झाला. अशीच एक

वस्ती होती पाईन टाऊनजवळ मार्टिन हिल येथे. पाईन टाऊन हे लहानसं खेडं होतं व ते ११,००० फूट उंचावर वसलेलं होतं. तिथलं हवामान अतिशय सुंदर होतं. ॲना किंग्जफोर्ड यांच्या *परफेक्ट वे इन डायट* हे पुस्तक विद्यार्थीदशेत असताना त्यांनी जेव्हा इंग्लंडमध्ये वाचलं होतं व त्यातून त्यांना शाकाहारी मिशनऱ्यांच्या समूहाची माहिती कळली होती तेव्हापासूनच गांधीजी त्यांना भेटायला फार उत्सुक होते. एप्रिल १८९५मध्ये गांधीजी आपल्या एका मित्रासह ट्रॅपिस्ट मिशनऱ्यांना भेटायला पाईन टाऊन येथे गेले.

एका सुंदर सकाळी ते त्यांना भेटायला निघाले. त्यांची वाट गर्द झाडांची राई असलेल्या दरीतून जात होती. त्या दरीतून एक लहानशी नदी झुळझुळ असा गोड आवाज करत वाहत होती. इतक्या सुंदर वातावरणातील इतक्या सुंदर फेरफटक्याची क्वचितच कल्पना करता येईल. ती दरी आणि आणि त्या मठाच्या आजुबाजूच्या टेकड्यांवर हिरवळीचा जणू गालिचाच अंथरलेला होता. वस्तीत त्यांचं स्वागत चिंचेच्या पाण्यानं आणि अननसानं करण्यात आलं. वेगवेगळ्या कार्यशाळांमध्ये जवळपास १,२०० नेटिव्ह विद्यार्थ्यांना लोहारकाम, कल्हईकाम, सुतारकाम, चांभारकाम, कातडी कमावणं आदी जी कामं शिकवण्यात येत होती त्यांचा होणारा आवाज सोडला तर त्या लाल रंगाच्या विटांच्या इमारतीत नीरव शांतता होती.

ती वस्ती एखाद्या आदर्श खेड्यासारखी स्वयंपूर्ण होती. तिचं संचालन समता, स्वातंत्र्य, आणि बंधुता या 'गणराज्याच्या खऱ्याखुऱ्या सिद्धान्तानुसार होत होतं. 'इथं प्रत्येक माणूस भाऊ आहे, प्रत्येक स्त्री बहीण आहे.' त्यांच्या प्रार्थनापूर्ण श्रमानं, शांतता न ढळणाऱ्या जीवनानं अतिशय प्रभावित होऊन त्यांनी व्हेजिटेरिअनमध्ये लिहिलं :

सर्व भाऊ आणि बहिणी शांततेचं आणि ब्रह्मचर्याचं काटेकोरपणे पालन करत होते. नाताळच्या ट्रॅपिस्ट युनियनचे प्रमुख ॲबॉट यांच्या परवानगीशिवाय कोणताही भाऊ अथवा बहीण बोलत नव्हते. ज्यांना शहरात बाजारहाटासाठी जायचं असायचं वा पाहुण्यांची देखभाल करायची असायची त्यांनाच केवळ बोलायची परवानगी होती....

आदर्श ट्रॅपिस्ट सकाळी २ वाजता उठतो आणि ४ तास प्रार्थनेत आणि ध्यानात घालवतो. ६ वाजता तो न्याहरी करतो. त्यात ब्रेड, कॉफी वा तत्सम साधे पदार्थ असतात. तो १२ वाजता जेवतो आणि जेवणात ब्रेड, सूप आणि फळं घेतो. सायंकाळचं जेवण ते ६ वाजता घेतात व ७ वा ८ वाजता झोपायला जातात. भाऊ मांसमच्छी वा पक्षी काहीच खात नाहीत.... त्यांनी अंड्यांचाही त्याग केलेला आहे.... कोणत्याही प्रकारच्या मादक द्रव्याचं ते सेवन करत नाहीत.... कोणीही खाजगी खर्चासाठी पैसे ठेवत नाही. सर्व जण सारखेच गरीब वा श्रीमंत आहेत.... खरेदीची ज्यांना परवानगी आहे त्यांच्याशिवाय वस्तीच्या बाहेर कोणीही कधीच जात नाही. धार्मिक नसलेली वृत्तपत्रं वा पुस्तकं ते वाचत नाहीत. ते परवानगी असलेल्या पुस्तकांशिवाय धार्मिक पुस्तकही वाचत नाहीत. [एम. के. गांधी, *'अ बँड ऑफ व्हेजिटेरियन मिशनरीज', द व्हेजिटेरिअन,* मे १८, १८९५]

मठातील जेवणघरात टेबलवर चादर टाकत नाहीत. वस्तीतच तयार केलेल्या लाकडी टेबलांना पॉलिश केलेलं नसते. काटे आणि चमचे 'डरबनमधील सर्वात कमी किमतीचे असतात.' काचेच्या भांड्यांऐवजी ते एनॅमलची भांडी वापरतात. तिथं कुठंही रंगभेद आढळून येत नव्हता. 'नेटिव्ह' गोऱ्यांबरोबरच काम करत होते व त्यांना समान वागणूक मिळत होती. हे सर्व पाहून त्यांना अतिशय आनंद झाला.

इतर संस्थांच्या मिशनरी शाळा नेटिव्हांना बहुधा पाश्चात्य संस्कृतीचे सर्व भयानक दोष शिकवतात आणि त्यांच्यावर क्वचितच नैतिक संस्कार करतात. ट्रॅपिस्ट मिशनमध्ये गेलेले नेटिव्ह साधेपणा, सद्गुण आणि नम्रपणा यांचं उदाहरण आहेत. शेजारून जाणारांना ते जेव्हा नम्रपणानं परंतु प्रतिष्ठितपणानं नमस्कार करतात तेव्हा ते दृश्य डोळ्यांसाठी एक प्रकारची मेजवानीच असते. [वरीलप्रमाणे]

त्यांना सर्वात अधिक नवल याचं वाटलं की तेथील बहुतेक मिशनरी जर्मन असूनही त्यांनी आपल्या धर्मात आलेल्या लोकांवर आपली भाषा लादायचा किंचितही प्रयत्न केला नाही. कला आणि हस्तव्यवसायाचं शिक्षण झुलू आणि इंग्रजी भाषेत एकाचवेळी देण्यात यायचं.

त्या वस्तीत मुद्रणालय, पाण्यावर चालणारी पिठाची गिरणी आणि तेलघाणी होती. ह्यांच्यातून आणि इतर कार्यशाळातून त्यांच्या सर्व गरजा भागवल्या जायच्या. त्या वस्तीत गंभीर धार्मिक वातावरण सर्वत्र नांदत असल्याचं दिसत होतं.

प्रत्येक खोलीत क्रूस होता आणि दाराशी पवित्र पाणी ठेवायचं भांडं ठेवलेलं असायचं. त्यातील पाणी प्रत्येक निवासी अतिशय श्रद्धेनं आपल्या पापण्याना, कपाळाला आणि छातीला लावायचा. एवढंच नाही तर पिठाच्या गिरणीकडे घाईगडबडीत जातानाही क्रुसाची आठवण व्हावी असं काही तरी ठेवलेलं असायचं..... शिळांवर.... असे काही तरी शब्द कोरलेले असायचे की त्यातून आपल्याला ख्रिस्ताच्या वधाच्या प्रसंगाची आठवण व्हावी....

त्यातील काही शब्द असे होते : 'येशू पहिल्यांदाच पडतो'; 'सायमन क्रूस नेतो'; 'येशूला त्याच्या आईच्या मांडीवर ठेवतात' इत्यादी इत्यादी. ही सर्व वाक्यं इतक्या व्यवस्थित ठिकाणी कोरलेली असायची की एका वाक्याचा मनातील विचार संपत नाही तोच दुसरं वाक्य डोळ्यासमोर यायचं. अशा प्रकारे त्या वाटेवरील संपूर्ण 'वाटचालीला ध्यानाचं स्वरूप यायचं.' [वरीलप्रमाणे] आणि बाह्य जगातील घाईगडबडीचा त्यात कोणताही व्यत्यय येत नसे.

दक्षिण आफ्रिकेतील ट्रॅपिस्ट लोकांच्या १२ वस्त्यात ३०० साधू आणि १२० साध्वी असे ४२० लोक राहत होते.

नाताळमधील आमचे शाकाहारी हे असे आहेत. त्यांनी जरी शाकाहार हा आपला धर्म मानलेला नसला, आपल्या देहाला त्यागाच्या वेदीवर चढवण्यासाठी त्यांनी जरी शाकाहाराचा अवलंब केलेला असला, आणि त्यांना व्हेजिटेरिअन सोसायटींची कल्पनाही नसली व तशी ती नसायचीच शक्यता आहे, आणि शाकाहारवादावरील काही साहित्य वाचायची त्यांना जरी फिकीर नसली तरीही असा कोणी शाकाहारी आहे काय की ज्याला या उदात्त लोकांना पाहून अभिमान वाटणार नाही, एवढंच नाही तर या लोकांशी सहज संपर्क आला तरी आपलं अंतःकरण प्रेम, दयाळूपणा आणि स्वार्थत्याग आदी भावनांनी भरून आल्याशिवाय राहू शकणार नाही?

आणि शाकाहाराचा आध्यात्मिक दृष्टीनं उपयोग आहे हे दर्शविणारा अजून दुसरा पुरावा कोणता आहे ? [वरीलप्रमाणे]

त्यांच्या "ora et labora" 'जनसेवा ही ईशसेवा' या बोधवाक्याचा गांधीजींच्या धर्मात - मानवतेच्या निःस्वार्थ सेवेतून ईश्वराची सेवा - साररूपानं समावेश झालेला होता. सहजपणानं आणि गंभीरपणानं ते करत असलेल्या तपश्चर्येमुळे गांधीजींचं मन त्यांनी जिंकलं. तिथं दुःखीकष्टी चेहरा एकही नव्हता. 'जिथं कुठं आम्ही गेलो तिथं हसऱ्या व उत्साही चेहऱ्यानं आणि नम्रपणे वाकून केलेल्या नमस्कारानं आमचं स्वागत करण्यात यायचं.... अविनाशी श्रद्धा आणि परिपूर्ण व निःशंक आज्ञाधारकपणा याचं याहून चांगलं दुसरं उदाहरण कुठेच सापडू शकत नाही. रोमन कॅथॉलिक धर्म असा असेल तर त्याबाबतीत जे काही सांगण्यात आलेलं आहे ते सर्व खोटं असायला पाहिजे.' गांधीजींनी आश्चर्योद्‌गार काढले. रोमन कॅथॉलिक हे दुर्मुखलेले आणि दुःखी असतात असं प्रॉटेस्टंट धर्मगुरू जे म्हणाले होते त्या संदर्भात गांधीजी बोलत होते. तिथं गांधीजी जो धडा शिकले तो होता 'कोणताही धर्म मुळात ईश्वरीही नसतो आणि सैतानीही नसतो; धर्माचे अनुयायी कशा प्रकारे त्या धर्माचं आचरण करतात यावरून तो धर्म ईश्वरी की सैतानी हे ठरत असतं.'

नंतर टॉलस्टॉय फार्मवर गांधीजींनी सत्याग्रहींसाठी साधेपणा आणि शारीरिक श्रमाच्या तत्त्वावर सामुदायिक जीवनाचा प्रयोग जेव्हा आरंभिला तेव्हा त्यांनी आपल्या एका सहकाऱ्याला चपला बनवायचं शिक्षण घेण्यासाठी ट्रॅपिस्ट लोकांच्या वस्तीवर पाठवलं. गांधीजींनी तिथं जी जीवनपद्धती पाहिली ती त्यांच्या विविध आश्रमांमध्ये त्यांना प्रेरणा देत राहिली. १९३४ साली हरिजन कार्यासाठी जमलेल्या कार्यकर्त्यांनी कोणता आदर्श डोळ्यासमोर ठेवावा हे सांगताना गांधीजींनी पाईन टाऊनमधील ट्रॅपिस्ट लोकांच्या मठाला दिलेल्या भेटीची आठवण अतिशय भावपूर्ण अंतःकरणानं सांगितली.

त्यांच्या जीवनात स्वतःसाठी खाजगी असं काहीच नव्हतं.... त्यांना २.३० वाजता उठावं लागायचं..... काटेकोरपणानं ते शांततेच्या शपथेचं पालन करायचे.... त्यांचा मठ हा सौंदर्याचा आदर्श होता.... त्यात कुठंही धुळीचा कणही नव्हता व तिथं सर्व वातावरणाला भारून टाकणारी गोड शांतता पसरलेली होती. [*हरिजन*, ऑगस्ट २४, १९३४]

शाकाहारवादाच्या तत्त्वावर गांधीजींनी आपल्या ज्या राजकीय तत्त्वज्ञानाची उभारणी केली होती ती त्यांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानापेक्षा काही कमी महत्त्वाची नव्हती. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या लोकांमध्ये शाकाहार प्रचलित नसल्यामुळे भाजीपाला व फळांच्या उत्पादनाचं काम भारतीयांसाठी सोडून देण्यात आलं होतं. भारतीय शाकाहारी असल्यामुळे शेतीव्यवसाय पत्करण्यात त्यांना कोणतीच अडचण गेली नाही. यामुळे गोऱ्या लोकांमध्ये मत्सर निर्माण झाला व त्यामुळे भारतीयांना दक्षिण आफ्रिकेतून बाहेर घालवण्यासाठी त्यांनी 'आपलं नाक कापून दुसऱ्याला अपशकुन करणाऱ्या आत्मघातकी धोरणाचा' अवलंब सुरू केला. परंतु त्यांच्यातील अदूरदर्शित्वाचा त्यांनी त्याग केला असता तर त्यांच्या लक्षात आलं असतं की बागबगीच्यांची ती वसाहत तिथं असलेल्या लोकांपेक्षा दुप्पट व कदाचित तिप्पट लोकांनाही सामावून घ्यायला समर्थ होती. आशियायी लोकांविरुद्ध ओरड होण्यासाठी 'गर्दीचं जे कारण सांगण्यात येत होतं त्यावर शाकाहार हा उपाय होता.

संपूर्ण गणराज्यातील जमीन अतिशय सुपीक असली तरी ती वाळवंटाप्रमाणे ओसाड पडलेली आहे. काही कारणानं सोन्याच्या खाणींचं काम बंद पडलं तर हजारो लोक बेकार होतील आणि अक्षरशः त्यांना उपाशी मरावं लागेल. अशा प्रसंगी काही धडा शिकण्यासारखा नाही काय? मांसाहाराच्या सवयीमुळे समाजाच्या प्रगतीत वास्तवात खीळ बसलेली आहे व त्यामुळे ज्या दोन महान समुदायांनी हातात हात घालून एक व्हायला पाहिजे होतं त्यांच्यात अप्रत्यक्षपणे संघर्ष व्हायची वेळ आलेली आहे. [एम. के. गांधी, *'अ बैंड ऑफ व्हेजिटेरिअन मिशनरीज'*, *द व्हेजिटेरिअन*, मे १८, १८९५]

गोऱ्यांनी जर आपल्या खानपानाच्या सवयीत बदल केला तर त्यांना मानसिकच नव्हे तर शारीरिक लाभ होईल. 'मला माहीत आहे की जर युरोपिअन व त्यांची मांसाहाराची भांडी नसती तर अनेक डॉक्टर उपाशी मेले असते. भारतीय काटकसर आणि निर्व्यसनीपणाच्या सवयीमुळे, ज्यांचं श्रेय शाकाहाराकडे जातं, युरोपिअनांशी स्पर्धा करू शकतात.'

काही काळानंतर त्यांनी परत शाकाहाराचा जोरदार पुरस्कार करायला सुरुवात केली. समजावण्याच्या व जाहिरातीच्या मार्गाचा नऊ महिने प्रयत्न करूनही दक्षिण आफ्रिकेत शाकाहाराला फारसे पाय रोवता आले नाहीत.

इथं लोक सोन्यापेक्षा इतर कशाचाच विचार करत नाहीत. या प्रदेशात सोन्याचा आजार इतका संसर्गजन्य आहे की त्याच्या तडाख्यातून लहान मोठा तर काय पण धर्मगुरूही सुटलेले नाहीत. जीवनातील उच्चतर ध्येयांसाठी त्यांच्याजवळ वेळच नाही. जीवनाच्या भौतिक गरजांच्या पलीकडे पाहायलाही त्यांना वेळ नाही.

निसर्गानं दक्षिण आफ्रिकेला आणि वैशिष्ट्यानं नाताळला भरपूर देणगी दिलेली असल्यामुळे तर ही गोष्ट अजूनच शोचनीय आहे. ह्या देणगीमुळे या प्रदेशातील लोकांसाठी शाकाहाराची सवय अतिशय सोयिस्कर आहे. ज्या माणसांजवळ दृष्टी आणि साधनं आहेत त्यांनी पुढं येऊन फळांची आणि भाज्यांची लागवड करायला पाहिजे. परंतु त्यासाठी त्यांना भारतीयांविरुद्धचे पूर्वग्रह सोडावे लागतील.

अगदी थोड्या लोकांचं मन जर वळवता आलं आणि त्यांचं लक्ष जोहान्सबर्गच्या सोन्याकडून शेतीद्वारे अर्थार्जनाच्या शांत पद्धतीकडे वळवता आलं आणि त्यांच्यातील भारतीयांबद्दलचे पूर्वग्रह दूर करता आले तर नाताळमध्ये सर्व प्रकारच्या भाज्या आणि फळं पिकवता येतील यात काही संशय नाही.... त्यांना मदत करायला त्यांच्याजवळ भारतीय आहेत. परंतु रंगाबद्दलच्या पूर्वग्रहामुळे ते त्यांचा उपयोग करू शकत नाहीत.... माझ्याजवळ एका

बागायतदाराचं पत्र आहे. त्याला भारतीय मजुराला कामावर लावावं असं फार वाटतं परंतु त्याच्या पूर्वग्रहांमुळे त्याचे हात बाधले गेलेले आहेत.

अशा रीतीनं भारतीय आणि युरोपिअन शाकाहारी लोकांसाठी देशभक्तीचं न संपणारं काम वाढून ठेवलेलं आहे :

गोरी ब्रिटिश प्रजा आणि भारतीयांच्या संबंधात दक्षिण आफ्रिकेत निर्माण झालेली दरी दिवसेंदिवस वाढते आहे. श्रेष्ठ इंग्रज आणि भारतीय मुत्सद्यांचं मत आहे की इंग्लंड आणि भारत यांच्यात प्रेमाचे अतूट संबंध निर्माण होऊ शकतात. अध्यात्मवाद्यांना वाटतं की अशा प्रकारचं ऐक्य निर्माण झाल्यास त्याचे चांगले परिणाम होतील. दक्षिण आफ्रिकेतील गोरी ब्रिटिश प्रजा मात्र यात खीळ घालण्यासाठी व जमल्यास अशा प्रकारचं ऐक्य होऊच नये म्हणून प्रयत्न करत आहे. अशा प्रकारच्या संकटातून वाचवण्यासाठी काही शाकाहारींनी पुढं यायला पाहिजे. [वरीलप्रमाणे, डिसेंबर २१, १८९५]

शाकाहारवादाचं ज्ञान आणि त्यासंबंधीची हृदयातील तीव्र तळमळ घेऊन मिशनऱ्याप्रमाणे अशा लोकांनी पुढं यायला पाहिजे आणि फळं आणि भाजीपाल्यांच्या बागांसाठी अनुकूल असलेल्या देशात आर्थिक उपक्रम म्हणून लावायला पाहिजे. त्यांचं म्हणणं होतं की उत्तम नीतिशास्त्र हे उत्तम अर्थशास्त्रही असलं पाहिजे. अशा प्रकारची शेतं ही त्या त्या विभागातील 'शाकाहारवादाची खरी केंद्र बनतील.' परंतु त्यासाठी शाकाहार त्यांचा धर्म असायला हवा, केवळ 'आरोग्याची सोय' असू नये.

त्यानंतरच्या वर्षात *नाताळ अॅडव्हरटाईझरला* लिहिलेल्या पत्रातून त्यांनी आपल्या शाकाहारवादाच्या तत्त्वज्ञानाचं विवेचन केलं. माणसाच्या नवचैतन्यासाठी शाकाहारवाद एक साधन म्हणून सर्वोत्कृष्ट आहे असं त्यांचं म्हणणं होतं. जर्मन निसर्गोपचारक लुईस कुन्हे यांनी लिहिलेल्या *द न्यू सायन्स ऑफ हिलींग* या पुस्तकावरील परीक्षणात्मक महत्त्वाचा लेख त्या वृत्तपत्रात प्रकाशित झाला होता. त्यामुळे गांधीजींना ते पत्र लिहायची स्फूर्ती झाली होती. बुद्ध,

पायथॅगोरस, प्लेटो, पॉरफिरी, वेस्ली, शेली, आणि एडिसन (वैज्ञानिक) यांच्यासह जगातील किती तरी प्रसिद्ध व्यक्ती शाकाहारी होत्या. ख्रिश्चन शाकाहारवाद्यांचं म्हणणं आहे की येशूही शाकाहारी होता 'आणि पुनरुत्थानानंतर त्यानं भाजलेला मासा खाल्ला एवढ्या संदर्भाशिवाय या दृष्टिकोनाला विरोधी असं काही आढळत नाही.' 'माणसाच्या आध्यात्मिक शक्तीसाठी सरसकट मांसाहारापेक्षा अधिक हानिकारक काहीही नाहीं' असं जगातील सर्व धर्मगुरूंनी आपल्या आचरणातून दाखवून दिलं आहे. त्याचप्रमाणे 'अज्ञेयवाद, जडवाद, आजच्या काळातील धार्मिक औदासिन्य' यांचं कारण 'अतिशय मांसाहार आणि मद्यपान' असल्याचं आढळेल व त्यामुळे 'माणसाची आध्यात्मिक शक्ती आंशिक वा पूर्णपणे लोप पावते.' जगातील काही अतिशय बुद्धिमान लोक 'वैशिष्ट्यानं आपलं सर्वोत्तम लेखन करताना संयमशीलतेचं आचरण करतात.' 'स्वार्थी माणसांच्या वासनापूर्ण आणि रोगट भुकेसाठी मानवसमाजातील काही लोकांना खाटकाचा धंदा करावा लागतो या गोष्टीचं शाकाहारी नैतिकतावाद्यांना दुःख होत असतं याची त्यांना खंत वाटत नाही.' मांसाहार आणि मद्यपान यांसारख्या उत्तेजक पदार्थाशिवायही 'वासनांवर नियंत्रण ठेवणं आणि सैतानाच्या आव्हानातून सुटणं' काही सोपी गोष्ट नसते. त्यातच अडचणीत भर घालणाऱ्या मांसाहार आणि मद्यपान या गोष्टींचा आश्रय घेतल्यास केवळ देवच आपल्याला वाचवू शकतो. माणसाचा अधःपात व्हायच्या आधी माणूस शाकाहारी होता या बायबलमध्ये सांगितलेल्या गोष्टीवरून बायबलवर विश्वास असणारांना शाकाहारासंबंधीचा एक पुरावा आढळून येईल.

आणि देव म्हणाला : पाहा, मी तुला बी असलेली प्रत्येक वनस्पती दिली आहे जी या पृथ्वीच्या तोंडावर आहे, आणि ज्या प्रत्येक झाडाला फळ आहे त्यात झाडाला जन्म देणारी बी आहे; तुझ्यासाठी तेच मांस असेल. आणि या पृथ्वीवरील प्रत्येक श्वापदासाठी, आणि हवेतील प्रत्येक पक्षासाठी, आणि या पृथ्वीवर सरपटणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी, जिथे कुठे जीव असेल त्या

प्रत्येकासाठी मी मांसाऐवजी वनस्पती दिलेली आहे. आणि त्याप्रमाणे झालं. [गांधीजींचं संपादक *नाताळ मर्क्युरीला* पत्र, दिनांक फेब्रुवारी ३, १८९६ प्रकाशन फेब्रुवारी ४, १८९६]

अखेरीस ज्यांनी 'धर्मांतर' (ख्रिश्चन धर्माचा स्वीकार) केलेलं नाहीं त्यांच्यासाठी मांसाहार हा क्षम्यही असू शकेल परंतु ज्यांचा आपण 'पुन्हा जन्मलो' वर विश्वास आहे त्यांच्यासाठी नाही. त्यांची अवस्था 'अधःपातपूर्व माणसापेक्षा श्रेष्ठ जरी नाही तरी समान निश्चितच असायला हवी.' ॲपोकॅलिप्सेमधील भविष्यानुसार पूर्वस्थिती प्राप्त व्हायच्या वेळी :

लांडगासुद्धा कोकराबरोबर राहील, आणि चित्ता शिशुबरोबर झोपेल, आणि वासरू व तरुण सिंह एकत्रित खेळतील; आणि एखादा लहानसा मुलगा त्यांना हाकारत नेईल.... आणि सिंह बैलाप्रमाणे गवत खाईल.... माझ्या पवित्र पर्वतात ते कुणाचाही नाश करणार नाहीत वा कुणाला दुखापत करणार नाहीत; कारण पाणी ज्याप्रमाणे सागरावर आच्छादलेलं असत त्याप्रमाणे पृथ्वी ईश्वरी ज्ञानानं परिपूर्ण असेल. [वरीलप्रमाणे]

गांधीजींनी समारोप करत लिहिलं की या गोष्टी अजून संपूर्ण जगापासून फार दूर असू शकतील, परंतु 'ज्यांना हे माहीत आहे आणि शक्य आहे ते ख्रिश्चन ही गोष्ट काहीही झालं तरी स्वतः अमलात का आणत नाहीत? अशी अपेक्षा करण्यात कोणतीही हानी नाही आणि कदाचित याची गती वाढेलच.' [वरीलप्रमाणे]

* * * *

जसं प्रामाणिक उत्साहासारखं संसर्गजन्य काहीच नसतं तसंच काही निरागस लहानसहान 'वेड' आणि स्वतःचीच थट्टा करून त्यावर हसायची क्षमता यासारखं आकर्षकही काहीच नसतं. शाकाहारवाद आणि एसोटेरिक ख्रिश्चनत्व यांच्या कार्याबद्दलच्या प्रेषिताच्या उत्साहामुळे गांधीजींचे अनेक प्रामाणिक राजकीय गोरे विरोधकही गांधीजींकडे आकर्षित झाले. त्यांच्या सरळ साध्या स्वभावामुळे अनेकदा त्यांच्याकडे पाहताना भुवया वर व्हायच्या आणि

त्यांची थट्टा केली जायची. एसोटेरिक ख्रिश्चन युनियनचं साहित्य लेकप्रिय करण्यासाठी अबे कॉस्टंट यांनी पुस्तकाच्या वेष्टनावर पुस्तकाचा जो परिचय करून दिला होता तो उद्धृत करत 'संपादकाला लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी दावा केला होता की एडवर्ड मेटलँडच्या द परफेक्ट वेमध्ये अखेरीस मानवी अस्तित्वासंबंधीचे जे तीन चिरंतन प्रश्न आहेत त्यांचं संपूर्ण आणि समाधानकारक उत्तर मिळतं. नाताळ मर्क्युरीनं त्यांची चेष्टा करत लिहिलं :

'आपण कुठून आलो, आपण कोण आहोत, आपण कुठं जाणार?' ही काही इनोची जाहिरात नाही; आम्हाला सांगण्यात येतं की हे तीन असे सर्वोच्च प्रश्न आहेत की जे मानवानं सतत विचारलेले आहेत आणि ज्यांचं संपूर्ण आणि समाधानकारक उत्तर श्रीयुत गांधींना रस असलेल्या एक वा दोन लहानशा तत्त्वज्ञानात्मक पुस्तकात सापडतं असा श्रीयुत गांधींचा दावा आहे.

'तुम्ही जर सावरला असाल तर आपण पुढं जाऊ या. सामान्यपणे सार्वत्रिक मान्यता आहे की हे आश्चर्यजनक एकोणिसावं शतक (एका दोषैकदृष्टीच्या आयरिश गृहस्थांच्या शब्दात सांगायचं तर - हे तथाकथित एकोणिसावं शतक) विज्ञानातील आश्चर्यकारक शोधांसाठी स्मरणात राहील. ज्यात वाफेवर चालणारी यंत्रं आणि इतर राक्षसी साधनं अशा किती तरी दृष्टिगोचर होणाऱ्या व थक्क करणाऱ्या गोष्टींचा समावेश आहे. परंतु या 'संपूर्ण आणि समाधानकारक' उत्तरामुळे जे महान युग अवतरत आहे (वा आपण असं म्हणू या की अवतरलं आहे) त्यात हे सर्व विस्मरणात जाणार आहे. आणि तरीही आपण ह्या आश्चर्यकारक बातमीकडे वरवर पाहतो आणि जांभई देऊन समभागाच्या वृत्तांताकडे जणू काही काहीच झालेलं नाही अशा रीतीनं वळतो !!! [*नाताळ मर्क्युरी*, डिसेंबर १९, १८९४]

या हल्ल्याला अजूनच झणझणितपणा यामुळे आला की निसर्गोपचाराकडे वळण्यापूर्वी महात्मा शब्दशः इनोज फुट सॉल्टचे गुलाम होते. दररोज सकाळी गडवाभर पाण्यात ते चमचाभर इनोज फ्रुट सॉल्ट टाकायचे व बुडबुडे येणारं ते आरामदायी द्रव्य गटगट प्यायचे. त्यांच्या या

सवयीची त्यांच्या वर्तुळातील अनेक लोक चेष्टा करायचे असं गांधीजी हसत हसत नंतरच्या काळात सांगायचे. नाताळ मर्क्युरीचं संपादकीय लिहिणाराला त्यांची ही सवय माहीत असली पाहिजे.

गांधीजींना ही चेष्टा वाचून नक्कीच गंमत वाटली असेल कारण त्यांनी तो लेख काळजीपूर्वक कापून आपल्या कात्रणाच्या पुस्तकात जपून ठेवला होता. ह्या अमूल्य देणगीचं मोल सांगणारी आणि ती आपणा सर्वांना मिळावी अशी प्रार्थना करणारी साक्ष स्कॉटीश गृहस्थांच्या वचनातूनही मिळते. '*इतरांना आपण जसं दिसतो तसं आपण स्वतःह कडे पाहावं.*'

प्रकरण ३: 'पाण्यावर काय आहे ?'

१

सवलतीत मिळालेलं १८९४ साल संपत आलेलं होतं. मतदान दुरुस्ती विधेयकावर नाताळ आचके देत होता. असं सांगतात की ज्या महत्त्वाच्या प्रतिनिधींनी इंग्लंडला भेट दिलेली होती त्यांनी लॉर्ड रिपन यांना सूचना केली होती की विधेयक फेटाळण्यात आलं तर दुसरा उपाय योजण्यात येईल व तो 'कदाचित याहूनही कठोर असेल.' परंतु त्यांच्या उद्गारानंतर मान्यवर महोदय काय म्हणाले ते मात्र त्यांनी सांगितलं नाही. मंत्र्यांच्या वृत्तपत्रानं तक्रार करत लिहिलं, 'वसाहतमंत्र्यांच्या उत्तराची अजून प्रतीक्षा आहे.' [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५] परंतु अफवाबाई मात्र सांगत होत्या की ते विधेयक फेटाळण्यात आलेलं आहे. लंडनहून अनेकांनी खाजगीत दिलेला सल्लाही असाच होता. नाताळ विटनेसनं जानेवारी ११, १८९५ला स्पष्टपणे लिहिलं, 'सम्राज्ञींना आपल्या अधिकाराचा उपयोग करायचा सल्ला देण्यात आलेला आहे.' [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५]

द टाईम्सनं लिहिलं:

इतकंच नाही तर जेव्हा कुली करारात बद्ध होते व पूर्णपणे मजुरीचं काम करत होते तेव्हा वसाहतीत त्यांचे कोणतेही कायम हितसंबंध नव्हते. परंतु स्वतंत्र आशियायी लोक नाताळमध्ये कायम वास्तव्य करू लागल्यानंतर आणि त्यांना सांसदीय मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतर परिस्थितीला हळूहळू अधिक गंभीर वळण मिळू लागलं आहे व त्या परिस्थितीकडे दक्षिण आफ्रिकेत सर्वत्र काळजीनं व नाराजीनं पाहण्यात येत आहे. [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५]

गूढ उकलण्यासाठी टाईम्स ऑफ नाताळच्या प्रतिनिधीनं दुसऱ्या दिवशी नाताळच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्याला सांगण्यात आलं की 'उत्तर पाण्यावर आहे व कोणत्याही डाकेनं ते येऊ शकेल.' [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५]

मंत्र्यांच्या उत्तरातून जेवढी माहिती देण्यात आली आहे त्याहून अधिक दडवण्यात आल्याच्या संशयानं *नाताळ विटनेसनं* त्यावरील आपलं मत देत लिहिलं की उत्तराची डाक अजून पोहोचलेली नसली तरी त्यात काय आहे हे सरकारला माहीत नाही, यावर कोणताही शहाणा माणूस विश्वास ठेवणार नाही. नाताळचे लंडनमधील प्रमुख प्रतिनिधी श्रीयुत पीस (सर वॉल्टर्स) यांनी सरकारला सर्व गोष्टींची योग्य कल्पना दिलेलीच असेल. [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५] आणि जर उत्तर आपल्या मार्गावर आहे हे माहीत असेल तर त्याच्या यायच्या दिवसाचं गणित एक दोन दिवसात करता येऊ शकतं. जे उत्तर नाताळच्या अधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे विशिष्ट जहाजानं पाठवण्यात आलं ते कोणत्याही डाकेनं यायची अपेक्षा कशी काय करता येऊ शकते? हे असं उत्तर आहे की 'जे आपल्याला समजलं असं कोणी ढोंग करतही सांगू शकत नाही.' तरीही चाकरमान्यांच्या पक्षाच्या वृत्तपत्रानं उपरोधानं लिहिलं की टाईम्स ऑफ नाताळनं मिळवलेलं उत्तर 'अगदी बरोबर आहे' असं समजायला हवं कारण गोंधळलेला माणूस जसं उत्तर देईल अगदी तसंच ते आहे.' [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५]

जर विधेयक नाकारण्यात आलं तर लगेच येत्या अधिवेशनात ते पुन्हा मंजूर करण्यात येईल आणि तेही नव्या निर्बंधांसहित अशा प्रकारचं बेलियर येथे शासनाच्या प्रवक्त्यानं जे विधान केलं होतं त्याचा उल्लेख करत *नाताळ विटनेसनं* लिहिलं : 'साम्राज्यसरकारच्या विरोधात जाऊन त्यांच्याशी संघर्ष करायचं मंत्रिमंडळात सामूहिक सामर्थ्य आहे काय हा आमच्यासमोर फार मोठा प्रश्न आहे.' [*नाताळ विटनेस*, जानेवारी १८, १८९५]

या वातावरणात *नाताळ ॲडव्हरटाईझरनंही* सुरात सूर मिळवला. त्यानं फेब्रुवारी ६, १८९५ला लिहिलं की लॉर्ड रिपन यांचं उत्तर पाण्यावर आहे असं अधिकृतपणे सांगण्यात आल्यानंतर काही आठवडे झालेले आहेत. तसं जर असेल तर 'एव्हाना ते मंत्रिमंडळाच्या हाती यायला पाहिजे होतं.' परंतु जनतेला त्याबद्दल काहीच माहिती नाही.

हे शक्य आहे की ही सर्व माहिती १४ तारखेच्या मोठ्या सभेसाठी राखून ठेवण्यात आलेली असावी. असो, जे काही दिसेल ते आम्ही पाहणार आहोत, आणि जे काही ऐकायला येईल ते आम्ही ऐकणार आहोत. [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, फेब्रुवारी ६, १८९५]

अखेरीस २ फेब्रुवारीला *नाताळ मर्क्युरी* स्पष्टीकरण द्यायला पुढं आलं. जी समुद्री तार मतदान दुरुस्ती विधेयकाबद्दल आहे ती 'वेगळ्याच विषयावरील होती असं लक्षात आलं.' परंतु सरकारला तारेन कळवण्यात आलेलं आहे की या प्रश्नावर 'सम्राज्ञींचं सरकार गांभीर्यानं विचार करत आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी ७, १८९५] शासनाच्या मुखपत्रानं पुढं लिहिलं की या विषयावर विचार करायला वेळ घेण्यात येत आहे यावरून 'एकूण पाहता' हे आशादायी चिन्ह आहे असं समजायला हरकत नाही. परंतु विधेयक परत येवो वा न येवो 'अशाच प्रकारची उपाययोजना लवकर वा उशिरा पुन्हा करायच्या वसाहतीच्या लोकांच्या निर्धारात किंचितही बदल होणार नाही.' [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी ८, १८९५]

तारेसंबंधी गैरसमज झाला होता या *नाताळ मर्क्युरीच्या* कथेवर विश्वास टाकायचं नाकारत *नाताळ अॅडव्हरटाईझरनं* लिहिलं :

असं आढळून येतं की हे जे वर्णन करण्यात आलं आहे त्यात काही तरी चूक असली पाहिजे. डाऊनिंग स्ट्रीटच्या समुद्री तारा जर सांकेतिक लिपीत राहत असतील तर त्यांच्या वाचनाची किल्ली असलीच पाहिजे. जर त्या सांकेतिक लिपीत नसतील तर चूक अजूनच विलक्षण ठरते. [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, फेब्रुवारी ९, १८९५]

नाताळ मंत्रिमंडळात आणि ब्रिटिश सरकारमध्ये जे काही घडलं ते सर्व आपल्याला सांगण्यात येईल असं ज्या दिवसाबद्दल वसाहतीच्या लोकांना वाटत होतं तो 'महान दिवस' अखेरीस उगवला. परंतु सर जॉन डरबन यांच्या व्याख्यानात 'भारतीय मतदान दुरुस्ती विधेयकाच्या' भवितव्याविषयी अवाक्षरही उच्चारण्यात आलं नाही. त्यावर नाताळ

ॲंडव्हरटाईझरनं लाजेनं मान खाली लावणारी टिप्पणी करत लिहिलं की साम्राज्याच्या सरकारनं हे पत्र व्यवस्थितपणे यावं म्हणून या कामासाठी 'खास करून काही विशेष प्रकारच्या जुन्या पद्धतीच्या जहाजाची व्यवस्था केलेली नसल्यास' आतापर्यंत हा दस्तावेज नाताळला पोहोचायला पाहिजे होता. 'या विषयावर प्रधानमंत्री तोंडी गुळणी घेऊन बसले आहेत त्यामुळे.... हे विधायक नाकारण्यात आलं आहे या वृत्ताला आधार मिळतो.' [*नाताळ ॲंडव्हरटाईझर*, फेब्रुवारी १९, १८९५]

नाताळ मर्क्युरीनं सर डरबन यांच्या व्याख्यानाचा गोषवारा देताना भारतीय मतदान दुरुस्ती विधेयकाकडून भारतीय आप्रवासी विधेयकाकडे स्पष्टपणे आपलं लक्ष केंद्रित केलं तेव्हा या संशयाला अजून बळ मिळालं. १०,००० पौंड अनुदान बंद करायच्या वसाहतीच्या निर्णयाचं जसं अतिशय प्रामाणिकपणे पालन करण्यात आहे तसंच भारतीयांना मतदानाचा सार्वत्रिक अधिकार मिळाल्यामुळे भारतीय मतामुळे राजकीय धोका निर्माण व्हायच्या शक्यतेमुळे भविष्यकालीन धास्तीला बाजूला सारण्यात येईल यावरही विश्वास ठेवायला भरपूर कारणं आहेत.

मागील सत्रात पारित करण्यात आलेलं विधेयक साम्राज्याचं सरकार फेटाळू शकेल परंतु सम्राज्ञींना ते मान्य करावंसं वाटेल तोपर्यंत आवश्यकता पडल्यास ते पुन्हा पुन्हा पारित करण्यात येईल. [*नाताळ मर्क्युरी*, फेब्रुवारी ८, १८९५]

या भंपकपणाचा अर्थ डोळ्यात धूळफेक करणं वा त्याहूनही अधिक खाली उतरायचा हा प्रयत्न असा करण्यात आला. नाताळ विटनेसनं चाणाक्षपणानं उद्‌गार काढले की मंत्र्याच्या वृत्तपत्रानं ज्या पद्धतीनं मतदानाच्या प्रश्नाचा उल्लेख केला आहे त्यावरून 'मागील सत्रात पारित करण्यात आलेल्या विधेयकाला मान्यता मिळालेली नाही यासाठी वसाहतीचं मन वळवण्यासाठी लेखकाला प्रेरणा आणि सूचना मिळाली आहे' असं गृहित धरून चालावं लागतं. [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २, १८९५] विधेयक 'पुन्हा पुन्हा पारित करण्यात येईल आणि ब्रिटिश सरकारनं पाठवलेलं उत्तर 'पाण्यावर आहे' या दोन घोषणांमध्ये स्पष्टपणे दिसून येणारी विसंगती सुचवते

की मंत्रिमंडळ अजून पत्रव्यवहार करून 'लॉर्ड रिपन यांच्या निर्णयात बदल करू पाहत आहे.' जर हा अंदाज बरोबर असेल तर म्हणावं लागेल की बराच वेळ वाया दवडण्यात आला आहे आणि त्यासाठी मंत्री महोदयांना वसाहत सहजपणे क्षमा करणार नाही.

मोठमोठ्या बाता मारणं आणि मोठमोठ्या गोष्टी करायची धमकी देणं हे सर्व विरोधकांचं समाधान करण्यासाठी ठीक आहे, परंतु धोरणी राजकारणी पुढारी आपले पाय पक्के रोवायचा प्रयत्न करील आणि कोणत्याही गोष्टीसाठी कृती करायचं ठरवायच्या आधी त्यासाठी मोजाव्या लागणाऱ्या मूल्याचा व वेळच आली तर परत फिरणं अशक्य जरी नाही तरी कठीण तर होणार नाही ना याचा विचार करील. [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २, १८९५]

एव्हाना *नाताळ अॅडव्हरटाईझरलाही* नाताळ मंत्रिमंडळाच्या गोलगोल बोलण्यातून कुठं तरी माशी शिंकत असल्याची जाणीव होऊ लागली होती. त्यानं फेब्रुवारी २८ला लिहिलं की काही आठवड्यांपूर्वी शासनानं कळवलं होतं की काही महत्त्वाचा खलिता 'पाण्यावर आहे'. परंतु त्या खलित्यासंबंधी काहीच ऐकिवात येत नाही. 'त्याचबरोबर हेही सत्य आहे की साम्राज्याची परवानगी मिळालेल्या विधेयकांची जी यादी जाहीर करण्यात आलेली आहे त्यात भारतीय मतदान विधेयकाचं नाव नाही.' [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, फेब्रुवारी २८, १८९५]

एका पंधरवाड्यानंतर त्यानं परत तोच आरोप केला. विधेयकाला 'लॉर्ड रिपन यांनी नक्कीच एखाद्या बंद कुलुपात कायम कोंडून ठेवलेलं नाही!' या प्रकरणी उघड उघड मतदारांना सर्व काही सांगण्याऐवजी त्याच्याशी लपाछपीचा खेळ खेळून सरकार 'मतदारांशी आणि सदस्यांशी' अत्यंत चुकीचा व्यवहार करत आहे:

हे शक्य आहे की या प्रकरणी साम्राज्याच्या सरकारला विरोध करायचा सल्ला वसाहतीला देण्यात येईल अथवा साम्राज्याच्या इच्छेसमोर मान तुकवून भारतीयांना मतदानाचा अधिकार देण्यात येऊन वसाहतीच्या भवितव्यावर त्यांना नियंत्रण प्रस्थापित करू देण्यात येईल.

हे पर्याय असे आहेत की त्यावर गंभीरपणे चिंतन करणं आवश्यक आहे व मंत्रिमंडळानं त्यासाठी वेळ नक्कीच काढायला पाहिजे. परंतु आजचं आपलं मंत्रिमंडळ असं समजते की जे करण्यात आलेलं आहे ते पुरेसं आहे व त्याला हवा तसा निर्णय ते घेऊ शकते. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च १५, १८९५]

२

एप्रिलच्या अखेरीस खात्रीपूर्वक वाटायला लागलं होतं की ब्रिटिश सरकार भारतीय मतदान विधेयकाला मान्यता देणार नाही. परंतु त्यांनी सांत्वन करत सांगितलं की 'विधेयक फेटाळण्यात आलेलं नसून त्याला केवळ तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २७, १८९५] विधेयकाला मंजुरी द्यायची वा न द्यायची यासाठी ब्रिटिश सरकारला घटनेनंच दोन वर्षांचा अवधी दिलेला होता. विचित्र गोष्ट ही होती की नाताळ मंत्रिमंडळ याबद्दल काहीच बोलत नव्हतं. जी काही यासंबंधी थोडीशी माहिती होती ती खाजगी लोकांकडून वा लंडनच्या वृत्तपत्रांतून आलेली होती. *नाताळ ॲडव्हरटाईझरचा* स्तंभलेखक उद्‌गारला, 'मला भीती वाटते की आमच्या मंत्रिमंडळाचं आम्ही थोडं अधिकच स्तोम माजवतो आहोत.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २७, १८९५]

जून २१, १८९५ला रोझबेरी मंत्रिमंडळाचा पाडाव झाला. रिपन यांनी राजीनामा दिला, त्यांनी आपलं खातं सोडलं आणि ते आपल्या प्रासादात राहायला निघून गेले. ५ दिवसांनंतर बर्मिंगहॅम येथील स्क्रू बनवणाऱ्या कंपनीचे जोसेफ चेम्बर्लेन यांनी रिकामी झालेली खुर्ची सांभाळली आणि ते वसाहत मंत्री झाले. जुलै १०, १८९५ला श्रीयुत टॅथॅम यांनी भारतीय मतदान विधेयकासंबंधी चौकशी केली असता दिलेल्या उत्तरात सर जॉन रॉबिन्सन यांनी पहिल्यांदाच कळवलं की सरकार अजूनही या विषयावर वसाहत कार्यालयाशी संपर्कात आहे व यासंबंधात दुसरं विधेयक आणायचा आमचा विचार आहे. वसाहत कार्यालयात तयार करण्यात आलेल्या

विधेयकानं सर्व पक्षांचं समाधान होईल व त्याला सम्राज्ञींच्या सरकारची मान्यता मिळेल असा 'विश्वास ठेवण्यासाठी' सरकारजवळ सबळ कारणं आहेत. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जुलै ११, १८९५]

विधेयक नाकारण्यात आल्याचं अशाप्रकारे आडवळणानं सांगण्यात आल्यामुळे तिखट प्रतिक्रिया व्यक्त करत *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं : 'हे शक्य आहे, परंतु त्यामुळे नाताळमधील वसाहतदारांचं समाधान होईल काय हा प्रश्न आहे.'

त्यानंतर त्यानं पुढं विचारलं :

इंग्लंडमधील अधिकाऱ्यांचा या प्रश्नासंबंधी काय दृष्टिकोन आहे त्याची माहिती आमच्या सरकारला आहे असं दिसतं. तसं असल्यास प्रस्तावित नवीन विधेयक याच सत्रात आणायचा प्रयत्न का करण्यात आलेला नाही? वा जुनं विधेयकच पुन्हा विचारार्थ का मांडलं नाही? [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जुलै ११, १८९५]

सर जॉन रॉबिन्सन यांच्या वक्तव्यानंतर लगेच *नाताळ ॲडव्हरटाईझरच्या* स्तंभलेखकानं टिप्पणी केली: 'अखेरीस पोतडीतून मांजर बाहेर आलं.' किती तरी महिन्यांपूर्वीपासूनच विधेयकाला ब्रिटिश सरकारची मान्यता मिळाली नसल्याचं वृत्तपत्रं जोर देऊन सांगत होतं. 'आधी हे वृत्त नाकारण्यात आलं आणि नंतर सरकार या विषयावर मौन धरून बसलं. अखेरीस श्री टॅथॅम यांनी अडखळणारं उत्तर उगाळायला लावलं.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जुलै १७, १८९५] जोपर्यंत डाऊनिग स्ट्रीटच्या गळी उतरत नाही तोपर्यंत आम्ही हे विधेयक पुन्हा पुन्हा पारित करू या शासनाच्या धमकीची 'शौर्यापेक्षा चाणाक्षपणा' बरा असं म्हणून टर उडवत लेखकानं पुढं लिहिलं:

मी नेहमीच सांगत आलो आहे की ब्रिटिश सरकार भारतीयांचा मताधिकार काढून घ्यायला कधीच मान्यता देणार नाही आणि आश्वासित करण्यात येणारं विधेयक जेव्हा समोर येईल तेव्हा मी जे म्हणतो ते खरं असल्याचं आढळून येईल. या प्रश्नाला हाताळायचा खरा मार्ग शैक्षणिक आणि सांपत्तीक पात्रता आणणं हा आहे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जुलै १७, १८९५]

पर्यायी उपायाचा धसका घेऊन नाताळ विटनेसनं इशारा दिला की एकदा एक पाऊल पुढं आणि नंतर दोन पावलं मागे अशा प्रकारे नाताळ सरकार भारतीयांच्या प्रश्नावर अळंटळं करत असतानाच आशियायी लोक मात्र संधीचा पुरेपूर फायदा घेत आहेत. 'आता त्यांना सवलतीचं अजून एक वर्ष मिळाल्यामुळे (लोंबकळीस पडलेल्या विधेयकामुळे) जास्तीत जास्त लोकांची नावं मतदार सूचीत नोंदवून ते त्याचा फायदा घेतील.' [*नाताळ विटनेस*, जुलै २६, १८९५] औपरोधिक भाषेत पुढं लिहिण्यात आलं की पुढील सत्रात सादर होणारं विधेयक 'आतापर्यंत न पाहिलेल्या विधेयकासारखं आदर्श असेल.' ते 'साम्राज्याच्या सरकारचं, भारत सरकारचं, वसाहतीतील लोकांचं आणि मतदार व्हायची अपेक्षा ठेवणाऱ्या आप्रवासी भारतीयांचं समाधान करणार आहे.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर २७, १८९५]

लंडन टाईम्स आतापर्यंत विरोधी पक्षाचं मुखपत्र होतं, परंतु आता ते नवीन सरकारच्या विश्वासाचं प्रमुख केंद्र आणि अधिकृत मुखपत्र झालं होतं. मागील मंत्रिमंडळाच्या काळात त्यानं कमीअधिक प्रमाणात वसाहतीच्या दृष्टिकोनाला पाठिंबा दिलेला होता. परंतु ट्रान्सवालमधील भारतीयांच्या प्रश्नावर त्यानं नुकतंच व्यक्त केलेल्या दृष्टिकोनामुळे 'इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा भारतीय व्यापाऱ्यांच्या प्रश्नाच्या विचाराला अधिक प्राधान्य देण्यात येईल' असं वसाहतीचं मत झालं होतं. त्यामुळे ते अस्वस्थ झाले. २९ ऑगस्टला भारतीयांचं एक प्रतिनिधिमंडळ नवीन वसाहत मंत्र्यांना भेटायला गेलं. दादाभाई नौरोजी यांनी जेव्हा निदर्शनास आणून दिलं की नवीन मतदान विधेयकामुळे आशियायी लोकांना आशियन म्हणून वगळण्यात आलं आहे तेव्हा चेम्बर्लेन यांनी दिलेल्या उत्तराच्या सारांशाची नाताळमध्ये पाठवण्यात आलेली तार अशी होती:

होय, परंतु मी हे सांगेन की तिथं अजून कायदा पारित झालेला नाही.... माझं असं मत आहे की या तरतुदीचा अतिशय गंभीरपणे विचार करायला पाहिजे. त्याकडे आता माझं लक्ष गेलेलं आहे आणि माझा असा विश्वास आहे की काही दिवसांनंतर मला याबद्दल समाधानकारक वक्तव्य करता येईल..... तुमच्या दाव्याचा आणि विनंतीचा मी अतिशय सहानुभूतिपूर्वक विचार करीन

आणि.... तुम्ही जशी कल्पना करता तसं सामर्थ्य माझ्यात नाही हे मी तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. तरीही माझा जो काही प्रभाव असेल त्याचा उपयोग मी तुमच्या बाजूनं करेन. [*इंडिया*, ऑक्टोबर १८९५, पृष्ठ ३०३]

भारतीय प्रतिनिधी मंडळाजवळ बोलताना चेम्बर्लेन यांनी कौशल्यानं ज्याचा सूतोवाच केला होता तेच त्यांनी थोड्याच दिवसांनंतर उघडपणे द टाईम्सच्या स्तंभातून सांगितलं. द टाईम्सनं लिहिलं : 'आशियायी लोकांना ते आशियायी आहेत म्हणून मतदानासाठी अपात्र ठरवणारा प्रस्तावित कायदा फेटाळण्यात येईल. त्यामुळे तिथं फार काळ तक्रारी राहणार नाहीत.' [*नाताळ विटनेस*, ऑक्टोबर ४, १८९५] भारतीयांच्या प्रश्नाला जोरदार पाठिंबा देत *द टाईम्सनं* पुढं लिहिलं :

ज्या महान साम्राज्याचं वसाहतीतील माणसांना संरक्षण मिळतं त्या साम्राज्याचा विचार करण्याऐवजी वसाहतीतील सर्वसामान्य माणसं, मग त्यांनी कुठंही वास्तव्य केलेलं असो, आपल्या अल्पकालीन स्वार्थाचा किती तरी अधिक विचार करतात व हिंदू अथवा पारसी माणसंही आपल्यासारखेच साम्राज्याची प्रजा आहेत हे लक्षात घेत नाहीत. या बाबीची त्यांना जाणीव करून देणं आणि ब्रिटिश साम्राज्याच्या सर्व प्रजेला, मग त्यांचा वर्ण कोणताही असो, न्याय्य वागणूक देणं हे वसाहत कार्यालयाचं कर्तव्य आहे. [नाताळच्या वृत्तपत्रात द टाईम्समधील उद्धरण, पहा फोटो प्रतीसाठी गांधीजींची कात्रणाची वही क्रमांक ३, पी. आय. एस. क्रमांक ५२६ गांधीजींच्या राष्ट्रीय स्मारक विश्वस्त संस्थेत, नवी दिल्ली]

द टाईम्सनं असंही लिहिलं, 'ब्रिटिश भारतीय प्रजेला दक्षिण आफ्रिकेत स्थिरावण्याचा अधिकार आहे.' [*नाताळ विटनेस*, ऑगस्ट १३, १८९५] व त्यापुढं लिहिलं की 'व्यापारी समाज सोडल्यास इतर आशियायी लोकांना त्यांच्या उपजीविकेच्या साधनांपासून वंचित करायची दक्षिण आफ्रिकेत इच्छा आढळलेली नाही.' [*स्टार*, ऑगस्ट ३१, १८९५]

श्रीयुत चेम्बर्लेन यांनी दिलेल्या उत्तराच्या आगीत *द टाईम्सच्या* उद्‌गारांचं तेल पडून दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रसृष्टीत एकच आगडोंब उसळला. *द स्टार*नं लिहिलं :

स्पष्ट सांगायचं तर द टाईम्सनं ज्या अर्थानं हिंदूंना नागरिक बांधव म्हणून संबोधलेलं आहे तसं गोरे समजत नाहीत.... मतदान केंद्रावर गोऱ्या मतदारांना आच्छादून टाकणारं वा विधानसभेत हिंदू बसलेला असल्याचं स्वरूपच गोऱ्या माणसाला दिसतं. ***या प्रश्नावर संघर्ष करणारे हजारो लोक उद्या दिसून येतील.*** *श्रीयुत चेम्बर्लेन लवकरात लवकर ज्या प्रमाणात हे निर्विवाद सत्य पूर्णपणे पचवू शकतील तेवढ्याच प्रमाणात दक्षिण आफ्रिकेशी व्यवहार करताना ते यशस्वी होतील.* (ठळक अक्षरं माझी)

स्टारनं पुढं लिहिलं, 'सन्माननीय महोदयांनी सूचित केलं आहे की नाताळमधील आशियायी लोकांना मतदानाचा अधिकार नाकारणारा कायदा नाकारण्यात येईल, परंतु इतर उपायांनी वसाहतीनं हाच हेतू साध्य करायचा प्रयत्न केला तर आपण त्यात अडथळा आणू असं काही ते म्हणाले नाहीत.'

बाहेरून सर्वांना जाणवणारा एखादा सामान्य धोका निर्माण झाल्यास आमच्यापैकी बहुतेक लोक ज्याचं स्वप्न पाहत आहेत त्या दक्षिण आफ्रिकी संघराज्यासारखं काही तरी चांगलं घडून येईल व त्या दक्षिण आफ्रिकी संघराज्याच्या कुटुंबात कुलींच्या मताचा शाप मिळालेल्या राज्याला प्रवेश मिळणार नाही असं सांगितलं तर ती अतिशयोक्ती होणार नाही. [*स्टार*, ऑगस्ट ३१, १८९५]

'आमच्यापैकी बहुतेक लोक ज्याचं स्वप्न पाहत होते त्या स्वप्नाला युटिलँडरांच्या एका इंग्रज वृत्तपत्रानं सांगितल्याप्रमाणे कुलींच्या मतानं नव्हे तर त्यांच्याच स्वतःच्या देशबांधवांच्या मतांमुळे गणराज्यात सामील होण्याविषयीच्या स्वप्नाला - ज्याला ओम पॉल शापरूप समजत होते - धक्का लागला. परंतु वर्णभेदाची जी धूळ त्यांनी स्वतःच उडवली होती तिच्यामुळे त्यांचीच दृष्टी अधू झाली होती व इंग्रज युटिलँडरांची आणि त्यांच्या मित्रांची निर्णयशक्ती त्यामुळे प्रभावित झाली. एवढंच नाही तर सौम्य प्रकृतीच्या नाताळ मर्क्युरीनंही लिहिलं:

भारतीयांना जे अधिकार भारतात मिळतात ते त्यांना देण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या लोकांचा कोणताच आक्षेप नाही. परंतु त्यांना राजकीय दृष्टीनं युरोपिअनांच्या बरोबरीत ठेवण्यावर.... आमचा निश्चितच आक्षेप आहे. मूलतः ही वसाहत ब्रिटिशांच्या पैशानं आणि श्रमानं उभारण्यात आलेली आहे.... या देशातील वसाहतीच्या जीवनपद्धतीत कमीअधिक प्रमाणात भारतीय इथं बांडगुळासारखे वाटतात. वसाहत उभारण्यासाठी ते पुढं येत नाहीत. त्यांनी जे पेरलं नाही त्याचं फळ घ्यायला मात्र ते येतात. [*नाताळ मर्क्युरी*, ऑगस्ट ३१, १८९५]

काही दिवसांनंतर त्यानं परत लिहिलं की दक्षिण आफ्रिकेत स्थिरावण्याचा अधिकार जेव्हा भारतीय मागतात तेव्हा ते पूर्णपणे आपल्या अधिकारक्षेत्रात असतात असं द टाईम्सनं वसाहतीच्या लोकांना सांगणं द टाईम्ससाठी उचित असलं तरी आम्हांला जसं भारतीयांनी व्यापलं तसं भारतीयांनी इंग्लंडला व्यापलं तर.... त्याचे प्रसिद्ध समकालीन वेगळाच राग आळवतील.' त्यानंतर त्यानं लिहिलं :

ब्रिटिश भारतीयही आपल्याप्रमाणेच एकाच साम्राज्याची प्रजा आहेत याची वसाहतीच्या लोकांना जाणीव करून देणं वसाहत कार्यालयाचं कर्तव्य आहे असं ***द टाईम्सला*** *वाटतं. यासंबंधी आमचा दृष्टिकोन असा आहे की.... भारतीय जेव्हा ब्रिटिश वसाहतीत येतात तेव्हा त्यांचं तिथं काय कर्तव्य असतं ते भारतीयांना समजावून सांगायची जबाबदारी द टाईम्सनं स्वतःच घ्यावी.* [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर ३, १८९५]

त्यानं धमकीवजा समारोप करत लिहिलं :

श्रीयुत चेम्बर्लेन जर इथं लुडबुड करायचा प्रयत्न करतील तर तो मूर्खपणा होईल व त्यामुळे भावनांचा असा काही उद्रेक होईल की नवीन वसाहतमंत्री दिङ्मूढ होतील. दक्षिण आफ्रिकेतील सर्व लोकांचं जर कोणत्या एका प्रश्नावर एकमत असेल तो प्रश्न आहे भारतीयांच्या मतदान हक्काचा. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर ६, १८९५]

एक्स्प्रेसनं इशारा दिला की *द टाईम्स* आणि इतरांनी लक्षात ठेवावं की ब्रिटिश भारतीय प्रजेची वसाहतीला गरज नव्हती आणि कधीकाळी वसाहतीत त्यांना चांगली वागणूक मिळायची शक्यता नाही. 'भारतीय हा फक्त त्याच्या स्वतःच्या ठिकाणी चांगला असतो आणि भारत हेच त्याच्यासाठी उत्तम ठिकाण आहे.' [*एक्स्प्रेस*, सप्टेंबर ३, १८९५]

नाताळ ॲडव्हरटाईझरनं द टाईम्सच्या लेखाचं वर्णन 'स्वायत्त वसाहतीसाठी अतिशय अपमानास्पद सुरातील लेख' असं केलं आणि पुढं लिहिलं की 'दादागिरी करायचा कोणताही प्रयत्न करण्यात आल्यास त्याला चोख उत्तर देण्यात येईल असं अतिशय स्पष्ट शब्दात ताबडतोब प्रत्युत्तरात सांगायला पाहिजे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जुलै १७, १८९५]

साऊथ आफ्रिका टाईम्सनं उद्‌गार काढले की *टाईम्स* दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या वसाहतदारांना सर्वसामान्य तत्त्वांवर 'व्याख्यानावर व्याख्यानं देत आहे परंतु सर्वसामान्य तत्त्वावर सोडवण्यासारखं हे प्रकरण नाही.

***'द टाईम्स'** चं म्हणणं आहे की त्यांचा (भारतीयांचा) ब्रिटिश ध्वजांतर्गत जन्म झालेला आहे व त्यामुळे जे काही हक्क त्यांना मिळू शकतात ते सर्व हक्क मिळायचा त्यांना अधिकार आहे. उलट आमचं असं मत आहे की त्यांना भारतात जे अधिकार नाहीत ते अधिकार नाकारण्याचा आग्रह धरण्याचा नाताळला अधिकार आहे. 'द टाईम्स' भारतीय काँग्रेसकडे कशा रीतीनं पाहते आणि ज्या संसद सदस्यांना हिंदूंना स्वराज्याचा अधिकार द्यावासा वाटतो त्यांची ते पॅडागेट संसद सदस्य - मग त्यांचं नाव शॉन वा डब्ल्यू. एस. केन्स असं काहीही असो - कशा प्रकारे उपहास करतात ते आम्हाला माहीत आहे. इंग्लंडमध्ये काही पारशांना वा बाबूंना मताधिकार मिळाल्यानं काही फरक पडत नाही कारण तिथं एका वा दुसऱ्या बाजूला निवडणुकीला वळवायचं त्यांच्यात सामर्थ्य नसतं. परंतु नाताळमध्ये.... कुलींना मताधिकार द्या आणि मग पार्नेल किंवा टिम हिली आणि कुलीसुद्धा देशाचा राज्यकारभार चालवतील आणि नाताळ व शेजारच्या वसाहती आणि राष्ट्रासाठी कायम कटकटी निर्माण करतील.* [*साऊथ आफ्रिका टाईम्स*, ऑक्टोबर ७, १८९५]

नाताळ विटनेसनं टिप्पणी केली की, 'द टाईम्सच्या कल्पनांना त्यांच्या तार्किक शेवटापर्यंत ताणलं तर त्यामुळे अगदी असहनीय अशी अवस्था निर्माण होईल.'

एकाच साम्राज्याच्या प्रजेच्या सिद्धान्ताबद्दल बोलायचं तर, *भारतीय जरी ब्रिटिश प्रजा असले तरी इंग्लंडमध्ये पोलिश वा रशिअन ज्यू ज्याप्रमाणे विदेशी आहेत त्याप्रमाणे ते या देशात सर्वार्थानं विदेशी आहेत. आणि 'साम्राज्याच्या सार्वजनिक हिताच्या दृष्टीनं' त्यांना आमच्यात सामावून घ्यायची आमच्यावर काही जबाबदारी आहे असं काही आम्हाला वाटत नाही. वसाहतींना भारताबद्दल काही आपुलकी नाही आणि केवळ काही भावनात्मक संबंध सोडले तर इंग्लंडशी परिशिष्टासारखे असलेले संबंध तोडायचं तिला काहीच वाटणार नाही.* [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर ६, १८९५]

त्याशिवाय परदेशांच्या स्पर्धेमुळे इंग्लंडमधील कामगारांचं पगारकपातीपासून संरक्षण करणं आवश्यक असेल तर, 'दक्षिण आफ्रिकेतील व्यापाऱ्यांना आणि दुकानदारांनाही अप्रामाणिक अरब आणि भारतीय व्यापाऱ्यांच्या स्पर्धेपासून संरक्षण मिळायचा तेवढाच अधिकार आहे' असं चाकरमान्यांच्या पक्षाच्या वृत्तपत्रानं लिहिलं. अशा रीतीनं निवडक विशेषणांचा भडिमार केल्यानंतर शेवटी या वृत्तपत्रानं लिहिलं:

आमच्या शासनपद्धतीच्या ज्ञानाबद्दल बोलायचं तर दक्षिण आफ्रिकेतील भारतीय हे निर्बुद्धांच्या पातळीवर आहेत व अशा माणसांना त्यांनी इंग्लंडबाहेर ठेवलं असतं. आणि सांसदीय निवडणुकातील अतिशय चाणाक्ष लोकांसाठी तो सुरक्षित मतदार होऊ शकत असल्यामुळे आम्ही त्याला मतदानाचा अधिकार देऊ इच्छीत नाही.... भारतीय विदेशात गरीब राहणार नाही. त्याच्या काटकसरीच्या आणि मेहनतीच्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे तो तसा राहणार नाही.... परंतु कालांतरानं तो इतरांना दारिद्र्यात ढकलल्याशिवाय राहणार नाही. [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर ६, १८९५]

या वादाला मिळू लागलेलं घाणेरडं वळण पाहून गांधीजींनी त्याला परत धमक्यांच्या मैदानातून विवेकाच्या व्यासपीठावर आणायचा प्रयत्न केला. सप्टेंबर २ला त्यांनी नाताळ मर्क्युरीला उत्तर दिलं :

ब्रिटिशांच्या मेहनतीनं आणि पैशानं या वसाहतीची उभारणी झालेली असल्यामुळे तुम्ही जर या वसाहतीत भारतीयांना विरोध करत असाल तर जर्मन आणि फ्रेंच लोकांनाही तुम्ही तेवढ्याच स्पष्टपणानं विरोध करायला पाहिजे. याच तत्त्वानुसार ज्या लोकांनी इथं रक्त सांडलं त्यांच्या वंशजांनीही इंग्लंडमधून इथं येणारांना निघून जायला सांगायला पाहिजे. [गांधीजींचं *नाताळ मर्क्युरीच्या* संपादकांना पत्र, सप्टेंबर ५, १८९५]

असं सांगण्यात येतं की दक्षिण आफ्रिकेतील लोकाचा भारतीयांना समान राजकीय अधिकार द्यायला विरोध आहे कारण भारतात त्यांना तसे अधिकार नाहीत. परंतु घटनेनं भारतीयांना युरोपिअनांएवढेच अधिकार दिलेले आहेत. भारतात जिथं कुठं युरोपिअनांना मतदानाचा अधिकार आहे तिथं भारतीयांना वगळण्यात आलेलं नाही. उदाहरणार्थ नगरपालिका आणि विधानपरिषदेत दोघांनाही मतदान अधिकार आहे. समान परिस्थितीत युरोपिअनांना जे अधिकार आहेत तेवढेच अधिकार वसाहतीतील तसंच दक्षिण आफ्रिकेच्या इतर भागातील भारतीयांना मिळाले तर भारतीयांचं 'पूर्ण समाधान' होईल.

गांधीजींनी स्पष्ट केलं की भारतीयांच्या प्रश्नाला स्थानिक तसाच साम्राज्याचा दृष्टिकोन आहे. वसाहतीच्या लोकांना आवडो वा न आवडो भारतीय अखेरीस त्यांचे प्रजाबंधू आहेत.

इंग्लंडला भारतावरील सत्ता गमावण्याची इच्छा नाही आणि त्याचबरोबर पोलादी हातानं भारतावर राज्य करायचीही इंग्लंडची इच्छा नाही. इंग्लंडचे मुत्सद्दी सांगतात की आम्हाला अशा रीतीनं भारतात राज्य करायचं आहे की त्यासमोर भारतीयांना दुसरं कोणतंच राज्य आवडू नये.... भारतीयांना वसाहतीत आमंत्रिल्यानंतर वसाहतीतील जबाबदार लोक.... भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांच्या परिणामाच्या जबाबदारीतून कसे काय मुक्त होऊ शकतात? [गांधीजींचं *नाताळ मर्क्युरीच्या* संपादकांना पत्र, सप्टेंबर ५, १८९५]

भारतीयांना आपल्या मातृभूमीत युरोपिअनांएवढेच राजकीय अधिकार आहेत या गांधीजींच्या विधानाला भारतात किती तरी वर्ष राहिलेले मार्स्टन टी. फॅन्सीस, यांनी आव्हान दिलं.

त्यांनी लिहिलं की नगरपालिकांचा अध्यक्ष हा नेहमीच भारतीय नागरी सेवेचा दीक्षित अधिकारी असतो आणि भारतीयांना जरी नगरपालिकेत मतदानाचा अधिकार असला आणि ते विधानपरिषदेचे सदस्य होऊ शकत असले तरी घटना अशा रीतीनं बनवण्यात आलेली आहे की ते युरोपिअनांना अल्पमतात आणू शकत नाहीत आणि 'सर्वोच्च सत्तेवर स्वतःचा हक्क सांगू शकत नाहीत.' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर १०, १८९५]

हा मुद्दा फेटाळत गांधीजींनी सप्टेंबर १५, १८९५ला लिहिलं की मुंबई महानगरपालिकेचा अध्यक्ष एक प्रसिद्ध सॉलिसिटर आहे. हे खरं आहे की नाताळसारख्या भारतातील विधानसभा प्रातिनिधिक नाहीत. परंतु भारतात जो काही मतदानाचा अधिकार आहे त्यात वर्णभेद करण्यात आलेला नाही.

प्रातिनिधिक राज्यपद्धतीचं तत्त्व समजावून घ्यायची क्षमता भारतीयांनी भरपूर सिद्ध केलेली आहे. या विषयावरील विद्वान सर विल्यम विल्सन हंटर यांच्यासारख्या महान जाणकारांनीही हे मान्य केलेलं आहे. त्यांनी नुकतंच *द टाईम्समध्ये* या विषयावरील लेखात लिहिलं आहे :

विविध वंशामधील सन्माननीय समता प्रस्थापित करायचा जवळचा मार्ग म्हणून रणांगणाचा नेहमीच आश्रय घेण्यात आलेला आहे. परंतु नागरी जीवनातील हळू आणि अधिक कठीण मार्गाचा अवलंब करून भारतीय आमच्या आदराला पात्र ठरत आहेत. परतंत्र राष्ट्रांत घटनात्मक सरकारमध्ये विधानसभेवर काही लोकांना निवडणुकीद्वारे निवडून यायची संधी द्यायच्या पद्धतीचा तीन वर्षांपूर्वी जो प्रयोग करण्यात आला होता त्याहून मोठा प्रयोग कधीच करण्यात आलेला नाही.... बंगालचा अपवाद सोडल्यास, जिथं निवडणूकपद्धती फार मोठ्या अडचणीत असल्याची भीती वाटते आहे, तिथं अनेक कठीण चाचण्यांनंतर हा प्रयोग यशस्वी झालेला आहे. [*द टाईम्स*, गांधीजींनी नाताळ मर्क्युरीच्या संपादकाला सप्टेंबर १५,१८९५ ला लिहिलेल्या पत्रात उद्धृत, प्रकाशन नाताळ मर्क्युरी सप्टेंबर २३,१८९५]

नागरी आयुक्ताच्या पदाएवढी महत्त्वाची फार कमी पदं आहेत आणि तरीही एका भारतीयाची त्या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं की बंगाल आणि मद्रास प्रांतातील सरन्यायाधीशाच्या पदावर भारतीयांचीच नियुक्ती करण्यात आलेली आहे. दोन समाजातील दरी वाढवण्यात काहीच लाभ नाही. उलटपक्षी ही दरी बुजवायचा आपला प्रयत्न असायला हवा.

मार्स्टन टी. फॅन्सीस यांना गांधीजींनी दिलेल्या संयुक्तिक आणि संयत उत्तराची प्रशंसा करत आफ्रिकी नेटिव्हांच्या इंकॅन्यिसो या वृत्तपत्रानं 'केवळ न्यायासाठी' या मथळ्याखाली लिहिलेल्या लेखात बोचऱ्या भाषेत लिहिलं की गांधीजींनी निर्विवादपणे सिद्ध केलं आहे की त्यांच्या देशात इंग्रजांना जे अधिकार आहेत त्यापासून भारतीयांना वंचित करण्यात आलेलं नाही. त्यामुळे वसाहतीच्या लोकांना न्यायाचं काही मूल्य असेल तर दक्षिण आफ्रिकेतही तसं करण्यात येऊ नये. परंतु *न्याय आणि प्रामाणिकपणाच्या सिद्धान्ताबद्दल आम्ही फार ऐकलेलं आहे. परंतु असं केल्यामुळे जेव्हा रंगीत माणसाचा थोडासाही फायदा व्हायची शक्यता असते तेव्हा नाताळच्या गोऱ्यांना त्यांचा व्यवहारात उपयोग करायची अगदीच इच्छा नसते असं दिसतं. जे लोक संकुचित आणि स्वार्थी दृष्टीचे असतात त्यांना न्याय आणि प्रामाणिकपणा या गुणांचं खरं सौंदर्य आजपर्यंत कधीच दिसू शकलेलं नाही. आणि आपल्याला आश्चर्य वाटायला नंको की उदात्त आणि मानवतापूर्ण भावनांना अभिव्यक्ती देणं अतिशय सोपं आणि सोयिस्कर असतं व तशी ती अभिव्यक्ती अनेकदा देण्यातही येते. परंतु त्यानुसार वागायची वेळ जेव्हा येते तेव्हा त्या भावनांनुसार वागण्याऐवजी बहुधा त्या बाजूला सारण्यात येतात वा विसरल्या जातात.*

[इंनकॅननसियो, सप्टेंबर ६, १८९५]

३

'मागील सत्रात पारित करण्यात आलेल्या ज्या विधेयकामुळे' आशियायी लोकांना मतदानाचा अधिकार नाकारण्यात आला होता त्याला 'सम्राज्ञींची संमती मिळू शकत नाही अशी

माहिती समुद्री तारेनं सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात कळवण्यात आली. [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर ६, १८९५] त्यानंतर लगेच द टाईम्समध्ये एक लेख आला. त्यात लिहिण्यात आलं होतं की ह्या प्रकरणी 'दोन्ही बाजूंनी प्रामुख्यानं सलोख्यानं आणि सामंजस्यानं कृती करायची गरज आहे.' भारतीयांना साम्राज्यात सर्वत्र ब्रिटिश प्रजा म्हणून 'सर्व अधिकार मिळावेत यासाठी शक्य ती सर्व उपाययोजना करायचं' भारत सरकारवर 'दडपण आणलं जाऊ शकतं.' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर १३, १८९५] *द टाईम्सनं* असंही लिहिलं की 'आम्ही गणराज्यांशी केवळ मुत्सद्दीपणाच्या पातळीवरच वागू शकतो. परंतु दोन वसाहतींच्या बाबतीत मात्र गोष्ट वेगळी आहे.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर २०, १८९५]

लंडनहून समुद्रतारेनं आलेली बातमी आणि *द टाईम्सचे* उद्‌गार यांनी वसाहतीला जोरदार धक्का दिला. त्याला ठोस प्रत्युत्तर देत विधायक श्रीयुत एफ. एस. टॅथॅम यांनी टाईम्सच्या प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं की वसाहतीवर ही जी वेळ आली आहे तिचा 'सर्व दोष डाऊनिंग स्ट्रीटनं आम्हा स्थानिक लोकांच्या सरकारमध्ये केलेल्या लुडबुडीकडे जातो.' त्यामुळे 'स्थानिक लोक आम्हाला ज्या मजुरांचा सहजपणे पुरवठा करू शकत होते त्याचा आम्हाला संपूर्ण उपयोग करता आला नाही.' त्यांनी पुढं सांगितलं की 'भारत सरकार या लोकांना त्यांच्या स्वतःच्या देशातही मतदानाचा अधिकार द्यायला तयार नाही ही गोष्ट लक्षात घेतली तर ही बाब अजूनच लक्षणीय ठरते. भारतीयांना जर मतदानाचा समान अधिकार दिला तर त्याचा अर्थ 'निश्चितपणे 'कुलींचं' राज्य असा होईल.' ही गोष्ट अशक्य आहे. 'याबद्दलची आमची बाजू मांडणं आम्ही थांबवणार नाही. आम्ही ठरवलं आहे की असं होऊ द्यायचं नाही.'

मतदानासाठी जे थोडेसे भारतीय पात्र आहेत त्यांना मतदानाचा अधिकार द्यावा या श्रीयुत बेल यांनी मांडलेल्या प्रस्तावाबद्दल बोलायचं तर,

ज्यांची नावं आधीच मतदार सूचीत आहेत त्यांची नावं मतदार सूचीतून काढून टाकावी इतक्या लांबवर जायचा सध्या जरी माझा विचार नसला तरी मला वाटतं की त्यांचा त्यात समावेश करण्यात येऊ नये.

सरकारनं भारतीयांना अतिशय चांगली वागणूक दिलेली आहे व त्यांची काळजी घेतली आहे. त्यांचा मताधिकार काढून घेणं हे त्यांच्या आणि 'नेटिव्हांच्याही' हिताचं आहे.

वसाहतीतील आतापर्यंत पूर्णपणे मिळूनमिसळून आणि शांततापूर्वक एकत्र राहणारे हिंदू आणि मुसलमान यांच्यात भांडण लावायचा प्रयत्न करणारा श्रीयुत टॅथॅम यांच्या मुलाखतीतील भाग हा सर्वात खोडसाळपणाचा भाग होता. ते म्हणाले की भारतीयांच्या आंदोलनामागे 'केवळ मुंबईचे अरब म्हणवल्या जाणारे व्यापारी आहेत.' त्यांच्यातील बहुतेकांचं नाव आधीच मतदारसूचीत आहे. हा मुद्दा उचलण्यामागील त्यांचा हेतू अगदी 'साधा म्हणजे सत्तेवर येण्यासाठी..... भारतीय मतांचा उपयोग करणं आहे.' त्यांनी शेवटी सांगितलं की ज्या भारतीयांच्यावतीनं मुंबईचे हे व्यापारी आंदोलन करत आहेत ते सर्व *मुसलमान आहेत. भारतात नुकत्याच घडलेल्या घटनांकडे पाहता हिंदूना गोऱ्या सरकारकडून जी वागणूक मिळते त्यापेक्षा मुसलमान सरकारकडून चांगली वागणूक मिळायची शक्यता आहे काय याचा आता हिंदूंनी विचार करायचा आहे.* [*टाईम्स ऑफ नाताळ*, ऑक्टोबर ८, १८९५]

द टाईम्सला उत्तर देताना *नाताळ मर्क्युरीनं* लिहिलं की वसाहत कार्यालयानं वसाहतीला शिक्षित करण्यापेक्षा ब्रिटिश वसाहतीत आल्यानंतर भारतीयांची कोणती कर्तव्यं आहेत यासंबंधी प्रशिक्षित करायच्या कामाला स्वतःला जुंपून घ्यायला पाहिजे. *नाताळ ॲडव्हरटाईझरचं* मत होतं की इंग्लंडमधील लोकांनाही अधिक नाही तरी तेवढीच शिक्षित करायची गरज आहे. त्याचं म्हणणं होतं की 'शेतमजुरांना हाउस ऑफ लॉर्ड्सचं सदस्य करा असं जेव्हा इंग्लंडमधील लोकांना सांगण्यात येईल तेव्हा, अथवा गाडी हाकलणारांना वा घरकाम करणारांना ड्यूक आणि डचेसबरोबर सर्व सामाजिक कार्यक्रमात आमंत्रित करा असं जेव्हा सुचवण्यात येईल' तेव्हा त्यांना ही परिस्थिती समजू शकेल. जे भारतीय दक्षिण आफ्रिकेत आले 'ते काही भारतात मतदार नव्हते आणि ते तिथं राहिले असते तरी त्यांना तो अधिकार मिळाला नसता.' विधेयकात जर

'अशिक्षिता'चं कलम घातलं व त्यामुळे आवश्यक हेतू पूर्ण होत असेल तर विधेयकाच्या त्या कलमावर कोणताच आक्षेप घेता येणार नाही.

परंतु साम्राज्याच्या सरकारला स्पष्टपणे सांगून टाकायला पाहिजे की विधेयकाच्या मुख्य हेतूला धक्का लागता कामा नये; तसंच तो हेतू कशा रीतीनं साध्य करावा यासाठी वसाहत भांडू इच्छीत नाही. परंतु एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे. ती म्हणजे आशियायी लोकांना मतदार सूचीतून वगळण्यासाठी वसाहत सर्व काही केल्याशिवाय राहणार नाही. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर ५, १८९५]

*द टाईम्स*मधील वादग्रस्त लेख पूर्णपणे मिळेपर्यंत नाताळ मर्क्युरीनं त्यावर सविस्तर मत द्यायचं टाळत लिहिलं की : 'भारतीय ब्रिटिश प्रजाजन आहेत यात काही शंका नाही. परंतु युरोपिअन वंशाच्या ब्रिटिश प्रजेत आणि आफ्रिकी वा आशियायी वंशाच्या ब्रिटिश प्रजेत भेद असायला पाहिजे.' [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर १३, १८९५]

नॉटिंगहॅम रोडवरील सभेत नाताळ विधानसभेचे सदस्य श्रीयुत स्माईथ म्हणाले की हा प्रश्न सर्व संस्थांच्या मुळाशी जाणारा आहे. आम्ही आशियायी लोकांना आमच्या बरोबरीची सत्ता व मतदानाचा अधिकार द्यायला तयार नाही. आमचा लहानसा समाज आहे व भारतीयांनी आम्हाला मताधिक्यानं खाऊन टाकावं व वसाहतीला भारताच्या संस्थानाचं रूप यावं अशी आमची इच्छा नाही. गांधीजींबद्दल बोलायचं तर यात काही संशय नाही की ते सद्‌गृहस्थ आहेत आणि इथल्या सर्वसामान्य भारतीयांपेक्षा वेगळे आहेत, त्यांच्यात योग्य आणि न्याय्य पद्धतीनं मत द्यायची पात्रता आहे, परंतु आम्ही एका माणसासाठी कायदा करू शकत नाही. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर १३, १८९५]

श्रीयुत स्माईथ यांनी ज्या पद्धतीनं विषयाला सुरुवात केली होती त्याची भलावण करत नाताळ विटनेस लिहिलं : *द टाईम्सनं* दिलेल्या धमकीचा 'ताबडतोब प्रतिकार करण्यात यायला पाहिजे आणि हा प्रतिकार करायचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे प्रत्येक शहरात, गावात

आणि वस्तीत या संबंधीची भावना व्यक्त करणारे ठराव करून वसाहतीची तीव्र भावना साम्राज्याच्या सरकारला कळवणं.' [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर २०, १८९५]

त्यानं या संदर्भात नेप्चूनच्या प्रसंगाची आठवण करून दिली. शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना ऑस्ट्रेलियात पाठवण्यात येत असे. परंतु आता तो मार्ग बंद झालेला असल्यामुळे ब्रिटिश सरकारनं शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना एका जहाजात भरून केपला पाठवायचा प्रयत्न केला होता. त्यामुळे लोकांमध्ये असं काही वादळ निर्माण झालं की सरकारला नमतं घ्यावं लागलं आणि गुन्हेगारांना न उतरवताच *नेपच्यूनला* परत जावं लागलं. चेम्बर्लेन यांना जाणीव करून देण्यासाठी नाताळसमोर हा आदर्श असायला पाहिजे असे उद्‌गार नाताळ विटनेसनं काढले.

द टाईम्समधील पूर्ण लेख नाताळमध्ये उपलब्ध झाल्यानंतर *नाताळ मर्क्युरीनं* लागोपाठ दोन अंकातून त्याचा समाचार घेतला. सप्टेंबर २५, १८९५ला त्यानं लिहिलं की इंग्लंडमधील वृत्तपत्रे दुर्बिणीच्या उलट्या टोकाकडे आहेत व त्यामुळे या प्रश्नाचा आवाका त्यांना कळू शकत नाही. भारतीयांना देण्यात येणाऱ्या वागणुकीबद्दल दादाभाई नौरोजी यांनी काढलेल्या उद्गारांसंबंधी त्यानं लिहिलं :

आमचा विश्वास आहे की ज्या कायद्यामुळे शासनाची सत्ता वास्तवात सर्वात खालच्या वर्गातील कुलींच्या हातात जाईल.... त्या अथवा तशा प्रकारच्या कायद्याला सुशिक्षित पारसी अथवा कोणत्याही समाजातील उच्चशिक्षित भारतीय विरोध करील. श्रीयुत गांधी वा उच्च वर्गाच्या व्यापाऱ्यांची जी पातळी आहे तीच कुलींची पातळी आहे काय ? तसं असतं तर भारतीय व्यावसायिकांबद्दल जी भावना आज आहे ती निर्माण झाली नसती. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर ५, १८९५]

नाताळ मर्क्युरीनं तक्रार केली की भारतीयांच्या अस्वच्छतेबद्दल प्रतिनिधी मंडळानं चुकीची माहिती दिली आहे. स्वच्छ हिंदू हा नियमाला अपवाद आहे – 'कावळ्यातील राजहंसासारखा.' 'ब्रिटिश सरदारात इंग्रज मजूर जसा असतो अगदी तसाच सर्वसाधारण

भारतीय असतो.' दक्षिण आफ्रिकेतील भारतीय हा 'शुद्ध आणि केवळ कुली आहे.' प्रतिनिधिमंडळानं हा चुकीचा मुद्दा उचलला आहे आणि इंग्लंड व अन्यत्र राहणाऱ्या बाहेरच्या लोकांचा त्यांनी गैरसमज करून दिला आहे.

कुली आणि नेटिव्ह आमच्या संस्कृतीत एकाच पातळीवर आहेत आणि त्यामुळे त्या दोघांनाही राजकीय दृष्टीनं एकाच पातळीवर ठेवण्यात ब्रिटिशांच्या दृष्टिकोनातूनही कोणताच अन्याय नाही. [*नाताळ मर्क्युरी*, सप्टेंबर २६, १८९५]

नाताळ ॲडव्हरटाईझरनं मत दिलं की साम्राज्याच्या सरकारनं या विषयाकडे 'केवळ तात्त्विक आणि भावनात्मक दृष्टीनं पाहायची चूक केलेली आहे. *नाताळ ॲडव्हरटाईझरला* खात्री वाटत होती की जर ब्रिटिश बेटात लाखोंच्या संख्येत भारतीय वस्ती करायला गेले आणि इंग्रजांपेक्षा भारतीयांची संख्या अधिक झाली तर 'ब्रिटिश प्रजा सिद्धान्त' 'लवकरच चेम्बर्लेन यांच्या डोक्यातून निघून जाईल.' नाताळमध्ये भारतीयांना जर मताधिकार देण्यात आला तर त्यामुळे काही वर्षातच युरोपिअनांच्या प्रशासनाच्या ठिकाणी भारतीयांचा भरणा असलेलं प्रशासन आल्याशिवाय राहणार नाही. अशा प्रकारच्या भवितव्याला शरण जाण्यापेक्षा दक्षिण आफ्रिकेतील लोक 'एक होऊन त्याला विरोध करतील.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर २५, १८९५]

गणराज्याची कानउघाडणी करण्याशिवाय वेगळं काही करायची श्रीयुत चेम्बर्लेन यांची तयारी नसल्यामुळे *नाताळ विटनेसचा* संताप झालेला होता. वसाहतीच्या बाबतीत 'थोडीशी बळजबरी' करावी लागेल असं चेम्बर्लेन यांनी सूचित केलं होतं. वसाहतीनं 'जे मिळवायचा निर्धार केलेला आहे ते नाकारणं' असा याचा अर्थ होतो असा *नाताळ विटनेसनं* त्यावरून तर्क केला. उदाहरणार्थ त्यांचा उपयोग वसाहतीच्या कारभारात अजून हस्तक्षेप करण्यासाठी होऊ शकेल अशा प्रकारची सूट मिळवण्यासाठी पारतंत्र्याचं मूल्य देणं उचित होईल काय? *नाताळ विटनेसनं* विचारलं. [*नाताळ विटनेस*, सप्टेंबर २७, १८९५]

साऊथ आफ्रिका या वृत्तपत्रानं चेम्बर्लेन यांच्या मुलाखतीचा उपरोधानं उल्लेख करत लिहिलं :

या सहस्रकात काय होणार आहे याची मागील आठवड्यात आम्हाला आधीच चव चाखायला मिळाली - मुसलमान सिंह, हिंदू शेळी आणि पारशी चिता या सर्वांना चेम्बर्लेन आपल्या तालावर नाचवतील आणि ते सर्व त्यांच्या पायाशी पडलेले दिसतील.

साम्राज्याचे सदस्य असलेल्या भारतीयांना ब्रिटिश प्रजेचे हक्क नाकारणं आणि ब्रिटिश वसाहत म्हणून नाताळची ब्रिटनशी जी निष्ठा होती तिच्यामुळे नाताळला पार पाडावं लागणारं कर्तव्य यातील अंतर्विरोध दूर करण्यासाठी *साऊथ आफ्रिकाचं* म्हणणं होतं की भारतीयांचं दक्षिण आफ्रिकेतील आंदोलन हे 'एका मोठ्या गोष्टीचं वरवर दिसणारं केवळ छोटंसं रूप आहे, ब्रिटिशांच्या इतर वसाहतीत मतदानाचा हक्क मिळवून मग त्याच प्रकारचा युक्तिवाद करून भारतात मतदानासाठी करावयाच्या आंदोलनाची ही लहानशी सुरुवात आहे.' आणि अखेरचं सांगायचं तर दादाभाई नौरोजी, एक सौजन्यशील भारतीय, एक मुसलमान आणि एक पारसी सद्गृहस्थ आणि त्यांचे सहकारी या सर्वांनी मिळून स्वस्त राजकीय बदनामी करण्यासाठी केलेला हा प्रयत्न आहे.' त्यानं इशारा दिला की ह्या प्रकरणी 'अतिरिक्त आंदोलन' करायचा प्रयत्न प्रतिनिधिमंडळानं सोडून द्यावा नाही तर 'ह्या सद्गृहस्थांच्या अपेक्षेपेक्षा त्याचे अगदी विपरीत परिणाम होतील.' [*नाताळ मर्क्युरीत साऊथ आफ्रिका* मधून उद्धृत, ऑक्टोबर २०, १८९५]

४

एकीकडे नाताळ मंत्रिमंडळावर दडपण आणण्यासाठी आणि दुसरीकडे डाऊनिंग स्ट्रीटशी व्यवहार करताना व त्याचबरोबर आशियायी प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाचे हात बळकट करण्याकरिता नॉटिंगहॅम (ऑक्टोबर ५), हॉविक (ऑक्टोबर ३१), बेलियर (नोव्हेंबर २५), रिचमंड (नोव्हेंबर २६,२७), आणि ग्रे टाऊन (नोव्हेंबर ३०) येथे संपूर्ण वसाहतीत प्रचार

करण्यासाठी सभांचं आयोजन करण्यात आलं. या सभांमधून लोकांच्या भावना भडकवण्याचा प्रयत्न करण्यात येऊन आशियायी लोकांवर कठोर टीकास्त्र सोडण्यात आलं. त्याचबरोबर नाताळमध्ये वास्तव्य करून एक वर्षही न झालेल्या तुच्छ 'कुली बॅरिस्टर'शी त्यांची गाठ पडली असल्याचंही त्या सभांमधून स्पष्ट झालं. ते त्याची प्रशंसा करू शकत होते वा त्याचा तिरस्कारही करू शकत होते परंतु त्याच्याकडे दुर्लक्ष मात्र करू शकत नव्हते. राजकीय परिसरात त्यानं जो बदल घडवून आणला होता तो त्यांच्याकडे कानाकोपऱ्यातून डोकावून पाहत होता. एवढंच नाही तर त्याच्या राजकीय विचारांशी मतभेद असणारेही त्याच्या आदर्शवादाची प्रशंसा करत होते आणि एक चांगला शत्रू म्हणून त्याच्याकडे पाहत होते. याचं कारण होतं त्याच्या सौजन्यशीलतेमुळे त्याची अजूनच वाढलेली क्षमता. या कामातून त्याला स्वतःची कोणतीही पोळी भाजायची नव्हती. त्याच्या शैक्षणिक कार्यानं विवेकी माणसांना भारतीयांच्या प्रश्नातील बऱ्यावाईट गोष्टी प्रथमच कळल्या होत्या. त्यामुळे समोर येऊन आपल्याला काय वाटतं ते ते सांगू लागले. त्यानं न थकता वसाहतीत आणि इंग्लंडमध्ये केलेल्या सतत प्रयत्नामुळे अनेक लोक अशा पर्यायी उपाययोजनांचा विचार करू लागले ज्यांचा आधी त्यांनी विचारही केला नसता. केपच्या एका वृत्तपत्रानं मांडल्याप्रमाणे ज्याची कोणी कल्पनाही केलेली नव्हती अशा रीतीनं आशियायी लोकांनी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली होती. भारतीय मतदान विधेयक सुरुवातीला जेव्हा मांडण्यात आलं होतं तेव्हा ते सहजपणे मंजूर होईल असं वाटत होतं. परंतु आता त्या शिळेवर आदळून मंत्रिमंडळाचं जहाजच फुटतं की काय अशी भीती वाटू लागली होती.

नॉटिंगहॅम रोड फार्मर्स असोसिएशनच्यावतीनं नॉटिंगहॅम रोड येथे सभा आयोजिण्यात आली होती व तिच्यात इतर अनेकांबरोबरच सन्माननीय मरे (जमीन आणि बांधकाम मंत्री) श्रीयुत सी. ए. एस. याँग आणि आमदार श्रीयुत सी. जे. स्माईट हेही हजर होते. श्रीयुत एडवर्ड वे यांनी संदेश वाचून दाखवले आणि रंगीत लोकांच्या मतदान अधिकाराच्या संबंधात कोणत्याही प्रकारची तडजोड न करता इंग्लंडला आम्ही जेरीस आणल्याशिवाय राहणार नाही असा संदेश

देऊन वसाहतीच्या लोकांना हुसकवण्यासाठी त्यातून प्रयत्न करण्यात आला होता. श्रीयुत हेनवुडही याच पद्धतीनं बोलले. परंतु श्रीयुत हेन्री बेल यांना मात्र वाटत होतं की 'अगदी काही मोजक्याच व्यक्तींच्या बाबतीत विशेष प्रकरणी अपवाद करता येऊ शकतो.' श्रीयुत स्माईथ यांनी जेव्हा वर्णन केलं की 'भारतातून इथं आलेले लोक भारतातील अगदी खालच्या वर्गातील आहेत.... तुरुंगाच्या दारावरून गोळा करण्यात आलेले.... अडाणी आहेत, भारतातील सर्वात खालच्या वर्गाचे आहेत' तेव्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. श्रोत्यांना घाबरवण्याच्या व सावध करायच्या उद्देशानं ते जेव्हा म्हणाले की 'भारतीयांजवळ किती तरी हुशार लोक आहेत आणि त्यांचं नेतृत्व करायची क्षमता व बुद्धिमत्ता असलेले लोक त्यांच्यात आहेत. ते एक होतील आणि.... आपण ज्यासाठी त्यांना अडवत होतो ते मिळवण्यासाठी ते आपल्या शक्तीचा उपयोग करतील'. तेव्हा श्रोत्यांचा थोडा गोंधळ झाला. एक तर हे वर्णन चुकीचं होतं वा विशेषणांची जी लाखोली वाहण्यात आली होती ती तरी चूक असायला पाहिजे होती. भाषणाचा शेवट निराशाजनक पद्धतीनं करण्यात आला. मागील सत्रात पारित करण्यात आलेलं विधेयक पुढील सत्रापर्यंतही स्थगित ठेवण्यात येऊ शकलं असतं. परंतु ब्रिटिश सरकारजवळ नवीन विधेयक मंजूर वा नामंजूर करण्यासाठी दोन वर्ष होती. त्यामुळे हे विधेयक 'जसं आहे तसंच वा त्याच्यावर थोडा साखरेचा मुलामा चढवून आणि सफेदी लावून' ब्रिटिश सरकारकडे परत पाठवण्यात यावं काय या प्रश्नाचा आपल्याला विचार करायचा आहे असं ते म्हणाले. सभेमध्ये 'वसाहत मंत्र्यांच्या विचाराधीन असलेल्या भारतीय मतदान विधेयकाला विनाअट पूर्ण पाठिंबा देणारा ठराव मंजूर करण्यात आला.' [*नाताळ मर्क्युरी*, ऑक्टोबर ७, १८९५]

सभेत मंजूर करण्यात आलेल्या ठरावामुळे मंत्रिमंडळाला मिळालेलं समाधान मात्र अल्पकालीन ठरलं. सर जॉन रॉबिन्सन यांना आव्हान देत स्टारनं विचारलं की 'नाताळवर कुलींचं मत लादायचा धोका तुम्ही जेलीफिश राजकारण्याप्रमाणे पत्करात' असं जे सर्व लोकांना वाटतं त्याचा हा पुरावा तर नाही? [*स्टार*, ऑक्टोबर १६, १८९५] *नाताळ विटनेसची* स्पष्टपणे निराशा झाली होती.

नाताळ ॲडव्हरटाईझरला वाटलं की केवळ मंत्रिमंडळालाच ज्याची माहिती आहे अशा आधीच ठरलेल्या ठिकाणाकडे आपलं स्थान घट्ट करण्याकरिता मंत्रिमंडळ वसाहतीला आंधळेपणानं ढकलत आहे. 'सत्राची सुरुवात झाली तेव्हा राणी ॲने जेवढी मरण पावलेली होती तेवढंच मतदान विधेयकही मेलेलं होतं, परंतु ते जाहीर होऊ न देण्यासाठी मंत्र्यांची खास वैयक्तिक कारणं असली पाहिजे.' मंत्रिमंडळाच्या सततच्या या मौनामुळे आणि वसाहतीला विश्वासात न घ्यायच्या त्याच्या धोरणामुळे त्यांच्या परिस्थितीला अजूनच धक्का लागायची शक्यता आहे. 'गप्प राहणं याचा अर्थ जर संमती होत असेल तर देशाबाहेरील धक्कादायक वृत्ताला त्यामुळे पाठिंबाच मिळतो.'

१८९४ साली मंजूर करण्यात आलेलं विधेयक 'ब्रिटिश प्रतिष्ठेला धक्का लावणारं आहे' या कारणासाठी विचाराधीन असलेल्या नवीन विधेयकाला श्रीयुत यॉंग यांनी पाठिंबा दिला. त्यामुळे चिडून *नाताळ विटनेस* उद्‌गारलं की 'ब्रिटिश प्रतिष्ठेच्या भ्रमाला प्रादेशिक निष्ठेमुळे बराच धक्का लागलेला आहे.' [*नाताळ विटनेसनं* ऑक्टोबर ११, १८९६ला लिहिलं : 'बहुधा आपल्याला हे दिसू शकणार नाही की काळाच्या कसोटीवर तावून सुलाखून निघालेल्या ब्रिटिश फर्निचरच्या ज्या वस्तू आपण आणल्या त्या वस्तू ब्रिटिशासाठी जेवढ्या महत्त्वाच्या आहेत त्यापेक्षा डचांसाठी काही कमी महत्त्वाच्या नाहीत.... आपण अध्यक्ष क्रुगरच्या देशभक्तीला हसतो परंतु त्यांनाही आपल्यापैकी कोणावरही हसायचा तेवढाच अधिकार आहे जेव्हा आपण आपली बाजू मांडताना परस्परांच्या हिताला महत्त्व देण्याऐवजी आपल्या राष्ट्रीयत्वाला महत्त्व देतो.... आपण सर्व, डच आणि इंग्रज सारख्याच प्रमाणात त्या वेळेची वाट पाहत असतो जेव्हा या देशाचाही फार मोठा विस्तार होईल, परंतु तो दिवस तोपर्यंत उगवणार नाही जोपर्यंत आपण आपल्या वा इतरांच्या वंशाच्या श्रेष्ठतेबद्दल बोलत राहू. आपण सर्व सारख्याच प्रमाणात आपल्या राष्ट्रांना एका मोठ्या घटकात विलीन करू इच्छितो.... आपण सर्व जर्मन आणि इतर राष्ट्रीयत्वाचे असू शकतो तसंच डच आणि इंग्रजही असू शकतो, आपण आपल्या देशाच्या आठवणी जपून ठेवू शकतो आणि इतरांच्या भावना न दुखावता आपल्या देशाच्या गौरवास्पद गोष्टींचं स्मरणही करू शकतो....'] *नाईनटीन्थ सेंचुरीच्या* जूनच्या अंकातील एका लेखात निदर्शनास आणण्यात आलं होतं की 'साम्राज्याबद्दलच्या भक्तीला' वेगानं उतरती कळा लागलेली आहे, परंतु साम्राज्याच्या प्रत्येक भागात 'स्थानिक निष्ठा' तिची जागा घेत आहे. ही भावना पूर्वीच्या भावनेपेक्षा काही कमी तीव्र नाही. केवळ तिचं स्वरूप तेवढं वेगळं आहे. *नाताळ विटनेसनं* प्रार्थना केली की 'संपूर्ण दक्षिण आफ्रिकेतील सर्व राज्यांना व्यापेल एवढी आपली

स्थानिक निष्ठा विकसित होवो व तो आपला आहे असं आपल्याला वाटो. त्यासाठी आपण आपल्या स्थानिक स्वार्थांना मोठं रूप न देता मोठ्या आणि व्यापक राजकारणाच्या दृष्टीने वागलं पाहिजे.'

सावधगिरीची सूचना देत लेखाचा शेवट करत त्यानं लिहिलं:

ब्रिटिश प्रतिष्ठा टिकवायच्या प्रयत्नात अमेरिका गमावल्या गेली. आणि आज आपण ज्या ब्रिटिश भारतीय प्रजेला तिच्या योग्य ठिकाणी ठेवायचा प्रयत्न करत आहोत ती त्या प्रतिष्ठेचा धावा करत आहे. त्याच ब्रिटिश प्रतिष्ठेप्रती असलेलं कर्तव्य पार पाडताना आज श्रीयुत चेम्बर्लेन यांना त्रास होतो आहे आणि दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश आणि डच प्रजेला शक्य तेवढा विरोध करणं त्यांना भाग पाडत आहे. [*नाताळ विटनेस* ऑक्टोबर ११, १८९६]

परंतु काळ आपला बदला लगेच घेत असतो. थोड्याच दिवसात *नाताळ विटनेस* आणि त्याचे अनेक समकालीन अग्निभक्षक जादूगार यांना दक्षिण आफ्रिकी संघराज्याच्या संबंधात आपल्या वृत्तीत एकदम बदल करावा लागला. साऊथ आफ्रिकामधील स्तंभलेखकानं लिहिलं की हलकीसलकी कामं करण्यासाठी भारतीय बरे आहेत. परंतु युरोपिअनांचं जे स्थान आहे त्या स्थानावर त्यांना 'लेखायचं सांगणं हा विक्षिप्तपणा आहे.' त्यांना जर नागरिकत्वाचे पूर्ण अधिकार देण्यात आले तर गोऱ्यांच्या श्रेष्ठतेच्या दृष्टीनं त्याचे भयंकर परिणाम होतील.

सुशिक्षित भारतीयांना मतदान अधिकार मिळण्याबाबत बहुतांश गोऱ्यांचा विरोध नाही असं लेखकानं पुढं लिहिलं. श्री गांधींनी त्याच्या 'देशबांधवांसाठी सर्व काही करणं हेही स्वाभाविक आहे. भारतीयांतील चांगल्या वर्गासाठी मतदानाचा हक्क मिळवायचा जेवढा ते प्रयत्न करतील तेवढी त्यांना सहानुभूती मिळायची शक्यता अधिक आहे.' इथं भारतीय आणि भारतीयच आहेत. [दक्षिण आफ्रिकेत स्थायी झालेल्या भारतीयांच्या उच्च दर्जाच्या संस्कृतीचं दर्शन साऊथ आफ्रिकाच्या स्तंभलेखकानं ऑक्टोबर २६, १८९५ च्या अंकात केलेल्या पुढील वर्णनातून होतं : 'त्या दिवशी एका वेटरला त्याच्या क्लबमध्ये घाईगडबडीत तो वाचत असलेलं पुस्तक खाली ठेवताना मी पाहिलं. कोणी तरी घंटी वाजवल्यामुळे तो तिकडे गेला असता मी पुस्तक उचलून ते कोणतं

आहे ते पाहिलं. ते पुस्तक जेमेरा ऑफ द तालमड होतं. त्यानंतर त्याला इंग्रजी वृत्तपत्र वाचता येतात याचीही मी खात्री करून घेतली. काही प्रमाणात तो माणूस माझ्यापेक्षाही अधिक शिक्षित होता आणि तरीही वरवर पाहणारे लोक त्याला कुलीच्या वर्गातील समजतील आणि कुली म्हणून बोलावतील. त्यामुळे जे लोक इंग्लंडमध्ये राहतात त्यांच्या मनात यासंबंधी काही गैरसमज असतील तर ते मी दूर करू इच्छितो.']

आपल्याच स्तंभलेखकाशी मतभेद व्यक्त करत साऊथ आफ्रिकानं लिहिलं की ब्रिटिश नागरिकत्व ही अभिमानाची गोष्ट आहे यात काही संशय नाही. परंतु भारतीयांना समान नागरिकत्वाचे अधिकार देणं अनुचितपणाचं होईल कारण 'नाताळमध्ये त्यांना मिळालेले अधिकार कोणत्याही न्यायानं ते भारतात परतल्यानंतर काढून घेता येणार नाही.' दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचं आंदोलन हे उत्स्फूर्त नाही. तो 'आंदोलक बॅरिस्टरच्या गुप्त कारस्थानाचा परिणाम आहे.' जोपर्यंत साम्राज्याच्या सरकारला ट्रान्सवालच्या कारभारात हस्तक्षेप करायचा अधिकार नाही तोपर्यंत नाताळ येथील पत्रलेखकानं दिलेल्या कारणासाठी नाताळमध्ये कोणतीही सवलत देता येत नाही. 'ज्या तत्त्वांच्या आधारे आपल्याला भारताबाहेर जाण्यास भाग पाडता येऊ शकतं त्या तत्त्वांचा ट्रान्सवालमध्ये कुलींसाठी आग्रह धरणं ही फार मोठी चूक होईल.' [*साऊथ आफ्रिका*, ऑक्टोबर २६, १८९५]

नॉटिंगहॅम रोड येथील सभेनं अपेक्षित उत्साह निर्माण केला नाही. 'श्रीयुत गांधी आणि भारतीयांचा मतदानाच्या अधिकाराचा प्रश्न सभेच्या आधी जिथं होता तिथंच राहिला' अशी तक्रार करण्यात आली. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, ऑक्टोबर १२, १८९५] भारतीय मतदान विधेयकाच्या बाबतीतील विरोध आपले घाणेरडे कपडे चव्हाट्यावर धुवायचा आणि सार्वजनिक जीवनाचा स्तर कमी करायचा प्रयत्न आहे असं वाटलं व त्याचा वीट येऊन एका युरोपिअन गृहस्थांना 'सिव्हिस ब्रिटनिरम सम' या टोपण नावाखाली आपला प्रामाणिक विरोध नोंदवणं भाग पडलं:

ज्या मूर्खपणाच्या वटवटीमुळे स्वायत्त सरकार चालवायची आपली क्षमता अगदीच सिद्ध होत नाही ती पूर्ण झाली काय असं विचारणं आता उचित होईल. ही सर्व चळवळ कशासाठी

आहे ? आमच्या आमदारातील बहुतांश आमदार, वृत्तपत्रं आणि जनता डुकराच्या कलेवराची वाटणी करत आहेत काय?

ब्रिटिश सरकारच्या अधिकाराचं उल्लंघन करायच्या उघड आणि अप्रत्यक्षपणे देण्यात येणाऱ्या धमक्यांचा उल्लेख करत लेखकानं पुढं लिहिलं:

अशा प्रकारच्या क्षुद्रपणात ब्रिटिश घटनेत बदल करायच्या मूर्खपणाच्या प्रयत्नाची भर पडणं हेच स्वायत्त सरकारचं फलित आहे काय?

ब्रिटिश साम्राज्याच्या अगदी लहानशा अशा एका स्वायत्त वसाहतीच्या अपवादात्मक परिस्थितीसाठी आपण संपूर्ण ब्रिटिश साम्राज्याचे मूलभूत तत्त्व रद्द करू पाहत असल्यामुळे आपण उपहासाला पात्र होत नाही काय याचा क्षणभर विचार करा. कोणताही इंग्रज मुत्सद्दी वर्णभेद करणाऱ्या प्रस्तावाला मान्यता द्यायचं साहस करू शकणार नाही. आपण वसाहतीच्या संस्थानासारखे असतो तर हे शक्य होतं. परंतु जबाबदार शासन पद्धत्तीत हे शक्य नाही. आपण सर्व जबाबदाऱ्या स्वीकारल्या पाहिजे, केवळ आपल्या कल्पनेप्रमाणे शासन चालवायच्या पद्धतीशी जुळतील तेवढ्याच नाही. ह्या अपवादात्मक परिस्थितीतून मार्ग काढायचा आणि भारतीयांच्या मताला या भूमीत निर्णायक शक्ती न होऊ द्यायचा उपाय सोपा आहे. ज्यामुळे संपूर्ण साम्राज्याची घटनाच वास्तवात कोलमडून पडेल अशा प्रकारचा पायंडा पाडणारं अशक्यप्राय कृत्य करण्यासाठी ब्रिटिश सरकारला प्रेरित करायचा प्रयत्न न करता - मतदान अधिकारासाठी शैक्षणिक तसंच अचल आणि चल संपत्तीविषयक पात्रता वाढवा आणि माझ्यावर विश्वास ठेवा की सुशिक्षित आणि जमीनजुमला असणाऱ्या भारतीयांची आपल्या मतदार सूचीत पडलेली भर वाईट असणार नाही. त्यांचे आणि आपले हितसंबंध अगदी एकच असतील. [*नाताळ मर्क्युरी*, ऑक्टोबर १५, १८९५]

लवकरच *नाताळ मर्क्युरीनं* तक्रार करायला सुरुवात केली की प्रत्येक सार्वजनिक प्रश्नाच्या बाबतीत 'अवास्तव कल्पना' निर्माण होऊ लागल्या आहेत. विरोधीपक्षांमध्ये

रस्साखेचीचा जो खेळ सुरू आहे तो पाहताना नाताळच्या कोणत्याही माणसाला थकवा येत नाही. त्यांना 'वर्तमान वादातून' विसावा हवा आहे. *नाताळ मर्क्युरीला* वाटलं की ही भयावह अवस्था आहे व त्यामुळे मंत्रिमंडळ दुर्बल होणं अपरिहार्य आहे.

घोषणाबाजी करण्यात आल्यानंतरही पुढील सभा चार आठवड्यांपर्यंत होऊ शकली नाही. हॉविक येथे नामांकित कलाकार वाद्यवृंद घेऊन नॉटिंगहॅम रोडवर आले आणि त्यांनी तिथं रीतसर प्रस्ताव पारित केला. तिथंही त्याच्यामागील प्रेरणास्रोत श्रीयुत याँग आणि श्रीयुत स्माईथ हेच होते. त्यांचं म्हणणं होतं की 'विशेष कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला मतदानसूचीत स्थान असू शकत नाही.' मतदार सूचीतून सर्व भारतीयांची नावं वगळायला सरकारनं कॉरोनेटला का सांगू नये अशी श्रीयुत हेनवुड यांनी विचारणा केली.

श्रीयुत याँग यांनी स्पष्ट केलं की मागील निवडणुकीत क्लिप विभागात काही भारतीयांची नावं मतदार सूचीतून वगळायचा खालच्या न्यायालयानं दिलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयानं फिरवला होता. त्यामुळे आता मतदार सूचीला मॅजिस्ट्रेटच्या न्यायालयात आव्हान द्यावं लागेल. त्यांनी वकील म्हणून या कामासाठी आपली सेवा 'मोफत' देऊ केली. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर २, १८९५] या प्रस्तावानं चिडून *नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये* पत्रलेखकानं लिहिलं की 'साधारणपणे मोफत सेवेसाठी जेवढी किंमत द्यावी लागते तेवढ्याच लायकीची ती असते.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, नोव्हेंबर ५, १८९५]

भारतीय आणि 'नेटिव्ह' यांच्या हितरक्षणाची जणू आपणच जबाबदारी पत्करली आहे असं समजणाऱ्या *साऊथ आफ्रिकन क्रिटिकनं* निर्वाळा दिला की दोघांनाही स्वतःचाच धोका आहे व त्याविरुद्ध संरक्षणाची गरज आहे. केप कॉलनीमध्ये 'गठ्ठा मतांचा' जो 'लज्जाजनक दुरुपयोग' करण्यात आला होता त्याकडे लक्ष वेधत साऊथ आफ्रिकन क्रिटिकनं लिहिलं की रंगीत लोकांचा मतदारसूचीत समावेश करण्यात आल्यास त्याचा दक्षिण आफ्रिकेवर किती 'वाईट आणि भयावह' परिणाम होऊ शकतो याचं हे अतिशय 'सूचक उदाहरण' आहे.

तारतम्य न बाळगता मतदानअधिकाराच्या बाबतीत करण्यात येणाऱ्या विस्तारापासून भारतीययांचं तसंच 'नेटिव्हांचं' संरक्षण करणं आवश्यक आहे. नेटिव्हांना अशा प्रकारचा तथाकथित अधिकार देण्यात आल्यामुळे त्यांचा लाभ होण्यापेक्षा हानीच अधिक झालेली आहे. त्यामुळे नेटिव्ह राजकीय आंदोलकांच्या हातातील बाहुले बनले. संशयास्पद पद्धतीनं काम करणाऱ्या त्याच वर्गातील मिशनऱ्यांचं लक्ष, वैशिष्ट्यानं पूर्वेकडील जिल्ह्यात, त्यांच्याकडे वेधलं गेलं व या अधिकारामुळे दारू आणि इतर घाणेरड्या सवयींपासून बचाव करायचं नेटिव्हांना स्वसंरक्षणाचं साधन उपलब्ध होण्याऐवजी या व्यसनांनी त्यांच्या अवनतीत सरळसरळ भर पडली. सर्वसामान्य आप्रवासी भारतीयावार अशाच प्रकारची कृपा नाताळमध्ये करण्यात आल्यास त्याच्या बाबतीतही अशाच प्रकारचा परिणाम व्हायची मला भीती वाटते.... वन्य जमाती वा या लोकांचं त्यांच्या स्वतःपासूनच खरं वा खोटंही संरक्षण होऊ शकतं. वन्य जमातींना याची चटक लावणारांचा निषेध करणारा मी पहिला असेन. परंतु 'अरब' लोकांचा वर्ग - तेही काही सर्व स्वच्छ नाहीत - सोडल्यास, नाताळमधील भारतीयांचं स्वतःपासून रक्षण करायची गरज आहे. त्याचप्रमाणे तो जेवढा चांगला आहे त्यापेक्षा तो अधिक चांगला असल्याचं जे आंदोलक दाखवत आहेत व राजकीय सत्ता मिळवायची त्याच्यात क्षमता असल्याचं सांगत आहेत त्या आंदोलकांपासूनही त्याचं रक्षण करायची गरज आहे. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर ४, १८९५]

वसाहतीत प्रत्यक्षात झालेल्या निषेध सभांचा आढावा घेत *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं की आतापर्यंत वसाहतीच्या राजकीय जीवनात महत्त्वाचं स्थान असलेल्या वसाहतीच्या विविध भागांनी भारतीयांच्या प्रश्नासारख्या मुख्य प्रश्नाबाबत स्वीकारलेली औदासिन्याची भूमिका नैराश्यपूर्ण आहे. या वृत्तपत्रानं वसाहतीतील लोकांना विनंती केली की त्यांनी मुळीच वेळ न गमावता आणि क्षुद्र पक्षीय राजकारणाचा विचार न करता नॉटिंगहॅम रोड आणि इस्टकोर्ट येथील मतदारांचं अनुकरण करावं व मंत्रिमंडळाचे हात बळकट करावे.

असं सांगतात की रोमन इतिहासात असा एक काळ होता की जेव्हा कोणीही पक्षासाठी नसायचं व सर्व लोक राज्यासाठी असायचे. अशाच रीतीनं भारतीयांच्या या प्रश्नाबाबतही वसाहतीतील युरोपिअनांनी सर्व व्यक्तिगत आणि राजकीय मतभेद बाजूला सारून सार्वजनिक हितासाठी एक होऊन काम करायची वेळ निःसंशयपणे आलेली आहे. तुमच्या भावनांना सौम्य करायचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न असेल व ते तुमच्याशी विश्वासघाताचा खेळ खेळत असतील तर, नाताळ ॲडव्हरटाईझरनं इशारा दिला की, 'येत्या निवडणुकांमध्ये या प्रश्नावर त्यांचा पराभव निश्चित आहे असं समजायला हरकत नाही.'

नाताळ ॲडव्हरटाईझरनं लिहिलं की 'चांगल्या वर्गातील भारतीयांबद्दल' 'नेटिव्हांसाठी' आहे तसं विधेयकात सूट देणारं एक कलम टाकण्यात यावं. त्या कलमानुसार पात्र भारतीयांना मतदार व्हायचा अधिकार देण्यात यावा. या सूटीच्या संबंधात निर्णय घ्यायचा संपूर्ण अधिकार कार्यकारिणीला असावा. हे संरक्षण प्रत्येक प्रकरणी 'शुद्ध व्यक्तिगत विशेषाधिकाराच्या स्वरूपाचं असावं. हा विशेषाधिकार व्यक्तीच्या चांगल्या वर्तनापर्यंतच कायम टिकणारा असावा आणि योग्य वाटलेल्या कारणासाठी कार्यकारिणीला तो केव्हाही काढून घ्यायचा अधिकार असावा.' अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळे सुशिक्षित, कायद्याचं पालन करणाऱ्या भारतीयाला सर्वसामान्य कायद्यामुळे मतदानाचा अधिकार न मिळाल्यामुळे जर काही अन्याय होत असेल तर तो दूर होऊ शकेल. यासाठी शैक्षणिक परीक्षा ठेवून काम भागणार नाही : 'शैक्षिणिक चाचणीचा काही वेळा प्रतिबंधक म्हणून उल्लेख करण्यात येतो; परंतु हा अडथळा अनेक भारतीय सहजतेनं ओलांडतील.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, नोव्हेंबर ४, १८९५]

ही सौम्य सूचनाही वसाहतीच्या मनाला जड झाली. लोअर टगेला येथील एका 'वॅग' नं टवाळी करत *नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये* लिहिलं की नाताळवर भारतीय मतदारांना लादण्यात आल्यास विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच बहुधा - नव्हे नक्कीच - आपल्याला 'अशा काहीशा' प्रकारचं मंत्रिमंडळ पाहायला मिळेल :

'प्रधानमंत्री - अली बंघारी

वसाहत मंत्री - दोस्त महमद

महाधिवक्ता - सैद महमद

कोषाध्यक्ष - रामासामी

नेटिव्ह सचिव - धुरा वाला

त्यांच्या सर्वोच्च आणि इतर न्यायालयात सरन्यायाधीश श्रीयुत गांधी आणि त्यांनी भारतातून आणलेले इतर लांब पांढरा डगला घातलेले लोक असतील. अशीच अवस्था इतर सार्वजनिक विभागांचीही असेल. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, नोव्हेंबर ४, १८९५] यामुळे वसाहतीची अवस्था गुलाम राज्यापेक्षाही वाईट होईल कारण त्यामुळे संसदेवर जरी भारतीय मतदारांचा प्रभाव असला तरी मंत्रिमंडळातील लोकांचं राष्ट्रीयत्व युरोपिअनच राहील असं लेखकाचं म्हणणं होतं.

काफिरांचं मंत्रिमंडळ भारतीयांच्या मंत्रिमंडळापेक्षा किती तरी चांगलं का? त्यांच्याशी तुलना करता नेटिव्ह सभ्य गृहस्थ आहेत. ते निर्भीड, शूर आणि स्पष्टवक्ते आहेत. भारतीय मात्र अगदी याउलट आहे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, नोव्हेंबर ४, १८९५]

यानंतर प्राप्त परिस्थितीत लेखकानं मातृभूमीविरुद्ध सविनय आज्ञाभंगाच्या आंदोलनाचं समर्थन केलं.

या गोष्टीला आपण सौम्यही करू नये आणि तडजोडही करू नये. राष्ट्रभक्तीबद्दलच्या आपल्या कर्तव्याबद्दल बरंच मूर्खपणाचं बोलण्यात आलेलं आहे. अशा काही वेळा येतात की जेव्हा मुलांना वडिलांचा आज्ञाभंग करावा लागत असतो. उदाहरणार्थ वडिलांनी जर मुलाला आत्महत्या करायला सांगितलं तर. त्याचप्रमाणे काही वेळा वसाहतीनं मातृभूमीची आज्ञा न पाळणंच न्याय्य असतं व मातृभूमीची आज्ञा जेव्हा अन्याय्य असते व त्या आज्ञेमुळे कधीही न भरून येणारं नुकसान होऊ शकतं तेव्हा तिची अवज्ञा करूनच तो आपल्या देशभक्तीचा अधिक

परिचय देत असतो. आमच्या मातृभूमीतील दीडशहाण्या लोकांनी नाताळनं राजकीय आत्महत्या करावी अशी आज्ञा केलेली आहे. त्यामुळे नाताळच्या बंधुनो, आता उठा आणि एक होऊन कामाला लागा आणि आपल्या राजकीय आईवडिलांनी केलेल्या अवास्तव आज्ञेला स्पष्टपणे, खंबीरपणे नाही म्हणा. [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, नोव्हेंबर ४, १८९५]

स्टॅंजर येथे लोअर ट्युगेला असोसिएशनच्या झालेल्या सभेत गोऱ्यांमध्ये या विषयावर असलेले मतभेद उघड झाले. श्रीयुत ए. कोलनब्रँडर भारतीयांबद्दल बोलताना म्हणाले की 'मी श्रीयुत गांधींसारख्या माणसासाठीही मताधिकाराची परवानगी देणार नाही.' श्रीयुत ह्युलेट म्हणाले की शैक्षणिक आणि सांपत्तिक अटी अधिक कडक करण्यात याव्या. श्रीयुत हिंडसन यांनी सुचवलं की भारतीय फार मोठ्या संख्येत आहेत आणि त्यांचं प्रतिनिधित्व कोणीच करत नाही. त्यामुळे त्यांच्या हिताकडे बघण्यासाठी एका सचिवाची नियुक्ती करण्यात यावी. त्याचं पद हे नेटिव्हांच्या हिताकडे बघणाऱ्या सचिवाच्या बरोबरीचं असावं. 'अशा प्रकारच्या प्रतिनिधित्वामुळे भारतीयांना कोणतीच राजकीय सत्ता मिळणार नाही. हा प्रतिनिधी आपला स्वतःचा दृष्टिकोन व्यक्त करायच्या परिस्थितीत असेल.'

सभेत एकमतानं ठराव पारित करण्यात आला की वसाहतीत बंधुआ मजूर म्हणून येणाऱ्या भारतीयांना मतदानाचा अधिकार कधीही देण्यात येऊ नये परंतु 'इतर ब्रिटिश भारतीय प्रजेला, ते जर देशातील मतदान अधिकार कायद्याप्रमाणे मतदानासाठी पात्र असतील तर आणि भारतात वा ब्रिटिशांच्या कोणत्याही प्रदेशात त्यांना मतदानाचा अधिकार होता अशा प्रकारचा त्यांच्याजवळ दाखला असेल तर त्यांना तो अधिकार देण्यात यावा.'

सभेच्या संयमाबद्दल प्रशंसा करत *नाताळ अॅडव्हरटाईरनं* लिहिलं की अशा प्रकारच्या वातावरणात चर्चा केल्यामुळेच 'नाताळमधील वसाहत करणाऱ्या लोकांची इच्छा या प्रकरणी इतर काही करायची नसून केवळ न्याय आणि योग्य तेच करायची आहे हे साम्राज्याच्या

सरकारला दाखवता येईल. अतिरेकी लोकांच्या वकिलीमुळे लाभापेक्षा हानीच अधिक होत असते.' [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, नोव्हेंबर १४, १८९५]

नाताळ अॅडव्हरटाईझरनं श्री हिंडसन यांच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला आणि शिफारस केली की 'श्रेष्ठ वर्गाच्या भारतीयांसाठी अशा प्रकारच्या सूटीची व्यवस्था करण्यात यावी की 'सर्व पात्र भारतीयांना मतदानाचा अधिकार मिळू शकेल.'

५

बहुतेक आप्रवासी आर्थिक दृष्टीनं दलित असल्यामुळे या संघर्षात भारतीय लोकांना अडचणींना तोंड द्यावं लागत होतं. त्याचबरोबर भारतीय नेतृत्वातील एका वर्गावर परकीय सत्तेचा परिणाम झाला व त्यामुळे अपरिहार्यपणे झालेल्या अवनतीमुळेही त्यांना फार मोठं मूल्य द्यावं लागत होतं. आपल्याच लोकांवर दादागिरी करणारे आणि तुच्छतेनं पाहणारे परंतु सत्ताधारी लोकांची हां! जी! हां! जी! करणारे सर मंचरजी भोवनग्री यांच्या अशा प्रकारच्या स्वभावामुळे कोटिबाज लोकांनी त्यांचं नाव बो अँड ॲग्री असं (वाका आणि मान्य करा) ठेवलं होतं. ते आपल्या निवडणूकपूर्व एका भाषणामध्ये म्हणाले होते की 'भारतातील नेटिव्ह अशक्यप्राय हक्कांची' आणि भारतातील परिस्थितीशी अगदीच न जुळणाऱ्या प्रगत सरकारची मागणी करत आहेत.' त्यामुळे ते ब्रिटिश आणि इतर प्रजाबांधवांतील संबंधात तणाव निर्माण करत आहेत. त्याचा उल्लेख करत नाताळ विटनेसनं टिप्पणी केली की 'तरीही हे लोक नाताळमध्ये युरोपिअनांच्या बरोबरीच्या हक्कांची मागणी करत आहेत.'

भोवनग्री यांना उद्धृत करत विटनेसनं लिहिलं, 'मी परत जोर देऊन सांगेन की ज्या सर्व कारणामुळे भारतात पूर्वी प्रक्षुब्धता माजलेली होती ती कारणं आजही तेवढीच अस्तित्वात आहेत व त्यांचा प्रभावही तसाच कायम आहे. त्यामुळे भारतातील इंग्रजांचं राज्य कायम ठेवणं व ते बळकट करणं भारताच्या हिताचं आहे.' त्यामुळे चेम्बर्लेनकडे गेलेल्या प्रतिनिधिमंडळात

भोवनग्री यांनी वठवलेल्या भूमिकेशी त्या उद्‌गारांचा संबंध जोडत *नाताळ विटनेसनं* लिहिलं : 'आता ते (भोवनग्री) जे करायचा प्रयत्न करत आहेत ते यावेळी आफ्रिकेत असलेल्या गोऱ्या सरकारचा नाश करणारं आहे.' वृत्तांतात भारतातील आंदोलनाबद्दल भोवनग्री पुढं असंही म्हणाल्याचं सांगण्यात आलं होतं : 'भारतातील नेटिव्हांच्या असंतोषाच्या भावनेला आणि तक्रारी करायच्या स्वभावाला उत्तेजन देणं, ब्रिटिश सत्तेच्या पद्धतीची आणि हेतूंची निंदा करायच्या संधीच्या शोधात असणं या अशा काही गोष्टी आहेत की ज्यांचा इंग्रजांच्या प्रभावावर परिणाम होईल.' या उद्‌गारांचा अप्रत्यक्षपणे निर्देश करत *नाताळ विटनेसनं* झोंबणाऱ्या शब्दात टीका करत विचारलं की 'भारतात मतदानाचा अधिकार दिल्यानं जर हे सर्व घडू शकत असेल तर या सर्व गोष्टींचा या देशात काही वेगळा परिणाम होईल असं गृहित धरण्यासाठी काही कारण आहे काय ?' [*नाताळ विटनेसनं* नोव्हेंबर १५, १८९५. भोवनग्री यांचं हे स्वभाववैशिष्ट्य भारतातही लक्षात आलेलं होतं आणि त्यांच्या पक्षातील काही महत्त्वाचे नेतेही त्यांच्याकडे अगदी घृणेनं पाहत असत. उदारमतवादी नेते राईट ऑनरेबल श्रीनिवास शास्त्री यांनी 'सर फिरोजशहा मेहता जीवन आणि काळ' या विषयावर जे भाषण दिलं होतं त्यात या आणि इतर प्रसंगीच्या त्यांच्या वर्तनाचं वर्णन असं केलं : 'या वेळेपर्यंत भोवनग्री हाउस ऑफ कॉमन्सचे बेथनाल ग्रीनमधून सदस्य झालेले होते. ते जेव्हा टोरी पक्षाचे सदस्य होते तेव्हा ते भारतातील सर्व सार्वजनिक नेत्यावर कडाडून टीका करायचे आणि देशद्रोही म्हणून त्यांची बदनामी करायचे..... ते .... ते नेहमी अधिकाऱ्यांची आणि अधिकारी नसलेल्यांचीही स्तुती करायचे. ते पारशी होते व आपल्या समाजाला ते कलंक होते यासाठी मेहता त्यांच्यावर अतिशय चिडलेले असायचे. एकदा..... फिरोजशहा मेहता यांनी त्यांच्याबद्दलची घृणा व्यक्त करणारं जोरदार भाषण दिलं आणि आपल्या भावनांना औपरोधिक शैलीनं व्यक्त केलं केवळ तेच तसं करू शकत होते.' शास्त्रींनी नंतर सर फिरोजशहा मेहता यांचे उद्‌गार उद्धृत केले : 'अँग्लो इंडियन लोकांच्या एका विशेष वर्गानं श्रीयुत भोवनग्री यांचा सोन्याची एक साखळी देऊन सन्मान केला आणि एक महान विश्वसनीय आणि प्रसिद्ध राजकीय भविष्यवेत्ता असं त्यांचं वर्णन करण्यात आलं. (जोरदार हशा.) आणि त्यांनीही भविष्यवेत्त्याप्रमाणे असामाधानाचं आणि राजद्रोहाचं बीजारोपण करण्यासाठी आणि इंग्रजांवर सतत व विवेकहीन हल्ले करण्याबद्दल सुशिक्षित वर्गाला दोष दिला. (पुन्हा हशा) सभ्य गृहस्थहो श्रीयुत भोवनग्री यांनी अशा प्रकारचा आरोप करायच्या पात्रतेसंबंधीचा काही वर्षांपूर्वीचा एक प्रसंग मला स्पष्टपणे आठवतो.' या प्रसंगासाठी प्रकरण *खंड* १ ला ५ ची ६ क्रमांकाची टीप पाहा.]

क्लिप रिव्हर फार्मर्स असोसिएशनद्वारे आयोजित करण्यात आलेल्या सभेत ठरवण्यात आलं की 'नाताळच्या वसाहतीत कोणत्याही भारतीयाला मतदानाचा हक्क नाकारण्यासाठी शक्य असेल ते सर्व करण्यात यावं.' प्रस्तावाला पाठिंबा देणाऱ्या गृहस्थानं एक पाऊल अजून पुढं टाकत सांगितलं, 'गरज पडल्यास आपले हक्क मिळवण्यासाठी आपण आपल्या

स्वातंत्र्याचा ध्वज फडकवण्याचीही तयारी ठेवली पाहिजे.' अखेर आमदार श्रीयुत ब्रेनब्रिज यांना आठवण करून द्यावी लागली की स्वायत्त सरकारची सूट देताना आपल्याला वर्गभेद करणारे ठराव करता येणार नाहीत अशी अट सम्राज्ञींच्या सरकारद्वारे आपल्यावर घालण्यात आलेली आहे.

६

भस्मासूर हाताबाहेर जाऊ लागला होता. उशिरा का होईना *नाताळ मर्क्युरीनं* त्याला परत बोलवायचा प्रयत्न केला. लेडिस्मिथ येथे मंजूर करण्यात आलेला ठराव 'संपूर्ण' होता. तरीही *नाताळ मर्क्युरीचं* म्हणणं होतं की त्याच्याकडे समग्र दृष्टीनं पाहिल्यास तो तसा नसल्याचं आढळेल :

इथं श्रीयुत गांधींसारखेही भारतीय आहेत.... ते या वसाहतीत वास्तव्य करायला आलेले आहेत व ते अनेक इंग्रजांपेक्षाही सूज्ञपणानं आणि राष्ट्रभक्तीनं मतदान करायला ते पात्र आहेत. वास्तवात ते नाताळचे स्वाभाविकपणेच वसाहतवाले झालेले आहेत आणि या वसाहतीत जर्मन वा फ्रेंच माणसाविरुद्ध मतदानाचा अधिकार नाकारायला जेवढी कारणं आहेत त्यापेक्षा अधिक कारणं त्यांना मतदान अधिकार नाकारण्यासाठी नाहीत. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर १९, १८९५]

प्रत्येक मुक्त भारतीयाला मत द्यायचा अधिकार देणं याचा अर्थ झाला असता युरोपिअन मताला भारतीय मतानं खाऊन टाकणं. इनांडा, लोअर टुगेला आणि किनारपट्टीवरील ऊस उत्पादक अलेक्झँड्रिया मतदारसंघात बंधुआ मजूर वगळता मुक्त भारतीयांच्या संख्येचं युरोपिअनांशी प्रमाण ३ ला १ वा कुठेकुठे ४ ला १ असंही होतं. उदाहरणार्थ व्हिक्टोरिया कौंटीत (लोअर टुगेला प्रभाग) २३२० मुक्त भारतीय होते तर युरोपिअन केवळ ५४१. परंतु *नाताळ मर्क्युरीला* हेही माहीत असायला हवं होतं - वा माहीत असेलही परंतु त्यानं सांगितलं नसेल - की व्हिक्टोरिया कौंटीत मतदारसूचीत १८९५ साली केवळ एकाच भारतीयांचं नाव होतं जेव्हा

की ५६६ युरोपिअनांची नावं मतदारसूचीत होती. अलेक्झँड्रिया कौंटीत एकाही भारतीयांचं नाव मतदार सूचीत नव्हतं जेव्हा २०१ युरोपिअन मतदान करण्यासाठी पात्र होते. ही गोष्ट संपत्तीविषयक पात्रतेच्या युक्तीमुळे साध्य झाली होती. त्यामुळे दाखवण्यात येणाऱ्या धोक्याचं हे चित्र काल्पनिक असल्याचं दिसून येतं.

'अधिक शिकलेल्या लोकांच्या वर्गाला, प्रामुख्यानं दुकानदार आणि त्यांचे मदतनीस यांना, सामान्यपणे भारतीय म्हणत असत.' *नाताळ मर्क्युरीनं* मान्य केलं की हे लोक मतदानासाठी पात्र आहेत यात काही संशय नाही. परंतु युरोपिअन वसाहतदारांच्या हिताच्या विरोधी त्यांचे हितसंबंध होते आणि *त्यांची एकूण संख्या अपरिहार्यपणे निवडणुकीचा निकालावर परिणाम करू शकत होती.'* [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर १९, १८९५ (तिरपी अक्षरं माझी)] त्यामुळे देशानं त्यांच्या मतापासून संरक्षणाची मागणी करणं 'स्वाभाविक' आणि 'योग्यही' होतं.

नाताळ विधानसभेचे अध्यक्ष श्रीयुत स्टाईनबेक यांचा बेलियर हा मतदार संघ होता. डरबन कौंटीचं ते राजकीय केंद्र आहे असं मानण्यात यायचं. इथं झालेल्या सभेत नवीन सत्रात मांडण्यात यावयाच्या विधेयकाचा उल्लेख करत श्रीयुत स्टाईनबेक म्हणाले की इंग्लंडमधील ज्या लोकांना संघराज्य निर्माण होतं की काय याची काळजी वाटते त्यांनी अशा काही शापपूर्ण धोरणाचा अवलंब करू नये की ज्यामुळे 'पिढ्यांपिढ्या अशक्य असलेलं' दक्षिण आफ्रिकेचं संघराज्य निर्माण व्हावं.

परंतु समजा की डाऊनिंग स्ट्रीटनं भारतीयांना मताधिकार नाकारणाऱ्या विधेयकाला मान्यता द्यायचं नाकारलं तर काय होईल ?

सरकार डाऊनिंग स्ट्रीटला ताबडतोब सांगेल: 'आमच्यावर विशिष्ट परिस्थितीत नाताळच्या जबाबदार शासनाची जबाबदारी टाकण्यात आली होती. परंतु आमच्या विधेयकाला तुम्ही मान्यता न दिल्यामुळे ती परिस्थिती आता एकाएकी पूर्णपणे बदलली आहे. तुम्ही अशी

भयावह परिस्थिती आणली आहे की त्यामुळे तुम्ही आम्हांला दिलेले अधिकार आम्ही तुम्हाला परत करत आहोत. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर २७, १८९५]

त्यामुळे प्रधानमंत्र्याच्या विश्वासातील म्हणून ओळखले जाणारे श्रीयुत मेडन यांनी लक्षपूर्वक त्यांचं म्हणणं ऐकलं. व्यासपीठावरून ऐका-ऐका अशा आरडाओरडीत श्रोतृसमुदायाला त्यांनी आश्वासित करत सांगितलं की सरकारनं या गोष्टीचा आधीच विचार केलेला आहे आणि लगेच ते पुढं म्हणाले:

यापुढे वसाहतीच्या स्वायत्त शासनाचा कारभार परत करताना मंत्रिमंडळ सदसद्विवेकबुद्धीला प्रामाणिक राहून म्हणेल : आम्ही आमचा अधिकार परत करत आहोत आणि त्यांना सूचित करेल की वसाहतीतील कोणताही युरोपिअन आपल्या विवेकाचा बळी द्यायला तयार होणार नाही आणि आमच्यानंतर आमच्या पदावर काम करायला तयार होणार नाही. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर २७, १८९५]

मंत्रिमंडळाला राजीनामा देणं भाग पडल्यास विरोधी पक्षाला रिकिबीत पाय घालता येऊ नये म्हणून त्यांनी अशा रीतीनं आपल्या मतदारसंघाला पूर्वीप्रमाणे बांधलं. त्यानंतर सरकारच्या कायम अवर सचिवानं प्रधानमंत्र्यांनी टॅथॅम यांना मतदान विधेयकासंबंधीचं नवीन तयार करण्यात आलेलं ९ जुलैला दिलेल्या उत्तराचं पत्र वाचून दाखवलं. या नवीन विधेयकात जुन्याच विधेयकाची पुनरावृत्ती करण्यात आलेली होती. त्यांनी आपल्या भाषणाच्या दरम्यान पुढील अतिरिक्त मुद्देही मांडले.

१. इंग्लंडमध्ये ५०० वर्षांपूर्वी भारतीयांपेक्षा प्रगत असलेल्या अशा वंशाच्या लोकांनी वास्तव्य केलं होतं आणि आता ते नाताळमध्ये राहत आहेत. (ऐका, ऐका). भारतीय मतदानाच्या अधिकाराची मागणी करत आहेत कारण इंग्लंडच्या राजदंडानं त्यांना इथं वल्हवत आणलेलं आहे. (टाळ्या)

२. त्यांच्या (भारतीयांच्या) देशाचा गतेतिहास असं दाखवतो की त्यांचा जन्म शासन करण्यासाठी आणि सरकार चालवण्यासाठी झालेला नाही. इतिहासाच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून त्यांचा इतिहास गुलामगिरीचा आहे.

३. भारतीयांनी केलेलं बंड हा एकच असा प्रसंग आहे की जेव्हा भारतीयांनी त्यांच्यात काही प्रतिकारशक्ती असल्याचं दाखवलं. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर २७, १८९५]

मोठेपणा दाखवत ते म्हणाले की माझ्या मनात 'कोणत्याही भारतीयाविषयी किंचितही पूर्वग्रह नाही.' तरीही 'ज्या बाकावर भारतीय बसलेला असेल - मग तो भारतीय कितीही उच्च जातीचा का असेना - त्या बाकावर बसण्यात मला काही बरं वाटणार नाही.'

* * * *

कोणत्याही परिस्थितीत नाउमेद न होता आपल्या देशभक्तीची जाहिरात करायची संधी न सोडणाऱ्या श्रीयुत पामर यांना मध्येच तोंड खुपसायला ही वेळ चांगली आहे असं वाटलं. परंतु नेहमीप्रमाणेच योग्य माहिती नसूनही त्यांनी त्यात हात घातला. 'वसाहतीत राहणाऱ्या भारतीयांपर्यंत मतदान अधिकाराचा विस्तार करणं वा त्यांच्या देशात त्यांना मिळणाऱ्या अधिकारापेक्षा अधिक अधिकार देणं योग्यही नाही आणि आवश्यकही नाहीं' असा ठराव मांडून सावधगिरीपेक्षा उत्साहाच्या भरात वाहवत जाऊन काहीही कारण नसताना आरोप करत ते म्हणाले की 'राजकीय दृष्टीनं निराश झालेल्या एका सद्‌गृहस्थांनी सध्याच्या सरकारचा पाडाव करायच्या हेतूनं' कुलींना मतदार सूचीत आणलं. [*नाताळ मर्क्युरी*, नोव्हेंबर २७, १८९५] परंतु त्यांच्या ह्या अप्रत्यक्ष टीकेचे लक्ष असलेले महाधिवक्ता हॅरी एस्कॉम्ब हे त्यांच्या दुर्दैवानं सर जॉन रॉबिन्सन मंत्रिमंडळाच्या आधारस्तंभातील होते! परिणामी *नाताळ विटनेसच्या* स्तंभाच्या खोड्यात पामरची मान अडकली.

असं दिसतं की श्रीयुत विल्यम पामर यांना वाटतं की भारतीयांना मतदान हक्क देण्याच्या बाबतीत स्पर्धा आहे आणि त्यांना ते हक्क अजून मिळालेले नाहीत. नक्कीच.... श्रीयुत पामर....

यांना माहीत असायला हवं की त्यांच्याएवढाच हिंदूंना मतदानाचा अधिकार आहे. आणि त्यांना हीही जाणीव असायला पाहिजे की भारतीयांचा मताधिकार काढून घेण्यासाठी मांडण्यात आलेल्या विधेयकासाठी सरकारनं जेवढा जोर लावायला पाहिजे तेवढा जोर सरकार लावत नाही असं समजलं जात असल्यामुळे असंतोष निर्माण झालेला आहे. श्रीयुत पामर यांना विनोद करून लोकांच्या भावनांशी खेळायचा अधिकार नाही.

याशिवाय श्रीयुत पामर यांचं म्हणणं आहे की जे लोक सध्याच्या सरकारबाबत असमाधानी आहेत त्यांनी आपला स्वार्थ साधण्यासाठी भारतीयांची नावं मतदार सूचीत घातलेली आहेत. अहो श्रीयुत पामर! श्रीयुत पामर महोदय! भारतीयांची नावं मतदार सूचीत स्वायत्त सरकार निर्माण व्हायच्या आधीही होती हे माहीत नसण्याएवढे तुम्ही अडाणी असू शकत नाही. आणि मागे झालेल्या निवडणुकीत सध्याच्या सरकारच्या एका सदस्याच्या महत्त्वपूर्ण सूचनेनुसार भारतीयांची नावं डरबन मतदार सूचीत घालण्यात आली होती. आणि मला असं वाटतं की त्या प्रसिद्ध मंत्र्यांनी आपल्या प्रचाराच्या दरम्यान एक भारतीय मुलाचा किती उत्साहानं मुका घेतला होता हेही तुम्हाला आठवत असेल. श्रीयुत पामर महोदय तुमच्या त्या आठवणीशी थोडा, अगदी थोडा तरी न्याय करा. [*नाताळ विटनेस*, नोव्हेंबर २८, १८९५]

तेवढीच कठोर टीका केली *नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये* 'इंक्वायररनं'. श्रीयुत पामर यांच्या विधानाचा उल्लेख करत त्यानं लिहिलं :

सरकारच्या विरोधकांनी सध्याच्या मंत्रिमंडळामधून मंत्र्यांना बाहेर घालवण्यासाठी भारतीयांची नावं मतदार सूचीत घातली हे बोलणं पूर्णपणे मूर्खपणाचं आहे. सरकारचा पाडाव करण्यासाठी काही लोक भारतीय मतदारांची नावं मतदार सूचीत घालायचं मूर्खपणानं साहस करतील या गोष्टीवर विश्वास ठेवण्याएवढे सध्याच्या मंत्रिमंडळाच्या संपर्कात नसलेले वसाहतीतील लोकही अडाणी नाहीत. जर सरकार पडायचंच असेल तर त्याला कारण मंत्रिमंडळ स्वतःच असेल. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, नोव्हेंबर ३०, १८९५]

आपल्या मूर्खपणाच्या बडबडीमुळे मित्रांनी आणि शत्रूनी तसंच मंत्रिमंडळानंही सारख्याच रीतीनं टाकून दिल्यामुळे अतिशय खजील झालेले श्रीयुत पामर आपण स्वतःच खोदलेल्या खड्ड्यात पडले.

७

मुळात नाताळ जरी केप कॉलनीचाच भाग होता तरी या दोघातील संबंधात, सर जॉन रॉबिन्सन यांच्या शब्दात सांगायचं तर, 'वात्सल्याचा गोडवा नव्हता.' [सर जॉन रॉबिन्सन, *अ लाईफ टर्म इन साऊथ आफ्रिका*, स्मिथ, एल्डर अँड कंपनी, लंडन, (१९००). पृष्ठ २२२] नाताळमध्ये वास्तव्य करायला अगदी सुरुवातीला आलेले लोक केप टाऊन वा पोर्ट एलिझाबेथमधून आलेले होते. तेथील आरंभीच्या व्यावसायिक प्रतिष्ठानांची स्थापना केपच्या व्यापाऱ्यांनी केलेली होती. त्यांच्या पहिल्या शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्तीही केपच्या सेवेत असणाऱ्या लोकांमधून झालेली होती. त्यामुळे केपमध्ये वसाहत केलेले लोक 'मालकाच्या दृष्टीनं जरी नव्हे तरी पालकाच्या दृष्टीनं' या नवजात वसाहतीकडे पाहायचे आणि आपल्या पालकत्वाखालून निघून जायचा या वसाहतींनी थोडा जरी प्रयत्न केला तरी त्यांना मत्सर आणि अविश्वास वाटायचा. त्यांनी केलेली कोणतीही स्पर्धा केपला आवडत नसे. नाताळ जसजसा प्रौढत्वाकडे जाऊ लागला तसतसं त्यानं हस्तक्षेप, अतिक्रमण वा गृहीत धरणं यासारख्या आपल्या भगिनीराज्यांच्या प्रवृत्तींचा प्रतिकार करायला सुरुवात केली.

१८४३मध्ये केप कॉलनीत सामिलीकरण झाल्यानंतर १८५६मध्ये नाताळला वेगळी वसाहत घोषित करण्यात आलं. परंतु १८७६पर्यंत त्यांच्या सीमा, उम्टाटा आणि उम्झिकुली या नद्यांमधील गेलेका, फिंगो, टेम्बू, पॉडो आणि इतर वन्य जमाती राहत असलेला काफ्रारिया म्हणून ओळखल्या जाणारा प्रदेश सोडला तर परस्परांना स्पर्श करणाऱ्या होत्या. सुरुवातीलाच नेटिव्हासारखा झालेला व काळ्या खंडाच्या टोकावर आपल्या वंशाचं राज्य स्थापन करणारा आदम कोक पहिला हा ग्रिकॉज या हलक्या प्रतीच्या जमातीचा राजा झाला होता. १८५८ साली

केप कॉलनीचे उच्चायुक्त आणि राज्यपाल जॉर्ज ग्रे यांच्या निमंत्रणानुसार आदम कोक हा अतिशय विरळ वस्तीच्या आणि कोणाचंही राज्य नसल्यामुळे 'कोणत्याही माणसाचा प्रदेश नाहीं' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या पश्चिम भागात वास्तव्य करायला गेला. त्यामुळे नाताळच्या आणि लुटारू बुशमनच्या प्रदेशात एक सुरक्षित प्रदेश निर्माण होत असल्यामुळे नाताळनं या व्यवस्थेला मुकाट्यानं संमती दिली. या बुशमनांनी ड्रेकन्सबर्गच्या वेगानं नाताळमध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांवर हल्ले केले होते. १८९५ साली वसाहत कार्यालयाच्या संमतीनं अंदाजे १० लाख मैलांचा, २५ मैल समुद्रकिनारा असलेला उम्झिकुलूच्या दक्षिणेकडील प्रदेश नाताळला जोडायची संमती देण्यात आली. त्या प्रदेशाला अल्फ्रेड कॉलनी असं नाव देण्यात आलं. १८९७ साली झुलूलँड जोडला जाईपर्यंत प्रदेशाच्या दृष्टीनं नाताळचा एवढाच लाभ झालेला होता.

आदम कोक पहिला याचा मृत्यू झाल्यानंतर त्यानं व्यापलेल्या प्रदेशाला – ज्याला पूर्व ग्रिकॉलँड म्हणायचे - नाताळच्या आक्षेपानंतरही केपच्या स्वाधीन करण्यात आलं. नाताळला वाटायला लागलं की व्यापार, नैसर्गिक साधन संपत्ती, कस्टम्स युनियन, वा प्रादेशिक विस्तार आदी कोणत्याही बाबतीत केपला नेहमीच मोठा वाटा मिळतो. या दोन राज्यांतील सीमांमध्ये केवळ गोंधळच होता. अल्फ्रेड कॉलनीमधून मारिट्झबर्ग येथे पोहोचण्यासाठी प्रवाशाला केप कॉलनीच्या २० मैलाच्या अरुंद पट्ट्यातून जावं लागायचं. ह्या पट्ट्यामुळे नाताळच्या एक भागाचा उर्वरित भागाशी असलेला संबंध तोडला जायचा. त्याच्या उत्तरेच्या भागाला लागून नाताळला आधीपासूनच हवं असलेलं पोंडोलॅंड होत. परंतु नाताळ अजून कस्टम्स युनियनमध्ये आलेलं नव्हतं. इतका महत्त्वाचा परराष्ट्रसंबंधविषक घटक गमावणं शक्य नव्हतं. ऱ्होड्स असा माणूस नव्हता की जो आपली किंमत वसूल करणार नाही. त्यानं त्यात अडथळा आणला.

नाताळ जोपर्यंत ब्रिटिश वसाहत होतं तोपर्यंत त्याच्यात स्वतंत्रपणे कृती करायचं सामर्थ्य नव्हतं. परंतु ऑक्टोबर १८९३मध्ये नाताळच्या पहिल्या जबाबदार मंत्रिमंडळानं पदभार सांभाळताच पोडोलँडला नाताळमध्ये सामील करण्याविषयीच्या मागणीनं परत जोर पकडला.

ब्रिटिश सरकारशी पत्रव्यवहार सुरू झाला. साम्राज्य सरकारनं नाताळला कळवलं की 'पोडोलँडवर केप कॉलनीचा किती तरी वर्षांपासूनच अधिकार असल्याचं मान्य करण्यात आलेलं आहे.' [सर जॉन रॉबिन्सन, *अ लाईफ टर्म इन साऊथ आफ्रिका*, स्मिथ, एल्डर अँड कंपनी, लंडन, (१९००). पृष्ठ २३३]

अतिशय निराश होऊन नाताळनं आपली नजर सीमेवरील ब्रिटिशांची वसाहत असलेल्या झुलूलँडकडे वळवली. यावेळी नशीब जोरावर असल्यासारखं दिसत होतं. साम्राज्याच्या सरकारनं नाताळला तो मुलूख ताब्यात घ्यायला संमती दिल्याची वदंता होती. १८९५चं वर्ष संपण्यापूर्वीच हे हस्तांतरण पूर्ण व्हायची अपेक्षा होती. परंतु इथंही परत तुपात माशी पडलेली होती. चर्चा होती की सम्राज्याच्या सरकारनं वसाहतीसमोर एक प्रस्ताव मांडलेला होता. नाताळनं भारतीयांना मतदान अधिकार दिला तरच त्याला झुलूलँड देण्यात येईल असा तो प्रस्ताव होता. एवढे प्रयत्न करूनही मंत्रिमंडळाला फुलं मिळण्याऐवजी काटेच मिळाले होते.

रिचमंड येथे नोव्हेंबर २६ला जाहीर सभेत बोलताना श्रीयुत बेन्स म्हणाले की मतदान विधेयकावर 'अपमानास्पद पद्धतीनं शरणागती' पत्करायच्या अटीवर झुलूलँड द्यायचा प्रस्ताव आपल्यासमोर 'मांडण्यात आलेला आहे.' त्यामुळे 'स्वायत्त शासन चालवायच्या जन्मसिद्ध अधिकाराच्या मोबदल्यात' झुलूलँड घ्यायच्या आधी या गोष्टीला विरोध करण्यासाठी वसाहतीनं ताबडतोब एक होऊन संपूर्ण वसाहतीत कृती करणं आवश्यक आहे. श्रीयुत बेन्स यांच्या संतप्त भाषणाचं जोरदार स्वागत करण्यात आलं होतं.

श्रीयुत बेन्स यांच्यानंतर बोलायला आलेले आमदार श्रीयुत निकोल्सन यांचं मत होतं की झुलूलँडचा 'बागुलबुवा' उभा करण्यात आला आहे. ते म्हणाले की आम्ही घाबरून मतदान प्रश्नावर शरणागती पत्करणार नाही. नेटिव्हांना मताधिकार न देता भारतीयांना तो देणं अन्याय्य होईल. आत्मरक्षण करणं हा निसर्गाचा पहिला नियम आहे.

जिथं कुठं नेटिव्हांना मतदानाचा अधिकार देण्यात आला तिथं ते परत रानटीपणाकडेच नाही तर मनुष्यभक्षणाकडेही वळले. त्यामुळे या देशातील नेटिव्हांना वा भारतीयांना मतदानाचा अधिकार देण्यात आल्यास काय होईल ते मला माहीत नाही.

या वेळी भारतविरोधी वृंदगानात विसंवाद निर्माण झाला. सभेत उपस्थित असलेले श्रीयुत ई. हॅरो, जे. डब्ल्यू. मॅकेंझी, आणि आर.ए. मॅकेन्झी हे लोक रंगीत लोकांच्या अधिकाराचं निर्भयपणे पुरस्कार करायचे. श्रीयुत हॅरो यांनी श्रोत्यांना आठवण करून दिली की तुम्ही लोकांशी तसं वागा जसं लोकांनी तुमच्याशी वागावं असं तुम्हाला वाटतं. ख्रिश्चन धर्माचं हे तत्त्व काही केवळ गोऱ्या वा युरोपिअन लोकांसाठीच लागू होतं असं नाही. रंग वा धर्म याचा विचार न करता सर्वांसाठी लागू होणारं हे तत्त्व आहे. न्यूझिलंडमध्ये माओरींचा ज्वलंत प्रश्न माओरींना जवळपास अर्धा डझन लोकांना सभागृहात प्रतिनिधित्व देऊन कशाप्रकारे सोडवण्यात आला त्याचं उदाहरण देत ते म्हणाले :

अशाच प्रकारे आशियायी लोकांना एका माणसाला मत देऊ द्या आणि जर ते या गांधीला आत पाठवतील तर तुम्हाला कुणाहीपेक्षा एक चांगला माणूस सभागृहात मिळेल. इंग्लंडमध्ये शिकलेला.... पूर्वेकडील राजकारणाची पूर्ण माहिती असलेला माणूस तुम्हाला मिळेल. लवकरच ते या देशाचे प्रधानमंत्री होऊ शकतील. (टाळ्या आणि हशा) ते अशा प्रकारचे गृहस्थ आहेत की ज्यांची तुम्हा गरज आहे. [*टाईम्स ऑफ नाताळ*, नोव्हेंबर २७, १८९५]

अलेक्झँडर उभे राहिले. त्यांनी टोला हाणत सांगितलं की केवळ गांधीच पाश्च्यात्त्य शिक्षण घेतलेले गृहस्थ नाहीत आणि श्रीयुत हॅरी यांनी ज्या माओरींचा उल्लेख केला ती माओरींची जमात श्रीयुत हॅरी ज्यांना 'रानटी जमात' म्हणतील त्या जगातील सर्व रानटी जमातीतील 'सर्वाधिक सुसंस्कृत' जमात आहे. ते शेवटी म्हणाले की हे मी मला माहीत असलेल्या तथ्यांच्या आधारे बोलत आहे.

'आणि मी अनुभवाच्या आधारे.' हसत श्रीयुत हॅरी म्हणाले.

निकोल्सन आपल्या भाषणात म्हणाले होते की सभागृहानं मागील वर्षी 'एकमतानं मतदान विधेयक मंजूर केलं होतं.' निकोल्सन यांच्या त्या मुद्यावरून त्यांच्यावर टीकेची झोड उठवत आपलं भाषण सुरू ठेवत श्रीयुत अलेक्झँडर म्हणाले:

सभागृहाचं मुळीच एकमत नव्हतं. सभागृहात असे अनेक सदस्य होते की ज्यांनी आंधळेपणानं सरकारकडून मतदान केलं आणि हॅरी एस्कॉम्ब यांनी काही करायचं सांगितलं तर तसं करण्यात यायचं. (एक आवाज - अगदी खरं आहे.) [*टाईम्स ऑफ नाताळ*, नोव्हेंबर २७, १८९५]

श्रीयुत आर. ए. मॅकेंझी : 'श्रीयुत गांधींना जेव्हा इंग्लंडमध्ये मतदानाचा अधिकार आहे तेव्हा तो इथं काढून घेणं शक्य आहे काय?'

अध्यक्ष : 'तो वैयक्तिक प्रश्न आहे व त्याचा संबंध गांधींशी आहे आपल्याशी नाही.'

त्यानंतर वसाहतीतील आशियायी लोकांना मतदानाचा अधिकार द्यायचा जो प्रयत्न करण्यात येत आहे त्याकडे ही सभा 'अतिशय असमाधाननं' पाहते व त्याबद्दल 'तीव्र नापसंती' व्यक्त करते असा ठराव श्रीयुत फ्लेट यांनी मांडला आणि श्रीयुत लेवीस यांनी त्याला पाठिंबा दिला.

आपण असं म्हणू या की आशियायी लोकांना दोन प्रतिनिधी पाठवायची अनुमती देण्यात यावी असा श्रीयुत हॅरो यांनी प्रस्तावाला दुरुस्ती सुचवणारा ठराव मांडला परंतु 'रंगीत वंशाच्या लोकांनी शैक्षणिक आणि संपत्तीविषयक पात्रता मिळवल्यानंतर त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा' या श्रीयुत जे. डब्ल्यू. मॅकेंझी यांनी नंतर मांडलेल्या दुरुस्ती ठरावामुळे त्यांनी तो मागे घेतला.

दुरुस्ती सूचनेवर बोलताना श्रीयुत जे. डब्ल्यू. मॅकेंझी उद्‌गारले की गोऱ्यांच्या लाभासाठी काळ्यांवर अत्याचार करायची प्रवृत्ती आहे. (आवाज - ओहो, ओहो आणि बसा, बसा) आवाज

देणाराला न दबता ते म्हणाले की मी बसणार नाही आणि मला जे सांगायचं आहे ते सांगेन. त्यांनी उत्कट इच्छा व्यक्त करत सांगितलं की ज्या लोकांनी शैक्षणिक आणि संपत्तीविषयक पात्रता मिळवली आहे त्यांना मताधिकार द्यावा. 'नेटिव्हांना अथवा भारतीयांना सभागृहाबाहेर ठेवण्यात यावं असं माझं मत नाही. श्रीयुत गांधी हे सभागृहाचं भूषण होतील.... रंगीत लोकांना प्रतिनिधित्व नाही हा अन्याय आहे. अशा प्रकारचे वर्षीय प्रस्ताव करायची प्रवृत्ती असण्यापेक्षा आपण सरळसरळ गुलामगिरीकडेच का जात नाही?

दुरुस्ती सूचना मतदानाला टाकण्यात आल्यानंतर ती ३ होय आणि २९ नाहीनं फेटाळण्यात आली. होय म्हणणारे श्रीयुत ई. हॅरो, जे. डब्ल्यू. मॅकेंझी, आणि आर. ए. मॅकेंझी होते. अनेक उपस्थितांनी मतदानात भाग घेतला नाही. [*टाईम्स ऑफ नाताळ*, नोव्हेंबर २७, १८९५]

सभा अगदी आपल्या मतानुसार झाली अशी जाणीव झाल्यामुळे ९ युरोपिअन मतदारांनी रिचमंड ॲग्रिकल्चरल हॉलमध्ये दुसऱ्या दिवशी पुन्हा सभेचं आयोजन केलं. श्रीयुत ई. हॅरो यांनी या सभेत 'भारतीयांना दोन आमदार निवडून द्यायची परवानगी असावी' असा प्रस्ताव मांडला परंतु त्याला कोणीच पाठिंबा दिला नाही. त्यानंतर जे. डब्ल्यू. मॅकेंझी यांनी प्रस्ताव मांडला, : 'ही सभा पुढील दुरुस्ती सूचना मान्य करते : रंगीत लोक जेव्हा शैक्षणिक आणि संपत्तीविषयक अटींना पात्र होतील तेव्हा त्यांना मताधिकार देण्यात यावा' आदल्या दिवसापेक्षाही स्पष्टपणे बोलत ते म्हणाले:

या सभांची प्रवृत्ती गोऱ्यांच्या फायद्यासाठी काळ्याचा छळ करायची झालेली आहे.... मला वाटत नाही की काफीर वा रंगीत लोक मतदानाच्या अधिकारासाठी पात्र आहेत. परंतु मला हे मात्र कळत नाही की श्रीयुत गांधींसारख्या सुशिक्षित लोकांना – ते जर संपत्तीविषयक अट पूर्ण करत असतील तर - सभागृहाबाहेर का ठेवण्यात यावं?

श्रीयुत ई. हॅरो यांनी उपसूचनेला पाठिंबा दिला.

श्रीयुत पी. फ्लेट यांनी पुढील प्रस्ताव मांडला आणि श्रीयुत लेवीस यांनी त्याला पाठिंबा दिला : 'या वसाहतीतील लोकांना मतदानाचा अधिकार द्यायचा जो प्रयत्न करण्यात येत आहे त्याकडे ही सभा अतिशय चिंतेनं पाहते आणि आशियायी लोकांची नावं मतदानसूचीत टाकायला विरोध करणाऱ्या १८९४ साली मंजूर करण्यात आलेल्या विधेयकाला जोरदार पाठिंबा देते आणि या विधेयकाला अमलात आणण्यासाठी या विभागातील सदस्यांनी त्यांना शक्य असेल ते सर्व करावं अशी विनंती करते.'

प्रस्ताव मंजूर करण्यात आला. परंतु युरोपिअनांच्या दृष्टिकोनातून परिणाम अजूनच असमाधानकारक होता. उपसूचनेच्या बाजूनं ४ लोकांनी मतं दिली जेव्हा की मागील सभेत तीन लोकांनीच विरोधात मतं दिली होती. प्रस्तावाच्या बाजूची मतं तेवढीच राहिली. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, नोव्हेंबर ३०, १८९५]

नॉटिंगहॅम येथे सुरू झालेल्या सभांचं सत्र ग्रेटाऊन येथे झालेल्या वादळी सभेमुळे एकाएकी नोव्हेंबर ३०, १८९५ला बंद पडलं. या सभेत मतदान विधेयकाला पाठिंबा देण्यात आला होता. द टाईम्सनं ब्रिटिश प्रजेला सम्राज्ञींच्या साम्राज्यात सर्वत्र समान हक्क आणि विशेषाधिकार आहेत असं विधान केलं होतं. सभेचं मत पडलं की 'अशा प्रकारचं बोलणं मूर्खपणाचं आहे कारण नेटिव्ह ब्रिटिश प्रजा असूनही त्यांना मतदानाचा अधिकार नाही.' [*नाताळ मर्क्युरी*, डिसेंबर ४, १८९५]

ग्रँडी हॉटेल, मुई येथे डिसेंबर १२, १८९५ला झालेल्या मुई फार्मर्स असोसिएशनच्यावतीनं बोलावण्यात आलेल्या सार्वजनिक सभेत 'श्रीयुत गांधींसारख्या उच्च वर्गाच्या सुशिक्षित भारतीयांना मताधिकार देण्यात यावा' या तडजोडीच्या प्रस्तावावर कडाडून हल्ला चढवत श्रीयुत रिचर्ड्स म्हणाले,

अशा लोकांना तर सगळ्यात शेवटून मताधिकार देण्यात यायला पाहिजे कारण शेतात काम करणाऱ्या ५०-६० सामींना मताधिकार दिल्यामुळे जेवढं नुकसान ते करतील त्याहूनही अधिक नुकसान अशा माणसांना मताधिकार मिळाल्यामुळे होईल.

भारतीयांना विधानसभेत दोन प्रतिनिधी देण्यात यावे या तडजोडीच्या प्रस्तावाला श्रीयुत कार्टर यांनी पाठिंबा दिल्यामुळे सभेत थोडासा गोंधळ उडाला. 'भारतीयांची संख्या दोनपर्यंत मर्यादित करण्यात आल्यास कोणतंही नुकसान होणार नाही. यामुळे भारतीयांची तोंडंही बंद होतील व ब्रिटिश सरकारचंही समाधान होईल.'

अध्यक्षांचंही मत होतं की भारतीयांना सार्वजनिक मतदानातून जरी बंगळण्यात आलं तरी त्यांना काही तरी प्रतिनिधित्व असायला पाहिजे.

श्रीयुत रिचर्ड्स : 'कुलींचं प्रतिनिधित्व आशियायी माणसानंच करायला पाहिजे काय?'

श्रीयुत वुड्स : 'होय, जर त्याला तसं कोणाला निवडायचं असेल तर.'

अखेरीस श्रीयुत हिंडसन यांचा स्टॅगर येथे जसा प्रस्ताव मान्य करण्यात आला होता त्याच धर्तीवर श्रीयुत रिचर्ड्स यांच्या प्रस्तावावर एक प्रस्ताव बिनविरोध मान्य करण्यात आला. तो असा होता : भारतीयांचा सर्वसाधारण मतदार सूचीत समावेश करण्यात येऊ नये परंतु त्यांचं प्रतिनिधित्व 'भारतीयांच्या प्रश्नाकडे लक्ष देणारा एक मंत्री करू शकेल व त्याची नियुक्ती नेटिव्हांच्या प्रश्नाकडे बघणाऱ्या सचिवाची जशी होते तशीच करता येऊ शकेल.

या सभेनंतर संपूर्ण वसाहतीत सार्वजनिक सभांची दुसरी फेरी सुरू झाली – मूरी रिव्हर (डिसेंबर १२, १८९५), कॅम्परडाऊन (जानेवारी ३, १८९६), बोस्टन (फेब्रुवारी २०, १८९६), क्लिप रिव्हर (मार्च ७, १८९६).

या सर्व सभांमधील सूर आणि रोख शक्य झालं तेव्हा आधीपेक्षाही विषारी होता.

८

या सभा सुरू असतानाच पिटरमारिट्झबर्ग आणि डाऊनिंग स्ट्रीट यांच्यात काही महत्त्वाचा पत्रव्यवहार सुरू होता. वसाहत कार्यालयातील मंत्र्यांनी ओठ घट्ट बंद केल्यानंतरही

काही बातम्या बाहेर आल्याच. त्यामुळे उडालेली खळबळ अखेरीस नाताळपर्यंत पोहोचल्यामुळे मंत्रिमंडळाची सत्ता कायम राहावी म्हणून पडद्यामागे काही तरी करार होत असल्याचा संशय लोकांच्या मनात निर्माण झाला. भारतीयांच्या प्रश्नांसंबंधात मंत्र्याच्या वृत्तपत्रांच्या सुरात आणि दृष्टिकोनात नंतरच्या काळात हळूहळू झालेला लक्षणीय बदल आणि सरकारच्या समर्थकांनी सभांमध्ये वारंवार मांडलेले तडजोडीचे प्रस्ताव यामुळे या संशयाला अजूनच रंग चढला. अखेरीस हा संशय खरा असल्याचं सिद्ध झालं.

नाताळच्या प्रधानमंत्र्यांनी जुन्या मतदान दुरुस्तीविधेयकावरील जे टिपण पाठवलं होतं त्याच्या चार दिवसांनंतर राज्यपालांनी वसाहत मंत्र्यांना लिहिलं :

या महिन्याच्या १६ तारखेला ६२ क्रमांकाचं मी जे पत्र पाठवलेलं होतं त्यातील मुद्यांबद्दलच मी पुढं लिहीत आहे. मतदान दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात ९,००० भारतीयांच्या सह्या असलेलं जे निवेदन मंत्र्यांनी माझ्याकडे पाठवलं ते मी आपल्याकडे पाठवत आहे.... आपल्या लक्षात येईल की सोबत जोडलेल्या निवेदनावर ९,००० सह्या करणारातून बहुतेकांचा सध्याच्या कायद्यानुसार मतदान अधिकारावर कोणताही अधिकार पोहोचत नाही व त्यामुळे योजण्यात यावयाच्या उपायाचा त्यांच्यावर कोणताही परिणाम होणार नाही.... जरी ह्या सह्या.... प्रभावित होणाऱ्या लोकांच्या आहेत असं.... मान्य केलं तरी सन्माननीय महोदय त्यांच्याबद्दल आपण अनुकूल विचार करावा अशी शिफारस मी करू शकत नाही. भविष्यात नाताळवर युरोपिअन वंशाच्या लोकांचं राज्य असावं की आशियायी वंशाच्या लोकांना वसाहतीच्या सरकारवर आपला प्रभाव पाडू द्यावा हा खरा प्रश्न आहे. नाताळच्या जनतेच्या मते या प्रश्नाचं केवळ एकच उत्तर आहे आणि ते आहे निवेदक विरोध करत असलेल्या कायद्याच्या आधारेच हा प्रश्न सोडवला जाऊ शकतो.

[*नाताळ मर्क्युरी*, डिसेंबर ४, १८९५]

मध्यंतरीच्या काळात सम्राज्ञींच्या सल्लागारांनी मतदानाच्या प्रश्नावर कोणताही निर्णय घेण्याआधी राजिनामा दिला व त्यामुळे लॉर्ड रिपन यांच्या ठिकाणी आलेले श्रीयुत चेम्बर्लेन यांच्यावर सम्राज्ञींच्या सरकारचं मत नाताळ मंत्रिमंडळाला कळवायची जबाबदारी येऊन पडली.

वसाहत मंत्री राज्यपालांना

सप्टेंबर १२, १८९५

फार मोठा बदल करायचं स्वरूप असलेल्या ह्या उपायावर अतिशय गंभीर आक्षेप येण्याची शक्यता आहे हे ऐकायची आपल्या मंत्र्यांची मानसिक तयारी नसेल असं नाही. यात परदेशातील लोक व सम्राज्ञींच्या सरकारची प्रजा यांच्यात अथवा अगदी अडाणी आणि भारतातील चांगले सुशिक्षित नेटिव्ह यांच्यात कोणताच भेद करण्यात आलेला नाही. या नंतरच्या वर्गात अशा प्रकारचे लोक आढळू शकतात की त्यांचं स्थान आणि त्यांचं कार्य पाहिलं तर ते नागरिकांची कर्तव्यं आणि हक्कं यांचं पालन करायला पात्र ठरतात आणि गेल्या काही वर्षात या देशातील काही महत्त्वाच्या मतदार संघांनी या भारतीय सद्गृहस्थांना केवळ मतदानासाठीच पात्र ठरवलेलं नाही तर हाउस ऑफ कॉमन्सवर प्रतिनिधित्व करण्यासाठीही पात्र ठरवलं आहे....

कदाचित असा विचार करण्यात येईल की ह्या प्रश्नाचा निर्णय इंग्लंडमधील परिस्थित्यनुसार घेण्यात आला आहे व स्थानिक परिस्थितीचं योग्य भान ठेवण्यात आलेलं नाही, वसाहतमंत्री पुढं म्हणाले :

तुमच्या सरकारची स्पष्ट इच्छा आणि हेतू आहे की नाताळच्या वसाहतीचं भवितव्य ॲंग्लोसॅक्सन वंशीय लोकांच्या हातून घडत राहावं, आणि आशियायी मतदारांचा संख्याबळ वाढवणारा लोंढा थांबवायचा प्रयत्न करण्यात यावा. या धोरणामागील कारणं मी समजू शकतो आणि भारतीयांच्या देशात प्रातिनिधिक पद्धतीच्या संस्था नाहीत आणि त्यांच्या देशावर युरोपिअनांचा प्रभाव नसताना त्यांनी स्वतः होऊन अशा संस्था स्थापन करायचा कधी प्रयत्नही केलेला नाही हे सत्यही मला मान्य आहे; परंतु विचाराधीन असलेल्या या विधेयकात भारतातील सर्व लोकांवर त्याची बुद्धिमत्ता, शिक्षण वा देशातील त्याचं स्थान आदी कोणत्याही प्रकारच्या अपवादाचा वा शक्यतांचा विचार न करता बंधनं घालण्यात आलेली आहेत. अशा प्रकारच्या उपाययोजनेला मान्यता दिल्यास भारतातील लोकांवर फार मोठा आघात होईल व त्यामुळे अशा

प्रकारच्या कामात कोणतंही ब्रिटिश सरकार सहभागी होऊ शकत नाही. मला विश्वास आहे की तुमचे मंत्री तुमच्या मनात असलेल्या हेतूंची पूर्ती करायच्या दृष्टीनं आवश्यक अशा प्रकारचे योग्य उपाय शोधून काढतील की ज्यामुळे सम्राज्ञींच्या सरकारला त्याला मान्यता देणं शक्य होईल.

प्रधानमंत्र्यांनी ऑक्टोबर १८, १८९६ला दिलेला वृत्तांत असा होता :

सरकारच्या इच्छेचा आणि हेतूंचा अगदी योग्य अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे आणि श्रीयुत चेम्बर्लेन यांच्या पत्रात त्याची योग्य बुजही राखण्यात आलेली आहे.... मंत्र्यांना त्यांच्यासमोर असलेल्या अडचणींची पूर्ण जाणीव आणि कल्पना आहे.... आणि मतदान अधिकारासाठी अपात्र असलेल्या व्यक्तींना मताधिकार न द्यायच्या हेतूचा बळी न देता आपल्या अडचणी दूर करण्यासाठी जे काही करता येईल ते करायची त्यांची तयारी आहे. मंत्र्यांनी अशा प्रकारचं विधेयक तयार करायला मान्यता दिली आहे की ज्यामुळे सम्राज्ञींच्या सरकारला मान्यता द्यायला अडचण जाणार नाही. ज्यामुळे वसाहत मंत्र्यांनी घेतलेले आक्षेप दूर व्हावे आणि त्याचबरोबर या देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाला जो गंभीर धोका निर्माण झाला आहे तोही टाळला जावा अशाप्रकारची उपाययोजना तयार करण्यात आलेली आहे. त्यांना असाही विश्वास आहे की विधेयकाला संसदेत सहज मान्यता मिळेल.

तथापि सम्राज्ञींच्या मान्यतेसाठी मतदान दुरुस्ती विधेयक आधीच पाठवण्यात आलेलं होतं. ते कायद्याच्या पुस्तकातून आधी रद्द करणं आवश्यक होतं.

महाधिवक्ता वसाहत मंत्र्यांना :

ऑक्टोबर २२, १८९५

मला असं वाटतं की अशा प्रकारचं कलम विधेयकात घालणं उचित राहील : '१८९४ चा कायदा क्रमांक २५ रद्द करण्यात येत आहे' कायद्याच्या पुस्तकात असलेला कायदा संपूर्ण उपाययोजना आहे. जोपर्यंत नवीन कायदा तयार होत नाही तोपर्यंत त्याच्या कार्यवाहीची तारीख

पुढं ढकलण्यात येत आहे. त्यामुळे मला वाटतं की कायद्याच्या पुस्तकात असलेली उपाययोजना रद्द करण्यात यावी.

राज्यपाल वसाहत मंत्र्यांना :

ऑक्टोबर २५, १८९५

प्रधानमंत्री महाधिवक्त्यांशी सहमत आहेत.

वसाहत मंत्री राज्यपालांना :

नोव्हेंबर २०, १८९५

आपल्याला विनंती आहे की या विषयावर प्रयत्न करायचं जे माझं कर्तव्य होतं ते मी केलं व त्यानुसार निवेदनावर सलोख्याच्या भावनेनं ज्या प्रकारे विचारविनिमय केला ते तुम्ही तुमच्या मंत्र्यांना कळवावा. तुम्ही विधेयकाचा जो मसुदा पाठवला आहे तो *वसाहतीच्या विधानसभेत त्याच स्वरूपात मंजूर झाल्यास सम्राज्ञींना तो मंजूर करायची शिफारस करण्यात मला अडचण जाणार नाही.* [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २२, १८९६, या आधीच्या दोन उद्धरणांसाठी टीप क्रमांक ९० पाहा]

परंतु वसाहतीच्या लोकांना यातील काहीच माहीत नव्हतं. या बाबतीत मंत्रिमंडळ काहीच करत नाही म्हणून आणि मंत्रिमंडळ इतर पक्षांना विश्वासात घेत नव्हतं म्हणून असमाधान पसरलेलं होतं.

९

नोव्हेंबर ३०, १८९५ला सेंट अँड्र्यूज येथील भोजन समारंभाच्या वेळी सर जॉन यांनी काहीच घोषणा न केल्यामुळे सर्वांचा अपेक्षाभंग झाला. ते सर्वसामान्य विषयावरच बोलत राहिले.

नाताळ असा देश आहे की ज्याचं नागरिकत्व सर्वांसाठी खुलं आहे. (आवाज : कुलींसाठी नाही.) सभ्य गृहस्थहो, मला माफ करा, मला असं म्हणायचं आहे की त्या सर्व लोकांसाठी

नाताळचं नागरिकत्व खुलं आहे ज्यांना आपल्या मातृभूमीत हे हक्क योग्य रीतीनं उपभोगायचा अधिकार आहे. (ऐका, ऐका) माघार घेता न येऊ शकणाऱ्या ह्या एकाच अटीसह या देशातील कायदे कोणत्याही माणसाच्या जन्मसिद्ध अधिकारावर कोणत्याही प्रकारचं बंधन न घालता नागरिकत्वाचे अधिकार देतात. [*नाताळ मर्क्युरी*मध्ये नाताळ विटनेसमधील उद्धरण, डिसेंबर ३, १८९५]

ते शेवटी म्हणाले :

मी हे सांगायला पाहिजे की जोपर्यंत आपला संबंध आहे तोपर्यंत या वसाहतीचं सरकार युरोपिअन आणि अँग्लोसॅक्सन वंशियांच्या लोकांकडूनच चालवलं जाईल. (टाळ्या) हा काही राजकारणाचा प्रसंग नाही व राजकीय विषयासंबंधी मी जो ओझरता उल्लेख केला त्यासाठी नम्रपणानं मी क्षमा मागायला पाहिजे. [वरीलप्रमाणे]

या वक्तव्याचं वर्णन संदिग्ध आणि मुत्सद्दीपणाचं असं करत *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* लिहिलं की सर जॉन म्हणाले की मंत्रिमंडळाचा निर्धार आहे की वसाहतीचं शासन त्यासाठी पात्र असलेल्या लोकांमार्फत चालवण्यात यावं. हे लोक कोण आहेत? 'या वर्गात भारतीयांचा समावेश होतो असं मान्य करावं म्हणून श्रीयुत चेम्बर्लेन मंत्रिमंडळाला गळ तर घालणार नाहीत?' 'ही अट मान्य केल्यामुळे झुलूलँडसाठी आम्हाला फार मोठी किंमत द्यावी लागली असा तर त्याचा अर्थ होणार नाही ?' *नाताळ ॲडव्हरटाईझरनं*शेवटी लिहिलं की हे स्पष्ट आहे की मंत्रिमंडळ आशियायी लोकांच्या प्रश्नाचा उपयोग 'लोकांचं लक्ष आतापर्यंत चालत असलेल्या कसोटीच्या प्रसंगांवरून दुसरीकडे वेधण्यासाठी करत आहे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, डिसेंबर ४, १८९५]

नाताळच्या दुसऱ्या एका वृत्तपत्रानं लिहिलं, 'आमचे मंत्री पदावर राहण्यासाठी काहीही करायला तयार आहेत असं म्हणालो तर त्यांच्या भावना दुखावतील. परंतु या आरोपाला त्यांच्या कृती सार्थ ठरवतात आणि त्यांच्या या विषयावरील मौनामुळे या आरोपाला आमंत्रण मिळतं.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, डिसेंबर १२, १८९५]

श्रीयुत मेडॉन यांनी सर जॉन यांचा जो संदेश बेलियर येथील सभेत वाचून दाखवला होता त्या संदेशाचं वर्णन *नाताळ विटनेसनं* 'चेम्बर्लेन यांना भंपक शब्दात दिलेलं आव्हान' [*नाताळ विटनेस*, डिसेंबर ६, १८९५] आणि सेंट अँड्रूयूज येथील भोजन समारंभातील त्यांच्या वक्तृत्वाचं वर्णन 'अतिशय गमती आणि रंजक नाटकातील..... शेवटचा प्रयोग' असं केलं. [*नाताळ विटनेस*, डिसेंबर १३, १८९५]

कुणाशीही संघर्ष करायची शक्ती नसलेलं असं सरकार नाताळमध्ये कधीच नव्हतं, आणि वसाहतीत संघर्षाच्या तयारीचं दृश्य दाखवण्यात येत असलं तरी वसाहत कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना मात्र यांचा सूर वाजवीपेक्षाही जास्त नम्रपणाचा असतो.... आपलं सरकार यापुढे संधी गमावणारं सरकार म्हणून ओळखलं जाईल. [*नाताळ विटनेस*, डिसेंबर ६, १८९५]

नाताळ विटनेसनं पुढील आठवड्यात लिहिलं की भांडखोरपणाचे निरोप 'ज्या फोनोग्राफमधून उच्चारले जातात त्यातूनच अस्पष्टपणे समजतात' आणि 'अंतःकरणाची हाक ही बुद्धिवादाच्या मेजवानीपेक्षा मोठी असते' अशासारख्या भविष्यदर्शी वाक्यांनी आपण कुठंच जाऊ शकणार नाही. आपण ब्रिटिश सरकारची अडचण लक्षात घेऊन त्यानुसार आपल्या मागण्यांचं स्वरूप ठेवायला पाहिजे.

जे लोक समजतात की चेम्बर्लेनवरच होय अथवा नाही अवलंबून आहे ते चुकत आहेत. वसाहतमंत्री या प्रश्नाच्या संबंधात आपल्या भारतातील सहकाऱ्यांशी आणि प्रधानमत्र्यांशी विचारविनिमय केल्याशिवाय काहीच करू शकत नाहीत. या दोघांपैकी पहिले भारत सरकारचा दृष्टिकोन व्यक्त करतात. त्यांची आपल्याला चांगली माहिती आहे; परंतु लॉर्ड सॉलिसबरी यांची भारतीयांबद्दल 'खरी अंतर्मुखता' आहे. त्यामुळे आशियायी लोकांचा मताधिकार काढून घ्यायला त्यांचा जो विरोध आहे त्यामुळे काहीच होऊ शकत नाही. [*नाताळ विटनेस*, डिसेंबर १३, १८९५]

गिल्डहॉल येथे लॉर्ड सॉलिसबरी यांनी दिलेल्या व्याख्यानात 'प्रत्येकाला स्वतःचे विश्वास असतात, परंतु सम्राज्ञींच्या विशाल साम्राज्यासारख्या साम्राज्याचा कारभार चालवायचा असेल

तर त्यासाठी इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा संपूर्ण निःपक्षपातीपणाची आवश्यकता असते' असं म्हणाल्याचं सांगतात. त्यामुळे 'परस्परांच्या अधिकारांचा सन्मान करून प्रत्येकाला आपला व्यवसाय करायची व समृद्धीकडे जाणाऱ्या मार्गाचं अनुसरण आत्मविश्वासानं आणि शांततेनं करायची संधी देणं हा साम्राज्याच्या सरकारचा हेतू आहे. *नाताळ विटनेसनं* वसाहतीच्या लोकांना सांगितलं की राणीच्या साम्राज्यातील मुसलमान प्रजेची संख्या ही टर्कीच्या सुलतानाच्या मुसलमान प्रजेपेक्षाही अधिक आहे. 'लॉर्ड बेकन्सफिल्ड यांनी बरोबरच सांगितलं आहे की..... की इंग्लंड युरोपिअन शक्तीपेक्षा आशियायी शक्तीच अधिक आहे.' तुम्ही हे लक्षात ठेवायला पाहिजे की ग्रेट ब्रिटनचं 'परंपरागत धोरण' कृतीवर नियंत्रण ठेवणं आणि तेही 'केव्हा केव्हा कठोरपणे' हेच राहिलेलं आहे.

आणि त्यामुळे इंग्लंडचं म्हणणं ऐकावं लागत असतानाच कधी कधी वसाहतीचा संताप होत असला तरी ते ऐकणं आवश्यक होतं. त्यांच्यासमोर असलेल्या अडचणी समजावून घेऊन त्याप्रमाणे निर्णय घ्यायची त्यांना सूट देऊ तेव्हाच इंग्रज मंत्री आपल्या बाजूनं वळू शकतील.
[*नाताळ विटनेस*, डिसेंबर १३, १८९५]

डिसेंबर जवळपास अर्धा लोटलेला होता. नवीन निवडणुकांची वेळ वेगात जवळ येत होती. एप्रिल-जून सत्रात विधेयक मंजूर झालं नाही तर वसाहतीतील भारतीयांना मतदार सूचीतून वगळता येणार नव्हतं. आणि तरीही लोकांना मतदान दुरुस्ती विधेयकासंबंधी काहीच कळत नव्हतं. हळुवारपणे *नाताळ मर्क्युरीनं* त्यासाठी भूमिका तयार करायला सुरुवात केली.

त्याची सुरुवात त्यानं श्रीयुत टॅथॅमला धारेवर धरण्यापासून केली. श्रीयुत टॅथॅम यांनी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीच्या शैलीवरच आपणच गोऱ्यांचे हितरक्षक आहोत असं दाखवणारं पत्र *द टाईम्सला* लिहिलं होतं. 'अशा प्रकारच्या पत्रातून नाताळमधील वसाहतदारांची भावना बरोबर व्यक्त होत असली तरी त्याचा लंडनच्या वर्तुळावर अनिष्ट परिणाम होऊन इच्छीत परिणाम साध्य होणार नाही. [*नाताळ मर्क्युरी*, डिसेंबर २७, १८९५] त्यानंतर त्यानं वसाहतीला आठवण

करून दिली की ब्रिटिश सरकार 'शक्य असेल त्या प्रमाणात' भारतीयांना 'इंग्रजांच्या बरोबरीत साम्राज्याच्या सर्व भागात समान हक्क द्यायला बाध्य आहे.' साम्राज्याच्या वसाहतींचा व्यापाराची केंद्र म्हणून विकास करण्यासाठी श्रीयुत चेम्बर्लेन आणि इंग्लंडमधील प्रभावी वर्गानं ब्रिटिशांची कोट्यवधीची रक्कम वसाहतीत गुतंवलेली आहे. प्रत्येकाला माहीत असल्याप्रमाणे गोरा मजूर हा गोऱ्या भांडवलापेक्षा आणि व्यवस्थापनापेक्षा वेगळा आहे आणि त्याचा उपयोग उष्ण हवामानातील ब्रिटिशांच्या वसाहतीत करता येऊ शकत नाही. भारतीय आप्रवासी बंधुआ मजुरांना एकच पर्याय आहे आणि तो म्हणजे सिसिली वा सारडिनामधून मजुरांची आयात करणं. त्या उपायांचा जोवर प्रयोग करण्यात येत नाही तोवर तुम्हांला भारतीय मजुरांवर अवलंबून राहावं लागणार आहे. त्यामुळे भारतीय मजुरांना नाताळमध्ये वास्तव्यास बंदी करणारा प्रस्ताव जेवढा आक्षेपार्ह असेल त्याहून इंग्रजांची ही भावना आक्षेपार्ह नाही.

नाताळ मर्क्युरीनं पुढं लिहिलं की शैक्षणिक पात्रता व्यवहारात 'अतिशय भ्रामक असल्याचं सिद्ध होईल.' मागील आठवड्यातच एक भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत चांगल्या गुणवत्तेनं उत्तीर्ण झाला हा याचा पुरावा आहे. त्याशिवाय नाताळच्या संरक्षणविषयक गरजा आहेत. साम्राज्यापासून एकाएकी वेगळं होणं आपल्याला परवडणारं नाही. आणि *नाताळ साम्राज्यात राहत असताना आपण आपल्या प्रजाबांधवांवर वंशभेदाच्या वा धर्मभेदाच्या नावावर बंधनं घालू शकत नाही. हे शक्य आहे की खालच्या वर्गाच्या आशियायी लोकांना मतदानाचा अधिकार नाकारायचा आडवळणाचा काही मार्ग असू शकेल.*

मंत्र्यांच्या या वृत्तपत्रानं सुचवलं की इंग्लंडमधील जनमताला अशा रीतीनं भावना दुखावणारी पत्रं लिहून डिवचण्यापेक्षा या वाईटातून काही तरी अशा प्रकारचं चांगलं शोधून काढायला पाहिजे की ज्यामुळे 'या वाईटाचा परिणाम कमी होऊन वसाहतीच्या एकूण हिताचा मार्ग सापडेल.'

नाताळ विटनेसमध्ये 'आशियायी लोकांना लगाम घालणं' या मथळ्याखाली एक लेखमालाच आली. वांशिक कारणावर भारतीयांना मतदानाचा अधिकार नाकारायला शक्य त्या पर्यायांचा त्यातून शोध घेण्यात आला. लेखक प्रसिद्ध घटनातज्ज्ञ वकील होता आणि त्यानं बराच प्रवास केलेला होता. न्यूझिलंडनं माओरींना आणि कॅनडानं रेड इंडियन लोकांना नागरिकत्वाचे जर पूर्ण अधिकार दिलेले आहेत तर लेखकाचं म्हणणं होतं की 'आशियायी लोकांना त्या नावाखाली मताधिकार नाकारायची ही योग्य वेळ नाही.' [*नाताळ विटनेस*, डिसेंबर १३, १८९५] परंतु संसदेवर प्रतिनिधी पाठवण्यासाठी एकाच प्रकारचे नाही तर अनेक प्रकारचे मतदार संघ निर्माण करायचा नाताळला संपूर्ण अधिकार आहे. 'कोणत्याही ब्रिटिश प्रजेला वंशाच्या वा धर्माच्या नावावर नागरिकत्वाचे अधिकार नाकारता येणार नाही हे ब्रिटिश घटनेचं महत्त्वाचं तत्त्व मात्र नाताळनं विसरायला नको.' [*नाताळ विटनेस*, डिसेंबर १३, १८९५] ऑस्ट्रियाच्या १८६७च्या घटनेत कौंट बीस्ट यांनी समावेश केल्याप्रमाणे मतदारांचे विविध प्रकारचे वर्ग करून आणि त्यांना वेगवेगळं महत्त्व देऊन क्युरिया पद्धतीच्या मतदानानं प्रतिनिधींची निवड करणं वा न्यूझिलंडमध्ये माओरींना देण्यात आलेल्या प्रतिनिधित्वाची पद्धत अमलात आणणं शक्य आहे. या पद्धतीनुसार न्यूझिलंडमध्ये १८९३ साली ९,६०३ युरोपिअनांसाठी एक प्रतिनिधी होता तर १०,४९८ नेटिव्ह माओरींसाठी १ प्रतिनिधी देण्यात आलेला होता. यामुळे संसदेतील युरोपिअन आणि माओरी प्रतिनिधींचं प्रमाण ७० ला ४ असं झालं होतं. अशीच काही व्यवस्था करण्यात आल्यास श्रीयुत गांधी आणि त्यांचे सहकारी आपल्या बहुसंख्येनं युरोपिअनांना गिळून टाकू शकणार नाहीत. [*नाताळ विटनेस*, डिसेंबर ७, १८९५] हळूहळू *नाताळ विटनेसनं* ऑस्ट्रियातील क्युरिया पद्धतीकडे आपला मोर्चा वळवला आणि आशियायी लोकांना मतदान अधिकार दिल्यामुळे होणाऱ्या 'हानीला' त्यामुळे किमान पातळीवर नेता येईल असं मत मांडलं. श्रीयुत बेल, हिंडसन आणि कार्टर यांनी मंत्रिमंडळात एक भारतीय मंत्री असावा असं जे मत मांडलं होतं त्यामुळे 'एकषष्टांश मंत्रिमंडळ

कायम भारतीयांच्या ताब्यात जाईल' असं म्हणून *नाताळ विटनेसनं* आपल्या योजनेची भलावण केली. [*नाताळ विटनेस*, जानेवारी १७, १८९६]

१०

निर्माण होणाऱ्या परिस्थितीकडे गांधीजी वाढत्या अस्वस्थतेनं पाहत होते. नाताळचे गोरे क्रुद्ध मनःस्थितीत होते. सर जॉन यांच्या सेंट अँड्रयू येथील भोजन समारंभातील भाषणामुळे त्यांची भीती कमी होण्याऐवजी त्यांचं असमाधान वाढलं आणि ते अजूनच भयभीत झाले. आतापर्यंत जे हिंदू आणि मुसलमान पूर्णपणे गुण्यागोविंदानं एकत्रित राहत होते त्यांच्यातही टॅथॅमनं संघर्षाची बीजं पेरायचा प्रयत्न केला होता. हा खेळ धोक्याचा होता. या परिस्थितीत एक लहानशी ठिणगीही आगीचा भडका उडवू शकली असती व त्याचे भयानक परिणाम झाले असते. नाताळमधील गोऱ्यांच्या मनातील निराधार भीती आणि सतत भडकवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला भारतविरोधी उन्माद दूर करण हाच या समस्येतून मार्ग काढायचा एकमेव मार्ग होता. खोडसाळपणाच्या या रोपाला मुळापासून छाटायची संधी साधायला गांधीजींनी वेळ लावला नाही. 'दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक ब्रिटिशाला आवाहन' या नावाच्या लेखातून अधिकृत माहितीच्या आधारे आकडेवारी देऊन गांधीजींनी निर्णायकपणे सिद्ध केलं की प्राप्त परिस्थितीत कोणत्याही अवस्थेत भारतीय मतामुळे गोऱ्यांची श्रेष्ठता धोक्यात यायची किंचितही शक्यता नाही. भारतीयांना मतदान अधिकार न देण्यासाठी दीर्घकाळ चाललेल्या वादाबद्दल वृत्तपत्रांतून वा व्यासपीठांवरून करण्यात आलेले युक्तिवाद व मूळ प्रश्नाभोवती पूर्वग्रहाचं आणि चुकीच्या माहितीचं जाळं विणण्यात आल्यामुळे खरा प्रश्न संदिग्ध झाला होता. परंतु १८९५च्या उत्तरार्धात करण्यात आलेल्या या आवाहनातून गांधीजींनी शांत व चिकित्सक पद्धतीनं या सर्व युक्तिवादांची चिकित्सा केली आणि सत्य काय आहे ते स्पष्ट केलं. गांधीजींनी आपलं काम इतक्या परिणामकारक पद्धतीनं केलं की लगेच केवळ विरोधी पक्षांचीच नव्हे तर मंत्र्यांची

वृत्तपत्रं आणि प्रधानमंत्रीदेखील परस्परांनी केलेल्या टीकेपासून आपला स्वतःचा बचाव करण्यासाठी गांधीजींच्या आवाहनातील मुद्यांचा आधार घेत असत.

नाताळच्या गोऱ्यांचे मुख्य आक्षेप पुढीलप्रमाणे होते.

१. भारतीयांना भारतात मताधिकार नाही.

२. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय भारतातील सर्वात तळागाळाच्या वर्गातील आहेत.

३. भारतीयांना मताधिकार काय आहे ते माहीत नाही.

४. भारतीयांना मताधिकार मिळू नये कारण भारतीयाएवढेच नेटिव्ह हे ब्रिटिश प्रजा असूनही त्यांना मताधिकार नाही.

५. नेटिव्ह जनतेच्या हिताच्या दृष्टीने भारतीयांचा मताधिकार काढून घेण्यात यावा.

६. वसाहत गोऱ्या माणसांचा देश आहे आणि राहायला पाहिजे, आणि भारतीयांना मताधिकार देण्यात आल्यास ते गोऱ्या मतांना मताधिक्याच्या आधारावर गिळून टाकतील व भारतीयांचं राजकीय श्रेष्ठत्व प्रस्थापित होईल.

भारतीयांना जे अधिकार भारतात उपभोगायला मिळतात त्या अधिकारांपेक्षा ते जास्त अधिकारांची मागणी करू शकत नाहीत आणि त्यांनी करूही नये हा युक्तिवाद सर्वात आधी घेत गांधीजींनी निदर्शनास आणून दिलं की वास्तवात भारतात भारतीयांना मताधिकार आहे. भारतातील विधानपरिषदेचं जे स्थान आहे ते 'नाताळमधील अगदी अलीकडच्या विधानपरिषदेपेक्षा फारसं वेगळं नाही.' व भारतीयांना या परिषदेत प्रवेश करण्यापासून मज्जाव करण्यात आलेला नाही. विधानपरिषदेच्या सदस्यत्वासाठी त्यांनी समान नियमांखाली युरोपिअनांशी स्पर्धा केली. [एम. के. गांधी, *अॅन अपील टू एव्हरी ब्रिटन इन साऊथ आफ्रिका*, डिसेंबर १६, १८९५, परिपत्रक मुद्रक टी. एल. कलिंगवर्थ, ४०, फिल्ड स्ट्रीट डरबन, १८९५] परंतु भारत सरकार मात्र नाताळच्या स्वरूपाचं नाही व

त्यामुळे या दोघांत काहीच साम्य नाही. नाताळमध्ये जसा मताधिकार आहे तसाच मताधिकार नाताळमध्ये आलेल्या माणसाला त्याच्या मूळ देशात असेल तरच त्याला नाताळमध्ये मताधिकार मिळेल हे तत्त्व सर्वांना सारखंच लागू करण्यात आलं तर इंग्लंडमधून आलेल्या माणसालाही नाताळमध्ये मताधिकार मिळू शकणार नाही कारण तिथला मतदानाचा कायदा नाताळसारखा नाही, एवढंच नाही तर नाताळमध्ये जन्मलेल्या काही युरोपिअनांनाही तो मिळू शकणार नाही कारण नाताळमध्ये १८९३च्या आधी संसद नव्हती.

ब्रिटिश साम्राज्याची प्रजा म्हणून आपल्या साम्राज्यभक्तीचा आणि रणांगणावरील आपल्या शौर्याचा भारतीयांनी जो परिचय दिला त्याद्वारे भारतीयांनी युरोपिअनांच्या बरोबरीचे आपण असल्याचं सिद्ध केलेलं आहे. द टाईम्समध्ये भारतासंबंधीचं लेखन करणारे सर विल्यम हंटर यांनी चित्रळच्या मोहिमेचं जे वर्णन केलं आहे त्यात ते सांगतात की भारतीयांच्या साहसाचं आणि धाडसाचं वर्णन वाचत असताना 'माणूस रोमांचित होतो व त्यांच्या पराक्रमाचं कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही.' [रणांगणावरील भारतीयांच्या शौर्याचं वर्णन डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांनी द टाईम्समध्ये करताना लिहिलं : 'एक शिपाई, ज्याला 'ऑर्डर ऑफ मेरिट' हा सन्मान मिळाला होता, त्याला ३१पेक्षा कमी जखमा नव्हत्या. इंडियन डेली न्यूजचं म्हणणं आहे की रणांगणावरील जखमांचा हा विक्रम असावा.']

दक्षिण आफ्रिकेतील भारतीय 'भारतातील सर्वात कनिष्ठ वर्गाचं प्रतिनिधित्व करतात' हा आक्षेप व्यापारी वर्गाबद्दलही खरा नाही आणि सर्व आप्रवासी बंधुआ मजुरांच्या बाबतीतही खरा नाही कारण त्यांच्यातील काही भारतातील सर्वोच्च वर्गातील आहेत. 'त्याशिवाय नाताळमधील भारतीय समाज तसा नसेल तर इथला युरोपिअन समाजही सर्वोच्च वर्गातून आलेला नाही.' नाताळला इथं आदर्श भारतीय हवा असेल तर भारतीयानं तसं व्हावं म्हणून सरकारनं त्याला मदत करायला पाहिजे. कुत्र्याला वेडं ठरवून त्याला मारण्यात येऊ नये. 'सातत्यानं केलेल्या दुर्लक्षामुळे अथवा हानिकारक कायदे केल्यामुळे वसाहतीतील भारतीयांची अधिकच अवनती होईल व मग ज्याच्यापासून आधी धोका नव्हता त्याच्यापासूनच खरा धोका निर्माण होईल.'

भारतीयांना मतदानाच्या अधिकाराचं ज्ञान नाही या तिसऱ्या मुद्याबद्दल बोलायचं तर असं म्हणणाराला भारताचा संपूर्ण इतिहासच माहीत नाही असं म्हणावं लागेल.

प्रतिनिधित्वाचा अगदी खरा अर्थ भारतीयांना कळलेला होता व ते त्याचं महत्त्व अगदी प्राचीन काळापासून जाणत होते.... त्यामुळे तो (भारतीय) जगातील सर्वात निरुपद्रवी आणि सालस माणूस झालेला आहे.... कारण त्याला माहीत असतं की तो राहत असलेल्या बहुसंख्य समाजाची संमती असल्याशिवाय त्याच्यावर कुणाचाच अधिकार चालू शकत नाही. हे तत्त्व भारतीयाच्या रक्तात इतकं भिनलेलं आहे की अगदी भारतीय संस्थानांच्या हुकुमशाही राजालाही वाटत असतं की आपण लोकांच्या वतीनं राज्य करत आहोत.... इतकंच नाही तर जेव्हा राजेशाहीचं सरकार असते तेव्हाही पंचायत सर्वोच्च असतं. तिचे निर्णय बहुमतानं ठरत असतात. [एम. के. गांधी, *अॅन अपील टू एव्हरी ब्रिटन इन साऊथ आफ्रिका*]

चौथ्या आक्षेपासंबंधी गांधीजींनी लिहिलं :

तुलनेत न जाता, मी जे कटू सत्य आहे ते सांगायचं साहस करणार आहे. नेटिव्हांना मतदानाचा हक्क एका विशेष कायद्यानं मिळालेला आहे व तो कायदा गेली काही वर्षांपासून अमलात आहे. तो कायदा भारतीयांना लागू होत नाही. तो भारतीयांसाठी आहे असं कोणी म्हणालेलंही नाही. भारतातील मतदानाचा अधिकार खास कायद्यानं ठरत नाही. तो सर्वांना सारखाच लागू होतो. १८५८च्या घोषणेनुसार भारतीयांसाठी स्वातंत्र्याचा जाहीरनामा घोषित करण्यात आलेला आहे. [वरीलप्रमाणे]

भारतीयांना मतदानाचा अधिकार देण्यात आल्यास ती गोष्ट 'नेटिव्हां' साठी हानिकारक होईल या पाचव्या मुद्द्यामागील धारणा बहुधा अशी होती की येथील 'नेटिव्हां'ना भारतीय दारू पुरवून त्यांना बिघडवतात. गांधीजींचं म्हणणं होतं की हे अगदीच खरं नाही. परंतु हे जरी खरं असलं तरी मतदान अधिकार असल्यामुळे 'नेटिव्हां'ना भारतीय अधिक दारू कसा काय पुरवू शकतो असा गांधीजींचा प्रश्न होता! तसंच डाऊनिंग स्ट्रीटचं बारकाईनं लक्ष असलेल्या आणि

काही प्रमाणात नियंत्रणही असलेल्या वसाहतीच्या नेटिव्ह विषयक धोरणावर' भारतीयांचा प्रभाव पडावा एवढं भारतीयांचं मत प्रभावी होऊ शकत नाही. 'एवढंच नाही तर याबाबतीत डाऊनिंग स्ट्रीटसमोर युरोपिअनांचंही काही चालत नाही.'

याशिवाय सध्या मतदार सूचीत नावं असलेले बहुसंख्य भारतीय हे व्यापारी आहेत व 'ते केवळ मद्यपान विरोधीच नाहीत तर या भूमीतून मद्य पूर्णपणे नाहीसं व्हावं या मताचे आहेत.' भारतीय आप्रवासी आयोग १८८५-८७ यांनी आपल्या अहवालात पृष्ठ ४२ आणि ४३वर लिहिलं आहे:

...अशा प्रकारे समोर आलेल्या गुन्हेगारी विषयक आकडेवारीवरून आप्रवासी भारतीयात मद्यपान आणि त्यामुळे निर्माण होणारी गुन्हेगारी इतर समाजांपेक्षा, ज्यांच्याबाबतीत बंधनं घालणारे कायदे करण्यात आलेले नाहीत, अधिक प्रमाणात आहे असं सिद्ध होत नाही.

आणि पुन्हा :

जे गोरे दारूचा व्यवसाय करतात त्यांच्यापेक्षा ते अधिक गुन्हेगार आहेत याबद्दल आम्हाला संशय आहे.

गांधीजींनी लगेच स्पष्ट केलं की याचा अर्थ असा नाही की मी माझ्या देशबांधवांना क्षमा करू इच्छितो. कोणताही भारतीय दारू प्याला वा नेटिव्हांना दारू पुरवू लागला असं जर आढळलं तर मला जेवढं दुःख होईल तेवढं इतरांना क्वचितच होईल. माझा हेतू एवढाच आहे की केवळ या कारणासाठी भारतीयांना मताधिकार नाकारणं योग्य नाही व हा मुद्दा युक्तिवादासमोर टिकत नाही. उलट जोडा उलट्या पायात घालण्यात आलेला आहे. आयोगाच्या सदस्यांनी त्यांच्या अहवालात दाखवलं आहे :

बारकाईनं चौकशी केल्यानंतर असं लक्षात आलं आहे की आप्रवासी भारतीय दारू विकतात म्हणून भारतीयांविरुद्ध जोरजोरात जे लोक तक्रार करतात ते लोक स्वतःच नेटिव्हांना

दारू विकतात. दारू विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या भारतीयांमुळे त्यांच्या व्यापारात अडथळा येतो व त्यांचा नफा कमी होतो म्हणून ते अशी तक्रार करतात.

१८९३ साली बरोमध्ये दारू पुरवण्यासाठी २८ युरोपिअनांना आणि केवळ ३ भारतीयांना शिक्षा झाली होती.

नेटिव्हांच्या अधःपाताविषयी बोलायचं तर अधीक्षक अलेक्झँडर यांनी दाखवून दिलं आहे की नेटिव्हांचा जो अधःपात झाला आहे त्याची जबाबदारी भारतीयांवर नसून युरोपिअनांवर आहे. त्यानुसार सरकारनं जे नेटिव्ह निळं पुस्तक प्रकाशित केलं आहे त्यात 'युरोपिअन प्रभावानं नेटिव्हांच्या नैतिक चारित्र्यात अवनती झाली असल्याचं' मत जवळपास सर्व न्यायाधीशांनी मांडलं आहे. [वरीलप्रमाणे]

अधीक्षक अलेक्झँडर यांनी भारतीय आप्रवासी आयोगासमोर दिलेल्या साक्षीत सांगितलं आहे :

माझ्याजवळ असलेल्या ताफ्याच्या मदतीनं ३,००० भारतीयांना मी सांभाळू शकतो परंतु त्यांच्या ठिकाणी ३,००० गोरे ब्रिटिश कामगार असते तर मला ते शक्य झालं नसतं.... कोंबड्या चोरणं आदीसारख्या होणाऱ्या प्रत्येक वाईट गोष्टीसाठी कुली जबाबदार असल्याचा लोकांना संशय असतो, परंतु असं नसल्याचं माझ्या लक्षात आलेलं आहे. कोंबड्या चोरायच्या गेल्या ९ प्रकरणात दोन नेटिव्ह आणि ३ गोऱ्या लोकांना शिक्षा झालेली आहे. [वरीलप्रमाणे]

या निर्विवाद तथ्यानंतरही नेटिव्हांच्या अधःपातासाठी केवळ भारतीयांना जबाबदार धरणं अन्याय्य नाही काय? गांधीजींनी विचारलं.

वसाहत गोऱ्या लोकांचा देश आहे आणि राहील या शेवटच्या मुद्याबद्दल बोलायचं तर उघड सत्य हे आहे की, आणि ते कोणालाही दिसू शकेल, दक्षिण आफ्रिका आणि या दृष्टीनं हा संपूर्ण काळा खंडच काळ्या लोकांचा देश होता आणि राहील. ॲन्थनी ट्रोलॉप यांनी

दर्शवल्याप्रमाणे 'तसं होतं, तसं आहे आणि तसं राहील.' आफ्रिकी लोकांचं जे वतन युरोपिअनांनी बळकावलं आहे ते मूळ आफ्रिकी रहिवाशांना जाग येईपर्यंतच त्यांच्याजवळ राहील आणि तो दिवस फार दूर नाही. त्यामुळे या निरर्थक मुद्यावर मी एक शब्दही बोलू इच्छीत नाही असं गांधीजी म्हणाले. भारतीयांच्या मतामुळे युरोपिअन मत अल्पमतात येईल आणि परिणामी नाताळमधील युरोपिअनांच्या राजकीय प्रभुत्वाला धक्का लागेल असं म्हणणारे मतदानपात्रतेसाठी मालमत्तेविषयक अट आहे ही गोष्ट विसरतात असं गांधीजी म्हणाले. [मतदान कायद्यातील मतदान पात्रतेविषयीचं कलम असं होतं : 'प्रत्येक माणसाला, यापुढे वर्णन करण्यात आलेल्यांना वगळता, २१ वर्षाच्या वर वय असेल, ज्याच्याजवळ स्थावर मालमत्ता ५० पौंडापेक्षा कमीची नसेल अथवा कोणत्याही मतदारसंघात जो स्थावर मालमत्ता कमीतकमी वार्षिक १० पौंडांना भाड्यानं घेतो व ज्यानं खाली वर्णन केल्याप्रमाणे आपलं नाव नोंदवलं असेल त्याला त्या मतदार संघातील मतदार म्हणून मतदान करायचा अधिकार असेल. जर वर वर्णन केलेल्या प्रकाराच्या मालमत्तेत एकाहून अधिक माणसं मालक वा भाडेकरू म्हणून राहत असतील तर तिथे राहणाऱ्या प्रत्येकाला नियमाप्रमाणे नाव नोंदवल्यानंतर मतदानाचा अधिकार राहील. अट एवढीच असेल की त्या मालमत्तेचं भाडं वा किंमत एकूण अशा प्रकारच्या लोकांच्या प्रमाणात असायला पाहिजे] राजपत्रात मतदारांची शेवटची जी सूची प्रकाशित झाली आहे तिच्यातील एकूण ९५६० मतदारातून केवळ २५१ भारतीय आहेत असं आढळेल. यावरून युरोपिअनांच्या प्रमाणात भारतीय मतांचं प्रमाण ३८ ला १ पडते. भारतीय *आप्रवासी संरक्षकाच्या १८९५ सालच्या अहवालानुसार* भारतीयांची एकूण संख्या ४६,३४३ होती व त्यातील ३०,३०३ लोक मुक्त भारतीय होते. ५,००० व्यापारी आणि त्यांचे मदतनीस या सर्वांना धरल्यास ही एकूण संख्या ३५,००० होईल. त्यापैकी 'निम्मेपेक्षा अधिक' लोक बंधुआ मजुरांपेक्षा आर्थिकदृष्टीनं 'एकच पायरी वर' असतील. ते कसंबसं पोट भरत असतात व त्यांच्याजवळ ५० पौंडांची स्थावर मालमत्ता नक्कीच नसते. वसाहतीत प्रौढ मुक्त भारतीयांची संख्या १२,३६० आहे. यावरून लक्षात येईल की भारतीय आपल्या मताधिक्यानं युरोपिअनांना निष्प्रभ करून टाकतील ही भीती 'पूर्णपणे निराधार' आहे.

मतदारसूचीतील भारतीयांच्या नावांचं विश्लेषण करून गांधीजींनी हा मुद्दा अजूनच स्पष्ट केला. मतदारसूचीतील ज्या २०५ मतदारांची गांधीजींना ओळख पटू शकली होती त्यातील केवळ ३५ पूर्वाश्रमीचे बंधुआ मजूर होते व ते वसाहतीत १५ वर्षांपासून राहत होते.

या ३५ मुक्त भारतीयांपैकी बहुतेक लोकांनी व्यापारी होऊन आपली प्रगती केलेली आहे. जे लोक स्वतःच्या संसाधनानं इथं आलेले आहेत त्यांच्यातील बऱ्याचशा लोकांना मतदारसूचीत नाव टाकायला दीर्घ कालावधी लागलेला आहे. ज्या ४६ लोकांची मला ओळख पटू शकली नाही त्यांच्या नावावरून ते व्यापारी समाजाचे असावे असे मला वाटते. वसाहतीत जन्मलेले अनेक भारतीय वसाहतीत आहेत. त्यांच्यापैकी अनेक जण चांगले शिकलेले आहेत आणि तरीही त्यांच्यातील केवळ नऊ जणांची नावं मतदार सूचीत आहेत. यावरून आढळेल की मतदान पात्रतेच्या दृष्टीनं ते अतिशय गरीब आहेत. त्यामुळे एकूण पाहता सध्याच्या यादीला आधारभूत मानलं तर जवळच्या भविष्यकाळात भारतीय मतदारांचं प्रमाण युरोपिअनांना निष्प्रभ करण्याएवढं भयावह होईल ही भीती काल्पनिक आहे. ज्या २०५ लोकांची नावं मतदार सूचीत आहेत त्यांच्यातील जवळपास ४०एक तर मरण पावलेले आहेत वा वसाहत सोडून गेलेले आहेत. [एम. के. गांधी, *अॅन अपील टू एव्हरी ब्रिटन इन साऊथ आफ्रिका*]

मतदार सूचीतील लोकांचं व्यावसायिक दृष्टीनं विश्लेषण केल्यास त्यांच्यातील बहुसंख्य लोक (२०५ पैकी ५१) 'व्यापारी' वर्गातील आहेत वा 'अरब' आहेत व ते 'मतदानासाठी अपात्र नाहीत हे मान्य करण्यात आलेलं आहे.' दुसरा क्रमांक आहे कारकून आणि मदतनीसांच्या वर्गाचा. त्यांची संख्या ५० आहे. त्यांना बऱ्यापैकी शिक्षण मिळालेलं आहे. तिसऱ्या वर्गात ज्यांचा समावेश होतो ते 'माळी व तत्सम काम करणारे' असून 'उच्चप्रतीचं काम करणारे ते मजूर आहेत.' त्यांची संख्या ५० असून ते वसाहतीत आपल्या कुटुंबियांसह २० वर्षांपासून वास्तव्य करत आहेत व त्यांच्याजवळ एक तर स्वतःची मालमत्ता आहे वा ते चांगलं भाडं देतात. यापैकी बहुतेक मतदारांना आपली मातृभाषा वाचता येते. यावरून पुन्हा लक्षात येईल की मतदार सूचीवर 'अपात्र' आणि 'अगदी खालच्या वर्गाच्या' भारतीयांचा पगडा बसेल ही भीती निष्कारण आहे.

निष्कर्ष स्पष्ट होता. जर सध्याची मतदार सूची ही भविष्याची मार्गदर्शन करू शकत असेल आणि मतदार होण्यासाठी याच अटी असतील असं गृहीत धरलं तर ही सूची युरोपिअनांच्या दृष्टीनं अतिशय समाधानकारक आहे. कारण एक तर संख्येच्या दृष्टीनं तिच्यातील भारतीयांचं प्रमाण अतिशय कमी आहे आणि दुसरं कारण म्हणजे यादीतील ७५ टक्के लोक व्यापारी असल्यामुळे त्यांची संख्या कमीअधिक प्रमाणात सारखीच राहणार आहे. 'दर महिन्याला त्यांच्यापैकी ज्याप्रमाणे बरेच जण येत असतात त्याचप्रमाणे जवळपास तेवढेच लोक भारतात परततही असतात. परिणामी आत येणारे बाहेर जाणारांची जागा घेत असतात.'

यात भर पडते भारतीयांच्या आणि युरोपिअनांच्या नैसर्गिक प्रवृत्तीची. भारतीय माणूस स्वभावतःच राजकारणात 'सक्रिय लुडबुड' करणारा नाही. कुठलीही सत्ता बळकावण्याचा त्यांनी कधीही प्रयत्न केलेला नाही.

त्यांच्या व्यावसायिक प्रयत्नाला पायदळी तुडवायचा प्रयत्न करण्यात आला नसता, समाजातील सर्वात खालच्या वर्गात ढकलून त्यांना वारंवार अपमानित करायचा प्रयत्न करण्यात आला नसता अथवा त्यांना केवळ हलकीसलकी कामं करणारे नोकर म्हणून अथवा बंधुआ मजूर म्हणून वा त्यासारख्याच परिस्थितीत ठेवायचा जर प्रयत्न करण्यात आला नसता तर मतदानाचं आंदोलनच झालं नसतं.... त्यांना त्यांचे कायदेशीर व्यवसाय करू द्या, त्यांना अपमानित करायचा प्रयत्न करू नका, सर्वसामान्य दयाळूपणाच्या भावनेनं त्यांच्याशी वागा आणि मग मतदानाचा प्रश्नच उपस्थित होणार नाही, आणि याला अगदी साधं कारण आहे व ते म्हणजे तशा अवस्थेत ते मतदारसूचीत नाव नोंदवायची तसदीच घेणार नाहीत.

द टाईम्सच्या प्रतिनिधीजवळ श्रीयुत टॅथॅम उद्‌गारले होते की थोड्याच भारतीयांना राजकीय सत्तेचा सोस आहे आणि ते थोडेसे लोक म्हणजे मुसलमान आंदोलक आहेत. हिंदूंनी मागील अनुभवावरून शिकायला पाहिजे की मुसलमानांच्या सत्तेनं हिंदूंचा सर्वनाश झाल्याशिवाय राहणार नाही. याबद्दल गांधीजी म्हणाले की श्रीयुत टॅथॅम यांच्या पहिल्या

विधानाला काहीच आधार नाही आणि दुसरं विधान अतिशय दुर्दैवी आणि दुःखदायक आहे. राजकीय सत्तेचा अर्थ जर विधानसभेत प्रवेश असा असेल तर व्यापारी वर्गासाठी सत्ता मिळवणं अगदी अशक्यप्राय गोष्ट आहे. याला कारण असं आहे की वसाहतीतील भारतीय व्यापाऱ्यात 'श्रीमंत' आणि 'सुखवस्तू' वर्गातील नावलौकिक मिळवलेले फार कमी लोक आहेत, तसंच दुसरं कारण असं आहे की आमदार म्हणून जी कर्तव्य पार पाडावी लागतात ती पार पाडायला हा व्यापारी वर्ग समर्थ नाही. 'याचा अर्थ असा नाही की त्यांना राजकारण कळू शकत नाही. त्याचा अर्थ केबळ एवढाच आहे की आमदाराकडून ज्या दर्जाच्या इंग्रजीच्या ज्ञानाची अपेक्षा करण्यात येते त्या दर्जाचं ज्ञान त्याच्याजवळ नाही.'

टॅथॅम यांनी निर्लज्जपणे वसाहतीतील हिंदू आणि मुसलमान यांच्यात भांडणं लावायचा प्रयत्न केला होता.

वसाहतीतील जबाबदार माणूस अशा प्रकारच्या आपत्तीची अपेक्षा करू शकतो हीच मुळी आश्चर्याची गोष्ट आहे. अशा प्रकारच्या प्रयत्नांचा फार गंभीर परिणाम झालेला आहे व त्यामुळे तिथल्या ब्रिटिश शासनाला धोका निर्माण झालेला आहे. तसाच प्रयत्न या वसाहतीत करणं - जिथं ते अतिशय गुण्यागोविंदानं राहत आहेत - अतिशय खोडसाळपणाचं आहे असं म्हणायचं साहस मी करेन.

जे लोक भारतात आपल्याला मतदानाचा अधिकार होता असं सिद्ध करू शकतील त्यांनाच नाताळमध्ये मताधिकार देण्यात यावा असं स्टँगर येथे सुचवण्यात आलं होतं. गांधीजी म्हणाले की सर्वांसाठी ही अट ठेवण्यात येत असेल तर भारतीयांचा कोणताही आक्षेप असणार नाही.

अशा प्रकारच्या अटीमुळे युरोपिअन लोकांना देखील वसाहतीच्या मतदार सूचीत आपलं नाव नोंदवणं कठीण गेलं तर मला आश्चर्य वाटणार नाही. असे किती लोक वसाहतीत आहेत की जे इथं आले तेव्हा त्यांची नावं त्यांच्या देशातील मतदार सूचीत होती ? [वरीलप्रमाणे]

अशा प्रकारची सूचना जर युरोपिअनांसाठी करण्यात आली तर त्यांचा संताप त्यामुळे उफाळून येईल. त्यामुळे अशा प्रकारची अट भारतीयावर का लादण्यात यावी ते मला कळू शकत नाही.

'एक माणूस एक मत' यासाठी भारतीय आंदोलन करत आहेत कारण त्यामुळे मतदानात त्यांचं युरोपिअनांच्या तुलनेत प्राबल्य वाढेल असं एक मत मांडण्यात आलं होतं. त्याला उत्तर देताना गांधीजी म्हणाले की या मताला कवडीचाही आधार नाही आणि भारतीय समुदायाविरुद्ध जनतेचं मत 'विनाकारण कलुषित' करण्यासाठीच ते मांडण्यात आलेलं आहे. युरोपिअन मताचं संख्याबळ टिकवण्यासाठी सध्या असलेल्या अटी नेहमीसाठी जरी नाही तरी दीर्घ काळापर्यंत पुरेशा आहेत. परंतु युरोपिअन वसाहतवाल्यांचं वेगळं मत असेल तर कोणताही भारतीय सध्यापेक्षा अधिक शैक्षणिक पात्रतेची अथवा मालमत्ताविषयक अट वाजवी प्रमाणात वाढवली तर अपवाद म्हणून आक्षेप घेणार नाही.

भारतीय जर कोणत्या गोष्टीविरुद्ध कृती करतील आणि आक्षेप घेतील तर ते रंगभेदाबद्दल, - रंगभेदाच्या कारणासाठी अपात्र ठरवण्यावर. सम्राज्ञींच्या भारतीय प्रजेला वारंवार गंभीरतापूर्वक अभिवचन देण्यात आलं आहे भारतीयांच्या वंशामुळे वा धर्मामुळे त्यांच्यावर कोणतीही बंधनं घालण्यात येणार नाहीत वा अपात्र ठरवण्यात येणार नाही. आणि हे अभिवचन भावनेच्या भरात देण्यात आलेलं नव्हतं तर गुणवत्तेचा पुरावा मिळाल्यानंतर देण्यात आलं होतं.... भारतीयांना समतेनं वागवण्यात काहीच धोका नाही, ते सिंहासनाप्रती अतिशय निष्ठावान आहेत, कायद्याचं पालन करणारे आहेत, आणि ब्रिटिशांचं भारतावरील राज्य इतर कोणत्याही अटीवर नव्हे तर केवळ याच अटीवर टिकू शकते हे कळल्यानंतरच वरील आश्वासन देण्यात आलं होतं.

हे खरं आहे की या गंभीर आश्वासनाचा अनेकदा भंग करण्यात आला आहे. परंतु अशी असंख्य उदाहरण देता येतील की ज्यावेळी १८५८च्या जाहीरनाम्याचं काटेकोरपणे पालन

करण्यात आलं होतं 'आणि आजही भारतात आणि अन्यत्र त्याचं पालन करण्यात येत आहे.' अपवादानं नियमच सिद्ध होत असतो.

मतदारसूचीतून आक्षेपार्ह माणसांना दूर ठेवण्यासाठी वा भविष्यात भारतीयांचं प्राबल्य वाढू नये म्हणून मतदान अधिकाराच्या संबंधात जर काही सल्ला देण्यात आला वा त्यासाठी काही उपाययोजना सुचवण्यात आली तर भारतीय त्यावर आक्षेप घ्यायचा विचार करणार नाहीत असं वसाहतीच्या लोकांना परत आश्वासन देत गांधीजी म्हणाले:

योग्य विचार करणाऱ्या भारतीयांचा हेतू वसाहतीच्या युरोपिअन लोकांच्या इच्छेनुसार शक्य तो वागावं अशी आहे. युरोपिअन वसाहतवाले वा इंग्लंडमधील लोक यांच्या इच्छेविरुद्ध संपूर्ण भाकरी खायची इच्छा ठेवण्याऐवजी ते त्यातील दोन घास सहज द्यायला तयार होतील. या आवाहनाचा हेतू आमदारांना आणि युरोपिअन वसाहतवाल्यांना अशा प्रकारचा उपाय शोधून काढायची विनंती करणं आहे - जर तसं आवश्यकच असेल तर - की ज्यामुळे प्रभावित होणाऱ्या लोकांनाही तो मान्य होईल.

मागील विधानसभेचे सदस्य श्रीयुत साँडर्स, आप्रवासी भारतीयांचे संरक्षक कॅप्टन ग्रेव्हज, आणि माजी महाधिवक्ता सर मायकेल गालवे, वसाहतीचे सर न्यायाधीश यांच्या वक्तव्यातील किती तरी उतारे पुराव्यासाठी देत त्यांनी दाखवलं की वसाहतीतील श्रेष्ठ लोक एकेकाळी योग्य काळजी घेऊन भारतीयांच्या मतदानाच्या अधिकाराला केवळ अनुकूलच नव्हते तर त्यांना वगळण्यासाठी करावयाच्या खास उपाययोजनेचा त्यांना तिटकाराही वाटत होता. [श्रीयुत साँडर्स हे जरी आशियायी विरोधी धोरणाचे कट्टर समर्थक होते तरी त्यांनी ब्ल्यू बुकमध्ये दिलेल्या वक्तव्यातून गांधीजींनी पुढील भाग उद्धृत केला आहे : 'मतदाराच्या हस्ताक्षरात ह्या सह्या पूर्ण आणि इंग्रजीत असायला पाहिजे अशी व्याख्या केल्यास आशियायी माणसांनी इंग्रजांवर प्राबल्य मिळवायच्या शक्यतेला बराच आळा बसेल. (अफेअर्स ऑफ नाताळ सी - ३७९६, १८८३)' आप्रवासी भारतीय बंधुआ मजुरांविषयी बोलताना कॅप्टन ग्रीव्हज यांनी असं मत व्यक्त केलं होतं की ज्या भारतीयांनी आपल्या स्वतःचा आणि आपल्या कुटुंबियाचा 'परतीचा प्रवासखर्च मिळायचा अधिकार सोडला असेल त्यांना न्यायानं मताधिकार मिळायला पाहिजे.' सर मायकेल गालवे यांनी आपल्या अहवालात असं मत दिलं आहे की, आणि हे मत याच निळ्या पुस्तकात पाहायला मिळू शकते : 'हे लक्षात येईल की मी तयार केलेल्या उपाययोजनेच्या

मसुद्यात असे काही कलम आहेत की जे श्रीयुत साँडर्स यांनी आपल्या पत्रातून जी पर्यायी योजना सुचवली होती व सिलेक्ट कमिटीनं त्यातील ज्या मुद्यांची शिफारस केली होती त्यातून ते मुद्दे घेतलेले आहेत. त्याचबरोबर विदेशी माणसांच्या मतदान अधिकारावर खास निर्बंध घालण्याऱ्या अटी मान्य करण्यासाठी शिफरशीयोग्य नाहीत.']

युरोपिअनांच्या रक्तानं जिंकलेल्या आणि युरोपिअनांच्या हातांनी घडवलेल्या देशात भारतीयांना वसू देऊ नये हा युक्तिवाद विवेक आणि न्यायाच्या विरोधात आहे. भारतीयांनी या भूमीसाठी रक्त सांडवलेलं नाही म्हणून या देशात त्यांना काही हक्क नाकारण्यात येत असतील तर याच न्यायानं 'वसाहतीत आधी आलेल्या लोकांच्या विशेषाधिकारावर इंग्लंडमधून नंतर आलेला आप्रवासी कोणतंच अतिक्रमण करू शकत नाही.' आणि रक्त वाहवणं हीच महत्त्वाची कसोटी असेल आणि ब्रिटिश वसाहतवाले ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या इतर देशांना ब्रिटिश साम्राज्याचाच भाग समजत असतील तर भारतीयांनी एकाहून अधिक वेळा ब्रिटनसाठी रक्त सांडवलेलं आहे.

वसाहतीची घडण युरोपिअनांच्या हातून झालेली आहे हा दावाही सरकारी अहवालांनी निरस्त होतो. त्यात सांगण्यात आलेलं आहे की 'नाताळ ही भारतीय मजुरांची निर्मिती आहे.' भारतीय जर खरोखरच बांडगुळासारखा इथं घुसलेला असेल व त्यानं नाताळच्या समृद्धीत काहीच भर घातलेली नसेल, जसं की दाखवण्यात येतं, तर मग आप्रवासी संरक्षकालाही पूर्ण करता येणं अशक्य होईल एवढी आप्रवासी भारतीय बंधुआ मजुराची मागणी का आहे? त्याची उपस्थिती जर वसाहतीसाठी हानिकारक असेल तर त्याच्या आयातीवर पूर्णपणे बंदी घालणं हाच उत्तम आणि न्याय्य उपाय आहे. *आणि यथावकाश सध्याची भारतीय जनता वसाहतीला त्रास देणं बंद करील. ते हवेत पण गुलाम म्हणून असं म्हणणं क्वचितच न्याय्य असू शकतं.*

'ब्रिटिश प्रजेची' कल्पना वृत्तपत्रांच्या काही वर्गांनी 'वेड आणि छंद' म्हणून फेटाळून लावलेली आहे. काहींनी तर इथपर्यंत सुचवलं आहे की ब्रिटिश साम्राज्याच्या सदस्यतेमुळे तिरस्करणीय आशियायीला राजकीय समतेचे अधिकार द्यावे लागणार असतील तर

साम्राज्याचा नकाशाच फाडून टाकण्यात यावा. ब्रिटिश साम्राज्याचा नागरिक म्हणून भारतीयांचं जे स्थान आहे ते भारतीयांच्या या संपूर्ण प्रश्नाच्या मुळाशी आहे याचा विचार करायचं कोणीही थांबवलेलं दिसत नाही. हा मुद्दा वगळून भारतीयांच्या प्रश्नाचा विचार करणं म्हणजे हॅम्लेट नाटकाचा प्रयोग डेन्मार्कच्या राजपुत्राशिवाय करण्यासारखं आहे.

भारतीय ब्रिटिश प्रजा असल्याशिवाय मतदान अधिकारासाठी जे काही आंदोलन चालू आहे ते चालू राहूच शकलं नसतं, भारतीय ब्रिटिश प्रजा असल्याशिवाय शासनाच्या मदतीनं आप्रवासी बंधुआ मजुरांची आयात होऊ शकली नसती, भारतीय जर ब्रिटिश प्रजा नसते तर ते नाताळमध्ये न येण्याचीच शक्यता अधिक आहे.... भारतीय दक्षिण आफ्रिकेत आहे कारण तो ब्रिटिश प्रजा आहे. कोणाला आवडो वा न आवडो त्यांना भारतीयाला सहन करणं भाग आहे.

भारतीय नेहमी गुलामगिरीत राहत आलेले आहेत व त्यामुळे स्वराज्यासाठी ते पात्र नाहीत हे श्रीयुत मेडॉन यांचं विधान ऐतिहासिक दृष्टीनं असत्य आहे. श्रीयुत मेडॉन यांनी गृहित धरल्याप्रमाणे भारताचा इतिहास अलेक्झँडर द ग्रेट पासून सुरू होत नाही आणि अलेक्झँडरच्या वेळी भारताच्या पतनाला सुरुवात झालेली होती.

(तरीही) त्या काळातील भारताची आजच्या युरोपशी तुलना केली तर भारतच श्रेष्ठ ठरेल.... जेव्हा इतर राष्ट्रांचा जन्मही क्वचितच झाला असेल तेव्हा भारताचा सूर्य कळसाला पोहोचलेला होता, आणि आजचे भारतीय त्या वंशाचे वंशज आहेत. त्यामुळे भारतीय आधीपासूनच गुलामगिरीत आहेत हे म्हणणं क्वचितच बरोबर ठरेल.

हे खरं आहे की भारतानं आपण अजिंक्य असल्याचं सिद्ध केलेलं नाही. परंतु मतदान हक्क नाकारण्यामागील हे कारण असेल तर 'दुर्दैवानं प्रत्येक राष्ट्र याच्या प्रभावात आलेलं दिसेल.' हेही खरं आहे की 'इंग्लंडनं भारतात आपला राजदंड ठामपणे उभा केलेला आहे'. परंतु त्यामुळे भारतीय लज्जित नाहीत:

ब्रिटिश साम्राज्यात असायचा त्यांना अभिमान आहे कारण इंग्लंड त्यांचा मुक्तिदाता होईल असा त्यांना विश्वास वाटतो. सगळ्यात आश्चर्याची गोष्ट ही आहे की बायबलमधील आवडत्या राष्ट्रांप्रमाणे शतकांच्या गुलामगिरीनंतरही भारतीयांना दडपता येऊ शकत नाही.

प्राध्यापक सीले यांनी आपल्या एक्सपँन्शन ऑफ इंग्लंड या ग्रंथात असं मत मांडलं आहे की भारताला परकियांनी जिंकलं असं म्हणणं क्वचितच बरोबर ठरेल. 'भारतानं स्वतःलाच जिंकलं असं म्हणणंच उचित ठरेल.'

सन्माननीय श्रीयुत स्टाईनबैंक बेलियर येथे म्हणाले होते की ब्रिटिश सरकारनं भारतीय मतदानदुरुस्तीविधेयक नामंजूर केल्यामुळे परिस्थिती एकदम बदलली आहे व त्यामुळे बदललेल्या परिस्थितीत 'तुम्ही आम्हाला दिलेले अधिकार आम्ही तुम्हाला आता परत करतो' असं ब्रिटिश सरकारला सांगणं वसाहतीच्या लोकांचं 'स्पष्ट कर्तव्य' ठरतं. यावर गांधीजी म्हणाले की या विधानात असं गृहीत धरण्यात आलेलं आहे की ब्रिटिश सरकार वसाहतीवर भारतीयांचा मतदान अधिकार लादत आहे. उलट सत्य हे आहे की 'जबाबदार सरकारवर ज्या परिस्थितीत जबाबदारी टाकण्यात आली होती ती परिस्थिती पूर्णपणे बदलवायचा प्रयत्न जबाबदार सरकार करत आहे.' गांधीजींनी विचारलं की अशा परिस्थितीत डाऊनिंग स्ट्रीटचं म्हणणं न्याय्य होणार नाही काय ?

आम्ही तुमच्यावर शासनाची जबाबदारी विशिष्ट परिस्थितीत टाकली होती. तुम्ही आणलेल्या विधेयकामुळे आता ती परिस्थिती पूर्ण बदलली आहे. ज्यामुळे संपूर्ण ब्रिटिश घटनेला व ब्रिटिशांच्या न्याय कल्पनेला धोका निर्माण व्हावा अशा प्रकारची परिस्थिती तुम्ही निर्माण केली आहे. आणि ज्या मूलभूत तत्त्वांवर ब्रिटिश घटना आधारित आहे त्या तत्त्वांचा तुम्हाला खेळखंडोबा न करू देणं आमचं स्पष्ट कर्तव्य नाही काय ?

जबाबदार सरकार जेव्हा देण्यात आलं होतं तेव्हा श्रीयुत मेडन यांनी जर आक्षेप घेतला असता तर ते योग्य झालं असतं. परंतु 'वसाहतीनं त्यावेळी मतदान अधिकार काढून घ्यायचा

आग्रह धरला असता तर वसाहतीला जबाबदार सरकार देण्यात आलं असतं की नाहीं हा प्रश्नच आहे.

यात काही संशय नाही की भारतीयही निष्कलंक नाहीत व त्याबाबतीत काही प्रमाणात तेच दोषी आहेत. परंतु टाळी एकाच हातानं वाजत नाही असं गांधीजींचं म्हणणं होतं. 'जगातील सर्वात सौम्य वृत्तपत्र द टाईम्सनंही हेच मत दिलं. भारतीयांचं जे प्रतिनिधीमंडळ चेम्बर्लेन यांना भेटायला गेलं होतं त्यावर भाष्य करत इंग्लंडमधील स्टार या वृत्तपत्रानं ऑक्टोबर २१, १८९५च्या अंकात मान्य केलं की 'ब्रिटिश भारतीय प्रजेचा जो घृणास्पद छळ करण्यात येत आहे त्याचं प्रत्यंतर नवीन भारतीय आप्रवासी विधेयकातून येतं. या विधेयकाद्वारे 'भारतीयांना गुलामगिरीत न्यायचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे.'

जाहीरनामा आणि अधिनियमांद्वारे समतेच्या तत्त्वानुसार ज्या लोकांना कायद्यासमोर आपल्या बरोबरीत ठेवण्यात आलेलं आहे त्यांच्यावर आफ्रिकेतील व्यापाऱ्यांच्या हावेमुळे अतिशय दुःखद अन्याय होऊ नये म्हणून प्रत्येक इंग्रज चिंतेनं पाहत आहे.

'भारतीयांना अतिशय दयाळूपणानं वागवलं जात असल्याच्या' आत्मसंतुष्ट वृत्तीतून निर्माण झालेला आपला स्वतःचा भ्रम वसाहतीचे लोक जर दूर करू शकले, आणि सध्याच्या अवस्थेसाठी युरोपिअनही जबाबदार आहेत हे समजून घेऊ शकले तर 'डाऊनिंग स्ट्रीटच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय दोन्ही पक्षांचं समाधान होऊ शकेल.' अशा रीतीनं भारतीयांचा संपूर्ण प्रश्न सुटू शकेल.

गांधीजींनी वृत्तपत्रांना, सार्वजनिक जीवनातील लोकांना आणि धर्मगुरूंना विनंती केली : भारतीयांबद्दल द्वेषाची भावना ठेवून काहीच चांगलं निष्पन्न होणार नाही.

भारतीयांना मतदानाचा अधिकार देण्याविषयी आक्षेप घेण्यासंबंधी त्यांनी स्वीकारलेलं धोरण ब्रिटिश घटना, ब्रिटिशांची न्यायभावना आणि न्याय्य व्यवहार यांच्याशी विसंगत आहे आणि याहीपलीकडे ते ख्रिश्चनत्वाच्या तत्त्वाचा तिटकारा करणारं आहे.

गांधीजींचं म्हणणं होतं की भारतीयांना अवनतीकडे न्यायच्या प्रयत्नाविरुद्धच्या या संघर्षात दक्षिण आफ्रिकेचा विवेक आणि ख्रिश्चन धर्माचा आवाज असलेल्या धर्मगुरूंवर भारतीयांकडून उभं राहायची विशेष जबाबदारी आहे. गांधीजींनी सांगितलं की अनेक युरोपिअनांनी माझ्याजवळ खाजगीत भारतीयांबद्दल सहानुभूती व्यक्त केली तसंच विविध सभांमध्ये सरसकटपणे मंजूर करण्यात आलेले प्रस्ताव आणि त्यावर भाषणं करतानाचा कटू सूर आपल्याला नापसंत असल्याचं सांगितलं आहे. गांधीजी त्यांना म्हणाले की अशा वेळी तुम्हाला जे वाटतं ते स्पष्टपणे धैर्यानं सांगणं तुमचं कर्तव्य आहे. त्यामुळे तुम्हाला चौपट बक्षीस मिळेल. तुम्हाला वसाहतीतील ४०,००० लोकांचीच नव्हे तर 'संपूर्ण भारताची कृतज्ञता मिळेल' ; नाताळच्या लोकांना अतिशय उपयुक्त सेवा देणाऱ्या वर्गाच्या विरोधात युरोपिअनांच्या मनात जे पूर्वग्रह आहेत ते दूर करून तुम्ही वसाहतीची खरी सेवा कराल; 'प्राचीन काळच्या या वंशाला अनावश्यक छळापासून वाचवून तुम्ही मानवतेचीही सेवा कराल'; आणि शेवटचं परंतु महत्त्वाचं म्हणजे एक उदार ब्रिटिश म्हणून तुम्ही भारत आणि इंग्लंडमध्ये प्रेम आणि शांतता यावर आधारित बंध निर्माण कराल.

दोन समुदायांत दरी निर्माण करणं सोपं असतं. त्यांना प्रेमाच्या रेशमी धाग्यानं एकत्रित बांधणं तेवढंच कठीण असतं. परंतु जी कोणती गोष्ट चांगली असते तिच्यासाठी तेवढाच त्रास घ्यावा लागत असतो. [एम. के. गांधी, *अॅन अपील टू एव्हरी ब्रिटन इन साऊथ आफ्रिका*]

११

दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक ब्रिटिशास आवाहन या गांधीजींच्या लेखाची त्याच्यातील 'फार मोठ्या नेमस्तपणामुळे' नाताळ मर्क्युरीनं फार वाखाणणी केली. [*नाताळ मर्क्युरी*, डिसेंबर १२, १८९५] *बछुआना लँड न्यूज* या वृत्तपत्रानं 'सुंदर पद्धतीनं केलेलं आवाहन' असं या लेखाचं वर्णन केलं आणि लिहिलं की लेखकानं 'आपली बाजू जवळपास सिद्ध' केलेली आहे. [*बछुआनालँड न्यूज*, फेब्रुवारी ८, १८९६] परंतु यातील कोणीही त्यांचा सिद्धान्त मान्य केला नाही हे खरं असलं तरी या

आवाहनाविरुद्ध त्यांनी केलेले युक्तिवाद दुबळे आणि अडखळणारे होते. उलटपक्षी *पिलिग्रिम* या वृत्तपत्रानं स्पष्टपणे जाहीर केलं की ज्या माणसानं स्वतःची पात्रता विपरीत परिस्थितीही वाढवली आहे त्याला नागरिकत्वाच्या अधिकाराच्या उपभोगापासून वंचित करणं आणि त्याला वास्तवात 'एखाद्या अगदी हलक्या प्रतीच्या प्राण्याप्रमाणे' वागवणं हे न्यायाच्या तत्त्वालाही अनुसरून नाही आणि आणि सार्वजनिक जीवनाच्या धोरणानुसारही योग्य नाही. कष्टाळू, प्रामाणिक भारतीयानं जर आपल्या कुटुंबांला वर आणलं असेल व आपल्या सर्व सामर्थ्यानुसार त्याला शिक्षित केलं असेल तर ती गोष्ट, तो जेव्हा या वसाहतीत आला होता तेव्हा अतिशय दयनीय वा जवळपास गुलामगिरीच्या अवस्थेत होता या एकाच कारणासाठी घृणास्पद ठरते काय? आणि त्याच्या मुलांच्या रंगामुळे वा त्यांचे वडील 'कुली बंधुआ मजूर होते या कारणासाठी त्यांच्याकडे तुच्छतेनं बोट दाखवणं' उचित आहे काय?

उत्तर ठामपणे 'नाही' होतं.

प्रसिद्ध रोमन कवी होरॅस यांची त्यानं आठवण करून दिली. त्यांच्या 'वडिलांना गुलामगिरीतून मुक्त करण्यात आलेलं होतं' व त्यांनी आपल्या मुलाला चांगल्या रीतीनं शिक्षित केलं होतं. रोमन साम्राज्याच्या महान सम्राटानं 'मुक्त केलेल्या गुलामाच्या मुलाची' घृणा केली नाही आणि त्यानं जेव्हा होरॅसला आपला जीवश्च कंठश्च मित्र केलं तेव्हा 'दोन हजार वर्षांपासून दैवतपदावर चढण्यासाठी धडपडणाऱ्या मॅसिनियानं' त्याच्या कमी प्रतीच्या वंशावळीचा बाऊ केला नाही. मुक्त झालेल्या भारतीयांच्या मुलांना वा बंधुआ मजुरांच्या मुलांना त्यांच्या जन्मामुळे मतदानाचा अधिकार नाकारू इच्छिणाऱ्या गोऱ्याविरुद्ध पिलिग्रिमनं टीकेची झोड उठवली.

सन्माननीय आणि बुद्धिमान भारतीय, कुणालाही अभिमानास्पद वाटावं अशा पद्धतीनं पैसा वाचवून अशा परिस्थितीत पोहोचतो की त्यामुळे निःसंशयपणे वसाहतीचे हितसंबंध त्याच्यात गुंतलेले असतात. त्यामुळे त्याच्यापेक्षा कमी पात्रतेच्या युरोपिअनांच्या मत्सराला तो पात्र होतो. परंतु त्यामुळे त्याला नागरिकत्वाचे अधिकार का नाकारण्यात यावे हे आम्हाला हे कळू

शकत नाही... आम्ही निश्चितपणे सांगू शकतो की भारतीयानं एकदा निर्बंधाचे अडथळे यशस्वीपणे ओलांडले आणि आवश्यक अटींची पात्रता मिळवली की त्याच्या नागरिकत्वाचा अधिकार रंग वा जातीचा विचार न करता मान्य करण्यात यावा.... जिथं गुणवत्तेला मान्यता देणं आवश्यकता असते तिथं त्या गुणवत्तेला नाकारणं ही गोष्ट अन्याय्य व अनुदारपणाची आहे तसंच ज्यांना ब्रिटिश नागरिकत्वाचं मूल्य वाटतं व ते मिळवू इच्छितात त्यांच्यावर संरक्षणाचं छत्र धरणाऱ्या ब्रिटिश घटनेच्या मूलभूत तत्त्वांच्या सरळसरळ विरोधातही ही गोष्ट आहे. [*पिलिग्रिम*, एप्रिल १८९५]

पिलिग्रिमचं म्हणणं होतं की 'युरोपिअनांच्या वा वसाहतीच्या हिताला' भारतीय मत 'अपायकारक होऊ शकतं' हा उभा करण्यात आलेला बागुलबुवा 'इतका भोळसटपणावर विसंबून आहे की त्याचा गंभीरपणानं विचार करायच्याही तो लायकीचा नाही.' सामान्यपणे बहुतेक प्रकरणी एखादा माल जसा जहाजात भरावा तशा पद्धतीनं भारतीय मुलांना आणि माणसांना जहाजात भरून नाताळमध्ये आणलं जातं. हा माल कालबाह्य झाला की सह्या करणाराना त्यांच्या मूळ स्थितीत परत ढकलण्यात येतं. मुक्त भारतीयांच्या प्रकरणात त्याचं स्थान साम्राज्यातील मुक्त प्रजेसारखं असतं. त्याचं ते स्थान अमान्य करणं वा ते स्थगित करणं वा 'त्यामुळे मिळणारे अधिकार कमी करणं' याचा अर्थ होईल 'ब्रिटिश घटनेच्या महत्त्वाच्या अशा तत्त्वांकडे दुर्लक्ष करणं' जी एका प्रसिद्ध वक्त्याच्या शब्दात सांगायचं तर 'नवागताला वा अतिथीलाही लागू होत असतात'.

ज्या क्षणी (उदा. अतिथी वा नवागत) आपला पाय ब्रिटिश भूमीवर ठेवतो त्या क्षणी त्याला वाटायला लागतं की ज्या भूमीवरून तो चालतो आहे ती पवित्र भूमी आहे. त्याच्या दुर्दैवाची घोषणा कोणत्याही भाषेत जरी झालेली असली; भारतीय वा आफ्रिकी सूर्यानं स्वातंत्र्याशी विसंगत असलेला कोणताही रंग जरी त्याच्यावर चढवलेला असला; कोणत्याही विध्वंसक युद्धात जरी त्याच्या स्वातंत्र्याचा अपहार झालेला असला; गुलामगिरीच्या वेदीवर कितीही पवित्र

समारंभात जरी त्याचा बळी देण्यात आलेला असला; तरी ज्याक्षणी त्याचं पाऊल पवित्र ब्रिटिश भूमीवर पडतं त्याच क्षणी वेदी आणि देव दोघंही एकाच वेळी धुळीला मिळतात; त्याचा आत्मा आपली गौरवशाली पावलं टाकत चालू लागतो; त्याचं शरीर त्याच्याभोवती खणखणणाऱ्या बेड्यांमध्ये मावणार नाही असं विशाल रूप धारण करतो; आणि तो मुक्त होऊन, नवजीवनानं प्रस्फुरित होऊन, अलौकिक सामर्थ्यानं वैश्विक उत्थानासाठी उभा राहतो. [*पिलिग्रिम*, एप्रिल १८९५]

पिलिग्रिमनं समारोप करत लिहिलं की ब्रिटिश घटनेचं हे 'उदात्त' तत्त्व आहे व न्यायासाठी आणि स्वातंत्र्यात जन्मलेल्या ब्रिटिश प्रजेच्या कधीही न हिरावून घेता येणाऱ्या या हक्कांचा नाताळमधील सन्माननीय भारतीय विश्वासानं धावा करू शकतात. [*पिलिग्रिम*, एप्रिल १८९५]

लंडनमध्ये 'आवाहनाचा' थोडा उशीरानं जरी परिणाम झाला तरी सुजाण ब्रिटिश जनतेचं मत पूर्णपणे भारतीयांच्या प्रश्नाकडे अनुकुलतेनं पाहू लागलं. भारतीयांच्या मतदान हक्कासंबंधात द टाईम्सनं आतापर्यंत कुणाचीही बाजू घेतलेली नव्हती. गोऱ्यांचं बहुमत धोक्यात यायची भीती असल्यामुळे भारतीयांना मतदान अधिकार देणं चुकीचं आहे अशा प्रकारची तक्रार वसाहतीतील कुणाकडून तरी काही काळापूर्वी आल्यानंतर *द टाईम्सनं* लिहिलं होतं की 'जर हे सत्य असेल तर ते अमान्य करणं कठीण आहे.' जानेवारी २७, १८९६ला *द टाईम्सनं* लिहिलं की कार्यालयीन आकडेवारीच्या व तथ्यांच्या आधारे श्रीयुत गांधींनी माहिती गोळा करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील आपल्या देशबांधवांच्यावतीनं जे कष्ट घेतले त्यामुळे ते आदराला पात्र झाले आहेत. *द टाईम्सनं* पुढं लिहिलं : व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीनं विचार करण्यायोग्य नजिकच्या काळात युरोपिअन मताचं प्राबल्य भारतीय मतामुळे कमी व्हायची शक्यता आहे काय? मतदार सूचीतील २५१पैकी मजुरांची फक्त २ मतं असल्याचं दिसून येतं आणि २५१पेक्षा अधिक मतं 'व्यापारी, दुकानदार, सोनार आणि दागिन्यांचे दुकानदार यांची आहेत.' *द टाईम्सनं* निदर्शनास आणून दिलं की भारतातील नगरपालिका आणि इतर मतदार संघात 'अतिशय महत्त्वाचा घटक असलेला' हाच वर्ग आहे.

नाताळमधील भारतीय त्या अधिकारांची मागणी करू शकत नाही जे त्याला भारतात मिळत नव्हते, आणि काहीही असलं तरी भारतात त्याला कोणताच मताधिकार नव्हता ह्या युक्तिवादात विसंगती आहे.

भारतीयांना भारतात तेच अधिकार आहेत जे तिथं इंग्रजांना आहेत. संपूर्ण भारतातील ७५० नगरपालिकांमध्ये नेटिव्ह आणि ब्रिटिश मतदारांना समान अधिकार आहेत आणि १८९१ साली ६७९० नगरपाल नेटिव्ह होते तर ८३९ युरोपिअन होते. भारतीय नगरपालिकांच्या मंडळावर युरोपिअनांच्या मताचं प्रमाण ८ ला १ असं होतं. उलट नाताळ मतदार संघात युरोपिअन आणि ब्रिटिश भारतीय मतांचं प्रमाण ३७ ला १ असं आहे.... दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश भारतीयांची मागणी ही आहे की कायद्याच्या बदलामुळे मतदार सूचीतून त्यांना पूर्णपणे वगळण्यात येऊ नये. हेही लक्षात ठेवलं पाहिजे की भारतीय नगरपालिका दीड कोटी लोकांचं प्रशासन चालवतात व त्यांचा खर्च पाच कोटी रुपये आहे. १८९१मध्ये नाताळमधील एकूण लोकसंख्या ५० लाख असावी असा अंदाज आहे व त्यातील ८८,००० युरोपिअन वा ब्रिटिश भारतीय होते (आता कदाचित एक लाख). नाताळचा सार्वजनिक खर्च १८९३-९४ साली १० लाख पौंड होता. [*द टाईम्स*, जानेवारी २७, १८९६]

ब्रिटिश भारतीयाला जबाबदार शासनपद्धतीच्या स्वरूपाची आणि **जबाबदाऱ्यांची** माहिती नाही हा युक्तिवादही तेवढाच निराधार आहे.

जगात कदाचित असा एकही देश नसेल की जेथे प्रातिनिधिक संस्था जनजीवनात एवढ्या खोलवर रुजल्या आहेत. भारतातील प्रत्येक जातीत, प्रत्येक व्यापारात, प्रत्येक गावात युगांपासून पाच लोकांची पंचायत असते व वास्तवात तीच तिच्या अंतर्गत असलेल्या लोकांसाठी नियम तयार करायचं व प्रशासनाचं काम करत असते. मागील वर्षी पॅरिश कौन्सिल कायदा होईपर्यंत इंग्लंडमध्ये देखील ग्रामीण भागासाठी अशा प्रकारची व्यवस्था नव्हती. [*द टाईम्स*, जानेवारी २७, १८९६ (ठळक अक्षरं माझी)]

द टाईम्सनं इशारा दिला की श्रीयुत चेम्बर्लेन यांच्यासमोरील प्रश्न केवळ तात्त्विक स्वरूपाचा नाही तर वर्णविद्वेषाचा आहे :

आपल्याच प्रजेत वर्णयुद्ध होणं आपल्याला परवडू शकत नाही. भारत सरकारनं नाताळमध्ये आप्रवासी भारतीय पाठवणं एकाएकी बंद करून नाताळच्या विकासात अडथळा आणणंही तेवढंच चूक होईल जेवढं नाताळनं ब्रिटिश भारतीय प्रजेला नागरिकत्वाचे अधिकार नाकारणं चूक होईल. भारतीयांनी आपल्या काटकसरीनं आणि वसाहतीतील चांगल्या कामानं स्वतःची नागरिक होण्यासारखी स्वतःची प्रगती केलेली आहे. भारत सरकारला काही वेळा काही वसाहतींशी व्यवहार करताना टोकाची पावलं उचलण्याशिवाय उपाय राहिलेला नव्हता. ब्रिटिशांच्या वसाहतीत तशा प्रकारची गरज पडू नये हे पाहणं ब्रिटिश सरकारचं कर्तव्य आहे....

[*द टाईम्स*, जानेवारी २७, १८९६ (ठळक अक्षरं माझी)]

द टाईम्सनं दिलेला निर्णय आणि स्पष्टपणे दिलेला इशारा यामुळे वसाहतीला जबर धक्का बसला. वसाहत झोपा काढत असताना 'श्रीयुत गांधी आणि त्यांच्या इंग्लंडमधील पाठीराख्यांनी पुढं जाऊन लक्षापर्यंत मजल मारली आहे अशी *नाताळ विटनेसनं* सावधगिरीची सूचना दिली. आतापर्यंत भारतीय प्रश्नाची दखल न घेणाऱ्या *डेली न्यूजनं* इशारा दिला की 'ब्रिटिश सरकार आणि नाताळ मंत्रिमंडळ या दोघांचंही मत आहे आहे की भारतीयांची गोऱ्यांपेक्षा संख्या वाढायची शक्यता असेल तर भारतीयांना मतदानाचा अधिकार देण्यात येऊ नये. यामुळे बोअर लोकांना युटिलँडरांच्या विरुद्ध करावयाच्या कार्यवाहीसाठी समर्थन मिळालं आहे.

ही मनोरंजक कबुली वाचत असताना अध्यक्ष क्रुगर गालातल्या गालात उपहासानं हसत असेल. कारण यामुळे युटिलँडरांच्या प्रश्नाच्या संबंधात ट्रान्सवालची बाजू बरोबर असल्याचं पूर्णपणे सिद्ध होते. बोअरांपेक्षा त्यांची संख्या किती तरी अधिक आहे याबद्दल कोणीच संशय घेत नाही आणि याच मुद्यावर त्यांचा दावा आधारलेला आहे. त्यामुळे आता युक्तिवाद असा होतो : बोअरांना मतदानात पराभूत करता यावं म्हणून इंग्रजांना ट्रान्सवालमध्ये मतदानाचा संपूर्ण

अधिकार पाहिजे आणि भारतीयांचा नाताळमधील मताधिकार कायम असायला हरकत नाही कारण त्यांना इंग्रज मतदानात कधीही पराभूत करू शकतील. [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २८, १८९६]

विटनेसनं लिहिलं की नाताळ आणि ट्रान्सवाल सरकारसमोरील समस्या मूलतः सारखी आहे. नाताळमध्ये भारतीयांना मताधिकार नाकारल्यामुळे ट्रान्सवालमधील युटिलँडरांची बाजू लंगडी होणं अपरिहार्य आहे. त्यामुळे ज्यांना नाताळमध्ये आशियायी लोकांना केवळ आशियायी म्हणून मताधिकार नाकारायचा आहे ते जितक्या लवकर तो विचार सोडतील तेवढं ते हितावह होईल, त्याचप्रमाणे 'साम्राज्याच्या सर्व राजकीय परंपरा आणि मान्य तत्त्व यांच्या सरळसरळ विरोधात असलेल्या गोष्टीला' मान्यता देणं योग्य होणार नाही हे ते जितक्या लवकर लक्षात घेतील तेवढं बरं होईल आणि समाधानकारक तोडगा निघायची शंक्यता वाढेल.' [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २८, १८९६]

इतर अपशकुनही याच दिशेनं निर्देश करत होते. चेल्सा पॉलिटेक्निक येथे लॉर्ड लॅन्सडाऊन यांनी *द टाईम्सच्या* लेखाच्या तीन दिवस आधी जानेवारी २७ला भाषण दिलं होतं. त्या भाषणात ते म्हणाले होते की 'काळजीपूर्वक प्रयोगात्मक पद्धतीवर.... भारतीय जनतेला त्यांच्या स्वतःच्या कारभारात मोठ्या प्रमाणात सहभागी करून घ्यायचा भारत सरकारचा हेतू आहे.' ही पद्धती भारतातील ब्रिटिश सत्तेसाठी संकोचाची तर आहेच पण त्याचबरोबर 'जे लोक भारतातील सार्वजनिक जीवनासाठी जबाबदार आहेत त्यांनाही यामुळे बरीच मदत झालेली आहे.' नाताळ विटनेसचं म्हणणं होतं की सूचित केलेल्या या दोन्ही गोष्टी सोबत वाचल्या तर भारत सरकारकडून आवश्यकता पडल्यास भारतातून कुलींना पाठवणं बंद करण्यात येईल याबद्दल कुणाच्याही मनात संशय राहू नये. 'नाताळ सरकारनं गांभीर्यानं केलेल्या सूचनेप्रमाणे या दोन्ही गोष्टींकडे पाहून तडजोड करायचा प्रयत्न करायला पाहिजे.' भारताच्या गर्दीनं भरलेल्या भागांच्या मदतीसाठी लोकांचं परदेशात जाणं आवश्यक जसं आहे तसंच दक्षिण आफ्रिका आणि मलय द्वीपकल्प यांच्या विकासासाठीही ते आवश्यक आहे. 'या सर्व आप्रवासी लोकांवर ताबा

मिळावा म्हणून हिंदचीनमध्ये फ्रान्ससाठी आणि साम्राज्यातील अनेक वसाहतींसाठी ग्रेट ब्रिटननं फार मोठा त्याग केलेला आहे.' त्यामुळे '१८५८चा जाहीरनामा आमच्यावर बंधनकारक नाही असं हे सरकार तांत्रिकदृष्टीनं कदाचित म्हणू शकत असलं तरी त्या' जाहीरनाम्याच्या विरोधात जाणाऱ्या बेकायदेशीर कृत्याला श्रीयुत चेम्बर्लेन हे मान्यता द्यायची फार कमी शक्यता आहे.' वसाहतीचे लोक या चिन्हाकडे आपल्या विनाशाचं मूल्य देऊनच दुर्लक्ष करू शकतात.

१२

१८९५च्या शेवटी जेम्सन रेडमुळे दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांच्या दीर्घ काळापासून जपलेल्या भ्रमाला धक्का लागला आणि सर्व पक्षांमध्ये आपले मतभेद विसरून जवळ यायची तीव्र भावना निर्माण झाली. 'आशियायी लोकांच्या मतदानाचा प्रश्न वसाहतीसाठी किती महत्त्वाचा आहे हे दुसऱ्या कोणालाही अधिक चांगलं कळू शकत नाहीं' असं १८९६च्या जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात एका समकालीनानं चाकरमान्यांच्या पक्षाच्या नियतकालिकाला सांगून सर्व मतभेद विसरायची विनंती केली आणि लिहिलं :

परंतु शेक्सपिअर म्हणाल्याप्रमाणे 'आपली हाडं इंग्लंडमध्ये तयार झालेली आहेत' आणि राणीच्या ताब्यातील इतर मुलुखाबद्दल साम्राज्याच्या सरकारची काही कर्तव्य आहेत व ती कर्तव्य पूर्ण करता न आल्यास अमेरिका गमवावी लागली तेव्हा ग्रेट ब्रिटनसमोर जसा घटनात्मक पेच निर्माण झाला होता तसा पेच निर्माण होऊ शकतो, त्यामुळे चिंता निर्माण केल्याशिवाय स्वायत्त सरकारच्या अधिकाराचा घटनात्मक प्रश्न निर्माण करायचा आपण विचार करू शकत नाही. [*नाताळ विटनेस*, जानेवारी १०, १८९६]

विटनेसनं आधीपासून भारतीयांना मतदानाचा अधिकार द्यायला कडाडून विरोध केला होता कारण तसं केल्यास दक्षिण आफ्रिकी राज्यांचं संघराज्य करावयाच्या प्रक्रियेला धक्का लागेल असं त्याचं मत होतं. 'मझलर'नं आपल्या लेखमालिकेत दाखवल्याप्रमाणे या बाबतीत

सत्य असं होतं की जर नाताळमधील गोऱ्यांची संख्या संघराज्याच्या संसदेतील प्रतिनिधींची संख्या ठरवण्यासाठी विचारात घेण्यात आली असती तर भविष्यकालीन आफ्रिकी संघराज्यात नाताळला अतिशय नुकसानीच्या परिस्थितीत ठेवण्यात आलं नसतं. परंतु पात्रताविषयक नियमांतर्गत पात्र असलेल्या भारतीय प्रजाबांधवांचा मतदार सूचीत समावेश करण्यात आला असता तर बोलणी करायला बसलं असताना प्रत्येक राज्यातील 'सक्रिय' मतदार नागरिकांच्या आधारावर नाताळ निश्चितपणे लाभदायक स्थितीत राहिला असता. उदाहरणार्थ अमेरिकेतील दक्षिणेकडील राज्यांनी उत्तरेकडील राज्यांवरील १७८६ ते १८६०पर्यंत आपली श्रेष्ठता 'केवळ या आधारावर टिकवून ठेवली होती की काँग्रेसमधील प्रतिनिधी ठरवताना त्या राज्यातील गुलामांच्या संख्येमुळे दोन गोरी मतं पाच मतांबरोबर मोजल्या जायची.' [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २८, १८९६] 'मझलर' च्या युक्तिवादाला जे साध्य करता आलं नाही ते अखेरीस आश्चर्यजनक रातीनं घटनाचक्रानं साध्य केलं. वास्तवाच्या वाढत्या दडपणामुळे अखेरीस *विटनेसला* शरणागती पत्करावी लागली. जानेवारी १७, १८९६ला *नाताळ विटनेसनं* लिहिलं:

आशियायी मताचा मोह पडायच्या अवस्थेपासून अजूनही आम्ही फार दूर असलो तरी ब्रिटिश सरकारशी अतिशय नाजूक आणि अपायकारक मुद्यावर संघर्ष करण्याऐवजी भारतीयांची सौम्य स्वरूपातील आणि नियंत्रित अवस्थेतील उपस्थिती सहन करायला आम्ही तयार आहोत कारण या बाबतीत इंग्लंडमधील भावना निश्चितच आमच्या विरोधात आहे, आणि या प्रकरणाच्या न्याय्यतेबद्दल अनेक निष्णात विधिज्ञांची मतंही अतिशय संशयास्पद आहेत. स्वतंत्र दक्षिण आफ्रिका आदर्श राहिला असता परंतु काही घटनांमुळे अजून किती तरी काळ ती गोष्ट पूर्णपणे अव्यवहार्य ठरली आहे. परिणामी ब्रिटिश सरकारशी संबंध टिकवणं आवश्यक आहे.... आमचा असा विश्वास आहे की मतदानाच्या प्रश्नावर तडजोड केवळ शक्यच नाही तर या आजुबाजूला निर्माण झालेल्या अडचणीच्या परिस्थितीतून मार्ग काढायचा तोच एकमेव उपाय आहे. [*नाताळ विटनेस*, जानेवारी १७, १८९६]

नंतरच्या काही आठवड्यात दक्षिण आफ्रिकी संघराज्याच्या बाबतीतील भावना भारतीयांच्या मतदानाच्या प्रश्नावरील बदलत्या भूमिकेबरोबर अजूनच ताठर होत गेली. ब्रिटिश वृत्तपत्रांमध्ये बातम्या येत होत्या की ज्यांच्या शस्त्रांच्या भरवशावर सुधारणावादी समितीच्या आशा अवलंबून होत्या त्या रँडवरील बहुतेक कॉर्निश खाणवाल्यांचा मतदारसंघ हा ओशियाना कंपनीचे संस्थापक सी. व्ही. ए. कॉनिबेअर या संसद सदस्याचा मतदारसंघ होता. ते गत दहा वर्षांपासून सोशलिस्ट पक्षाचं कॉर्नवालमधील कॅम्बोर्न विभागाचं प्रतिनिधित्व करत होते. भांडवलदारांनी आपल्या स्वार्थासाठी दक्षिण आफ्रिकी गणराज्यासाठी चालवलेल्या चळवळीत त्यांना अगदीच स्वारस्य नव्हतं. [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २१, १८९६] युटिलँडर लोकांच्या नेत्यांनी रँडवरील कामगार संघटनांच्या मनोभूमिकेचा अंदाज घेण्यात केलेल्या चुकीला जेम्सन रेडच्या अपयशासाठी जबाबदार धरण्यात आलं. *आफ्रिकन क्रिटिक, सन्डे टाईम्स, ऑब्झर्व्हर* या वृत्तपत्रातील अनेक लेखांमधून भाकीत करण्यात आलं की येत्या काही वर्षातच जोहान्सबर्ग हे 'कडव्या समाजवादाचं अतिशय महत्त्वाचं केंद्र झाल्याशिवाय राहणार नाही.' *नाताळ विटनेसनं* आधी जितक्या जोरदारपणे दक्षिण आफ्रिकी संघराज्याचा पुरस्कार केला होता तेवढ्याच जोरदारपणे त्याला विरोध करायला आता सुरुवात केली. त्यानं सांगायला सुरुवात केली की समाजवादाच्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी भारतीयांना मर्यादित प्रमाणात मताधिकार दिल्यास त्याचं 'स्वागत' करायला हवं.

जे लोक बोअरांच्या डच गणराज्याच्या अस्तित्वाला सतत विरोध करत आले आहेत असा बोअरांचा विश्वास आहे त्यांना ते मताधिकार देत नाहीत अशी बोअरांविरुद्ध नेहमी तक्रार करत राहणं आणि जे लोक या वसाहतीसाठी विविध प्रकारे अतिशय उपयोगी असल्याचं सिद्ध झालं आहे आणि ज्यांच्यावर आपल्या स्वातंत्र्याला आणि संस्कृतीला इजा पोहोचवणारी लहानशी योजना आखायचासुद्धा आरोप करता येऊ शकत नाही आणि कोणत्याही परिस्थितीत त्यासाठी ते समर्थही नाहीत त्या लोकांना त्याच वेळी कोणत्याही प्रकारचा धोका नसलेली थोडीशी सवलत

नाकारणं ही विसंगती आहे.... ट्रान्सवालमधील नुकत्याच घडलेल्या घटना शिकवतात की, अर्थात त्यांच्याबद्दलचा आपला समज ह्या दृष्टिकोनातून जर बरोबर असेल तर, दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्यामुळे आज आपली जशी समाजरचना आहे त्या समाजरचनेला गंभीर धोका निर्माण व्हायची शक्यता आहे. संघराज्यात भांडवल आणि मजूर, डी बेअर्सच्या संमिश्र व्यवस्थेचं प्रतिनिधित्व करणारी मालकी हक्काची व्यवस्था व त्याला केवळ अज्ञानामुळे पाठिंबा देणारा जुन्या वसाहतीतील प्रतिगामी डच शेतकऱ्यांचा घटक आणि गणराज्य, आणि दक्षिण आफ्रिकेतील सर्व मुक्त व्यापारी हितसंबंधाचा एकाधिकारवाद्यांपासून संरक्षण करण्यासाठी पाठिंबा असलेले रँडवरील समाजवादी आंदोलक, अशा विविध प्रकारच्या पक्षामध्ये ज्या प्रकारचा बेफाम पक्षीय संघर्ष होईल त्याची कल्पनाही करणं कठीण आहे.

आजच्या परिस्थितीत एकाधिकारवादी आणि त्यांची स्वस्त ब्रँडी व तिच्याबरोबर महाग ब्रेड यांच्यासह केलेलं संघराज्य आपल्या नाताळच्या वसाहतीला शाप होईल... दक्षिण आफ्रिकी संघराज्यात सामील झाल्यामुळे अशा प्रकारच्या पक्षीय संघर्षात आपण गुंतू. त्यामुळे आपल्या समाजव्यवस्थेला धक्का लागेल. [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २८, १८९६ (ठळक अक्षरं माझी)]

भीती वाटण्यायोग्य ही सर्वात वाईट गोष्ट नव्हती.

गोरा माणूस जेव्हा पराभूत होईल तेव्हा काळ्या माणसाला संधी मिळेल आणि झॅबेसीच्या दक्षिणेकडे काळ्या माणसाच्या उठावाबरोबरच - शक्यता हीही आहे की - बुलेवायो अथवा रँडमध्ये समाजवादी उठाव करतील. पात्र आशियायी लोकांना आणि नेटिव्हांना नाताळमध्ये मर्यादित मताधिकार दिल्यास कोणत्याही परिस्थितीत एक चांगला परिणाम होईल. त्यामुळे आफ्रिकी संघराज्याच्या निर्मितीच्या मार्गात अनुल्लंघनीय अडथळा निर्माण होईल. संघराज्याच्या निर्मितीच्या या स्वप्नानं - नाव घेता येईल अशा इतर कोणत्याही कारणापेक्षा - दक्षिण आफ्रिकेचं १८७७पासून नुकसानच अधिक केलेलं आहे. मजुबा हा लॉर्ड कॉर्नरव्हॉनच्या विधेयकाचं फळ होता, आणि क्रुगर्सडॉर्प व त्याचे परिणाम ही मजुबाची फळं आहेत. आणि त्या परिणामातील

बऱ्याचशा गोष्टींना रँड येथे भांडवल आणि मजूर यांच्यात निर्माण झालेली भावनाही कारणीभूत आहे. युटिलँडर जर आपसात एक राहिले असते तर बोअरांच्या अल्पलोकसत्ताक राज्याला त्या अटी मान्य कराव्या लागल्या असत्या ज्या क्रुगर यांनी चेम्बर्लेनजवळ आधीच मान्य केलेल्या आहेत आणि ज्यात युटिलँडरांच्या सर्व मागण्यांचा समावेश होता. त्यांच्यात एकी नव्हती आणि गेल्या २० वर्षात त्यांची परिस्थिती तर ढासळलीच. पण त्याचबरोबर युरोपमधील मजुरांचं युद्धही दक्षिण आफ्रिकेत सुरू झालं असल्याचं दिसतं. दक्षिण आफ्रिकेचं संघराज्य हे उत्तर कदाचित २० वर्षांपूर्वी बरोबर असू शकलं असतं पण आज ते शापस्वरूप आहे. [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २८, १८९६ (ठळक अक्षरं माझी)]

रेडनंतर श्रीयुत ब्राऊन नावाच्या एका गृहस्थांनी अध्यक्ष क्रुगरसमोर 'दक्षिण आफ्रिकी गणराज्याला हानी होणार नाही अशाप्रकारे युटिलँडरांना मताधिकार द्यावा' म्हणून तडजोडीचा प्रस्ताव मांडला. नाताळ विटनेसचं म्हणणं होतं की ह्या उपायात काही थोडेसे बदल करून नाताळच्या आशियायी लोकांची गरज पूर्ण होऊ शकते. हा बदल एक तर 'मताधिकार मागणाऱ्या सामान्य आशियायी माणसाच्या बौद्धिक चाचणीविषयक असू शकतो वा तो व त्याचे बांधव नाताळच्या अधिकोषात किती भर घालतात याविषयी असू शकतो.'

नाताळ विटनेसनं ठासून सांगितलं की 'हे खरं आहे की बुद्धिमत्ता आणि सचोटी या गुणांच्या बाबतीत श्रीयुत गांधी श्रीयुत कॉक आणि वॉमर्नस आणि एवढंच नाही तर श्रीयुत प्रिटोरिया येथील लिपर्ट (सवलतींच्या शोधात असलेले) यांच्यापेक्षा किती तरी उच्च दर्जाचे ठरतील.' [*नाताळ विटनेस*, फेब्रुवारी २८, १८९६]

चक्र पूर्ण फिरलं होतं. चाकरमान्यांच्या पक्षाच्या वृत्तपत्रानं 'आशियायी' लोकांच्या मतदानाच्या प्रश्नावर पूर्णपणे कोलांटी उडी घेतली होती. १८९४चं मतदान दुरुस्ती विधेयक ज्या वंशीय मुद्यावर आधारलेलं होतं त्या शुद्ध वंशीय मुद्याऐवजी इतर कोणत्या तरी मुद्याच्या आधारे भारतीयांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी भूमिका तयार झालेली होती.

मंत्र्यांच्या बाजूनं असणारे आणि विरोधक यांच्यातील भांडणं सुरूच होती. परंतु त्यांच्यातील भेद उडदामाजी काळे गोरे निवडण्यापुरताच उरला होता.

प्रकरण ४: जबर मोल देऊन मिळवलेला विजय

१

अगदी अल्पावधीतच नवीन मतदान विधेयक राजपत्रात मार्च ३, १८९६ ला प्रसिद्ध झालं. त्यात केवळ तीन कलमं होती. पहिल्या कलमान्वये १८९४चा कायदा क्रमांक २५ रद्द करण्यात आला. नाताळ ॲंडव्हरटाईझरनं बेधडकपणे लिहिलं की सम्राज्ञींच्या सरकारला अमान्यतेचा शिक्का मारायची संधी न देता नको असलेल्या कायद्याच्या मार्गातील अडसर दूर करण्यासाठी असं करण्यात आलेलं आहे. दुसऱ्या कलमान्वये 'मुळात युरोपिअन नसलेल्या 'नेटिव्हाला' अथवा *ज्या देशात निवडपद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था नसतील* त्या देशातील पुरुषाच्या बाजूनं वंशपरंपरा असलेल्या व्यक्तीला, त्या व्यक्तीनं 'गव्हर्नर इन कौन्सिल'कडून या कायद्यापासून सूट मिळाल्याचा आदेश मिळवल्याशिवाय, नाताळमध्ये मतदानाचा अधिकार मिळणार नव्हता.' (तिरपी अक्षरं माझी) ज्यांचा कलम २मध्ये उल्लेख होता परंतु नियमाप्रमाणे या कायद्याची घोषणा व्हायच्या दिवशी ज्यांच्या नावांचा मतदार सूचीत समावेश झालेला होता आणि ज्या व्यक्ती इतर नियमांप्रमाणे मतदान करायला पात्र होत्या त्या व्यक्तींचा मतदान अधिकार कलम ३अन्वये सुरक्षित ठेवण्यात आला होता एकूण याचा अर्थ असा होता की ज्यांची नावं मतदार सूचीत होती ती कायम राहणार होती, १८९४च्या कायदा क्रमांक २५प्रमाणे सरसकट आशियायी लोकांसाठी जी तरतूद करण्यात आली होती ती वगळण्यात येणार होती आणि त्या जागी अशी उपाययोजना करण्यात येणार होती की ज्यामुळे युरोपिअन वंशाच्या व्यक्तींशिवाय इतर व्यक्तींना मतदानअधिकारापासून वगळण्यात येणार होतं.

लोकांची फसवणूक करायचा प्रयत्न अशी यावर नाताळ विटनेसनं टिप्पणी केली. श्रीयुत चेम्बर्लेन यांनी वसाहतीतील सत्ताधाऱ्यांची लाज राखली होती. जो कायदा कचऱ्याच्या टोपलीत फेकण्यात आला होता त्यात एकच गुण होता व तो म्हणजे आशियायी लोकांना आशियायी

म्हणून मतदान अधिकार नाकारायचा. त्यात रोखठोकपणा होता. आता नवीन विधेयकातून आशियायी हा शब्द अदृश्य झाला होता पण त्या जागी ' 'पॉलीनेशियन्स', 'पेन्टॅग्रॉनियन्स' आणि 'इतर वंश', 'ज्यांच्यात प्रातिनिधिक संस्था नाहीत' असे शब्द घालण्यात आले होते,' [*नाताळ विटनेस*, एप्रिल ३, १८९६] आशियायीला आशियायी म्हणण्यात आलं नव्हतं. पर्यायानं ' 'नेटिव्हाला' अथवा *'ज्या देशात निवडपद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था नसतील* त्या देशातील पुरुषाच्या बाजूनं वंशपरंपरा असलेल्या व्यक्तीला" हे नवीन विधेयकातील शब्द 'इतक्या उशिरा आले होते की त्यामुळे केवळ आंधळाच फसू शकला असता.' [*नाताळ विटनेस*, मार्च ६, १८९६] प्रातिनिधिक संस्था हे शब्द फार व्यापक होते. विधेयकानं प्रातिनिधिक संस्थांची व्याख्या केलेली नव्हती. नाताळमध्ये मतदान अधिकार मिळवण्यासाठी अर्जदाराच्या देशात प्रातिनिधिक संस्था असणं आवश्यक असायची अट होती. लॉर्ड लँड्सडाऊन यांनी स्पष्टपणे सांगितलं होतं की 'भारतीय जनतेला मोठ्या प्रांतांच्या विधान परिषदांमध्ये आपलं म्हणणं मांडायची संधी तर आहेच पण त्याचबरोबर भारताच्या मंत्रिपरिषदेतही त्यांना प्रतिनिधित्व आहे.' [*नाताळ विटनेस*मधील लॉर्ड लँड्सडाऊन यांचं उद्धरण, मार्च ६, १८९६] भारतीयांनी दावा केला होता की आमच्या देशात निवडणूक पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था आहेत. *नाताळ विटनेसनं* ठासून सांगितलं की देशात असं कोणतंच न्यायालय नाही की जिथं 'हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्यांचा मतदानाचा दावा मान्य केल्या जाणार नाही.' [*नाताळ विटनेस*, एप्रिल ३, १८९६]

त्याशिवाय हे विधेयक प्रामाणिक नाही. आशियात जन्मलेल्या ब्रिटिश प्रजेला मतदान अधिकारापासून वगळून वसाहतीला प्रभावित करायचा त्याचा हेतू आहे, परंतु त्यामुळे असं काहीच घडणार नाही. 'विधेयकाची शब्दरचना आमुलाग्र बदलल्याशिवाय.... आवश्यक पात्रता असलेल्या आशियायी लोकांना आताप्रमाणेच मताधिकार मिळवता येईल.' [*नाताळ विटनेस*, एप्रिल ३, १८९६] 'कुली अथवा काळ्या माणसाला' मतदान अधिकारातून वगळण्याऐवजी विधेयकानं

मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यपालांना जो कोणी पात्र वाटेल त्याला मताधिकार द्यायचा अधिकार दिलेला आहे.

सत्तेत असणाऱ्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार मतदान अधिकार देणाऱ्या याहून अधिक घटनाविरोधी प्रकियेची कोणी स्वप्नातही कल्पना करू शकणार नाही. त्यामुळे घाऊक भ्रष्टाचाराची दारं उघडतील.... मंत्री जर मतदान यादीत हस्तक्षेप करू शकतील तर प्रातिनिधिक सरकार केवळ एक नाटक ठरेल. [*नाताळ विटनेस*, एप्रिल ३, १८९६]

भारतीयांना दिलेली ही जर लाच असेल व श्रीयुत गांधी आणि प्रमुख भारतीयांनी आपलं आंदोलन थांबवावं म्हणून सरळसरळ दिलेलं हे आमिष असेल तर, विटनेसला खात्री होती की ते त्या मोहात पडणार नाहीत. 'आज ज्याप्रकारे कायद्यानं मताधिकार मिळतो त्याशिवाय इतर कोणत्याही आधारावर मिळालेला मताधिकार ते मान्य करणार नाहीत व राज्यपाल वा मंत्र्याद्वारे नामित होण्यात त्यांना स्वारस्य नाही असं आपण गृहीत धरू तरच आपण त्यांना न्याय करू.' [*नाताळ विटनेस*, मार्च ६, १८९६]

अशा प्रकारचं विधेयक तयारच का करण्यात आलं असावं? आपल्याच प्रश्नाला उत्तर देत *नाताळ विटनेसनं* सुचवलं की पडद्यामागे असं काही तरी आहे की ज्याची कल्पना वसाहतीपासून दडवली जात आहे. त्यामुळे विधानसभेनं दुसरं वाचन सुरू व्हायच्या आधी सम्राज्ञींच्या सरकारशी झालेला पत्रव्यवहार टेबलवर ठेवण्यासाठी आग्रह धरावा आणि 'तो पूर्णपणे ठेवण्यात आला असल्याचीही खात्री करून घ्यावी.' [नाताळ विटनेस, एप्रिल ३, १८९६] झुलूलँडचं नाताळमधील सामिलीकरण आशियायी लोकांना मतदान हक्क द्यायच्या अटीवर आहे अशी जी वदंता सतत ऐकू येते तिच्या दृष्टिकोनातून झुलूलँडच्या संबंधातील पत्रव्यवहारही टेबलवर ठेवायचा आग्रह धरण्यात यावा. झुलूलँडच्या मोबदल्यात आपल्याला 'विकण्यात' तर आलेलं नाही ना याची आमदारांनी खात्री करून घ्यावी.

टाईम्स ऑफ नाताळला भीती वाटत होती की नवीन विधेयकाच्या कलम २च्या अंतर्गत गव्हर्नर इन कौन्सिलकडे ताबडतोब अर्ज करण्यात येतील. या गोष्टीला सर्व भारतीय जनतेची सहानुभूती मिळेल तसंच 'श्रीयुत गांधी यांच्यासारख्या सक्षम, उत्साही आणि महत्त्वाकांक्षी माणसाच्या नेतृत्वाखालील जबरदस्त संघटनेचा सक्रिय पाठिंबाही त्यांना मिळेल.' [*टाईम्स ऑफ नाताळ*, मार्च ३, १८९६] सत्तेत असलेल्या आजच्या मंत्रिमंडळाकडून सवलत मिळवणं फारसं कठीण ठरू नये. त्यामुळे आपण अतिशय सावध राहायला पाहिजे. 'जर चूक झाली, जर कुठं पळवाट राहिली आणि आपल्या राजकीय व्यवस्थेत भारतीयांना आपला आवाज उचलायची सरळ संधी मिळाली तर नाताळच्या नशिबी लवकरच संपूर्ण काळी वसाहत व्हायचं लिहिलं गेलं आहे हे नक्कीच समजा.' [*टाईम्स ऑफ नाताळ*, मार्च ३, १८९६]

वरवर पाहता मागणी केलेली प्रत्येक गोष्ट या कायद्यानं दिलेली आहे असं दिसत असलं तरी दुसऱ्या कलमात करण्यात आलेल्या 'तरतुदीद्वारे करण्यात आलेला प्रतिबंध निरुपयोगी ठरायची शक्यता आहे' अशी *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* टिप्पणी केली. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च ३, १८९६] नगरपालिकांच्या प्रशासनाची पद्धत भारतात प्रचलित आहे या भारतीयांच्या दृष्टिकोनाचा अर्थ १८५८च्या जाहिरनाम्याप्रमाणे निवडणुकीच्या माध्यमातून प्रातिनिधिक व्यवस्था असा होतो व त्या मताला लंडनहूनही बराच पाठिंबा मिळत असलेला दिसून येतो. 'त्याचा अर्थ असा होतो की प्रस्तावित विधेयक मंजूर केल्यामुळे वादाचा अंत कोणत्याही अर्थानं होऊ शकणार नाही.... विधेयकातील तरतुदीनुसार मतदारसूचीतून भारतीयांची नाव वगळण्यास आल्यास प्रिव्ही कौन्सिलकडे दाद मागितली जायची फार मोठी शक्यता आहे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च ३, १८९६] यामुळे नवीन विधेयकामुळे नाताळमधील भारतीयांच्या प्रवेशासाठी दार बंद तर झालं नाहीच पण आता 'एका दाराऐवजी दोन दारं उघडली गेली आहेत.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च ७, १८९६] भारतात 'निवडणुकीद्वारे प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्था' आहेत असं जर सिद्ध झालं तर तो आत येऊ शकतो. जर यात त्याला अपयश आलं तर गव्हर्नर इन कौन्सिलकडे अर्ज करून तो सवलत

मिळवू शकतो आणि मतदार होऊ शकतो. 'आमच्या समजुतीप्रमाणे 'निवडणुकीद्वारे प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्था' असलेल्या देशातून आपण आलो असल्याचं सिद्ध करणं किंचितही कठीण जाणार नाही. ही शब्दरचना जाणीवपूर्वक शक्य तेवढी संदिग्ध ठेवण्यात आली आहे की काय हे जरी आम्ही सांगू शकत नाही तरी एवढं मात्र सत्य आहे की याहून अधिक शिथिल शब्दरचना करणं शक्य झालं नसतं.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च ३, १८९६]

नाताळचं मंत्रिमंडळ आणि ब्रिटिश सरकार यांच्यात दीर्घकाळ चाललेल्या चर्चेचं फळ हे विधेयक असल्यामुळे *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* सुचवलं की ब्रिटिश सरकारचा काय हेतू आहे त्याचा शोध घेणं हाच ही संदिग्धता दूर करायचा उपाय आहे. भारतीयांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेता येण्यासारखा नाही असं जर ब्रिटिश सरकारला वाटत असेल तर कायदा तयार करायला काहीच अर्थ नाही कारण त्याला आवश्यक असणारी मान्यता ब्रिटिश सरकारकडून मिळणार नाही. उलटपक्षी वार्ताहराचं म्हणणं होतं की अजूनही कृती करायला अवसर आहे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च २८, १८९६] भारतीय मतदान विधेयकावरील सर्व पत्रव्यवहार उपलब्ध करून देण्यात आला नाही तर 'संसद अंधारात मतदान करेल असा इशाराही या वार्ताहरानं दिला.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मार्च २८, १८९६]

नाताळ विटनेसच्या जी. डब्ल्यू. डब्ल्यू. या स्तंभलेखकानं या उपाययोजनेचं वर्णन 'एक गूढ कोडं वा संपूर्ण शरणागती आणि अतिशय संशयास्पद अर्थ आणि उपयोग असलेली उपाययोजना' असं केलं. [*नाताळ विटनेस*, मार्च १३, १८९६]

गांधीजींनी दादाभाई नौरोजी आणि सर वेडरबर्न यांना लिहिलेल्या दोन पत्रातून भारतीयांची प्रतिक्रिया कळते.

असं सांगतात की या विधेयकाला चेम्बर्लेन यांची मान्यता आहे. तसं असल्यास भारतीय समाजाची फार विचित्र अवस्था होईल. वृत्तपत्रांना असं वाटत असल्यासारखं दिसतं की भारतीयांजवळ प्रातिनिधिक संस्था आहेत व त्यामुळे त्यांच्यावर या विधेयकाचा परिणाम होणार

नाही. त्याचबरोबर यात काही संशय नाही की या विधेयकाचा हेतू भारतीय समाजावर परिणामकारक उपाययोजना करायचा आहे. या विधेयकाला विरोध करायचा आमचा हेतू आहे. परंतु मध्यंतरीच्या काळात यासंबंधी हाउस ऑफ कॉमन्समध्ये प्रश्न विचारण्यात आल्यास फार बरं होईल आणि चेम्बर्लेन यांच्या मनात काय आहे तेही आपल्याला त्यामुळे कळू शकेल असं माझं नम्र मत आहे. [गांधीजींचं सर विल्यम वेडरबर्न यांना पत्र, मार्च ७, १८९६, मूळ हस्ताक्षरीत पत्राच्या फोटोप्रतीवरून]

वसाहतीतील लोक आणि भारतीय या दोघांकडूनही या विधेयकाचा निषेध करण्यात आल्यानंतर या विधेयकाला मंत्र्याच्या मुखपत्रानं संपूर्ण पाठिंबा दिला. *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* ५ मार्चला लिहिलं की 'त्यांच्यापैकी अनेकांना १८९४ सालचा कायदाच अखेरीस मंजूर व्हावा असं वाटत होतं परंतु आपण हे तथ्य विसरू शकत नाही की वसाहतीवर सम्राज्ञींच्या सरकारचे निर्बंध आहेत आणि सम्राज्ञींचं सरकार १८५८च्या जाहीरनाम्यानं बांधलं गेलेलं आहे. त्या जाहीरनाम्यानुसार ब्रिटिश भारतीय प्रजेला साम्राज्यात नागरिकत्वाचे संपूर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत. १८९४ सालच्या कायद्यात एक कलम असं होतं की ह्या विधेयकाला 'सम्राज्ञींच्या सरकारची मान्यता मिळेपर्यंत हे विधेयक अंमलबजावणीत येणार नाही.' हे कलम नवीन विधेयकात आढळून येत नाही. भारतातील प्रातिनिधिक संस्थांचं जे स्वरूप आहे ते विधेयकातील अर्थाप्रमाणे 'निवडणुकीद्वारे प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्था' या स्वरूपाचं आहे की नाही हा प्रश्न आहे आणि ही बाब कोणत्या तरी मार्गानं विधेयक मंजूर व्हायच्या आधी स्पष्ट करण्यात आली नाही तर मग या देशातील सर्वोच्च न्यायालयाला त्यासंबंधी निर्णय करावा लागेल.' निवडणुकीद्वारे प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्था असलेल्या देशातून भारतीय आलेले आहेत असं जरी गृहित धरण्यात आलं तरी भारतीय मतदारांचं बहुमत युरोपिअन मतदारांना खाऊन टाकेल या आशंकेला मागील अनुभव पाहता काहीच आधार नाही असं नाताळ मर्क्युरीचं मत होतं. ही गोष्ट अनुभवानंही सिद्ध झालेली आहे.

इथं येणाऱ्या भारतीयांचा वर्ग सामान्यपणे मतदान हक्कासंबंधी चिंता करणारा नाही.... त्यांच्यातील बहुतेकांजवळ मतदान पात्रतेसाठी आवश्यक असणारी थोडीशी संपत्तीही नाही....
[नाताळ मर्क्युरी, मार्च ५, १८९६]

एवढंच नाही तर नेटिव्ह सोडून सर्व वंशांच्या आणि वर्गांच्या ब्रिटिश प्रजेला मतदानाचा अधिकार असूनही एकूण नोंदणी केलेल्या ९,००० मतदारात केवळ २५० भारतीयांनी मतदार म्हणून नोंदणी केलेली आहे. हे प्रमाण ३६ युरोपिअन मतदारामागे एक भारतीय मतदार असं आहे. यावरून सिद्ध होते की हे विधेयक कायम जरी नाही तरी दीर्घ काळापर्यंत पूर्णपणे आपली गरज भागवू शकेल.

या बाबतीतील वास्तव हे आहे की संख्येचा प्रश्न पूर्णपणे बाजूला ठेवला तरी वरच्या वर्गाच्या लोकांच्या हातातच शासनाचे लगाम असतात. त्यामुळे भारतीय मतदारांचं बहुमत युरोपिअन मतदारांना खाऊन टाकेल ही आशंका काल्पनिक आहे असा आम्हांला विश्वास ठेवावासा वाटतो. [*नाताळ मर्क्युरी*, मार्च ५, १८९६]

अखेरीस या सर्व प्रयत्नांनंतरही आपल्याला मतदार सूची 'निर्दोष' ठेवता आली नाही तर सध्या मतदान पात्रतेसाठी जी अतिशय कमी पात्रतेची अट आहे तिची पातळी आपण केव्हाही वाढवू शकतो. 'ती केव्हाही वाढवता येऊ शकते एवढंच नाही तर दुप्पटही करता येऊ शकते.' याशिवाय 'शैक्षणिक चाचणीच्या अटीचाही त्यात समावेश करता येऊ शकतो. या चाचणीमुळे मतदार सूचीतील एकाही युरोपिअनाचं नाव कमी न होता भारतीय मतदारांवर त्याचा फार मोठा प्रभाव पडेल.' [*नाताळ मर्क्युरी*, मार्च ५, १८९६]

अगदी हीच गोष्ट गांधीजी प्रत्येकाला सांगत होते. परंतु नाताळच्या गोऱ्यांची ते ऐकायची तयारी नव्हती. लवकरच मंत्र्याच्या मुखपत्राला त्या परिस्थितीतील विसंगतीचा शोध लागला व त्याप्रमाणे त्यानं भूमिका घ्यायला सुरुवात केली. तुम्हीच मान्य केल्याप्रमाणे भारतीय मतदारांचं

बहुमत युरोपिअन मतदारांना खाऊन टाकायची आशंका 'काल्पनिक' असेल तर नवीन विधेयकाची गरज काय असा आव्हानात्मक प्रश्न विचारण्यात आला असता त्यानं लिहिलं :

बहुतेक ती आशंका काल्पनिकच आहे, परंतु त्याबाबतीत आपल्याला अशा रीतीनं वागावं लागते की जणू काय ती आशंका खरीच आहे - आम्ही स्पष्ट केल्याप्रमाणे यासंबंधीच्या आमच्या स्वतःच्या दृष्टिकोनाप्रमाणे नाही तर या देशातील इतर युरोपिअनांची ही सार्वत्रिक धारणा आहे हे आम्हांला माहीत असल्यामुळे आपल्याला तसं वागावं लागते. [*नाताळ मर्क्युरी*, एप्रिल २३, १८९६] एकदा आपण उर्वरित आफ्रिकेपासून रेल्वेच्या दळणवळणाच्या अभावी वेगळे पडलो होतो. रंगीत मताचा आमच्यावर शिक्कामोर्तब होऊन दक्षिण आफ्रिकेतील शेजारच्या राष्ट्रांनी 'आशियायीसम लोकांची वसाहत' असं आम्हांला संबोधावं अशी आता आमची इच्छा नाही.

दोन गणराज्यांमध्ये वेगात निर्माण होऊ लागलेल्या परिस्थितीच्या संदर्भात यामुळे परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी ती अजूनच चिघळली. कोंबडी आपल्या खुराड्यात परतली आहे.

गांधीजींच्या 'आवाहना'चा सविस्तर आढावा घेताना 'भारतीयांना त्यांच्या देशात मताधिकार आहे' ह्या गांधीजींच्या विधानावर जी. डब्ल्यू. डब्ल्यू. यांनी आक्षेप घेतला. परंतु समीक्षकाशी शाब्दिक वादाच्या भानगडीत न पडता गांधीजींनी त्यांना सांगितलं की वास्तवात हा मुद्दा विषयाशी संबंधित नाही. भारतीय समुदायाचा मताधिकार काढून घेणं आवश्यक आहे की नाही हा प्रश्न वसाहतीच्या लोकांनी स्वतःलाच विचारायचा आहे आणि त्याचं उत्तरही त्यांनीच द्यायचं आहे. [*नाताळ विटनेस*च्या संपादकांना गांधीजींचं पत्र, दिनांक एप्रिल ४, १८९६, प्रकाशन एप्रिल १७, १८९६]

जर आवश्यक असेल तर भारतात प्रातिनिधिक संस्था असल्याचा पुरावा देऊनही काहीच परिणाम होऊ शकणार नाही. तशी आवश्यकता नसेल तर मग संदिग्ध कायदे करून भारतीयांचा छळ करायची आवश्यकता काय? भारतात प्रातिनिधिक संस्था आहेत की नाहीत

या प्रश्नाच्या उत्तरावरून भारतीयाच्या मतदानाचा प्रश्न सुटणार असेल तर मी नम्रतापूर्वक म्हणेन की या विषयावरील साहित्य एवढं कमी उपलब्ध नाही की त्याचा अभ्यास करून वसाहतीच्या लोकांना हा वादग्रस्त प्रश्न कायमचा सोडवता येऊ नये. न्यायालयातून याबद्दल निर्णय मिळवायची जर वेळ आली तर लोकांना विनाकारण खर्चात पडावं लागेल. [वरीलप्रमाणे]

२

एप्रिल १८९६मध्ये नाताळच्या संसदेचं सत्र अतिशय वादळी ठरेल असं बोललं जात होतं. काहीही फलित न निघणाऱ्या चर्चेमध्ये स्वतःला गुंतवून घेतल्याबद्दल मंत्रिमंडळाला टोमणे दिले जात होते. एवढंच नाही तर त्यांच्यावर विश्वासघाताचाही आरोप करण्यात येत होता. डाऊनिंग स्ट्रीटशी जुळतं घ्यायच्या मंत्रिमंडळाच्या प्रयत्नाला सुस्तपणा वा काहीही करून सत्तेला चिकटून राहायचा प्रयत्न समजलं जात होतं. *नाताळ विटनेस*मध्ये पुढील कविता आली :

हे खरं आहे की आम्ही दिलं होतं वचन
काढू भारतीयांना मतदार सूचीतून बाहेर;
पण नव्हतं चातुर्य आमच्यात
पटवायचं लॉर्ड रिपनला.
अखेर ठरवलं, योजायचा उपाय एक लहानसा,
पण झाला सामीलाच त्याचा लाभ;
आणि नसेल जर जराही महत्त्वाकांक्षी विधानसभा
तर मिळेल गांधीला हवं ते सर्व.
ही काही रीत नाही आपलं घर सांभाळायची,
पण करू तरी काय शकतो आम्ही?
ना तर आहाला आहे कणा, ना बुद्धी. [*नाताळ विटनेस*, मार्च ६, १८९६]

सरकारच्या गुप्ततेच्या धोरणामुळे विरोधीपक्षाचा संताप झालेला होता. सर जॉन रॉबिन्सन यांचा भारतीय बंधुआ मजुरांबद्दलच्या 'चिंते'बद्दल आणि मागील निवडणुकीत भारतीयांची मत मिळवण्यासाठी 'भारतीय जॉय बी. या मुलाचा महाधिवक्ता हॅरी एस्कॉम्ब यांनी घेतलेल्या मुक्याबद्दल'चं एक विडंबन काव्य लोकप्रिय झालं होतं. [*नाताळ विटनेस*, एप्रिल १७, १८९६ जॉय बी ही जॉय आरच्या ठिकाणी झालेली चूक असावी (सर जॉन रॉबिन्सन)]

श्रीयुत जॉन्स्टन यांनी ९ एप्रिलला नाताळ विधानसभेत विचारलेल्या प्रश्नामुळे घोंघावणाऱ्या वादळाची पूर्वसूचना दिली. नवीन विधेयकात कुठंच 'भारतीय' हा शब्द न सापडल्यामुळे त्यांनी विचारलं की 'भारतीय लोकांसाठी भारतात प्रातिनिधिक संस्था' आहेत काय? त्यांना सांगण्यात आलं की 'संदर्भित देशाच्या नेटिव्हांसाठी निवडणुकीवर आधारित प्रातिनिधिक संस्था नाहीत.' [*नाताळ विटनेस*, एप्रिल १७, १८९६] वृत्तपत्रांनी या उत्तराचं वर्णन 'गूढ' आणि 'कुणाच्याही आकलनशक्तीपलीकडील' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २४, १८९६] असं केलं. परंतु असं लक्षात आलं की राज्यपालांच्या भाषणातील 'सांसदीय संस्था' या शब्दांऐवजी विधेयकाच्या मसुद्यात 'प्रातिनिधिक निवडणूक पद्धतीच्या संस्था' हे शब्द घालण्यात आले होते.

एप्रिल २२ला विधेयकाचं दुसरं वाचन व्हायचं होतं. लोकांनी केलेल्या आरडाओरडीमुळे नमतं घेऊन नियोजित तारखेच्या दोन दिवस आधी सरकारनं लंडन आणि पिटरमारिट्झबर्गमध्ये झालेला पत्रव्यवहार टेबलवर ठेवला. दुसऱ्या दिवशी प्रधानमंत्र्यांनी सभागृहाला सांगितलं की जाहीर करण्यात आलेला पत्रव्यवहार 'समजून घेता यावा' म्हणून विधेयकाचं वाचन एक आठवडा लांबणीवर टाकण्यात येत आहे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २३, १८९६]

वसाहतीच्या अंतर्गत प्रशासनासाठीच नाही तर दक्षिण आफ्रिकेच्या इतर भागाशी नाताळचे जे भविष्यकालीन संबंध असतील त्याद्दष्टीनं विधेयकाचा विषय 'अतिशय महत्त्वाचा' असल्यामुळे विधेयक लांबणीवर टाकायचं समर्थन करत नाताळ मर्क्युरीनं विधेयकाला पाठिंबा द्यायचं सर्वांना आवाहन केलं. नाताळ मर्क्युरीचं म्हणणं होतं की १८९४च्या विधेयकाला वा अगदी

त्यासारख्या दुसऱ्या विधेयकाला साम्राज्याच्या सरकारची मान्यता मिळणार नाही हे सत्य लोकांनी लक्षात घ्यायला हवं. उलटपक्षी त्यात दुरुस्ती करून सभागृहात मांडण्यात आलेल्या विधेयकाला मान्यता मिळेल आणि अशा रीतीनं वसाहतीवर अगदीच असुरक्षिततेत राहायची जी वेळ आली असती ती या विधेयकामुळे टाळण्यात आली आहे. आपल्यासमोर एकच पर्याय आहे :

एक तर हे अथवा काहीच नाही.... १८९४च्या विधेयकास मान्यता देण्याकरिता आपण साम्राज्याच्या सरकारला भाग पाडू शकतो या मताचे जे सदस्य होते ते स्वतःला मूर्ख बनवायचा धोका पत्करत आहेत आणि त्याचबरोबर अशा प्रकारच्या उपाययोजनेपासून वसाहतीला वंचित करू पाहत आहेत. [*नाताळ मर्क्युरी*, एप्रिल २३, १८९६]

विरोधी पक्ष नवीन विधेयकाकडे आणि विधेयकाच्या तहकुबीच्या समर्थनार्थ केलेल्या स्पष्टीकरणाकडे अविश्वासानं पाहत होता. नाताळ ॲडव्हरटाईझरचं म्हणणं होतं की प्रकाशित करण्यात आलेल्या दस्तावेजावरून स्पष्ट होत होतं की 'प्रातिनिधिक संस्था' हे शब्द वसाहत मंत्र्यांकडून घेण्यात आलेले आहेत. परंतु 'पॅटॅगोनियन वा ऑस्ट्रेलियातील वेगात नामशेष होणारे आदिवासी' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २३, १८९६] सोडले तर अशा प्रकारच्या प्रातिनिधिक संस्था नसलेला एक तरी वंश अस्तित्वात आहे काय हा प्रश्न आहे. त्यामुळे राज्यपालांच्या अभिभाषणातील 'सांसदीय प्रातिनिधिक संस्था' या शब्दांच्या ठिकाणी डाऊनिंग स्ट्रीटनं योजिलेले 'प्रातिनिधिक संस्था' हे शब्द आले. या दुसऱ्या वाचनाच्या स्थगितीचा अर्थ ब्रिटिश सरकारनं या बदलाला मान्यता द्यावी म्हणून पडद्याच्या पाठीमागे प्रयत्न चालू होते असा होतो काय? तसं असल्यास ती गोष्ट गुप्त का ठेवण्यात आली?

*नाताळ ॲडव्हरटाईझर*चं म्हणणं होतं की ह्या क्षमायाचनेला बदललेल्या शब्दरचनेनं झाकोळून टाकलं आहे. ते कलम चेम्बर्लेन यांचा आक्षेप दूर करण्यासाठी घालण्यात आलेलं होतं हे स्पष्ट होतं कारण जुन्या विधेयकात 'विदेशी आणि सम्राज्ञींची प्रजा' वा 'अतिशय अडाणी'

आणि 'अतिशय सुजाण' असा कोणताही भेद करण्यात आलेला नव्हता. आपल्या हातून पद निसटून चालल्याची जाणीव झालेलं मंत्रिमंडळ मतदार यादीत गोंधळ करणार नाही याची काय खात्री आहे?

कोणत्याही मंत्रिमंडळाला मतदारसंघात बनवाबनवी करायचा अधिकार देण्यात येऊ नये दुसरं कलम मतदान अधिकार नाकारत होतं तर तिसरं अतिशय आक्षेपार्ह पद्धतीनं ते मान्य करत होतं. त्यामुळे विधेयकाच्या समर्थनाचे मुद्दे वारंवार बदलण्यात येत होते. मताधिकार देणं अथवा नाकारणं हा संसदेचा एकाधिकार आहे. त्यामुळे तो अधिकार मंत्रिमंडळाला देण्यात आल्यास संसदेचा अधिकार नाकारला जाईल.... ह्या विधेयकामुळे ताबडतोब धोका तर आहेच पण त्याचबरोबर राजमुकुटानंही शतकांपूर्वी ज्या अधिकारावर आक्रमण करणं बंद केलं त्या अधिकारावर आक्रमणही होईल. [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, एप्रिल २३, १८९६]

एप्रिल २७ला भारतीय समाजानं नाताळ विधानसभेचे सन्माननीय अध्यक्ष आणि सन्माननीय सदस्य यांना आपलं निवेदन सादर केलं. विधेयकासंबंधीचे नवीन आक्षेप उपस्थित करत निवेदक म्हणाले :

या विधेयकामुळे अत्यंत द्वेषभाव निर्माण करणारा रंगभेद करण्यात आलेला आहे. ज्या देशांमध्ये निवडणूक पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था नाहीत त्या देशातील लोक या देशात कदाचित मतदार होऊ शकणार नाहीत. उलट युरोपमधील देशात अशा प्रकारच्या संस्था नसतानाही त्या देशातील लोकांना देशातील सामान्य निवडणूक कायद्यान्वये मतदान अधिकार मिळू शकतो.

यामुळे युरोपिअनेतर देशातील चारित्र्यहीन स्त्रियांची मुलं जर युरोपिअन वडिलांपासून झालेली असतील तर त्यांना मताधिकार राहील परंतु एखाद्या प्रतिष्ठित युरोपिअन स्त्रीनं

युरोपिअन वंश नसलेल्या प्रतिष्ठित माणसाशी विवाह करायचं ठरवल्यास तिच्या मुलांना वसाहतीच्या सर्वसामान्य मतदार कायद्यानुसार मात्र मताधिकार मिळणार नाही.

....ज्या पद्धतीनं भारतीयांना आपलं नाव मतदार सूचीत दाखल करून घेता येईल ती पद्धत भारतीय समजासाठी सतत असमाधानाचं कारण राहील व त्यामुळे पक्षपात करणारी व्यवस्था निर्माण होऊ शकेल आणि भारतीय समाजात गंभीर मतभेद निर्माण होतील.

याशिवाय हे विधेयक अशा रीतीनं तयार करण्यात आलेलं आहे की भारतीय समाजाला आपले अधिकार मिळवण्यासाठी अंतहीन कोर्टकचेऱ्यांची दारं ठोठवावी लागतील. पण आपल्या निवेदकांना वसाहतीतील न्यायालयांचा आधार घ्यायची वेळ येणार नये अशा प्रकारे आपणच त्याची व्याख्या करू शकता असा आपल्या निवेदकांचा विश्वास आहे.

याशिवाय सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विधेयकामुळे भारतीयांचा मतदान हक्क हिरावून घेऊ इच्छिणाऱ्या युरोपिअनांकडून भारतीय समाजाकडे आंदोलन वळेल व आपल्या निवेदकांना भीती वाटते की ते कायम राहील. भारतीयांना मतदान हक्क नसावा म्हणून आंदोलन करणाऱ्या युरोपिअन लोकांऐवजी मतदान अधिकाराची मागणी करणाऱ्या भारतीयांमध्ये असंतोष पसरेल आणि आपले निवेदक नम्रपणे आपल्याला सांगू इच्छितात की हा असंतोष कायम चिघळत राहील. (३४)

वाचनाच्या वेळी श्रीयुत वॅलेस यांनी निवेदन नियमानुसार आहे काय असा मुद्दा उपस्थित केला. अध्यक्षांनी त्यांना आपला मुद्दा स्पष्ट करायला सांगितलं असता ते म्हणाले की 'निवेदन व्याख्यानासारखं अधिक आहे, निवेदनासारखं कमी.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, सप्टेंबर ३०, १८९६] आक्षेप फेटाळण्यात आला. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी घोषणा केली की भारतीयांचं निवेदन मिळालेलं असल्यामुळे विधेयकाचं दुसरं वाचन पुढील आठवड्यापर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

जे काही टेबलवर ठेवण्यात आलेलं आहे तेवढ्याच याबाबतीतील संपूर्ण पत्रव्यवहार आहे काय असा श्रीयुत फेल यांनी प्रश्न विचारला. त्यामुळे प्रधानमंत्र्यांना

उत्तरात सांगणं भाग पडलं की 'हा संपूर्ण पत्रव्यवहार नाही. कारकुनांच्या चुकीमुळे तीन पत्र इथं ठेवण्यात आलेली नाहीत परंतु ती फारशी महत्त्वाची नाहीत.' [*नाताळ मर्क्युरी*, एप्रिल २९, १८९६ (नाताळ विटनेसही पहा मे १, १८९६)]

'विसरण्यात आलेल्या पत्रांसहित हा पत्रव्यवहार पूर्ण होतो काय?' श्रीयुत फेल यांनी परत प्रश्न विचारला. त्यांना सांगण्यात आलं की 'नाही, त्यामुळे तो पूर्ण होत नाही. परंतु याशिवाय जे काही घडलं ते गोपनीय स्वरूपाचं आहे.' [*नाताळ मर्क्युरी*, एप्रिल २९, १८९६ (नाताळ विटनेसही पहा मे १, १८९६)]

श्रीयुत फेल यांना सरकारी पक्षानं दिलेल्या उत्तरातून स्पष्ट झालं की सर्वत्र जो संशय व्यक्त करण्यात येत होता तो खरा होता. सभागृहासमोर संपूर्ण पत्रव्यवहार ठेवण्यात आलेला नव्हता. जुलै २, १८९४ला पारित झालेला कायदा राज्यपालांनी १६ जुलैला पुढं पाठवला होता. रोझबरी यांच्या सरकारनं जुलै १८९५पर्यंत राजिनामा दिलेला नव्हता. संपूर्ण वर्षभर रिपन गुपचुप बसून होते यावर क्वचितच विश्वास ठेवता येऊ शकत होता. सर जॉन रॉबिन्सन यांनी श्रीयुत टॅथॅम यांना दिलेल्या उत्तरात सांगितलं होतं की पुढील सत्रात सर्व पक्षांचं समाधान करू शकेल अशा प्रकारचं विधेयक सादर करता येईल अशी आशा आहे. लॉर्ड रिपन यांनी जर पूर्ण मौन धरलेलं असतं तर पुढील सत्रात नवीन विधेयकाची गरज पडू शकेल असा मंत्र्याला संशय निर्माण व्हायचं कारण तरी काय? श्रीयुत चेम्बर्लेन यांच्या पहिल्या पत्राची सुरुवातच अशी होती : 'फार मोठा बदल करायचं स्वरूप असलेल्या ह्या उपायावर अतिशय गंभीर आक्षेप येण्याची शक्यता आहे हे ऐकायची आपल्या मंत्र्यांची मानसिक तयारी नसेल असं नाही.' आपल्या जागी येणारा कोणती घोषणा करील याविषयी लॉर्ड रिपन यांनी नाताळ मंत्रिमंडळाची मानसिक तयारी केलेली असलीच पाहिजे. ज्या पत्रांनी ती तयारी केली होती तो पत्रव्यवहार कुठं आहे? नाताळ विटनेसनं विचारलं. नंतर त्यानं मत दिलं की :

'ज्या सरकारला लपवायचं असतं ते सरकार आपल्या इच्छेप्रमाणे कशालाही गोपनीय घोषित करू शकते. परंतु मंत्र्यांनीच जो विषय वसाहतीसाठी महत्त्वाचा आहे म्हणून मान्य केलं आहे त्या विषयावरील पत्रव्यवहाराचा काही भाग मागे राखून ठेवून.... त्यांनी संसदेबद्दलचा अविश्वास व्यक्त केला आहे आणि त्यातून संसदेवरील त्यांच्या अविश्वासाचं दर्शन होतं.... याची चीड यायला पाहिजे.' [नाताळ विटनेस, मे १, १८९६ नाताळ विटनेसनं केलेला अंधाज, संशय यासाठी असणारी कारणंही समर्थनीय होती. मंत्रिमंडळ जनतेपासून लॉर्ड रिपन याच्याकडून आलेली काही प्रतिकूल पत्र लपवत होतं. ही गोष्ट 'ब्रिटिश भारत संघटना, बंगाल'नं भारत सरकारला जे निवेदन दिलं होतं त्यातून उघड झाली. त्यात निवेदकांनी लॉर्ड रिपन वसाहत कार्यालयात असताना त्यांनी पाठवलेल्या विशेष खलित्यांचा उल्लेख करण्यात आलेला होता : 'सम्राज्ञींच्या सरकारची इच्छा आहे की सम्राज्ञींच्या भारतीय प्रजेला सम्राज्ञींच्या इतर सर्व प्रजेप्रमाणेच समतेची वागणूक देण्यात यावी.' (भारत सरकार रेकॉर्डस, फाईल क्रमांक १४/१८९७, महसूल आणि कृषी विभाग, नोव्हेंबर)] दडवण्यात आलेला पत्रव्यवहार कोणत्याच मार्गानं बाहेर येऊ शकत नसेल तर त्याची मागणी हाउस ऑफ कॉमन्समध्ये करायला पाहिजे.

याच वृत्तपत्रानं सुचवलं की 'चेम्बर्लेन यांना पाठवण्यात आलेल्या विधेयकाच्या मसुद्याप्रमाणे, अगदी तसंच' संसदेत सादर करण्यात आलेलं विधेयक आहे याचीही खात्री करून घ्यायला पाहिजे. दुसरं वाचन वारंवार स्थगित करण्यात आल्यामुळे या विषयाला हाताळायची शासनाची असमर्थता स्पष्टपणे दिसून पडते. सदस्यांना पत्रव्यवहार 'समजावून घेता यावा' म्हणून मागील स्थगिती देण्यात आली होती. 'तरीही काही मिनिटं आधीच तोच पत्रव्यवहार, ज्याला समजावून घेण्यासाठी एक आठवड्याचा अवधी देण्यात आला होता, फारसा महत्त्वाचा नाही असंही सांगण्यात आलं होतं. [वरीलप्रमाणे] विधेयकाच्या बाबतीत सम्राज्ञींच्या विधीज्ञांचा सल्ला घेतल्याचं त्या पत्रव्यवहारावरून कुठेच दिसून येत नाही. 'ज्या स्वरूपात विधेयक आहे त्या स्वरूपात वसाहतीसाठी ते धोकादायक आहे आणि सांसदीय आणि निवडलेल्या संस्थांवर तो स्पष्ट आघात आहे. [वरीलप्रमाणे]

अशा रीतीनं वातावरण संशयानं भारलेलं असताना आणि सर्व आशियायी लोकांना मतदानातून वगळलं जाईल अशा प्रकारच्या सर्वंकष विधेयकासाठी वसाहतीचे लोक

आरडाओरड करत असताना मंत्रिमंडळाला दुसऱ्या वाचनाच्या वेळी निर्णायक बहुमत मिळते की नाही याबद्दल संशय निर्माण झाला होता. पराभवाच्या भीतीनं सत्ताधारी गटाची सभागृहाच्या वाचनालयात 'अनौपचारिक पद्धतीनं चर्चा करण्यासाठी' ५ एप्रिलच्या दुपारी सभा झाली. [*नाताळ विटनेस*, मे ८, १८९६] परंतु अंदाजे अर्धा डझन दुराग्रही सदस्यांना 'त्याच्याशी काहीच कर्तव्य नव्हतं.' त्यांच्यापैकी एक श्रीयुत टॅथॅम होते. सारासार विचार करायच्या त्यांच्या असमर्थतेमुळे 'शहराचा तरुण सदस्य' म्हणून त्यांना टोपणनाव मिळालं होतं. [*नाताळ विटनेस*, मे ११, १८९६]

संकटाची चाहूल लागल्यानं सरकारनं आपल्या 'महान जोडतोड करणाऱ्या' श्रीयुत हॅरी एस्कॉम्ब यांना कामाला लावलं. कणा नसलेल्या राजकारण्यांची मतं बदलवायची त्यांची पद्धत 'आलंकारिक भाषेत म्हणायचं तर गळा पकडण्याची आणि धाकदपटशाची असायची.' [*नाताळ विटनेस*, मे ८, १८९६] अस्थिर आणि वाकड्या लोकांना सरळ करण्यात आलं. पराभवाची भीती टाळण्यात आली. [*नाताळ विटनेस*, मे ८, १८९६]

३

सगळ्यात शेवटी करण्यात आलेल्या दुरुस्तीसह मे ६ला विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाची सुरुवात झाली. दर्शकदीर्घा वार्ताहरांनी खचाखच भरलेली होती. एखाद्या मेलेल्या जनावराच्या देहावर तुटून पडण्यासाठी पक्षी जसे गोळा होतात तसे मतदान विधेयकाच्या कत्तलीचा दुरूनच वास आलेले वृत्तपत्र संपादक आणि अग्रलेख लिहिणारे लोक आणि तिथं गोळा झालेले होते. आठ प्रतिनिधींसह *नाताळ विटनेस* सर्वात पुढे होतं. उपस्थितांत 'अकाली प्रौढत्व आलेल्यांपासून आदरणीय वयोवृद्धांपर्यंत सर्व होते.' परंतु जनतेला मात्र यात फारसा रस नव्हता आणि संपूर्ण वादविवादाचा स्तर इतका कमी प्रतीचा होता की दर्शकदीर्घेत फारसे भाडेकरू नसल्यामुळे 'आमच्या विधानसभेचा नावलौकिक राखला गेल्याचं पाहून मला आनंद झाला' असं एक दर्शक म्हणाला. हाउस ऑफ कॉमन्सचा चाहता असलेला आणखी एक जण म्हणाला की मी 'निदान १० वेळा तरी झोपलो.'

दुपारी ३.३० वाजता मतदान विधेयकावर चर्चा सुरू झाली आणि बरोबर दोन तास ती चालली. प्रधानमंत्र्यांचं सुरुवातीचं भाषण ३० मिनिटं झालं. चर्चेच्या शेवटी त्यांनी दिलेलं उत्तर आणि महाधिवक्ता यांचं स्पष्टीकरण यासाठी अजून ३० मिनिटं लागली. उरलेला वेळ श्रीयुत बिन्स, बेल, ह्युलेट, स्माईथ, ओमीरा आणि बेन्स यांनी घेतला.

दुसऱ्या वाचनाचा प्रस्ताव मांडताना सर जॉन रॉबिन्सन म्हणाले की मागील विधेयक मान्य होऊ शकलं नाही कारण ते 'उघडउघड अतिशय बेपर्वाईचं' होतं. त्याशिवाय त्या विधेयकाद्वारे सम्राज्ञींच्या प्रजेतील विशिष्ट वर्गाला नाव घेऊन मतदान अधिकारापासून वगळण्यात आलं होतं '२० कोटी संख्येचा हा एवढा मोठा वर्ग आहे की त्याच्या हिताकडे सम्राज्ञींचं सरकार दुर्लक्ष करू शकत नाही.' दोन्ही विधेयकांचा हेतू एकच आहे आणि तो म्हणजे आशियायी लोकांना मतदारसूचीतून वगळणं. आपल्यासमोर असलेल्या या विधेयकाचा आवाका वास्तवात मागील विधेयकापेक्षाही 'अधिक व्यापक' आहे कारण याद्वारे एकाच वंशाच्या लोकांना वगळण्यात आलेलं नाही तर ज्या देशात निवडपद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था नसतील त्या देशातील पुरुषाच्या बाजूनं वंशपरंपरा असलेल्या व्यक्तींना अथवा आतापर्यंत मतदानाचा अधिकार नसणाऱ्या सर्वांना मतदानाच्या अधिकारापासून वगळण्यात आलेलं आहे.' (टाळ्या)

पंतप्रधानांनी सांगितलं की 'अतिशय स्पष्टपणे आणि तरीही मैत्रीपूर्ण पद्धतीनं, सलोख्याची तयारी ठेवून आणि तरीही कणखरपणे आपली भूमिका घेऊन' सम्राज्ञींच्या सरकारकडे आम्ही हा प्रश्न अशा रीतीनं मांडला की तो सोडवायची खरोखरच इच्छा असेल तर त्यांना आमची भूमिका मान्य करणं भाग पडावं. त्यामुळे आम्ही अशा प्रकारचं विधेयक तयार करायचा प्रयत्न केला की सम्राज्ञींच्या सरकारचा उद्देशही पूर्ण व्हावा आणि वसाहतीच्या हिताला यत्किंचितही धक्का लागू नये. आपल्यासमोर असलेलं विधेयक ह्या सर्व गरजा पूर्ण करणारं आहे.

हे विधेयक ईप्सित पूर्ण करण्यास असमर्थ ठरेल अशी अशुभाची भविष्यवाणी करणाऱ्या देवदूतांना त्यांनी आव्हान दिलं. भारतातील लोकांजवळ प्रातिनिधिक संस्था असल्याची गोष्ट वसाहत मंत्री आणि त्यांच्या तज्ज्ञांनी 'सपशेल फेटाळली आहे. तरीही काही संशय राहू नये म्हणून विधेयकाच्या दुसऱ्या कलमात 'निवडपद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था' या शब्दांनंतर 'मतदानावर आधारित' हे शब्द घालायची सरकारनं वसाहत मंत्र्यांना परवानगी मागितली आहे.

'सत्तेत असलेल्या कोणत्याही सरकारला सवलतीच्या कलमामुळे कितीही लोकांची नावं मतदार सूचीत टाकून मतदार सूचीवर आपलं प्राबल्य निर्माण करता येईल' असा जो आक्षेप घेण्यात आला होता त्या आक्षेपासंबंधी बोलताना ते म्हणाले की 'ही अशक्यप्राय गोष्ट आहे.' या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी भारतीयांच्या निवेदनाचा आधार दिला : वसाहतीत असणाऱ्या भारतीय मतांची संख्या इतकी कमी आहे की त्यांचा देशाच्या भवितव्यावर वा विधान मंडळांच्या निर्णयांवर कोणताच परिणाम होऊ शकणार नाही. उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांचं हे समर्पक उत्तर आहे. त्याशिवाय जनतेला जबाबदार असलेलं, युरोपिअन वंशाच्या लोकांनी निवडून दिलेलं शासन असताना आणि आशियायी लोकांना मतदानाचा अधिकार देण्यात येऊ नसे असं युरोपिअनांचं एकमत असताना,

जबाबदार सरकारनं असा काही प्रयत्न केल्यास मतदार उठाव करून एक होतील. वसाहतीच्या मतदार संघातील प्रत्येक गोरा मतदार खांद्याला खांदा लावून आणि एक होऊन उभा राहील व असा काही तो विरोध करील की असा प्रयत्न करणाऱ्या सरकारसाठी ती राजकीय आत्महत्याच ठरेल. (ऐका, ऐका) [*नाताळ मर्क्युरी*, मे ७, १८९६]

झुलूलँड वसाहतीला मिळावं म्हणून विधेयकाच्या बाबतीत सरकार सौदा करत आहे हा आरोप त्यांनी अतिशय संतप्त होऊन फेटाळून लावला. सभागृहासमोरील विधेयकाचा विचार सरकारनं केवळ त्याच्या गुणावगुणानुसार केला आहे असं त्यांचं म्हणणं होतं.

विधेयकाला ब्रिटिश सरकारकडून मान्यता न मिळाल्यास सरकार हेच विधेयक 'पुन्हा पुन्हा' मंजूर करील ही जी घोषणा त्यांनी दोन वर्षांपूर्वी केली होती तिला त्यांनी बगल दिली. हे विधान करताना आपल्याला 'सर्व तथ्यांची माहिती नव्हती' असं त्यांनी संपूर्ण शरणागती पत्करून मान्य केलं. 'तशा प्रकारच्या विधेयकाला मान्यता दिल्यामुळे साम्राज्याच्या सरकारसमोर ज्या अनंत अडचणी येऊ शकल्या असत्या त्यांची मंत्रिमंडळाला जाणीव झाली' असं ते पुढं म्हणाले.

आपल्यासमोर असलेलं विधेयक - ज्याला सम्राज्ञींच्या सरकारची जवळपास मान्यता मिळाल्यासारखीच आहे - मंजूर झाल्यास ताबडतोब अमलात येऊ शकेल. या संधीचा उपयोग न घेणं हा मूर्खपणाचा कळस ठरेल. पुढील वर्ष संपायच्या आधी सार्वत्रिक निवडणुका व्हायलाच पाहिजे. भारतीयांची मतदार सूचीत किती संख्या असेल ते आज आपल्याला माहीत नाही. अजून उशीर न करता 'या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन तो कायमचा संपवायची' वेळ आता आलेली आहे. हे विधेयक सम्राज्ञींच्या सरकारच्या कोणत्याही वर्गाला कलंकित करू इच्छीत नाही, परंतु ते मतदारसंघाची 'शुद्धता' मात्र कायम ठेवू इच्छिते.

काँग्रेसची जी एकाएकी वाढ झाली होती तिचा धसका घेतलेल्या युरोपिअन सदस्यांना अजूनच घाबरवायचा प्रयत्न करून त्याचा लाभ घ्यायचा प्रयत्न त्यांनी केला. 'ज्या वेगानं भारतीयांचं निवेदन तयार करण्यात आलं होतं आणि 'मोठ्या संख्येत निरक्षर लोकांनी' त्यावर सह्या केल्या होत्या त्यावरून आपल्यासमोर किती मोठा राजकीय धोका आहे ते दिसून येतं. धोका आणि दुर्दैव या दोघांशीही आपल्याला लढत द्यायची आहे' असं त्यांनी सांगितलं. ते म्हणाले की हे निवेदन गांधी या एकाच माणसाची निर्मिती आहे असं म्हणायच्या पातळीवर जरी मी जाणार नाही तरी ही निर्मिती भारतीय समाजाच्या 'अगदी लहानशा गटाची' आहे असं म्हणायला बराचसा आधार आहे 'आणि आतापेक्षा भारतीयांना मोठ्या प्रमाणात राजकीय अधिकार मिळाले

तर अशा प्रकारच्या संघटनेचा प्रभाव किती मोठा होऊ शकेल त्याची कल्पना करता येऊ शकते.' हाच मुद्दा घेऊन भाषणाचा शेवट करत ते म्हणाले :

सदस्यांना कदाचित या गोष्टीची जाणीव नसेल की या देशात अशी एक संघटना आहे की जी एका अर्थानं अतिशय सामर्थ्यशाली आहे, तिच्यात फार मोठं ऐक्य आहे व व्यावहारिक दृष्टीनं ती गुप्त संघटना आहे - मी भारतीय काँग्रेसबद्दल बोलतो आहे. ह्या संघटनेजवळ फार मोठा निधी आहे, त्या संघटनेच्या नेतृत्वपदी अतिशय सक्रिय आणि कार्यक्षम लोक आहेत, आणि राजकीय शक्तीचा उपयोग करून या वसाहतीच्या कारभाराला प्रभावित करायचा तिचा स्पष्ट उद्देश आहे.

[नाताळच्या भारतीयांचं जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, मे २२, १८९६, मुद्रित प्रतीच्या फोटो प्रतीवरून. (तिरपी अक्षरं माझी)]

सभागृहानं एकमतानं हे विधेयक मंजूर करावं म्हणून त्यांनी सदस्यांना विनंती केली. विधानसभेत 'एकमतानं, वा कमीत कमी फार मोठ्या बहुमतानं' जर विधेयक मंजूर झालं नाही तर 'अन्यत्र असा समज होईल' की हे विधेयक मंजूर करताना या विषयावर वसाहतीचं १८९४ साली जे मत होतं ते आता काही प्रमाणात बदललं आहे.

विधेयकाला विरोध करताना श्रीयुत बिन्स खेदपूर्वक म्हणाले की १८८३ सालच्या कायद्याप्रमाणे ज्या लोकांवरील प्रशासन विशेष कायद्याद्वारे करण्यात येत होतं वा ज्या लोकांसाठी खास न्यायालयं निर्माण करण्यात आली होती त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला नव्हता; परंतु प्रधानमंत्र्यांनी त्या कायद्याचा फायदा घेतलेला नाही. खास न्यायालयं रद्द करण्यात आलेली असल्यामुळे तो कायदा आता लागू होत नाही असा आक्षेप घेण्यात येतो. असं असल्यास कायद्याच्या शब्दात बदल करून ही समस्या सोडवता आली असती. आपल्यासमोर जे विधेयक आहे त्यात गृहीत धरण्यात आलेलं आहे की भारतात प्रातिनिधिक संस्था नाहीत, सांसदीय संस्था नाहीत, आणि निवडणुकीची कोणतीही तत्त्व अमलात नाहीत. परंतु वसाहत मंत्र्यांनी जरी ठासून सांगितलं असलं तरी ते सत्य नाकारू शकत नाहीत. प्रकरणं आणि कविता उद्धृत करत त्यांनी दाखवलं की ह्या तत्त्वांना भारतात मान्यता मिळालेली आहे व सांसदीय

पद्धतीही तिथं अस्तित्वात आहे. 'सन्माननीय सदस्यांनी शब्दकोशात आणि कायद्याच्या पुस्तकात 'मतदान' शब्दाचा अर्थ पाहिला तर ते अतिशय आश्चर्यचकित होतील.' [*नाताळ विटनेस*, मे ७, १८९६]

इंग्लंड आणि नाताळमध्ये जशा प्रकारचा मताधिकार आहे तशा प्रकारचा संपूर्ण मताधिकार भारतात नाही अशा प्रकारचा आक्षेप आपल्या मुद्यावर येऊ शकेल याची आधीच कल्पना करत त्यांनी सदस्यांना आठवण करून दिली की 'निवडणुकीचं तत्त्वही तसंच आहे आणि संसदही तशीच आहे' आणि म्हणून विधेयक चूक आहे. 'त्यामध्ये चुकीची वस्तुस्थिती मांडण्यात आली आहे व त्यामुळे आपल्याला अंतहीन खटलेबाजीत, अडचणीत आणि संकटात पडावं लागेल.' या दुसऱ्या वाचनाच्या बाजूनं मतदान करायला मी असमर्थ आहे.

उत्तर देताना महाधिवक्त्यांनी मान्य केलं की १८८३च्या कायद्यातील 'अथवा न्यायाधिकरण' हे शब्द वगळण्यात आल्यास नवीन विधेयकाची काहीच गरज राहिली नसती. परंतु असं केल्यामुळे पळवाटेचा आम्ही आधार घेतला असं वाटलं असतं. आमची उघडपणे, दिवसाढवळ्या काम करायची इच्छा आहे. त्यांचं म्हणणं होतं की सुशिक्षित आणि कर्तृत्वसंपन्न भारतीयांचा मतदान सूचीत समावेश करायची आवश्यकता होती. परंतु कोणत्याही नवीन माणसाला गव्हर्नर इन कौन्सिलच्या परवानगीशिवाय मतदार सूचीत प्रवेश मिळू शकत नाही. याचा अर्थ असा आहे की यासाठी मंत्रिमंडळावर जबाबदारी टाकण्यात आलेली आहे आणि कोणत्याही मंत्रिमंडळानं विशिष्ट वर्गाच्या लोकांची नावं मतदान सूचीत घालून तिच्यात बदल करून मतदार संघावर परिणाम करायचा प्रयत्न केला तर ते मंत्रिमंडळ एक पंधरवडाही सत्तेवर राहणार नाही. श्रीयुत बिन्स यांनी भारतातील मतदान अधिकाराबद्दल जे उद्गार काढले त्याबद्दल बोलताना ते म्हणाले की भारतात मतदान अधिकार आहे हे मला मान्य आहे परंतु भारतात 'निवडपद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था' आहेत ही गोष्ट मात्र त्यांनी पूर्णपणे फेटाळून लावली.

मतदान अधिकार म्हणजे 'स्वातंत्र्य असा अर्थ जगात सर्वत्र समजण्यात येतो.' [*नाताळ विटनेस*, मे ७, १८९६]

श्रीयुत बेल यांनी श्रीयुत बिन्स यांना पाठिंबा दिला. ते म्हणाले की माझ्या मते ' 'मतदान अधिकार' या शब्दाचा अर्थ महाधिवक्ता म्हणतात तेवढा मर्यादित नाही. या विधेयकामुळे खटलेबाजीला सुरुवात होईल, शत्रुत्वाची भावना निर्माण होईल आणि भारतीयांमध्येही क्षोभ निर्माण होईल.' त्याशिवाय या विधेयकामुळे प्रिव्ही कौन्सिलकडे जाणाऱ्या तक्रारी वाढतील आणि सभागृहातील गोऱ्या लोकांचं सदस्यत्वही धोक्यात येईल.

अगदीच भाकरी नसण्यापेक्षा अर्धी भाकरी बरी या जुन्या वाक्प्रचाराची आठवण करून देत श्रीयुत स्माईथ म्हणाले की आपण दुसऱ्या वाचनाला पाठिंबा द्यायला पाहिजे.

श्रीयुत बेन्स यांनी विधेयकाच्या विरुद्ध भाषण दिलं आणि ते 'अपुरं आणि संशयास्पद' असल्याचं सांगितलं. प्रधानमंत्र्यांनी वादाला उत्तर दिल्यानंतर दुसऱ्या वाचनाला पाठिंबा देणारा ठराव मतदानाला टाकण्यात आला. 'नाही'चे काही आवाज आले परंतु श्रीयुत बेन्स यांच्या नाहीच्या आवाजाखाली ते सर्व दबून गेले. ठराव मतविभाजन न होता मान्य करण्यात आला व श्रीयुत बेन्स यांनी एकट्यांनी विरोधी मत नोंदवलं. नंतर ५.२५ वाजता सभागृह स्थगित करण्यात आलं. [*नाताळ मर्क्युरी*, मे ७, १८९६]

प्रधानमंत्र्यांच्या भाषणावर टिप्पणी करत नाताळ विटनेसनं धाष्टर्य करून विचारलं की विधेयकाच्या मसुद्यात प्रातिनिधिक संस्था या शब्दाच्या ठिकाणी सांसदीय संस्था हा शब्द आला असता तर विधेयक जास्त फटकळ झालं असतं काय? [*नाताळ विटनेस*, मे ८, १८९६]

मे १८, १८९६ला विधेयक दोन्ही सदनांच्या समित्यांकडे पाठवण्यात आलं. सर जॉन रॉबिन्सन यांनी सांगितलं की दुसऱ्या वाचनाच्या वेळी सूचित केल्याप्रमाणे ब्रिटिश सरकारची समजूत घालण्यात आली आहे आणि विधेयकात दुरुस्ती करण्यात आलेली आहे व आता हे

विधेयक पूर्णपणे व सर्वप्रकारे आपल्या उद्देशाची परिपूर्ती करणारं झालं आहे. दुप्पट खात्री करून घेण्यासाठी 'निवडणुकीच्या पद्धतीवरील प्रातिनिधिक संस्था नाहीत' या शब्दांच्या आधी 'सांसदीय मतदान पद्धतीवर आधारित' हे शब्द टाकण्यासाठी आम्ही सम्राज्ञींच्या सरकारची मान्यता मिळवली आहे. त्यामुळे विधेयकाचा दुरुस्त करण्यात आलेला भाग आता असा होईल: 'ज्या रहिवाशांच्या देशात सांसदीय मतदान पद्धतीवर आधारित निवडणुकीच्या पद्धतीवरील प्रातिनिधिक संस्था नाहीत त्या देशातील लोक मतदार सूचीत आपली नावं दाखल करून घ्यायला पात्र नसतील.' [*नाताळ मर्क्युरी*, मे १४, १८९६] त्यांच्या वक्तव्याचं जोरदार टाळ्यांनी स्वागत करण्यात आलं.

दुसऱ्या कलमातील सवलतीच्या परिच्छेदातील 'आतापर्यंत' या शब्दावर जोरदार वाद झाला.

डरबन शहराचे सदस्य श्रीयुत ल्युकार्स यांनी 'आतापर्यंत' या शब्दाऐवजी 'हा कायदा व्हायच्या आधी' हे शब्द विधेयकात घालण्यात यावे अशी एक उपसूचना मांडली. उपसूचनेला पाठिंबा देत श्रीयुत मेडन म्हणाले की विधेयक जसं आहे तशा स्वरूपात त्याचा असा अर्थ लावता येऊ शकेल की नाताळमध्ये वास्तव्य करणारे लोक सोडून इतर कोणत्याही देशातून आलेल्या लोकांसाठी नाताळमधील न्यायालयांमध्ये हा प्रश्न विचारार्थ यायच्या तारखेपर्यंत ज्या रहिवाशांना मतदानाचा अधिकार नसेल त्यांचा मतदान अधिकार काढू घेण्यात यावा, उलटपक्षी विधेयकाचा अर्थ असा व्हायला पाहिजे की हा प्रश्न विचारार्थ येईपर्यंत सांसदीय मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतर अशा प्रकारच्या देशातील कोणत्याही रहिवाशाचा मतदान अधिकार काढून घेण्यात येऊ नये व त्यामुळे त्याला नाताळमध्ये मतदानाचा अधिकार असावा. अशा परिस्थितीत हा प्रश्न 'सभागृहाच्या हेतूवर अवलंबून राहणार नाही, या विधेयकासाठी जबाबदार असणाऱ्या मंत्र्यांच्या हेतूवर तो अवलंबून राहणार नाही, एवढंच नाही तर वसाहत मंत्र्यांच्या हेतूवरही तो अवलंबून राहणार नाही.... तर या प्रकरणी न्याय देणाऱ्या न्यायाधीशासाठी

निःसंदिग्धपणा हाच न्यायाचा एकमेव आधार असायला पाहिजे आणि त्याच्या मनातून विधानसभेचा हेतूच नव्हे तर समतेचा विचारही निघून जायला पाहिजे.' [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, मे १४, १८९६] न्यायालयाचा निर्णय कायद्यातील प्रावधानाप्रमाणेच व्हायला पाहिजे.

पुढं जात भारतीयांना सांसदीय मतदान अधिकार मिळायच्या संबंधातील विधेयकाची शब्दरचना करताना कोणतीही चूक राहिल्यास त्या विधेयकातील तरतुदीचा अन्वयार्थ लावताना भारतीयांना सांसदीय मतदान अधिकार मिळायची शक्यता श्रीयुत मेडन यांनी ध्वनित केली. ते म्हणाले की विधेयकात काही पळवाट राहिल्यास तिचा पूर्ण लाभ घ्यायचा प्रयत्न संपूर्ण भारतीय समाज जरी नाही तरी त्यांचं नेतृत्व करणारा माणूस

....ज्याचा उल्लेख या विधेयकाची चर्चा करताना एकाहून अधिक वेळा झाला आहे. तो अतिशय हुशार, फारसा विधिनिषेध नसलेला आणि अतिशय महत्त्वाकांक्षी आहे. आपल्या लोकांना मतदान अधिकार मिळवून देण्यासाठी इंच-इंच झगडणं या नेत्याला फार जमलेलं आहे व आपल्या लोकांना मतदान अधिकाराचं सामर्थ्य मिळवून देण्यासाठी तो यापुढेही प्रयत्न करत राहील व तो अधिकार त्यांना मिळवून देण्यात या माणसाला यश आल्यास ह्या माणसाला फार मोठा मोठेपणा मिळेल... हा प्रश्न विधानसभेसमोर आला आहे तेव्हा पासून कौशल्य, हुशारी, उपलब्ध साधनं यांच्या आधारानं तो जरी आमच्याविरुद्ध व्यूहरचना करत असला तरी त्याचं कौतुक करायला आपल्याला त्यानं भाग पाडलं आहे. अशा प्रकारचा विरोधक समोर उभा असताना एखादी पळवाट राहू देणं उचित होईल काय हे मी तुम्हाला विचारू इच्छितो. [*नाताळ अॅडव्हरटाईझर*, मे १४, १८९६]

श्रीयुत मेडन पुढं म्हणाले की या वा अशा प्रकारच्या विधेयकाविरुद्ध कठोर संघर्ष करण्यासाठी हा माणूस काही काळापासून साधनसामुग्री जमवत आहे. त्याच्याजवळ साधनसामुग्री आहे. भारतीय काँग्रेसजवळ भरपूर निधी आहे. त्यामुळे आपण अतिशय काळजी घ्यायला पाहिजे.

प्रधानमंत्र्यांनी उत्तर देताना स्पष्ट केलं की हे विधेयक ब्रिटिश सरकार आणि आपल्यात झालेल्या कराराच्या स्वरूपाचं आहे. त्यामुळे या प्रश्नासंबंधी ब्रिटिश सरकारनं दिलेल्या आश्वासनानंतर त्यांच्यासमोर हा प्रश्न पुन्हा उपस्थित करणं उचित होणार नाही. श्रीयुत मेडन यांनी भारतीय समाजाच्या 'कार्यक्षम, हुशार आणि प्रभावी' माणसावर अतिशय भर दिला आहे. माझ्या मते श्रीयुत मेडन यांनी 'या सद्‌गृहस्थांना फार महत्त्व दिलेलं आहे.'

श्रीयुत बिन्स, बेन्स आणि सायमन्स यांनी दुरुस्तीला पाठिंबा दिल्यानंतर आणि बेल यांनी तिला विरोध केल्यानंतर प्रधानमंत्र्यांनी मध्येच हस्तक्षेप करत सभागृहाला सांगितलं की या विधेयकातील शब्दरचनेच्या समर्थनार्थ दिलेल्या कारणांशिवाय सदस्यांनी लक्षात घ्यावं की या विधेयकाला वसाहत मंत्र्यांनी संमती तर दिलेलीच आहे पण त्याचबरोबर सम्राज्ञींच्या सरकारच्या 'प्रख्यात अनुभवी विधिज्ञांनी' दिलेल्या सल्ल्याप्रमाणेही हे विधेयक आहे.

यामुळे श्रीयुत मेडन यांचे पाय जमिनीला लागले. ते म्हणाले की सम्राज्ञींच्या सरकारच्या 'प्रख्यात अनुभवी विधिज्ञांबद्दल' मला संपूर्ण आदर आहे. परंतु त्यांचं मत पाहायचं भाग्यही मला मिळालेलं नाही. परंतु तरीही नम्रपणे मी म्हणेन की या कलमाचा अर्थ आपल्याकडून लागणार नाही. चुकीची अर्थ लावला जायची आशंका दूर व्हावी म्हणून काहीसा संशयास्पद आशय असलेला 'आतापर्यंत' हा शब्द वगळणारी दुरुस्ती मी सुचवलेली आहे. [*नाताळ मक्युरी*, मे १४, १८९६]

श्रीयुत मेडन यांच्या टोमण्याला कोणतंच उत्तर देण्यात आलं नाही. पुढील काही चर्चेनंतर दुरुस्ती मतदानासाठी टाकण्यात आली व ती २३ विरुद्ध ९ मतांनी फेटाळण्यात आली.

त्यानंतर उमव्होट येथील सायमन्स या सदस्यांनी कलम ३ हे 'इंग्रजी परंपरेनुसार नाही आणि 'घटनाविरोधी' आहे असं सांगून सवलतीचं कलम रद्द करावं अशी दुरुस्ती सुचवली.

श्रीयुत बेल यांचं मत होतं की या कलमानुसार गव्हर्नर इन कौन्सिलला देण्यात आलेल्या अधिकारांचा चातुर्यानं उपयोग केला जाईल. पण त्यांचं म्हणणं होतं की आपण केवळ एकाच

सरकारसाठी हा कायदा करत नाही तर अनेक भविष्यकालीन सरकारांसाठीही आपण हा कायदा करत आहोत.

दुरुस्ती सूचनेला श्रीयुत बिन्स यांनी पाठिंबा दिल्यानंतर आणि श्रीयुत टॅथॅम यांनी विरोध केल्यानंतर श्रीयुत आर्चिबाल्ड बोलले. ते म्हणाले की सभागृहानं हे लक्षात ठेवावं की विधेयकात कोणताही बदल करण्यात आल्यास ते परत सम्राज्ञींच्या सरकारकडे पाठवावं लागेल व त्यामुळे फार मोठी गैरसोय निर्माण होईल.

सरकार नेहमीच सामर्थ्यसंपन्न असेल असं नाही आणि दुबळं सरकार सत्तेत आल्यास त्याला 'या कलमाचा लाभ घ्यायचा मोह होऊ शकेल' अशी श्रीयुत बेल यांना वाटणारी भीती श्रीयुत मेडॉन यांनाही उचित वाटली. परंतु ते म्हणाले की असं असूनही संपूर्ण भाकरी गमावण्यापेक्षा अर्धी भाकरी बरी या श्रीयुत स्माईथ यांच्या म्हणण्याप्रमाणे मी विधेयकाला पाठिंबा देणार आहे.

श्रीयुत स्माईथ यांनी सभागृहाला आठवण करून दिली की हे विधेयक एक तडजोड आहे आणि यात काही संशय नाही की ब्रिटिश सरकारनं सौदेबाजीत मिळवलेलं हे सवलतीचं कलम आहे. जर आपण हे कलम विधेयकातून काढून टाकलं तर त्यामुळे विधेयकाचा मृत्यू होईल.

२८ होय आणि ३ नाही अशा बहुमतानं कलम मंजूर करण्यात आलं (श्रीयुत बेल, बेन्स आणि सायमन्स). त्यानंतर विधेयक समितीच्या पातळीवरून पुढं गेलं. [*नाताळ मर्क्युरी*, मे १४, १८९६] सभागृहानं त्याच दिवशी त्याचं तिसरं वाचनही उरकवलं. [नाताळच्या भारतीयांचं जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, मे २२, १८९६, मुद्रित प्रतीच्या फोटो प्रतीवरून. (तिरपी अक्षरं माझी)] दोन दिवसांनंतर ते परिषदेकडे पाठवण्यात आलं. तिथं महाधिवक्त्यांनी कलमातील तरतुदी स्पष्ट करून सांगितल्यानंतर आणि स्थगन प्रस्ताव मागं घेण्यात आल्यानंतर दुसऱ्या वाचनाला मंजुरी देण्यात आली. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १५, १८९६]

बाकी सर्व सुरळीत पार पडलं. विरोधकावर डावपेचात मात करण्यात आली होती. आपल्याच उन्मादानं खोदलेल्या खड्यात पडल्यामुळे काल्पनिक गोष्टींना घाबरायची त्यांची प्रवृत्ती झालेली होती. दिसू शकणाऱ्या काळात तरी दक्षिण आफ्रिकी संघराज्याचा प्रश्न कायमचा संपलेला होता. लाल कापडामुळे बैलांना मिळणाऱ्या चिथावणीप्रमाणे त्याच्या पूर्वीच्या पुरस्कर्त्यांना तो चिथावत होता तर काहींना ती अव्यवहार्य कल्पना वाटत होती.

समितीच्या पातळीवरून गेल्यानंतर व विधानपरिषदेत विधेयकाचं तिसरं वाचन झाल्यानंतर नवीन मतदानविधेयक राज्यपालांनी वसाहतीच्या सचिवांकडे सम्राज्ञींच्या मान्यतेसाठी पाठवलं. श्रीयुत चेम्बर्लेन यांनी इंग्लंडमधील आपल्या ब्रिटिश आणि भारतीय मित्रांना दिलेल्या आश्वासनामुळे १८९४च्या विधेयकाप्रमाणे याही विधेयकाला मान्यता देऊ नये असा सम्राज्ञीला सल्ला देतील असंच भारतीय समुदायाला वाटत होतं व त्यामुळे भारतीय समुदायानं अजूनही आशा सोडलेली नव्हती.

मतदान विधेयकाच्या चर्चेबरोबरच एक वेगळंच उपाख्यान सुरू झालेलं होतं. सर जॉन रॉबिन्सन यांनी 'भारतीय काँग्रेसबद्दल जवळपास गुप्त संघटना' असा उल्लेख केला होता. 'दगड मारायच्या' खटल्याच्या दरम्यान कॅप्टन ल्युकास यांनी हाणलेल्या ताशेऱ्यांनंतर नाताळच्या वृत्तपत्रात महिनोगणती घनघोर वाद चालला होता. त्यानंतरही ते असा शेरा ते कसा काय मारू शकत होते? त्यांच्या स्वतःच्या वृत्तपत्रानंही त्या आरोपाबद्दल तक्रार केली होती. गांधीजींनी त्या वक्तव्याला आव्हान दिलं.

गांधीजी आदरणीय प्रधानमंत्र्यांना

डरबन, मे १६, १८९६

आपण दिलेल्या व्याख्यानातील तो उतारा बरोबर उद्धृत करण्यात आलेला आहे काय हे विचारायचं साहस मी करू शकतो काय? आणि तसं असल्यास 'काँग्रेस ही जवळपास गुप्त

संघटना आहे' अशा प्रकारचा विश्वास ठेवण्यासारखी पुरेशी कारणं आहेत काय? अशा प्रकारची संघटना तयार करायचा जेव्हा विचार झाला तेव्हा त्याला वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्यात आली होती आणि वास्तवात जेव्हा ती स्थापन झाली तेव्हा तिच्या स्थापनेकडे नाताळ विटनेसचं लक्ष गेलं होतं, तिचे वार्षिक अहवाल आणि सदस्यांची सूची वृत्तपत्रांना पुरवण्यात आली होती व त्यावर वृत्तपत्रातून टिप्पणीही आली होती, आणि ही कागदपत्रं काँग्रेसचा मानद सचिव म्हणून मी शासनाकडे पाठवली होती याकडे आपलं लक्ष वेधायची परवानगी आपण मला द्यावी. [साबरमती संग्रहालयातील फोटोप्रत क्रमांक ९८४ वरून]

सी. बर्ड, मुख्य सहाय्यक सचिव गांधीजींना

डरबन, मे १६, १८९६

प्रधानमंत्र्यांना या महिन्याच्या १४ तारखेला लिहिलेल्या पत्राचं उत्तर मी देत आहे.... सर जॉन रॉबिन्सन यांनी मला कळवायला सांगितलं आहे की काँग्रेसचा उल्लेख त्यांनी जेव्हा जवळपास गुप्त राजकीय संघटना असा जेव्हा केला होता तेव्हा त्यांचा असा समज होता की काँग्रेसच्या सभांना जनतेला व वृत्तपत्रांना उपस्थित राहायची परवानगी नसते.

प्रधानमंत्र्यांना या मुद्याची जर चुकीची माहिती असेल तर ती चूक दुरुस्त करण्यात त्यांना आनंद वाटेल हे आपल्याला कळवायला मला आनंद वाटतो. [साबरमती संग्रहालयातील फोटोप्रत क्रमांक १३२ वरून]

गांधीजी माननीय सी. बर्ड यांना

डरबन, मे १८, १८९६

या विषयासंबंधी मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की काँग्रेसच्या सभा नेहमी उघडपणे होत असतात व त्यांना वृत्तपत्रांना आणि वार्ताहरांना उपस्थित राहायची परवानगी असते. ज्या युरोपिअन सद्गृहस्थांना काँग्रेसच्या सभांमध्ये स्वारस्य असेल असं काँग्रेसला वाटलं होतं त्यांनाही त्या सभांची विशेष निमंत्रणं पाठवण्यात आली होती. एका

सद्गृहस्थांनी निमंत्रणाचा स्वीकार केला होता व काँग्रेसच्या सभेला ते उपस्थितही राहिले होते. निमंत्रित नसलेले काही सद्गृहस्थही काँग्रेसच्या सभेत एक दोनदा उपस्थित राहिलेले आहेत.

काँग्रेसच्या एका नियमाप्रमाणे युरोपिअनांना काँग्रेसचा उपाध्यक्ष होण्यासाठी निमंत्रित करता येतं. त्यानुसार दोन सद्गृहस्थांना आपण हे पद स्वीकाराल काय असंही विचारण्यात आलं होतं परंतु ते काम करायची त्यांची तयारी नव्हती. काँग्रेसच्या कार्यवाहीचा वृत्तांत नियमितपणे ठेवण्यात येत असतो. [साबरमती संग्रहालयातील प्रती वरून]

मे २०ला सर जॉन रॉबिन्सन यांनी संसदेत एक वक्तव्य देताना सांगितलं की मला एक स्पष्टीकरण द्यायचं आहे. भारतीय मतदान विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाचा प्रस्ताव मांडताना मी भारतीय काँग्रेसचा उल्लेख 'जवळपास गुप्त संघटना' असा केला होता. त्यावेळी माझा असा विश्वास होता की तिच्या सभांना सर्वांना उपस्थित राहायची परवानगी नसते. परंतु त्याच वेळी मी हेही सांगितलं होतं की माझी माहिती चुकीची असेल तर ती दुरुस्त करण्यात मला आनंदच होईल. त्यानंतर संघटनेच्या सचिवांकडून मला पत्र आलं आहे व त्यांनी मला कळवलं आहे की काँग्रेसच्या कार्यवाहीबद्दलची माझी माहिती चुकीची आहे. त्यानंतर वक्तव्याची दुरुस्ती करताना त्यांनी त्यासंबंधातील पत्रव्यवहार सभागृहासमोर ठेवला. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे २३, १८९६]

पुन्हा एकदा काँग्रेस निष्कलंकपणे सत्त्वपरीक्षेतून बाहेर पडली. सर्व गोष्टींचा सामग्र्यानं विचार करता असं वाटतं की पळापळ करणाऱ्या नाताळ विधान सभेच्या अस्थिर सदस्यांना थांबवण्यासाठी व भारतीय मतदान विधेयकाचं भवितव्य अनिश्चित दिसत असताना सरकारकडून सदस्यांना मतदान करायला लावण्यासाठी योजिलेली युक्ती म्हणून प्रधानमंत्र्यांनी दिशाभूल करणारं ते वक्तव्य केलेलं होतं व त्याचं कार्य झाल्यानंतर त्यांनी ते मागं घेतलं. सर जॉन रॉबिन्सन यांनी चुकीची दिलेली कबुली गांधीजींनी शब्दशः स्वीकारली. विरोधकाच्या शब्दाचा आणि वर्तनाचा शक्य तेवढा चांगला अर्थ घेऊन सत्याशी सुसंगत असा त्यावर विश्वास ठेवणं हा गांधीजींच्या स्वभावाचा एक अविभाज्य भागच झालेला होता. यानंतर परस्परांच्या

गुणांबद्दल आदरभाव आणि एकमेकांच्या प्रामाणिकपणावर आधारित विश्वासाचे संबंध त्यांच्यात निर्माण झाले व सर जॉन पदावरून निवृत्त झाल्यानंतरही ते सुरू राहिले. त्यांच्यात अधूनमधून प्रेमाचा पत्रव्यवहार सुरू असायचा. गांधीजींनी वसाहतीची, साम्राज्याची जी सेवा केली त्याबद्दल त्यांनी गांधीजींचं जाहीर कौतुक केलं होतं आणि त्यांचे आभारही मानले होते.

४

मतदान विधेयकावरील वादाचा एकूण विचार करता तो मंत्रिमंडळाचा नैतिक पराभव आहे असं समजलं जात होतं. विधेयक 'तांत्रिक बहुमतानं मंजूर झालं होतं. मतदानावर आधारित आणि अखेरीस 'सांसदीय मतदानावार आधारित' या शब्दांचा विधेयकात जो समावेश करण्यात आला होता तो भारतीयांच्या निवेदनाचा विजय होता. श्रीयुत बिन्स आणि बेल यांनी जे आक्षेप घेतले होते त्या विरोधात आणि विधेयकाच्या समर्थनार्थ महाधिवक्त्यांना एकाही तज्ज्ञ व्यक्तीची साक्ष देता आली नाही. गोऱ्या लोकांची सर्वसाधारण धारणा होती की विधेयकामुळे 'आशियायी मता'चा धोका कमी तर झाला नाहीच उलट त्यामुळे, त्यांच्या दृष्टिकोनातून, वसाहतीची परिस्थिती पूर्वीपेक्षाही अधिक 'संकटग्रस्त' झाली होती. 'दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक ब्रिटिश माणसाला आवाहन' म्हणून गांधीजींनी भारतीयांच्यावतीनं जे निवेदन तयार केलं होतं त्याचा आपल्या टीकाकारांना उत्तर देताना प्रधानमंत्र्यांना आधार घ्यावा लागला होता. ते 'आवाहन' जर बरोबर असेल तर हे विधेयक चुकीचं होतं.

*नाताळ ॲडव्हरटाईझर*चं म्हणणं होतं की नवीन उपाय 'दुटप्पीपणाचा' आहे. विशेष कायद्याच्या आणि विशेष न्यायालयांच्या कक्षेत येणाऱ्या सर्वांना मतदान अधिकारापासून वंचित करणाऱ्या १८८३च्या कायद्याची मदत न घ्यायचं कारण सांगताना महाधिवक्ता म्हणाले होते की मंत्रिमंडळाला 'पळवाटेनं' आपला हेतू साध्य करायची इच्छा नव्हती. त्यावर *नाताळ ॲडव्हरटाईझर*नं विचारलं की सध्याचं विधेयक पळवाट नाही तर काय आहे? जी गोष्ट मागील विधेयकानं साध्य करता येऊ शकली नव्हती ती गुपचुप आणि पळवाटेनं करायचा हा संपूर्ण

प्रयत्न आहे.' प्रधानमंत्र्यांनी मान्य केलं होतं की मागील उपाय 'अतिशय बेपर्वाईचा' होता व त्याच कारणामुळे त्यात अपयश आलं होतं. परंतु त्यांनी असंही सांगितलं होतं की नवीन विधेयकाचा हेतूही अगदी पूर्वीच्या 'बेपर्वाई'च्या विधेयकासारखाच आहे. वेगळ्या शब्दात सांगायचं तर यातील हेतू प्रामाणिकपणानं आणि स्पष्ट शब्दात सांगण्यात आलेला नाही. 'विरोध होऊ नये अशा मार्गानं जी गोष्ट साध्य करणं शक्य नव्हतं ती गोष्ट गुपचुप आणि पळवाटेनं साध्य करायचा प्रयत्न यात करण्यात आलेला आहे.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे ८, १८९६]

विधेयकाच्या 'दुटप्पीपणाचं' दुसरं उदाहरण आहे सवलतीचं कलम. 'अधूनमधून सवलतीच्या कलमाचा उपयोग करण्यात येईल, कदाचित अतिशय कमी वेळाही – परंतु उपयोग करण्यात येईल' असा सम्राज्ञींच्या सरकारचा समज व्हावा या हेतूनं या कलमाचा समावेश विधेयकात करण्यात आला होता हे स्पष्ट आहे. तरीही महाधिवक्त्यांनी विधानसभेत यासंबंधी जे वक्तव्य दिलं होतं त्याला जर काही अर्थ असेल तर मंत्रिमंडळाचा सवलतीच्या कलमाचा उपयोग करायचा कोणताही हेतू नाही. मग त्याचा विधेयकात का समावेश करण्यात आला आहे? 'उपाययोजनेत अशा प्रकारची तरतुद करायची की जी सादर करतानाच ती मृत अक्षरासारखी आहे असं योजना करणारांनीच जाहीर करावं..... 'यातून ढोंगाच्या वा कमीतकमी 'पळवाटेच्या' प्रवृत्तीचं दर्शन होत नाही काय?' *नाताळ ॲडव्हरटाईझर*नं सूचित केलं की 'या विधेयकाच्या प्रत्येक ओळीत युरोपिअन आणि भारतीयांमधील मतदान अधिकारासंबंधीचा वाद दबा धरून बसलेला आहे. तो एखाद्या दिवशी बाहेर पडेल आणि वर्षानुवर्ष कटुता वाढवील.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे ८, १८९६]

*नाताळ विटनेसन*या विधेयकाचं वर्णन असं केलं : 'या विधेयकाबद्दल अनेक महत्त्वाच्या सदस्यांना अविश्वास वाटतो, तत्त्वांशी केलेली ही तडजोड आहे असे वाटते, आणि ह्या तडजोडीचा विशेष परिणाम होणार नाही असेदेखील त्यांना जाणवते. तसंच विधानसभेच्या अधिकारावर अतिशय भयानक पद्धतीनं आक्रमण करणारं हे विधेयक आहे आणि घटनात्मक तत्त्वावरही ते

हल्ला करणारं आहे. महान घटनात्मक सिद्धान्तांचा एकदा भंग करून त्यात दरी निर्माण केली की मग तो भंग कितीही का लहान असेना – सत्तेची हाव असणारं सरकार ही दरी रुंद करायचा धोका नेहमीच असतो.' [*नाताळ विटनेस*, मे १५, १८९६] विधेयकात अनेक विसंगती आहेत आणि अनेक प्रश्न त्यात अनुत्तरित राहिलेले आहेत. उदाहरणार्थ :

अ) त्यामुळे युरोपिअन आईवडिलांच्या ज्या मुलांचा जन्म भारतात झालेला असेल त्यांना मतदानाचा अधिकार मिळणार नाही. उलट न्युझिलंडमधील माओरी, आणि जमेका आणि वेस्ट इंडीजच्या बेटांमधील निग्रोंना तसंच ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या उत्तर अमेरिकेत जन्म घेतलेल्या निग्रोना मताधिकार मिळेल.

ब) असं सांगण्यात आलं आहे की तुर्कस्तानच्या मुसलमान प्रजेचा या निर्बंधात समावेश होईल. परंतु हे सत्य नाही काय की तुर्कस्तानच्या सध्याच्या सुलतानांनी १८७६मध्येच संसदेला मंजुरी दिली होती? १८७८ साली ती घटना 'तात्पुरती' स्थगित करण्यात आली परंतु मागे कधीच घेण्यात आलेली नाही. इजिप्तमध्ये विधानसभा आणि विधानपरिषद आहे. तुर्कस्तान आणि इजिप्तमधील नागरिक नाताळमध्ये मताधिकार मिळवायला पात्र आहेत काय?

क) मॉरिशस, जमेका, हाँगकाँग आणि एवढंच नाही तर भारतातही विधानपरिषदेचे जे कायदे करण्यात आलेले आहेत त्यानुसार तिथल्या संस्था निवडणुकीच्या पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था आहेत काय?

ड) पुन्हा समजा की भारतात जन्मलेल्या मुलांना ब्रिटिश प्रजेचा पूर्ण अधिकार राणीच्या जाहीरनाम्यामुळे मिळत नाही. अशा व्यक्तींची जी मुलं नाताळमध्ये जन्मतील त्यांना गव्हर्नर इन कौन्सिलच्या प्रक्रियेशिवाय वसाहतीत मताधिकार मिळू शकेल काय?

इ) साम्राज्याच्या नागरिकत्वाचे नियम बदलवण्याचे अधिकार वसाहतीला आहेत काय ?

फ) निवडणुकीच्या प्रातिनिधिक संस्था असलेल्या देशातील रहिवासी जर रशियन ज्यू असेल तर त्याला युरोपिअन वंशाचा म्हणता येईल काय? रशियाचे कायदे सांगतात की तो रशियाचा नागरिक नाही आणि त्याच्यावर साम्राज्याच्या पश्चिमेकडील १६ प्रांतात वास्तव्य करण्यावर, ज्यांना ज्यूईश पेल म्हणतात, विशेष बंधन घालण्यात आलेली आहेत. नाताळच्या १८५६च्या घटनेच्या अर्थानं आणि १८८३च्या कायदा क्रमांक दोनच्या अर्थानं ज्याअर्थी तो विशेष कायद्याच्या कक्षेत येतो त्याअर्थी अशा प्रकारच्या ज्यूला गव्हर्नर इन कौन्सिलकडे जायच्या तरतुदीचा आधार न घेता मतदार सूचीत प्रवेश मिळू शकतो काय? [*नाताळ विटनेस*, मे २२, १८९६]

वांशिकतेचं खरं कारण न सांगता आशियायी लोकांना वगळण्यासाठी ते जसजसा प्रयत्न करत होते व त्यासाठी उपाय शोधत होते तसतसे ते एकापेक्षा एक मोठी चूक करत जात होते. आधी 'मतदान पद्धतीवर आधारित प्रातिनिधिक संस्था' या शब्दांचा उपयोग करण्यात आला. त्यांच्या जेव्हा लक्षात आलं की यामुळे उद्दिष्ट साध्य होणार नाही तेव्हा 'सांसदीय संस्था' या शब्दाचा उपयोग करण्यासाठी गव्हर्नर इन कौन्सिलच्या अभिभाषणाचा उपयोग करण्यात आला. दुसऱ्या वाचनात 'मतदानावर आधारित' हे शब्द 'मतदान पद्धतीवर आधारित प्रातिनिधिक संस्था' या शब्दांच्या आधी घालण्यात आले. अखेरीस समितीच्या पातळीवर चेम्बर्लेन यांच्या संमतीनं 'सांसदीय पद्धतीच्या मतदान पद्धतीवर आधारित प्रातिनिधिक संस्था' या शब्दप्रयोगाचा उपयोग करण्यात आला व महाधिवक्त्यांनी सांगितलं की यामुळे आता कोणतीही पळवाट बंद करायची राहिलेली नाही. न्यायालयातील कामकाजात अतिशय निपुण म्हणून गाजलेल्या एका अधिवक्त्यांनी *नाताळ ॲडव्हरटाईझरला* पाठवलेल्या पत्रातून दाखवलं की अगदी शेवटी करण्यात आलेल्या दुरुस्तीनंतरही विधेयकाला चाळणीसारखी भोकं आहेत. त्यांनी खात्रीपूर्वक सांगितलं की या विधेयकामुळे भारतीयांचा मतदान अधिकार काढून घेतला जाण्याऐवजी नाताळमध्ये आपल्याला मताधिकार मिळावा असा जो भारतीयांचा दावा आहे त्याला बळकटी आली आहे.

हे महाधिवक्ता होते डरबन येथील गुडरिक लॉटन अँड कूक्स कंपनीचे एफ. ए. लॉटन. न्याय्य व चांगल्या कारणासाठी गांधीजी एकाकी लढा देत असल्यामुळे ते गांधीजींकडे आकर्षित झाले होते. एकदा तर गांधीजींनी त्यांच्या भागीदारीत वकिली व्यवसाय करायचाही विचार केला होता. त्याबद्दल आपण नंतर अजून वाचणार आहोतच. एफ. ए. लॉटन यांनी नाताळ ॲडव्हरटाईझरमध्ये मे १९ ला लिहिलं:

आणि आता जरी त्याचा मताधिकार काढून घेण्यात आला तरी तो जेव्हा एवढा शक्तिशाली होईल की नाताळला त्याची उपस्थिती जाणवेल तेव्हा राज्यशास्त्राच्या कायद्याप्रमाणे युटिलँडरला ज्याप्रमाणे दक्षिण आफ्रिकी गणराज्यात मताधिकार मिळणं अपरिहार्य आहे त्याप्रमाणे तोही आपला मताधिकार मिळवेल.... केव्हा तरी - कधी काळी - ते शक्य झाल्याशिवाय राहणार नाही हेतुपुरस्सर संदिग्ध भाषेचा उपयोग करून तिचा अर्थ लावण्याचं काम जाणीवपूर्वक न्यायालयांवर ढकलणारं हे विधेयक सादर करून मंत्रिमंडळानं आमच्यासमोर एक आगळंच दृश्य उभं केलं आहे.

श्रीयुत लॉटन यांनी विचारलं की सांसदीय पद्धतीच्या मतदान पद्धतीवर आधारित या शब्दांचा काय अर्थ आहे? *'इंग्लंड, नाताळ आणि अन्यत्र मान्यता असलेल्या* सांसदीय मतदान पद्धतीच्या तत्त्वांवर आधारित' असे विधेयकात शब्द नाहीत. उलटपक्षी विधेयकात केवळ 'सांसदीय पद्धतीच्या मतदानावर आधारित' एवढेच शब्द आहेत. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १९, १८९६ (तिरपी अक्षरं माझी)] प्रजेच्या अधिकारावर गदा आणायचा प्रयत्न करणाऱ्या कायद्यांवर न्यायालयांनी वेळोवेळी 'कडक ताशेरे' झाडलेले आहेत. नाताळमधील भारतीयांना युरोपिअनांएवढेच मतदानाचे अधिकार आहेत. त्यामुळे त्यांच्या या अधिकाराचं हनन करू पाहणाऱ्या विधेयकावर न्यायालयाचे 'कडक' ताशेरे येणं अपरिहार्य आहे.

बहुतेक सुसंस्कृत देशात सांसदीय (वा विधानसभेची) मतप्रणाली आहे; यापैकी ह्या विधेयकात कोणत्या गोष्टीचा संदर्भ आहे? या शब्दांचा होणारा एकमेव अर्थ.... एवढाच आहे की

अशा प्रकारच्या निवडणुकीच्या तत्त्वावर आधारित प्रातिनिधिक संस्था त्या त्या देशाच्या सांसदीय पद्धतीवर आधारित असणं अपरिहार्य आहे. यापेक्षा या शब्दांचा वेगळा अर्थ काढणं हे त्यांच्या अर्थाला ताणल्यासारखं होईल व त्यामुळे विसंगती निर्माण होईल. आपण जपानचंच उदाहरण घेऊ या. तिथं जर सांसदीय मतदान पद्धतीच्या अशा तत्त्वांवर आधारित काही प्रातिनिधिक संस्था असतील तर त्या जपानच्याच सांसदीय पद्धतीवर आधारित असू शकतील, टिम्बक्टूच्या पद्धतीवरील नाही. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १९, १८९६]

दुसरा प्रश्न आहे : भारतात सांसदीय प्रणाली आहे काय आणि असल्यास तिचं स्वरूप काय आहे? उत्तर आहे :

तिथं आहे, आणि ती व्हिक्टोरियाच्या प्रकरण ६७च्या २३ आणि २४; आणि प्रकरण १४च्या ५५ व ५६ क्रमांकाच्या कायद्याप्रमाणे आणि नंतरच्या कायद्याच्या अंतर्गत परिच्छेद ४अन्वये करण्यात आलेल्या नियमांतर्गत निर्माण करण्यात आली आहे.... भारताची सांसदीय प्रणाली.... ही अशी आहे.... भारतातील निवडणूक पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्थांवर ती आधारित आहे. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १९, १८९६ (ठळक अक्षरं माझी)]

आता केवळ एकाच मुद्याचं उत्तर द्यायचं राहिलेलं आहे. भारतात सांसदीय प्रणाली असलेल्या निवडणूक पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था आहेत काय?

पुन्हा उत्तर हेच आहे की भारतात भारताच्या सांसदीय मतप्रणालीवर आधारित अशा प्रकारच्या संस्था आहेत, यापेक्षा वेगळं काहीही नाही.

निष्कर्ष स्पष्ट आहे :

भारतीयांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करायचा प्रयत्न करणारं संदिग्ध शब्दांतील हे विधेयक त्याच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरलेलं आहे. त्यामुळे मतदानाच्या अधिकारावरील त्यांची पकड पूर्वीपेक्षा अजूनच घट्ट झाली आहे. आधीच दोन

कायद्यानुसार त्याला मतदानाचा अधिकार दिल्यानंतर, वसाहत मंत्री भारतीयांवर पुन्हा एकदा हल्ला करायची परवानगी द्यायची शक्यता नाही. त्यामुळे या विषयावर अजून कायदा करणं अशक्य झालेलं आहे एवढंच नव्हे तर त्याच्या या अधिकाराचं हनन करण्यात आल्यास भारतीयांना कदाचित प्रिव्ही कौन्सिलमध्ये जाणंही भाग पडू शकेल. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १९, १८९६]

लॉटन यांच्या पत्राच्या प्रसिद्धीमुळे आणि त्यांनी काढलेल्या निष्कर्षामुळे नाताळच्या वृत्तपत्रांमध्ये बरंच मोठं वादळ माजलं. विधिज्ञांच्या वर्तुळात लॉटन यांना असलेल्या स्थानामुळे नाताळच्या गोऱ्यांच्या गैरसमजात अजूनच भर पडली. सरकारला विधेयक मंजूर करून घेण्यात आलेलं यश जबर मोल देऊनच मिळालं होतं एवढंच अधिकात अधिक म्हणता येऊ शकत होतं.

नाताळच्या राजकारणाच्या रंगभूमीवर योगायोगानं अगदीच प्रसिद्धी नसलेला एक युवक दुय्यम वकील म्हणून प्रथमदर्शनीच प्रवेश करतो. अगदी काही वर्षांपूर्वीच त्याचं नाव कोणीच ऐकलेलं नसतं. अशा या युवकानं गोऱ्यांचा अगदी तडीस जायची खात्री असलेला बेत जवळपास उधळून लावला होता. संपूर्ण गोऱ्या वृत्तपत्रसृष्टीनं दिलेलं आव्हान स्वीकारून तो केवळ ताठ उभाच राहिला नव्हता तर सर्व वृत्तपत्रं, स्वायत्त सरकार असलेली वसाहत, इंग्लंडमधील शिक्षितांचा प्रभावी वर्ग आणि अनेक प्रकरणी साम्राज्याचं सरकार या सर्वांच्या एकत्रित विरोधानंतरही त्यानं त्यात विजय मिळवला होता. मतदान विधेयकावरील संपूर्ण चर्चेवर त्याच्या प्रतिमेची छाया पडलेली होती. चर्चेत सहभागी होणाऱ्या एकानंतर दुसऱ्या व्याख्यात्यांना त्याची दखल घेणं भाग पडलं होतं व त्याचा उल्लेख त्यांच्या भाषणातून वारंवार होत होता. सर जॉन रॉबिन्सन यांनी आपल्या आक्षेपकांना दिलेल्या उत्तरात त्या व्यक्तीचा उल्लेख 'ज्या सद्गृहस्थाचा नामनिर्देश या चर्चेत करण्यात आलेला नाही परंतु ती व्यक्ती श्रीयुत गांधी आहे हे सर्वांना माहीत आहे व जिला आवश्यकतेपेक्षा अधिक महत्त्व देण्यात आलेलं आहे' असा केला होता. त्यांच्या या बेफिकीर वृत्तीबद्दल नाताळ विटनेसनं त्यांना धारेवर धरलं आणि सांगितलं की उलटपक्षी नाताळ मंत्रिमंडळ 'त्याच्याकडे फार कमी लक्ष देत आहे आणि विधेयकात गंभीर त्रुटी ठेवून

त्याचा फायदा घ्यायची संधी त्याला देत आहे आणि त्याचा फायदा न घेण्याइतका तो मंदबुद्धीचा नाही.' [*नाताळ विटनेस*, मे १५, १८९६]

काहींना तर त्याला भारतात परत पाठवलेलं आवडलं असतं. एस. ए. रफी नावाचे एक भारतीय नागरिक सरकारी अधिकारी होते. परंतु गोऱ्यांना ते नकोसे झाले होते. मतदान विधेयकावरील दुसरं वाचन संपायच्या दोन दिवसांनंतर नाताळ संसदेत सांगण्यात आलं होतं की गव्हर्नर इन कौन्सिलने त्या माणसाला भारतात परत पाठवण्यासाठी २०० पौंड अनुदान मंजूर केलं आहे. 'पैशाच्या दृष्टीनं फार स्वस्त गोष्ट' अशी श्रीयुत बिन्स यांनी त्यावर टिप्पणी केली होती. त्यानंतर श्रीयुत विन्टर यांनी 'याच किंमतीवर श्रीयुत गांधींनाही परत पाठवता येणार नाही काय' अशी चौकशी केली होती. [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, एप्रिल २४, १८९६] परंतु हा एक वेगळाच ग्राहक होता. त्याच्यावर शारीरिक धोक्याचा वा धमक्यांचा कोणताच परिणाम होत नव्हता. खुशामतीनं तो प्रभावित होत नव्हता. त्याच्यापासून सुटका करून घ्यायची इच्छा असली तरी तो त्यांना आवडल्याशिवाय राहू शकत नव्हता. त्यानं त्यांना गोंधळात पाडलं होतं. एवढंच नाही तर औपरोधिक राजकीय लेखातही या व्यक्तीचा उल्लेख 'स्वभावानं खडीसाखरेसारखा गोड आणि हातात सदैव कागद पेन्सिल घेतलेला' म्हणून केला जायचा.' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, जानेवारी १, १८९६] वैयक्तिक द्वेषबुद्धीला उघड जिव्हाळ्यानं त्यानं खोडून काढलं होतं.

श्रीयुत मेडन यांनी नाताळ विधानसभेत त्याचा उल्लेख 'फारसा विधिनिषेध नसलेली आणि अतिशय महत्त्वाकांक्षी व्यक्ती' असा केला होता. नाताळ विटनेसनं जेव्हा लिहिलं:

'ज्या माणसाबद्दल श्रीयुत मेडन एवढ्या आदरानं बोलले त्या भारतीय बॅरिस्टरच्या क्षमतेकडे पाहता मतदान अधिकाराची लाच देऊन या माणसाला खुश करता येईल आणि तो सध्या करत असलेल्या कार्यापासून त्याला वेगळं करता येईल या मनोराज्यात ते दंग आहेत काय?' [*नाताळ ॲडव्हरटाईझर*, मे १५, १८९६]

त्या आरोपातील पहिला भाग खोटा ठरवला गेला. त्या माणसाला तीनदा मतदार म्हणून नाव नोंदवायची संधी मिळूनही त्यानं ती नाकारली हे जेव्हा नाताळ मर्क्युरीच्या स्तंभात एका 'अतिशय महत्त्वाकांक्षी माणसानं लिहिलेल्या पत्रातून उघड झालं तेव्हा दुसरा भागही खोटा ठरवला गेला.

मला कोणत्याही प्रकारच्या सांसदीय सन्मानाची आकांक्षा नाही.... जे मला ओळखतात त्यांना माझी महत्त्वाकांक्षा काय आहे ते माहीत आहे. [गांधीजींचं पत्र, दिनांक एप्रिल १३, १८९७, संपादक *नाताळ मर्क्युरी* यांना, प्रकाशन एप्रिल १६, १८९७]

त्यांच्या आत्म्याची काय महत्त्वाकांक्षा होती व त्यांच्या जीवनाचं असं कोणतं ध्येय होतं की ज्यामुळे मित्रांना आणि शत्रूंना त्यांचं सारखंच आकर्षण वाटायचं व त्यांना ते सारखंच प्रभावित करायचे? नाताळच्या राजकीय नभोमंडळात अतिशय विपरीत परिस्थितीतही त्यांची विजयपताका वेगात कशी वरवर चढत होती याकडे आपण लवकरच वळणार आहोत.

५

अगदी कठीण संघर्षात व्यस्त असतानाच गांधीजींनी सर विल्यम हंटर यांना तार करून भारतीयांचा विधेयकाला विरोध करायचा निर्धार असल्याचं कळवलं होतं. दादाभाई नौरोजी यांनाही चेम्बर्लेन यांच्याकडे पाठवण्यासाठी निवेदन तयार करत असल्याचं त्यांनी कळवलं होतं. सर विल्यम यांनी उत्तरात लिहिलं, 'तुमच्या सार्वजनिक कार्यासाठी तुम्ही करत असलेल्या प्रयत्नाला शुभेच्छा' आणि *एका पंधरवाड्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश भारतीय प्रजेच्या तक्रारीसंबंधी माझी वसाहत मंत्र्यांशी दीर्घ मुलाखत झाली. त्यांनी त्या लक्षपूर्वक ऐकून घेतल्या.... त्यांनी सहानुभूती व्यक्त केली परंतु सध्याच दक्षिण आफ्रिकेत जी गुतागुंत झाली आहे त्यात अधिक भर घालण्यात अडचणी असल्याचं त्यांनी सांगितलं.*

संथ गतिने का होईना पण अखेरीस न्याय केल्या जाईल अशी सर विल्यम यांनी फार आशा वाटत होती. त्यांना एकच भीती वाटत होती:

तुम्ही अतिशय चांगल्या ध्येयाने काम करत आहात; परंतु भारतीय काँग्रेस पक्ष एकच तक्रार करत असते असं दुर्दैवानं इंग्लंडमधील लोकांच्या मनात ठसलं आहे. काँग्रेसच्या आंदोलनाबद्दल मला स्वतःला सहानुभूती आहे. तरीही मला असं वाटल्याशिवाय राहू शकत नाही की दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश भारतीय प्रजेच्या कारणासारखं कोणतं तरी चांगलं कारण काँग्रेसच्या व्यासपीठाशी जुळलेलं नाही.

निवेदन आल्यानंतर कोणती पावलं उचलणं योग्य राहील याचा काळजीपूर्वक विचार करायचं त्यांनी आश्वासन दिलं. मध्यंतरीच्या काळात भारतीयांना खंबीर राहायचा सल्ला त्यांनी दिला.

यशस्वी होण्यासाठी तुम्ही केवळ तुमची भूमिका ठामपणे मांडायला पाहिजे. ती भूमिका आहे दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश भारतीय प्रजा ही आपल्या इतर वसाहतीतील आणि इतर स्वतंत्र मित्र राष्ट्रातील प्रजेसारखीच आहे व ब्रिटिश प्रजा म्हणून ज्या स्थानाची तिला सम्राज्ञींकडून आणि ब्रिटिश संसदेकडून ग्वाही देण्यात आली आहे त्या स्थानापासून तिला वंचित करण्यात येत आहे. [साबरमती संग्रहालयातील फोटोप्रत क्रमांक ११९-१२ वरून]

दादाभाई नौरोजी यांच्याकडूनही उत्साहवर्धक बातमी होती.

दादाभाई नौरोजी गांधीजींना

मे २१, १८९६

मला आनंद वाटतो की तुमच्या निवेदनावर विचार केला जाईल व ते मिळाल्याशिवाय कोणतीही कृती केली जाणार नाही वा निर्णय घेतला जाणार नाही. [साबरमती संग्रहालयातील फोटोप्रत क्रमांक ११४ वरून]

त्याच्या दुसऱ्या दिवशी भारतीयांनी गांधीजींनी तयार केलेलं निवेदन चेम्बर्लेन यांना पाठवलं. निवेदकांचं म्हणणं होत की सर जॉन रॉबिन्सन यांनी विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळी त्यांना वाटत असलेल्या भीतीसाठी तीन कारणं दिली होती:

१. नवीन कायद्यान्वये मतदानाच्या संबंधातील जे विधेयक रद्द आलं करण्यात आहे त्यावर सम्राज्ञींच्या सरकारच्या ९,००० प्रजेनं सह्या केलेल्या आहेत.

२. वसाहतीत लवकरच येऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुका.

३. नाताळ भारतीय काँग्रेसचं अस्तित्व. [नाताळच्या भारतीयांचं जोसेफ चेम्बर्लेन यांना निवेदन, मे २२, १८९६, मुद्रित प्रतीच्या फोटो प्रतीवरून]

सुरुवातीला प्रधानमंत्र्यांनी मान्य केलं होतं की युरोपिअन मतांच्या प्रमाणात भारतीय मताचं मतदानात प्राबल्य व्हायचं दृष्टीच्या टप्प्यातील काळात कोणताच धोका नाही. सार्वजनिक निवडणुका जवळ येत असल्यासंबंधी बोलायचं तर मतदानाचा अधिकार काढून घ्यायचा प्रयत्न गेल्या दोन वर्षांपासून होत आहे. तेव्हापासून दोनदा मतदार सूचीचं नूतनीकरण झालेलं आहे. नंतर मतदार म्हणून नावं नोंदवता येणार नसल्यामुळे भारतीयांसमोर नाव नोंदवण्यासाठी फार मोठं आकर्षण होतं. आणि तरीही भारतीय समाजातील एकाही मताची भर मतदान सूचीत पडलेली नाही. [वरीलप्रमाणे] काँग्रेसनं कधीही 'सामर्थ्यशाली राजकीय सत्ता व्हायचा हेतू कोणत्याही प्रकारे बाळगलेला नाही.' सचिवावर घेतलेला आक्षेप प्रधानमंत्र्यांनी सभागृहात परत घेतलेला आहे. काँग्रेसनं जो काही निधी गोळा केलेला आहे तो जनसेवेच्या कामावर तसंच सभांच्या सूचना आणि निवेदनं वगैरे तयार करण्यावर आणि दैनंदिन कामकाजासाठी खर्च करण्यात आलेला आहे. हा निधी काँग्रेसच्या उद्दिष्टांची परिपूर्ती करण्यासाठी अगदीच अपुरा आहे. वास्तवात निधीच्या अभावी काँग्रेसचं शैक्षणिक कार्य फार मागं पडलं आहे. 'त्यामुळे आपले निवेदक नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितात की ज्या धोक्यापासून संरक्षण करण्यासाठी सध्याचं विधेयकात मांडण्यात आलं आहे तो धोका मुळीच अस्तित्वात नाही.'

आम्ही सांगितलेल्या तथ्यांवर जसाच्या तसा विश्वास सम्राज्ञींच्या सरकारनं ठेवावा वा तेच सत्य आहे असं मान्य करावं असं आमचं म्हणणं नाही असं परत ठासून सांगत निवेदकांनी सुचवलं की कोणत्याही विधानाबद्दल संशय असल्यास - आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'हजारो लोक असे आहेत की ज्यांच्याजवळ मतदार व्हायच्या पात्रतेसाठी आवश्यक तेवढी मालमत्ता नाही' - किती भारतीयांजवळ ५० पौंडाची स्थावर मालमत्ता आहे वा ते वार्षिक १० पौंड भाडं भरतात याची चौकशी करणं हाच योग्य मार्ग राहील.

अशा प्रकारचं माहितीपत्रक तयार करण्यासाठी फार मोठा पैसा वा वेळ खर्च होणार नाही व मतदान अधिकाराचा प्रश्न सोडवण्यासाठी त्याची फार मोठी मदत होईल. घाईगडबडीत एखादा कामचलाऊ उपाय योजणं वसाहतीच्या एकूण हिताच्या दृष्टीनं हानिकारक होईल असं आपल्या निवेदकांचं नम्र मत आहे. आपले निवेदक भारतीय समुदायाचे प्रतिनिधी म्हणून आणि ज्या संघटनेचं सदस्य व्हायचा त्यांना सन्मान मिळालेला आहे त्या संघटनेच्यावतीनं अधिकृतपणे बोलायचा अधिकार असलेले प्रतिनिधी म्हणून.... सम्राज्ञींच्या सरकारला नम्रपणे आश्वासन देऊ इच्छितात की त्यांना पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार होणाऱ्या मतदार सूचीत एकाही भारतीय मताची भर घालायचा प्रयत्न करायची इच्छा नाही. [वरीलप्रमाणे]

नाताळ मर्क्युरीनं जाहीरपणे मान्य केलं की भारतीय मतांनी युरोपिअन मतांना खाऊन टाकायचा 'धोका काल्पनिक आहे.' मॉरिशससारख्या देशात पात्रताविषयक अट कमी असूनही हीच गोष्ट सूचित करते. 'मॉरिशसमध्ये अशा अटी असताना आणि भारतीयांची लोकसंख्या इतर लोकांच्या दुप्पट असताना तसंच नाताळमध्ये ज्या वर्गाचे भारतीय आहेत त्याच वर्गाचे भारतीय मॉरिशस असूनदेखील तिथं कोणताच धोका आढळून येत नाही.' [वरीलप्रमाणे]

ज्याप्रकारे आडवळणाच्या मार्गानं विधेयकाला पुढं रेटायचा प्रयत्न करण्यात आला होता त्या प्रकाराची नाताळच्या सर्व वृत्तपत्रांनी एकमतानं निंदा केली होती. नाताळमध्ये भारतीय मतांवर बंधन घालणं आवश्यक आहे असा जर सम्राज्ञींच्या सरकारचा विश्वास असेल आणि

वर्गीय कायदा केल्याशिवाय ह्या समस्येचं समाधानकारक उत्तर सापडू शकत नाही अशी जर सम्राज्ञींच्या सरकारची खात्री झालेली असेल, आणि १८५८च्या जाहीरनाम्यानंतरही ज्या प्रकारे युरोपिअन प्रजेला वागवण्यात येते त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीनं ब्रिटिश भारतीय प्रजेला वागवणं आवश्यक आहे हा वसाहतीचा दृष्टिकोन सम्राज्ञींच्या सरकारला जर मान्य असेल तर निवेदक आदरपूर्वक आणि नम्रपणे सांगू इच्छितात की 'जे अधिकार आणि विशेषाधिकार भारतीयांना देण्यात येऊ नये असं सम्राज्ञींच्या सरकारचं मत आहे त्या अधिकारातून आणि विशेषाधिकारातून भारतीयांना वगळण्यासाठी संदिग्ध शब्दातील कायदे करून खटलेबाजीसाठी न्यायालयाची दारं उघडण्यापेक्षा आणि मनस्तापाला निमंत्रण देण्यापेक्षा भारतीयांचं नाव घेऊन त्यांना त्या अधिकारांपासून वगळणं किती तरी चांगलं आणि समाधानकारक राहील.' [वरीलप्रमाणे]

हे नवीन विधेयक काही इथंच संपत नाही. सरकारनं त्याचं वर्णन 'प्रायोगिक तत्त्वावरील उपाय' असं केलं आहे. सन्माननीय आणि विद्वान महाधिवक्त्यांनी विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळी सांगितलं की जर 'आमच्या विश्वासाच्या विपरीत' विधेयकामुळे अपेक्षेनुरूप काम होऊ शकलं नाही तर 'वसाहतीत कधीही शांतता राहणार नाही इत्यादी.'

'अशा प्रकारच्या परिस्थितीत आम्ही निवेदक आपल्याला प्रार्थना करतो की सर्व प्रकारच्या उपायांचा प्रयोग केल्याशिवाय आणि त्यांना अपयश आल्यास (म्हणजे असं गृहीत धरू या की युरोपिअन मतांना भारतीय मत गिळून टाकायचा धोका आहे) सध्याच्या विधेयकासारखे वर्गीय विधेयकं मंजूर करण्यात येऊ नये.' [वरीलप्रमाणे]

दक्षिण आफ्रिकेच्या भवितव्यतेला आकार द्यायची भारतीय समुदायाची इच्छा आहे ही गोष्ट स्पष्टपणे अमान्य करत निवेदकांनी सांगितलं किती भारतीयांना वा कोणत्या भारतीयांना मताधिकार मिळतो हा प्रश्न नाही तर ब्रिटिश भारताबाहेरील वसाहतीत आणि इंग्रजांच्या मित्रराष्ट्रात भारतीयांचं कोणतं स्थान आहे हा प्रश्न आहे. भारतीय मत वरचढ व्हायचा यत्किंचितही धोका असेल तर निवेदकांचं म्हणणं होतं की,

मालमत्ता विषयक अट वाढवून वा न वाढवता सर्वांसाठी सारखीच साधी शैक्षणिक चाचणी ठेवण्यात यावी.... आणि अशा प्रकारच्या चाचणीचाही उपयोग झाला नाही तर अधिक कठीण परीक्षा घेण्यात यावी. त्यामुळे युरोपिअन मतावर परिणाम न होता भारतीय मतांवर परिणाम होईल. [वरीलप्रमाणे]

अखेरचं सांगायचं तर नाताळ सरकारला मतदार सूचीतून सर्व भारतीयांची नावं काढूनच टाकायची असतील तर आणि सम्राज्ञींच्या सरकारची ती मागणी मान्य करायला अनुकूलता असेल तर मान्य केलं पाहिजे की 'भारतीयांचं स्पष्टपणे नाव घेऊन त्यांची नावं मतदान सूचीतून काढण्याशिवाय दुसरा कोणताही जवळचा मार्ग उपयोगाचा नाही.' परंतु परिस्थिती अशी नाही. युरोपिअन वसाहतवाल्यांनी एकमतानं अशी मागणी कधीच केली नाही. यासाठी *नाताळ ॲडव्हरटाईझर*नं त्यांची खरडपट्टीही काढलेली आहे. ज्या लोकांना भारतीयांची नावं मतदार सूचीतून पूर्णपणे काढून टाकायची आहेत त्यांच्या दृष्टीनंही मंजूर करण्यात आलेलं विधेयक अपुरं आहे आणि आम्हा भारतीयांच्या दृष्टिकोनानंही ते अपुरं आहे. [वरीलप्रमाणे]

या विधेयकाला मान्यता देण्यात आल्यास त्याच्यातील संदिग्धतेमुळे खटलेबाजीला अंत राहणार नाही आणि त्यामुळे भारतीय समाजाला क्षमतेपेक्षा अधिक खर्च करावा लागेल. *नाताळ विटनेसनं* सांगितलं की हे विधेयक सादर करायची 'एवढी घाई करण्यामागील कोणताही खुलासा, कमीत कमी समाधानकारक तरी' करण्यात आलेला नाही. *नाताळ ॲडव्हरटाईझरनं* सांगितलं आहे की 'भारतीयांच्या मतदानाचा हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे व तो कायमचा सोडवायची कोणतीही घाईगडबड करण्यात येऊ नये. प्रस्तावित विधेयक पुढं ढकलून मतदारसंघाची संपूर्ण माहिती मिळाल्यानंतरच संपूर्ण प्रकरणाची समीक्षा करणं हाच खरं पाहता सर्वोत्तम मार्ग आहे.' [वरीलप्रमाणे] अधिकार विरहित, पूर्णपणे अनावश्यक 'आपल्याच वेगवेगळ्या वंशाच्या प्रजेमध्ये संघर्षाचं' बीजारोपण करणारं अशी *द टाईम्सनं* या उपायाची संभावना केली आणि सांगितलं की सम्राज्ञींच्या सरकारला ही गोष्ट परवडणारी नाही. त्यामुळे आम्हा निवेदकांचा

विश्वास आहे की लंडनला पाठवण्यात आलेल्या या विधेयकाची मान्यता रोखून धरण्यात येईल, आणि *जर युरोपिअन मतांना भारतीय मतांकडून गिळंकृत केल्या जायची भीती असेल तर सध्याच्या कायद्यांतर्गत खरोखरच असा काही धोका आहे काय व न्यायाच्या दृष्टीनं वेगळा काही उपाय योजता येऊ शकतो काय याची चौकशी करायचा आदेश देण्यात यावा.* [वरीलप्रमाणे]

परंतु अन्याय करणारात सहभागी असलेल्या खुद्द न्यायाधीशाकडे अपील करण्यासारखी ही गोष्ट होती. त्याशिवाय तोच न्यायाधीश, पंचही तोच आणि शिक्षेची अंमलबजावणी करणाराही तोच राहणार होता. भारतीयांच्या लवकरच लक्षात यायचं होतं की कानांना गोडगोड वाटेल असं बोलायचं परंतु त्याच वेळी ते कसं मोडायचं हे मनातल्या मनात आधीच ठरवून ठेवायचं अथवा एका हातानं भारतीयांच्या खिशात काही तरी टाकायचं व लगेच दुसऱ्या हातानं काढून घ्यायचं अशा प्रकारे वागण्याचा चेम्बर्लेन यांनी एक नमुनाचं तयार केला होता. त्यांच्या या 'दुटप्पीपणाचे' भारतीयांना येत्या काही वर्षात कटू आणि कटूतर अनुभव यायचे होते. सप्टेंबर २५, १८९६ला नाताळ सरकारचे मुख्य दुय्यम सचिव सी. बर्ड यांनी निवेदकांना डरबन येथे चेम्बर्लेन यांचा निर्णय कळवला :

....मी आपल्याला कळवू इच्छितो की सरकारला वसाहत मंत्र्यांकडून एक पत्र मिळालं आहे. सम्राज्ञींच्या सरकारनं त्यांच्या विनंतीचा काळजीपूर्वक विचार केला परंतु कायद्याला मान्यता न देणं न्याय्य होईल असं सम्राज्ञींच्या सरकारला वाटत नाही असं श्रीयुत चेम्बर्लेन यांनी निवेदनावर सह्या करणाऱ्या व्यक्तींना कळवायची विनंती त्यातून केली आहे. [साबरमती संग्रहालयातील फोटोप्रत क्रमांक १६० वरून]

नवीन मतदान विधेयक जाहीर झाल्यानंतर लगेच भारतीय शाळा शिक्षक ॲन्बिओ रॉयप्पन यांना मतदार सूचीत नाव दाखल करण्यासाठी केलेला अर्ज कॅप्टन ल्युकास यांनी नामंजूर केला. [*नाताळ मर्क्युरी*, ऑगस्ट १४, १८९६] त्यामुळे त्यावर दाद मागण्यासाठी नाताळच्या सर्वोच्च न्यायालयात आणि अखेरीस प्रिव्ही कौन्सिलकडे जाणं हाच स्वाभाविक मार्ग उरला होता. परंतु

सरळ सरळ वंशभेद करणारा कायदा टाळण्यात मिळालेल्या यशावरच भारतीयांनी काही काळ समाधान मानायचं ठरवलं. १८९४ सालचा अमान्य करण्यात आलेला कायदा तशाच प्रकारचा होता. नवीन कायद्यात भारतीयांचा नावानिशी उल्लेख नव्हता. त्यातील गर्भितार्थाप्रमाणे तो जरी वंशभेद करणारा कायदा होता तरी त्याची भाषा कोणत्याही विशिष्ट वर्गाचा उल्लेख करणारी नव्हती. तो केवळ भारतीयांसाठी तयार करण्यात आलेला नव्हता तर सर्व ब्रिटिश प्रजेसाठी तयार करण्यात आलेला होता. हे खरं आहे की सर्वांवर बंधनं घालणाऱ्या या कायद्याची अंमलबजावणी भारतीयांविरुद्ध करण्यात येणार होती व त्यामुळे विधेयकाच्या हेतूची परिपूर्ती त्याच प्रकारे झाली असती. तरीही गांधीजींनी दाखवून दिल्याप्रमाणे तो कायदा सर्वांसाठी होता. तो कार्यवाहीत आणल्यामुळे भारतीयांना अपमानित झाल्यासारखं वाटायचं कारण नव्हतं आणि काळाच्या प्रवाहात भारतीयांबद्दलच्या कटुतेचं वातावरण निवळल्यानंतर कायद्याची अंमलबजावणी थोडी उदारपणानं करण्यात आली तर भारतीय समाजाची तक्रार संपू शकली असती. तशा अवस्थेत या कायद्यात दुरुस्ती करायचीही गरज राहणार नव्हती.

भारतीयांच्या नावाचा वैशिष्ट्यानं उल्लेख असलेल्या ज्या विशेष कायद्यामुळे रंगभेद करण्यात आला होता त्यासाठी वसाहतीतील लोकांच्या मतात बदल करणं आवश्यक होतं. त्यासाठी भारतीयांबद्दलची जनतेतील शत्रुत्वाची भावना दूर करणं आवश्यक होतं. त्याचबरोबर आशियायी लोकांबद्दल त्यांच्या मनात मैत्रीभाव निर्माण होईल अशा प्रकारचं वातावरण निर्माण होणंही आवश्यक होतं. एकदा युक्तिवाद म्हणून भारतीयांना सांसदीय मताधिकार नाही असं जरी मान्य केलं तरी मतदान विषयक नवीन कायद्यांतर्गत एखाद्या अधिकाऱ्यानं भारतीयाचं नाव नाताळच्या मतदार सूचीत नोंदवलं तर ती गोष्ट घटनेच्या दृष्टीनं अवैध ठरू शकत नव्हती.

जनतेच्या हक्कांबद्दल नेहमीच एक सर्वसामान्य धारणा असते. त्यामुळे जोपर्यंत तत्कालीन सरकार जाणीवपूर्वक विरोधात जात नाही तोपर्यंत सध्याचा कायदा असूनही भारतीयांची नावं मतदार सूचीत दाखल करता येऊ शकतील. याचा अर्थ असा आहे की जर

भारतीयांबद्दलची घृणा थोडी कमी झाली व स्थानिक सरकार भारतीयांना इजा करू इच्छीत नसेल तर या कायद्यात कोणत्याही प्रकारचा बदल न करता भारतीयांची नावं मतदार सूचीत दाखल करता येऊ शकतात. [एम. के. गांधी, *सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका*, नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद, (१९६१), पृष्ठ ८८]

हाच सर्वात महत्त्वाचा बदल होता. भारतीयांनी वारंवार जाहीर केलं होतं की 'आमची कोणतीही राजकीय आकांक्षा नाही; आमचा लढा केवळ आम्हाला अवनतीकडे ढकलण्याविरुद्ध आहे. आम्हा भारतीयांचा सरळ नामोल्लेख विधेयकात नसल्यामुळे अपमानास्पद परिस्थिती नाहीशी झाली आहे, आम्ही वाट पाहू शकतो. आमच्या अधिकारासाठी सुरू असलेला संघर्ष आम्हांला उपलब्ध असलेल्या मार्गानं आता सुरू राहू शकतो.' त्यांनी जो लढा दिला होता त्यामुळे 'दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचा प्रश्न सर्वाधिक महत्त्वाचा आहे हे साम्राज्याच्या सरकारला वाटायला लागलं' हीच भारतीयांसाठी फार मोठी उपलब्धी होती.

याचा परिणाम दुहेरी होता. एकीकडे भारतीयांनी वास्तव्य केलेल्या सर्व वसाहतींमध्ये 'आपल्या स्थानाबद्दलची जागृती निर्माण झाली होती.' दुसरीकडे 'युरोपिअन लोकांनाही भारतीयांचं प्राबल्य वाढायचा धोका वाटू लागला होता.' परिस्थिती वेगात संघर्षाकडे जाऊ लागली होती. तिला तोंड देण्यासाठी फार मोठ्या तयारीची आवश्यकता होती. भारतीयांना जी थोडीशी उसंत मिळाली त्यासाठी ते आभारी होते.

प्रकरण ५: जीविकेच्या शोधापासून ईश्वराच्या शोधापर्यंत

१

तीन वर्षांपूर्वी १८९३ साली दक्षिण आफ्रिकेत आल्यापासून गांधीजींमध्ये सखोल परिवर्तन घडून आलं होतं. ते तिथं जीविकेच्या शोधासाठी गेले होते. एका पाठोपाठ एक आलेल्या असाधारण वैयक्तिक अनुभवातून त्यांच्यात सेवेची भावना निर्माण झाली होती. वंशपरंपरागत धर्मापासून त्यांना ओढायचा त्यांच्या ख्रिश्चन मित्रांनी जो प्रयत्न केला त्यामुळे ते धर्माच्या अभ्यासाकडे वळले. ख्रिश्चन धर्माच्या अभ्यासामुळे त्यांच्यातील आध्यात्मिक ज्ञानाची भूक अजूनच वाढली. परंतु ह्या सर्व उद्योगांना त्यांच्या व्यावसायिक कामासमोर दुय्यम स्थान असणं स्वाभाविक होतं. येणाऱ्या वर्षांमध्ये यात सूक्ष्म बदल होत गेला. एकीकडे सार्वजनिक कार्याचा आवाका वाढत असताना आणि त्यात त्यांचा अधिकाधिक वेळ जात असतानाही सत्याचा शोध घेण्याची त्यांची ओढ दिवसेंदिवस एवढी वाढत चालली होती व तिनं त्यांच्या इतर सर्व कामांना व्यापून टाकलं होती की समाजसेवा आणि राजकारण ह्या गोष्टी ह्याच सत्याच्या शोधाच्या भाग झाल्या आणि त्यातूनच त्यांच्या अंतरीची धार्मिक भावना अभिव्यक्त होऊ लागली. अशा रीतीनं अंतरात्म्याच्या शोधानं त्यांना सेवेकडे नेलं व त्यातूनच ईश्वराचं ज्ञान होऊ शकेल याची त्यांना जाणीव झाली. सार्वजनिक कार्यात त्यांचा अडथळा येण्याऐवजी त्यांना अधिकच जोम आला व त्यांना नवीन परिमाण प्राप्त झालं.

त्यांच्या प्रिटोरिया येथील मुक्कामाच्या शेवटी त्यांच्या जीवनात अजून एक प्रभावानं प्रवेश केला. तो प्रभाव होता रशियन संत, तत्त्वज्ञ आणि साहित्यिक काऊंट लिओ टॉलस्टॉय यांचा. श्रीमद राजचंद्र यांच्या खालोखाल गांधीजींवर प्रभाव पडला होता तो टॉलस्टॉय यांचाच. ज्या ख्रिश्चन मिशनरी मित्रांनी त्यांच्याशी मैत्री केली होती ते त्यांच्यावर त्यांच्या वाडवडिलांच्या धर्माचा त्याग करण्यासाठी आणि ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करण्यासाठी सारखं दडपण आणू लागले. ते

ज्या सिद्धान्तांचा सत्य म्हणून पुरस्कार करत होते ते स्वीकारायला गांधीजींची तयारी नव्हती. इंग्लंडमधील एका शुभचिंतकानं टॉलस्टॉय यांच्या *द किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू* या पुस्तकाची प्रत त्यांना पाठवली. या पुस्तकाचा ए. डिलेनो यांनी केलेला इंग्रजी अनुवाद फेब्रुवारीमध्ये प्रकाशित झाला होता. ते पुस्तक मिळाल्यानंतर त्यांनी एडवर्ड मेटलँड यांच्याशी पत्रव्यवहार सुरू केला. 'ह्या पुस्तकातील स्वतंत्र विचारसरणी, सखोल नैतिकता आणि सत्य या गुणामुळे मी भारावून गेलो व श्रीयुत कोट्स यांनी दिलेली सर्व पुस्तकं मागे पडली' असं ते आपल्या आत्मकथेत सांगतात. १९२०च्या दरम्यान टॉलस्टॉय यांच्या जन्मशताब्धीच्या प्रसंगी त्यांना जाहीर आदरांजली वाहताना *द किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू* या पुस्तकाच्या संपर्कात जेव्हा मी आलो तेव्हा अंतर्मनातील नास्तिक्य आणि संशयवाद यांच्या भोवऱ्यात मी कसा सापडलो होतो ते गांधीजींनी सांगितलं. 'त्यावेळी माझा हिंसेवर विश्वास होता. ते पुस्तक वाचल्यामुळे माझा संशय गेला आणि अहिंसेवर माझी दृढ श्रद्धा बसली.

असं काही केवळ टॉलस्टॉय यांच्या लेखनामुळेच झालं नव्हतं. टॉलस्टॉय यांच्या जीवनाचं उदाहरण - त्यांची सत्याची ओढ आणि परिपूर्णतेसाठी अविरत धडपड या गोष्टींनी गांधीजींच्या हृदयात स्थान मिळवलं होतं. टॉलस्टॉयबद्दल गांधीजींनी सांगितलं होतं की 'त्या महान नेत्याचा मी नम्र अनुयायी होतो व त्यांच्याकडे दीर्घकाळापासून मी माझा मार्गदर्शक म्हणून पाहत होतो.' टॉलस्टॉयमध्ये गांधीजींना त्या चैतन्य तत्त्वाचं दर्शन झालं ज्याच्या ते शोधात होते - सत्याच्या शोधाला पूर्णपणे वाहिलेलं त्यांचं व्यक्तिमत्व, जीवनाच्या अर्थाच्या शोधासाठी वैभवशाली जीवनाचा त्याग करून त्यांनी पत्करलेलं शेतकऱ्याचं आणि चांभाराचं जीवन; आपली संपत्ती, कौशल्य आणि प्रतिभा त्यांनी मानवी सेवेसाठी अर्पण केलेली असतानाच ते शारीरिक श्रमावर आधारित जीवन जगत होते. ते जन्मजात आदर्शवादी होते आणि सत्याच्या जीवनदायी सामर्थ्याचा परिचय व्हायच्याआधी अश्रद्धा आणि वासनामय जीवनाच्या दुःखद अनुभवातून त्यांना जावं लागलं होतं. ते शूर योद्धा होते व साहसामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचं रणांगणात

आगळंच दर्शन व्हायचं. केवळ आत्मचैतन्याच्या शक्तीद्वारे अतिशय सामर्थ्यसंपन्न जुलुमशहाला निष्प्रभ करायच्या सामर्थ्याचं दर्शन त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून व्हायचं. केवळ निसर्गच बरोबरी करू शकेल अशा श्रेष्ठ दर्जाची निर्मितिक्षमता असलेले ते परिपूर्ण कलावंत होते. परंतु तरीही एकीकडे धर्म आणि दुसरीकडे आर्थिक, राजकीय आणि सामाजिक विज्ञानांमधील पोकळी अध्यात्मानं भरून त्याला मान्यता मिळवून देण्यासाठी; संपत आलेल्या एकोणिसाव्या शतकातील विज्ञानाला दिशादर्शन करण्यासाठी आणि विज्ञानानं गमावलेला जीवनाचा अर्थ त्याला परत मिळवून देण्यासाठी टॉलस्टॉय यांनी आपल्या कलेचा त्याग केला. अखेरचं सांगायचं तर गांधीजींना त्यांच्यात अध्यात्म विज्ञानाच्या आद्य संशोधकाचं दर्शन झालं. प्रतिकार न करायच्या तत्त्वाच्या दैवी शक्तीचा त्यानी शोध लावला होता. त्याच तत्त्वाचा गांधीजींनी आपल्या सामाजिक कार्यात समावेश करून अपरिमित यश मिळवलं होतं.

नाताळमध्ये स्थायी झाल्यानंतर गांधीजींनी त्यांची इतरही पुस्तकं वाचली – *व्हाट शाल वुई डू देन, गॉस्पेल इन ब्रिफ, द फोर गॉस्पेल्स हॉरमनाईझ्ड अँड ट्रान्सलेटेड* आणि इतरही अनेक पुस्तकांचा त्यात समावेश होता. गांधीजी सांगतात की 'त्यामुळे वैश्विक प्रेमाच्या क्षमतांची मला अधिकाधिक जाणीव होऊ लागली.' टॉलस्टॉय यांची शिकवण त्यांच्या अगदी अंतहृदयात रुजली. भारताच्या प्राचीन ऋषिमुनींनी सांगितलेली काही महान सत्येच त्यांनी आधुनिक भाषेत सांगितली होती. याशिवाय आधुनिक समाजाला त्रस्त करणारे राजकीय आणि सामाजिक दोष दूर करण्यासाठी या तत्त्वांचा व्यवहारात उपयोग करायचं टॉलस्टॉय यांनी गांधीजींना सुचवलं होतं, त्याबद्दलचे मूलभूत नियम गांधीजींना सांगितलं होते. टॉलस्टॉयच्या विचारांनी गांधीजींच्या विचारावर एवढा प्रभाव पडला होता की गांधीजींच्या जीवनात आणि विचारांत नंतरच्या काळात घडून आलेल्या परिवर्तनांचा अन्वयार्थ त्यांच्या गुरूच्या जीवनातून आणि तत्त्वज्ञानाच्या माध्यमातूनच लावता येऊ शकतो. त्यांचा प्रभाव गांधीजींच्या जीवनावर आणि धार्मिक विचारांवरच पडला असं नाही तर गांधीजींच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक

प्रश्नांविषयीच्या विचारसरणीवरही पडला. टॉलस्टॉय यांच्या प्रभावामुळे भारताची प्राचीन आध्यात्मिक सत्येही गांधीजींना नव्या अर्थांसह स्पष्टपणे कळली. त्यांच्या गुरूनं पाया घातलेल्या विज्ञानाचा विकास करण्यासाठी व त्याचा सर्व क्षेत्रात उपयोग करण्यासाठी त्यातील तयार सूत्रे त्यांच्या आयतीच उपयोगी पडली.

२

कौंट निकोलाय इलियिच लिओ टॉलस्टॉय हे पाच भावंडातील शेवटचे होते. ऑगस्ट २८, १८२८ला म्हणजे नवीन पद्धतीच्या कालगणनेनुसार सप्टेंबर ९ला त्यांचा जन्म झाला होता. जेमतेम तीन वर्षांचे असताना त्यांची आई वारली होती. सहा वर्षांनंतर त्यांचे वडीलही वारले. त्यामुळे त्यांचं संगोपन त्यांच्या काकूंनी केलं. ती स्वतः अतिशय पवित्र स्त्री होती. तरुणाच्या चारित्र्यघडणीसाठी विवाहीत स्त्रीच्या संपर्काची जेवढी मदत होते तेवढी इतर कोणत्याही गोष्टीची होत नाही अशी तिची धारणा नसल्यामुळे आपल्या पुतण्याच्या चारित्र्याला घडवणारी ही बाजू नीट राहील याची तिनं काळजी घेतली.

लिओंनी जीवनाला गांभीर्यानं घेतलं. 'व्याधिमुक्त, सुखीसंपन्न आणि क्रोधरहित वातावरण असलेला स्वर्ग भूमीवर अवतरल्याची त्यांच्या अतिशय प्रिय लाडक्या भावानं जी कल्पना केली होती ती त्यांच्या बालपणाची अगदी सुरुवातीची आठवण होती. निकोलायनं आपल्या भावांना अतिशय गंभीरपणे सांगितलं होतं की माझ्याजवळ एक गुपित आहे, व जर ते सर्वांना कळलं तर सर्व माणसं सुखी होतील - सर्वजण मुंग्यांप्रमाणे बंधुभावानं राहतील आणि एकमेकांवर प्रेम करतील. मुख्य गुपित मात्र त्यानं कुणाला काही सांगितलं नाही. त्यानं सांगितलं की मी ते एका 'हिरव्या काठी' वर लिहिलं आहे आणि ती काठी जंगलातील एका ओहोळाजवळ कुठं तरी लपवली आहे. तिच्या आधारानं सर्व माणसं 'कायमची सुखी होतील. त्याच्या नेतृत्वाखाली टॉलस्टॉय मुलं अँट ब्रदरहुडचा खेळ खेळायचे. ते जेव्हा 'शालींनी झाकलेल्या खुर्चा आणि पेट्यांच्याखाली काळोखात एकमेकांना घट्ट धरायचे तेव्हा त्यांच्या अंतःकरणात

एकमेकांबद्दलचा वेगळाच जिव्हाळा निर्माण व्हायचा.' टॉलस्टॉय यांनी लिहिलं आहे की माझ्या जीवनातील प्रेमाचा तो पहिला अनुभव होता, 'कोणत्याही व्यक्तीबद्दलचं प्रेम नाही तर प्रेमाबद्दलचं प्रेम.' [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, जॉन लॉगमन, लंडन, (१९४९), पृष्ठ ३५] स्वतःत सुधारणा करायच्या आणि परिपूर्ण व्हायच्या त्यांच्या तीव्र इच्छेचा अंत कधीच झाला नाही. वयाच्या सत्तराव्या वर्षी रिकलेक्शन्समध्ये त्यांनी लिहिलं

....त्यावेळी कुठं तरी हिरवी काठी आहे व तिच्यावर काही तरी लिहिलेलं आहे व त्यामुळे माणसांतील सर्व अनिष्टांचा नाश होईल व त्यांना फार मोठं वरदान मिळेल यावर माझा विश्वास होता. त्याचप्रमाणे आताही माझा विश्वास आहे की अशा प्रकारचं सत्य लोकांमध्ये अस्तित्वात आहे व ते त्यांच्यासमोर प्रगट होईल व त्यानं आश्वासिलेली प्रत्येक गोष्ट ते त्यांना पुरवील. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३६]

कझान विद्यापीठातून मॅट्रिकच्या परीक्षेत सोळाव्या वर्षी उत्तीर्ण होऊन पौर्वात्य भाषेतील पदवी परीक्षेसाठी त्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला. १८४७ साली कोणतीही पदवी न घेता कायद्याचं सर्वसाधारण प्रशस्तीपत्र घेऊन विद्यापीठातून ते बाहेर पडले. अंदाजे याच काळात कझान येथील सार्वजनिक रुग्णालयात गुप्तरोगावरील उपचार घेत असताना - ज्याची लागण सामान्यपणे जशा प्रकारच्या ठिकाणी होत असते तशा ठिकाणी झाली होती - त्यांची भेट रशियन मंगोलियातील बुरियत लामा यांच्याशी झाली व त्यांच्याकडून त्यांनी बौद्ध धर्म समजावून घेतला. त्यावेळी ते १९ वर्षांचे होते.

स्वतःला शिक्षित करायचं आणि शेती व गुलाम यांच्याकडे प्रागतिक पद्धतीनं स्वतःच लक्ष द्यायचं असं ठरवून ते यास्नाया येथील आपल्या इस्टेटीच्या ठिकाणी राहायला गेले, पण ते काही त्यांना जमलं नाही. १८५१ साली सैन्यात नाव मिळवायच्या आकांक्षेनं 'सभ्य स्वयंसेवक' म्हणून त्यांनी तोफखान्यात नाव नोंदवलं व तीन वर्षांनंतर त्यांना सैन्यातील अधिकारपद मिळालं व त्यांना क्रिमियन युद्धाच्या वेळी सेवॉस्टोपॉल येथे नियुक्त करण्यात आलं. वेढा उठेपर्यंत ते तिथं

राहिले. जिथून शत्रू केवळ २०० यार्डाच्याच अंतरावर असतील अशा चौथ्या तटबंदीच्या किल्ल्यावर मृत्यूच्यासमोर उभं राहून आपल्या धैर्याचा त्यांनी आगळाच परिचय दिला.

सेवॉस्टोपॉल येथील वेढ्याच्या काळात त्यांनी लिहिलेल्या अनेक कथा आणि व्यक्तिचित्रे तसंच वेढ्याच्या काळातील जीवनाचं त्यांनी केलेलं वर्णन यांमुळे त्यांच्याकडे झार अलेक्झँडर दुसरे यांचं लक्ष वेधलं गेलं आणि 'या तरुण माणसाला जपावं म्हणून त्यांनी निरोप पाठवला.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १३५]

१८५७ साली त्यांनी सैन्यातून राजिनामा दिला आणि तीन हिवाळे ते मॉस्कोत राहिले. त्यांच्या *चाईल्डहुड* या प्रकाशित झालेल्या पुस्तकानं त्यांना आधीच प्रसिद्धी मिळवून दिली होती. त्यांच्या काळातील साहित्यिकात त्यांना प्रसिद्धी मिळाली व त्यामुळे आपल्या सैल नैतिकतेचं समर्थन करायला त्यांना एका तत्त्वज्ञानाचा आधार मिळाला. समाजाच्या ऐषआरामी जीवनाला ते पूर्णपणे शरण गेले. तत्कालीन साहित्यिकात प्रचलित असलेल्या हुल्लडबाजीच्या भोवऱ्यात त्यांनी सरळ सूर मारला; ते दुपार व्यायामात घालवत आणि सूट आणि पांढरा टाय चढवून सायंकाळच्या पार्थ्यांना उपस्थित राहत. 'रात्रभर मौजमजा करणं, दारू पिणं, पत्ते खेळणं आणि भटकणं असा त्यांचा कार्यक्रम असायचा.'

त्याच वर्षी ते विदेशात गेले आणि पुन्हा १८६० साली त्यांनी परदेशवारी केली. युरोपमधील काही काळाच्या मुक्कामात त्यांची अनेक विद्वानांशी भेट झाली आणि तिथून ते परतले तेव्हा त्यांची परिपूर्णतेवरील आणि प्रगतीवरील श्रद्धा वाढलेली होती. त्यांनी न्यायाधीशाचं पद स्वीकारलं, १८६१च्या मुक्ततेच्या कायद्यानुसार जमीनदार आणि वेठबिगार यांच्यातील वाद मिटवण्याचं काम त्यांनी केलं, 'आपल्या दृष्टिकोनानुसार संस्कृतीच्या कृत्रिम दर्जावर उच्च मूल्यांचा नैसर्गिक प्रकाश टाकायच्या दृष्टीनं' शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी शाळा काढली व आपल्या शिक्षणविषयक सिद्धान्तांना प्रत्यक्षात आणायच्या प्रयत्नाला सुरुवात केली. परंतु लवकरच त्यांनी न्यायाधीशपद आणि शाळा या दोघांचाही त्याग केला.

ते आपल्या कन्फेशनमध्ये सांगतात की यास्नाया पोल्याना येथे वास्तव्य करण्याआधी 'मी ज्ञात असलेले सर्व प्रकारचे अपराध केले होते व तरीही समाजात तुलनात्मक दृष्टीनं मी नैतिक माणूस म्हणून ओळखला जात होतो.' कौंट लेव्ह एन. टॉलस्टॉय, *लेटेस्ट वर्क्स, लाईफ, जनरल इन्डेक्स, बिब्लिओग्राफी*, अनुवादक लिओ विनर, डेना ईस्ट्स अँड कंपनी, बोस्टन, (यु.एस. ए.) (१९०५), पृष्ठ २४० पॅरीसमधील अल्प मुक्कामात त्यांनी फासावर चढवायचं जे दृश्य पाहिलं त्यामुळे त्यांचा प्रगतीच्या निर्दोषत्वावरील विश्वास उडाला आणि तोच त्यांच्या छछोर सामाजिक जीवनातील परिवर्तनाचा क्षण ठरला. ज्या निकोलाय या भावावर त्यांची भक्ती होती व ज्याला त्यांच्याबद्दल तेवढाच आदर वाटत होता त्याच निकोलायचा मृत्यू सप्टेंबर १८६० साली अती दारू प्याल्यामुळे अक्षरशः त्यांच्या हातात झाला. त्यामुळे त्यांच्या अंतर्मनात एक संघर्ष सुरू झाला. रशियन कवी फेट यांना पाठवलेल्या पत्रात आपल्या भावाच्या मृत्यूचा उल्लेख करत त्यांनी लिहिलं:

तो जेव्हा सांगायचा की मृत्यूपेक्षा काहीच भयानक नाही तेव्हा तो बरोबर होता..... त्याच्या मृत्यूच्या काही मिनिटे आधी त्याला डुलकी लागली होती, एकाएकी तो उठला आणि भयभीत होऊन कुजबुजला : हे काय आहे? शून्यात विलीन होत असल्याचं त्यानं पाहिलं होतं. आणि त्याला जर धरून ठेवायला काही आधार सापडला नसेल तर मला तरी तो कुठं सापडणार होता? त्याहूनही कमी....

टेनिसन यांची कविता आहे :

सत्यासाठी सत्य, चांगुलपणासाठी चांगुलपणा, सत्य, चांगुलपणा

शुद्ध, न्याय्य

घ्या चिरंतन आनंद यांचा, आणि मग होतात ते

जमीनदोस्त

संपत्ती, प्रतिभा आणि प्रसिद्धी यांच्यापासून मिळणारं सर्व प्रकारचं समाधान यांना काहीच महत्त्व नाही हे एकाएकी टॉलस्टॉय यांच्या लक्षात आलं. त्यांना चिरंतनत्वाचा वेध लागला होता:

घृणास्पद असत्य, स्वतःचीच फसगत, आणि या सर्वांच्या शेवटी शिल्लक राहणारं शून्य अशा प्रकारच्या गोष्टींनी उद्याच्या सकाळची सुरुवात मृत्यूच्या जाचानं जर होणार असेल तर त्याचा आपल्यासाठी काय उपयोग.... उपयोगी व्हा, सदाचारी व्हा व जोपर्यंत तुम्ही जिवंत आहात तोपर्यंत सुखी राहा असं लोक एकमेकांना सांगतात; परंतु तुम्ही, आणि समाधान, आणि सद्गुण आणि उपयोगिता या सगळ्यांचा समावेश सत्यात होतो. आणि या बत्तीस वर्षात मला जे सत्य कळलं ते हे आहे की ज्या अवस्थेत आपण ठेवले गेलो आहोत ती भयानक आहे.... माणूस विकासाच्या सर्वोच्च स्थानी ज्या क्षणी पोहोचतो त्याच क्षणी त्याला कळतं की प्रत्येक गोष्ट गोंधळ आणि फसवणूक आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २३९ 'जोपर्यंत तुमच्यात सत्य जाणून घ्यायची आणि बोलायची इच्छा आहे, तुम्ही जाणून घ्यायचा आणि बोलायचा प्रयत्न करता..... एवढ्यानंच काम भागू शकेल परंतु तुमच्या कलेच्या घाटाप्रमाणे नाही. कला असत्य आहे आणि सुंदर असत्यावर मी प्रेम करू शकत नाही.' (तिरपी अक्षरं माझी)]

त्यांच्यापेक्षा सोळा वर्षांनी लहान असलेल्या सोफिया बेहर या मुलीशी सप्टेंबर १८६२मध्ये त्यांचं लग्न झाल्यामुळे हा पेचप्रसंग पुढील १५ वर्षांच्या दीर्घ काळापर्यंत टाळला गेला. तो काळ त्यांच्यासाठी पूर्ण कौटुंबिक सुखाचा आणि साहित्यिक उद्योगांनी भरलेला होता. याच काळात त्यांनी *वॉर अँड पीस* आणि *अॅना कोरिनिना*सारख्या अजरामर कृतींना जन्म दिला.

वैवाहिक जीवनाच्या ११ वर्षांनंतर १८७३ साली टॉलस्टॉय कुटुंबावर प्रथमच मृत्यूचा घाला आला. त्यांचा मुलगा पिटर एकाएकी वारला. त्यानंतर थोड्याच दिवसात तात्याना या त्याच्या काकूचा मृत्यू झाला आणि लगेच एकामागूनएक अशा रीतीनं त्यांच्या दोन मुलांना आणि त्यांच्या आवडत्या काकूलाही काळानं हिरावून घेतलं. आपल्या ध्येयशून्य, सुखासीन जीवनाबद्दल त्यांना असमाधान वाटायला लागलं. अंतर्मनानं विचारलेल्या प्रश्नांनी त्रस्त होऊन त्यांनी सखोल आणि कठोर आत्मनिरीक्षणाला सुरुवात केली आणि थोड्याच दिवसात त्यांच्या मनात कलेविषयी तिटकारा निर्माण झाला व एक 'सुंदर असत्य' म्हणून त्यांनी कलेचा निषेध

केला. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २३८] आपल्या अन्याय्य आणि दिखाऊ जीवनाबद्दल त्यांच्या मनात घृणा उत्पन्न होऊन अस्तित्वाच्या समस्येचा ते अतिशय गंभीरपणे विचार करू लागले.

ते सांगतात की मी 'आत्महत्या आणि नैराश्य यांच्या काठावर' पोहोचल्यानंतर आजुबाजूच्या जिवंत मानवी समुदायाकडे पाहू लागलो आणि माझ्या लक्षात आलं की मानवाच्या ललाटी काही केवळ नैराश्यच लिहिलेलं नाही. श्रद्धेच्या आधारावर जगणाऱ्या आणि त्यातून जीवनाच्या अर्थाचा वेध घेतलेल्या लोकांना 'मिळणाऱ्या जीवनशक्तीचं आणि शांतपणे जगण्यासाठी आणि मरण्यासाठी मिळालेल्या सामर्थ्याचं' त्यांना दर्शन झालं. त्या गोष्टीचा अर्थ तर्काधारे लागू शकत नव्हता. त्यामुळे परंपरागत श्रद्धाळू माणसं ज्या प्रकारचं जीवन जगतात तशा प्रकारचं जीवन जगायचा त्यांनी मनःपूर्वक प्रयत्न केला. एवढंच नाही तर त्यांच्या भक्तीच्या बाह्योपचाराचाही ते त्याचं प्रकारे अवलंब करू लागले. अशा रीतीनं त्यांच्या 'सामर्थ्यशाली, सुबोध व कुणाच्याही आक्रमणाचा धोका नसलेल्या श्रद्धेचं रहस्य' आपल्यासमोर उलगडेल असा टॉलस्टॉय यांना विश्वास वाटत होता. त्यांनी सामान्य माणसांशी संपर्क वाढवायला सुरुवात केली, मठांचं दर्शन घेतलं, यात्रेकरूत ते मिसळले आणि चर्चमध्येही गेले. ते जसजसे त्यांच्यात मिसळत गेले तसतसं त्यांच्या लक्षात दोन गोष्टी येऊ लागल्या. एका बाजूनं त्यांना अधिकाधिक समाधान मिळेल असा जीवनाचा अर्थ कळू लागला. असं समाधान 'ज्याचा मृत्यूही विनाश करू शकत नव्हता.' दुसरीकडे त्यांच्या लक्षात आलं की अशा प्रकारे बाह्यतः भक्तीची कबुली देण्यात बरीच फसवणूक आहे. अज्ञान, मानसिक जाड्य, आणि जीवनसंघर्षातील अतिशय व्यस्तता यांमुळे ही गोष्ट समाजाच्या लक्षात येत नाही. परंतु टॉलस्टॉय म्हणतात की ही गोष्ट मला दिसल्याशिवाय राहू शकत नाही आणि एकदा ती दिसल्यानंतर त्याकडे मी दुर्लक्षही करू शकत नाही. केवळ ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीतच जीवनाचं सत्य आहे या गोष्टीवर ते फार काळ विश्वास ठेवू शकले नाही. मग अंत कुठं आहे आणि सत्याची सुरुवात कुठं होते? ज्या तत्त्वज्ञानाला ते स्वीकारू इच्छित होते त्या तत्त्वज्ञानाचा शोध घेण्यासाठी त्यांनी ईश्वराचा शोध

घेणाऱ्या आणि धर्माच्या मुळाशी असलेल्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करायला सुरुवात केली. त्यांची खात्री झाली की संघटित चर्च जो धर्म मान्य करते आणि प्रचार करते 'तो केवळ असत्यच नाही तर ती नैतिक फसवणूकही आहे' आणि चर्च ज्या मानवी संघटनेच्या हातात आहे ते लोक सत्यावर आपलाच अधिकार आहे असा दावा करत असतात. त्यामुळे 'ख्रिस्ताची शिकवणूक लोकांना समजण्याच्या मार्गातील ते मुख्य अडथळा झालेले आहेत.' 'तू कुणालाही मारू नकोस' असं ख्रिस्तानं स्पष्टपणे सांगितलं असताना शासनाच्या हातात हात घालून काम करताना माणसांच्या कत्तलीसाठी चर्चनं देवाचे आभार मानलेले आहेत, शत्रूंचा नाश व्हावा अशी प्रार्थना करण्यासाठी प्रार्थना सभांचं आयोजन केलं आहे, आणि सैनिकी विजयासाठी आनंद व्यक्त केला आहे. ह्या आज्ञेला चर्चनं विकृत रूप देऊन त्याचं स्पष्टीकरण द्यायचा प्रयत्न केला आहे. स्वर्गाचं राज्य भूवर अवतरावं म्हणून वैश्विक प्रेमाचं आचरण करायला हवं या तत्त्वज्ञानाऐवजी चर्चनं सांगितलेले आचार म्हणजे बाप्तिस्मा, भोजनोत्सव, आणि 'जगाच्या पापासाठी प्रायश्चित्त म्हणून ख्रिस्तानं भोगलेल्या दुःखांसाठी प्रतीक म्हणून भाग घेणं' आदी आचारांचं आचरण करूनच माणसाचा उद्धार होऊ शकतो अशी अंधश्रद्धा चर्चनं पसरवायचा प्रयत्न केला आहे. समाजामध्ये ख्रिस्तानं ज्या प्रेमाचं, चांगुलपणाचं आणि धीराचं आचरण केलं त्याचा चर्चच्या शिकवणुकीत समावेश नाही तर बायबलमध्ये शिकवलेल्या ख्रिश्चनत्वात आहे.

टॉलस्टॉय यांनी चर्चचा उघड निषेध केला आणि जाहीर केलं की 'संघटित चर्च ख्रिश्चनत्वाचा सर्वात मोठा शत्रू आहे.' त्यांनी स्वतःच हिब्रू आणि ग्रीक भाषांचा अभ्यास केला आणि ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा खरा अर्थ कळावा म्हणून, जो चर्चनं अस्पष्ट करून टाकला होता, मूळ बायबलच्या अभ्यासाला सुरुवात केली. या अभ्यासासाठी टॉलस्टॉय यांना १० वर्ष लागली. (१८७९ ते १८८८) या काळात त्यांनी माय कन्फेशन हे पुस्तक लिहून पूर्ण केलं. (१८७९-८२) 'जीवनाच्या महान समस्यांनी वेढल्यामुळे गोंधळून गेलेल्या माणसाच्या अंतःकरणातून बाहेर पडलेले उदात्ततम आणि अतिशय साहसी उद्गार [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, जॉन लॉगमन, लंडन,

(१९४९), पृष्ठ ३५] असं सायमंड्स यांनी या पुस्तकाचं वर्णन केलं आहे. यातून टॉलस्टॉय यांच्यातील परिवर्तनाची संपूर्ण माहिती मिळते.

आत्मज्ञानातून आलेला संपूर्ण प्रांजळपणा आणि प्रामाणिकपणा यामुळे एक आगळाच आकृतीबंध या ग्रंथात निर्माण झाला आहे. त्याचं गांधीजींनी नंतर आपल्या आत्मकथेत अनुसरण केलं. टॉलस्टॉय सांगतात की माझ्यातील परिवर्तनाची अवस्था तेव्हा आली जेव्हा 'पापाचा प्रतिकार करू नका' (मॅथ्यू ५.३९) हा येशूचा उपदेश मला जेव्हा पूर्णपणे कळला. 'ख्रिस्ताच्या शब्दांचा अर्थ अगदी पहिल्यांदाच मला एकाएकी कळला. मला कळलं की येशू जे सांगतो आहे ते केवळ येशूच सांगतो आहे.' टॉलस्टॉय यांच्या नावाशी जुळलेल्या संप्रदायाचा हाच विचार आधार झाला.

त्यापाठोपाठ टॉलस्टॉय यांनी *क्रिटिसिझम ऑफ डोग्मॅटिक थिऑलॉजी* (१८८०-८२), *द फोर गॉस्पेल्स हॉरमनाईझ्ड अँड ट्रान्सलेटेड* (१८८१-८२), *माय रिलीजन ऑर व्हाट आय बिलीव्ह* (१८८४) ही पुस्तक लिहिली. ह्या सर्वांचं वैशिष्ट्य जळजळीत प्रामाणिकपणा, अंतर्ज्ञान आणि खोलवर पाहायची शक्ती हे होतं. त्यामुळे त्यांच्या टीकाकारांनी धर्मशास्त्रावर मांडलेले विचार तुलनात्मक दृष्टीनं एखाद्या पितळी वाद्यातून काढलेल्या ध्वनीसारखे वाटू लागले.

प्रस्थापित चर्चवर स्पष्टपणे केलेल्या टीकेमुळे, शासनाच्या हिंसेचा धिक्कार केल्यामुळे आणि मृत्युदंडाची शिक्षा येशूच्या शिकवणुकीविरुद्ध आहे असं म्हणून ती रद्द करण्यासाठी त्यांनी आवाहन केल्यामुळे देशातील अधिकारी वर्गाचे कान टवकारले गेले. त्यांचं पुस्तक माय रिलीजन प्रकाशित होताच त्यावर बंदी घालण्यात आली. झार अलेक्झँडर दुसरा याचा खून करणारांना, दहशतवाद्यांना क्षमा करावी म्हणून त्यांनी झारच्या वंशजांना केलेल्या विनंतीमुळे त्यांच्या साहित्यावरील बंधनं अजूनच वाढू लागली. त्यांच्या लेखनाला दडपायचा जेवढा प्रयत्न करण्यात यायचा तेवढ्याच प्रमाणात त्यांची प्रसिद्धी मात्र वाढत गेली.

३

१८८१ साली खानेसुमारीचं काम केल्यामुळे मॉस्कोतील झोपडपट्ट्यातील हीनदीन जीवनाचं त्यांना प्रत्यक्ष दर्शन झालं. हजारो मानवी प्राण्यांना सध्याच्या सामाजिक व्यवस्थेनं अशा प्रकारचं दारिद्र्य आणि घाण यांनी भरलेल्या परिस्थितीत राहायला भाग पाडलं आहे की ज्यातून बाहेर पडायची त्यांच्यासमोर कोणतीच आशा उरलेली नाही. असं असताना 'आमच्यासारख्या थोड्याशा लोकांना' जीवनातील सर्व विलासांचा उपभोग घ्यायचा काय अधिकार आहे असा प्रश्न संतप्त होऊन त्यांनी स्वतःलाच विचारला. ते उद्‌गारले, 'हा असा अपराध आहे की जो एकदाच नव्हे तर वारंवार करण्यात येत आहे आणि.... माझ्या विलासामुळे मी तो सहनच केला नाही तर त्यात मी सहभागीही झालेलो आहे.' [लिओ टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?* अनुवादक अलेमेर मॉड, ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस, लंडन, (१९६०) पृष्ठ १४] आजुबाजूच्या दुर्दैवी परिस्थितीच्या झालेल्या दर्शनामुळे ते दिङ्‌मूढ झाले. परंतु ज्या कुणाशी ते त्यांच्या दुर्दैवी परिस्थितीतून आणि दारिद्यातून बाहेर काढण्यासाठी चर्चा करायचा प्रयत्न करायचे त्याच्या नजरेत अपरिहार्यपणे दिसून येणाऱ्या अविश्वासाची आणि चिडेची तीव्र भावना पाहून त्यांना ती गोष्ट अजूनच खटकायची.

या लाखो लोकांना यातना आणि उपासमारीचं जीवन जगणं भाग पडत असतानाच 'मी.... हजारोंबरोबर आधाशीपणानं मांस आणि मासे खातो आणि जमिनीवर आणि घोड्यांवर गालिचे अंथरतो हे कसं आधी ते त्यांना कळतच नसे.' [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू?*, अनुवादक लिओ विनर, जे. एम. डेन्ट अँड कंपनी, लंडन, (१८८६), पृष्ठ १५] नंतर त्यांच्या हळूहळू लक्षात आलं की या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन उलट्या आणि सरळ बाजू आहेत. त्यांच्या व्हाट शाल आय डू? (१८९६) या ग्रंथात बऱ्याचशा आत्मपरीक्षणानंतर त्यांनी निष्कर्ष काढला की: गरिबांच्या गरिबीसाठी श्रीमंतांचा आळशीपणाच कारणीभूत आहे. श्रम न करणाऱ्या शहरी लोकांनी निसर्गनियमाला डावलून श्रमाची जबाबदारी टाळली आणि नंतर अप्रामाणिकपणाच्या मार्गांनी गावातील मूलभूत निर्मिती करणारांकडून त्याच्या श्रमाच्या फळांची अफरातफर केली व ती फळं शहरांना दिली. त्यांच्या

टेबलवरील काही तुकडे गोळा करता यावे म्हणून त्याच्या मार्गाचं अनुसरण करायला तयार असलेल्या लोकांना त्या श्रीमंतांनी भ्रष्ट केलं. असं करताना त्यांनी कुणाचीही पर्वा न करता केवळ आपल्या विलासाकडे लक्ष दिलं. वास्तवात लांगुलचालन करणाऱ्या त्या लोकांवर श्रीमंतांनी फेकलेले ते तुकडे त्यांच्याचकडून हिरावून घेतलेल्या संपत्तीतील होते. कालौघात हळूहळू आळशी श्रीमंतांचं 'आरामशीर, मोकळं, सुसंस्कृत, सुरक्षित जीवन' पाहून त्या गरिबांनाही 'कमीतकमी कष्ट करावे लागतील आणि इतरांच्या श्रमावर जास्तीत जास्त मजा मारता येईल अशा रीतीनं आपल्या जीवनाची घडण करावीशी वाटू लागली.' लुबाडले गेलेले, भ्रष्ट झालेले आणि मनोधैर्य गमावलेले ते लोक अजूनच गुलामगिरीच्या खोल आणि खोल दरीत ढकलले जातात.

गरिबांच्या मनात श्रीमंताच्या परोपकाराबद्दल अविश्वासाची आणि चीडेची तीव्र भावना का दिसून येते ते आता त्यांच्या लक्षात यायला लागलं. त्यांच्यासाठी काही कल्याणाची गोष्ट करायची असल्यास आधी आपण त्यांना नागवायचा आणि मोह पाडायचा जसा प्रयत्न करत होतो तसं काही करायला नको हे त्यांना कळलं. गरिबांकडून एका हातानं हजारो घ्यायचे आणि त्यांच्यातील जो खूप आवडतो त्याच्या तोंडावर काही कोपेक फेकून मारायचे आणि त्याचं आपण कल्याण करत आहोत असं समजायचं हा आपला विचारच भयानक आत्मवंचना करणारा असल्याचं त्यांच्या लक्षात आलं.

मी माणसाच्या मानगुटीवर बसलेलो आहे, त्याला श्वास घेणं कठीण करत आहे आणि त्याच्या मानगुटीवरून खाली न उतरता मला वाहून न्यायला त्याला भाग पाडतो आहे. मी माझी आणि इतरांची समजूत करून देत असतो की मला त्याच्याबद्दल फार कणव वाटते आहे, त्याच्या परिस्थितीत सर्व मार्गांनी मी सुधारणा करू इच्छितो आहे, परंतु त्याच्या मानेवरून न उतरता.

[वरीलप्रमाणे, पृष्ठ ९६-९७]

'एखाद्या टोळधाडीनं झाडावरील पानन्पानं खाऊन टाकावं आणि तरीही त्या झाडाच्या वाढीची आणि आरोग्याची काळजी आपणच करणारे आहोत' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ९८] असं समजण्यासारखी ही गोष्ट आहे. माझ्याजवळ सहा लाख रुबल असतील व त्यातून मी एक लाख रुबल देत असेन तरी त्या परिस्थितीत मी काही चांगला झालो असं म्हणता येऊ शकत नाही. कारण त्याही परिस्थितीत माझ्याजवळ पाच लाख रुबल वाचतील. 'माझ्याजवळ जेव्हा काहीच शिल्लक राहणार नाही तेव्हाच मी थोडासा चांगला झालो असं म्हणता येईल.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ९२]

हीच गोष्ट संघटित परोपकारालाही लागू होते. जोपर्यंत आपण गरिबाच्या जिवावर जीवनाच्या विशेषाधिकारांचा उपभोग घेत आरामाचं जीवन जगत असतो तोपर्यंत गरिबांसाठी काही दानधर्म करून त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी केलेला प्रयत्न त्यांना ढोंग आणि क्रूरपणानं भरलेला विनोद आहे असं वाटेल.

मी या साध्या निष्कर्षावर पोहोचलो की ज्या जीर्णशीर्ण घोड्यावर मी बसलो आहे त्याची मला खरोखरच कणव वाटत असेल तर आधी मी त्या घोड्याच्या पाठीवरून उतरून पायी चालायला सुरुवात करायला पाहिजे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ १७१]

वैयक्तिक आणि संघटित परोपकारी कृत्यांमुळे दारिद्र्याची समस्या सोडवली जाऊ शकत नाही कारण मुळात पैसा हाच किवा पैशावरील मालकीच आपल्या अवतीभवती दिसणाऱ्या दारिद्र्यासाठी जबाबदार असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. पैसा काय आहे? पैशाच्या स्वरूपाचा शोध घेताना त्यांच्या लक्षात आलं की पैसा श्रमाचं प्रतिनिधित्व करतो, परंतु त्या लोकांच्या श्रमाचं नाही ज्यांच्या मालकीचा तो असतो. उलट पैशावर स्वामित्व सांगणारे लोक स्वतः काहीही काम न करता इतरांच्या श्रमावर पूर्वाधिकार ठेवून त्यांना काम करायला भाग पाडतात. अशा लोकांच्या श्रमाचं प्रतिनिधित्व पैसा करतो. त्यामुळे पैशाचा उपयोग करून जेव्हा गरिबांना मदत व्हावी म्हणून आपण एखादी वस्तू विकत घेतो तेव्हा 'आपण वेगळं काही करत नसून त्यांचं

आपल्यावर जे कर्ज असतं त्यातीलच काही भाग त्याला वा इतर कुणाला देणगी वा दान म्हणून परत करत असतो.'

गरिबांच्या यातना कमी करण्यासाठी मदतकार्य करायचा आपण पूर्वी जो प्रयत्न करत होतो त्यातील मूर्खपणा कळल्यानंतर त्यांच्या स्पष्टपणे लक्षात आलं की तो प्रयत्न वेगळं काही नसून एका गरिबाला दुसऱ्या गरिबाच्या बळावर मदत करायचा तो प्रयत्न होता. एकदा हे कळलं की ज्या लोकांच्या बळावर आपण जगत असतो, आपल्या श्रमानं न कमावलेला पैसा ज्यांच्या जिवावर आपण दुप्पट करतो आणि तरीही त्याला आपण मदत करतो असं जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपल्या शब्दातील विसंगती त्याला दिसू लागते. 'मी घाणीत कानापर्यंत बुडालेलो होतो व इतरांना त्यातून बाहेर काढायचा प्रयत्न करत होतो.' [तिखॉन पॉल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, अनुवादक निकोलस व्रेडन, जोनाथन केप, लंडन, (१९४६), पृष्ठ १४५]

चांगलं काम करणं आणि पैसा देणं या गोष्टी केवळ परस्पर विसंगतच नाहीत तर त्या अगदी वेगळ्या आणि सामान्यपणे विरोधीही आहेत: 'पैसा हा मुळात वाईट आहे आणि त्यामुळे जो कोणी हा पैसा देतो तो वाईट देतो. 'बहुतेक वेळा जो माणूस चांगलं काम करतो तो वाईटापासून म्हणजे स्वतःच्या पैशापासून स्वतःची सुटका करून घेतो आणि म्हणूनच पैसा देणं म्हणजे चांगलं काम करणं हा भ्रम कायम आहे.'

त्यांनी गुलामगिरीचा नवीन प्रकार म्हणून पैशाचा निषेध केला. त्याच्या प्रभावामुळे गरीब माणसाजवळ कर भरण्यासाठी वा भाकरी विकत घेण्यासाठी पैसा नसतो व त्यामुळे त्याला सर्व श्रीमंतांची एकाच वेळी गुलामगिरी करावी लागते, तो सर्वांचा गुलाम होतो.

तो जर त्यासाठी नकार देणार असेल तर मी त्याला कर भरण्यासाठी पैसा देणार नाही, आणि मग तो शरण येईपर्यंत ते त्याला फटके मारत राहतील.... कारण त्याच्याजवळ भाकरीही नसेल आणि शेतीही नसेल. आणि मी त्याला खायला न देता त्याच्या ताकदीबाहेर त्याच्याकडून काम घेत असेन, मी त्याला कामामुळे मारणार असेन तर मला कोणी शब्दानंही हटकणार नाही....

पैसा गुलामगिरीचा नवीन आणि भयानक प्रकार आहे, त्यामुळे गुलाम आणि गुलाममालक दोघंही भ्रष्ट होतात, परंतु तो त्याहूनही वाईट आहे, कारण त्यामुळे गुलाम आणि गुलाममालक यांचे वैयक्तिक संबंध संपुष्टात येतात. [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू?*, अनुवादक लिओ विनर, जे. एम. डेन्ट अँड कंपनी, लंडन, (१८८६), पृष्ठ १५]

मग यावर उपाय काय आहे? जॉन द बॅप्टिस्ट यांनी 'आम्ही काय करावं' या प्रश्नाला जे उत्तर दिलं होतं त्यातून या प्रश्नाचं उत्तर टॉलस्टॉय यांना मिळालं. [तिखॉन पॉल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*] 'आपल्याजवळ एकापेक्षा अधिक कपडे नसावे, पैसा नसावा म्हणजे इतरांच्या श्रमाचा उपयोग करायचा नाही, आणि त्यामुळे आपल्या हातांनी जे काही आपल्याला करणं शक्य असेल ते करायला सुरुवात करणारात आपण पहिले असलो पाहिजे.' आणि ही गोष्ट एक निरक्षर रशियन शेतकरी व्ही. के. स्युटेयेव्ह यांनी टॉलस्टॉय यांच्या लक्षात आणून दिली.

टॉलस्टॉय यांनी स्युटेयेव्ह यांना जेव्हा आपली योजना सांगितली तेव्हा स्युटेयेव्ह यांनी टॉलस्टॉय यांना सांगितलं 'हे सर्व व्यर्थ आहे, तुमच्या प्रयत्नांचा काहीच परिणाम व्हायचा नाही.'

'का?' टॉलस्टॉयनी अविश्वासानं विचारलं. त्यांना वाटलं की स्युटेयेव्ह यांना आपण आपली योजना नीट समजावून सांगितली नसावी. 'बायबलच्या आज्ञेप्रमाणे उपाशी लोकांना जेवू घालण्यात काही चूक आहे काय?'

'मला माहीत आहे, मला माहीत आहे.... परंतु तुम्ही तसं करत नाही.... माणूस तुम्हाला २० कोपेक मागतो. तुम्ही त्याला वीस कोपेक देता. याला दान म्हणतात काय ?.... तुम्ही त्याच्यापासून तुमची सुटका करून घेतली एवढाच याचा अर्थ आहे. त्याला आध्यात्मिक मदत करा.'

मग निराधारांना उपासमारीनं आणि थंडीनं मरू द्यायचं काय? टॉलस्टॉय नेट धरून पुन्हा म्हणाले.

'त्याची काहीच गरज नाही.' तत्त्वज्ञ शेतकरी उद्‌गारला. 'आपण त्यांना (दरिद्री लोकांना) आपसात वाटून घेऊ या.... तुम्ही एक घ्या आणि मी एक घेईन. आपण सोबत कामाला जाऊ

शकतो. त्याला मी कसा काम करतो ते कळेल आणि कसं जगायचं ते त्याला कळेल; आणि आपण एका टेबलवर बसू आणि तो एकदा माझं बोलणं ऐकेल एकदा तुमचं. तो खरा दानधर्म होईल.' [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*]

टॉलस्टॉय यांच्या लक्षात आलं की गरीब लोकांची परिस्थिती सुधारण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे त्यांच्याबरोबर कामाला जाणं आणि नैतिक उपदेशाच्याआधी आपल्या वैयक्तिक आचरणाच्या उदाहरणातून आपल्या प्रामाणिक श्रमानं साधं, सुखी, समाधानी जीवन कसं जगावं हे शिकवणं. चांगलं होण्यासाठी माणसाला चांगलं म्हणजे काय ते शोधावं लागतं आणि त्यासाठी *त्याच्याशी आपण मानवी म्हणजे सामोपचाराचे संबंध जोडले पाहिजे. त्यामुळे चांगलं काम करण्यासाठी पैशाची गरज नाही तर जीवनाची परंपरागतता किमान तेवढ्या काळासाठी का होईना त्यागायची आपली तयारी असली पाहिजे, आपले बूट आणि कपडे मातीनं भरायची भीती आपल्याला वाटायला नको, अंथरुणातील ढेकणं आणि उवा यांचीही आपल्याला भीती वाटू नये, विषमज्वर, डिफ्थेरिया वा देवी, कांजण्यांचीही आपल्याला भीती वाटायला नको; आपल्यात चिंध्या पांघरलेल्या माणसाच्या खाटेवर बसता येण्याची क्षमता पाहिजे आणि एवढ्या आत्मीयतेनं त्याच्याशी बोलता यायला पाहिजे की त्याला वाटावं की बोलणाराला आपल्याबद्दल आदर आणि प्रेम वाटतं आणि तो अभिनयाचा वा आत्मसंतुष्ट होण्याचा प्रयत्न करीत नाही.* [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू?*, अनुवादक लिओ विनर]

वरच्या वर्गातील लोकांची जीवनपद्धती - जिचा त्याग करणं त्यांना शक्य होत नाही - त्यांना असं करण्यापासून परावृत्त करते. त्यांचं समर्थन असं असतं की अस्तित्वासाठी संघर्ष करण्यासाठी व प्रगतीला मदत करण्यासाठी मानवावरील वैश्विक जबाबदारीतून त्यांनी आपली स्वतःची मुक्तता करून घेतली आहे. हे खोटं होतं, परंतु त्यांच्यात सत्याच्या नजरेला नजर भिडवायचं सामर्थ्य नव्हतं आणि त्यामुळे त्यांनी असत्याला सत्य म्हणूनच स्वीकारलं होतं. त्यांचं म्हणणं असायचं की आम्ही विशेष विषयात प्राविण्य मिळवलं आहे, आमचं विशेष असं कार्य

आहे, आम्ही जनतेचा 'मेंदू' आहोत व त्यामुळे आम्हाला खाऊ घालणं, कपडालत्ता व सर्व सुखसोयी पुरवणं जनतेचं कर्तव्य आहे व आमचा तो हक्क आहे. अशा प्रकारच्या श्रमविभागणीशिवाय जगाची प्रगती होऊ शकणार नाही असा युक्तिवाद विज्ञान आणि कलेचे महान पुजारी करत असतात. टॉलस्टॉयनी उत्तर दिलं की हे खरं आहे की मानवी समाजात श्रमविभागणी राहत आलेली आहे आणि भविष्यकाळातही ती कदाचित राहील. परंतु त्याचबरोबर ही वाटणी न्याय्य असावी असं म्हणायचा समाजाला अधिकार आहे.

कला आणि विज्ञानाच्या सेवकांनी खोट्या श्रमविभागणीच्या नावाखाली स्वतःला शारीरिक श्रमापासून वगळलं आणि श्रमिकांच्या पाठीवर ते बसू शकले म्हणून कलेला आणि विज्ञानाला मानवी प्रगतीला हातभार लावता आला हे सत्य नाही. उलट 'कलेच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रात असे काही प्रतिभावंत जन्माला आलेले आहेत की ज्यांनी ह्या संधीचा उपयोग केला नाही म्हणूनच त्यांना मानवी समाजाला प्रगतीपथावर नेता आलं.' [लिओ टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?* अनुवादक अलेमेर मॉड] विद्वानांच्या आणि कलावंतांच्या ज्या वर्गानं श्रमविभागणीच्या खोट्या नावाखाली आणि लोकांना आध्यात्मिक अन्न पुरवायचं अभिवचन द्यायच्या निमित्तानं इतरांच्या श्रमाच्या बळावर आरामशीर जीवनाच्या सुखसोयी पुरवल्या जाण्याची जी मागणी केली त्यामुळे खऱ्या विज्ञानाची आणि खऱ्या कलेची प्रगती झालेली नाही कारण 'असत्यापासून सत्याचा जन्म कधीच होऊ शकत नाही.' [वरीलप्रमाणे]

कलेच्या आणि विज्ञानाच्या माणसांनी आपल्या उपजीविकेसाठी शारीरिक श्रमापासून मुक्ती मिळवल्यानंतर त्यांचा मानवसमाजाच्या कल्याणासाठी हातभार तर लागला नाहीच उलट त्यांच्या वैज्ञानिक आणि कलात्मक कामांमुळे मानवी मूल्यापासून त्यांचा घटस्फोट झाला आणि 'आळशीपणात आणि घातक खेळात त्यांचं रूपांतर झालं.' [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू?*, अनुवादक लिओ विनर]

कला आणि विज्ञान लोकांची सेवा तेव्हाच करू शकतील जेव्हा ते लोक लोकांमध्ये लोकांसारखे राहतील आणि कोणत्याही हक्काची मागणी न करता आपली वैज्ञानिक आणि कलाक्षेत्रातील सेवा समाजाला देऊ करतील व लोकांना ती सेवा स्वीकारायचा वा नाकारायचा आपल्या इच्छेनुरूप अधिकार राहील. [लिओ टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?* अनुवादक अलेमेर मॉड]

टॉलस्टॉय म्हणाले की माणसाचा धंदा वा व्यवसाय काहीही असला तरी आपल्या आणि इतरांच्या जीवनाला आधार मिळावा म्हणून त्याचं पहिलं आणि निःसंशय कर्तव्य निसर्गाशी चाललेल्या संघर्षात सहभागी व्हायचं असतं. [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू?*, अनुवादक लिओ विनर] माणसात सुधारणा करायच्या आधी त्याला जगवणं आवश्यक असतं.

प्रेम मूर्ख असू शकत नाही. कारण एखाद्या माणसावरील प्रेमामुळे तो उपाशी असताना आपण त्याला कादंबऱ्या वाचून दाखवू लागलो वा कपडे नसलेल्या एखाद्या माणसाच्या कानात आपण सुंदर डूल घालू लागलो तर ते तो सहन करणार नाही, त्यामुळे जोपर्यंत काही माणसं उपासमारीनं आणि थंडीमुळे मरत आहेत तोपर्यंत मानव समाजावरील प्रेम आपल्याला सुखवस्तू लोकांचं मनोरंजन करू देणार नाही.

केवळ शब्दातील नव्हे तर वर्तनातील खरं प्रेम, मूर्ख असू शकत नाही - प्रेम ही अशी गोष्ट आहे की जी आपल्याला दृष्टी आणि शहाणपण देते.

आणि त्यामुळे ज्या माणसाच्या अंतःकरणात प्रेमाचा खोलवर शिरकाव झालेला असेल तो चूक करू शकणार नाही उलट प्रेमाच्या माणसाकडून ज्या वर्तनाची अपेक्षा असते तेच तो करील; भुकेल्या माणसाचा जीव वाचवण्यासाठी, वा थंडीत कुडकुडणारी वा डोक्यावर जडभारी वजन असलेली माणसं निसर्गाशी लढत असताना त्यांच्यासाठी जे काही करणं आवश्यक असेल ते तो करील. [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अलेमेर मॉड, ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस, लंडन, (१९२५), पृष्ठ ११-१२]

कलात्मक कार्यात स्वतःला गुंतवून घेण्यासाठी शारीरिक श्रमाच्या कायद्यातून स्वतःची सुटका करून घेऊन आम्ही इतरांची सेवा करत आहोत असं म्हणणं किमान अविवेकीपणाचं तरी आहेच आहे एवढं तर आपण नक्कीच म्हणू शकतो.

'परंतु ही गोष्ट कलेच्या वा विज्ञानाच्या व्याख्येला नाकारणारी वा कमीतकमी सीमित करणारी तर आहेच' असा आक्षेप साहित्यात अर्ध्या हळकुंडानं पिवळा झालेल्या एका पृच्छकानं घेतला. टॉलस्टॉय आपल्या टीकाकाराला उत्तर देत म्हणाले: विज्ञान आणि कला या गोष्टी माणसासाठी तेवढ्याच अपरिहार्य आहेत जेवढं अन्न, पाणी आणि कपडे आवश्यक आहेत आणि एवढंच नाही तर कदाचित त्यापेक्षाही अधिक अपरिहार्य असू शकतील. परंतु जेव्हा माणसाच्या सर्वोच्च श्रेयाशी त्या जुळलेल्या असतील तेव्हाच असं होऊ शकेल. त्यांनी निदर्शनास आणून दिलं की ज्ञानाचं कार्यक्षेत्र इतकं विशाल आणि व्यापक आहे की त्यातील शाखांच्या तुलनात्मक महत्त्वाबद्दल काही कल्पना नसेल तर त्याच्या विविध शाखांच्या व्यापात तो हरवून जाईल. काय आधी करावं आणि नंतर काय हेच त्याला कळणार नाही.

जेव्हापासून मानवजात अस्तित्वात आली आहे तेव्हापासून प्रत्येक देशात या विज्ञानाची निर्मिती करण्यासाठी धडपडणारेणारे शिक्षक झालेले आहेत. सर्व विज्ञानांचा आणि कलेचा 'आधारभूत आणि प्रारंभबिंदु हे विज्ञान आहे. म्हणजे असं की विज्ञान माणसासाठी अत्यावश्यक काय आहे, प्रत्येक माणसाचं आणि मानवजातीचं भवितव्य आणि खरं कल्याण कशात आहे याचा विचार करते. [लिओ टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?* अनुवादक अलेमेर मॉड] या विज्ञानाचा उपयोग इतर सर्व ज्ञानाची व्याख्या करण्यासाठी आणि त्याच्या अभिव्यक्तीसाठी मार्गदर्शक तत्त्वासारखा होतो. [कौंट लेव एन. *टॉलस्टॉय, व्हाट शाल वुई डू?*, अनुवादक लिओ विनर]

सर्व मानवजातीनं हा प्रश्न विचारलेला आहे : 'माझ्या वैयक्तिक जीवनासाठी आणि कल्याणासाठी असलेल्या माझ्या गरजांचा सर्व माणसांच्या कल्याणाची मागणी करणाऱ्या माझ्या सदसद्विवेकबुद्धीशी अथवा माझ्या विवेकाशी सुसंवाद कसा साधावा?' आणि या

प्रश्नाच्या उत्तरामुळे हळूहळू पण सतत जीवनाबद्दलच्या नवीन संकल्पना निर्माण झाल्या व त्यामुळे माणसं आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या अथवा विवेकाच्या मागणीच्या जवळ जाऊ लागले.

आणि त्यामुळे 'माणसाच्या भवितव्यतेच्या वा कल्याणाच्या अभिव्यक्तीशिवाय' कोणत्याही युगात खऱ्या कलेला [वरीलप्रमाणे, पृष्ठ २७९] काहीही अर्थ नसतो. तिनं माणसाला जीवनासंबंधी जे शिक्षण दिलं 'त्यालाच धर्म म्हणतात.'

माणसाच्या भवितव्याच्या आणि कल्याणाच्या विज्ञानाची जागा जेव्हा मनात येईल त्या प्रत्येक गोष्टीच्या ज्ञानानं भरलेल्या विज्ञानानं बळकावली तेव्हा विज्ञानातील दिशा आणि अर्थ या दोन्ही गोष्टी हरवल्या गेल्या.

'मानवता एक सेंद्रीय रचना आहे व तिची उत्क्रांती माणसाच्या प्रगतीच्या नियमानुसार होत असते असा युक्तिवाद तथाकथित विज्ञानाचे लोक करत असतात. टॉलस्टॉय मोठ्यामोठ्या शब्दांनी हबकणारे नव्हते. चिनी लोकांनी 'प्रगती' केली नव्हती परंतु ते अतिशय सुसंस्कृत होते. युरोपिअनांनी तोफा आणि बंदुकीच्या गोळ्यांच्या आधारे प्रगती करायचा प्रयत्न केला. हे संस्कृतीचं चिन्ह आहे काय? यामुळे केवळ वरच्या वर्गाचा लाभ झाला व त्यांनी प्रगतीचं स्तोम माजवलं. जनसमुदायानं या प्रगतीची मागणीही केली नव्हती व त्या तथाकथित प्रगतीचा त्यांना उपयोगही नव्हता.

टॉलस्टॉयनी प्रतिटोला हाणत सांगितलं की प्रगतीच्या धर्मगुरुंच्या म्हणण्याप्रमाणे जर मानव समाज एक सेंद्रिय घटक असेल तर मग त्याच्या प्रत्येक अवयवाची कृती इतर सर्व मानवांच्या वा समाजाच्या हिताची असायला पाहिजे. आधुनिक विज्ञान आणि कला या कसोटीला उतरत नाहीत. ते आपलं काम करू शकले नाहीत आणि करू शकत नाहीत याचं कारण त्यांनी आपली जबाबदारी पार पाडलेली नाही आणि त्यांनी कर्तव्याच्या ठिकाणी हक्काची

स्थापना केली हे आहे. उलटपक्षी वैज्ञानिक आणि कलात्मक कार्याला 'खऱ्या अर्थानं तेव्हाच यश येतं जेव्हा त्यांना अधिकार माहीत नसतात, केवळ कर्तव्यच माहीत असतात.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २८५]

ते पुढं म्हणाले, 'याचं कारण एवढंच आहे की त्याचा गुणधर्म स्वार्थत्यागाचा असतो, त्यामुळे माणूस तिला (कलेला) एवढं महत्त्व देतो.' जे लोक खरोखरच इतरांची सेवा आध्यात्मिक श्रमानं म्हणजे कलेच्या द्वारे करू *इच्छितात ते लोक हे सेवाकार्य पार पाडत असताना नेहमीच यातना सहन करत असतात कारण केवळ यातनांमधूनच, प्रसूतिवेदनांतूनच आध्यात्मिक जगाचा जन्म होत असतो. स्वार्थत्याग आणि यातना हाच विचारवंताचा आणि कलावंताचा वाटा असतो कारण त्याचं ध्येय माणसांचं कल्याण असतं. अनेक जण दुःखी असतात, ते यातना भोगतात आणि नाश पावतात. वाट पाहायला आणि सर्व गोष्टींकडे शांतपणे पाहायला त्यांना वेळ नसतो.*

आपल्याला वाटत असतं त्याप्रमाणे विचारवंत आणि कलावंत ऑलिंपिकच्या उंच प्रेक्षागृहात कधीच बसून राहणार नाही, तो सदैव क्षुब्ध आणि अस्वस्थ असेल. [वरीलप्रमाणे]

तो क्षुब्ध आणि अस्वस्थ असेल कारण त्याला नेहमी वाटत असतं की *आपण समस्या सोडवू शकलो असतो वा असं काही तरी बोलू शकलो असतो की ज्यामुळे आपण लोकांचं कल्याण करू शकलो असतो व त्यांची यातनांतून सुटका करू शकलो असतो. परंतु आपण ती समस्या सोडवायचा प्रयत्नही केला नाही आणि तसं बोललोही नाही आणि उद्या कदाचित फार उशीर झालेला असेल वा त्या वेळी आपण कदाचित नसूही.*

जिथं विचारवंत आणि कलाकार तयार करण्यात येतात त्याच परंपरेत तो शिकलेलाही नसेल.... आणि तिथून पात्रतेचा दाखलाही त्यानं मिळवलेला नसेल; परंतु त्याच्या अंतःकरणात जे रुजलं आहे त्याचा विचार करताना वा ते अभिव्यक्त करताना जो स्वतःला आवरतो आणि

तरीही अंतर्गत आवश्यकता आणि मानवी गरजा या दोन दुर्दम्य शक्तींनी ओढला जाऊन तो त्याची अभिव्यक्ती केल्याशिवाय राहू शकत नाही. [वरीलप्रमाणे]

अशा प्रकारचा माणूस लोकप्रियता, प्रसिद्धी अथवा पैसा यांसाठी कला वा विज्ञानाकडे आकर्षिला जाणार नाही. मानवतेच्या सेवेकरिता स्वतःला समर्पित करण्यासाठी आपल्या आवडीच्या व्यवसायाकडे जाणं अशक्यप्राय झाल्यामुळेच तो तिकडे वळेल.

संघर्षहीन, कशाचीही पर्वा न करणारा, आत्मतुष्ट असा काही विचारवंतांचा वा कलावंतांचा प्रकार नसतो.

आध्यात्मिक कार्य आणि त्याची अभिव्यक्ती.... या गोष्टींची हाक माणसासाठी अतिशय दुःखद असते, ती त्याचा सूळच असतो.... इतरांच्या कल्याणासाठी आणि माणसाच्या अंतर्मनात रुजलेल्या कामासाठी सर्वसंगपरित्याग, आत्मबलिदान करायला भाग पाडणारी अंतःप्रेरणा ही अशाप्रकारच्या हाकेच्या उपस्थितीचं निःसंशय चिन्ह होय.

कोणत्याही प्रकारच्या यातनांचा अनुभव न घेता भौतिक विज्ञानातील तथ्ये शिकवता येऊ शकतात, जगात किती ढेकणं आहेत ते शिकवता येऊ शकतं आणि सूर्यावरील डागांचं निरीक्षण करता येऊ शकतं वा स्वस्त मनोरंजन करणाऱ्या चित्रपटांची निर्मिती करता येऊ शकते. परंतु

सर्वसंगपरित्याग केल्याशिवाय लोकांना त्यांचं कल्याण शिकवता येऊ शकत नाही, त्याचं स्वरूपच मुळी संपूर्ण सर्वसंगपरित्यागाच्या आणि इतरांच्या सेवेच्या स्वरूपाचं असतं आणि ह्या शिकवणुकीच्या अभिव्यक्तीसाठी....

'आधी धर्मगुरू सोनेरी असायचे आणि त्यांचे वाडगे लाकडी. आता वाडगे सोन्याचे झाले आणि धर्मगुरु लाकडी' असं लोक सांगतात.

येशू क्रुसावर का मेला यासाठी फार चांगली कारणं आहेत, आणि यातनामय त्यागामुळे प्रत्येक गोष्ट का जिंकता येऊ शकते यासाठी फारच चांगली कारणं आहेत. [वरीलप्रमाणे पृष्ठ २८६]

खऱ्या विज्ञानाची आणि खऱ्या कलेची दोन चिन्ह निःसंशयपणे असतात – कला आणि विज्ञानाचा सेवक आपलं काम आपल्या लाभासाठी करणार नाही तर स्वार्थत्यागासाठी करील हे त्यांचं पहिलं अंतर्गत चिन्ह आहे. दुसरं चिन्ह बाह्य आहे आणि ते म्हणजे ती निर्मिती ज्यांच्या कल्याणासाठी करण्यात आली असेल त्या सर्वांना ती आकलनीय असायला हवी. [वरीलप्रमाणे]

कला, विज्ञान, साहित्य आणि इतर सर्व सामाजिक कार्य या सर्वांमध्ये त्यामुळे एकीकरण व्हायला पाहिजे आणि त्यांनी आपल्या अर्थाचा शोध धर्मातून घ्यायला पाहिजे. त्यांच्या अस्तित्वाचं समर्थन तेव्हाच करता येऊ शकतं जेव्हा ते धर्माची मूलभूत मागणी पूर्ण करतात. ती मागणी आहे कारणांच्याही कारणाची निश्चिती करणं व त्याद्वारे आपल्या बांधवांशी आपले संबंध निश्चित ठरवणं. 'त्या सर्वांना सिंहासनावर बसवताना एकाही माणसाला शारीरिक, नैतिक अथवा मानसिक यातना व्हायला नको. त्यानंतर अशी वेळ येईल की त्या सर्वांना आपलं नियत कार्य पार पाडता येईल. तो पर्यंत नाही.' [कौंट लेव टॉलस्टॉय, *लेटेस्ट वर्क्स*, पृष्ठ २९८] ज्या प्रमाणात ते या सर्वव्यापी आणि सर्वसमावेशक कायद्यापासून स्वार्थी हेतूंसाठी दूर जातील त्या प्रमाणात ते या सर्वांचा निषेध करावा लागेल.

अखेरीस टॉलस्टॉय यांनी आपल्या *'व्हॉट् इज आर्ट?'* या पुस्तकात सौंदर्यशास्त्राच्या सिद्धान्तांचं विवेचन केलं. माणसाचं उच्चतर कल्याण हाच सर्व कलात्मक कार्य आणि त्याच्या संघटनेचा पाया आहे या तत्त्वापासून त्याची सुरुवात झाली आहे.

अशा वेळी यातील खोटेपणाची जाणीव झाली असूनही परिस्थितीमुळे जे पांगळे झाले आहेत त्यांनी काय करावं?

सर्वप्रथम यांचं उत्तर आहे त्यांनी स्वतःशी वा इतरांशी खोटेपणा करू नये, वेगळ्या शब्दांत सांगायचं तर त्यांनी सत्याला घाबरू नये. काहीही झालं तरी 'सदसद्विवेकबुद्धीनं आणि तर्कानं काढलेल्या निष्कर्षांना लपवण्यासाठी' त्यांनी कारणं शोधू नये वा इतरांनी शोधलेल्या कारणांचा स्वीकार करू नये. सत्य आणि सदसद्विवेकबुद्धी जिथं कुठं नेईल ते ठिकाण, असत्याच्या आधारे आपण जिथं जाऊ त्या ठिकाणापेक्षा कितीही कल्पनारम्य वाटलं तरी निश्चितच वाईट असू शकणार नाही असा त्यांना पूर्ण विश्वास असायला हवा. त्यांनी आपल्या श्रद्धेसाठी सर्व जगासमोर एकट्यानं उभं राहायला घाबरू नये. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट ही आहे की आपली चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी आपलं पाऊल मागं घ्यायला हवं.

जर माणूस चुकीच्या मार्गालाच खरा मार्ग समजून पुढं जाऊ लागला तर त्या मार्गावरील त्याचं प्रत्येक पाऊल त्याला त्याच्या ध्येयापासून दूर नेईल. या चुकीच्या मार्गावर दीर्घ काळ चालत राहिल्यानंतर माणसाच्या जर लक्षात आलं वा त्याला सांगण्यात आलं की तो चुकीचा मार्ग आहे तर आपण किती काळ या मार्गावर भरकटत राहिलो याचा घाबरून तो विचार करू लागतो आणि काही तरी करून याच मार्गानं चालत राहून योग्य रस्त्यावर येऊच असा तो विचार करू लागतो. परंतु तो तिथं कधीही पोहोचणार नाही हे निश्चित असते. माणूस जर सत्याला बिचकला व ते दिसूनही त्याला ओळखायला त्यानं नकार दिला तर तशा परिस्थितीत त्यानं काय करायला पाहिजे हे त्याला कधीही कळू शकणार नाही. [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू देन?*, अनुवादक लिओ विनर पृष्ठ २९१-९२]

'आपण काय करायला पाहिजे' या प्रश्नाचं बरोबर उत्तर शोधण्यासाठी आपण आपलीच स्वतःची फसवणूक करू नये हे तर खरं आहेच परंतु त्याशिवाय अगदी खऱ्या अर्थानं आपण पश्चात्तापही करायला पाहिजे. जोपर्यंत आपण खऱ्या अर्थानं पश्चात्ताप करणार नाही आणि स्वतःचं खोटं मूल्यन करत राहू तोपर्यंत आपल्याला ज्या जीवनाचं शुद्धीकरण करायचं आहे ते जीवन असत्याच्या किती मोठ्या भागावर आधारित आहे ते कळू शकणार नाही व आपण त्याचा त्याग

करणार नाही. जोपर्यंत माणूस स्वतःला 'विशेष' माणूस समजत राहील, 'प्रतिभासंपन्न, सुसंस्कृत आणि अलौकिक' समजत राहील तोपर्यंत तो असा प्रश्न विचारत राहील : 'एवढं ज्ञान आणि कौशल्य संपादित केलेल्या माझ्यासारख्या उत्कृष्ट लेखकानं आपल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा मानवसेवेसाठी कसा उपयोग करावा?' ह्या प्रश्नाची मांडणीच चुकीची झाली आहे व त्यामुळे या प्रश्नाचं बरोबर उत्तर मिळूच शकत नाही. हा प्रश्न मांडायच्या आधीच या प्रश्नात माणसाची सेवा करण्यासाठी आपण काही तरी करू शकतो असं खरं पाहता गृहीत धरण्यात आलेलं आहे. खरं पाहता हा प्रश्न असा असायला पाहिजे : 'आतापर्यंत इतरांच्या श्रमांवर बांडगुळासारखं स्वार्थीपणाचं सुखलोलूप जीवन जगल्यामुळे श्रमाची सवय राहिलेली' नसताना ज्यांनी मला आतापर्यंत खायलाप्यायला घातलं, कपडेलत्ते दिले त्यांच्या ऋणाची परतफेड करण्यासाठी मी काय करायला पाहिजे? आपणच जनतेचं कल्याण करणारे आहोत असा स्वतःविषयीचा समज करून घेण्याऐवजी जनतेवर आपण अन्याय केलेला आहे आणि आपण आपल्या हातून जनता अपमानित झाली आहे व त्यामुळे आपण 'पूर्णपणे अपराधी, वाया गेलेलो आणि निरुपयोगी माणूस आहो' असं त्यानं समजायला पाहिजे. [वरीलप्रमाणे पृष्ठ २९४]

ज्या क्षणी माणसाच्या हे लक्षात येईल त्या क्षणी त्याची अडचण दूर होईल; आणि आतापर्यंत कठीण आणि जटिल वाटत असलेल्या प्रश्नांच्या उत्तराच्या 'सोपेपणानं' तो 'आश्चर्यचकित होईल'. [वरीलप्रमाणे पृष्ठ २९८] 'आपण काय करायला पाहिजे याच्या अंतिम उत्तरात आपल्याला कोणतेच हक्क नसतात, केवळ कर्तव्येच असतात असं त्याला आढळून येईल. संपत्तीच जगातील यातना, स्खलन आणि संघर्ष यासाठी कारणीभूत आहे. लोकांनी खाजगी संपत्ती आणि पैसा बाळगायच्या हक्काचा त्याग करायची वेळ येईपर्यंत - ज्या हक्कासाठी त्यांना बळावर अवलंबून राहावं लागतं - त्यांनी इतरांच्या श्रमाचा शक्य तेवढा कमी उपयोग घेतला पाहिजे. त्यांनी आपलं जीवन साधं करायला पाहिजे, गरजा कमी करून त्यांना शेतकऱ्यांच्या पातळीवर आणायला पाहिजे. चूल, चहाचं भांडं, पाणी, कपडे इत्यादी ज्या जीवनावश्यक

गोष्टींशिवाय त्याचं भागूच शकणार नाही त्या गोष्टींच्या बाबतीत त्यानं स्वावलंबी व्हायला पाहिजे. याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वतःसाठी लागणारं धान्य. ते त्यांनं स्वतःच्या श्रमांनी पिकवायला पाहिजे आणि संपत्ती, शिक्षण अथवा कौशल्य यामुळे मिळालेल्या विशेषाधिकारांमुळे निर्माण होणाऱ्या अमानवीय परिस्थितीची आणि अन्यायाची इतर लोकांना जाणीव करून द्यायला पाहिजे. यानंतर त्याच्याजवळ काही वेळ वाचणार असेल तर त्यानं मानवतेची सेवा करून इतरांच्या गरजा पूर्ण करायचा प्रयत्न करायला पाहिजे.

१८९१-९२ साली टुला येथील दुष्काळाचं काम केल्यानंतर त्यांनी आपल्या कामाचा जो 'अहवाल' तयार केला होता त्याच्या 'उपसंहारात' त्यांनी श्रीमंत वर्गासमोर दोनच मार्ग आहेत असं लिहिलं होतं. आम्हांला ज्या काही सोयीसवलती मिळालेल्या आहेत त्यासाठी गरिबांना जरी रक्त आणि अश्रू ढाळावे लागले तरी आम्ही त्या कायम ठेवणारच असं ते म्हणू शकतात अथवा खोटं बोलण्याया पर्याय ते स्वीकारू शकतात. व्यर्थ पश्चात्ताप व्यक्त करणं बंद करून गरिबांच्या परिस्थितीत बदल घडवून आणायच्या गप्पा मारणं बंद करायला पाहिजे. त्यांनी लक्षात ठेवायला पाहिजे की ते 'लोकांकडून घेत असलेला मद्याच्या प्रत्येक प्याल्यामुळे, खात असलेल्या साखरेच्या, लोण्याच्या वा मांसाच्या प्रत्येक कणामुळे श्रमिकांच्या तोंडातील घास तेवढ्याच प्रमाणात हिरावून घेतला जात असतो आणि त्यांच्या श्रमात ते तेवढीच भर घालत असतात.' [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, पृष्ठ १२५] ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांना मिळत असलेल्या विशेष सोयीसवलतींचा त्यांनी त्याग करायला पाहिजे. तसं केल्यानंतर लोकांशी बरोबरीच्या नात्यानं वागायला पाहिजे आणि त्यांच्यासह ईश्वरी कृपाप्रसादानं मिळणाऱ्या गोष्टींची वाटणी करायला पाहिजे. आतापर्यंत त्यांचा सल्ला न घेता तुम्हाला हवं ते त्यांना तुम्ही पुरवत होता व त्याच्या मोबदल्यात 'त्यांना यातना आणि व्यथा भोगायला लावून त्यांच्याजवळील पैसा तुम्ही हिरावून घेत होता. [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, पृष्ठ १२६-२७]

आधी टॉलस्टॉय यांना भीती वाटत होती की त्यांच्या योजनेची अंमलबजावणी लोकांना विचित्र वाटेल आणि लोक त्यांना विक्षिप्त समजतील. परंतु त्यांच्या योजनेतील वैचित्र्य केवळ आठवडाभरच पुरलं हे पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. त्यानंतर ते आपल्या पूर्वीच्याच परिस्थितीकडे वळले असते तर लोकांना आणि त्यांनाही ते विचित्र वाटलं असतं.

आपण जर कष्टकरी जीवनाचा अवलंब केला तर आपल्याला साहित्यिक कार्याला मुकावं लागेल अशी टॉलस्टॉय यांना भीती वाटत होती. परंतु घडलं उलटंच. शारीरिक श्रमामुळे त्यांच्या मानसिक कार्याला अजून जोम आला व त्याची गुणवत्ताही वाढीस लागली.

ठराविक साच्याच्या प्रश्नाला त्यांनी मिळवलेलं उत्तरही तेवढंच अनपेक्षित होतं: श्रमाच्या महासागरातून तुमच्या वैयक्तिक श्रमाद्वारे तुम्ही शोषून घेतलेल्या एका नगण्य बिंदुएवढ्या श्रमामुळे कोणता फरक पडणार आहे? मला शारीरिक श्रमाच्या जीवनपद्धतीची सवय लावून घ्यायला पाहिजे. तसं करताना माझ्या लक्षात आलं की आळशीपणाच्या माझ्या काळात माझ्या गरजा आणि मला जडलेल्या बहुतेक महागड्या सवयी कोणताही प्रयत्न न करता आपोआप नाहीशा झाल्या. 'ज्या प्रमाणात माझे श्रम अधिक उपयुक्त होऊ लागले त्या प्रमाणात इतर लोकांच्या श्रमांची माझी मागणी कमी होऊ लागली आणि स्वाभाविकपणेच कोणताही प्रयत्न न करता आणि काहीही न गमावता मी अशा साध्या जीवनाकडे जाऊ लागलो की ज्याची श्रमाच्या कायद्यावर आधारित जीवनाचा अंगीकार केल्याशिवाय मी कल्पनाही करू शकत नव्हतो.' [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू देन?*, अनुवादक लिओ विनर पृष्ठ ३०१] कठोर परिश्रमांची सवय नसल्यामुळे तुमच्या प्रकृतीवर त्याचा विपरीत परिणाम होईल असं मत प्रसिद्ध डॉक्टरांनी दिलं होतं. परंतु तसं न होता त्या जीवनपद्धतीमुळे टॉलस्टॉय यांच्यात अधिक जोम व उत्साह आला आणि त्यांना अजूनच ताजंतवानं वाटायला लागलं.' [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू देन?*, अनुवादक लिओ विनर पृष्ठ ३०१]

आपल्या बुद्धीच्या अचाट सामर्थ्यानं आपल्या टीकाकारांच्या अनेक आक्षेपांची कल्पना करत टॉलस्टॉय यांनी त्यांच्या प्रश्नाची उत्तर देऊन त्यांच्या खास युक्तिवादातील दोष, अवास्तवता

आणि अप्रामाणिकपणा दाखवून दिला. समाजाचं संचालन ज्या ऐतिहासिक प्रक्रियेनं होतं त्यात हस्तक्षेप केल्यामुळे लाभ न होता अजून नुकसानच होणार नाही काय? तसंच समाजातील महत्त्वाच्या माणसांनी - मंत्री, संसदसदस्य, विद्वान लोक, कलावंत आणि वैज्ञानिक इत्यादींनी- आपला वेळ आपले कपडे धुण्यात, समाजाच्या गरजेकडे दुर्लक्ष करून नांगरण्यात, पेरण्यात वाया घालवणं उचित होईल काय? या प्रश्नांचं उत्तर देताना टॉलस्टॉय म्हणाले की 'माणसाच्या जाणिवेतील अतिशय सूक्ष्म बदलांमुळेच' त्याच्यातील महान बाह्य परिवर्तनाला सुरुवात होत असते. 'महान आणि खऱ्या कृती या नेहमीच साध्या आणि मर्यादशील असतात.' आपण ज्या वातावरणात राहतो त्या वातावरणातील विसंगती ज्या कृती दूर करतात त्या अगदी अशाच 'मर्यादशील, न जाणवणाऱ्या आणि वरवर हास्यास्पद असतात : आपल्या स्वतःला आपणच मदत करणं, स्वतःसाठी आणि जमल्यास इतरांसाठी शारीरिक श्रम करणं, आपल्याला जर आपल्या दुर्दैवाची जाणीव झाली..... व ज्या परिस्थितीत आपण सापडलो आहोत त्यांतील धोका आपल्याला जाणवला तर ती आपली जबाबदारीच आहे असं आपल्या लक्षात येईल. [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू देन?*, अनुवादक लिओ विनर पृष्ठ ३१७]

पाचपंचवीस माणसांनी आपल्या जीवनात अशा प्रकारचं परिवर्तन केलं तर काय फरक पडेल? असा प्रश्न काहींनी केला. त्यावर टॉलस्टॉय यांचं उत्तर होतं :

जे घडेल ते असं असू शकेल : एक वा दोन वा तीन डझन माणसं कुणाशीही संघर्ष न करता, सरकार वा क्रांतिकारकांद्वारे हिंसा न करवता जगासमोर उभी असलेली व वरवर न सोडवण्यासारखे वाटणारे प्रश्न आपल्यापुरते सोडवतील; आणि ते अशा प्रकारे सोडवतील की.... त्यामुळे दडपशाहीची भीती त्यांना यापुढे घाबरवणार नाही; इतर लोकांना दिसून येईल की ज्या श्रेयाचा शोध ते सर्वत्र घेत होते ते श्रेय इथं त्यांच्याजवळच आहे.... आणि आपल्या आजुबाजूच्या माणसांना घाबरण्याऐवजी त्यांच्याजवळ जाणं आणि त्यांच्यावर प्रेम करणं आवश्यक आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३१७-१८]

जो जमाव आपलं ऐकायला तयार नाही अशा प्रकारच्या जमावात आपण काय करू शकतो या सबबीला टॉलस्टॉय यांचं उत्तर असं होतं: जे लोक अशा प्रकारचं अनैतिक कृत्य करतात त्यांना त्यातील चूक याहून वेगळ्या पद्धतीनं दाखवता येऊ शकत नाही. प्रवाहाविरुद्ध नाव ओढणाऱ्या टोळीच्या लोकांमधील एखादा नाव ओढणारा माणूस नाव ओढताना आपल्याला तसं करणं शक्य नाही असं म्हणून एकटाच नाव ओढायला नकार दिला असेल तर तो अप्रामाणिक वा मूर्ख माणूस असल्याचं ठरेल. नाव ओढणाऱ्या प्रत्येकाला माहीत असतं की नावेला बांधलेल्या दोराला धरलेले हात तर त्यांनी सोडायला नकोच पण त्याचबरोबर प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनं नावेला ओढायला पाहिजे. जी गोष्ट नाव ओढणारांसाठी खरी आहे तीच गोष्ट मानवसमाजासाठीही खरी आहे. प्रत्येक माणसाला माहीत असतं की आपल्या सर्वांच्या मालकानं सांगितलेल्या दिशेनं, त्याच दिशेनं इतरही आपली नाव ओढतील अशी श्रद्धा ठेवून, आपण आपली नाव ओढायला पाहिजे.

आपल्याला ज्या दिशेनं जायचं आहे ती दिशा एकच आणि समान आहे हे प्रत्येक माणसाला कळावं म्हणून सर्वांना एकच बुद्धी देण्यात आलेली आहे. प्रत्येक माणसाच्या जाणिवेत, आणि माणसाच्या सूज्ञपणाच्या संपूर्ण आविष्कारातून संपूर्ण जीवनभर ही दिशा इतक्या स्पष्टपणानं, इतक्या निःसंदिग्धपणानं सांगण्यात आली आहे की ज्याला काम करायची इच्छा नाही तोच म्हणेल की मला दिसू शकत नाही. [वरीलप्रमाणे पृष्ठ ३२५]

यातून काय निष्पन्न होणार आहे या अखेरच्या प्रश्नाला त्यांचं उत्तर होतं:

तो अशा विचारांची एक दोन माणसं आपल्याकडे ओढेल; त्यांच्याकडे पाहून तिसरा माणूस येऊन त्यांच्यात सहभागी होईल, अशा रीतीनं उत्तम माणसं येऊन त्यांच्यांत तोपर्यंत सहभागी होत राहतील. मग अशी वेळ येईल की हे काय चालू आहे आणि कशासाठी चालू आहे हेही ज्यांना कळत नाही त्यांनाही यात सहभागी व्हावंसं वाटेल.

ज्या माणसांना ईश्वराच्या कायद्याची जाणीवपूर्वक परिपूर्ती करावीशी वाटते त्यांच्यात अर्धवट श्रद्धा असलेले लोकही सहभागी होतील व मग त्यांनाही त्याच गोष्टीची जाणीव होईल. ही माणसं सहभागी झाल्यानंतर असे लोक त्यात सहभागी होतील की ज्यांची श्रद्धा या श्रद्धावंतांवर असेल, व अखेरीस बहुतेक लोकांना या गोष्टीची जाणीव होईल आणि नंतर सर्व माणसं पळणं थांबवतील आणि त्यांना सुखाचा शोध लागेल. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३२३]

जो माणूस कामाला आपला व्यवसाय समजणं आणि त्यात जीवनाचा आनंद मानणं शिकला आहे, त्याच्या जीवनाचा अर्थ 'त्याला श्रमामध्ये गवसेल, श्रमाच्या फळात नाही आणि संपत्ती गोळा करण्यातही नाही.' इतरांच्या कामाच्या आधारे तो स्वतःची कामातून मुक्तता करून घ्यायची इच्छा करणार नाही. जसजसा तो कौशल्य, चपळपणा आणि सहनशक्ति मिळवत जाईल तसतसं त्याला अधिक काम करावंसं वाटत जाईल. काम करण्यासाठी आपण कोणत्या साधनांचा उपयोग करतो याची तो पर्वा करणार नाही. तो स्वाभाविकपणेच अधिकात अधिक उत्पादन देणाऱ्या साधनांची जरी निवड करील तरी साध्या हातांनी जरी काम करायची वेळ आली तरी त्याला त्या कामात तेवढंच समाधान मिळेल. 'जर तिथं वाफेच्या एंजिनवर चालणारा नांगर असेल तर तो त्याचा वापर करील, जर काहीच नसेल.... तर तो लाकडी नांगर वापरील; आणि तोही नसेल तर तो कुदळीनं खोदेल व कोणत्याही परिस्थितीत तो आपलं ईप्सित साध्य करील. लोकांना उपयोगी पडेल अशा कामात जीवन घालवणं हे ते ईप्सित असेल. त्यामुळे त्या कामातूनही त्याला पूर्ण समाधान मिळेल.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३२३]

भौतिक गोष्टींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं वा अंतर्गत शांतता आणि आनंद यांच्या दृष्टीनं संपत्ती गोळा करण्यात जीवन घालवणाऱ्या माणसापेक्षा अशा माणसाची परिस्थिती चांगली असेल. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३२३ 'बाह्य परिस्थितीवरून असा माणूस कधीही गरजवंत असल्याचं दिसणार नाही, कारण त्याची काम करायची इच्छा पाहून लोक त्याचा जास्तीत जास्त उत्पादक कामासाठी उपयोग घ्यायचा प्रयत्न करतील व त्याची उत्पादकता कायम राहावी म्हणून त्याचं भौतिक अस्तित्व टिकवायचा प्रयत्न करतील. संग्राहक वृत्तीच्या लोकांसाठी ते लोक हे काम करत नाहीत. परंतु भौतिक परिस्थितीतील संरक्षणाचीच माणसाला गरज असते म्हणून ते हे काम करतात. 'अंतर्गत परिस्थितीच्या दृष्टीनं पाहिलं तर असा माणूस

संग्राहक वृत्तीच्या माणसापेक्षा नेहमीच सुखी राहील कारण संग्राहक वृत्तीचा माणूस ज्यासाठी धडपड करतो ती गोष्ट त्याला कधीच मिळू शकत नाही. उलट संग्राहक वृत्ती नसलेल्या माणसाला त्याच्या क्षमतेनुसार त्याला हवी ती गोष्ट मिळाल्याशिवाय कधीच राहणार नाही : दुर्बलमनस्क, म्हातारे, मरायला टेकलेले या सर्वांना हातात पहार घेतलेल्या त्याच्या हाताकडून संपूर्ण समाधान मिळेल.' कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू देन?*, पृष्ठ ३२३]

भविष्यवेत्त्याप्रमाणे त्यांनी सावधगिरीची सूचना देत सांगितलं की ज्या समाजाच्या पाठीवर आतापर्यंत तुम्ही बसून होता त्याची सहनशीलता आता संपली आहे. त्यामुळे विधिलिखिताकडे दुर्लक्ष करायचा तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी श्रीमंतांच्या स्वार्थीपणानं विनाशाकडे तुम्ही दिवसेंदिवस ओढले जात आहात.

प्रत्येक दिवसाला आणि तासाला धोका वाढत आहे.... आणि आता तो इतका वाढला आहे की या वादळी सागरात आपल्या बोटीला सांभाळून ठेवणं कठीण झालं आहे. हा महासागर क्रोधानं आपणा सर्वांना जलमय करून टाकतो आहे, गिळायचा प्रयत्न करतो आहे, बुडवू पाहतो आहे. क्रांती (कामगारांची) भयानक विनाश आणि खून यांनी आपल्याला केवळ घाबरवूनच सोडत नाही. गेली तीस वर्षं आपण त्या धोक्यासोबत राहत आहोत पण सर्व प्रकारच्या लबाडीच्या उपायांनी धोक्याचा तो उद्रेक आपण लांबणीवर टाकला आहे. युरोपची अवस्थाही अशीच आहे; आपलीही अवस्था तशीच आहे, नव्हे ती त्याहूनही भयानक आहे कारण आपल्याजवळ त्या उद्रेकाला वाट करून द्यायची व्यवस्था नाही.

आपल्या समुदायांमध्ये गेल्या तीन चार वर्षात एक नवीन आणि महत्त्वपूर्ण जग अस्तित्वात यायला लागलं आहे; हे जग, ज्याबद्दल पूर्वी मी कधीच ऐकलं नव्हतं, आज घृणेनं आपल्याला 'मधमाशा' म्हणत आहे.

चिरडल्या जात असलेल्या समुदायातील द्वेष आणि घृणेची भावना वाढत आहे आणि श्रीमंत वर्गाचं भौतिक आणि सांपत्तिक सामर्थ्य कमी होत आहे; ज्या फसवणुकीद्वारे प्रत्येक गोष्ट

तग धरून आहे ती आता जीर्ण झालेली आहे, आणि श्रीमंत माणसं या विनाशाच्या काळात कशानंही आत्मसंतुष्ट होऊन राहू शकत नाहीत.

जुन्या परिस्थितीत परत फिरणं आता अशक्य आहे; भंग करण्यात आलेल्या प्रतिष्ठेचं पुनर्जीवन करणं अशक्य आहे; ज्यांना आपलं जीवन बदलवायची इच्छा नाही त्यांच्यासाठी करण्यासारखी एकच गोष्ट शिल्लक राहिली आहे आणि ती म्हणजे जे घडेल ते आयुष्यभर घडत राहू द्यायचं व मग जे घडायचं असेल ते घडू दे असं म्हणत राहायचं.

आंधळ्या श्रीमंतांचा वर्ग जरी असं करत राहिला तरी विनाशाचा धोका दरक्षणी वाढतोच आहे व भयानक संकट जवळजवळ येत चाललं आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३१४-१५]

आपल्या स्वार्थासाठी, नैतिक विचार बाजूला ठेवला तरी, जे लोक वरच्या वर्गातील आहेत त्यांनी आपली जीवनशैली बदलायला पाहिजे आणि माणूस म्हणून आपलं जे कर्तव्य असेल ते पार पाडायला पाहिजे. याचा अर्थ असा की आपल्याला ज्या कारणासाठी 'हात आणि पाय देण्यात आलेले आहेत त्या कारणांसाठी आपण त्यांचा उपयोग करायला पाहिजे म्हणजे श्रमासाठी आपण त्यांचा उपयोग करायला पाहिजे, आणि त्या श्रमाचं फळ म्हणून मिळालेलं अन्न खायला पाहिजे, तसंच त्यांचा नाश होऊ देऊ नये.... त्यांचा उपयोग केवळ अन्न, दारू आणि सिगारेट तोंडात ढकलण्यासाठी करण्यात येऊ नये.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३१६]

ज्ञानी लोकांच्या वर्गाला व त्यांचं अनुसरण करणाऱ्या संपूर्ण समाजाला आपले संडास साफ करायची लाज वाटणार नाही, उलट आपण घाण करायची आणि आपल्या बांधवांना ती साफ करायला सांगायची याची त्यांना लाज वाटेल; भाकरी कशी बनवावी हे न कळता भाकरी खायची लाज वाटेल; घाणेरड्या हातांची लाज वाटणार नाही, उलट घट्टे न पडलेल्या हातांची लाज वाटेल अशी वेळ फार दूर नाही अशी त्यांनी भविष्यवाणी केली. जनमत याची मागणी करणार आहे. 'सत्य दडवून ठेवणारे माणसांच्या मनातील अपराध जेव्हा नाहीसे होतील' तेव्हाच

असं घडू शकेल. आताच या बाजूनं जनमत बरंच झुकलेलं आहे. परंतु अजून बरंच काही करावं लागेल. 'माणसावर पैशाचं सामर्थ्य चालवणाऱ्या अपराधांचा नाश करायला पाहिजे आणि मग जनमत प्रशंसनीय काय आहे व निंदास्पद काय आहे ते ओळखेल व नंतर त्यानुसार बदलेल.... आता हा अपराध स्पष्टपणे दिसतो आणि त्याला लपवता येऊ शकत नाही.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३२६-२७] मानवसमाज अपरिहार्यपणे आणि वेगात या दृष्टिकोनाकड़े वळत आहे. आपण नवजीवनाच्या दृष्टिकोनाच्या सीमेवर उभे आहोत व त्याला मान्यता मिळायला थोड्याच वेळेचा अवधी आहे.

टॉलस्टॉय यांचं 'आपण काय करायला पाहिजे हे पुस्तक वाचल्यामुळे गांधीजींच्या धार्मिक विचाराला निश्चित सामाजिक रंग आला. लेनीनच्या मतांचा प्रतिध्वनी उमटवत टॉलस्टॉयवर टीका करण्यात येत असते की त्यांनी रोगाचं निदान बरोबर केलं परंतु त्यांनी त्याच्या दुरुस्तीसाठी 'जपतपाचाच' उपचार सांगितला. अशाप्रकारच्या अडाणीपणाचा परिणाम महात्माजींवर क्वचितच होऊ शकत होता. गरिबांना मदत करायची असेल तर माणसानं आधी त्याच्या पाठीवरून खाली उतरायला पाहिजे आणि आपली भाकरी आपल्या श्रमानं निर्माण करायला शिकलं पाहिजे; इतरांचं जीवन बदलायचं असेल तर आधी स्वतःचं जीवन बदलायला पाहिजे; अथवा मी माझ्या जीवनात तेव्हाच परिवर्तन करेन जेव्हा इतर सर्व माणसांनी आपल्या जीवनात परिवर्तन केलेलं असेल असं म्हणणारा माणूस एक तर ढोंगी असेल वा स्वतःची बुद्धिपुरस्सर फसवणूक करणारा मूर्ख तरी असेल असं सांगताना गांधीजी कधीच थकत नव्हते. एडवर्ड कार्पेटर यांनी आधुनिक संस्कृतीला आजारी घोषित केलं होतं आणि माणसाला जर चांगलं धार्मिक जीवन जगायचं असेल तर त्यानं आपल्या शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या हातानं काम करणं आवश्यक आहे असं प्रतिपादन करायच्या बरंच आधी टॉलस्टॉय यांनी प्रतिपादिलेल्या कला विज्ञान आणि प्रगती विषयक विचारांचा खोल ठसा गांधीजींवर उमटलेला होता. टॉलस्टॉय यांनी व्यावसायिकावर केलेल्या टीकेचा प्रतिध्वनी किती तरी वर्षांनी गांधीजींनी लिहिलेल्या *हिंद स्वराज* या पुस्तकातून उमटलेला आपल्याला आढळून येतो.

गांधीजींनी भारतात निर्माण केलेले आश्रम फिनिक्स येथील वस्तीच्या नमुन्यानुरूप बनवण्यात आले होते. फिनिक्स आश्रमाच्या घटनेच्या उद्दिष्टातील एक उद्दिष्ट 'टॉलस्टॉय यांनी प्रतिपादित केलेल्या उद्दिष्टाप्रमाणे आश्रम चालवणं' असं होतं. दक्षिण आफ्रिकेतील गुजराती समाजाला शिकवण्यासाठी त्यांनी जे पाठ तयार केले होते त्यातील एक पाठ टॉलस्टॉय यांच्या *इव्हान द फूल* या गोष्टीचा *मुरख राज अने दो भाईओ* या नावानं केलेला अनुवाद होता. आणि सविनय आज्ञाभंग करणाऱ्या भारतीय सत्याग्रही लोकांसाठी वस्ती स्थापन केली तेव्हा गांधीजींनी तिचं नाव याच रशियन महर्षीच्या नावावरून 'टॉलस्टॉय फार्म' असं ठेवलं होतं.

४

या वैचारिक परिवर्तनामुळे टॉलस्टॉय यांना नवीन जीवन पद्धतीचा स्वीकार करावा लागला. त्यांनी शेतकऱ्याप्रमाणे कपडे घालायला आणि राहायला सुरुवात केली; नोकरांची मदत घेणं बंद केलं, आपल्या खोलीची साफसफाई ते स्वतःच करू लागले, स्वतःचे कपडे स्वतःच धुऊ लागले आणि स्वतःच्या संडासाची बादलीही स्वतःच साफ करू लागले. हिवाळ्यात त्यांनी इंधनासाठी लाकडं तोडून त्यांचा साठा करून ठेवला; उजाडायच्या आधीच ते विहिरीवर पाणी काढायला जायचे आणि बर्फाळ पाण्याच्या कावडी स्वयंपाक आदी कामांसाठी आणायचे. आपल्या ओळखीच्या एका चांभाराकडून ते जोडे तयार करणं शिकले आणि त्यात ते प्रवीण झाले. इतकंच नाही तर आपल्या मुलीलाही त्यांनी स्वतः तयार केलेले जोडे वापरायचा आग्रह केला.

पैशाच्या उपयोगाबद्दल तीव्र घृणा निर्माण झाल्यामुळे ते रेल्वेनं बहुधा तिसऱ्या वर्गानं प्रवास करायचे आणि म्हातारपणी एका प्रसंगी तर मॉस्को ते यास्नाया पोल्यानापर्यंतचा १३० मैलांचा प्रवास त्यांनी 'पायी केला. त्यावेळी एखाद्या अनाम शेतकऱ्याप्रमाणे त्यांनी कपडे घातलेले होते, हातात ओबडधोबड काठी होती. त्या प्रवासात रस्त्यात भेटलेल्या माणसांची ते ओळख करून घ्यायचे, त्यांच्याशी न संपणाऱ्या गप्पा मारायचे.' या प्रवासांमुळे त्यांना फार विरंगुळा

मिळाला. 'ज्या परंपरागत जीवनात महान लेखक टॉलस्टॉय यांना राहणं भाग पडलं होतं त्या जीवनाच्या कक्षेपलीकडील ईश्वराच्या संपूर्ण विश्वाची दारं त्यांच्यासमोर उघडली गेली होती.' [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १५८] त्यांचे यास्नाया पोल्याना येथील प्रवास हे टॉलस्टॉय यांनी सांगितल्याप्रमाणे 'ग्रामीण जीवनात केलेल्या आंघोळीप्रमाणे' झाले होते. गांधीजींनी आपल्या आश्रमाला दिलेल्या भेटी ज्याप्रमाणे शारीरिक जोम परत मिळवण्यासाठी आणि आपण कुठं उभे आहोत हे पाहण्यासाठी असायच्या त्याचप्रमाणे टॉलस्टॉय यांच्यासाठी त्या यात्रा आध्यात्मिक गरजेसारख्या झाल्या होत्या.

साधं जीवन जगायचा एक भाग म्हणून टॉलस्टॉय यांनी शिकार करणं बंद केलं (१८८४), मद्यपान आणि मांसाहार बंद केला (१८८७), धूम्रपान सोडलं (१८८८), आणि बराच प्रयत्न केल्यानंतर आणि अनेकदा निश्चय मोडल्यानंतर अखेरीस चहाही सोडला (१८९२).

पत्नीचा संताप झाल्यानंतरही ते पांढरी ब्रेड खात नसत. त्यांनी सोजी आणि उकडलेल्या भाज्या हाच आहार घ्यायला सुरुवात केली. त्यामुळे अनेकदा त्यांना पोटातील वाताचा त्रास व्हायचा. त्यांच्या नात्यातील एक प्रिय नातलग त्यांना भेटायला आली आणि तिला कोंबडी खायची इच्छा झाली तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी तिच्या आरामखुर्चीला एक कोंबडी बांधलेली आणि टेबलवर एक चाकू ठेवलेला तिला आढळला. त्याबरोबर एक चिठ्ठीही होती. चिठ्ठीत लिहिलं होतं की 'तुमचं कोंबडीशिवाय भागूच शकत नसेल तर तुम्हालाच ही कोंबडी कापावी लागेल; घरात हे काम करायला कोणीच तयार नाही.'

१८८१पासूनच त्यांनी शेतकऱ्यांच्या शारीरिक श्रमात भाग घ्यायला सुरुवात केली होती. त्यांच्या यास्नाया पोल्याना येथील इस्टेटीवर अर्धबटाईनं काम करणारे शेतकरी जेव्हा सामुदायिकपणे कापणी करायचे तेव्हा टॉलस्टॉयही त्यांच्याबरोबर कधी या भुंग्याबरोबर तर कधी त्या भुंग्याबरोबर काम करायचे. आपण कापलेलं गवत त्यांच्यासाठी राहू द्यायचे. हळूहळू नांगरणीचं आणि शेतातील ढेकळं दंताळ्याच्या सहाय्यानं फोडायचं कामही ते करू लागले व

ज्या शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतीवर काम करायला मजूर मिळत नसायचे त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी काम करून ते त्यांना सतत मदत करू लागले. एका गरीब विधवा बाईला आपल्या शेतीसाठी मजूर लावणं परवडत नसल्यामुळे काही वेळा ते तिच्या शेतीचं सर्व काम स्वतःच करायचे.

टॉलस्टॉय यांच्यासाठी कोणतंच काम हलक्याप्रतीचं नव्हतं. आपल्या इस्टेटीवर खताची गाडी घेऊन जाताना, लाकडाची मोळी नेताना, लाकडं कापताना, झोपडीच्या छतावरील तिरपे वेळू नीट करताना ते दिसायचे. 'सगळ्यात वरच्या तुळईवर दोन्ही बाजूला पाय टाकून बाह्या वर केलेल्या आहेत, केसांचा गुंता झालेला आहे, सदऱ्याच्या गुंड्या उघड्या आहेत आणि उघडी छाती दिसते आहे, चामडी कमरपट्ट्यात पटाशी खोचलेली आहे, कमरेला करवत लटकलेली आहे, आणि पांढरी दाढी कुऱ्हाडीच्या प्रत्येक घावासरशी हालते आहे' [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, जॉन लॉगमन, लंडन, (१९४९), पृष्ठ ४२५] असं दृश्य अनेकदा दिसायचं.

त्यांना शारीरिक श्रम मनापासून आवडायचे. त्यांच्या उत्साहाचा संपूर्ण कुटुंबावर परिणाम झाला. तरुण आणि म्हातारे, बाया आणि माणसं गट तयार करायचे आणि ते 'कापणी, कोयत्यानं गवत काढणं, ते गोळा करून त्यांच्या गंज्या लावणं आदी कामात त्यांची स्पर्धा लागायची.' [वरीलप्रमाणे] एवढंच नाही तर त्यांची बायकोही काहीसा शेतकऱ्यासारखा पोषाख घालून मुलं आणि त्यांच्या दायांना बरोबर घेऊन त्या कामातील आपला वाटा उचलायची.

त्यांच्या इस्टेटीवरील शेतकऱ्यांना त्यांच्यातील प्रामाणिक, गंभीर अशा ईश्वरी माणसाची ओळख पटली होती. त्यांच्या लक्षात आलं होतं की त्यांच्या माहितीतील इतर काही विक्षिप्त जमीनदार लहर लागली की केवळ देखाव्यासाठी काम करतात तसं हा माणूस करत नाही. तरीही टॉलस्टॉय यांचं समाधान होत नव्हतं. त्यांना वाटायचं की इतर शेतकऱ्यांप्रमाणे आपल्याला आपल्या श्रमाद्वारे कुटुंबाला पोसावं लागत नाही. काही वेळा ते तक्रार करायचे की आपले शारीरिक श्रम व्यावहारिक दृष्टीनं निरुपयोगी आहेत कारण त्यांची 'अगदीच गरज नाही'.

लेखक आणि नवजीवनाचे प्रवर्तक म्हणून त्यांची कीर्ती जसजशी पसरत गेली तसतशी रशियात व इतर अनेक देशात किती तरी टॉलस्टॉय वस्त्या उभारण्यात आल्या. 'टॉलस्टॉय संप्रदायाची' टूम सुरू होऊन त्यांच्याकडे भेटायला येणारांचा एक प्रवाहच सुरू झाला. 'रशियन ब्लाऊझ घातलेले व लांब दाढ्या वाढवलेले टॉलस्टॉयी', नाव न झालेले वैज्ञानिक, तरुण लेखक, विद्यार्थी, कामगार, शेतकरी आणि त्यांचे होऊ घातलेले अनुयायी अशा विविध प्रकारच्या लोकांचे थवे संपूर्ण रशियातून आणि इतर देशांतून त्यांच्याकडे लोटायचे. त्यांच्या घराला विविध वर्गाच्या विक्षिप्त आणि तऱ्हेवाईक लोकांच्या आश्रयस्थानांचं रूप यायचं. कौंटेसच्या भाषेतील हे 'काळतोंडे' तिला त्रासदायक व्हायचे आणि एकूण पाहता त्या सर्वांना सांभाळणं एक सत्त्वपरीक्षाच असायची. परंतु कौंटना मात्र त्यांच्यात 'समानशील आत्म्याचं' दर्शन व्हायचं.

एक वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग असा होता : अमेरिकेत ३० वर्ष राहिलेले आणि चीन, जपान आणि भारत इत्यादी देशात फिरून आलेले लांब पिवळसर पांढरी दाढी असणारे सत्तर वर्षांचे एक स्विडिश गृहस्थ टॉलस्टॉय यांना भेटायला आले होते. ते तिथं जवळपास अनवाणी आले होते, जमिनीवर झोपले होते व उशाशी उशी म्हणून त्यांनी काचेची बाटली घेतली होती. त्यांना सर्व गोष्टी न 'शिजवता खाणं पसंत होतं.' ते शाकाहारी होते आणि त्यांनी मासे, मटन, दूध आणि अंडीही सोडलेली होती. न्याहरीच्या वेळी त्यांच्यासमोर जेव्हा मोठं चहाचं भांडं आणण्यात आलं तेव्हा ते उभे राहिले आणि 'जुन्या करारा'तील एखाद्या देवदूताप्रमाणे निर्भर्त्सना करत म्हणाले : 'आणि तुम्ही मूर्तीसमोर नम्र होता!' स्पष्ट करत ते म्हणाले की चहा घेणं म्हणजे आपल्या चिनी बांधवांना लुबाडणं आहे, कारण त्यांची सर्वात चांगली जमीन चहाच्या मळेवाल्यांनी घेतलेली आहे व त्यांच्याजवळ रोजच्या भाकरीसाठी आवश्यक असलेल्या धान्याची पेरणी करण्यासाठी जमीन नाही. टॉलस्टॉय यांच्या स्वभाववैशिष्ट्याप्रमाणे चहाचं भांडं ताबडतोब परत नेण्यात आलं. टॉलस्टॉय यांच्या मुलीनं नोंद केली आहे की 'माझ्या वडिलांनीही त्यानंतर चहा सोडला. त्याऐवजी ते बार्लीची कॉफी घेऊ लागले.' याचं अनुकरण नंतर महात्माजींनीही केलं होतं.

या स्विडिश गृहस्थांच्या सिद्धान्तांनी टॉलस्टॉय एवढे प्रभावित झाले की त्यांनी चहा आणि लोणी सोडलं आणि केवळ कच्चं अन्न खायचा त्यांनी निर्णय घेतला. परंतु या प्रयोगामुळे जेव्हा टॉलस्टॉय यांना पोटशूळाच्या विकाराचा झटका आला आणि कौंटेसनी निर्धारानं या प्रयोगाला विरोध केला तेव्हा हा प्रयोग अल्पजीवी ठरला. साठीच्या जवळ पोहोचले असताना अशाच प्रकारच्या एका 'स्विडिशाच्या' प्रेरणेनं महात्माजींनी कच्च्या अन्नाचा प्रयोग सुरू केला व त्याचे याहूनही गंभीर परिणाम झाले होते.

स्युटेयेव्ह या नावाचं अजून एक वेगळ्याच प्रकारचं व्यक्तिमत्व टॉलस्टॉय यांच्याकडे आलं होतं. हे गृहस्थ शेतकरी होते. लिओप्रमाणेच त्यांनी चर्चचा त्याग केला होता. त्यांनी आपल्या दृष्टीनं बायबलचा अन्वयार्थ लावला होता. आपल्या बांधवांच्या प्रेमाच्या तत्त्वावर आधारित जीवनाचा पुरस्कार केला होता आणि खाजगी संपत्तीच्या हक्काला त्यांचा विरोध होता व सर्व प्रकारच्या हिंसेचा त्यांनी निषेध केला होता. रायफलला हात लावायची त्यांची तयारी नव्हती कारण तिला 'रक्ताचा वास' आहे असं त्यांचं मत होतं.

तत्त्व म्हणून त्यांनी कर भरायला नकार दिला आणि त्यांची लहानशी संपत्ती अधिकाऱ्यांनी जप्त करायची शिक्षा दिली असता न कुरकुरता ती मान्य केली. भेटायला आलेल्या आपल्या या नामांकित मित्राला स्टेशनवर सोडण्यासाठी टॉलस्टॉयनी घोडागाडी जोडली. परंतु तत्त्व म्हणून त्यांनी चाबूक घ्यायला नकार दिला. हे दोन तत्त्वज्ञ 'बंधुप्रेमानं मानवतेच्या उद्धारासंबंधीच्या गप्पा मारण्यात दंग असताना' घोडे उधळले आणि खाईत जाऊन पडले. गाडी उलटली आणि ते जमिनीवर जाऊन आदळले! स्युटेयेव्ह मोठ्या कष्टानं वाचू शकत होते आणि त्यांना लिहिता तर अगदीच येत नव्हतं तरी त्यांच्यात एक 'शांत धीरगंभीरपणा' होता आणि त्यांच्या हळूहळू बोलायच्या पद्धतीत 'व्यावहारिक शहाणपण आणि पटवून द्यायची क्षमता होती'. त्यामुळे त्यांचं बोलणं ऐकणारे प्रभावित व्हायचे. टॉलस्टॉय यांनी त्यांना मॉस्कोतील काही अतिशय प्रसिद्ध अशा दिवाणखान्यात प्रवचन देण्यासाठी नेलं. पण त्यामुळे ते अजूनच संतापले. एवढंच नाही तर

कौंटेसही त्यांची फार तारीफ करायच्या. टॉलस्टॉय नेहमी म्हणायचे की त्यांच्या या आदर्शवादी शेतकरी मित्राचा बुद्धिवादी लोकांवरील प्रभाव 'रशियन लेखक आणि विद्वान यांच्यापेक्षा किती तरी मोठा होता.' [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?*, अनुवादक ए. मॉड, पृष्ठ ३९०]

टॉलस्टॉय यांना 'स्वीडांचं' आणि 'स्युटेयेव्हांचं' असलेलं हे आकर्षण - जे सर्व देशातील सर्व प्रकारच्या प्रदेशातील संतांचं सामान्य लक्षण असावंसं वाटतं - हे महात्माजींचंही तेवढंच मोठं लक्षण होतं. त्यांच्याजवळही 'स्वीडांचा' आणि 'स्युटेयेव्हांचा' गोतावळा जमा झालेला असायचा व त्यामुळे त्यांच्या आश्रमाला 'विक्षिप्त, तऱ्हेवाईक आणि वेडसरांचं संग्रहालय' म्हणून संबोधलं जायचं. परंतु गांधीजींचं म्हणणं असायचं की सर्व परिस्थितीत मदत करणारे ते त्यांचे शक्तिस्रोत आहेत आणि त्यामुळे ते अनेकदा त्यांना भेटायला आश्रमाकडे धाव घ्यायचे, व्हाईसराय यांच्याशी चालू असलेली भेट अर्धवट सोडूनही. त्यांचं म्हणणं होतं की आपल्यासमोर आलेलं कर्तव्य, मग ते कितीही का नगण्य असेना, प्रामाणिक, जाणीवपूर्वक आणि बुद्धिमत्तापूर्वक पार पाडल्यामुळेच संस्कृती आणि मानवतेचा विकास होत असतो, ग्रांथिक ज्ञानानं नाही.

५

व्हॉट् आय बिलीव्ह अथवा *माय रिलीजन* ह्या पुस्तकावर रशियन सरकारनं बंदी घातल्यानंतर धार्मिक नियंत्रण मंडळाच्या आदेशाप्रमाणे सर्व प्रती न जाळता त्या केवळ जप्त करण्यात आल्या आणि त्या उच्च दर्जाच्या अधिकारी वर्गात आणि त्यांच्या आवडीच्या लोकात वितरित करण्यात आल्या. लवकरच अधिकाऱ्यांच्या सहमतीनं आणि प्रोत्साहनानं ज्या पुस्तकाबद्दल कुणालाही माहिती नव्हती त्या पुस्तकाच्या विरोधातील टीका तसंच पुस्तकातील सिद्धान्तांचं खंडन वृत्तपत्रातून यायला सुरुवात झाली. त्यामुळे बंदी घालण्यात आलेल्या या पुस्तकाकडे लोकांचं लक्ष अजूनच वेधलं गेलं आणि या पुस्तकात चर्चिलेल्या विषयावरील माहिती आणि साहित्य जगातील सर्व भागातून टॉलस्टॉय यांच्याकडे येऊ लागलं. सविनय

आज्ञाभंगाच्या विषयावर लिहिण्यात आलेली प्रत्येक गोष्ट टॉलस्टॉय यांनी अभ्यासायला सुरुवात केली. शांततावादी विल्यम लॉईड गॅरिसन आणि एम. आदिन बॅलॉ (दोघंही अमेरिकेतील) यांच्या साहित्याबद्दल त्यांना रस वाटू लागला आणि धार्मिक आणि सदसद्विवेकबुद्धीच्या कारणासाठी सैन्यात काम करायला नकार देणाऱ्या डखोबोर्स - रशियन ख्रिश्चनातील शांततावादी पंथ - यांच्या कार्याचा पुरस्कार करायला त्यांनी सुरुवात केली (१८९६). सैन्यात काम करायला नकार देणाऱ्या वा असा नकार देणारांना मदत करणाऱ्या वा त्यांच्याबद्दल सहानुभूती दर्शवणाऱ्या लोकांचा पोलीस अतिशय निर्दयपणे छळ करायचे. बिरकॉफ आणि चेर्टकॉव्ह यांचा समावेश असलेल्या काहींना त्यासाठी सैबेरियात पाठवण्यात आलं. परंतु टॉलस्टॉय यांनी आपल्यावर खटला भरायचं आव्हान देऊनही अधिकारीवर्ग त्यांना स्पर्श करायला तयार नव्हता. याबद्दल टॉलस्टॉय यांना मनस्वी दुःख होत होतं. 'एक दिवस असा येईल की ज्यावेळी ते तुम्हाला दोराला बांधून फरफटत तुरुंगात नेतील,' कौंटेस यांनी त्यांना सूचना देत सांगितलं. 'मला तेच हवं आहे.' हे त्यावर आलेलं उत्तर होतं.

मार्च ३१, १८८८ला टॉलस्टॉय यांच्या शेवटच्या मुलाचा - इव्हान लिव्हेविचा (व्हानिच्का) जन्म झाला. सात वर्षांनंतर त्याचा लोहितांग ज्वरानं मृत्यू झाला व त्यामुळे आपला आध्यात्मिक वारस तयार करायच्या त्यांच्या शेवटच्या आशेलाही तडा गेला. मध्यंतरीच्या काळात *द डेथ ऑफ इव्हान इलिविच* (१८८६) ही कादंबरी प्रकाशित झाली. त्यामुळे गांधीजी अतिशय सद्गदित झाले. *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू* (१८८३) आणि *व्हॉट ईज आर्ट* हे त्यांचे काही महत्त्वाचे ग्रंथही याच काळात प्रकाशित झाले. काही विद्वांनांचं मत आहे की *व्हॉट ईज आर्ट* ही त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची कृती आहे.

व्हॉट शाल वुई डू या पुस्तकाचं शेवटचं प्रकरण स्त्रियांचं कर्तव्य या विषयाला वाहिलेलं आहे. त्यांनी जाहीर केलं की भविष्याची निर्मिती स्त्रियांच्या हाती आहे तर अशा स्त्रियांच्या की ज्या 'आई होतात आणि वडिलांनी पार न पाडलेलं कर्तव्य पार पाडतात'. परंतु ज्या स्त्रिया कृत्रिम

साधनांनी अपत्यहीन राहतात आणि माणसाला मोहवतात, अथवा माणसांवर हुकुमत गाजवतात, माणसाचं अधःपतन करतात व स्वतःही अधःपतीत होतात अथवा माणसाप्रमाणे जीवनाचा सर्व अर्थ हरवतात त्या स्त्रिया भविष्यनिर्मात्या होऊ शकत नाहीत. [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट शाल वुई डू देन?*, अनुवादक लिओ विनर, पृष्ठ ३३१] जी आई मुलांना वाढवण्यात आणि त्यांना पुढं आणणाऱ्या 'स्वार्थत्यागाला ईश्वरी इच्छेची परिपूर्ती करणं मानते' [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?*, अनुवादक ए. मॉड, पृष्ठ ३६१] ती आपल्या मुलांसमोर आणि नवऱ्यासमोरही जीवनाचा तोच आदर्श ठेवते. ती आपल्या मुलांना अशा रीतीनं शिकवू इच्छिणार नाही की ज्यामुळे त्यांना शारीरिक श्रमापासून दूर पळावंसं वाटेल; ती त्यांना गोळ्या चॉकलेट वा मिठाई वगैरेसारख्या पदार्थांनी आणि मनोरंजनाच्या साधनांनी आकर्षित करणार नाही आणि वडिलांनी संपत्ती वा प्रतिष्ठा असं काहीही मागे सोडलं नसेल तरी ती घाबरणार नाही. याच न्यायानं 'ज्याचा उद्देश केवळ इतरांच्या श्रमाचा उपयोग करणंच असेल' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३५९] अशाप्रकारचं ढोंगीपणाचं वा खोटेपणाचं काम करायलाही ती आपल्या नवऱ्याला प्रोत्साहित करणार नाही. तसंच अन्याय्य मार्गानं एखादं पद मिळवायला वा टिकवायलाही ती सांगणार नाही. उलटपक्षी ती आपल्या मुलांना अशा प्रकारानं वाढवेल की त्यांच्यात प्रामाणिकपणे जीवनाला सामोरं जाण्याचं सामर्थ्य येईल, प्रामाणिक मेहनतीनं काम करायची प्रेरणा होईल आणि त्या मेहनतीनं जे काही मिळेल त्यावर ती समाधानी राहील. केवळ अशा प्रकारची स्त्री आणि माता यांच्यावरच 'जगातील पापाच्या कर्दमात रुतलेल्या माणसाचा उद्धार अवलंबून आहे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३५४]

त्यांनी पुढं सांगितलं की जी कोणती स्त्री 'शारीरिक संबंधाचा त्याग केल्याशिवाय अपत्यांना जन्म देणं थांबवते' ती कितीही सुसंस्कृत असली तरी 'ती वेश्या असते'. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३५७] या वेळी त्यांचा विश्वास होता की मोठं आणि निरोगी कुटुंब सुखासाठी आवश्यक असतं. परंतु काही दिवसांनीच त्यांचा हा विचार मागे पडला. स्त्री-पुरुष संबंधांकडे *क्रुएट्झर सोनाटा*मध्ये ते पुन्हा वळले (१८८९). त्यात त्यांनी तडजोडीला वाव न ठेवता अविश्रांतपणे

परिपूर्णतेच्या शोध घेण्यासाठी अविवाहितांसाठीच नव्हे तर विवाहितांसाठीही संपूर्ण ब्रह्मचर्याचं पालन करायला पाहिजे हा विचार मांडला. इतर अनेक गोष्टींप्रमाणेच त्यांचं अनुयायित्व करणाऱ्या महात्माजींनीही या विचाराचं पूर्ण अनुसरण केलं होतं.

क्रुएट्झर सोनाटाच्या प्रकाशनानंतर दोषैक दृष्टीच्या टीकाकारांनी उपरोधिकपणे सुचवलं की द्राक्ष आंबट झाली आहेत, ऋषी म्हातारे झाले आहेत आणि त्यामुळे ज्या पापांबद्दल त्यांना 'काहीच वाटत नव्हतं' त्यांना ते आता दूषण देऊ लागले आहेत. या आदर्शांप्रमाणे वागणं शक्य नसल्यामुळे त्यांची घृणा करणारांना उथळ उपहासाचं सोयीस्कर निमित्त मिळालेलं होतं. टॉलस्टॉय यांच्या अनेक चरित्रकारांनी लिहिल्याप्रमाणे *क्रुएट्झर सोनाटा* लिहिली तेव्हाही 'द्राक्ष' अतिशय मोहवणारी होती. सत्तरीच्या जवळ असताना अल्मर मॉड यांना त्यांनी सांगितलं, 'आदल्या रात्री मी स्वतः नवरा होतो, परंतु संघर्ष थांबवण्यासाठी ते काही निमित्त होऊ शकत नव्हतं. ईश्वरानं पुन्हा माझ्यावर ही कृपा करू नये.' त्यांच्या यास्नाया पोल्याना इस्टेटीवरील बक्सन स्वयंपाकीण डोम्ना हिच्या प्रकरणावरून त्यांच्यासाठी हा संघर्ष किती उग्र होता ते दिसून येतं. पन्नाशी ओलांडल्यानंतर आणि केसांना करडेपणा येऊ लागल्यानंतर आपल्या मनाला तिचं वेड लागल्याचं पाहून त्यांना धक्काच बसला. तिच्याबद्दलचा मोह दूर करणं त्यांना कठीण जात होतं व एकदा तर त्यांनी एका शांत ठिकाणी तिची भेटही ठरवली. आपल्या या मनःस्थितीची घृणा येऊन त्यांनी अलेक्झँडर या शिक्षकाला एका बाजूला घेतलं. विनवणी करत त्यांना ते म्हणाले, 'मी जिथं कुठं बाहेर फिरायला जाईन तिथं माझ्यासोबत राहा. शक्य आहे ही वासना निघून जाईल.' आणि आपल्या दुबळेपणामुळे निर्माण झालेल्या लाजिरवाण्या कठीण परिस्थितीचं त्यांनी त्यांच्याजवळ विस्तारानं वर्णन केलं.' देव त्यांच्या मदतीसाठी धावून आलाः परंतु दैवावर अवलंबून राहण्यापेक्षा त्यांनी डोम्नाची बदली दुसरीकडे केली. ते एक्यैशी वर्षांचे झाले तेव्हा मृत्यूच्या एक वर्षआधी त्यांनी मॉडजवळ कबूल केलं की आता मलां वैषयिक वासनांचा त्रास होणं बंद झालं आहे. [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, जॉन लॉगमन, लंडन, (१९४९), पृष्ठ ४९२]

१८९९ साली टॉलस्टॉय यांची शेवटची कादंबरी *रिसरेक्शन* प्रकाशित झाली. त्यावेळी ते एक्काहत्तर वर्षांचे होते. एका हिंदू मित्रानं हिंदूंच्या ज्ञानसंपदेचं सार असलेलं स्वामी विवेकानंद यांनी लिहिलेलं आणि न्यूयॉर्क येथून प्रकाशित झालेलं *राजयोग* हे पुस्तक टॉलस्टॉय यांना पाठवलं. त्या पुस्तकाचा टॉलस्टॉय यांच्या मनावर सखोल ठसा उमटलेला होता. टॉलस्टॉय यांनी त्यात सांगितलेल्या काही तंत्रांचा मनाला शिस्त लावण्यासाठी आणि स्वतःवर विजय मिळवण्यासाठी सराव सुरू केला.

१९०१ साली अतिशय पवित्र मानण्यात येणाऱ्या रुसो-ग्रीक चर्च या परंपरानिष्ठ सभेनं टॉलस्टॉय यांना धर्मबहिष्कृत केलं. त्यांचा *आय कॅनॉट बी सायलेंट* हा लेख प्रकाशित झाल्यानंतर संपादकाला अटक करण्यात आली आणि अनेक वृत्तपत्रांवर दंड ठोठावण्यात आला (जुलै १९०८). एव्हाना त्यांची कीर्ती जगभर पसरली होती. त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवशी जगभरातील लोकांकडून संदेश आणि शुभेच्छा यांचा त्यांच्यावर वर्षाव झाला. त्यात रोमा रोला, बर्नार्ड शॉ, मसारिक आणि एम. के. गांधी यांचाही समावेश होता.

६

टॉलस्टॉय यांच्या जीवनातील परिवर्तनामुळे त्यांची मुलांशी आणि बायकोशी फार मोठी भांडणं सुरू झाली. त्यांच्या बायकोला नवऱ्याच्या 'तऱ्हेवाईक वागण्याबोलण्याची कधी गंमत वाटायची तर कधी चीड यायची. सुरुवातीला शारीरिक कामं त्यांच्या प्रकृतीसाठी बरी राहतील या दृष्टीनं ती त्या कामांना सहन करायची आणि त्याला प्रोत्साहनही द्यायची. परंतु टॉलस्टॉय ईश्वराच्या शोधात जसजसे मग्न होत गेले तसतसा त्यांचा आध्यात्मिक संघर्ष वाढत गेला व त्यामुळे त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वात होऊ लागलेल्या परिवर्तनामुळे तिची काळजी वाढत गेली. त्यांची नजर 'स्थिर आणि वेगळीच' झाली असल्याचं, ते 'क्वचितच बोलत असल्याचं', आणि 'या जगाशी अगदीच संबंध नसल्यासारखं' ते वागत असल्याचं तिच्या लक्षात आलं होतं. [अलेक्झॅन्ड्रा टॉलस्टॉय, *टॉलस्टॉय,* अनुवादक एलिझाबेथ रेनोल्ड्स हॅपगुड, व्हिक्टर गोलॅन्झ लिमिटेड, लंडन, (१९५३), पृष्ठ २२९] या

तणावाचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होऊ लागला आणि ते सहनशील आणि नम्र होत गेले. ती त्यांना त्यांच्या संपत्तीचा त्याग करू द्यायला तयार नव्हती. तिचं म्हणणं होतं की ती संपत्ती त्यांच्याजवळ केवळ मुलांच्या विश्वस्ताच्या नात्यानं आहे. परिणामी त्यांनी आपली सर्व संपत्ती, यात त्यांच्या लेखनावरील हक्काचाही समावेश होता, बायकोच्या नावानं १८८० साली करून दिली. धार्मिक आणि ईश्वरीविद्येविषयी लेखन करण्यासाठी त्यांनी 'कलेला टाकून दिल्या'बद्दल ती नाराज होती. तिचं म्हणणं होतं की यामुळे काहीच मानधन मिळत नाही व 'कोणी त्याकडे लक्षही देत नाहीं'. त्यांचे कुटुंबीय ज्याप्रकारे 'उधळपट्टी करत' डामडौलात राहत होते त्याबद्दल आपल्या लेखातून त्यांनी उघड टीका केली. त्यामुळे तिची वैचारिक भूमिका अजूनच ताठर झाली व ती त्यांच्या शिकवणुकीच्या, त्यांच्या जीवनपद्धतीच्या आणि संपूर्ण टॉलस्टॉयी चळवळीच्या पूर्णपणे विरोधात गेली.

१८८३ सालच्या अखेरीस चेर्टकोव्ह म्हणून त्यांचा मुख्य शिष्य जेव्हा आला तेव्हा गोष्टी अजूनच विकोपाला गेल्या. तिला असा संशय येत होता की तो शिष्य त्यांना तिच्यापासून दूर करतो आहे. टॉलस्टॉयवरील त्याच्या प्रभावामुळे ती त्याचा अतिशय द्वेष करू लागली. तिची जीभ अतिशय तिखट होती आणि कोणताही संवेदनशील माणूस त्यामुळे दुखावल्याशिवाय राहू शकत नव्हता. आपल्या पतीच्या मानसिक यातनांवर 'आधी तुम्ही स्वतःला दुरुस्त करा.' असा ती टोमणा मारायची.

....सुखी माणसाला एकाएकी जीवनातील भयानक गोष्टीच दिसू लागल्या व प्रत्येक चांगल्या गोष्टीकडे तो दुर्लक्ष करू लागला तर त्याच्या प्रकृतीत काही तरी बिघाड असला पाहिजे.... एकदा तुम्ही म्हणाला होता की माझ्यात श्रद्धा नसल्यामुळे मला स्वतःला फासावर लटकवून घ्यावंसं वाटतं.... आता तुमच्यात श्रद्धा असताना तुहाला समाधान का वाटू नये? आता तुम्हाला केवळ हेच दिसतं काय की जग उपाशी, दुर्दैवी आणि हलकट माणसांनीच भरलेलं

आहे?.... देवा.... तू मला मार्ग दाखव.... मी असहाय आहे. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १३७-३८]

अधूनमधून तिला स्पष्टपणे तिचे दोष जाणवायचे व त्यांच्यातील मतभेदांबद्दल ती अधिक समतोल दृष्टिकोन घ्यायचा प्रयत्न करायची. १८८३च्या सुरुवातीला तिनं लिहिलं :

मला जरी हे माहीत असलं की तो हे टाळू शकत नाही तरी तो मला दुखावतो. तो पुढारी आहे, तो जमावाच्या पुढं जातो व इतरांनी कोणता मार्ग घ्यायला पाहिजे ते दाखवतो. मी जमावातील आहे. मी जमावाबरोबर चालते. जमावाबरोबरच नेता दाखवत असलेला दिव्याचा प्रकाश आणि लेव्ह यांना पाहते आणि मला कळतं की तो प्रकाश आहे. परंतु त्यापेक्षा मी वेगात जाऊ शकत नाही; माझा जमाव, माझं वातावरण, माझ्या सवयी मला मागं धरून ठेवतात. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १३७-३८]

परंतु बहुधा तिची मनःस्थिती स्वतःची कीव करणारी असायची व आत्मसमर्थन करताना उदारपणाला वा नवऱ्याचा दृष्टिकोन समजावून घ्यायला अवकाशच नसायचा.

१९१४ साली तिनं आत्मवृत्तात लिहिलं :

नऊ मुलं असताना वाऱ्याची दिशा दाखवणाऱ्या कोंबड्याप्रमाणे माझ्या नवऱ्याच्या सतत बदलणाऱ्या कल्पनांप्रमाणे तो वळेल त्या दिशेनं मी तोंड वळवू शकत नाही. त्याचा सत्याचा शोध उत्साहपूर्ण आणि प्रामाणिक होता, परंतु माझ्यासाठी ती गोष्ट मूर्खपणानं केलेली नक्कल ठरली असती व ती गोष्ट कुटुंबासाठी अपायकारक ठरली असती.... माझ्या नवऱ्याच्या इच्छेप्रमाणे आमची संपत्ती जो कोणी येईल त्याला देण्यात आली असती तर माझ्या नऊ मुलांसह एकाही वस्तूशिवाय केवळ माझ्या हातावर आम्हाला अवलंबून राहावं लागलं असतं. त्यांना खाऊ घालण्यासाठी मला शिवणकाम, कपडे धुणं आदींसारखी कामं करत राहावं लागलं असतं आणि मुलांना शिक्षणाशिवाय वाढवावं लागलं असतं. माझा नवरा त्याच्या अंतरीच्या हाकेप्रमाणे आणि

प्रतिभेप्रमाणे लेखन करण्याशिवाय वेगळं काहीच करू शकला नसता. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १३७]

विवाहित जीवनाच्या बावीस वर्षात १२ वेळा प्रसूतिवेदना सोसल्यानंतर नवीन मूल जन्मायला यायची जेव्हा वेळ आली तेव्हा बाळाला अंगावरचं दूध पाजू शकेल अशी दाई ठेवायला टॉलस्टॉयनी नकार दिला व जन्माला येणाऱ्या मुलाला अंगावर पाजायचा बायकोला सल्ला दिला. तेव्हा ती स्वाभाविकपणेच नाराज झाली. *कुएट्झर सोनाटाला* खरोखरच पुरवणी जोडण्यात आली आहे हा मॉस्कोमधील विनोद ऐकून ती फार अस्वस्थ झाली. तिची मनःस्थिती ढासळू लागली. तिच्या नवऱ्याबद्दल तिच्या मनात विकृती निर्माण झाली व तिच्या विकृत मनःस्थितीच्या अवस्थेत तिनं तिच्या नवऱ्याचं वर्णन ' 'दबा धरून बसलेला चैनी व विषयासक्त माणूस', 'आपल्या तारुण्यातील विषयासक्तीचं किळसवाणं पण प्रांजळ वर्णन आपल्या डायरीत करणारा' तसंच 'माझ्या निरागसतेचा नाश करून' माझ्या अंतःकरणात विष पेरणारा" असं केलं. [कौंटेस सोफिया ए. *टॉलस्टॉय* यांची डायरी] यात भर पडली एक पियानोवादक आणि संगीतशास्त्री एस. आय. तानेयेव्ह यांच्याबद्दलच्या प्रथमदर्शनी आकर्षणाची. त्यामुळे टॉलस्टॉय यांची व्यथा स्वतःसाठी नाही तर कौंटेससाठी अतिशय वाढली व जेव्हा कौंटेस त्या आकर्षणातून पूर्णपणे मुक्त झाल्या तेव्हाच टॉलस्टॉय यांची त्या व्यथेमधून मुक्ती झाली.

सामान्यपणे बरेच दिवसांपासून टॉलस्टॉय यांना तिच्यापासून त्रास होत होता. कौटुंबिक वादावादीत परस्परांतील मतभेदांबद्दल धारण केलेल्या संयमाचा बांध तुटायचा. तिच्याबरोबर होणाऱ्या दैनंदिन वादावादीनं त्यांना अतिशय वेदना व्हायच्या. केव्हा केव्हा तर त्यांना रात्रभरही विसांवा मिळू शकत नसे. त्याहूनही वेदनादायी होत असत त्यांच्या स्वतःच्या मर्यादा. टॉलस्टॉय यांनी मान्य केलं की 'परिवर्तनाच्या माझ्या सुरुवातीच्या काळात वैशिष्ट्यानं मी कठोर आणि असहिष्णू होतो'. त्यामुळे पत्नीच्या संबंधात आलेल्या अपयशाबद्दल ते स्वतःला जबाबदार समजायचे.

मी सोन्याला दोष देऊ शकत नाही. माझी शिकवणूक न स्वीकारण्यासाठी तिला दोष देता येऊ शकत नाही. ज्या गोष्टी आज ती चिवटपणे धरून ठेवू पाहत आहे त्या गोष्टींचा स्वीकार करायला अनेक वर्ष मीच तिला प्रोत्साहन दिलं होतं. शिवाय माझ्या जागृतीच्या पहिल्या काळात मी अतिशय चिडखोर होतो आणि माझेच विचार बरोबर आहेत हे तिला पटावं म्हणून तिच्यावर फार दडपण आणत होतो. त्या काळात जीवनाचा मला आकळलेला अर्थ इतक्या कटू आणि अस्वीकारार्ह पद्धतीनं मी मांडत होतो की त्यामुळे तिच्यात स्वाभाविकपणेच त्याबद्दल तिटकारा निर्माण झाला. आता मला वाटायला लागलं आहे की ज्या पद्धतीनं मला सत्याचं ज्ञान झालं आहे त्या पद्धतीनं तिला होऊ शकणार नाही. तिच्यासाठी दार बंद करायचा अपराध माझा आहे.

टॉलस्टॉय यांची अखेरची वर्षं आध्यात्मिक एकाकीपणात गेली. त्यांची पाच मुलं हळूहळू त्यांच्यापासून दूर गेली. शेवटच्या तिघांची वाढ आईवडिलांच्या वाढत्या भांडणांच्या काळात झाली होती. ज्या तत्त्वज्ञानानं त्यांच्या प्रसन्न आणि आनंदी स्वभावाच्या मानवी वडिलांचं परिवर्तन गंभीर, चिडखोर आणि तऱ्हेवाईक माणसात केलं होतं त्या तत्त्वज्ञानाची त्यांना गरज वाटत नव्हती. त्यामुळे क्षुल्लक कारणासाठी त्यांचे वडील कौंटेसशी भांडायचे. आत्मसमर्थन करत त्यांचा दुसरा मुलगा एकदा उद्‌गारला होता:

आमच्या बालपणापासून आमच्यावर बिंबवण्यात आलेल्या अपरिवर्तनीय, मूलभूत विश्वासांचा पपांच्या 'धार्मिक' जीवनाशी - त्यांना अतिशय आवडणाऱ्या भिकाऱ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या जीवनाशी - सुसंवाद साधणं कसं शक्य होतं? जेवायच्या वेळी सूप आणि मांसाहार घेणं, इंग्रजी आणि फ्रेंच भाषा बोलणं, शाळा आणि विद्यापीठासाठी तयारी करणं आणि आमच्या हौशी नाटकातील पात्रांची भाषणं पाठ करणं असे आमच्यावर जे संस्कार करण्यात आले होते त्या जीवनाशी पपांनी स्वीकारलेली जीवनपद्धती अगदीच वेगळी होती. आम्हां मुलांना अनेकदा वाटायचं की पपांना समजावून घेण्यात आम्ही चूक केलेली नाही तर पपा स्वतःच कशात तरी

गुंग असल्यामुळे त्यांना आम्हाला समजावून घेता आलं नाही.... [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १३२]

आपल्या मुलाच्या प्रश्नातील दोष न पाहण्याएवढे ते मोठ्या मनाचे होते. परंतु वडील म्हणून टॉलस्टॉय यांना मुलांबद्दल दुःख वाटायचं.

मुलाची लग्न झाल्यानंतर - शेवटचं लग्न १९०१ साली झालं होतं - ती मुलं स्थिरावली आणि टॉलस्टॉय कुटुंब लहान लहान होत गेलं. त्यांच्या तीन मुली खंबीरपणे त्यांच्याकडून होत्या व कमी अधिक प्रमाणात त्यांच्या आध्यात्मिक जीवनात सहभागी होत होत्या. पण हळूहळू त्यांचीही लग्न झाली. मेरीचं १८९७ साली प्रिन्स ओबोलेन्स्कीशी, आणि टॉलस्टॉय कुटुंबातील गांधीजींना भेटलेली एकमेव व्यक्ती म्हणजे तात्याना हिचं एम. एस. सुखोटीनशी १८९९ साली लग्न झालं व टॉलस्टॉय, त्यांची बायको आणि सर्वात लहान मुलगी एवढेच लोक घरात राहिले.

त्यांना वाटायला लागलं की घरात आपण कुणालाही आवडत नाही, आपल्या खऱ्या स्वरूपाची घरातील लोकांना घृणा वाटते, आपल्या उत्पन्नाशिवाय आपण कुणालाही नको आहोत आणि ही गोष्ट कुटुंबियांसाठी वाईट आहे. कुटुंबातील लोकांना वाटायचं की ते वेडसर झालेले आहेत. तुम्ही जर तुमची संपत्ती गरिबांत वाटली तर तुम्हाला वेड्यांच्या रुग्णालयात टाकू अशी टॉलस्टॉय यांना धमकी देण्यात येत होती. कुटुंबियांची जीवनपद्धती बदलवायचा टॉलस्टॉय यांनी केलेल्या प्रत्येक प्रयत्नाचा निग्रहानं प्रतिकार करण्यात यायचा.

मी त्यांच्याशी बोलायचा प्रयत्न करतो पण असं दिसतं की माझ्या शब्दांचं आकलन त्यांना होऊ शकत नाही.... त्यांच्या हृदयशून्यतेचं मला आश्चर्य वाटतं.... मला कुरकुरणाऱ्या म्हाताऱ्याची भूमिका देण्यात आली आहे व त्यांच्या डोळ्यात माझ्यासाठी काहीच नाही. मी जर त्यांच्या जीवनात सहभागी झालो तर मी सत्याशी प्रतारणा करेन आणि माझ्यातील विसंगतीकडे अंगुलिनिर्देश करणारे ते पहिले असतील. आणि मी दुःखानं त्यांच्या वर्तनाकडे पाहत राहिलो तर इतर सर्व म्हाताऱ्यांप्रमाणे मी कुरकुरणारा म्हातारा होतो. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १३९]

गरिबी आणि असंग्रह यांचा उपदेश देणाऱ्या माणसानं आपल्या दृष्टिकोनाच्या विरोधात असलेल्या कुटुंबाला चिकटून राहावं या विचारांनीच टॉलस्टॉय यांच्या मनात वादळ उठलेलं होतं. आपण त्यांच्या जीवनात बुडत आहोत असं त्यांना वाटायला लागलं. ज्या परिस्थितीत ते अडकले होते व दिवसेंदिवस गुरफटले जात होते त्या परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी पळून जावं असं त्यांनी अनेकदा ठरवलं. त्यांना अदृश्य व्हावंसं वाटत होतं, जमावात विरघळून जावंसं वाटत होतं, 'घरदार, नावगाव नसलेला भटक्या' होऊन - टॉलस्टॉयचं अस्तित्व संपवावंसं त्यांना वाटत होतं. 'भटकंतीच्या जीवनात कितीही अडचणी असल्या तरी त्यांची तुलना त्यांच्या अंतःकरणातील वेदनांशी होऊ शकत नव्हती.' [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १४०] आणि पुन्हा, 'मला जर स्वतःबद्दल खात्री असेल तर या वेडसर जीवनाबरोबर मी राहू शकत नाही. एवढंच नाही तर यातूनही काही चांगलं त्यांना शोधून काढता येईल. त्यांच्यात सहृदयतेचा काही अंश असेल तर त्यांना विचार करावाच लागेल.' ते सारखी प्रार्थनेवर प्रार्थना करत होते, 'तो मला अशा प्रकारच्या जीवनापासून वाचवेल असं वेदनेनं किंचाळत म्हणत होते.' [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १७४] तरीही ते निर्णय घेऊ शकत नव्हते. अशा प्रसंगी घरातून पळून जाणं त्यांना अक्षम्य दुबळेपणा वाटत होता. त्यांनी आपल्या वेदनांचा स्वीकार ईश्वरानं पाठवलेल्या सूळाप्रमाणे केला आणि मृत्यूपर्यंत त्या वेदना सहन करायचं ठरवलं.

त्यांची बायको दिवसेंदिवस वेडसर होऊ लागली. ती त्यांच्या जनसंपर्कात अडथळे आणू लागली व काही वेळा यास्नाया पोल्यानाची जमीन पट्ट्यावर घेणारांवर टॉलस्टॉय यांच्या माहितीशिवाय अतिक्रमणाचे खटले भरून त्यांच्या इच्छा आणि श्रद्धा यांच्या विरोधात वक्तव्य देऊन त्यांच्यासाठी लाजिरवाणी परिस्थिती निर्माण करू लागली. तिचा मनोविकार जसजसा वाढत गेला तसतसे तिला अपस्माराचे झटके येऊ लागले व अनेकदा ती आत्महत्येच्या धमक्या देऊ लागली. अखेरीस अनेक वर्षांपासून बंद पडलेले शारीरिक संबंध पुन्हा सुरू करायची तिनं मागणी केली.

टॉलस्टॉय यांना तिच्याबद्दल सहानुभूती वाटत होती, तिला फार सहन करावं लागलं याचीही त्यांना जाणीव व्हायची, तिची त्यांना दया यायची आणि त्यांनी आपल्याकडून तिला सर्वतोपरी मदत करण्याचा व तिला तिच्या स्वतःपासून वाचवायचा प्रयत्न केला. परंतु ह्या प्रयत्नाचा त्यांच्यावर फार ताण आला. त्यांना काही वेळा आचके येऊन बेशुद्धीचे झटके येऊ लागले आणि अनेकदा हृदयगती वाढू लागली.

बर्फाच्या वादळात मध्यरात्रीच्या वेळी ते घरातून जेव्हा निघून गेले तेव्हा दीर्घ काळ चाललेला हा संघर्ष ऑक्टोबर २३, १९१०ला संपला. आपल्या दैनंदिनीत आपल्या प्रस्थानाचं वर्णन करताना टॉलस्टॉय यांनी लिहिलं, 'लेव्ह निकोलव्हिचला नाही तर माझ्यातील काही वेळा अतिशय लहानशा प्रमाणात असलेल्या गोष्टीला म्हणजे मला मी वाचवायचा प्रयत्न करत होतो'. [अलेक्झॅन्ड्रा टॉलस्टॉय, *टॉलस्टॉय*, पृष्ठ ५१६]

रिकॉर्डो बाखेली यांनी वर्णिल्याप्रमाणे ती साधी 'शांत, एकाकी आणि भव्य स्वरूपाची नैसर्गिक.... दुर्दम्य, अदम्य' गूढ आणि आध्यात्मिक वेदनांनी परिपूर्ण, बलिदानाची भावना असलेली, वीरोचित, संन्यस्तपणाची, धार्मिक आणि शोकात्म 'कृती होती'. 'नैराश्य, गुलामगिरी आणि ईश्वराचा शोध यांमुळे होणाऱ्या वेदनांपासून' दूर पळून जाण्यासाठी तसंच 'आशा आणि स्वातंत्र्य, आणि ईश्वरातील मृत्यू आणि मृत्यूतील ईश्वर यांचा शोध घेण्यासाठी ते निघालेले होते.' [सिनी फौन्डेशननं टॉलस्टॉय यांची ५० वी पुण्यतिथीनिमित्त आयोजिलेल्या व्हेनीस येथे झालेल्या टॉलस्टॉय चर्चासत्रात रिकॉर्डो बछेली यांनी वाचलेल्या निबंधावरून. (जून २९ ते जुलै ३, १९६०)]

रेल्वेच्या डब्यातील लोकांनी त्यांना ओळखलं. निरागसपणे त्यांना वाटलं की आपण यास्नाया पोल्यानावरून निसटू शकतो आणि एखाद्या दूरच्या अज्ञात स्थळी स्वतःला गाडून घेऊ शकतो. त्यांच्या हे लक्षातच आलं नव्हतं की त्यांचा 'चेहरा रशियात सर्वपरिचित आहे' व केवळ तो चेहराच त्यांचं गुपित फोडायला पुरेसा आहे; रेल्वेतील प्रत्येकाला त्यांच्या उपस्थितीची कल्पना होती; आणि त्यांच्या गुप्त पलायनाची बातमी वृत्तपत्रांनी सर्व जगात झळकवली होती.

याशिवाय लिओ निकोलविच टॉलस्टॉय स्वतःला मदत कशी काय करू शकणार होते? लवकरच 'एका शेतकऱ्याशी, जमिनीचं मोजमाप करणाराशी आणि विद्यार्थ्याशी' धर्म, हेन्री जॉर्ज आणि शिक्षण या विषयांवर त्यांची उत्साहात चर्चा सुरू झाली. अर्नेस्ट सायमनच्या शब्दात :

वादाला रंग चढताच आपला मुद्दा जोरात मांडण्यासाठी ते उठून उभे राहिले आणि रेल्वेच्या गोंगाटातूनही आपला आवाज सर्वांना ऐकू जावा म्हणून जवळपास ओरडूच लागले. चर्चेला व्याख्यानाचं स्वरूप आलं आणि डब्यातील दोन्ही बाजूचे लोक रशियातील सर्वात प्रसिद्ध माणसाचं बोलणं ऐकता यावं म्हणून त्यांच्याभोवती गोळा होऊन उभे राहिले. एक विद्यार्थी मेहनतीनं त्यांच्या भाषणाची टिपणं घेत होता. जो माणूस काही तासांपूर्वी शांततेत राहण्यासाठी आपल्या बायकोच्या न कळत पळून आला होता तोच माणूस आता गर्दीनं भरलेल्या तिसऱ्या वर्गाच्या रेल्वेच्या डब्यात उभा होता आणि बायबलमधील एखाद्या लांब दाढी वाढलेल्या देवदुताप्रमाणे चिरंतन सत्याचं विवरण करत होता. ते आग्रहपूर्वक सांगत होते की या जगाला निर्माण करणाऱ्या देवावर माझा विश्वास नाही परंतु सर्वांच्या अंतर्यामी असणाऱ्या देवावर मात्र माझा विश्वास आहे. [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, जॉन लॉगमन, लंडन, (१९४९), पृष्ठ ८३८]

इथं शामरॅडिनोजवळील ऑप्टिमा मॉन्सटरीत राहणाऱ्या आपल्या माशा या बहिणीला भेटायची त्यांची इच्छा असल्यामुळे यास्नाया पोल्यानाहून सत्तर एक मैलांवर असलेल्या कोझिल्स्क येथे त्यांनी आपला प्रवास थांबवला. पुन्हा ऑक्टोबर ३०ला प्रवासाला त्यांनी प्रारंभ केला. परंतु ॲस्टॅपोव्हो स्टेशनवर पोहचल्यानंतर त्यांना प्रवास थांबवणं भाग पडलं. त्यांना बाधलेल्या थंडीची परिणती न्युमोनियात झाली होती. त्यांना स्टेशन मास्तरच्या झोपडीत हलवण्यात आलं. तिथं त्यांनी आपल्या नोंदवहीत लिहून घेण्यासाठी पुढील विचार सांगितले.

ईश्वर अनंत आहे : माणूस ही त्याची सांत निर्मिती आहे. ईश्वर ते अनंतत्व आहे की ज्याचं सांत स्वरूपातच माणसाला ज्ञान होतं. केवळ देवच खऱ्या अर्थानं सत्य आहे. पदार्थ, काळ आणि अवकाश यात ईश्वरानं केलेली निर्मिती म्हणजे माणूस. माणसातील ईश्वरत्व जेवढ्या अधिक

प्रमाणात इतर माणसातील ईश्वरत्वाशी एकरूप होईल तेवढ्या अधिक प्रमाणात तो अस्तित्वात येईल. माणसाच्या जीवनाचं इतरांच्या जीवनाशी ऐक्य प्रेमाच्या माध्यमातून होऊ शकेल.

ईश्वर प्रेम नाही, परंतु माणसात जेवढं अधिक प्रेम असेल तेवढाच तो ईश्वराला अधिक अभिव्यक्त करील व तेवढाच खऱ्या अर्थानं तो अस्तित्वात येईल. [अलेक्झॅन्ड्रा टॉलस्टॉय, *टॉलस्टॉय*, पृष्ठ ५२०]

परंतु दिव्यातील तेल जवळपास संपलेलं होतं. त्यांची शक्ती कमी होत जात होती. नोव्हेंबर चारच्या मध्यरात्री मोठ्या प्रमाणात त्यांची प्रकृती ढासळू लागली. त्यांची बायको अलेक्झँड्रिया आणि टॉलस्टॉय कुटुंबातील अन्य लोक मध्यंतरीच्या काळात तिथं आलेले होते. धर्माधिकाऱ्यांच्या पवित्र सभेच्या आदेशानुसार मरणपंथाला लागलेल्या माणसाला चर्चशी समझोता करण्यासाठी राजी करावं म्हणून ऑप्टिना मॉन्स्टरीच्या मठाधीपतीला पाठवण्यात आलं होतं. तत्कालीन धर्माधिकाऱ्यांचा दुटप्पीपणाबद्दल टॉलस्टॉय यांच्या मतांची चांगलीच कल्पना असल्यामुळे टॉलस्टॉय यांची शुश्रूषा करणारांनी आजाऱ्याच्या खोलीत त्यांना प्रवेश नाकारला. आजारात टॉलस्टॉय यांनी मृत्यूची कोणतीच भीती दाखवली नाही. त्यांची उशी सरळ करत असताना निःश्वास सोडत ते म्हणाले, 'शेतकरी कसे मरतात ते तुम्हाला माहीत आहे?' मृत्यूच्या अगदी थोडा वेळ आधी त्यांनी सर्जी नावाच्या आपल्या मुलाला जवळ बोलावलं. 'मी.... सत्यावर फार प्रेम करतो....' हे त्यांनी उच्चारलेले शेवटचे शब्द होते. नोव्हेंबर ७, १९१०ला सहाला पंधरा मिनिटं कमी असताना त्यांनी शेवटचा श्वास सोडला.

धर्मपरिषदेनं त्यांच्या स्मृतीच्या सर्व सभांना मनाई केली. परंतु संपूर्ण रशियात तो दिवस शोकदिवस म्हणून पाळण्यात आला. सेंट पिटसबर्ग विद्यापीठानं आपलं शैक्षणिक कार्य थांबवलं, सर्व नाट्यगृहे बंद होती, आणि झार, द ड्युमास, आणि राज्याच्या मंत्रिमंडळानं खास शोकसंदेश पाठवले. त्यांनी निवडलेल्या अरुंद दरीच्या काठी त्यांचं दफन करण्यात आलं होतं. त्याच ठिकाणी निकोलाय या त्यांच्या भावानं 'हिरवी काठी' पुरली होती. तिच्यावर असं रहस्य कोरलेलं

होतं की जे 'मानवजातीला जेव्हा कळेल तेव्हा सुवर्णयुग अवतरून' सर्व लोक बांधव होणार होते आणि जगातील पाप आणि क्षुद्रता संपणार होती.

* * * *

त्यांच्या मृत्यूच्या पुढील वर्षी यास्नाया पोल्याना त्यांच्या मुलांजवळून विकत घेण्यात आलं आणि ती जमीन त्यांच्या मृत्युपत्रानुसार तिथल्या शेतकऱ्यांना वाटण्यात आली. 'आजच्या माणसांनी आपला मार्ग बदलवला नाही तर कामगारांची क्रांती होईल व तीही अधिक भयानक विनाशानं आणि रक्तप्रवाह वाहून' ही त्यांनी वर्तवलेली भविष्यवाणी पूर्ण व्हायला त्यांच्या मृत्यूनंतर फार वर्षं लागली नाहीत. १९१७ साली बोल्व्हेशिक क्रांती झाली आणि तेव्हा घट्टे पडलेल्या हातांना 'लाजेची गोष्ट' तर मानण्यात येतच नव्हतं उलट तसं नसणं हा गुन्हा मानण्यात येत होता आणि त्या अपराधासाठी अनेक नाजूक आणि गोऱ्या हाताच्या श्रीमंतांना आपल्या जिवाला मुकावं लागलं होतं. झंझावात आलेला असताना यास्नाया पोल्याना येथे कौंटेस आणि आधीच विधवा झालेल्या तान्याला क्रांतिकारक मारायला आले तेव्हा पळून जायच्या तयारीत पेट्या भरून त्या पेट्यांवर त्या बसलेल्या होत्या. परंतु आता शेतमालक झालेल्या 'टॉलस्टॉय इस्टेटी'च्या शेतकऱ्यांनी हल्लेखोरांना परतायला भाग पाडलं आणि इस्टेटीला आणि टॉलस्टॉय कुटुंबियांच्या लोकांना त्यांनी वाचवलं. ज्या कौंटेसनं टॉलस्टॉय यांना विरोध केला होता, ज्या आपल्या बटाईदारांशी सहानुभूती ठेवण्याबद्दल टॉलस्टॉय यांच्याशी भांडल्या होत्या आणि ज्यांनी अक्षरशः त्यांना मृत्यूच्या खाईत ढकललं होतं त्या कौंटेस केवळ टॉलस्टॉय यांच्या पुण्याईमुळे वाचल्या होत्या. त्यांच्या शेजारच्या इस्टेटी व इस्टेट मालक मात्र त्यावेळच्या दंगलीच्या तडाख्यात सापडले होते. मैलोगणती प्रदेशातील ती एकच इस्टेट अशी होती की जी सहीसलामत सुटली होती.

टॉलस्टॉय यांनी आपल्या डायरीत अंदाज व्यक्त केला होता की त्यांच्या बायकोच्या मनात जर काही परिवर्तन व्हावयाचं असेल तर ते तिच्या मनापेक्षा काही वेगळ्याच कारणानं होईल.

'हळूहळू वैशिष्ट्यपूर्ण अशा स्त्रियांच्या मार्गानं, ज्याचं मला आकलन नाही.... ती तिच्या स्वतःच्या पद्धतीनं याच निष्कर्षावर येईल.' [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, जॉन लॉगमन, लंडन, (१९४९), पृष्ठ ६२५]

सर्व कौटुंबिक वादळात टॉलस्टॉय यांच्या बाजूनं राहिलेली त्यांची मुलगी अलेक्झँड्रिया तुर्कस्तानच्या आघाडीवर नर्सचं काम करायला जायच्या आधी १९१४ साली आपल्या आईला भेटायला गेली. कौंटेस सुज्ञ आणि मवाळही झालेली होती. एकेकाळचे तिचे आकर्षक डोळे आता मंद झाले होते. आता ती जरी पाहू शकत होती तरी तिची दृष्टी मंद झालेली होती. 'तू युद्धावर का जाते आहेस? वडिलांना हे आवडलं नसतं.' ती म्हणाली.

१९१८ साली तिनं परत यास्नाया पोल्यानाला भेट दिली. बोल्व्हेशिक क्रांतीनंतर तिथं दुष्काळ पडला होता. पूर्वीप्रमाणेच आताही जेवण शुभ्र चादर अंथरलेल्या टेबलवरच वाढण्यात आलं होतं, तिथं चांदीही दिसत होती परंतु ताटल्यात उकळलेले हिवाळी बीट आणि कणिक आणि भुसा मिसळून तयार करण्यात आलेली काळी ब्रेड होती.

मरायच्या आधी कौंटेसनी मान्य केलं की मी माझ्या महान नवऱ्यावर फार मोठा अन्याय केला आहे. १९२० साली अलेक्झँड्रिया तिला अखेरची भेटायला गेली असता ती म्हणाली, 'साशा बेटा, मला माफ कर. मला कळत नाही की मला काय झालं होतं.... मला खरोखरच वाटतं की मला वेड लागलेलं होतं.... मला माहीत आहे की त्याच्या मृत्यूसाठी मीच कारणीभूत आहे.' [अलेक्झॅन्ड्रा टॉलस्टॉय, *टॉलस्टॉय*, पृष्ठ ५२५ तसंच *व्हाट देन मस्ट वुई डू?*, अनुवादक ए. मॉड, संपादकीय टीप पृष्ठ ११]

७

टॉलस्टॉय यांनी ख्रिश्चनत्वाच्या पुनःशोधाच्या कार्याला स्वतःला वाहून घ्यायचा जसा प्रयत्न केला होता तसा प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत कोणीच केलेला नव्हता. चर्चनं उद्घोषित केलेल्या ख्रिश्चन धर्माच्या स्वरूपाविषयी असमाधान वाटल्यामुळे आणि बायबलचा तंतोतंत अर्थ लावताना आलेल्या अडचणीमुळे एसोटेरिक युनियनच्या संस्थापकांनी दृष्टांतात्मक

पद्धतीनं बायबलचा अन्वयार्थ लावायचा प्रयत्न केला आणि घोषित केलं की बायबल मधील येशू 'ईश्वराचा एकमेव प्रेषित नाही' आणि ख्रिस्ताचे जे चमत्कार बायबलमध्ये सांगण्यात आलेले आहेत त्यांना 'ऐतिहासिक घटना' मानण्यात येऊ नये. एसोटेरिक युनियनच्या संस्थापकांनी आपल्या स्वतःच्या गूढ अनुभवांच्या आधारे त्या चमत्कारांचा अधिकारवाणीनं जो अर्थ लावला होता त्या अर्थाप्रमाणे त्या चमत्कारांना चिरंतन सत्याचे दृष्टान्त मानायला पाहिजे असा एसोटेरिक युनियनच्या संस्थापकांचा दावा होता. यामुळे एका अधिकारवाणीच्या ठिकाणी केवळ दुसऱ्या अधिकारवाणीची स्थापना करण्यात आली होती. आपल्या मतप्रणालीचा पुरस्कार करण्यासाठी त्यांना अशा मिथ्या वैज्ञानिक युक्तिवादाचा आधार घ्यावा लागला की जो अनेकदा भाबडेपणाचा वाटायचा.

उलटपक्षी टॉलस्टॉय यांनी येशूला माणूस जरी मानलं तरी बायबलमध्ये येशूसंबंधी वर्णिलेल्या सर्व आधिभौतिक आणि न-नैतिक गोष्टींना गाळलं. अभिमान वाटावा अशा त्यांच्या विवेकवादानं सर्व प्रकारच्या हुकुमशाहीविरुद्ध बंड पुकारलं. 'येशूला मी आपल्यासारखाच एक माणूस मानतो. त्याला देव मानणं हे देवाला नाकारण्यासारखं आहे' असं त्यांनी घोषित केलं. येशूच्या जन्माच्या चमत्काराविषयी ते म्हणाले, 'त्याबद्दल मला काही माहीत नाही आणि माहिती करून घ्यायची इच्छाही नाही.' येशू हा महापुरुष होता व त्याच्या शिकवणुकीतून आढळणाऱ्या दैवी अंशापर्यंतच ती दैवी होती. परंतु बुद्ध आणि आणि इतर माणसंही येशूप्रमाणेच महान होती. सत्यावर येशूचा एकट्याचाच एकाधिकार नाही.

येशू देवाचा मुलगा आहे म्हणून त्याची शिकवण सत्य आहे असं नसून ती मानवी विवेकाच्या प्रकाशाशी जुळणारी आहे म्हणून सत्य आहे : 'चर्च, परंपरा, बायबल आणि येशूलाही काढून टाका आणि मग विवेक आणि सदसद्विवेकबुद्धी यांच्याद्वारे माणसाला

नैतिकतेचं म्हणजेच ईश्वराचं ज्ञान सरळ पद्धतीनं आणि स्पष्टपणे होईल. इतर कोणत्याही परिस्थितीत तसं होऊ शकणार नाही. मग असं आढळून येईल की जे 'सत्याचरण' करतात

त्यांचा कधीच विनाश होऊ शकत नाही व सत्यापासून विन्मुख होणं त्यांना कधीच परवडू शकणार नाही.' [टॉलस्टॉय, डॉ. कालिदास नाग यांनी टॉलस्टॉय अँड गांधी या पुस्तकात दिलेलं उद्धरण, पुस्तक भंडार, पटना, (१९५०) पृष्ठ ३२]

चर्चची शिकवण साक्षात्कारावर आधारित असल्यामुळे तिची तर्काधारे छाननी करता येऊ शकत नाही असं जे चर्चचं म्हणणं होतं त्याला टॉलस्टॉय यांनी आव्हान दिलं. माणसाला मार्गदर्शन व्हावं म्हणून देवानं आपलं सत्य माणसाच्या अंतःकरणात प्रगट केलं आहे. त्यामुळे ते इतक्या साध्या भाषेत सांगण्यात आलेलं असलं पाहिजे की ज्यांच्यासाठी ते सांगण्यात आलेलं आहे त्यांना त्यापासून त्याचं सहज आकलन होऊन त्यापासून मार्गदर्शन होऊ शकेल. तर्काद्वारे जिचं आकलन होऊ शकणार नाही अशा प्रकारच्या भाषेत तो ते सत्य प्रकाशित करील अशी अपेक्षा करता येत नाही. त्यामुळे चर्च ज्या सत्याचा साक्षात्कार झाल्याचं सांगते ते सत्य असेल तर त्या सत्याची तर्काद्वारे छाननी होऊ देण्यात चर्चला घाबरायचं कारण नाही. 'जे विवेकाला आकलनीय असतं व अत्यूच्य सीमेपर्यंत पोहोचलेलं असतं त्यालाच मी ईश्वरी ज्ञान वा साक्षात्कार म्हणेन आणि जे ईश्वरी असतं त्याचं चिंतन करणं म्हणजे तर्कशक्तीच्या पलीकडे जे सत्य प्रस्थापित झालेलं असतं त्याचं चिंतन करणं. जीवनाचा अर्थ काय .... अशासारख्या प्रश्नांची उत्तरं तर्काधारे मिळू शकत नाहीत. ती उत्तरं ज्याद्वारे मिळतात त्यालाच मी ईश्वरी ज्ञान म्हणेन.' [कौंट लेव टॉलस्टॉय, *द फोर गॉस्पेल्स हार्मनाईझ्ड अँड ट्रान्सलेटेड*, अनुवादक लिओ विनर, जे. एम. डेन्ट अँड कंपनी, लंडन, (१९०४), खंड १,पृष्ठ ११]

असे काही प्रश्न होते की ज्यांची उत्तरं त्यांनी बायबलमधून शोधायचा प्रयत्न केला होता : 'मी काय आहे?, देव काय आहे? आणि प्रत्येक साक्षात्काराचा मुख्य आधार काय आहे?'

त्यांचं म्हणणं होतं की ही उत्तर माझ्यासाठी आकलनीय असायला पाहिजे 'कारण अनाकलनीय गोष्टींवर कोणीच विश्वास ठेवू शकत नाही आणि अनाकलनीय गोष्टीचं ज्ञान हे अज्ञानासारखंच असते'; त्यानं विवेकाच्या नियमांचा उल्लंघन करू नये, 'देव ही गोष्ट सोडून इतर काहीही करू शकतो: तो मूर्खपणाची बडबड करू शकत नाही. आणि ज्याचं आकलन होऊ

शकत नाही अशा साक्षात्कारासंबंधी लिहिणं हा मूर्खपणा आहे'; [वरीलप्रमाणे] आणि असं साक्षात्कार हा दुराग्रहापलीकडील असतो. गणना न करता येणाऱ्या माणसासाठी अनंताची कल्पना ज्याप्रमाणे अपरिहार्य असते त्याचप्रमाणे विवेकासाठी असा साक्षात्कार अपरिहार्य असतो. माणसाची बुद्धी कुठवर पोहोचू शकते याला सीमा आहेत हे सर्वांना माहीत आहे, परंतु तिच्या सहाय्यानं काढलेल्या सर्व महत्त्वाच्या निष्कर्षांच्या आधारानं मला माझ्या आयुष्याचे सर्व प्रश्न सोडवता आले पाहिजेत.' वेगळ्या शब्दात सांगायचं तर उत्तर इतकं स्पष्ट, सत्य आणि विवेकाला पटणारं असायला पाहिजे की माणसाला त्यावर सहजपणे विश्वास ठेवायची अंतःकरणापासून इच्छा व्हायला पाहिजे आणि कोणत्या तरी लहरीपणाच्या बंधनामुळे त्यावर विश्वास टाकणं आवश्यक आहे असं त्याला वाटायला नको. मला 'जे काही सांगण्यात येईल त्यावर मी आधीच विश्वास ठेवावा' अशा प्रकारच्या श्रद्धेवर साक्षात्कार आधारित असू शकत नाही. *'श्रद्धा हा अपरिहार्यतेचा आणि सत्याच्या साक्षात्काराचा अपरिहार्य परिणाम आहे व तिच्याद्वारे विवेकाचं पूर्ण समाधान व्हायला पाहिजे.'* [वरीलप्रमाणे, खंड १, पृष्ठ १२, (तिरपी अक्षरं माझी)]

माणसातील समतेच्या जाणिवेला मान्यता दिल्याची ख्रिश्चन धर्मानं घोषणा केली आहे. परंतु चर्च आणि तिच्या मालकांना म्हणजे राज्यांना ती अमलात आणणं गैरसोयीचं वाटलं. त्यामुळे माणसातील समतेच्या जाणिवेत विकृती निर्माण करायचं साधन म्हणून चर्चनं श्रद्धेचा दुरुपयोग केला आहे. समतेच्या उद्घोषातून सुटका करून घेण्यासाठी उपाय शोधून काढण्यात आला आहे. काही लेखनासाठीच नव्हे तर चर्च म्हणवल्या जाणाऱ्या माणसांच्या विशिष्ट वर्गासाठीही अस्खलनशीलता घोषित करण्यात आली व त्यांनाही 'त्यांनी निवडलेल्या व्यक्तींना अस्खलनशील घोषित करायचा अधिकार देण्यात आला'; [लिओ टॉलस्टॉय, *एस्सेज अँड लेटर्स*, अनुवादक अलेमेर मॉड, पृष्ठ ३०१] भोंदुगिरीला आधार देण्यासाठी बायबलमध्ये थोडीशी भर घालून शोध लावण्यात आला आणि श्रद्धेची व्याख्या 'जिची आशा करण्यात येते व जिचा पुरावा मिळत नाही अशा गोष्टी' (हेब ११ : १) अशी करण्यात आली. टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की विषण्णता उत्पन्न करणारा हा

सर्व उद्योग लोकांच्या विवेकाला बधिर करायची युक्ती आहे. त्यांच्या मते 'श्रद्धा आशाही नाही आणि भोळसटपणाही नाहीं' (पुराव्यासाठी एपिस्टलमधील उताऱ्यातील उल्लेखावरून श्रद्धा म्हणजे साधा भोळसटपणा असे दिसून येते.) तर ती 'आत्म्याची विशिष्ट अवस्था आहे'. ती माणसाला काही गोष्टी करायला भाग पाडते. 'प्रत्यक्षाप्रमाणे माणसानं अप्रत्यक्षाला पाहिलेलं आहे' अथवा 'श्रद्धेद्वारे अपेक्षापूर्तीहोईल असं माणसाला वाटते' म्हणून ती त्याला विशिष्ट वर्तन करायला लावते असंही नाही. श्रद्धेमुळे माणसाला 'विश्वातील आपल्या स्थानाची जाणीव होते व ती जाणीव झाल्यानंतर स्वाभाविकपणेच तो त्या स्थानाप्रमाणे वागायचा प्रयत्न करतो.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३०४] सर्व धार्मिक श्रद्धांची कसोटी आणि सार यात आहे की 'माणसाचं विश्वातील स्थान निर्धारित झाल्यानंतर त्याच्याकडून अपरिहार्यपणे त्यानुसार वर्तनाची मागणी ते स्थान करत असते.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३०६] उदाहरणार्थ ज्या खऱ्या खिश्चनाचा 'देव सर्वांचा आध्यात्मिक पिता आहे, आणि माणूस जेव्हा ईश्वराचं पितृत्व मान्य करतो व त्यानुसार संपूर्ण मानवजातीशी बंधुभावाच्या नात्यानं वागतो तेव्हा माणसाला परमसुखाची प्राप्ती होऊ शकते.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३०६]

टॉलस्टॉय पुढं म्हणाले की विज्ञानाच्या गृहीतकाप्रमाणे श्रद्धा सैद्धांतिक गृहीतक नाही. श्रद्धेचा अनुभवानं पडताळा घेता येऊ शकतो. विज्ञानाच्या गृहीतकाप्रमाणे ती सिद्ध करता येत नसली तरी ती अविवेकी नाही. उलटपक्षी 'ती जीवनातील घटितांना अधिक तर्कशुद्ध अर्थ देते व तिच्याशिवाय ती घटितं अर्थहीन आणि विसंगत वाटतात.' अखेरीस त्यांनी सांगितलं की खऱ्या श्रद्धेला तिच्या विकृतीपासून वेगळं ओळखायची निर्णायक कसोटी अशी आहे की *विकृत श्रद्धेत माणूस आपल्या त्यागाच्या आणि प्रार्थनेच्या मोबदल्यात ईश्वरानं आपल्या इच्छा पूर्ण कराव्या अशी मागणी करत असतो. परंतु खऱ्या श्रद्धेत माणसाला वाटत असतं की देवाला त्याची इच्छा आपण पूर्ण करावी असं वाटत आहे आणि आपण त्याची सेवा करावी अशी तो मागणी करतो आहे.* [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३०७]

लोकांच्या श्रद्धेला बळकटी यावी म्हणून प्रेषिताच्या कार्याचं वर्णन करताना त्यात चमत्काराचा अंतर्भाव करण्यात येत असतो. त्या काळात त्यामुळे हा हेतू साध्यही झाला असेल. परंतु आधुनिक काळात ते ख्रिस्ताच्या शिकवणुकीच्या आकलनात अडथळा निर्माण करतात आणि त्या श्रद्धेला बळकटी आणण्यापेक्षा तिचं महत्त्व कमी करतात. टॉलस्टॉय म्हणाले की 'सत्याच्या पुराव्यासाठी चमत्काराचा आधार घेणं हे प्रकाश दाखवण्यासाठी दिव्याचा आश्रय घेण्यासारखं आहे. परंतु प्रकाश असेल तर दिवा लावण्यात काहीच अर्थ नाही कारण दिव्याशिवायही प्रकाश दिसणारच आहे. ख्रिस्ताचे चमत्कार हे त्या दिव्याप्रमाणे आहेत ज्यांना प्रकाशित करण्यासाठी प्रकाशात आणण्यात आलं आहे. जर तिथं प्रकाश असेल तर काहीही झालं तरी तो दिसणारच आहे आणि जर तिथं प्रकाश नसेल तर तिथं केवळ दिव्याचाच प्रकाश असेल.' [कौंट लेव टॉलस्टॉय, *द फोर गॉस्पेल्स हार्मनाईझ्ड अँड ट्रान्सलेटेड*, अनुवादक लिओ विनर, खंड १, पृष्ठ १५]

त्यामुळे बायबलमधील चमत्कारांना आणि ऐतिहासिक अर्थाला बाजूला ठेवत टॉलस्टॉय बायबलच्या चार तत्त्वांमध्ये सुसंगती निर्माण करायच्या आणि त्यांचा अर्थ स्पष्ट करायच्या कामाला लागले. तेळामाधानपूर्वक म्हणाले की चार तत्त्वांमध्ये ख्रिश्चनत्वाच्या सर्व तत्त्वांचा समावेश झाला आहे. त्याचप्रमाणे जुन्या करारासंबंधीही त्यांनी काहीच लिहिलं नाही. नव्या कराराच्याआधी जे काही लिहिण्यात आलं होतं त्याचा उपयोग नवा करार समजावून घ्यायची ऐतिहासिक साधनं म्हणूनच होऊ शकत होता. तसंच नव्या करारानंतर लिहिण्यात आलेल्या गोष्टींकडे या नव्या कराराच्या स्पष्टीकरणार्थ लिहिण्यात आलेल्या गोष्टी म्हणूनच पाहता येऊ शकते असं टॉलस्टॉय यांचं मत होतं. बायबलमधील येशूची शिकवण कोणत्या प्रकारे देण्यात आली होती व तिचा यहुदी धर्माच्या तत्त्वाशी, ज्यांची जागा ही तत्त्व घेणार होती, काय संबंध आहे हे समजावून घेण्यासाठीच जुन्या करारातील पुस्तकांची मदत होऊ शकत होती. परंतु जुन्या करारातील पुस्तकं येशूच्या शिकवणुकीचा अर्थ लावण्यावर मर्यादा घालू शकत नाहीत. ॲपॉस्टल्स, आणि जॉन, पिटर, आणि जेम्स यातील उपदेशात येशूच्या शिकवणुकीशी 'अनेक

ठिकाणी काहीच साम्य नाही आणि काही ठिकाणी तर ती विरोधीही आहे.' रिव्हिलेशनमध्ये 'अक्षरशः काहीच गूढ उकलण्यात आलेलं नाही.' बायबलमध्ये सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीवर - चमत्कार, येशूच्या अनुयायांचं वर्तन इत्यादीवर अस्खलनीयतेचं शिक्कामोर्तब करून आणि त्या सर्वांना पवित्र सत्य म्हणून मान्यता देऊन चर्चनं त्याकडे 'कानाडोळा केला, लपवालपवी केली, खोटा व्यवहार केला, विसंगती पत्करली आणि दुःखाची बाब म्हणजे अनेकदा असत्य बोलूनही त्यांचं समर्थन करायचा प्रयत्न केला.' [वरीलप्रमाणे]

बायबलचा बारकाईनं अभ्यास केल्यानंतर टॉलस्टॉय या निष्कर्षावर पोहोचले की त्यात अस्खलनीय दैवी सत्यही सांगण्यात आलेलं नाही आणि ती एकाच माणसाची निर्मितीही नाही. त्यांच्या मते बायबलच्या निर्मितीसाठी हजारो लोकांचे हात लागलेले होते व त्यांच्या मताचा त्यावर प्रभाव पडलेला होता. बायबलमधील प्रसंग एकत्रित करण्यात आल्यानंतर शतकांपासून सुरू असणाऱ्या हस्तांतरणात, अनुवादात, लिप्यंतरात, आणि अनेकदा न शिकलेल्या, पूर्वग्रहदूषित असलेल्या लोकांनी विराम चिन्हांचा उपयोग न करता तयार केलेल्या प्रतींवरून लिप्यंतर करण्यात येऊन प्रती तयार करण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेत बायबलमध्ये अनेक चुकांचा शिरकाव झाला; जिथं काहीही आवश्यकता नव्हती तिथं अन्वयार्थाचा प्रक्षेप करण्यात आला आणि अनेकदा जाणीवपूर्वक अशा रीतीनं अनुवाद करण्यात आला की येशूच्या एकूण शिकवणुकीविरुद्ध त्याचा अर्थ जावा. [उदाहरणार्थ मॅथ्यू ५,२२मध्ये 'विनाकारण' हे शब्द 'जो कोणी आपल्या भावावर संतापलेला असेल' आणि 'निर्णयाचा धोका असेल' या शब्दांमध्ये घातलेले आहेत ज्याला मूळ ग्रीक प्रतीत कोणताही आधार नाही. मॅथ्यू ५,३२ मध्ये घटस्फोटासंबंधीच्या आज्ञेचं भाषांतर असं करण्यात आलं आहे : 'जो कोणी आपल्या बायकोला दूर लोटेल, व्यभिचाराच्या कारणासाठी, तो तिला व्यभिचार करायला लावत्तो व जो कोणी अशा स्त्रीशी विवाह करतो तो व्यभिचार करतो.' व्याकरणाच्या दृष्टीनंसुद्धा हे वाक्य अर्थपूर्ण होत नाही. शब्दशः या कडव्याचा अनुवाद असा होतो. 'जो कोणी आपल्या बायकोला दूर लोटेल, व्यभिचाराच्या कारणाशिवाय, तो तिला व्यभिचार करायला लावतो. आणि जो घटस्फोटित स्त्रीशी विवाह करतो तोही व्यभिचार करतो.' भाष्य करताना टॉलस्टॉय सांगतात की अर्थ स्पष्ट आहे : ज्यूंच्या जुन्या कायद्यानुसार मान्य असलेल्या घटस्फोटाच्या पद्धतीला येशू या आज्ञेनुसार विरोध करत आहे] चर्चनं पुरस्कारिलेल्या नव्या करारातील प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कडवं पवित्र असल्याचं अमान्य करत टॉलस्टॉय यांनी पाठाच्या निर्दोषतेला आव्हान देत त्याविषयी अनेक

प्रश्न विचारायचं आणि पाठशोधन करायचं मुक्त स्वातंत्र्य घेतलं. त्यासाठी त्यांनी मूळ ग्रीक बायबलचा आधार घेतला आणि जेव्हा येशूच्या शिकवणुकीचा अगदी स्पष्ट अर्थ लागत असलेल्या परिच्छेदाच्या विपरीत अर्थ आढळायचा तेव्हा तर त्यांनी त्याही मागे जायचा प्रयत्न केला आणि येशूच्या शिकवणुकीशी त्या पाठांमध्ये सुसंगती निर्माण करायचा प्रयत्न केला.

अशा रीतीनं आपल्या जीवनाला पापमुक्त ठेवण्यासाठी आणि मृत्यूही ज्याचा नाश करू शकणार नाही अशा प्रकारचा हेतू जीवनाला देण्यासाठी पर्वतावरील प्रवचनात करण्यात आलेल्या नीतिपर उपदेशात सर्वप्रकारचं मार्गदर्शन असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. परंतु त्यात त्याहूनही अधिक काही होतं. त्याचा जेवढा व्यक्तीशी संबंध होता त्यापेक्षा समाजाशी काही कमी संबंध नव्हता. त्यांनी एका पत्र पाठवणाराला लिहिलं की तीच शिकवण केवळ खरी असते जी आत्म्याचं समाधान करते आणि त्याच वेळी इतरांसाठीही कल्याणकारक असते. ख्रिश्चनत्व धार्मिक स्थितप्रज्ञताही नाही आणि त्यात केवळ स्वतःच्या आत्म्याचाच विचार नाही अथवा 'खरं संशयातीत कल्याण कशात आहे याची स्वतःलाच माहिती नसणाऱ्या परंतु तरीही त्याची फळं इतरांना देऊ पाहणाऱ्या' घायकुत्या सुधारकाशीही ख्रिश्चनत्वाचा संबंध नाही. टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की 'आपलं स्वतःचं कल्याण केल्याशिवाय' इतरांचं कल्याण करणं तसंच 'आपल्या शेजाऱ्यांचं कल्याण न करता केवळ आपलं कल्याण करणं' ख्रिश्चन जीवन पद्धतीत अशक्य आहे. [कौंट लेव टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?*, अनुवादक ए. मॉड, पृष्ठ ३८५, एन्जलहार्ट यांना लिहिलेल्या पत्रात] ख्रिश्चनत्व भक्तीचं आणि वैयक्तिक मुक्ततेचं काही केवळ गूढ तत्त्वज्ञान नाही. त्यात जीवनविषयक अशी नवीन संकल्पना आहे की जिचं अनुसरण करणारांकडून त्यांच्या जीवनपद्धतीविषयी ती काही मागणी करत असते. चर्च आणि राज्य ज्याप्रमाणे हातात हात घालून 'द्व्यर्थी शब्द, लपवालपवी आणि खोटेपणा यांच्या सहाय्यानं' त्या आव्हानाला बगल देतात त्याप्रमाणे वागणं 'धर्मविरोधी आणि ख्रिश्चनत्वाला नाकारणारं कृत्य ठरेल.'

८

टॉलस्टॉय यांनी अन्वयार्थ लावल्याप्रमाणे येशूची शिकवण ही तात्त्विक, नैतिक आणि सामाजिक विचारसरणी होती. तिचं जर प्रामाणिकपणे अनुसरण करण्यात आलं तर केवळ व्यक्तिगत जीवनच नव्हे तर संपूर्ण मानवी समाजाचा पोतच बदलू शकतो. उदाहरणार्थ येशूनं पर्वतावरील प्रवचनात वर्तनाविषयी केलेल्या अखेरच्या धार्मिक उपदेशात सांगितलं आहे की तुम्ही 'ईश्वरावर आणि तुमच्या शेजाऱ्यावर संपूर्ण अंतःकरणापासून, संपूर्ण आत्म्यापासून आणि संपूर्ण मनापासून स्वतःवर जसं प्रेम कराल तसं प्रेम करा.' यानुसार पूर्णपणे आचरण करायचं असल्यास आपल्याला समतेच्या सिद्धान्ताकडे जावं लागतं, वांशिक भेदभावाचा त्याग करावा लागतो आणि राष्ट्रभक्तीच्या भावनेलाही तिलांजली द्यावी लागते कारण यामुळे आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करा या उपदेशावर मर्यादा येतात व म्हणून ही भावना वरील उपदेशाशी विसंगत आहे. 'तू कुणालाही मारू नये' या उपदेशातून केवळ युद्धाला आणि फासावर चढवायच्या शिक्षेलाच विरोध करण्यात आलेला नाही तर मांसाहारालाही विरोध करण्यात आलेला आहे. आणि शपथ घ्यायला जी मनाई करण्यात आली आहे त्यातून आपल्याला सर्व प्रकारच्या न्यायालयांना आणि बळावर आधारित सर्व प्रकारच्या शासनपद्धतीला विरोध करावा लागतो. भिक्षांदेहीच्या आणि उद्याचा विचार न करायच्या येशूच्या उपदेशातून खाजगी संपत्तीला विरोध करण्यात आलेला असून ख्रिश्चनत्वाच्या तत्त्वावर आधारित वस्त्या स्थापन करायला सांगितलं आहे.

यासाठी या उपदेशांचा 'अर्थ' बायबलनुसार लावला पाहिजे आणि कुणाच्या लहरीप्रमाणे वा सोयीप्रमाणे त्याचा 'अर्थ' लावण्यात येऊ नये. 'पर्वतावरील प्रवचनातील उपदेश' हा परिपूर्ण माणसासाठी आहे आणि अधःपतित माणूस आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानं परिपूर्णतेला पोहोचू शकत नाही आणि त्यामुळे त्याची मुक्ती केवळ 'श्रद्धा, प्रार्थना आणि त्याग' यावरच अवलंबून असते हे धर्ममार्तंडांनी दिलेलं स्पष्टीकरण झिडकारत ते आग्रहपूर्वक म्हणाले की त्या उपदेशाचा

व्यक्तीशी प्रत्यक्ष संबंध आहे व व्यक्तीनं त्याप्रमाणे वर्तन केलं पाहिजे अशी त्या उपदेशाची मागणी आहे.

त्यांना शोध लागलेल्या नवीन श्रद्धेच्या प्रकाशानं तेजोमय झालेल्या पुढील उताऱ्यात टॉलस्टॉय यांनी आपल्या संप्रदायाचं वर्णन असं केलं आहे :

सर्व लोक जेव्हा येशूच्या शिकवणुकीप्रमाणे वागतील तेव्हाच खरं तर या जगात माझं कल्याण होईल असा मला विश्वास वाटतो.

माझा विश्वास आहे की त्या शिकवणुकीप्रमाणे वागणं शक्य, सोपं आणि आनंददायी आहे.

माझा विश्वास आहे की त्या शिकवणुकीनुसार सर्वत्र आचरण होईपर्यंत, मी एकटा जरी त्यानुसार आचरण करणारा असलो तरी तसं आचरण मी करत राहिलो पाहिजे. ज्याप्रमाणे जळत्या घरात सापडलेल्या माणसाला जर दार दिसलं तर तिकडे पळत जाण्याऐवजी दुसरा कोणताच पर्याय नसतो त्याप्रमाणे अपरिहार्य विनाशापासून मला वाचवण्यासाठी माझ्याजवळ दुसरा कोणताच उपाय नाही....

माझा विश्वास आहे की ही शिकवणूक मानवतेसाठी वरदान आहे, ती मला अपरिहार्य विनाशापासून वाचवू शकते व या जगात माझं सर्वोत्तम कल्याण करू शकते. त्यामुळे ती मान्य करण्याशिवाय माझ्यासमोर कोणताच पर्याय नाही. [लिओ टॉलस्टॉय, *अ कन्फेशन, द गॉस्पेल इन ब्रीफ, आणि व्हाट आय बिलीव्ह*, अनुवादक ए. मॉड, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, (१८५८), पृष्ठ ५२३]

लोकांनी येशूच्या शिकवणुकीप्रमाणे शब्दशः वर्तन केलं तर काय होईल? लोकांचा उदरनिर्वाह कसा होईल? उदाहरणार्थ, माणसांनी आपल्या सर्व भौतिक संपत्तीचा त्याग केला तर त्यांना उपाशी मरावं लागणार नाही काय असा प्रश्न टॉलस्टॉय यांना विचारण्यात आला असता ते उत्तरले की येशूला या आक्षेपाची पूर्वकल्पना होती आणि त्यानं उत्तर दिलं की 'या सर्व गोष्टींची तुमच्यात भर पडेल'. इतरांनी आपली सेवा करावी म्हणून माणूस जगत नाही. कोणी जर स्वार्थी

हेतूशिवाय आणि संपत्ती गोळा करायच्या हेतूशिवाय काम करील तर ज्यांना त्याच्या सेवेची गरज आहे ते त्याची व त्याच्या कुटुंबाचीही काळजी घेतील.

हीच गोष्ट ब्रह्मचर्याविषयीही होती. असं सांगण्यात यायचं की हा आदर्श चुकीचा आहे. त्यानुसार वर्तन करण्यात आल्यास मानवजात नाहीशी होईल. जे हा युक्तिवाद करत होते त्यांना माहीत होतं की ते खोट बोलत आहेत. त्यांचा खरोखरीच यावर विश्वास नव्हता, ते याविषयी कधीच गंभीर नव्हते आणि यासाठी त्यांनी कधीही प्रयत्न केलेला नव्हता. जर त्यांनी तसा प्रयत्न केला असता तर त्यांना कळलं असतं की ज्यामुळे आदर्श दुर्गम असल्याचं जाणवावं असं त्या आदर्शात मुळी काही नाहीच. परंतु सत्य हे आहे की त्यांना जर या आदर्शात यश मिळवायचं असेल तर अतिरिक्त इच्छा उद्दिप्त करणाऱ्या 'शारीरिक आळशीपणाची आणि सर्व इच्छांची परिपूर्ती करणाऱ्या जीवनाची अपेक्षा ते करू शकत नाहीत'; कादंबऱ्या, कविता, संगीत, रंगभूमी, नृत्य आदी वासना चाळविणाऱ्या रंजनाच्या मागे ते लागू शकत नाहीत; संपूर्ण जीवनपद्धतीत आणि सामाजिक आचरणात त्यांना बदल करावा लागेल. ही गोष्ट करणं त्यांना शक्य होत नाही व त्यामुळे आदर्शच सदोष आहेत असं ते सांगतात. जर आदर्श केवळ आदर्श असेल व त्याची परिपूर्ती केवळ कल्पनेतच होऊ शकत असेल तर ही गोष्ट ब्रह्मचर्यालाही लागू होते आणि लगतच्या वा दूरच्या भविष्यकाळात मानवजात नाहीशी व्हायची अगदीच शक्यता राहत नाही. लोकांनी ब्रह्मचारी राहण्यासाठी धडपड केली तर मानवजात नाहीशी होण्याऐवजी ती अजूनच वरच्या पातळीवर जाईल.

अखेरीस हत्त्या न करण्याविषयी : जर प्रेमाच्या आणि त्याचाच उपसिद्धांत असलेल्या अप्रतिकाराच्या नियमाचं पालन केल्यामुळे जर वाईट होणार तर माणसानं कसं वागावं? असं काही वेळा विचारण्यात यायचं. अगदी नित्याचं उदाहरण घ्यायचं तर एखादा डाकू मुलाला मारणार असेल वा त्याच्यावर अत्याचार करणार असेल व त्या मुलाला वाचवणं डाकूला मारल्याशिवाय शक्य नसेल तर माणसानं काय करावं? त्या मुलाला वाचवणं माणसाचं कर्तव्य

ठरणार नाही काय? यासंबंधीचं टॉलस्टॉय यांचं उत्तर कोणत्याही प्रकारची तडजोड करणारं नव्हतं. अशा प्रकारच्या टोकाच्या परिस्थितीतही न मारायच्या नियमाचा भंग करण्यासाठी कोणतंही समर्थनीय कारण त्यांना आढळून येत नाही. 'डाकूला मारून तुम्ही निश्चितपणे हत्या करता; उलट डाकू मुलाला नक्कीच मारणार आहे की नाही हे कळून घ्यायचा तुमच्याजवळ काहीच आधार नाही.' [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अलेमेर मॉड, पृष्ठ १८४] कारण वेळेवर त्याचं मन बदलणार नाही कशावरून? डाकूच्या जिवापेक्षा 'मुलाच्या जिवाची जास्त गरज आहे व त्याचं जीवन डाकूच्या जीवनापेक्षा श्रेष्ठ प्रतीचं राहील' असं माणसाला नक्कीच सांगता येईल तेव्हाच डाकूला मारायचं समर्थन करता येईल. ह्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी ज्या 'मुलाला वाचवण्यात येत आहे तो पुढं कसा होईल आणि डाकूला मारलं नाही तर त्याचं जीवन कसं असेल' याचीदेखील निश्चितपणे माहीत असणं आवश्यक आहे. [वरीलप्रमाणे] आणि हे ज्ञान कुणालाच देण्यात आलेलं नसल्यामुळे मुलाला वाचवण्यासाठीदेखील डाकूला मारण्यासाठी कोणतंही समर्थनीय कारण सांगता येऊ शकत नाही. 'तो डाकूला विनवणी करू शकतो, डाकू आणि त्याच्या बळीच्यामध्ये स्वतःचा देह झोकून देऊ शकतो, परंतु एक गोष्ट मात्र तो करू शकत नाही : देवानं दिलेल्या ज्या कायद्यामुळे जीवन अर्थपूर्ण होते त्या कायद्याचं तो जाणीवपूर्वक उल्लंघन करू शकत नाही.' [वरीलप्रमाणे] याच उदाहरणानुसार असा युक्तिवाद करता येईल : एका माणसाचं जीवन धोक्यात आहे आणि ते केवळ खोट बोलायच्या एकाच उपायानं वाचवता येऊ शकतं.... त्यामुळे विशिष्ट प्रसंगी माणसानं खोटं बोलायलाच पाहिजे. एक माणूस उपाशी मरत आहे आणि त्याला केवळ चोरी करूनच वाचवता येऊ शकते व त्यामुळे विशिष्ट प्रकरणी चोरी करायलाच पाहिजे [वरीलप्रमाणे, पृष्ठ १८५] आणि असं किती तरी. थोडक्यात सांगायचं तर प्रत्येक नैतिक नियमाच्या बाबतीत असा अपवाद शोधून काढता येईल की जेव्हा तो नियम तोडावा की तोडू नये हे समजणं कठीण व्हावं. डाकू आणि मुलाचं गृहीत धरण्यात आलेलं उदाहरण कुणीच प्रत्यक्ष पाहिलेलं नाही. परंतु सतत वाढत चाललेल्या हिंसेचे परिणाम ज्या कुणाला डोळे आहेत त्याला

दिसू शकतात. 'जेव्हा दोन शत्रू भांडत असतात तेव्हा प्रत्येकाला विशिष्ट परिस्थितीत आपलीच बाजू न्याय्य असल्याचं वाटत असतं. हिंसेच्या प्रत्येक उपयोगासाठी कारणं शोधून काढता येऊ शकतात; आणि असा एकही अचूक मापदंड शोधून काढण्यात आलेला नाही की ज्यामुळे या कारणाची वैधता निश्चित करता येईल.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १८६] टॉलस्टॉय सांगतात की येशूनं सांगितलं आहे की हिंसेसाठी 'कोणत्याही प्रकारच्या निमित्तावर विश्वास ठेवण्यात येऊ नये - हिंसेचा कधीच उपयोग करू नये.'

टॉलस्टॉय युक्तिवादाच्या अखेरीस म्हणाले, आपल्या कृतीचे काय परिणाम होणार आहेत हे कुणालाही माहीत नाही आणि माहीत होऊ देखील शकत नाही. परंतु ज्यानं त्याला या जगात पाठवलं आहे त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी काय करायला पाहिजे हे येशूच्या शिकवणुकीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक माणसाला माहीत असतं. माणसाच्या या जगातील अस्तित्वाचा हेतू कोणत्याही परिणामाची फिकीर न करता *त्याची इच्छा* पूर्ण करणं आहे. या तत्त्वापासून आपण आपल्या कृतीमुळे एकदा विचलित होऊ लागलो आणि *त्याच्या* निःसंशय नियमाचं दर्शन 'परंपरांवर त्याचप्रमाणे आमच्या युक्तिवादावर आणि हृदयावरही अवलंबून आहे' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १८१] असं मान्य करू लागलो व आपल्याला हितावह असणाऱ्या कारणांसाठी त्या तत्त्वांचा आपण त्याग करू लागलो तर चांगुलपणा वा नैतिकता यांच्यासाठी कोणताही तर्कशुद्ध आधार राहणार नाही.

९

टॉलस्टॉय यांच्या धार्मिक शिकवणुकीतील तत्त्वांचं सार थोडक्यात असं सांगता येईल: काही अलौकिक घटनांवरील विश्वास म्हणजे धर्म होत नाही, काही विशिष्ट प्रकारच्या प्रार्थना आणि समारंभ म्हणजेही धर्म होत नाही, अथवा 'प्राचीन काळातील अज्ञानातून निर्माण झालेली अंधश्रद्धा म्हणजेही धर्म होत नाही. धर्म म्हणजे माणसाचं स्वतंत्र व्यक्तिमत्व आणि आणि अनंत विश्व अथवा त्या विश्वाचं आदिकारण यांच्यात प्रस्थापित करण्यात आलेले संबंध आणि अशा

प्रकारच्या संबंधातून निर्माण झालेला 'माणसाचा जीवनहेतू व त्या जीवनहेतूमुळे मानवी वर्तनाविषयी मिळणारे नियम.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३२९] ईश्वर व्यक्ती नाही आणि वैयक्तिक अमरत्वासारखी काही गोष्ट नसते, परंतु जेव्हा केव्हा कोणी त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी, म्हणजे ते प्रेम व्यक्तीत आणि विश्वात वाढवायचा जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा त्याचं कार्य अविनाशी होतं आणि व्यक्तीच्या देहाचा नाश झाल्यानंतरही या विश्वातील प्रेमाशी म्हणजे ईश्वराशी तो एकाकार होतो. अशा रीतीनं खऱ्या ख्रिश्चन जीवनाला मृत्यूच्या अपरिहार्यतेनंतरही एक हेतू प्राप्त होतो. त्यामुळे जीवन वरदानासारखं होतं व मृत्यूची नांगी ठेचली जाते.

'मानवजातीनं कोणत्या दिशेनं जायला पाहिजे याचं माणसाला जे पूर्वज्ञान होत असतं' तेच धर्माचं सार आहे. 'मानवतेच्या भवितव्यासंबंधीचं हे पूर्वज्ञान सर्व माणसांमध्ये कमीअधिक प्रमाणात असतेच. परंतु अधूनमधून असे लोक जन्माला येतात की ज्यांच्यातील ही क्षमता बरीच विकसित झालेली असते.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड ईज वुइदिन यू*, अनुवादक ए. डेलानो, वॉल्टर स्कॉट लि. लंडन, (१८९४), पृष्ठ ९१] जगातील प्रमुख धर्माचे निर्माते वा प्रेषित अशाच प्रकारचे लोक होते.

बाहेरून पाहिलं तर धर्माची अनंत रूपं आढळून येतात, परंतु मूलभूत तत्त्वांच्या संबंधात ते सर्व सारखेच असतात. ही मूलभूत तत्त्वंच खऱ्या धर्माचा पाया असतात. सर्व धर्माचं, विश्वधर्माचं वा टॉलस्टॉय म्हणत असल्याप्रमाणे केवळ धर्माचं पहिलं सामान्य तत्त्व 'देव आहे, तो कारणांचंही आदिकारण आहे, व सर्व गोष्टींचं मूळ आहे'; ज्याला माणूस आपल्या आचरणाच्या पद्धतीनं वाढवू वा कमी करू शकतो असा माणसाच्या अंतःकरणात मूळ दैवी शक्तीचा स्फुल्लिंग राहत असतो; माणसातील ईश्वराचा हा जो प्रकाश असतो तो माणसाच्या विवेकबुद्धीतून अभिव्यक्त होत असतो व नैतिकतेचा आधार पुरवत असतो; 'हा दैवी स्फुल्लिंग वाढवण्यासाठी माणसानं आपल्या वासना दाबायला पाहिजे. आपल्यातील प्रेमभावना वाढवायला पाहिजे, आणि हा परिणाम अमलात आणण्यासाठी आपल्याशी इतरांनी जसं वागावं असं आपल्याला वाटतं तसं आपण इतरांशी वागायला पाहिजे.' [लिओ टॉलस्टॉय, *एस्सेज अँड लेटर्स*, अनुवादक अलेमेर मॉड, पृष्ठ ३२८]

टॉलस्टॉय आग्रहपूर्वक म्हणाले की सर्व धर्मात सामान्य असलेली ही वैश्विक सत्य समजायला 'इतकी सोपी, सहज आकलनीय व प्रत्येक माणसाच्या अगदी हृदयाशी जाऊन भिडणारी असतात' की त्यांची ओळख पटवून घ्यायला ते आपल्याला भाग पडतात. गरजेमुळे समग्राचा म्हणजे काही तरी असीमाचा आपण भाग असल्याचं आपल्याला जाणून घ्यावं लागतं. या ज्या असीमाचा आपण भाग असल्याचं आपल्याला जाणवतं तोच देव आहे. जे लोक अज्ञानी असतात म्हणजे जडाच्या पलीकडे जे लोक पाहू शकत नाहीत त्यांच्यासाठी 'असीम काळ आणि अवकाश यांच्या संदर्भात' देव जड असतो. परंतु 'जीवनाची सुरुवात आणि सार जड नाही तर चैतन्य आहे हे कळलेल्या' ज्ञानियांसाठी देव 'अनंत, असीम चैतन्य असेल. त्याचं दर्शन त्याला स्वतःमध्ये काळ आणि अवकाशाच्या सीमेत होतं.' [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *मिसलेनियस लेटर्स अँड एसेज*, अनुवादक लिओ विनर, डाना इस्टेट अँड कंपनी, बोस्टन, (१९०५), पृष्ठ ५१०-११] सारांश सांगायचा तर : देव ते पूर्णत्व आहे की ज्याचा अंश आपण आहोत असं आपल्याला जाणवतं; जडवाद्यांसाठी तो जड असतो; व्यक्तिवादी माणसासाठी तो भव्य न-नैसर्गिक माणूस असेल; आदर्शवाद्यांसाठी त्याचं आदर्श प्रेम असेल.' [लिओ टॉलस्टॉय, *अ कन्फेशन*, द गॉस्पेल इन ब्रीफ, आणि व्हाट आय बिलीव्ह, अनु. ए. मॉड, पृष्ठ ५२३]

आपल्या जीवनाचा हा आधार, हे अमूर्त तत्त्व काळ आणि अवकाश यांच्या सीमेत बंदिस्त नाही आणि त्यांच्या अटीही त्याला लागू होत नाहीत. एरव्ही देव म्हणून जे ओळखलं जाते ते 'चांगलंही नसते आणि वाईटही नसते. ते ते आहे जे ते आहे.' टॉलस्टॉय यांनी जोर देऊन सांगितलं की 'अशा प्रकारच्या देवाची ओळख मानवजातीला पटलेली आहे आणि मानवजात जर पशूत्वाच्या पातळीवर गेली नाही तर युगायुगातील मानवजातीला तशी ती पटत राहील.' [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *मिसलेनियस लेटर्स अँड एसेज*, अनुवादक लिओ विनर, पृष्ठ ५१०-११]

देवाची वा आत्म्याची ओळख व्याख्येच्या द्वारे पटवता येऊ शकत नाही तर ती 'अगदीच वेगळ्या मार्गानं' पटत असते. ज्याप्रमाणे आपल्याला अनंत संख्येची खात्री पटते त्याप्रमाणे आपण त्याच्याकडे 'अपरिहार्यतेनं' ढकलले जात असतो,

एकात मी एक मिळवतो, आणि अजून एक आणि अजून एक आणि अजून किती तरी, अथवा मी काठीचे दोन तुकडे करतो, आणि पुन्हा दोन आणि पुन्हा दोन असं पुन्हा पुन्हा मी करतो आणि ती संख्या अनंत असेल हे जाणवल्याशिवाय मी राहू शकत नाही.

'मी कुठून आलो?' या प्रश्नापासून देवाविषयी विशेष ज्ञान करून घ्यायची आपल्यात उत्सुकता निर्माण होते.

मी माझ्या आईपासून जन्माला आलो व ती माझ्या आजीपासून आणि ती माझ्या पणजीपासून पण अगदी सुरुवातीला कुणापासून? आणि मी अपरिहार्यपणे देवाकडे वळतो.

माझे पाय मी नाही, माझे हात मी नाही, माझं डोकं मी नाही एवढंच नाही तर माझे विचारही मी नाही. मग मी काय आहे? मी मी आहे आणि मी माझा आत्मा आहे.

जीवनाचे दोन दृष्टिकोन आहेत. पहिला म्हणजे जीवन चल स्वरूपातील प्रकृती आहे व माणसाचा 'स्व' म्हणून आपण ज्याला ओळखतो तो इतर प्रत्येक गोष्टीपासून वेगळा आहे. दुसऱ्या दृष्टिकोनानुसार माणसाच्या 'स्व'ला अचल अस्तित्व म्हणून ओळखण्यात येते, तो नेहमीच त्याच्यासमान असतो व त्यात कोणतंही परिवर्तन होत नाही, त्याच्यात परिवर्तन झाल्यासारखं वाटतं परंतु वास्तवात तसं नसतं. एकाचवेळी आपण चैतन्य तत्त्व आहोत आणि मर्यादांनी बंदिस्तही आहोत या एकाच संकल्पनेच्या या दोन बाजू आहेत. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५३६]

टॉलस्टॉय यांनी नोंदवलं आहे की '१८९७ सालीच मला कळलं होतं की तो अस्तित्वात आहेच आणि माझं अस्तित्व त्याच्यात आहे व त्याच्याबाहेर काहीच नाही. त्या असीमात माझं सीमित अस्तित्व आहे आणि तो असीम माझ्या सीमित स्वरूपात आहे.' [टॉलस्टॉय, डॉ. कालिदास नाग यांनी *टॉलस्टॉय अँड गांधी* या पुस्तकात दिलेलं उद्धरण, पृष्ठ ३२]

आपण तेव्हाच खऱ्या अर्थानं जगतो जेव्हा आपल्या अंतर्गत असलेल्या त्याच्या परमात्म स्वरूपाची आपल्याला जाणीव होते, ज्याच्यावर जडाचा, काळाचा वा अवकाशाचा कोणताच

परिणाम होत नाही, जो नेहमीच त्याच्या समान असतो व त्याच्यात कोणतंच परिवर्तन होत नाही. तो नेहमीच अस्तित्वात असतो परंतु त्याची जाणीव आपणा सर्वांना देण्यात आलेली नाही वा सर्व काळी ती आपल्याला नसते. आपण जेव्हा आपल्या आत डोकावून पाहतो तेव्हा आपल्याला कळतं की जाणिवेचं ते तत्त्व एकच आणि अपरिवर्तनीय आहे. त्याला आदी आणि अंत नाही. परंतु आपण आपली दृष्टी जेव्हा इतरांच्या जाणिवेच्या मर्यादांवर केंद्रित करतो तेव्हा आपल्याला जाणीव होऊ लागते की आपलं अस्तित्व काळात वाढत आणि विकसित होत आहे. याचा अर्थ असा की ज्याप्रमाणे ढग हालत असताना चंद्र हालत असल्यासारखा आपल्याला वाटतो त्याप्रमाणे ते जे हालत असतं ते आपलं बंदिस्त अस्तित्व असतं. [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *मिसलेनियस लेटर्स अँड एसेज*, अनुवादक लिओ विनर, पृष्ठ ५३५]

जे जीवनाला सीमित करते त्यालाच जीवन समजल्यामुळे चूक होते. ज्या क्षणी आपल्याला कळतं की जीवन हे जडाच्या पलीकडील चैतन्य तत्त्व आहे व तोच खरा 'मी' अथवा 'अहं' आहे त्याच क्षणी मृत्यूची संकल्पना आपल्याला मिथ्या वाटू लागेल. 'मृत्यूचं वाईटपण संपेल, आकारात बदल होण्याची ती केवळ प्रक्रिया आहे व त्यातून प्रगतीच होणार आहे असं आपल्याला वाटायला लागेल.'

आपल्या खऱ्या स्वरूपाची म्हणजे 'चैतन्याच्या या अपरिवर्तनशील तत्त्वाची जाणीव झाल्यामुळे आणि व ते 'ज्या सीमित स्वरूपात व्यक्त झालेलं असतं त्या सीमित स्वरूपात ते नाहीं' असं सर्व धर्मगुरुंनी सांगितलेलं आहे. त्यामुळे 'ज्याला आपण सद्गुण म्हणतो व ज्यापासून माणसाच्या सर्वोच्च कल्याणाची प्राप्ती होते' त्याची निर्मिती व्हायला ही जाणीवच कारणीभूत असते. आणि याच जाणिवेपासून 'आत्मसंयम, निर्भयता आणि सर्वसंगपरित्याग आदी भावना निर्माण होत असतात. कारण ज्यांच्याद्वारे जाणिवेची मूलभूत गरज पूर्ण होऊन.... इतर जिवांची आपल्यातून आपल्याला ओळख पटत असते तेच हे प्रेम होय.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५१२]

जॉन ३,३मध्ये 'आणि कोणताही माणूस स्वर्गापर्यंत चढत गेलेला नाही, परंतु एकजण मात्र स्वर्गातून - तो जरी मानवाचा पुत्र होता तरी - खाली आला. यातून टॉलस्टॉय यांना कारणाच्या आदिकारणाशी माणसाचा जो संबंध आहे त्याची संपूर्ण व्याख्या कळली व त्यापासून आपल्या बांधवांशी वागायच्या नियमांचीही त्यांना कल्पना आली.

माणसानं आपण देवपुत्र आहोत याची जाणीव ठेवली पाहिजे व तसेच इतर सर्व लोकही आहेत याचीही जाणीव ठेवायला हवी. माणसाला जर आपण कोण आहोत हे कळलं व त्याची आठवण राहिली तर तो हलकटपणाचं तिरस्करणीय वर्तन करून आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागू देणार नाही. आणि जर त्याला आठवण राहिली की प्रत्येक माणूस देवाचा पुत्र आहे तर तो त्या देवपुत्रांना आणि आपल्या भावंडांना अपमानित करायची स्वतःला कधीच परवानगी देणार नाही.

गीतेच्या भाषेत

असं जो कोणी मानतो, प्रत्येक ठिकाणी,
प्रत्येक आकारात असतो एकच जीवात्मा राहत
तो करू शकत नाही काहीही वाईट

पास्कलला उद्धृत करत टॉलस्टय सारूपात सांगतात : 'एखाद्या गुलामाला आपण राजा आहो असे एकाएकी समजलं तर त्याची जशी मनःस्थिती होईल तशीच आपल्या जीवनाची यथार्थ ओळख पटल्यानंतर माणसाची अवस्था झाल्याशिवाय राहणार नाही.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५३७]

१०

चांगलं जीवन आणि चांगला आनंद या गोष्टी आपल्या इतिहासात आणि संतचरित्रमालेत हातात हात घालून चालताना दिसतात. माणूस स्वैराचाराचं आणि विलासी जीवन जगू शकेल आणि तरीही तो चांगला आणि नैतिक असू शकेल असं जे प्रचलित मत आहे त्याविरुद्ध

टॉलस्टॉय यांनी प्रखर टीका केली आहे. पर्वतावरील प्रवचनात वर्णन करण्यात आलेल्या प्रेमाच्या नियमाप्रमाणे चांगल्या आणि धार्मिक जीवनाबरोबर आपल्या निढळाच्या घामानं निर्माण केलेली भाकरी खाणं आणि गरजा कमीत कमी करणं आवश्यक आहे. ख्रिश्चन धर्माच्या आगमनापूर्वी मानवजातीच्या सर्व महान शिक्षकांनी - धार्मिक आणि इतरही - सदाचारी होण्यासाठी आपल्या इच्छांना शिस्त लावणं अपरिहार्य आहे असं जोर देऊन सांगितलं आहे. प्लेटोच्या सदाचारांना आत्मशिस्तीपासून सुरुवात होते. धैर्य, बुद्धिमत्ता आणि न्याय या सर्व गोष्टी त्यानंतर येतात. ज्यातून मानवजातीचं प्रेम निर्माण होणं अपरिहार्य आहे. अशा ईश्वराच्या इच्छेबद्दल भक्ती निर्माण व्हायची पहिली पायरी म्हणून सर्वसंगपरित्यागाची ख्रिश्चन नैतिकता अपेक्षा करते. परंतु आजचे ख्रिश्चन धर्माचे कैवारी उघडपणे ख्रिश्चनत्वाच्या तत्त्वज्ञानातील 'उपास आणि दारिद्र्य या तत्त्वांचा' उपहास करतात आणि सांगतात की आमच्या 'ख्रिश्चनत्वात गायीच्या मांसाहाराचा समावेश आहे!' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ८२] आधुनिकतावादी तर इथपर्यंत आपला सिद्धान्त मांडतात की इच्छांची वाढ आणि त्यांची परिपूर्ती हेच प्रगतीचं, संस्कृतीचं आणि सदभिरूचीचं लक्षण आहे- 'माणसाच्या गरजा जसजशा वाढू लागतात तसतशा त्या अधिक सुसंस्कृत होत जातात व तसतसा तो अधिक चांगला होतो'. टॉलस्टॉय म्हणाले की अज्ञानापासून दूर झालेल्या स्वार्थाच्या शुद्ध उपयोगितावादाच्या दृष्टिकोनातून वा कोणत्याही धर्मावर विश्वास नसलेल्या माणसाच्या न्यायावर आधारित दृष्टिकोनातून अथवा प्रेमाची मागणी करणाऱ्या ख्रिश्चन धर्माच्या दृष्टिकोनातून पाहिलं तरी हे मत टिकणारं नाही. आत्मसंयमाशिवाय तटस्थताही शक्य नाही आणि न्यायही, मग उदारपणाची वा प्रेमाची तर गोष्टच नको. मानवी स्वभावाचं असामान्य ज्ञान असलेल्या टॉलस्टॉय यांना आढळून आलं होतं की खऱ्या जीवनाचा प्रारंभ 'लहान लहान गोष्टींची' जिथून सुरुवात होत असते तिथूनच होत असतो. माणसाची जाणीव समग्र असल्यामुळे इतर भागांवर परिणाम केल्याशिवाय एका भागात काहीच घडू शकत नाही, त्यामुळे 'ज्याप्रमाणे इतर वस्तू मोजायच्या तराजूकडे जसं आपण बारकाईनं लक्ष देतो' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३०] तसं या

लहानसहान बदलांकडे विशेषेकरून आपण बारकाईनं लक्ष द्यायला पाहिजे. चैनीची राहणी किंवा तंबाखूसारखे कितीही सौम्य का होईना व्यसन ह्या गोष्टी काही केवळ तपशिलाच्या नाहीत. बुद्धीवर आणि बऱ्यावाईट गोष्टीत भेद करण्याच्या क्षमतेवर तर त्या परिणाम करतातच त्याशिवाय नैतिक जाणिवेलाही त्या बधिर करतात.

चांगले लोक युक्तिवाद करतात की जर 'आतल्या माणसाचं समाधान करण्यासाठी अधूनमधून थोडासा षौक केला तर त्यामुळे काय फरक पडतो? व त्यासाठी ते पुढील आशयाच्या कडव्याचा पुरावा देतात: जे तोंडात शिरतं त्यामुळे तोंड खराब होत नाही तर जे तोंडातून बाहेर पडतं त्यामुळे तोंड खराब होतं. (मॅथ्यू १५.११) यावर टॉलस्टॉय यांचं उत्तर होतं: थोडा वेळ तुमच्या बुद्धीच्या कामाकडे लक्ष द्या आणि मग तुम्हीच तुमच्या अंतःकरणाचा सल्ला घ्या.

तुम्ही कोणीही असलात तरी.... तुमच्या दारावर एखादा भुकेला, थंडीत कुडकुडणारा आजारी दुःखी माणूस उभा असताना तुम्ही टेबलवर बसून शांतपणे तुमचा चहा, तुमचं जेवण घेऊ शकता काय? तुमच्या राजकीय, कलात्मक, वैज्ञानिक, वैद्यकीय वा शैक्षणिक कार्याविषयी तुम्ही शांतपणे चिंतन, मनन करू शकता काय? नाही. आणि जरी ते तुमच्या दारावर नसले तरी १० यार्डांवर १० मैलांवर असले तरीही ते असतातच.... या जाणीवेनं तुमचं अंतःकरण विषाक्त झाल्यानंतर तुम्ही कधीच शांत राहू शकत नाही - सुखी राहू शकत नाही. [वरीलप्रमाणे, पृष्ठ १४]

सदाचारी, चांगलं आणि धार्मिक होण्यासाठी टॉलस्टॉय यांनी मांडलेल्या योजनेत आत्मनिग्रहाला आणि उपासाला पहिलं स्थान दिलं. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की 'एखादा माणूस चांगला व्हायची इच्छा करू शकेल, चांगलं व्हायचं स्वप्न पाहू शकेल परंतु उपवासाशिवाय चांगलं होणं तेवढंच अशक्य आहे जेवढं आपल्या पायावर उभं न राहता पुढं चालणं अशक्य आहे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ७८]

ते म्हणाले की माणूस आपल्या इच्छांचा गुलाम असल्यामुळे त्यांच्या परिपूर्णतेत रममाण असलेल्या आपल्या जीवनाला चांगलं मानत असताना त्याला 'चांगलं, उपयुक्त, न्याय्य आणि प्रेमानं परिपूर्ण' जीवन जगता येईल अशी आशा करणं हा फार मोठा भ्रम आहे. लोक अनेकदा एखाद्या माणसाबद्दल ढिलेपणानं बोलतात की तो धार्मिक, संतप्रवृत्तीचा वा पवित्र माणूस आहे. परंतु संतप्रवृत्तीचं वा पावित्र्याचं मोजमाप काय आहे? टॉलस्टॉय यांनी असा प्रश्न विचारला आणि स्वतःच उत्तर दिलं: संतत्वाच्या वा पावित्र्याच्या जीवनाची गोष्ट तर सोडाच पण चांगल्या जीवनाचा एकच मापदंड आहे आणि तो म्हणजे 'आत्मप्रेम आणि जनप्रेम यातील गणितीय संबंध!', [वरीलप्रमाणे, पृष्ठ ६९] वेगळ्या शब्दात सांगायचं तर इतरांना आपण स्वतःसाठी किती कष्ट करायला लावतो व इतरांसाठी आपण किती कष्ट घेतो यातील गणितीय संबंधांवर ही गोष्ट अवलंबून आहे. 'माणूस इतरांना जेवढं अधिक देतो आणि इतरांपासून जेवढं कमी घेतो तेवढा तो अधिक चांगला असतो; इतरांना तो जेवढं कमी देतो आणि इतरांपासून तो जेवढं अधिक घेतो तेवढा तो वाईट असतो.' उदाहरणार्थ इतरांना खाऊ घालण्याऐवजी माणूस स्वतःच फार खातो तेव्हा 'इतरांना द्यायची शक्यता तर तो कमी करतोच परंतु अतिरिक्त खाण्यामुळे इतरांना मदत करायची क्षमताही तो गमावतो.' त्यामुळे विलासी जीवन भोगणाऱ्या आत्मतुष्ट माणसात,

जरी सौजन्यशीलतेत समावेश होणारे नम्रता, सुस्वभाव आदी अनेक गुण असले तरीही तो चांगला असू शकत नाही आणि चांगलं जीवन व्यतीत करू शकत नाही.... चांगलं होणं व चांगलं जीवन व्यतीत करणं म्हणजे इतरांपासून जेवढं घेतो त्यापेक्षा अधिक परत करणं. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ७०]

यानंतर टी. एफ. बाँडारेफ यांनी प्रतिपादिलेल्या 'भाकरीसाठी श्रम' या निष्कर्षाकडे टॉलस्टॉय पोहोचले. ज्याचा साधा अर्थ आहे : 'जर माणूस काम करणार नाही तर तो खाणारही नाही.' सर्व माणसांच्या समतेवर त्याचा अंतःकरणापासून किती विश्वास आहे हे जाणून घेणं ही पहिली कसोटी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कष्टकरी जनतेच्या गरजांचा फायदा घेऊन आपल्या

सुखासीन जीवनासाठी आणि ऐषआरामासाठी साधनं पुरवण्याकरता त्यांना काम करायला भाग पाडून बहुसंख्य कष्टकरी जनतेत आणि आपल्यात जे कुंपण उभं करण्यात आलं आहे ते यामुळे तुटू शकतं आणि आपण त्यांच्याजवळ जाऊ शकतो. अखेरचं म्हणजे 'गुलामांच्या सेवेचा उपभोग घेणाऱ्या प्रामाणिक माणसाला जी मनःशांती मिळत नाही ती मनाची शांतता आणि सर्वोच्च प्रतीचं कल्याण यांची प्राप्ती त्यामुळे आपल्याला होऊ शकते.'

जोपर्यंत माणूस संपूर्णपणे संयमित जीवन जगत नाही आणि भाकरीसाठी श्रमाच्या नियमांचं पालन करत नाही तोपर्यंत पाच आज्ञांचं पालन करणं त्याला शक्य नाही. उदाहरणार्थ न संतापायचाच नियम घेऊ या. संतापाच्या शमनासाठी शारीरिक श्रमाएवढा परिणामकारक दुसरा उपाय कोणताच नाही. एकदा आपल्या शेतकऱ्यांचा टॉलस्टॉय यांना असह्य संताप आला आणि तो त्यांना आवरत नव्हता. परंतु टॉलस्टॉय जेव्हा त्यांच्या कष्टाच्या आणि थकवणाऱ्या कामात सहभागी झाले तेव्हा एखाद्यानं किमया केल्याप्रमाणे तो आपोआप नाहीसा झाला. त्याचप्रमाणे आपल्या वासना ताब्यात ठेवण्यासाठी माणसानं केवळ गरजेपुरतंच खायला पाहिजे. जो माणूस घामाघूम होईपर्यंत कष्ट करत नाही त्याच्या ब्रह्मचर्याच्या प्रयत्नातही तेवढंच अपयश आल्याशिवाय राहणार नाही. ईश्वर आणि आपले बांधव यांच्यावर प्रेम करायचा जो आदर्श ख्रिश्चन धर्मानं सांगितला आहे त्याप्रमाणे देवाची आणि आपल्या शेजाऱ्यांची सेवा करण्यासाठी आत्मत्यागाची गरज असते. टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की लोकांना आपल्या खोटेपणाची सवय झालेली असते आणि इतरांच्या लक्षात कदाचित आपला खोटेपणा येईल या भीतीनं इतरांच्या खोटेपणाच्या पलीकडे पाहायची त्यांना इच्छाही नसते. त्यामुळे आरामात आणि विलासात मग्न असणाऱ्या लोकांबद्दलही सदाचाराची आणि 'पावित्र्याची' विधानं करण्यात येतात तेव्हा त्यांना गप्प राहून ती गिळावी लागतात.

११

सर्व धर्मातील मूलभूत ऐक्यासंबंधीच्या आपल्या भूमिकेशी सुसंगती राखत धर्मांतराला आणि एकाधिकारशाहीला त्याचप्रमाणे 'टॉलस्टॉयवाद' यासारखा काही वाद असण्यालाही टॉलस्टॉय यांनी विरोध केला.

धर्म ही वैयक्तिक अनुभूतीची गोष्ट असल्यामुळे आपल्या व्यक्तिगत प्रयत्नामुळेच ती आपल्यात विकसित होऊ शकते असं टॉलस्टॉय यांचं मत होतं. बाहेरच्या लोकांकडून धर्म लादला जाऊ शकत नसतो. 'माणसाच्या सर्व आध्यात्मिक शक्तींची एकूण बेरीज ज्या विश्वासाकडे त्याला नेईल त्यावरच तो विश्वास ठेवू शकेल.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५०९] त्यामुळे एखाद्याचा धार्मिक विश्वास आपल्यापेक्षा वेगळा असेल तर त्याला त्याच्या विश्वासाचा त्याग करायला आणि आपला विश्वास स्वीकारायला सांगणं हे आपलं काम नाही असं टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं. शारीरिक रूप बदलण्याइतकीच ही गोष्ट त्याच्यासाठी अशक्य असते.' उलटपक्षी आपण त्याला त्याच्याच विश्वासावर दृढ राहायला आणि 'त्यानुसार अजून पुढं जायला सांगायला पाहिजे.' टॉलस्टॉय म्हणाले की स्वतः कापलेल्या वा निवडलेल्या आकाराच्या खिडकीतून प्रत्येकजण सुरुवातीला जगाकडे पाहत असतो. नंतर त्याच्या जर लक्षात आलं की ज्या खिडकीतून तो पाहतो आहे त्या खिडकीतून जगाचं नीट व स्पष्ट दर्शन होत नाही तर तो दुसऱ्या माणसाच्या खिडकीची निवड करू शकेल. परंतु 'आपल्या खिडकीतून पाहत असताना जो माणूस समाधानी आहे' त्याला माझ्या खिडकीतून तू पाहा असं म्हणणं केवळ 'अविवेकीपणाचं' नाही तर 'असभ्यपणाचंही' आहे. टॉलस्टॉयनी विचारलं की 'सर्व माणसं त्याच्याकडे विविध बाजूनं पाहत असताना व त्याच्याकडे पाहायचा भिन्न दृष्टिकोन असतानाही त्याच्या मुख्य नियमाचं म्हणजे परस्परांवर प्रेम करायच्या नियमाचं ते पालन करू शकतात हे पुरेसं नाही काय?' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ५१०]

कुणालाही त्याचा धर्म सोडायला सांगून आपल्या धर्माचा स्वीकार करायला सांगणं तर सोडाच पण तशी इच्छा करणंही अनुचित आणि अविवेकीपणाचं आहे. त्याशिवाय आपलाच धर्म खरा वा श्रेष्ठ आहे आणि इतर सर्व धर्म खोटे वा कमी प्रतीचे आहेत असा अहंकार मिरवायचा अधिकारही कुणाला पोहोचत नाही. निदान ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीवर विश्वास ठेवणाराला तरी नाही. टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की ख्रिश्चन धर्माची शिकवण पूर्वीच्या मूर्तिपूजक धर्मापेक्षा वेगळी आहे. मूर्तिपूजक धर्माचं म्हणणं असायचं की त्यांचाच धर्म 'परिपूर्ण आहे' तर ख्रिश्चन धर्माचं म्हणणं आहे की 'परिपूर्ण व्हायची ही प्रक्रिया असीमित आहे.' ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वानुसार 'जीवन म्हणजे प्रगती होत होत ईश्वराच्या परिपूर्णतेकडे जायची अवस्था.' त्यामुळे कोणतीही अवस्था श्रेष्ठ वा कनिष्ठ नसते; कारण 'अशक्य अशा संपूर्ण परिपूर्णतेकडे जाणाऱ्या मानवी प्रगतीच्या टप्प्यातील प्रत्येक अवस्था ही कोणती तरी पायरी असते. त्यामुळे प्रत्येक अवस्था ही सारखीच महत्त्वाची असते.' कोणत्याही प्रकारची आध्यात्मिक घाई ही परिपूर्णतेच्या दिशेनं वेगात केलेली हालचाल असते. म्हणून,

येशूला सुळावर चढवताना झॅकियस या वेश्येला, भ्रष्टाचारिणीला आणि चोराला आलेला उमाळा पाहिला असता निष्क्रिय सदाचारी फारसीपेक्षा त्यांची पातळी किती वरच्या दर्जाची होती हे आढळून येतं. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड एज वुइदिन यू*, अनु. ए. डेलानो, पृष्ठ ९१]

त्यामुळे धार्मिक पद्धतीनं सांगायचं तर 'उच्च श्रेणीच्या नैतिकतेच्या पातळीवर उभा असलेल्या परंतु परिपूर्णतेकडे वाटचाल न करणाऱ्या माणसापेक्षा जो माणूस आपल्या विचारसरणीप्रमाणे खालच्या पातळीवर असतो व सतत परिपूर्णतेचा प्रयत्न करतो तो माणूस उच्च श्रेणीचं जीवन जगत असतो.' अशाच रीतीनं 'गोठ्यात असलेल्या कोकरापेक्षा वडिलांना भरकटलेलं कोकरूच अधिक प्रिय असतं, तसंच ताळ्यावर आलेल्या उधळ्याचं आहे, कधीच न हरवलेल्या नाण्यापेक्षा परत सापडलेल्या हरवलेल्या नाण्याचं माणसाला अधिक मोल वाटत असतं.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १०४]

आत्म्याला ईश्वराकडे नेणं हेच ध्येय असल्यामुळे माणूस कोणत्या बिंदूपासून सुरुवात करतो, कोणत्या मार्गानं तो जातो वा कोणत्या मुक्कामापर्यंत तो पोहोचतो याला फार कमी महत्त्व आहे. 'तो परिपूर्णतेच्या वा अपरिपूर्णतेच्या कोणत्याही पातळीवरून सुरुवात करू शकतो. या तत्त्वाच्या परिपूर्तीसाठी कोणतेच नियम वा कायदे बंधनकारक असू शकत नाहीत.' अंतःकरणापासूनचा प्रामाणिकपणा आणि भावनेची तीव्रता यालाच केवळ महत्त्व असतं. त्यामुळे माणसाचा धर्म अद्वैतवादी, प्राणीपूजा करणारा वा जड वस्तूंची पूजा करणारा वा अशाच कोणत्या तरी प्रकारचा असला तरीही माणसाला त्याच्या धर्मामुळे त्याच्या वासनांवर विजय मिळवण्यासाठी व संपूर्ण मानवजातीवर प्रेम करण्यासाठी जर मदत होऊ शकत असेल तर त्याच्या स्वभावाशी प्रतिकूल असलेल्या आपल्या पसंतीच्या ख्रिश्चन वा अन्य कोणत्याही धर्मात त्याला धर्मांतर करायला सांगण्यात काहीही अर्थ नाही. मग त्यामुळे आपला कितीही लाभ होत असला तरीही आपण त्याचा विचार करू नये.

१२

आपल्या आदर्शाचं आचरण करताना टॉलस्टॉय यांनी कधीच जरठपणा वा ताठरता दाखवली नाही. शब्दप्रामाण्याचा त्यांना तिटकारा होता व त्यामुळे त्यांचे विचार सदैव ताजेतवाने असायचे आणि आपल्या सत्यशोधनासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानात भर घालायचा त्यांनी कधीही कंटाळा केला नाही. इतर लोकांच्या श्रमावर अवलंबून असलेल्या आपल्या गरजा कमी करायच्या प्रयत्नाबद्दल आणि गरज पडल्यास इतरांसाठी काम करायच्या आपल्या कार्यक्रमासंबंधी १८८८च्या दरम्यान कधी काळी पाठवलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं : 'माणसानं हे काम अतिशय नीटनेटकेपणानं आणि प्रेमानं करायला पाहिजे.... आणि असं करताना.... आपल्या जवळच्या लोकांना वा आपल्या मार्गाच्या आड येणाऱ्या लोकांना त्यानं दुखवता कामा नये.' [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १४८] आपल्या कुटुंबियांवर आपल्या दृष्टिकोनाचं दडपण आणू नये एवढं मानवी स्वभावाचं ज्ञान त्यांना नक्कीच होतं. एवढंच नाही तर जशा प्रकारच्या

ख्रिश्चन धर्मजीवनावर आपला विश्वास आहे तशा प्रकारचं जीवन जगण्यासाठी लोकांना प्रवृत्त करण्याकरिता वैयक्तिक उदाहरणच उपयोगी पडू शकेल या निष्कर्षावर ते जेव्हा आले तेव्हा ही प्रक्रिया संथ आणि कठीण राहणार आहे व या बाबतीत कोणत्याही प्रकाराच्या चमत्काराची अपेक्षा करता येत नाही हे त्यांना माहीत होतं. आपण जसं करतो आहोत तसंच आपल्या कुटुंबानं करत राहावं असं त्यांना वाटत असतानाच त्यांनी आपल्या बायकोला लिहिलं की ज्याप्रकारे मी सर्व गोष्टींकडे पाहतो 'त्याच पद्धतीनं सर्व लोकांनी जगाकडे पाहायला पाहिजे' या 'भ्रमिष्टपणाच्या कल्पनेपासून' मी स्वतःला 'मुक्त' केलं आहे.

त्यांनी सुरू केलेलं नवजीवन त्यांच्याकडून कुटुंबाच्या त्यागाची मागणी करत होतं. 'माणसाचे शत्रू त्याचे स्वतःचे प्रिय लोक असतात' (मायकल ७.६) हा प्राचीन काळापासूनचा वाक्प्रचार आहे. परंतु आपल्या आदर्शाला व्यवहारात आणायचा त्यांनी प्रयत्न करताच त्यांच्या लक्षात आलं की कुटुंबत्यागासाठी घालण्यात आलेलं हे बंधन विश्वप्रेमावर आधारित आहे. या म्हणीचा अर्थ केवळ एवढाच असू शकतो की 'माणसानं कुटुंबाची सेवा करायच्या मोहात ईश्वराची सेवा करायचा विसर पडू देऊ नये.' टॉलस्टॉय यांनी आपल्या डायरीत लिहिलं की कुटुंब हे 'माणसाचं शरीर आहे.' त्यामुळे कुटुंबाचा त्याग करणं हा 'वेगळ्या प्रकारचा आत्मनाशच ठरेल.' परंतु देहाला द्यायची ही शिक्षा प्रत्येकाच्या अधिकतम क्षमतेवर अवलंबून आहे. देव काही आपल्याकडून सर्वनाशाची मागणी करत नाही. 'कुटुंब हा देह आहे, व ज्याप्रमाणे आजारी माणसाला हलकं अन्न पाहिजे असतं त्याप्रमाणे बिघडलेल्या कुटुंबाची एकापेक्षा अधिक प्रकारांनी उपासमार करावी लागते.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १३५] ख्रिस्ताच्या कुटुंबत्यागाचा तुमचा अर्थ काय असं त्यांना उत्तरायुष्यात विचारण्यात आलं असता ते म्हणाले : 'माझा अर्थ हा आहे की ते तुमच्यावर अवलंबून आहेत असं समजून तुम्ही त्यांची जी काळजी करता ती काळजी करणं बंद करा. जर 'त्याग करावा' या शब्दाचा शब्दशः अर्थ 'त्यांना त्यांच्या नशिबावर सोडून द्यावं' असा

घेतला तर प्रेमाच्या नियमाचा भंग होईल. आणि हा तर ख्रिश्चन धर्माचा प्राण आहे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ १३३]

इतरांच्या मर्यादांबद्दल सामजस्याचा आणि सहानुभूतीचा दृष्टिकोन घ्यायला ते जसजसं शिकत गेले तसतसे ते स्वतःच्या दोषांकडे अधिक कठोरपणानं आणि दयामाया नसलेल्या न्यायाधीशाच्या भूमिकेतून पाहू लागले. कारण त्यांना माहीत होतं की माणूस स्वतःबद्दल किती पक्षपाती असतो.

आपल्या आध्यात्मिक प्रवासात अखेरीस ते अशा अवस्थेत पोहोचले की एवढ्यानंही त्यांचं समाधान होऊ शकलं नाही. त्यांना वाटायला लागलं की हे सत्य सर्वांना सारखंच लागू होत नाही; प्रत्येकानं आपल्या आत्म्यानं दर्शवलेल्या सत्याप्रमाणे चाललं पाहिजे. आत्मप्रतारणा न करताच माणूस सत्याचा शोध घेऊ शकतो, इतरांचं यांत्रिकपणानं अनुकरण केल्यामुळे नाही. सैन्यात काम करायची एका तरुणाची वेळ जवळ येत असताना परिणामाची फिकीर न करता व आपल्या आईवर त्याचा काय परिणाम होईल याचा विचार न करता आपण सैन्यात नाव नोंदवायला नकार द्यावा काय असा त्या तरुणानं टॉलस्टॉय यांना प्रश्न विचारला. टॉलस्टॉयनी त्या पत्राला उत्तर न द्यायचं ठरवलं. त्याचं कारण स्पष्ट करताना त्यांनी लिहिलं :

येशूची शिकवण कोणाच्याही कृतीवर बंधन आणत नाही : ते सत्याकडे अंगुलिनिर्देश करत असते : विशिष्ट प्रसंगी कोणी कसं वर्तन करावं ह्याचा निर्णय प्रत्येक व्यक्तीनं आपल्या आत्म्यानं दाखवलेल्या प्रकाशाप्रमाणे आणि आपल्या सामर्थ्याप्रमाणे जे सत्यदर्शन होईल त्याप्रमाणे घ्यायला पाहिजे. येशूच्या शिकवणुकीप्रमाणे त्यानं कसं वागावं वा कसं वागू नये असं जे मला वाटतं त्याप्रमाणे त्यानं वागू नये. मी जसा वागतो तसं वागल्याशिवाय मी राहूच शकत नाही म्हणून मी तसा वागतो. [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, पृष्ठ ६२५]

सुखाच्या मागे लागलेल्या या व्यवहारी जगात सुरू असलेल्या दीर्घकाळच्या संघर्षानंतर टॉलस्टॉयमध्ये झालेल्या परिवर्तनामुळे त्यांच्यावर सत्त्वपरीक्षेचे अनेक प्रसंग आले. उत्साहाच्या

पहिल्या भरात त्यांना वाटत होतं की आपल्या नवीन योजनेनुसार या जगात सहज परिवर्तन करता घडवून आणता येईल. लोकांना केवळ आपल्या मनावरील मळभ दूर करायचं होतं, येशूनं सांगितलेल्या उद्धाराच्या मार्गाचा स्वीकार करायचा होता. त्यांनी एवढं करताच त्यांच्या लक्षात येईल की त्यांचं ओझं हलकं आहे. परंतु १० वर्षे वाट पाहिल्यानंतरही जगाला देवाच्या राज्याची फार कमी गरज असल्याचं आणि ते आपल्या नेहमीच्याच मळवाटेनं चालणं पसंत करत असल्याचं दिसत होतं. टॉलस्टयी वस्त्या विरळ होऊ लागल्या. विजय आणि सत्य ही दूरस्थ स्वप्नासारखी दिसू लागली, निदान त्यांच्या डोळ्यादेखत ती अस्तित्वात येतील असं वाटत नव्हतं. काही असेही क्षण यायचे की जेव्हा त्यांनाच आपल्या शिकवणुकीचा अर्थ काय हे कळत नसे. परंतु ह्या सर्व गोष्टी त्यांच्या अंतःकरणात जे नवीन सत्य जन्माला येऊ घातलं होतं त्या सत्याच्या प्रसूतिपूर्व वेदनासारख्या होत्या. त्यांच्या आध्यात्मिक विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात त्यांचं लक्ष हळूहळू बाह्याकडून अंतर्मनाकडे केंद्रित होऊ लागलं. त्यांच्या लक्षात आलं की कुणालाही सत्याच्या नावावर ह्या जगाला बदलायचा अधिकार नाही. कोणीही निदान त्याच्या आयुष्यात तरी संपूर्ण सत्यानुसार जीवन जगू शकत नाही. परंतु जगाची काळजी न करता अथवा आपलं स्वतःचं उदाहरण इतरांना योग्य वाटतं की नाही याचा विचार न करता माणूस जर त्याला जाणवणाऱ्या सत्याचं आपल्या संपूर्ण क्षमतेनुसार अनुसरण करील तर माणसाला ईश्वराच्या दृष्टीतून सत्यदर्शन होऊ शकतं. माणूस घमेंडखोरपणानं कल्पना करत असतो की त्याला जगात परिवर्तन करण्यासाठी पाठवण्यात आलं आहे. परंतु त्याच्या कर्मफळांवर त्याचं नियंत्रण नसतं. त्याच्या मार्गावरील अनपेक्षित अडथळ्यांमुळे त्याला विचित्र तडजोडी आणि विसंगत वर्तन यांचा आश्रय घ्यावा लागतो. घाईगडबडीत त्यातून मार्ग काढायचा प्रयत्न केला तर ते वर्तन हिंसेच्या श्रेणीत मोडणारं ठरतं. बळाच्या आधारानं अनिष्टाचा प्रतिकार करायचा प्रयत्न केला तरी अधिक गंभीर स्वरूपाच्या विसंगत परिस्थितीत आपण सापडलो असल्याचं माणसाच्या लक्षात येतं. आपला भूतकाळ आपल्याला बंदिस्त करत असतो. आपल्याला वर्तनस्वातंत्र्य आहे असं

आपल्याला वाटेनासं होतं. आपल्या कर्मांची जी काही फळं येतील ती स्वीकारण्यासाठी असीम धैर्याची आणि आत्मबलिदानाची गरज असते. आणि जी गोष्ट आपल्याला लागू होते तीच इतरांनाही लागू होते. यामुळे कृतीनं आणि वैयक्तिक उदाहरणानं शिकवण्यावर फार मर्यादा येतात. जाणीवपूर्वक सत्याचा स्वीकार करणं एवढीच गोष्ट आपल्या हातात शिल्लक असते.

माणसानं हे समजावून घ्यायला पाहिजे की तो येशूचं कितीही प्रामाणिकपणानं अनुसरण करत असला तरी असे काही लोक असतील की जे येशूचा स्वीकार करणार नाहीत व जे त्याची बदनामी करतील.

आपल्या अंतरीचा दिवा पेटवूनच ख्रिश्चन माणूस आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतो व तोच अंतरीचा दिवा इतरांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करू शकतो.... आपल्या वर्तनाला आधार असायला पाहिजे आणि तो आधार आपल्या खाजगी जीवनात ईश्वरेच्छेला शरण गेल्यामुळेच मिळू शकतो. परमेश्वरासमोराला शरण जाणं आणि जीवनात प्रेमाची अनुभूती निर्माण करणं हेच आपलं कर्तव्य आहे. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १७७]

आत्मशुद्धी करून आणि खंबीरपणे आपल्या अंतरीच्या प्रकाशाला साक्षी ठेवून आणि सर्वांवर सर्वप्रकारच्या परिस्थितीत प्रेम करायची जी शिकवण येशूनं दिली तिचं आपल्या वर्तनातून उदाहरण घालून देऊनच इतरांचं अज्ञान दूर करता येईल.

स्वतःमध्ये प्रगती घडवून आणणं आणि कल्पना करता येईल अशा कोणत्याही परिस्थितीत प्रेम करता येणं हेच टॉलस्टॉय यांचं घोषवाक्य झालेलं होतं. आपल्या श्रद्धेच्या विपरीत पद्धतीनं जीवन जगणाऱ्या कुटुंबियांसोबतच्या जीवनाला श्रद्धेची अजून एक कसोटी समजून टॉलस्टॉय यांनी संपूर्ण नम्रतेनं त्याचा स्वीकार केला. एकीकडे त्यांच्या अडचणी वाढत चालल्या होत्या तर दुसरीकडे श्रीमंतीच्या आणि सुखाच्या वातावरणात राहण्याबद्दल त्यांच्यावरील टीकेचा भडिमारही वाढत होता. हे सर्व सुरू असताना तेवढ्याच प्रमाणात त्यांना

वाटत राहायचं की आपल्याला 'स्वीकार करणं, क्षमा करणं आणि प्रेम करणं' शिकायचं आहे. दिनांक २ जुलै १९०८च्या डायरीत त्यांनी लिहिलं :

हा माणूस विलासात राहतो आहे, शेतकऱ्यांची पिळवणूक करून जे काही याला मिळवणं शक्य होतं ते यानं मिळवलं आहे आणि त्याच शेतकऱ्यांना यानं तुरुंगात ढकललं आहे, हा ख्रिश्चन धर्माचं आचरण करत असल्याचं सांगतो व तशी शिकवणूक लोकांना देतो, परंतु लोकांना तो केवळ पेनीच देतो, जेव्हा केव्हा याला वाईट काम करायचं असतं तेव्हा तो बायकोच्या मागे दडतो. असं कोणी म्हणताना माझ्या कानावर सहजगत्या जरी पडलं असतं तर मी त्याला हलकट माणूस म्हणालो असतो! पण खरं म्हणजे या जगाच्या मोहातून मला मुक्त करण्यासाठी आणि माझ्या आत्म्यासाठी जगता येण्यासाठी याच गोष्टीची आवश्यकता होती. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ,* पृष्ठ १७८ (ठळक अक्षरं माझी)]

एवढंच नाही तर कल्पना करता येण्यासारख्या कोणत्याही अवस्थेत प्रेम करायची समस्याही अतिशय कठीण होती. माणसानं कुणावर प्रेम करावं आणि कसं? प्रेमाची अभिव्यक्ती नेहमीच सोपी नसते कारण 'प्रेमाची मागणी पूर्ण करत असताना आपण इतरांचा नाश करत असतो.' त्याचप्रमाणे विश्वप्रेमाच्या तत्त्वानुसार वैयक्तिक प्रेमाला स्थान असू शकतं काय? उत्तरं सोपी नव्हती. प्रत्येकाला आपला सूळ घेऊन 'दररोज, दर तासाला व दरक्षणी' चालावं लागत असतं. ज्या व्यक्तीवर प्रेम करायचं त्याच्यावर प्रेम करायचं सूत्र एकच आहे : 'मला माहीत आहे की तू माझ्यावर प्रेम करत नाहीस.... तर माझ्या आत्म्यावर प्रेम करतोस. आणि माझा आत्मा - हा तुझा आत्मा आहे व त्यांच्या मागण्याही समान आहेत.' [अलेक्झॅन्ड्रा टॉलस्टॉय, *टॉलस्टॉय,* पृष्ठ ५२५] आणि अखेरीस माणसानं आपली सर्व शक्ती 'हिरॉडसारख्यावर प्रेम करण्यात' वा 'माकडांना माणसाळवण्यातच' खर्च करावी आणि परिपूर्णता येईपर्यंत मानवजातीच्या प्रेमाला त्याची स्वतःची काळजी घ्यायला मोकळं ठेवावं? अथवा 'हिरॉडसारख्यावर प्रेम करणं' आणि 'माकडांना माणसाळवणं' हे सर्व विसरून आपल्या प्रेमाचं क्षेत्र विश्वव्यापी होईपर्यंत सतत

विकसित करत जाणं आवश्यक आहे? टॉलस्टॉयनी आपल्या एका मित्राला लिहिलं की मी याबद्दल निश्चित मत देऊ शकत नाही, कदाचित दोन्ही मार्ग सारखेच उचित असू शकतील.

तुझं म्हणणं आहे की हिरॉडवर कोणीच प्रेम करू शकत नाही. मला माहीत नाही. परंतु मला माहीत आहे आणि तुलाही माहीत आहे की आपण त्याच्यावर प्रेम करायला पाहिजे. मला माहीत आहे आणि तुलाही माहीत आहे की मी जर त्याच्यावर प्रेम करण्यात चुकलो तर मी स्वतःलाच दुखवेन, मी पूर्णत्वाचं जीवन जगू शकणार नाही आणि हिरॉडवर प्रेम करणं शक्य होईपर्यंत तसं करणं मी स्वतःला शिकवायला पाहिजे. मी अशा माणसाची कल्पना करू शकतो की ज्याच्यावर आयुष्यभर त्याच्या प्रेमासाठी प्रेम करण्यात आलं आहे परंतु जो हिरॉडवर मात्र प्रेम करू शकत नाही आणि मी दुसऱ्या अशा माणसाचीही कल्पना करू शकतो की ज्यानं हिरॉडवर प्रेम करणं शिकण्यात आपली सर्व शक्ती खर्ची घातली आहे व जे त्याच्यावर प्रेम करतात त्यांच्याबद्दल मात्र तो उदासीन राहिला आहे, आणि जो वीस वर्ष हिरॉडवर प्रेम करणं शिकू शकला नाही परंतु एकविसाव्या वर्षी मात्र हिरॉडवर प्रेम करण्यात त्याला यश आलं आणि हिरॉडला त्याच्यावर आणि इतर सर्व लोकांवर प्रेम करायला भाग पाडलं. यापैकी काय चांगलं आहे ते मी सांगू शकत नाही. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १७८]

माणसानं आपल्या सर्व सामर्थ्यानिशी आपल्या वासनांवर नियंत्रण मिळवायला पाहिजे आणि मग हातचं काहीही राखून न ठेवता प्रेमाच्या सिद्धान्ताला शरण जायला पाहिजे एवढंच करायची आवश्यकता आहे याच निष्कर्षावर अखेरीस टॉलस्टॉय आले. त्यानंतर प्रेमच अचूक मार्ग दाखवील.

आपल्या अंतर्मनावर प्रेमाला सत्ता गाजवू देण्याकरिता आणि मोहापासून दूर राहण्यासाठी सर्व काही करण्यावरच सर्व अवलंबून आहे. मोहांपासून दूर होताक्षणीच जगाचं अज्ञान दूर करण्यासाठी माणसाला कार्यप्रवृत्त करून वा माकडांना माणसाळवायचं आणि शांत करायचं

काम करायला लावून प्रेम आपलं अधिराज्य गाजवू लागेल. दोन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या आहेत. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १७८]

यामुळे त्यांना आध्यात्मिक शक्ती मिळाली, इच्छाशक्तीच्या पक्षाघातापासून ते वाचले. १८९१ साली त्यांनी दुष्काळप्रभावित लोकांच्या मदतकार्यात स्वतःला झोकून दिलं होतं. चांगलं काम म्हणजे उपाशी माणसाला पैसा देणं नाही तर जे उपाशी आहेत आणि ज्यांच्याजवळ भरपूर खायला आहे अशा दोन्ही प्रकारच्या लोकांवर सारखंच प्रेम करणं या तत्त्वानुसार तुम्ही वागत नाही असा त्यांच्या मित्रांनी त्यांच्यावर आरोप केला. 'गरिबांपासून चोरलेल्या संपत्तीतून देणग्या मागायचा व त्या देणग्या गरिबात वाटायचा तुम्हाला काय अधिकार आहे?' मित्रांनी विचारलं. तेही त्यांच्या टीकाकारांच्या टीकेत सामील झाले आणि पश्चात्ताप न करता व निरुत्साही न होता आपलं काम करत राहिले.

सदसद्विवेकाच्या आधारावर स्थलांतर करू इच्छिणाऱ्या डखोबोर लोकांना मदत करण्यासाठी काही वर्षांनंतर त्यांनी निधी गोळा करायला सुरुवात केली. त्यांच्या या 'अक्षम्य अपराधामुळे' त्यांच्यावर पुन्हा एकदा टीकेचं वादळ उठलं व तेही त्यांच्या कट्टर 'अनुयायांकडून'. त्यांच्यातील एकाला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केलं :

तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे. मी विचार केला आणि अजूनही विचार करतो आहे, मला जाणवलं आणि अजूनही जाणवत आहे की जे लोक सत्यासाठी यातना सहन करत आहेत त्या लोकांसाठी वस्तुरूपात मदत मागणं चूक आहे.... दुष्काळात लोकांना मदत करायला जसा माझा विरोध होता तसाच विरोध माझा या कामालाही होता. परंतु जर माणसाला सांगण्यात आलं की मुलं, म्हातारी माणसं, आणि कृश झालेल्या गर्भार स्त्रिया यासारखी अशी माणसं आहेत की ज्यांना तुमच्या शब्दानं वा कृतीनं मदत होऊ शकते तर मग माणूस काय करू शकतो? त्याला बोलणं वा कृती करणं भाग आहे. त्यांच्या म्हणण्याला मान्यता देणं म्हणजे पापपूर्ण जीवनाच्या शुद्धीत आणि स्वतःसाठी न जगता देवासाठी जगावं यातच नेहमी आणि कोणत्याही परिस्थितीत

खरा सद्गुण असतो आणि लोकांची फसवणूक करून चोरलेल्या वस्तूंनी मदत करणं ही गोष्ट ज्यू लोकांसारखं वर्तन करण्यासारखी आणि त्यांच्या वर्तनाला मान्यता देण्यासारखी आहे व मी स्वतःच व्यक्त केलेल्या आधीच्या मताशी विसंगत आहे. परंतु त्याला न मान्यता देणं म्हणजे ज्यांच्या यातना माझ्या शब्दानं वा कृतीनं ताबडतोब दूर होऊ शकतील त्यांना मदत करायला नकार देणं असा अर्थ होईल. माझ्या स्वभावातील दुबळेपणामुळे मी नेहमीच दुसऱ्या पर्यायाची निवड, त्यामुळे मला यातना होत असल्या तरी, करत आलो आहे. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १८१-८२]

तत्त्वांची मांडणी करताना माणसानं कोणतीही तडजोड करू नये असं त्यांचं मत होतं. परंतु वागताना मात्र ते आपल्या प्रेमळ, माणुसकीपूर्ण हृदयाचं ऐकत असत. व अनेकदा तर जेव्हा केव्हा लोकांच्या यातना दूर करायची त्यांना संधी मिळायची तेव्हा आपल्या अनुयायांचा विरोध बाजूला सारत आणि आपल्या वर्तनात इतरांना सुसंगती जाणवते की नाही याची फिकीर न करता जाणूनबुजून ते आपल्याच तत्त्वाच्या विरोधी वर्तनही करायचे.

१३

१९०१ साली पवित्र धर्मसभेनं धर्मातून काढून टाकल्याचा निर्णय टॉलस्टॉय यांना जेव्हा कळवला तेव्हा त्याला उत्तर देताना टॉलस्टॉय यांनी लिहिलं :

सुरुवातीला परंपरागत श्रद्धेवर मी शांततेपेक्षाही अधिक प्रेम करत होतो, त्यानंतर ख्रिश्चनत्वावर मी चर्चपेक्षाही अधिक प्रेम करू लागलो व आता जगातील कोणत्याही गोष्टीपेक्षा सत्यावर माझं प्रेम अधिक आहे. [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अल्मेर मॉड, पृष्ठ २८७] *उत्तराच्या आधी एस. टी. कॉलरीज यांच्या पुढील ओळी उद्धृत करण्यात आल्या होत्या :*

जो कोणी ख्रिश्चन धर्मावर सत्यापेक्षाही अधिक प्रेम करील तो ख्रिश्चनत्वापेक्षा केवळ आपल्याच पंथावर वा चर्चवर प्रेम करत असल्याचं आणि सर्वांवर प्रेम करण्यापेक्षा स्वतःवरच प्रेम करणारा असल्याचं आढळून येईल.

जसजसं त्यांचं वय वाढत गेलं तसतसे हळूहळू ते सर्व प्रकारच्या ताठर स्वरूपाची विचारसरणी असलेल्या धर्ममतांचा त्याग करू लागले. आपल्या धर्मविषयक श्रद्धांचा लोकांना स्वीकार करायला सांगणं त्यांना कठीण जात होतं कारण त्यांचा सत्याचा शोध संपलेला नव्हता. सत्याचा चिरंतन शोध हाच जीवनाचा संपूर्ण अर्थही आहे आणि हेतूही आहे असं जाहीर करून ते म्हणाले की मला अजून बरंच काम करायचं आहे आणि माझ्या अंतर्जीवनात अजून बरीच परिवर्तनं व्हायची आहेत. त्यांचा असाही विश्वास नव्हता की त्यांचा विश्वास असलेल्या सत्याकडे जाणारा त्यांचाच एकमेव मार्ग आहे. चेर्टकोव्ह यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं की 'माझी खात्री आहे की प्रत्येकाला अखेरीस मला ज्या सत्याचं दर्शन झालं त्याच सत्याकडे यावं लागेल, त्याकडे ते कधी आणि कसे येतील यात मला स्वारस्य नाही.' एखाद्या संप्रदायाचं मध्यवर्ती केंद्र बनायची कल्पनाच त्यांना असह्य व्हायची. आपल्या शिकवणुकीतून कोणत्याही प्रकारचा संकुचितपणा वा असहिष्णुता वाढण्याबद्दल ते अतिशय संवेदनशील होते व त्यामुळे अस्वस्थ होऊन 'टॉलस्टॉयी' लोकांबद्दल एकदा ते म्हणाले की हे लोक 'अगदीच पाठिंबा द्यायच्या लायकीचे नाहीत'. दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले होते की 'टॉलस्टॉयी माणूस म्हणून 'माझ्या श्रद्धांना अगदीच अपरिचित आहे.'

टॉलस्टॉयी वस्त्यांकडे लोकांना आकर्षित करावं म्हणून प्रयत्न करणाऱ्या आपल्या एका अनुयायाचं लक्ष आपणच बरोबर आहोत या विकसित होत असलेल्या भावनेतील धोक्याकडे वेधत टॉलस्टॉय म्हणाले :

वेगळं उभं राहणं, आपल्या स्वतःला मठात कोंडून घेणं, आपल्यासारख्याच देवदूतांनी घेरलेलं राहणं अशा प्रकारचा प्रयत्न आपण केल्यास अशा प्रकारचं ऊबदार घर आणि परिस्थिती आपण निर्माण करू की आपल्याला तिथं सदाचारी म्हणून राहता येईल परंतु इतर कोणालाच त्याची ऊब मिळू शकणार नाही. जगात राहा आणि सदाचारी राहा - गरज आहे ती या गोष्टीची.

[अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, पृष्ठ ४६०]

आणि पुन्हा,

प्रत्येक संघटनेवर, प्रत्येक व्याख्येवर, सदसद्विवेकबुद्धीच्या कोणत्याही एका अटीवर भर देणं याचा अर्थ होतो कोणत्याही प्रकारचं चांगलं काम न करता आपल्या स्वतःवरील प्रेमाला सामर्थ्यसंपन्न करण्याविषयीची चिंता.... असा कोणताही प्रकार लोकांपासून व पर्यायानं चांगल्या वर्तनापासून आपल्याला दूर करतो व त्यांच्यात प्रेमभावना निर्माण करायची शक्यता संपवतो. वस्त्यांना जर कायम स्वरूप द्यायचं असेल तर त्यांची अवस्था ही अशी असेल व त्यांची ही मर्यादा असेल. खांबावर उभं राहायचं आणि एकांतवासात राहण्यासाठी वस्तीमध्ये जाऊन राहायचं ही गोष्ट लोकांसाठी काही काळ योग्यही असेल परंतु कायमस्वरूपी पद्धत म्हणून निश्चितच ही गोष्ट मूर्खपणाची होईल. एखाद्या खांबावर वा वेगळ्या वस्तीत शुद्ध जीवन कंठणं अशक्य आहे कारण यामध्ये अर्ध्या जीवनाला - जगाशी संपर्काला आपण मुकतो व त्याशिवाय आपल्या जीवनाला काहीच अर्थ नसतो. [अर्नेस्ट जे सायमन्स : *लिओ टॉलस्टॉय*, पृष्ठ ५०४]

चर्चच्या सिंहासनावर बसवल्याबद्दल आणि इतरांच्या वर्तनाचा निवाडा करण्यासाठी त्यांच्या मतांना उद्धृत करण्याविषयी त्यांनी तक्रार केली. त्यांचं म्हणणं होतं की लोकांनी त्यांना पडलेल्या प्रश्नाची उत्तरं मला विचारणं आणि सतत मार्गदर्शनासाठी माझ्याकडे धाव घेणं चूक आहे. १९०७ सालच्या आपल्या डायरीत त्यांनी लिहिलं : 'माझी शिकवण अशी काही गोष्ट नाही.

सत्यासंबंधी जगात एकच वैश्विक शिकवण आहे.... माणसाचा ईश्वराशी असलेल्या पितृत्वाच्या संबंध ओळखणं असं या शिकवणुकीला म्हणतात, आणि त्याचप्रमाणे 'जगाच्या प्रभावापासून मुक्ती आणि ईश्वराची म्हणजे त्याच्या इच्छेची गुलामगिरी' हा आपल्या स्वातंत्र्याचा अर्थही आपण लक्षात घेणं आवश्यक आहे. ज्या क्षणी माणसाला या गोष्टीचं ज्ञान होतं त्याच क्षणी ईश्वराशी त्याचं भावैक्य निर्माण होतं आणि मग त्याला कुणालाही काहीही विचारायची गरज राहत नाही (तिरपी अक्षरं माझी).

ही गोष्ट नौकानयनासारखी आहे..... जोपर्यंत माणूस मध्यप्रवाहापर्यंत पोहोचत नाही.... तोपर्यंत त्याला स्वतःलाच नाव वल्हवावी लागते, आणि इतर माणसांच्या वल्हवण्यातून त्याला कदाचित मार्गदर्शनही मिळू शकेल.... परंतु आपण प्रवाहात शिरताक्षणीच तिथं कुणाचंच मार्गदर्शन राहत नाही आणि राहूही शकत नाही. प्रवाहाच्या शक्तीनं आपण सर्वजण खेचले जात असतो, एकाच दिशेनं ओढले जात असतो, आणि जे आपल्या मागं असतात ते पुढेही जाऊ शकतात. [कौंट लेव एन. टॉलस्टॉय, *मिसलेनियस लेटर्स अँड एसेज*, पृष्ठ ५५५]

दुसऱ्या बाजूनं विचार करता आपण कोणत्या बाजूनं वल्हवावं असं जर माणसाला वाटत असेल तर तो अजून मध्यप्रवाहात पोहोचला नसल्याचं ते द्योतक असेल. जे लोक 'एकाच मार्गदर्शकाचं सतत ऐकतात ते लोक' अशा प्रकारची मागणी मान्य करणाऱ्या मार्गदर्शकासोबत 'काळोखात भटकत असतात' असं म्हणावं लागेल असं टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं.

त्यांचा सत्याचा हा दीर्घ शोध संपू लागला असताना 'निर्विवाद सत्याचा' जुना अहंकार वितळू लागला आणि हळूहळू तो विस्मरणात गेला. एवढंच नाही तर ख्रिश्चनत्वाच्या विशेष स्थानाबद्दलचा त्यांचा विश्वासही नरम पडू लागला आणि त्यांच्या जेव्हा लक्षात आलं की सर्व धर्मातील मूलभूत सिद्धान्त कमी अधिक प्रमाणात सारखेच आहेत तेव्हा बायबलसंबंधीचा त्याचा उत्साहही कमी झाला. प्रत्येकाच्या सदसद्विवेकबुद्धीनं या तत्त्वांना मान्यता देण्यावरून त्यांनी निष्कर्ष काढला की केवळ हीच तत्त्वं अशी आहेत की जी देवानं माणसाला सांगितली आहेत आणि ज्यामुळे संघर्ष होतो आणि मानवजातीत दुफळी पडते ती मानवी निर्मिती आहे.

व्हॉट आय बिलीव्ह या पुस्तकात त्यांनी सांगितलं आहे की जीवनाचा संपूर्ण हेतू ईश्वरी इच्छेचं पालन करणं आहे आणि त्याची इच्छा आपल्यामध्ये प्रेमभाव रुजावा आणि ऐक्य प्रस्थापित व्हावं ही आहे; 'अशा प्रकारे या भावना मनात वाढल्यानंतर आणि प्रत्येक गोष्टीवर प्रेम करू लागल्यानंतर' माणूस स्वतःला भावी जीवनासाठी तयार करत असतो. परंतु त्यांना

स्वतःलाच 'तुमचा यावर खरोखरी विश्वास आहे काय' म्हणून जेव्हा विचारणा करण्यात आली तेव्हा 'मला माहीत नाहीं' हेच उत्तर त्यांना द्यावं लागलं.

स्वाभाविकपणेच माझ्या तोंडून उत्तर निघालं की निश्चितपणे मी कशाबद्दलच काही सांगू शकत नाही. मग माझा कशावर विश्वास आहे? प्रामाणिकपणानं मी उत्तर दिलं की प्रत्येकानं चांगलं आणि नम्र असायला पाहिजे आणि प्रत्येकानं क्षमा करायला पाहिजे आणि प्रेम करायला पाहिजे. मी माझ्या संपूर्ण अंतःकरणापासून एवढ्याच गोष्टींवर विश्वास ठेवू शकतो. [तिखॉन पोल्नरै, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १९२]

त्यांनी देवाच्या व्यक्तिगत अस्तित्वविचाराला विरोध करायला सुरुवात केली – 'निर्माता देव, विचार करणारा देव, वा प्रश्नांची उत्तरं देऊ शकणारा देव.' 'लोकांच्या जाणीवेत जो राहतो' व जो 'अनंत' 'असीम' आहे आणि ज्याचा आपण अंश आहोत असं माणसाला वाटतं तोच त्यांच्यासाठी देव होता. माझ्यातील प्रत्येक गोष्ट ही ईश्वराच्या जवळ आहे व मला तो प्रत्येक गोष्टीत जाणवतो असं टॉलस्टॉय म्हणाले. परंतु सत्याला शरण जायच्या सतत वाढत जाणाऱ्या तळमळीनं त्यांनी स्वतःलाच विचारलं की 'चिनी, कन्फ्युशिअस, बौद्ध आणि आपले नास्तिक आणि अज्ञेयवादी या सर्वांना सामावून घेण्यासाठी ईश्वराशिवाय भागणं अगदीच अशक्य होईल.'

'कंटाळवाळेपणा, नैराश्य आणि भीतीसारख्या भावना' मनात एकाएकी निर्माण झाल्याचं पाहून त्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला. त्यांच्या लक्षात आलं की माणसातील देवावर प्रेम केल्याशिवाय माणसावर आपण प्रेम करू शकत नाही; विश्वबंधुत्वाची भावना ईश्वराच्या माध्यमातूनच अर्थपूर्ण होते:

मला माहीत नाही की का, पण मला वाटायला लागलं की आध्यात्मिकदृष्टीनं माझा एकाएकी अधःपात झाला आहे आणि माझ्यातील सर्व प्रकारच्या आनंदाला आणि आध्यात्मिक शक्तीला मी मुकलो आहे. त्यावेळी कुठं माझ्या लक्षात आलं की मी देवाला सोडल्यामुळे असं

घडलं आहे. ईश्वर आहे की नाही याचा विचार करताना मला ईश्वराचा पुन्हा शोध लागला. [तिखॉन पोल्नर, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १९३]

त्यांच्या सत्यावरील भक्तीमुळे त्यांच्यासाठी सर्व काही असलेल्या ईश्वराच्या अस्तित्वाविषयीच प्रश्न निर्माण झाला व अखेरीस त्यांना परत गांधीजी ज्याला 'ईश्वर सत्य आहे आणि सत्य ईश्वर आहे' असं म्हणायचे त्याकडे वळावं लागलं.

१४

आपला जीवनमार्ग न बदलता आपण येशूचा स्वीकार करू शकतो हा लोकांचा समजच ख्रिश्चन धर्मात निर्माण झालेल्या विकृतीसाठी मुख्यत्वेकरून जबाबदार होता. येशूच्या तत्त्वज्ञानानं पुरस्कारिलेलं जीवन बहुसंख्य लोकांच्या जीवनपद्धतीपेक्षा अगदी वेगळं होतं आणि त्यानं दिलेली शिकवणही आतापर्यंतच्या लोकधारणेपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. त्यामुळे येशूच्या शिकवणुकीचा पूर्ण अर्थ लोकांना कळू शकला नाही. सेंट जॉन्समध्ये लिहिलं आहे, 'आणि माणसं प्रकाशापेक्षा काळोखावर प्रेम करतात कारण ते पापाचरण करत असतात.' आपल्या जीवनमार्गाच्या मोहामुळे ते येशूच्या शिकवणुकीला विकृत करत असतात. त्यांचं म्हणणं असतं की हे तत्त्वज्ञान आदर्शवादी आहे. त्याच्या आज्ञांचं पालन करणं कठीण आहे व ज्या समाजातील माणसं परिपूर्ण असतात त्याच समाजात या तत्त्वज्ञानाचं पालन करणं शक्य आहे.

अशा परिस्थितीत स्वतःची अस्खलनशीलता जाहीर करणाऱ्या लोकांची संस्था म्हणून चर्चचा उदय झाला व चर्चनं लोकांना येशूची म्हणजे ख्रिश्चन धर्माची शिकवण समजावून सांगायला सुरुवात केली. किंवा असं म्हणता येईल की जी तत्त्वं व्यवहारात उतरवणं चर्चच्या लोकांना कठीण वाटत होतं त्या तत्त्वांचा खोटा अर्थ चर्चच्या माध्यमातून सांगायला त्यांनी सुरुवात केली. ख्रिश्चन शिकवणुकीचा जो अर्थ आपण लावला तोच खरा आहे म्हणून त्यांनी सांगितलं. परंतु तो अर्थ सामान्यज्ञानाच्या आणि माणसाच्या अंतःकरणाला जाणवणाऱ्या सत्याच्या इतका विपरीत होता की त्याला प्रभावी करण्यासाठी त्यांना त्यात चमत्कारांचा भाग

घालावा लागला. त्यांनी एवढा प्रयत्न करूनही लोकांना ख्रिश्चनत्वाच्या शिकवणुकीचा अधिकाधिक चांगला अर्थ कळण्यापासून ते वंचित शकले नाहीत. यामुळे लोकांचं जीवन आणि त्यांची ख्रिश्चनत्वाची जाणीव यांत विरोध निर्माण झाला. आधुनिक माणसाच्या कटुतापूर्ण जीवनातील दुःखाचं हेच कारण आहे.

उदाहरणार्थ, आर्थिक क्षेत्रात प्रत्येक माणसाला उपजतपणे जाणवत असतं की प्रत्येकाला जीवनावश्यक गोष्टी मिळवायचा व एका मर्यादेपर्यंत सुखी राहण्याचा अधिकार आहे. आणि तरीही समाज आहेरे आणि नाहीरे या दोन वर्गामध्ये विभागलेला असल्याचं आपल्याला आढळते. एकीकडे माणूस बंधुता, मानवता आणि न्यायाच्या तत्त्वाला मान्यता देतो आणि तरीही कामगार वर्गाची पिळवणूक हा समाजाच्या दैनंदिन जीवनाचा भाग झाला आहे.

राजकीय क्षेत्रात पाहिलं तर राज्याच्या कायद्यासमोर लोकांनी प्रश्न न करता मान तुकवावी असं शिकवण्यात येतं. न्यायालयाकडून देण्यात येणाऱ्या क्रूरपणाच्या आणि विषम शिक्षा, जमिनीची अनैतिक आणि अन्याय्य वाटणी, अनेक सरकारी अधिकारी, सैन्य आणि पोलीस यांना पोसण्यातील चूक या सर्वांचा लोकांना संताप येत असला तरी त्यांना त्याला पाठिंबा द्यावा लागतो.

आंतरराष्ट्रीय संबंधात तर बंधुभावाचं तत्त्व आणि युद्ध यातील विरोध अजूनच डोळ्यात भरणारा आहे. ख्रिश्चन लोकांना एकमेकांवर प्रेम करायला शिकवण्यात येतं परंतु त्यांना हुकुमाप्रमाणे हल्ला करायला जावं लागतं आणि ज्यांनी त्यांना कधीही इजा केलेली नसते त्यांच्यावर हल्ला करावा लागतो वा ज्यांच्यावर त्यांनी वास्तवात प्रेम केलेलं असतं त्यांनादेखील मारावं लागतं.

ज्यामुळे माणसाला वेड लागू शकतं वा तो आत्महत्या करायला प्रवृत्त होऊ शकतो अशी जाणीव नाहीशी करण्याकरिता 'दारू, तंबाखू, पत्ते, वृत्तपत्रवाचन, प्रवास, सर्व प्रकारची नाटकं

वगैरे हानिकारक मनोरंजनात लोकांनी बुडी घेतली आणि आपल्या मनाच्या टोचणीला मंद करायचा प्रयत्न केला.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड एज वुइदिन यू*, अनु. ए. डेलानो, पृष्ठ १३६]

व्यक्तीप्रमाणे मानवतेच्या आयुष्यातही वेगवेगळ्या अवस्था असतात असा टॉलस्टॉय यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन होता. वयाच्या प्रत्येक अवस्थेत जीवनविषयक काही संकल्पना असतात व त्यानुसार त्या त्या अवस्थेतील माणसाच्या कामावर त्यांचा प्रभाव पडत असतो. प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनाचा अर्थ लावण्यासाठी आपल्या वयाप्रमाणे संकल्पना तयार करत असते व त्यानुसार अनेकदा ती आपलं वर्तन बदलवत असते. तिचा जीवनाकडे पाहायचा दृष्टिकोन जसजसा बदलत जातो तसतसं त्याद्वारे नियंत्रित होणारं तिचं वर्तनही बदलत जातं. हीच गोष्ट मानवतेलाही लागू होते. तिच्या जीवनविषयक संकल्पनाही खालच्या पातळीवरून वरच्या पातळीवर विकसित होत जातात. अशा रीतीनं मानवजातीच्या जीवनविषयक तीन संकल्पना आढळून येतात. त्यातील दोन भूतकालीन आहेत तर एक वर्तमानकालीन. आणि हिच्यावरच भविष्यकाळ अवलंबून आहे.

जीवनविषयक या तीन संकल्पना अशा : पहिली व्यक्तिनिष्ठ वा जैविक पातळीवरील. दुसरी पातळी आहे सामाजिक वा मूर्तिपूजेची. तिसरी पातळी आहे दैवी वा वैश्विक जीवनाच्या संकल्पनेची. हिलाच आध्यात्मिक जीवनसंकल्पना म्हणतात. पहिल्या संकल्पनेनुसार माणूस केवळ स्वतःसाठी आणि स्वतःच्या इच्छांसाठी जगत असतो. त्यात नैतिकतेचा प्रश्नच नसतो. दुसऱ्या संकल्पनेनुसार मानवी जीवनात केवळ स्वतःच्याच व्यक्तिमत्वाचा समावेश नसतो तर त्यात कुटुंब, वंश आणि अखेरीस राष्ट्राचाही समावेश होतो. तिसऱ्या संकल्पनेनुसार माणसाचं जीवन केवळ स्वतःच्या व्यक्तित्वावर केंद्रित नसतं तसंच कुटुंब, वंश वा राष्ट्र यांच्यावरही केंद्रित नसतं. या अवस्थेत त्याला आपल्या जीवनाचा अर्थ जीवनाच्या चिरंतन स्रोतात म्हणजे सर्व शक्तिमान ईश्वरात गवसत असतो.

रानटी माणूस जीवनाकडे वैयक्तिक दृष्टिकोनातून पाहत असल्यामुळे आपल्या वैयक्तिक इच्छांच्या परिपूर्तीतच जीवनाचं सार आहे असं त्याला वाटत असतं. तो कुटुंब, जमात वा राष्ट्र यांचा विचार करत नाही. त्याचा धर्म म्हणजे ईश्वराला आपल्या कामासाठी प्रसन्न करणं एवढाच असतो. मूर्तिपूजकाला कुटुंब, जमात अथवा वंश आणि राष्ट्र अथवा राज्य यांचं हितचिंतन जीवनात महत्त्वाचं वाटत असतं. वंशाच्या प्रमुखाप्रती, पूर्वजांप्रती वा राज्याच्या प्रमुखाप्रती निष्ठा हाच त्याचा धर्म असतो. परंतु ज्या माणसाची जीवनसंकल्पना दैवी असते त्याला तो ज्या जीवसृष्टीशी संबंधित आहे 'ती सर्व जीवसृष्टी अनादी अनंत ईश्वरातून उत्प्रेरित झाल्याचं जाणवतं.' तो ईश्वराची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्या वैयक्तिक स्वार्थाचा, कुटुंबाच्या हिताचा वा तो ज्या जमातीत जन्माला आला त्या जमातीच्या सर्व हितावरही तिलांजली द्यायला तयार होतो. त्याच्या जीवनाचा प्रमुख उद्देश प्रेम आहे, सर्व गोष्टीचं आदिकारण असलेल्या ईश्वराची सत्याचरणाद्वारे भक्ती करणं हाच त्याचा धर्म असतो.

टॉलस्टॉय यांचं मत होतं की इतिहास म्हणजे माणसाचा वैयक्तिक अवस्थेतून सामाजिक अवस्थेत आणि सामाजिक अवस्थेतून दैवी अवस्थेत झालेल्या परिवर्तनाची माहिती. टॉलस्टॉय याला ख्रिश्चन जीवनसंकल्पना म्हणायचे कारण त्यांना त्या संकल्पनेची सर्वाधिक चांगली अभिव्यक्ती येशूच्या शिकवणुकीत असल्याचं आढळलं होतं. परंतु त्याला वैयक्तिक महत्त्व नव्हतं. त्यात चिरंतन सत्याचा समावेश झालेला होता व हे चिरंतन सत्य माणसाच्या अंतःकरणात कोरलं गेलेलं असून त्याच्याच अंतर्गत मानवजात राहते, हालचाल करते व आपल्या अस्तित्वाचा अर्थ शोधते.

जेव्हा मानवजात नवीन परिस्थितीत प्रवेश करते तेव्हा नवीन जीवन संकल्पना जन्माला येते व त्यानुसार आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणायची ती मागणी करते. माणूस मूल असताना ते ज्या पद्धतीनं पाहते त्या पद्धतीनं वयात आलेला व कुटुंबप्रमुख झालेला माणूस पाहू शकत नाही. जर बाप मुलासारखं वागणं सुरू ठेवील तर त्याचं स्वतःचं आणि त्याच्या कुटुंबियांचं

जीवन नरकमय होईल. त्याचप्रमाणे लोकसंख्येतील वाढ, माणसामाणसात आणि राष्ट्राराष्ट्रांत अधिक संपर्क, निसर्गावर अधिक नियंत्रण, आणि ज्ञानात होणारी वाढ अशाप्रकारची अनेक परिवर्तनं झाल्यानंतर मानवजातीला पूर्वीसारखं राहणं परवडू शकणार नाही. बदललेल्या परिस्थितीमुळे विकासाच्या ज्या नवीन टप्प्यात मानवजातीनं प्रवेश केला आहे त्यानुसार तिला आपल्या दृष्टिकोनात आणि वर्तनात बदल करावा लागणार आहे. मानवतेला अवनतीकडे आपलं पाऊल टाकता येऊ शकत नाही. कुटुंब आणि राज्य या संकल्पनेच्या पलीकडे माणूस गेलेला आहे आणि त्याची इच्छा असो वा नसो त्याला या पलीकडील टप्यानुसार असलेल्या जीवनपद्धतीचा स्वीकार करावाच लागणार आहे.

जीवनाचा अर्थ व्यक्तीत नसून व्यक्तींच्या समूहात आहे असं गृहीत धरणाऱ्या सामाजिक जीवन संकल्पनेची मागणी असते की व्यक्तीनं आपल्या गटासमोर दुय्यम स्थान स्वीकारावं आणि गटासाठी आपल्या वैयक्तिक स्वार्थाचा त्याग करावा. समुदायासाठी व्यक्ती जर आपल्या स्वार्थाचा त्याग स्वेच्छेनं करत असेल तरच या संकल्पनेचं समर्थन करता येऊ शकतं. परंतु ज्या क्षणी स्वेच्छेनं अशा प्रकारचा स्वार्थत्याग करायची तयारी नसलेल्या लोकांचा जन्म होतो व त्यांना नियंत्रित करण्यासाठी बळाचा वापर करणं भाग पडतं त्या क्षणीच नवीन जीवनसंकल्पनेचा जन्म होतो. ती या जीवनपद्धतीशी विसंगत असते.

सामाजिक कल्याणाचा विचार न करता आपला वैयक्तिक स्वार्थच सिद्ध करू पाहणाऱ्या लोकांवर निर्बंध आणण्यासाठी पूर्णपणे निस्वार्थी आणि निर्दोष असलेल्या लोकांच्या हाती सत्ता असणं आवश्यक आहे. परंतु सत्ता हाती आल्यानंतर तिचा निश्चितच दुरुपयोग करणार नाही अशा निस्वार्थी आणि निर्दोषी माणसाच्या हाती सत्ता सोपवायचा वा अशा प्रकारची सत्ता सोपवल्यानंतर तिचा गैरवापर तो करणार नाही अशी हमी देणारा अचूक मार्ग अजून तरी सापडलेला नाही. त्यामुळे अशा प्रकारची सत्ता हाती असणारा कोणीही असला, व त्यानं सैन्याच्या बळानं सत्ता मिळवलेली असो वा वारसाहक्कानं ती त्याला मिळालेली असो वा

लोकांनी निवडून त्या सत्तेचा त्याला लाभ झालेला आसो, यापैकी कशामुळेही फारसं अंतर पडत नाही. अशा माणसाची प्रवृत्ती इतर माणसांपेक्षा वेगळी नसण्याचीच शक्यता असते. म्हणजे समाजाच्या स्वार्थाचा बळी देऊन स्वतःचाच स्वार्थ साधायची त्याला प्रवृत्ती होण्याची शक्यता असते. एवढंच नाही तर सत्ता असणाऱ्या लोकांपेक्षाही ही माणसं अधिक वाईट असायची शक्यता अधिक. कारण सत्ता माणसाला अपरिहार्यपणे भ्रष्ट करत असते.

आणि ज्या लोकांविरुद्ध सत्तेचा उपयोग करण्यात येत असतो त्यांच्या लक्षात येतं की सत्तेत असणाऱ्या माणसांचे हेतूही आपल्या हेतूंसारखेच असतात. तेव्हा ते संधी मिळेल तेव्हा सत्ताधाऱ्याची सत्ता सत्ताधाऱ्यांच्याच मार्गानं उलथवण्याचा प्रयत्न करतात वा सत्तेत शिरायचा प्रयत्न करतात. परिणामी समाज जसजसा सुसंस्कृत होऊ लागतो व समाजविरोधी तत्त्वांना नियंत्रणात आणण्यात येतं, - जो सत्तेचा एकमेव हेतू असतो - तसतशी शासनानं आपली सत्ता कमी करावी अशी अपेक्षा असते परंतु तसं होण्याऐवजी शासनाला अटकाव करणारं कोणीच न राहिल्यामुळे शासनाचा अजूनच नैतिक अधःपात होतो व शासनावर हिंसक आघात करायची व्यक्तीची क्षमता जेवढी कमी होते तेवढीच शासनाची व्यक्तीवर हल्ला करायची हिंसक क्षमता वाढते. 'गेल्या दोन हजार वर्षांच्या संपूर्ण इतिहासातून समूहाच्या नैतिक विकासाचं आणि शासनाच्या नैतिक अधःपाताचं दर्शन होतं.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेज*, अनुवादक अल्मेर मॉड, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, (१९५१), पृष्ठ २०२] असं टॉलस्टॉय यांनी दाखवलं आहे.

निष्कर्ष स्पष्ट होता :

पाशवी हिंसेची शक्ती सरकारच्या हाती जाताच तिच्यात वाढ होण्याची प्रवृत्ती निर्माण होते व तिला ज्या गोष्टींचा नाश करायचा असतो त्यापेक्षा ती मोठी असावी अशी अपेक्षा असते. परंतु समाजातील लोकांची परस्पर संबंधात हिंसा करायची क्षमता जसजशी कमी होते तसतशी शासनाच्या हिंसक क्षमतेची गरज कमी होत जाते.

शासनाची सत्ता जरी खाजगी हिंसेला दाबत असली तरी ती लोकांवर हिंसा करायचे नवनवीन उपाय शोधून काढते व ती सतत वाढत राहते. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २०३]

आणि यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नाही. हिंसेसाठी स्वभावतःच ही गोष्ट अपरिहार्य आहे. एकदा हिंसेचा अवलंब करण्यात आला की त्यामुळे हिंसेची त्याहूनही मोठी प्रतिक्रिया निर्माण होते आणि अशा रीतीनं या दुष्ट वर्तुळाचा परीघ वाढत राहतो.

शासनाच्या मागण्या मान्य न करणाराच्या विरोधात हिंसेची धमकी द्यायची शासनाची क्षमता म्हणजे त्याला शारीरिक इजा पोहोचवण्याची शासनाची क्षमता हा शासनाच्या सर्व सत्तेचा आधार आहे. शासन आणि सत्ताधारी वर्ग यांच्या हितासाठी जी जीवनपद्धती फायदेशीर असेल ती जीवनपद्धती सर्वांनी अवलंबावी म्हणून शासन अशा सशस्त्र दलाची उभारणी करते की ज्याला विचार न करता एक होऊन आदेशाप्रमाणे हल्ला करायचं प्रशिक्षण देण्यात आलेलं असतं. परंतु या बाबतीत सरकार एकटं नसतं. शेजारच्या राज्यातील सरकारही याच वेळी याच कारणासाठी अशाच प्रकारची तयारी त्याच्या सीमेत करत असते. एका देशातील सशस्त्र दलात आधी जी वाढ होत असते ती त्याच देशातील गुंडगिरी रोखण्यासाठी होत असते परंतु ही वाढ जसजशी अधिक होऊ लागते तसतसा शेजारच्या राष्ट्राला त्याचा धोका अधिक जाणवू लागतो व अशा रीतीनं शस्त्रस्पर्धेला सुरुवात होते.

सैन्यांमधील वाढीसाठी एकाच वेळी दोन कारणं जबाबदार असतात व ही कारणं परस्परांना चेतवत असतात; सैन्याची गरज स्व-राष्ट्रातील शत्रूंना रोखण्यासाठीं असते आणि शेजारी राष्ट्रांतील आपलं स्थान टिकवण्यासाठीही असते. एकामुळे दुसरी गोष्ट प्रभावित होते. ज्या प्रमाणात सरकारच्या सामर्थ्यात आणि सैन्यात वाढ होते त्याच प्रमाणात सरकारची देशातील हुकुमशाही आणि परराष्ट्रावरील आक्रमकता वाढते. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २०९]

युद्धाच्या वेळी कमीत कमी खर्चात अधिकाधिक सैनिकांची भरती करण्यासाठी सक्तीची लष्कर भरती हा सर्वोत्तम उपाय आहे. पाशवी शक्तीला नियंत्रणात ठेवायचं साधन म्हणून

सैन्याला मान्यता देण्यात आल्यामुळे निर्माण झालेल्या व्यवस्थेतून सक्तीच्या लष्कर भरतीच्या व्यवस्थेचा जन्म झाला. राष्ट्रभक्ती म्हणून माणसांना मारायचं प्रशिक्षण मिळालेल्या सैन्याची उभारणी सत्तेत असलेल्या सरकारला टिकवण्यासाठी करण्यात आलेली असते व अशा प्रकारच्या सैन्य उभारणीची अपरिहार्य परिणती युद्धात होत असतो.

अशा रीतीनं जगात चाललेली सक्तीची सैन्यभरती व परिणामी वाढणारा युद्धाचा धोका ह्या घटना म्हणजे आकस्मिक कारणामुळे उद्भवलेला राजकीय अपघात नाही. हा धोका व्यक्तीचा आणि समाजाचा अंतर्गत ढाचा बदवल्याशिवाय दूर करता येऊ शकत नाही. कारण जीवनाच्या सामाजिक संकल्पनेत अंतर्भूत असलेल्या विसंगतीतून तो निर्माण झालेला आहे व ही जीवनाची सामाजिक संकल्पना टिकवून ठेवण्यासाठी हिंसा आवश्यक होते व युद्ध तिची अपरिहार्य तार्किक परिणती आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २१० (तिरपी अक्षरं माझी)] ज्या साधनांचा सामाजिक जीवनसंकल्पनेसाठी अवलंब करण्यात येतो तीच साधनं तिच्या घाताला कारणीभूत होतात. 'व्यक्तिव्यक्तीतील संघर्ष आणि वैयक्तिक जीवनातील क्षणभंगुरता यातून निर्माण होणारं क्रौर्य लक्षात घेऊन माणूस आपल्या जीवनहेतूला एकूण मानवजातीच्या हितासाठी समर्पित करतो' हा सामाजिक जीवन संकल्पनेमागील संपूर्ण युक्तिवाद आहे. परंतु ज्या गोष्टीला काढून टाकण्यासाठी सक्तीची सार्वत्रिक सैन्यभरती करण्यात आली होती तीच गोष्ट तिच्यामुळे निर्माण झाली.

सर्व प्रकारचा त्याग केल्यानंतरही संघर्षातील क्रौर्य आणि वैयक्तिक जीवनातील क्षणभंगुरता यातून मुक्त होण्यासाठी माणसांना तोच धोका स्वीकारण्यासाठी परत बोलावण्यात आलं ज्यातून आपण मुक्त झालो असं त्याला वाटत होतं.... त्याशिवाय ज्या राज्यासाठी त्यांनी आपल्या वैयक्तिक हिताचा त्याग केला होता त्या राज्यालाही तोच विनाशाचा धोका निर्माण झाल जो आधी वैयक्तिक जीवनात होता.

वैयक्तिक संघर्षाच्या क्रौर्यातून सरकारनं माणसाला मुक्त करायचं असतं आणि समूहजीवनात वागताना त्यांना संरक्षण द्यायचं असतं. परंतु असं करण्याऐवजी ते माणसासाठी त्याच संघर्षाची आवश्यकता निर्माण करते. बदल केवळ एवढाच होत असतो की व्यक्तिव्यक्तीतील संघर्षाची जागा राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष घेतो व ज्या धोक्याला माणूस टाळू पाहत होता तो धोका तसाच कायम राहतो. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २१०]

याचा अर्थ असा की व्यक्ती, कुटुंब आणि सामाजिक कल्याण इत्यादी हेतूंसाठी हिंसेच्या पायावर समाजाची उभारणी करण्यात आलेली असते. परंतु तो हेतूच पराभूत होण्याच्या अवस्थेत समाज सापडतो. आधुनिक समाजाच्या हालअपेष्टा पराकोटीच्या वाढतात. अशी अवस्था आली की राज्य ज्या त्यागाची मागणी करत होतं त्या त्यागासाठी व्यावहारिक दृष्टिकोनातूनही कोणतंच समर्थन उरत नाही. त्यामुळेंपरिवर्तन अपरिहार्य होतं. परंतु समाजासमोरील पराकोटीच्या संकटांनीच मानवजातीसाठी ही आवश्यकता निर्माण केलेली नव्हती. माणसांच्या जाणिवेत ख्रिश्चन विचारसरणीनं केलेला समावेश आणि तिचा त्याच्या विचारावर पडलेला पगडा हे परिवर्तनाच्या आवश्यकतेसाठी याहूनही अधिक महत्त्वाचं कारण होतं. अठराव्या शतकाच्या इतिहासानं माणसाच्या लक्षात आणून दिलं की सामाजिक जीवनसंकल्पना आता मानवतेसाठी कालबाह्य झाली आहे आणि आता मानव समाज ज्या टप्प्यावर पोहोचला होता त्या टप्प्याशी याच जीवनसंकल्पनेनुसार जगत राहणं विसंगत झालेलं आहे. यातून कोणत्या मार्गानं मुक्ती होणार याबद्दल मतभेद होत होते परंतु ही मुक्ती हिंसेच्या त्यागानं म्हणजे येशूच्या नियमांच्या परिपालनानंच होऊ शकणार आहे या बाबतीत मात्र सर्वांचं एकमत होतं. काहींचा विश्वास होता की येशूच्या पुनरागमनातून ही मुक्ती मिळणार आहे; काहींना वाटत होतं की सर्व लोकांना आपल्या कवेत सामावून घेऊन आणि त्यांच्या मनावर येशूची खरी शिकवण बिंबवून हे काम करता येणार आहे; तर इतर काहींना वाटत होतं की धर्मनिरपेक्षतेच्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांच्या आधारे मुक्तीचा मार्ग सापडणार आहे. हिंसक

क्रांतीच्या माध्यमातून खाजगी संपत्तीचा हक्क नष्ट करून उत्पादन साधनं आणि उत्पादनं सामाजिक मालकीची करून व त्यांचं वाटप समाजात केल्यामुळे म्हणजे 'ख्रिश्चनत्वातील भौतिक तत्त्वाच्या अनुसरणातूनच मुक्तीचा मार्ग सापडेल असं वाटणारा चौथाही एक वर्ग होता.'

अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा निषेध सर्वांकडून करण्यात येत होता व जे लोक स्वतःला ख्रिश्चन विरोधी समजत होते त्यांनाही वाटत होतं की 'येशूच्या शिकवणुकीचं वा त्या शिकवणुकीच्या काही भागाचं खऱ्या अर्थानं अनुसरण केल्यामुळेच मुक्तीचा मार्ग संभव आहे.

जीवनपद्धतीतील परिवर्तनाची आवश्यकता समाजातील सुज्ञ लोकांना जाणवून व तशी त्यांनी घोषणा करूनही बहुतेक लोक काही प्रमाणात सवयींमुळे आणि काही प्रमाणात अविचारामुळे कालबाह्य जीवनसंकल्पनेनुसार आपल्या जीवनाची आखणी करत राहिले. लोक वर्तमान अवस्था सहन करत राहिले याचं मुख्य कारण हे होतं की लोक आपल्याच भ्रमाचे आणि राज्याचं हस्तक असलेल्या चर्चनं त्यांच्या मनात भरवलेल्या धर्मसंकल्पनेचे असहाय कैदी होते हे आहे. जीवनातील पोकळी विपुल सुखसाधनांनी भरून सत्ताधारी वर्ग कामगार वर्गाला गुलाम करू इच्छीत असतो. गुलामगिरीचा ही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी राज्याची हिंसक यंत्रणा निर्माण करण्यात आलेली असते. धर्माशिवाय राहू लागल्यामुळे आपलं संरक्षण केवळ राज्याच्या हिंसेद्वारेच होऊ शकते, 'बंदुकीच्या गोळ्या, फासावर चढवायची शिक्षा आणि तुरुंग' अशा प्रकारच्या ज्या साधनांनी राज्याच्या सत्तेचं रक्षण होत असतं तीच साधनं उत्तम समाजव्यवस्था कायम राखायची साधनं आहेत अशा प्रकाराच्या विचारानं लोक संमोहित झाले. यामुळे त्यांच्या व्यथांचं खरं कारण आणि त्या व्यथा दूर करायचा उपाय काय आहे हेही त्यांना कळू शकलं नाही. खऱ्या धर्माच्या अभावामुळे 'हिंसेवर आधारित पाशवी जीवनाचा' स्वीकार केला गेला व हिंसाधारित पाशवी जीवनामुळे त्या 'संमोहनातून मुक्त होणं आणि नवजीवनाचा स्वीकार करणं लोकांसाठी अजूनच कठीण होत गेलं.' अशा रीतीनं एक दुष्ट वर्तुळ पूर्ण झालं.

आधी असं वाटत होतं की 'चेटूक करण्यात आलेल्या या चक्रातून' सुटकेचा कोणताच मार्ग नाही. शासनाच्या मूलभूत प्रवृत्तीमुळे तेही यातून मार्गदर्शन करू शकत नव्हतं. ते ज्या फांदीवर बसले होते ती फांदी कापण्यासारखीच ही गोष्ट झाली असती. ज्या शिकलेल्या लोकांमध्ये या भ्रमजालाच्या पलीकडे पाहायची क्षमता होती तेही सत्ताधाऱ्यांना घाबरत होते कारण आपण केलेल्या भ्रष्टाचाराला जे शासन आतापर्यंत संरक्षण देत होतं तो भ्रष्टाचार शासन उघड करील की काय अशी त्यांना भीती वाटत असते. त्याशिवाय सर्व धर्म हे चुकीचे आहेत हा निर्णय त्यांनी आधीच घेतलेला असल्यामुळे लोकांचा भ्रम दूर केल्यानंतर त्या जागी वेगळं देण्यासारखं त्यांच्याजवळ काहीच नव्हतं. दुसरीकडे गुलामगिरीचं जीवन जगणाऱ्या समुदायाला व्यावहारिक दृष्टीचंच महत्त्व वाटत असल्यामुळे वरच्या वर्गाशी संघर्ष करून आपल्या व्यथांमध्ये अजूनच भर घालायची त्यांची इच्छा नसते.

परंतु धार्मिक लोकांसाठी ही गोष्ट वेगळी असते. टॉलस्टॉय निग्रहपूर्वक सांगतात की कितीही अधःपतित झालेला समाज असला तरी त्यात असे लोक असतातच की ज्यांच्या जीवनाचा एकमेव उद्देश त्यांना जे दैवी वाटतं त्याचा प्रत्यय 'शब्दातून आणि कृतीतून जगाला आणून द्यायचा असतो' व जे 'केवळ ईश्वराची इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि असत्याला उघडं पाडून सत्याला साक्षी राहण्यासाठीच जगत असतात. प्रसिद्धी, यातना, छळ, हेटाळणी, अवहेलना यांची कशाचीच पर्वा न करता 'आपले प्राण पणाला लावून ते धर्माच्या पावित्र्याचं रक्षण करत असतात'. कारण त्याशिवाय मानवी जीवनाचं अस्तित्वच अशक्य होते. 'मानवाला भ्रमिष्ट करणाऱ्या चक्रव्यूहात जे शिरू शकतात आणि त्याचा भेद करू शकतात' असे केवळ तेच लोक असतात. [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अल्मेर मॉड, पृष्ठ ३३५] व्यावहारिक लोकांना प्रस्थापित समाजव्यवस्थेला विरोध करायची ज्या सर्व कारणांसाठी भीती वाटत असते त्यांचं त्यांना काहीच महत्त्व तर वाटत नाहीच उलट त्या असत्याविरुद्ध लढा द्यायचा त्यांचा निर्धार त्यामुळे अधिकच वाढतो.

त्यांच्यासाठी या जीवनात यातना आणि मृत्यू नगण्य असतात. चिलटं चावल्यामुळे हाताला आलेली फोडं, अथवा नांगर हाकणाराला त्याच्या हातापायांचं दुखणं जसं महत्त्वाचं वाटत नसतं तशीच त्यांची गोष्ट असते.... अशी माणसं कितीही थोडी असली, त्यांचं सामाजिक स्थान कितीही कमी प्रतीचं असलं, ते कितीही कमी शिकलेले असले वा त्यांची क्षमता कितीही कमी असली तरी विस्तवाची ठिणगी वाळलेल्या पानांना ज्याप्रमाणे निश्चितपणे पेटवते त्याप्रमाणे हे लोकही सर्व जगाला पेटवतात व धर्माच्या अभावी काळोखात असलेल्या आणि नवजीवनासाठी तळमळणाऱ्या सर्व माणसांची अंतःकरणं प्रकाशित करतात.

एक हिब्रू म्हण उद्धृत करत टॉलस्टॉय यांनी समारोप केला :

'माणसाचं अंतःकरण देवाचा दिवा आहे.' जोपर्यंत आतला दिवा प्रज्वलित नाही तोपर्यंत माणूस दुबळा आणि दुर्दैवी असतो. आणि जेव्हा तो दिवा प्रज्वलित होतो (आणि धर्माद्वारे जागृत झालेल्या अंतःकरणातच तो प्रकाशतो) तेव्हा तो माणूस जगातील सर्वात सामर्थ्यवान प्राणी होतो. यापेक्षा वेगळं काहीच होऊ शकत नाही कारण यानंतर त्याच्या अंतःकरणात जी शक्ती कार्य करत असते ती त्याची शक्ती नसते तर ईश्वराची असते. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३३६-३७]

आत्मशक्तीचा हा महान सिद्धान्त टॉलस्टॉय यांच्या प्रतिभेनं धर्माभ्यासातून शोधून काढला आणि यास्नाया पोल्याना येथील ऋषीनं कल्पनाही केली नसावी एवढ्या महान स्तरावर गांधीजींनी त्यालाच परिपूर्ण करून त्याचा प्रयोग केला.

१५

द किंगडम ऑफ द गॉड इज विदिन यू या ग्रंथात टॉलस्टॉय यांनी पाशवी सरकारच्या हिंसेविरुद्ध अप्रतिकाराच्या तत्त्वाचा उपाय सांगितला. सक्तीच्या सैन्यभरतीविरुद्ध लिहायच्या लेखाबद्दलचा विचार त्यांच्या मनात चार वर्ष घोळत राहिला. परिणामी सरकारांवर आतापर्यंत करण्यात आलेल्या हल्ल्यापेक्षा तीव्र हल्ला करणारा; सर्व प्रकारच्या युद्धातील आणि हिंसेतील

दुष्टपणाचं आणि दोषांचं दर्शन घडवणारा; आणि सामाजिक परिवर्तनाचं साधन म्हणून अहिंसेचा उपयोग करायच्या सिद्धान्ताचं संपूर्ण विवेचन व असहकाराची कल्पना करणारा ग्रंथ त्यातून बाहेर पडला. त्या सिद्धान्ताचा गांधीजींनी नंतर दक्षिण आफ्रिकेत आणि भारतात प्रयोग केला.

सर्व प्रकारचं शासन, मग ते हुकुमशाही पद्धतीचं असो की उदारमतवादी विचारसरणीचं, पाशवी आणि अन्याय्य असतं या सिद्धान्तापासून टॉलस्टॉय यांनी आपल्या विवेचनाला सुरुवात केली. आपला समकालीन हेर्झन याच्या शब्दांचा उपयोग करत ते सांगतात की 'तारेच्या उपकरणाचा उपयोग करणारे ते केवळ चंगीझखानच' असतात. सक्तीची सैन्यभरती आणि युद्ध हे राज्याच्या हिंसेसोबत नेहमीच असतात. अशाप्रकारचं बळावर आधारित असलेल्या सत्तेचं सरकार जोपर्यंत अस्तित्वात असते तोपर्यंत सक्तीची सैन्यभरती आणि युद्ध यांचं अस्तित्व राहीलच. शांततापरिषदा भरवून त्यात प्रस्ताव करून वा लवाद नेमून युद्ध टाळायचा प्रयत्न करण्यात येतो. परंतु ते जर शासनाच्या सत्तेला कमी लेखणारे असले तर कोणतंही शासन अशा प्रकारच्या प्रस्तावांना वा निवाड्यांना भीक घालत नाही. टॉलस्टॉय आठवण करत सांगतात की मी जेव्हा लहान होतो तेव्हा मला सांगण्यात आलं होतं की मला जर पक्ष्याला पकडायचं असेल तर त्याच्या शेपटीवर थोडेसे मिठाचे कण टाकले की झालं. मी तसा प्रयत्न केला. पण लगेच माझ्या लक्षात आलं की मला जे सांगण्यात आलं होतं तो केवळ विनोद होता. मला जर पक्ष्याच्या शेपटावर मिठाचे कण टाकता आले असते तर ते कण न टाकताही मला पक्ष्याला पकडता आलं असतं. निःशस्त्रीकरणासाठी देण्यात आलेले लवादाचे निर्णय वा शांतता समित्यांचे प्रस्ताव याच प्रकारात मोडतात. जे सरकार सक्तीच्या लष्कर भरतीच्या आधारानं प्रत्येक नागरिकाला त्याच्या इच्छेविरुद्ध आणि त्याला 'न्याय्य न वाटणाऱ्या कारणासाठी [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेज*, पृष्ठ २१२] आपल्या प्रजेवर करत असलेल्या हिंसेच्या प्रत्येक अपराधात सहभागी करून घेते त्या सरकारला पूर्णपणे सहकार्य देणं बंद करून शासन संस्थेला नष्ट करणं हाच शस्त्राच्या आणि पर्यायानं युद्धाच्या दुष्परिणामापासून सुटायचा एकमेव उपाय आहे.

टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की मानवजातीच्या नैतिक जाणिवेत झालेल्या प्रगतीमुळे हे केवळ आवश्यकच नाही तर अपरिहार्यही आहे. पापाचं वा वाईटाचं निराकरण करायच्या दोन पद्धती आहेत. पहिल्या पद्धतीनुसार पापाची वा वाईटाची सर्वसामान्यपणे जी व्याख्या करण्यात येते व ती सर्वांना बंधनकारक असते. तिचा हिंसेनं प्रतिकार करायचा असतो. दुसऱ्या पद्धतीप्रमाणे पापाचा वा वाईटाचा प्रतिकार हिंसेनं करायचा नसतो. येशूच्या शिकवणीच्या आधी माणसं आपल्या बांधवांच्या विरोधात हिंसेचा वापर करत होती व स्वतःला आणि इतरांना आश्वस्त करत सांगत होती की अगदी सर्व जग ज्याला वाईट म्हणते आणि जे खरोखरी वाईट आहे त्याविरुद्धच त्यांनी हिंसेचा उपयोग केलेला आहे. त्यासाठी सर्वांवर बंधनकारक होईल अशा प्रकाराची ते वाईटाची व्याख्या करू लागले. त्यासाठी ईश्वरी आदेशात ज्याचं मूळ आहे असं सांगण्यात यायचं त्याप्रमाणे वा जी माणसं स्खलनशील नाहीत असं समजण्यात यायचं त्यांच्या आदेशाप्रमाणे कायदे करण्यात येऊ लागले. नीरो आणि कलिगुला यांचं वर्तन याच कोटीतील होतं. 'निश्चितपणे आणि पूर्णपणे सर्व जगासाठी जे वाईट आहे असा त्यांचा विश्वास होता त्यावर हिंसेनं विजय मिळवणं आवश्यक आहे असं त्यांचं मत होतं.

परंतु मानवसमाजाची प्रगती होत गेली आणि समाज संश्लिष्ट होत गेला. सर्वांना मान्य होईल अशी वाईटाची व्याख्या करणं कठीण असल्याचं स्पष्ट झालं. लोकांच्या लक्षात येऊ लागलं की माणूस बाह्यतः कितीही मोठा असला वा त्याला कुणाचीही मान्यता असली तरीही कोणालाही अस्खलनशील समजता येऊ शकत नाही; सिनेट, विधानसभा, संसद अशा प्रकारच्या संस्थांच्या सदस्यत्वामुळे चुकणाऱ्या माणसांचं रूपांतर काही नं चुकणाऱ्या माणसात होऊ शकत नाही; एखाद्या व्यक्तीला वा ती व्यक्ती सदस्य असलेल्या एखाद्या संस्थेला हिंसक प्रतिकार करावा असं वाटत असलं तरी ती गोष्ट उचित असेलच असं नाही; आणि कोणत्याही मानवी प्रतिभेला निर्विवादपणे वाईटाचा मापदंड निश्चित करता आलेला नाही.

यानंतर येशूनं आपल्या तत्त्वज्ञानाची घोषणा केली. त्यानं केवळ एवढंच सांगितलं नाही की 'वाईटाचा प्रतिकार स्वतः वाईट असलेल्या हिंसेनं करण्यात येऊ नये'. सत्ताधीशांच्या काहीही सांगण्याला मूग गिळून मान तुकवायचा मार्ग न सांगता सर्वांनी - यात सत्ताधारीही आले - कोणाच्याही विरोधात आणि कोणत्याही परिस्थितीत हिंसेचा प्रयोग न करूनच संघर्ष संपवता येईल अशा प्रकारची नवीन जीवनसंकल्पनाही येशूनं दिली.

परंतु ही नवीन शिकवण स्वीकारायची लोकांची अजून तयारी झालेली नव्हती आणि बहुसंख्य लोकांनी आणि वैशिष्ट्यानं सत्ता हस्तगत करून इतरांवर राज्य करणारांनी नावासाठी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेला असला तरी त्यांना जे चूक आहे असं वाटत होतं त्याविरुद्ध कायदे करून जुलूम आणि बळजबरी यांच्या आधारे ते सर्वांना मान्य करायला लावायची जुनी पद्धत अजूनही सुरूच होती.

वाईट काय आहे ते ठरवणारा व त्याला जुलूमजबरदस्तीनं दडपण्याचा अधिकार असणारा वर्ग वेळोवेळी वेगळा असायचा. एकदा तो पोप असायचा तर दुसऱ्या वेळी एखादा सम्राट. कधी राजा तर कधी निवडलेल्या प्रतिनिधींची विधानसभा वा कधी संपूर्ण राष्ट्र. परंतु नेहमीच अशी काही माणसं असायची की ज्यांना अधिकारात असणारांनी वाईट ठरवलेली गोष्ट चांगली वाटायची व ते अधिकारात असणाऱ्या माणसांच्या विरोधात त्याच हिंसेच्या मदतीनं संघर्ष करायचे ज्या हिंसेचा प्रयोग अधिकारी त्यांच्यावर करायचे. आणि असं घडत असताना संघर्ष अधिकाधिक क्रूर होत जायचा. १८०० वर्ष असंच चालत राहिलं आणि मग अशी वेळ आली की वाईट काय आहे हे ठरवायची सर्वांना बंधनकारक व्याख्या बाहेरून करता येत नाही हे सर्वांच्या लक्षात आलं आणि सत्ताधाऱ्यांना तर वाईटाची व्याख्या करायचीही गरज आता वाटेनाशी झालेली होती. त्यांचं म्हणणं एवढंच असायचं की आम्हाला जे चुकीचं वाटतं ते वा आम्ही ज्याला चूक म्हणू तेच चूक असतं. पुराव्याचा देखावाही न करता त्यांना चूक वाटत असलेल्या गोष्टी दडपण्यासाठी ते स्वतःला सोयीचं असेल व लहर लागेल त्याप्रमाणे हिंसेचा

वापर करायचे. अशा सत्ताधाऱ्यांच्या आज्ञेसमोर जे नमायचे तेही, त्यांना त्या आज्ञा बरोबर वा नैतिक वाटत होत्या म्हणून नव्हे तर, हिंसेच्या अशा वर्तुळात सापडलेले असायचे की ज्यातून बाहेर पडायचा मार्ग त्यांना माहीत नसायचा व म्हणून ते तसं करायचे.

राजकीय हिंसेच्या ज्या संमिश्र स्वरूपाच्या मदतीनं शासन स्वतःचं संरक्षण करायचं त्याच्या व्यामिश्र स्वरूपामुळे सुटका करून घेता येणं कठीण व्हायचं. ज्या यंत्रणेद्वारे शासकीय हिंसा होत असते ती इतकी गुंतागुंतीची आणि इतक्या कावेबाजपणाची असते की तिच्यात किती तरी 'फूस लावणारे, सहभागी असणारे' लोक असतात व त्यामुळे त्या कृत्यासाठी आपण जबाबदार आहोत असं कोणत्याही एका माणसाला वाटत नाही.

वेताच्या टोपलीत ज्याप्रमाणे सर्व टोकं इतक्या काळजीपूर्वक विणण्यात आलेले असतात की ते वेगळे दिसू शकत नाहीत. तशीच गोष्ट अपराधातील जबाबदारीबद्दल असते. वैयक्तिक जबाबदारीला अशा काही हातचलाखीनं वाटण्यात आलेलं असतं की कोणालाही आपण काय करतो आहोत हे दिसतच नाही. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड ईज वुइदिन यू*, अनु. ए. डेलानो, पृष्ठ ३२७]

यंत्रामधील एखाद्या चाकाप्रमाणे त्यांना एकमेकांशी अशा रीतीनं जोडण्यात आलेलं असतं की त्यातील कोणालाही वैयक्तिक पुढाकार घ्यायचा अधिकार नसतो. हल्ल्याला साक्षीदार असलेल्या सर्व लोकांना 'हल्ल्याची जबाबदारी अधिकात अधिक लोकांमध्ये विभागता यावी म्हणून बळीच्या शरीरावर मारेकरी हल्ला करायला लावतो.' त्याचप्रमाणे अधिकारीही शक्य तेवढ्या अधिक नागरिकांना गुन्ह्यात गुंतवायची काळजी घेतात. 'काही अपराधाची मागणी करतात, काही त्याचा प्रस्ताव करतात, काही त्यासंबंधी निर्णय घेतात, काही योजनेला मान्यता देतात, काही त्याचा आदेश देतात व काही त्याची अंमलबजावणी करतात.' [वरीलप्रमाणे] संपूर्ण प्रक्रियेला इतक्या गुंतागुंतीच्या पद्धतीनं गतिशील करण्यात येत असते की तिच्यात भाग घेणाऱ्या लोकांना आपल्या कृत्याचे काय परिणाम आहेत ते डोळ्यांनी दिसतच नाहीत; प्रत्येकाला वाटत असतं की या कृत्याची जबाबदारी आपण सोडून इतरांवर आहे व त्यामुळे ते सर्व राज्याच्या

हिंसेच्या अपराधात 'त्यातील अनैतिकतेच्या जाणिवेचा आपल्या मनाला स्पर्श न होऊ देता सहभागी होत असतात.

आपल्या काळात क्वचितच आढळणाऱ्या भेदक अंतर्दृष्टीनं टॉलस्टॉय यांनी राज्याच्या हिंसेचं विश्लेषण केलं. तिचा व्याप आणि त्यासाठी अवलंबिण्यात येत असलेली संमोहित करणारी कारणं, लाचलुचपत, दहशत व सैन्यशक्तीचा उपयोग या चौपदरी कार्यपद्धतीचा उपयोग करून शासन सर्व बाह्य धोक्यांपासून स्वतःला सुरक्षित करून घेते आणि लोकांना स्वतःच्या गुलामगिरीला मान्यता द्यायला लावते. शासनाच्या दडपशाहीला विरोध करायच्या क्रांती आणि सांसदीय संघर्ष या दोन्ही पद्धती सारख्याच निरुपयोगी, असमंजसपणाच्या आणि अपायकारक असल्याच्या कारणास्तव टॉलस्टॉय यांनी फेटाळल्या. अन्याय्य शासनाला बळाच्या आधारानं उलथवून त्याच्या जागी बळाचा उपयोग करायची गरज न पडणारं नवीन शासन आणायच्या प्रयत्नाविषयी टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की तो प्रयत्न फारसा आशादायी होणार नाही. बळाला बळानं उत्तर देण्यासाठी शासन पुरेसं समर्थ असतं. क्रांतिकारकांना त्यात जर अपयश आलं तर क्रांतिकारक आणि अराजकवादी यांच्या हिंसेमुळे आपली संरक्षण शक्ती अजून वाढवण्यासाठी सरकारला निमित्त मिळते. क्रांतिकारकांना त्यात जर यश आलं तर एका हुकुमशाहीची जागा केवळ दुसरी हुकुमशाही घेते व ही दुसरी कदाचित पहिलीहूनही भयानक असण्याची शक्यता असते. टॉलस्टॉयनी इतिहासाचं जे वाचन केलं होतं त्यामुळे टॉलस्टॉयची खात्री पटली होती की कोणत्याही क्रांतीत, मग त्या क्रांतीचं राजकीय स्वरूप काहीही असलं तरी, जनतेचीच हानी होत असते. समाजवादी, साम्यवादी आणि व्यक्तिवादी यांचे एकमेकांशी कितीही मतभेद असले तरी त्यांच्यात एक गोष्ट समान असते - त्यांना जे वाईट आहे असं वाटत असतं त्याचा प्रतिकार करण्यासाठी हिंसेशिवाय दुसरं कोणतंच साधन त्यांच्याजवळ नसतं.

त्यामुळे यापैकी कोणत्याही पक्षाचा विजय झाला तरी त्याला केवळ सर्व हिंसेच्या तत्कालीन पद्धतींचाच वापर करावा लागणार नाही तर आपली सत्ता टिकवण्यासाठी नवीन

पद्धतींचाही शोध घ्यावा लागणार आहे. इतर लोकांना गुलाम करण्यात येईल व त्यांना वेगळ्या गोष्टी करण्यासाठी भाग पाडण्यात येईल, परंतु हिंसा आणि अन्यायाचं स्वरूप तेच असेल वा कदाचित त्याहूनही अधिक क्रूरपणाचं असेल कारण संघर्षामुळे एकमेकांविरुद्धचा द्वेष वाढलेला असेल व दडपशाहीच्या अजून नवीन प्रकारांचा शोध घेण्यात येईल.

क्रांतीचे सर्व प्रयत्न, सर्व कटकारस्थानं व सरकारमधील कल्पना करता येण्यासारखे सर्व बदल ह्या गोष्टींचा विचार करूनही प्रत्येक क्रांतीनंतर असंच घडत आलेलं आहे. प्रत्येक संघर्ष सत्तेत असणारांच्या जुलूम करायच्या साधनांमध्ये भरच घालत असतो. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेज*, पृष्ठ २३४-३५]

साम्यवादी क्रांतीमुळे, जर ती यशस्वी झाली तर, शासनाच्या हस्तक्षेपापासून आतापर्यंत मुक्त असलेल्या मानवी जीवनाच्या क्षेत्रातही हस्तक्षेप केला जाईल. ते क्षेत्र म्हणजे खाजगी जीवन आणि मजुरी. टॉलस्टॉय म्हणाले की 'साम्यवादी आणि समाजवादी यांच्या प्रयत्नामुळे आता याही क्षेत्रात *हळूहळू हस्तक्षेप सुरू झाला आहे, जेणे करून मजूर आणि मनोरंजन, घरं, पोषाख आणि अन्न ह्या सर्व गोष्टी (क्रांतिकारकांची आशा जर पूर्ण झाली तर) कशा असाव्या ते हळूहळू शासन सांगेल व त्यानुसार शासन त्यांची वाटणी करेल.* [वरीलप्रमाणे, पृष्ठ २३५]

सामाजिक जीवन संकल्पना असलेल्या लोकांसाठी अशा प्रकारच्या निराशाजनक परिस्थितीतून निसटायचा कोणताच मार्ग नाही आणि नव्हताही. त्यांना अन्यायाचा, विषमतेचा, वर्गावर्गातील भेदांचा, आणि अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेतील क्रौर्याचा तिरस्कार होता परंतु या सर्व गोष्टींपासून मुक्त होण्यासारखी मनःस्थिती ते बनवू शकले नाही कारण ती त्यांना मदत करत होती. त्यांचं म्हणणं असायचं की इतर सर्व असं करतील तर आम्हीही हे सर्व त्यागायला तयार आहोत. परंतु एकाच व्यक्तीनं असं करून काही लाभ नाही. तसं केल्यास कुणाचाही फायदा तर होणारच नाही परंतु या सर्वांचा त्याग करणाराला त्रास मात्र होईल.

सामाजिक संकल्पना असणाऱ्या माणसाचा सर्वश्रेष्ठ हेतू त्याचं वैयक्तिक कल्याण असल्यामुळे तो याहून वेगळं काही करूही शकत नाही. 'त्याच्या व्यक्तिमत्वामुळे त्याला यासमोर शरण जाणं उचित वाटतं आणि तसा तो शरण जातोही.... त्याच्याजवळ असं कोणतंही तत्त्वज्ञान नसतं की ज्याच्या आधारे तो एकट्यानं हिंसेचा प्रतिकार करू शकतो. आणि जे सत्तेत असतात ते या कामासाठी इतरांबरोबर त्याला येऊ देऊ शकत नाहीत.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २४७] शासनाच्या विरोधात उभं राहण्यासाठी व त्याच्या अधिकाराचा प्रतिकार करण्यासाठी माणसाजवळ असं काही तरी असलं पाहिजे की जे त्यागायची त्याची कोणत्याही अवस्थेत तयारी नसेल. उच्च जीवनसंकल्पनेचा स्वीकार केल्यामुळेच मुक्ती शक्य आहे. तिचा स्वीकार करणारांना तर ती मुक्त करीलच पण त्याचबरोबर जगाचीही बाह्य सत्तेपासून ती मुक्ती करील.

माणसाला केवळ कळायला पाहिजे..... की त्याचं जीवन केवळ त्याचं स्वतःचं, त्याच्या कुटुंबाचं वा राज्याचं नाही तर ज्यानं त्याला या जगात पाठवलं आहे त्याचं आहे व त्यामुळे त्याच्यावर स्वतःच्या व्यक्तिमत्वाच्या, कुटुंबाच्या वा राज्याच्या नियमांचं पालन करायची जबाबदारी नाही तर ज्याच्यापासून तो या जगात आला आहे केवळ त्याच्या चिरंतन कायद्यालाच तो जबाबदार आहे. आणि हे कळताच त्याला सर्व मानवी सत्तांपासून आपण पूर्णपणे स्वतंत्र असल्याचं जाणवेल, एवढंच नाही तर त्याला अडवायची कुणातही शक्ती असल्याचंही तो मान्य करणार नाही.

परंतु यासाठी आपल्या आयुष्याचा हेतू ईश्वरी इच्छेची परिपूर्ती करणं आहे हे माणसाला कळायला पाहिजे आणि मग तो कायदा त्याच्यावर आपलं आधिपत्य गाजवील आणि त्याच्यावर अधिकार गाजवणाऱ्या वा त्याला अडवणाऱ्या इतर सर्व कायद्यांचीही तो जागा घेईल. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २५१]

अशा प्रकारचा प्रेमाचा कायदा सर्वांच्या आत्म्यांत रुजलेला आहे असा माणसाला विश्वास असेल व तोच त्याचा मार्गदर्शक असेल. त्याचा छळ होऊ शकेल, त्याला तुरुंगात टाकलं जाऊ

शकेल, त्याची सर्व भौतिक संपत्ती हिरावून घेण्यात येऊ शकेल. परंतु शारीरिक यातना वा बाह्य अपायांची भीती विवेकबुद्धीच्या विरोधातील कृती करायला त्याला बाध्य करू शकणार नाहीत. वेगळ्या प्रकारची जीवनसंकल्पना त्याच्या अंतःकरणात रुजल्यानंतर या गोष्टींना घाबरण्याऐवजी त्या 'हानीचं वा यातनेचं अथवा हानी वा यातना द्यायच्या धमकीचं' तो स्वागत करील. त्याला माहीत असते की आपण ईश्वराच्या इच्छेची परिपूर्ती करत आहोत व त्यामुळे आपल्या खऱ्या कल्याणाला हे बाह्य सत्ताधारी कोणत्याही प्रकारचा धक्का लावू शकत नाहीत. त्यांच्या अशा वर्तनामुळे त्याच्या कल्याणात ते भरच घालत असतात. उलटपक्षी सामाजिक संकल्पनेच्या माणसासमोर अशा प्रकारच्या धमकीसमोर नमण्याखेरीज दुसरा कोणताच उपाय शिल्लक राहत नाही. 'उच्च जीवनसंकल्पना असणाऱ्या माणसाजवळ दैवी तत्त्व असल्यामुळे त्याच्यावर कोणत्याही बाह्य परिस्थितीचा परिणाम होत नाही. तिच्यावर जे अवलंबून असतात त्यांना ती कधीच दूर लोटत नाहीत.

सामाजिक जीवन संकल्पना असणाऱ्या लोकांची तुलना टॉलस्टॉय यांनी मधमाशांशी केली. मधमाश्यांचं घरटं झाडावर लटकलेलं असतं व त्या घरट्याचं ठिकाण कोणतीही एक मधमाशी बदलवू शकत नाही. कारण त्या सर्व मधमाशा एकमेकांमध्ये गुंतलेल्या असतात व कुणाही एकट्या मधमाशीत ते घरटं हलवायचं सामर्थ्य नसतं. जेव्हा एखादी मधमाशी पंख फडफडवून दुसरीकडे जायचा निर्णय घेईल व तिच्यामागे एक आणि नंतर अजून एक आणि अजून एक अशा मधमाशा जातील तेव्हाच त्या घरट्याची जागा बदलली जाऊ शकते. गरज असते ते एका ठिकाणी स्थायी झालेल्या मधमाशांच्या थव्याचं उडणाऱ्या मधमाशांच्या थव्यात रुपांतर करणाऱ्या एका मधमाशीची.' अशाच प्रकारे सामाजिक जीवनाच्या या चक्रव्यू हाचा भेद करण्यासाठी एकाच माणसानं ख्रिश्चन दृष्टिकोनाचा स्वीकार करायची आणि त्यानुसार आपल्या जीवनात परिवर्तन करायची गरज आहे. त्यांनंतर इतर लोक आपसुखंच त्याच्या पावलावर पाऊल टाकतील.

परंतु यावर आक्षेप घेण्यात आला की तुमची पद्धत अतिशय संथ आहे. समुदायाची मुक्ती प्रत्येक व्यक्तीनं आपल्या जीवन मार्गात आपल्या अंतरीच्या प्रकाशाप्रमाणे बदल केल्यामुळे होणार नाही तर आकस्मिक उद्रेक होऊन हिंसक मार्गाने समाजाची पुनर्रचना केल्यामुळेच समुदायाची मुक्ती होऊ शकेल असं या वर्गाचं म्हणणं असतं. ज्या ठिकाणी समाजाला जायचं आहे त्या ठिकाणी जाण्यासाठी कोणत्याही व्यक्तीनं जागेवरून हालायचाही प्रयत्न करू नये आणि त्या सर्वांना एखादी जादूची चटई एकदमच उडवत तिकडे घेऊन जाईल असं म्हणण्यासारखा हा युक्तिवाद आहे असं टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं. वा उपमा बदलून सांगायचं झालं तर विस्तव पेटवण्यासाठी कोणीच काडी न पेटवता विशिष्ट पद्धतीनं केवळ कोळशाचा ढीग लावला की विस्तव पेटेल असं म्हणण्यासारखं हे होतं. अशा प्रकारच्या हास्यास्पद गृहीतकावर विसंबून ज्या आर्थिक सिद्धान्ताची बांधणी करण्यात आली आहे तो थोडक्यात असा आहे: जेवढं वाईट तेवढं बरं. जेवढी परिस्थिती वाईट होईल तेवढं भविष्य चांगलं राहील.' व्यक्तीनं आपल्या बाजूनं परिस्थितीत सुधारणा करायचा प्रयत्न अनावश्यकच नाही तर हानिकारकही आहे. भांडवलाचं केंद्रीकरण आणि कामगारांची पिळवणूक यात जेवढी वाढ होईल तेवढीच मुक्ती त्यांच्याजवळ येईल. त्यामुळे त्यांच्या व्यथा दूर करण्यासाठी करण्यात आलेल्या कोणत्याही वैयक्तिक प्रयत्नामुळे येणाऱ्या नवीन सहस्रकाची चाकं मागे फिरवली जातील. या सिद्धान्तानुसार आंतरराष्ट्रीय राजकारणातही सैन्य आणि मरणाचं तांडव उभं करायचं सामर्थ्य असलेल्या यंत्रणेत तीव्र गतीनं होणारी वाढ अतिशय स्वागतार्ह गोष्टच ठरते कारण त्यामुळे निःशस्त्रीकरणाची गती तीव्र होते. शासनाच्या संबंधात घोषित करण्यात आलं होतं की शासनाचा अधिकार जेवढा अधिक तेवढं चांगलं. त्यामुळे खाजगी जीवनाच्या क्षेत्रातही त्याच्या हस्तक्षेपाची मागणी करण्यात यावी. वेगळ्या शब्दात ज्या दुःखात लोक कण्हत आहेत त्यातून मुक्त होण्यासाठी त्यांनी त्याचं सत्तेवर विसंबून राहायला पाहिजे जी त्यांच्या दुःखासाठी कारणीभूत आहे व आपल्या दुःखातून मुक्त होण्यासाठी त्या सत्तेची शक्ती वाढवून तिच्या आज्ञांचं

पालन करायला पाहिजे. त्यातील आश्चर्याचा भाग हा होता की या प्रचारामुळे फायदा होणारे सत्ताधारीच हा प्रचार करत नव्हते तर स्वतःला स्वातंत्र्याचे पाईक समजणारे समाजवादीही हाच प्रचार करत होते.

माणूस ज्या गोष्टीकडे जाण्यासाठी धडपडत आहे त्यात अडथळा आणणारी मानवी चुकांमधील सर्वात मोठी चूक ही आहे. आपल्या ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी माणसं विविध प्रकारच्या अनेक गोष्टी करतात परंतु प्रत्येकाच्या आटोक्यात असणारी अगदी साधी आणि सरळ असणारी गोष्ट मात्र करत नाहीत. ज्या परिस्थितीच्या दडपणाखाली ते दबून गेलेले असतात तिच्यातून मुक्त होण्यासाठी अतिशय कावेबाजपणाच्या साधनांचा ते अवलंब करतात परंतु ती परिस्थिती ज्या कारणामुळे निर्माण झाली ती कारणं निर्माण करायला हातभार लावायचा नाही एवढं मात्र ते ठरवत नाहीत. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २५८]

याशिवाय उदारमतवादीही होते. ते 'आस्ते कदमचा' पुरस्कार करत होते. म्हणजे ज्या अन्याय्य सरकारच्या विरोधात त्यांनी आपला लढा उभारलेला आहे त्या सरकारनं जे काही कायदे केलेले असतील त्याच कायद्यांच्या आधारानं एकएक करून 'घटनात्मक अधिकार मिळवायच्या मार्गाचा पुरस्कार हे उदारमतवादी करत होते.' [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अल्मेर मॉड, पृष्ठ १९५] ही पद्धत निरुपयोगी आणि अविवेकीपणाची होती कारण ज्या सरकारच्या पकडीत संपूर्ण सत्ता असते व ज्यांच्या आदेशांचं पालन सर्व प्रजा करत असते व मार्गदर्शनाप्रमाणे चालत असते ते सरकार आपल्याच अस्तित्वाला धोका निर्माण होईल अशी गोष्ट कधीच करणार नाही. परंतु प्रामाणिक माणसांनी सरकारशी केलेल्या सहकार्यामुळे त्या सरकारला अशी प्रतिष्ठा मिळते की जी शासनाचं घटक असलेल्या 'हिंसक, स्वार्थी आणि लांगुलचालन करणाऱ्या' लोकांमुळे सरकारला मिळू शकत नाही. [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अल्मेर मॉड, पृष्ठ १९७] यामुळे ही गोष्ट अजूनच अपायकारक होते. 'अतिशय सुजाण आणि प्रामाणिक असणाऱ्या या माणसांना' कार्यरत राहता यावं म्हणून तडजोड करणं भाग पडतं आणि न कळत त्यांचा विश्वास बसू लागतो

की 'चांगल्या ध्येयासाठी माणसाला एखाद्या वेळी बोलण्यात वा वर्तनात थोडाबहुत सत्याचा त्याग करावा लागू शकतो.' माणूस एकदा या घसरगुंडीच्या मार्गाला लागला की मग थांबायला कोणताच मार्ग उरत नाही. 'सदसद्विवेकबुद्धीच्या मागणीपासून अजून आणि अजून दूरवर घसरत जात' *ते शासनावर पूर्णपणे अवलंबून राहायच्या परिस्थितीत सापडतात. त्यांना शासनाकडून पारितोषकं आणि पगार यांचा रतीब सुरू असतो व ते या संभ्रमात मग्न राहतात की आपण उदारमतवादी विचारांना पुढं नेत आहोत. असं करत करत ते त्या शासनाचे नम्र सेवक आणि पुरस्कर्ते होतात ज्याच्या विरोधात त्यांनी संघर्षाला सुरुवात केलेली असते.* [वरीलप्रमाणे, पृष्ठ १९९]

यामुळे जी राजकीय हानी होते त्याहूनही अधिक नैतिक हानी होते. शासनाच्या उच्च अधिकारी वर्गाकडून मान्यता मिळून आणि कनिष्ठ अधिकारी वर्गाकडून हिंसा तेव्हाच अमलात आणल्या जाऊ शकते जेव्हा वरिष्ठ आणि कनिष्ठ वर्गांच्या सदसद्विवेकबुद्धीला क्रमशः स्वयंसूचनेद्वारे आणि संमोहनाद्वारे गुंगी आलेली असते. परिणामी हिंसेला मान्यता देणाऱ्या लोकांना असं केल्यामुळे आपण इतरांना काय करायला लावतो आहोत याविषयीची वैयक्तिक जबाबदारी जाणवत नाही. आणि जे लोक त्यांच्या आज्ञेचं पालन करतात त्यांचा असा समज असतो की वरिष्ठ वर्गाच्या आज्ञेचं पालन करणं आपलं कर्तव्य आहे. दोघांचाही समज झालेला असतो की आपण सामान्य माणसं नसून विशेष माणसं आहोत आणि 'आपल्याला सामान्य कर्तव्य पार पाडायची नाहीत तर ज्या वर्गात आपण आहोत त्या वर्गाच्या विशेष कर्तव्यांचं आपल्याला पालन करायचं आहे.' लोकांना आपल्या वर्तनाच्या परिणामाची कल्पना येऊ शकत नाही आणि त्यांना देण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे ते केवळ वागत राहतात. अशा प्रकारची विकृत परिस्थिती तोपर्यंतच कायम राहू शकते जोपर्यंत जनमताला पूर्णपणे शिस्तीत बांधून ठेवण्यात आलेलं असतं. परंतु अपरिहार्यपणे अशी एक अवस्था येते की जेव्हा 'काही थोड्याशा लोकांना कळलेल्या सत्याची माहिती इतर लोकात पसरते. असं झालं की सत्ताधारी वर्ग अचूक असल्याबद्दलचा जो विश्वास लोकांच्या मनात निर्माण करण्यात आलेला असतो त्याच्या

अचूकतेबद्दल त्यांच्या लोकांच्या मनात शंका निर्माण व्हायला सुरुवात होते. अशा प्रसंगी थोडेसे लोक जरी धैर्यानं बाहेर आले, सत्ताधाऱ्यांच्या मागण्यांबद्दलचं आपलं मत व्यक्त करून त्यानुसार वर्तन करू लागले तर त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी निर्माण केलेल्या भ्रमाच्या आणि भीतीच्या 'वातावरणात ते काम करत असल्याचं त्यांच्या लक्षात येईल व मग ते तसं काम करायला तयार होणार नाहीत.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड एज वुइदिन यू*, अनु. ए. डेलानो, पृष्ठ ३४१] टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की यासाठी जागतिक वातावरण तयार झालेलं आहे. चांगली माणसं जेव्हा हिंसा आणि खून करण्यात पुढाकार घ्यायची आणि तसं करताना त्यांच्या वर्तनाच्या चांगुलपणाविषयी संशय न घेतला जाण्याची वा प्रश्न न उपस्थित होण्याची वा त्यांना पश्चात्ताप न होण्याची वेळ आता निघून गेली आहे. 'त्यांना माहीत आहे की आपण डोळे मिटून आपल्या विवेकबुद्धीला गप्प बसवू शकतो परंतु ज्या लोकांना अशा प्रकारचं जुलमी वर्तन करावं लागतं वा ज्यांना अशा प्रकारच्या वर्तनाचा आदेश द्यावा लागतो ते त्या वर्तनामुळे होणाऱ्या परिणामांकडे आता दुर्लक्ष करू शकत नाहीत.' त्यामुळे आता प्रत्येक गोष्ट लोकांमध्ये ही जाणीव विकसित होण्यावर अवलंबून आहे. 'काही वेळेसाठी सदसद्विवेकबुद्धी झोपलेली असू शकते, परंतु ती मेलेली नाही आणि स्वयंसूचन आणि सूचन अजूनही तिच्या कानात कुजबुजत असले तरी काही वेळात ती जागृत झाल्याशिवाय राहणार नाही.

परंतु उदारमतवाद्यांचं म्हणणं होतं की सत्यावर आधारित कोणतंही वैयक्तिक वर्तन जर प्रस्थापित व्यवस्थेशी सुसंगत नसेल तर ते अपायकारक होतं कारण 'त्यामुळे शासनाकडून विरोधाची प्रतिक्रिया निर्माण होते व समाजोपयोगी असलेलं ते कार्य व्यक्तीला पुढं सुरू ठेवणे कठीण होते.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३४२] उदारमतवाद्यांचं असंही म्हणणं होतं की ज्या माणसाला जगाची सेवा करायची असते व आपल्यासारख्या लोकांच्या परिस्थितीत सुधारणा करायची असते त्याचं मुख्य कार्य 'सत्याची शिकवणूक देणं आणि त्यानुसार वागणं' नसून समाजवादी विचाराचा जगात प्रसार करणं, 'शासनाची सेवा करून' समाजाच्या घडणीला किंचितही धक्का न लावता

'त्याच्या कार्यात उदारमतवादी आणि प्रगतिशील तत्त्वांचा प्रवेश करायचा प्रयत्न करणं आहे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३४२-४३] या सोयिस्कर सिद्धान्तानुसार माणसाचा ज्यावर विश्वास आहे

'त्यानुसार वागायची वा कमीतकमी त्या तत्त्वांच्या विरोधी वर्तन न करायची आवश्यकता नव्हती.' जे शासन पापी आहे असा विश्वास असूनही एखादा त्या शासनाची नोकरी सुरू ठेवू शकतो, एवढंच नाही तर त्याच्या अधिकारात वाढ व्हायलाही मदत करू शकतो; भांडवलशाही वाईट आहे असं वाटत असूनही तिचे फायदे उपटू शकतो; न्यायप्रक्रियेत कायदेपंडित, वकील, न्यायाधीश, पंच म्हणून भाग घेऊ शकतो एवढंच नाही तर 'खोटंही बोलू शकतो' वा बदमाशासारखा वागू शकतो; थोडक्यात या सिद्धान्तानुसार 'एखादा जमीनदार, व्यापारी, कारखानदार, न्यायाधीश राहू शकतो, सरकारी नोकर म्हणून सैनिकाचं, अधिकाऱ्याचं काम करू शकतो आणि त्याच वेळी मानवतावादी, समाजवादी आणि क्रांतिकारीही राहू शकतो.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३४३]

दांभिकपणाची ही सीमा होती व उघडपणे सर्वत्र वाईट पाहण्यापेक्षाही ही गोष्ट अधिक घातक होती. ज्या माणसांनी सत्य माहीत नसल्यामुळे वाईट वर्तन केलं होतं त्या माणसांनी केवळ स्वतःचीच आणि त्या वाईट वर्तनानं प्रभावित होणारांचीच हानी केली होती, परंतु ज्या माणसांना चांगलं काय आहे हे माहीत होतं व तरीही ज्यांनी सतत 'दांभिकपणाचा मुखवटा धारण करून' चांगल्या वर्तनाच्या नावाखाली वाईट वर्तन केलं त्यांनी केवळ स्वतःची आणि त्या वाईट वर्तनानं प्रभावित होणारांचीच हानी केली नाही तर त्या दांभिकपणाच्या मुखवट्याखालील वाईट वर्तनामुळे जे हजारो लोक फसले त्यांचीही हानी केली.

चोर, डाकू, खुनी, गुंड वगैरेसारखे जे लोक असं वर्तन करतात की जे वाईट असल्याचं त्यांना आणि इतरांनाही माहीत असतं. वाईट वर्तन कसं असतं हे दाखवण्यासाठी व त्याची घृणा निर्माण करण्यासाठी या वर्तनाचा उपयोग होतो. परंतु जे लोक चोरी करतात, डाका घालतात, लोकांचा छळ आणि खून करतात व स्वतःचं समर्थन धार्मिक, वैज्ञानिक वगैरेसारख्या कारणांनी

आजचे जमीन मालक, व्यापारी, कारखानदार व आजचे सरकारी नोकर वगैरेप्रमाणे करतात ते लोक त्यांच्या अपकृत्याला बळी पडणारांचीच हानी करत नाहीत तर त्यांच्यामुळे प्रभावित होऊन चांगलं वाईट यातील भेद कळायची क्षमता गमावलेल्या हजारोलाखो लोकांचीही हानी करतात.

यापैकी कोणत्याही मार्गानं संपत्ती मिळवायला समाजातील नेत्याकडून परवानगीच नाही तर मान्यताही मिळते आणि त्याहीपलीकडे दानशूरपणाद्वारे तिला प्रतिष्ठितपणाचा आधारही देण्यात येतो. लक्षावधी चोऱ्या, भ्रष्टाचार, डाके व देशातील कायद्यांविरुद्ध करण्यात आलेल्या अपराधांमुळे जेवढं मनोधैर्य खचतं त्यापेक्षा लक्षावधी लोकांचं मनोधैर्य यामुळे अधिक खचतं. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३५१-५२]

जोपर्यंत लोक स्वतःपासूनच सत्य लपवणं सुरू ठेवतात तोपर्यंत वा 'सत्य हेच असं बंधन आहे की जे मानवजातीला एकत्र ठेवू शकते' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३४९]

आणि त्याच्या आज्ञेत राहणं व त्यानुसार आचरण करणं यापेक्षा मानवजातीसाठी दुसरी कोणतीच महत्त्वाची गोष्ट नाही याची जाणीव ठेवत नाहीत [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३५०] तोपर्यंत मानवजातीत कोणतीही सुधारणा शक्य नाही. टॉलस्टॉय म्हणाले की केवळ हिंसेच्या माध्यमातूनच शक्य असलेलं जीवन जगत असताना लोकांची शासनाच्या हिंसेपासून आणि अन्यायापासून मुक्तता होऊ शकेल असा विचार करणं फार मोठा भ्रम आहे. राज्याच्या हिंसेवर आधारित सर्व कृत्यात भाग घ्यायला नकार देऊन वा अशा प्रकारच्या सहभागामुळे मिळणाऱ्या लाभाचा स्वीकार करायला नकार देऊनच राज्याच्या हिंसेपासून मुक्ती शक्य आहे. सर्व मानवजातीनं पर्वतावरील प्रवचनात सांगितलेल्या येशूच्या खऱ्या शिकवणुकीनुसार आचरण करायचा निर्धार केला तर सरकारची गरजही उरणार नाही आणि सरकार अस्तित्वात राहणं शक्यही होणार नाही. कारण ही अशी गोष्ट आहे की जिच्यासमोर कोणतंही सरकार झुकू शकत नाही. बाह्य शत्रूशी कसं लढायचं ते सरकारला माहीत असतं. परंतु जी माणसं शासनाशी झगडायलाही तयार नसतात आणि त्यांच्या राजकीय हिंसेत सदसद्विवेकबुद्धीच्या वा धार्मिक

कारणासाठी सहभागी व्हायलाही तयार नसतात त्यांच्याशी कसं झगडावं हे मात्र शासनाला माहीत नसतं. सरकारचा पाया कोणत्याही प्रकारचा संघर्ष न करता ते आतून खिळखिळा करतात व त्यांना शिक्षा करायचा अर्थ ज्या कारणासाठी त्यांनी शासनाशी सहकार्य करायला नकार दिलेला असतो त्या कारणाची लागण सर्वत्र करायला मदत करणं असा होत असतो. हेच कारण आहे की समाजवादी, साम्यवादी आणि अराजकवादी यांच्या बॉम्बना शासन जेवढं घाबरत नाही तेवढं या लोकांना शासन घाबरते.

१६

समाजाला ग्रासणाऱ्या हिंसेपासून आणि अन्यायापासून सुटका करून घेण्यासाठी ख्रिश्चन अराज्यवादाचा आणि राज्याशी अहिंसक असहकार्याचा आपला सिद्धान्त मांडताना टॉलस्टॉय यांनी कल्पना करता येण्यासारख्या एकाही प्रश्नाला अनुत्तरित ठेवलं नाही. तेव्हाच्या व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांचं म्हणणं होतं की जोपर्यंत सर्व राष्ट्र आणि राष्ट्रांमधील सर्व लोक अहिंसक होत नाहीत व समाजात वाईट माणसं शिल्लक आहेत तोपर्यंत सामाजिक जीवनाचा एक भाग म्हणून दुष्ट लोकांच्या छळापासून चांगल्या लोकांना वाचवण्यासाठी राज्याची आवश्यकता आहे. टॉलस्टॉय म्हणाले की या युक्तिवादात गृहीत धरण्यात आलेलं आहे की जे लोक सत्तेत आहेत ते चांगले आहेत आणि हिंसेचा प्रतिकार करण्यासाठी प्रतीहिंसेशिवाय दुसरा कोणताच उपाय नाही. ही दोन्हीही गृहीतकं खोटी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे सत्ता मिळवण्यासाठी सत्तेविषयी म्हणजे हिंसेविषयी प्रेम वाटायला पाहिजे. परंतु हिंसा तर दैवीसंपत्तीचा म्हणजे नैतिक संपत्तीच्या अगदी विरोधी आहे. त्यामुळे तिच्या व्याख्येनुसारच जे लोक नैतिकदृष्ट्या कमी प्रतीचे असतात तेच सत्तेचा स्वीकार करतात. 'जास्त दुष्ट असलेले लोकच नेहमी सत्तेत असतात. चांगल्यावर वाईटांनी विजय मिळवून सत्ता बळकावल्याची उदाहरणं इतिहासातून वारंवार वाचायला मिळतील.' दुसरी गोष्ट म्हणजे राज्याच्या प्रतिहिंसेनं हिंसेचा नाश होत नाही उलट त्या हिंसेचा प्रयोग केल्यानंतरही ज्या लोकांनी हिंसेद्वारे सत्ता मिळवलेली असते त्यांच्याच लक्षात हिंसेची

निरुपयोगिता येऊ लागते व ते अजून हिंसा करायला असमर्थ ठरतात. 'समाजातील सर्वोत्कृष्ट घटकानं सत्ता मिळवलेली असते व आपल्या प्रजेला अधिक चांगली प्रजा करण्यासाठी त्यांनी हिंसेचा अवलंब केलेला असतो म्हणून हिंसा संपत नसते तर लोकांच्या अंतःकरणात ख्रिश्चन जीवनपद्धतीनं प्रवेश केलेला असल्यामुळे हिंसा संपत असते.'

सत्ता आपल्याकडे समाजातील सर्वात वाईट घटकांना आकर्षित करून घेत असते. ती मिळवण्यासाठी होणाऱ्या संघर्षातून 'सर्वात वाईट, क्रूरतम आणि किमान ख्रिश्चनत्व असणारे घटक वर येत असतात. परंतु सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धी या ध्येयापर्यंत पोहोचल्यानंतर या लोकांचा भ्रम लवकरच दूर होतो व त्यातील वैय्यर्थ त्यांना कळून येतं.

सत्तेच्या आकर्षणामुळे आणि तिच्या इतर सर्व लाभांमुळे.... तिच्याकडे वळणाऱ्या लोकांना तिच्यासाठी संघर्ष करायचं महत्त्व ती मिळेपर्यंतच वाटत असतं. माणसाच्या पकडीत ती येताच त्यांना त्यांच्या अंतःकरणातील पोकळीची जाणीव व्हायला लागते व दूरवर दिसणारे चित्रासारखे सुंदर ढग आपल्या सभोवती पसरल्यानंतर ज्याप्रमाणे त्यात कुठेच सौंदर्य दिसत नाही त्याप्रमाणे आपल्या हाती सत्ता आल्यानंतर हळूहळू त्यांच्या मनातील तिचं आकर्षण कमी होऊ लागतं. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २५७]

ज्याप्रमाणे साखर कारखान्यात जेव्हा तवा गरम करण्यात येतो तेव्हा बुडबुडे करत मळी वर येत असते परंतु थोड्या वेळानं गाळ खाली बसतो आणि साखरेचा शुद्ध पाक वेगळा दिसू लागतो. हा खालचा गाळ त्यावेळी निरुपद्रवी आणि निरुपयोगी होतो. याचप्रमाणे जे सत्ता वा संपत्तीसाठी संघर्ष करतात आणि 'वैशिष्ट्यानं ज्यांना ती वारसा हक्कानं मिळते' ते लोक कमी हावरट आणि कमी क्रूर होतात.

अनुभवानं शिकल्यानंतर, केव्हा केव्हा एका पिढीत, केव्हा केव्हा अनेक पिढ्यांमध्ये, हिंसेची फळं किती निरर्थक असतात त्याचा लोकांना अनुभव येऊ लागतो, सत्ता आणि संपत्ती

यांच्याद्वारे आलेले दोष दूर करायचा लोक प्रयत्न करतात, आणि ते अधिक मानवी होऊ लागतात, त्यांच्यापेक्षा कमी ख्रिश्चन आणि अधिक क्रूर असलेल्या गर्दीत ते त्यांचं स्थान गमावतात आणि सामाजिक दृष्ट्या जरी ते खालच्या स्थानावर ढकलले जातात तरी नैतिकतेत ते वरच्या पायरीवर जातात व अशा रीतीनं ख्रिश्चनत्वाच्या जाणिवेची एकूण पातळी वाढवतात. परंतु सरळसरळ अधिक वाईट, अधिक गुंड प्रवृत्तीचे आणि कमी ख्रिश्चन असलेले लोक पुढे येतात व त्यांच्या पूर्वसुरींचाच अनुभव त्यांनाही येतो आणि एकदोन पिढ्यांनंतर या लोकांच्याही लक्षात त्यांच्या हिंसक आकांक्षेचं वैय्यर्थ लक्षात येऊ लागतं व त्यांच्या अंतःकरणात ख्रिश्चनत्वाचा प्रवेश होऊ लागतो व तेही जुलूम सहन करणाऱ्या वर्गात येतात. त्यांची जागा मग नवीन जुलूम करणारे घेतात. ते आधीच्या जुलमी लोकांपेक्षा कमी जुलमी असतात. परंतु ज्यांच्यावर ते जुलूम करतात ते त्यांच्यापेक्षा अधिक क्रूर असतात. अशा रीतीनं बाह्यतः सत्ताधीश तसेच राहत असलेले दिसत असले तरी सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक बदलासोबत ख्रिश्चन जीवन तत्त्वाचा अंतःकरणात प्रवेश झालेल्या माणसांची संख्या वाढत असते. ते त्यांच्या प्रजेपेक्षा अधिक घातक अधिक क्रूर असू शकतात परंतु त्यांच्या पूर्वी सत्तेत असलेल्या लोकांपेक्षा ते नेहमीच कमी क्रूर आणि कमी वाईट असतात.

अशा प्रकारे *हिंसा स्वतःचं साधन म्हणून समाजातील सर्वात वाईट वर्गाची निवड करत असते; लोक हळूहळू सभ्य आणि सौम्य होतात आणि चांगले होऊन परत समाजाकडे वळतात.*
[वरीलप्रमाणे, पृष्ठ २५७-५८]

राज्याच्या अधिकाराच्या पुरस्कर्त्यांनी उभा केलेला बागुलबुवा राज्याच्या हिंसेनं दूर होऊ शकला नाही; राज्याची हिंसा हीच मुळात घातक गोष्ट होती. निसर्गनियमाप्रमाणे तिचा विखार हळूहळू कमी होत होता. अधिकात अधिक एवढंच मान्य करता येईल की 'राज्याची हिंसा बंद करण्यात आली तर कदाचित ते लोक हिंसा करतील जे आधी हिंसा करत नव्हते.' परंतु टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की 'माणसांच्या एका गटाकडून दुसऱ्या गटाकडे सत्ता गेल्यामुळे

एकूण हिंसा वाढणार नाही.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेज*, पृष्ठ २९३] तसंच वाईट लोकांचं अस्तित्व कोणत्याही काळात कायम राहणार असल्यामुळे त्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी राज्याला जुलमाचा आधार घ्यावाच लागणार आहे व त्यामुळे राज्य या संस्थेचा कधीच त्याग करता येऊ शकणार नाही हा युक्तिवाद टिकणारा नाही असंही टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं.

असाही युक्तिवाद करण्यात आला होता की जे लोक सत्तेत आहेत ते लोक स्वतः होऊन सत्तात्याग करण्याएवढे पुरेसे ख्रिश्चन झाले व त्यांची जागा घेणारं कोणीच आढळलं नाही तर राज्याची हिंसा संपेल. परंतु असं होण्यासाठी ग्रीकांची कालगणना संपेपर्यंत आपल्याला वाट पाहावी लागेल. टॉलस्टॉय यांनी निदर्शनास आणून दिलं की हा युक्तिवाद विनाकारण असं गृहीत धरतो की एका जीवनसंकल्पनेतून दुसऱ्या जीवनसंकल्पनेत परिवर्तन होत असताना प्रत्येक माणसाचं 'स्वतंत्रपणे आणि अंतर्गत आध्यात्मिक मार्गानं परिवर्तन होतं.' ही प्रक्रिया अपरिहार्यपणे संथ असते. परंतु या प्रक्रियेशिवायही तिला समांतर अशी अजून एक बाह्य प्रक्रिया सतत कार्यरत असते. लोकांना सत्याचं आकलन प्रेषिताच्या अंतर्दृष्टीनं वा वैयक्तिक अनुभवानं काही होत नाही. एकदा सत्य प्रस्थापित झालं की ज्या लोकांना सत्याची 'अनुभूती झालेली असते आणि *आपल्या जीवनात ज्यांनी त्याचं अनुसरण केलेलं असतं*' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ २६०(तिरपी अक्षरं माझी)] त्यांच्यावरील श्रद्धेमुळे जे लोक बौद्धिक दृष्टीनं खालच्या पातळीवर काम करत असतात ते उत्स्फूर्ततेनं ते सत्य मान्य करतात.

अगदी सुरुवातीला लोक नवीन सत्याचा स्वीकार आणि त्याच्या आज्ञेचं पालन 'एकेका पायरीनं' करत असतात. या प्रक्रियेत सत्याचा प्रसार हळूहळू एका विशिष्ट बिंदूवर पोहोचल्यानंतर नवीन सत्याचा स्वीकार 'प्रज्ञेनं नाही, क्रमशःही नाही तर सामान्यपणे एकदम आणि स्वेच्छेनं करण्यात येतो.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २६०]

सामाजिक जीवन संकल्पनेपासून ख्रिश्चन जीवनप्रणालीकडे जाणाऱ्या विकासप्रक्रियेत खालच्या पातळीवर असलेल्या समाजाचा अडथळाच येत असतो असं काही नाही. वादळाच्या प्रत्येक हेलकाव्यानिशी जहाज अस्थिर होऊ नये म्हणून त्याच्या तळात टाकलेल्या वाळूचा जसा उपयोग होतो तसा विकासप्रक्रियेत खालच्या पातळीवर असलेल्या समाजाच्या शैथिल्याचा उपयोग होतो. मानवी अनुभवानं न पारखलेल्या सतत होणाऱ्या सामाजिक परिवर्तनापासून ते शैथिल्य समाजाला वाचवते. त्याचबरोबर मानवी अनुभवाच्या कसोटीला उतरलेल्या सत्याला दीर्घकाळापर्यंत टिकवून ठेवायलाही या शैथिल्याची मदत होते. स्वतःच्या प्रज्ञेनं सत्याची पारख करायची क्षमता नसलेली ही सर्वसामान्य माणसं नेहमीच जनमतानं हेलकावत असतात, कारण जनमतात वेगात पसरायचा आणि जनसमूहाला अतिशय वेगात आपल्याकडे आकर्षित करायचा गुण असतो आणि हे जनमत तयार व्हायला 'शेकडो हजारो वर्ष लागत नसतात.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेज*, पृष्ठ ३०३] एका जीवनपद्धतीकडून दुसऱ्या जीवनपद्धतीची सिद्धी *घटिकायंत्रातून वाळू ज्याप्रमाणे संपेपर्यंत कणकण गळते त्याप्रमाणे.... नाही तर पाण्यात बुडवलेल्या भांड्यात पाणी आधी एका बाजूनं ज्याप्रमाणे हळूहळू शिरते व मग एकदम सर्व बाजूनं शिरते व ते पूर्णपणे भरते त्याप्रमाणे होत असते.* [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ २५९]

याशिवाय असाही युक्तिवाद करण्यात आला होता की जोपर्यंत 'हिंसा करणाऱ्या माणसांनी' माणसं घेरलेली आहेत तोपर्यंत ती हिंसेचा उपयोग करणं बंद करू शकत नाहीत. असं सांगण्यात येतं की जोपर्यंत असंस्कृत राष्ट्रांचा शांततामय राष्ट्रांना धोका कायम आहे तोपर्यंत राज्याचा सर्व वाईटपणा मान्य करूनही त्याला टाकून देणं अशक्य आहे. याला उत्तर देताना टॉलस्टॉय यांनी निदर्शनास आणून दिलं की कोणताही देश दुसऱ्या देशाच्या केवळ हिंसेनं जिंकला जात नाही. 'राष्ट्र आणि वंश हिंसेनं नष्ट केले जाऊ शकतात.... पण शरण आणले जाऊ शकत नाहीत.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २६६] ज्या राष्ट्रातील 'शिक्षण, परंपरा आणि धर्म आक्रमकाच्या

प्रतिकाराला गौरवान्वित करत असतात व स्वातंत्र्यप्रेमाला सर्वात मोठा गुण मानतात' त्या राष्ट्रावर हिंसेद्वारे गुलामगिरी लादली गेल्याचं. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २६६] अथवा अशा राष्ट्राला असंस्कृत राष्ट्रानं जिंकल्यामुळे जित राष्ट्राच्या जीवनपद्धतीत फरक पडल्याचं इतिहासात एकही उदाहरण नाही. जेव्हा केव्हा 'विजेते जितांपेक्षा संस्कृतीच्या खालच्या पातळीवर असतात तेव्हा ते नेहमीच जितांच्या सवयी आणि परंपरांचं अनुकरण करतात.'[वरीलप्रमाणे, पृष्ठ २६५] ग्रीसवर विजय मिळवणाऱ्या रोमन विजेत्यांना ग्रीसनं आपलं गुलाम बनवलं नव्हतं काय? उलटपक्षी जेव्हा केव्हा जित लोक विजेत्यांच्या धर्माचा स्वीकार करून 'मुसलमान वा ख्रिश्चन होतात' तेव्हा सत्ताधारी त्यांना असं करायला भाग पाडतात म्हणून ते असं करत नसतात तर ('हिंसा बहुधा अगदी विरुद्ध परिणाम करते') स्वतःच्या धर्माबद्दल असमाधानी असल्यामुळे वा त्यावर श्रद्धा नसल्यामुळे ते तसं करत असतात. त्यांनी स्वीकारलेल्या धर्माकडे वा त्यावर आधारित जीवनपद्धतीकडे अपरिहार्यपणे ते आकर्षित होत असतात. ज्या गोष्टीचा आपल्या धर्मात अभाव आहे असं काही कारणानं त्यांना वाटत असतं व ती गोष्ट ते स्वीकारत असलेल्या धर्मात आहे अशी त्यांची भावना असते.

तथाकथित मागासलेल्या 'असंस्कृत' राष्ट्रांपर्यंतच रानटीपणा मर्यादित असतो असं नाही; प्रगत राष्ट्रही रानटी आणि कदाचित अधिक रानटी असू शकतात. डहोमीच्या झुलूंकडून वा त्यांच्याप्रमाणेच 'दूरवर राहणाऱ्या लोकांडून, आपल्यावर हल्ला करायचा अगदीच हेतू नसलेल्या लोकांकडून आपल्यावर हल्ला व्हायचा धोका आहे असं म्हणणं हा थिल्लरपणा आहे; अथवा काही हजार दुराचारी, चोर आणि खुनी लोकांमुळे - ज्यांच्या नीतिभ्रष्टतेत आपलाही हात आहे व न्यायालयं, तुरुंग आणि शिक्षा आदींचा एवढा सर्व खटाटोप करूनही ज्यांची संख्या कमी करण्यात आपल्याला यश आलेलं नाही - आपल्यावर हल्ला व्हायचा धोका आहे असं म्हणणं मूर्खपणा आहे.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ २६९] सध्याची व्यवस्था बळामुळे टिकलेली नसून जनमतामुळे टिकलेली आहे. 'सर्वसामान्य परंपरांचा ज्याला पाठिंबा असतो त्याला हिंसा कधीच दाबू शकत

नाही.' परंपरागत हाडवैर दाबण्यासाठी आणि द्वंद्वयुद्धाची पद्धत बंद करण्यासाठी कठोरतम शिक्षेची योजना करण्यात येऊनही काही देशांना आलेलं अपयश हे याचंच उदाहरण आहे. 'हिंसेबद्दल जर जनमत नाराजी दाखवील तर ते हिंसेचं सर्व सामर्थ्य खच्ची करून टाकेल.' त्यामुळे शासनव्यवस्था संपवल्यामुळे व तिच्या जागी जनमताचं नैतिक दडपण आणल्यामुळे लोकांना समाजविरोधी तत्त्वांपासून बचाव करण्यासाठी काहीच आधार राहणार नाही व ते असहाय होतील असं सध्याच्या सामाजिक व्यवस्थेचे पुरस्कर्ते जेव्हा सांगतात तेव्हा ते 'आत्मवंचना' करत असतात. हिंसा लोकांना संरक्षण देण्याऐवजी 'त्यांच्या सुटकेचा एकमेव मार्ग असलेल्या येशूच्या शिकवणुकीचा अवलंब करण्यापासून व त्याचा प्रसार करण्यापासून अडवते.' अशा रीतीनं लोकांना ज्या गोष्टींना पाठिंबा द्यायचा असतो त्यांनाच ती दुर्बल करायचं आणि नष्ट करायचं काम करते. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २६८]

सध्याची व्यवस्था नष्ट झाल्यानंतर आम्हांला कोणतं संरक्षण राहील असं काही लोकांनी विचारलं. सध्या आम्ही ज्या नियमांतर्गत राहत आहोत त्यांची जागा कोणते नियम घेतील? नवीन व्यवस्थेत आपलं जीवन कसं राहील हे कळल्याशिवाय कोणतंही पुढचं पाऊल उचलायची आमची तयारी नाही असं ते लोक म्हणाले.

यावर टॉलस्टॉय यांचं उत्तर असं होतं :

नवीन व्यवस्थेत काय परिस्थिती असेल ते आम्हांला माहीत नाही, कारण त्यासाठी आम्हांला स्वतःला कष्ट करायचे आहेत. जे लपलेलं आहे ते शोधून काढणं आणि नंतर नवीन मिळालेल्या ज्ञानानुसार आपल्या जीवनाला आकार देणं हा जीवनाचा अर्थ आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २७१]

भविष्य अंधुक आहे म्हणून अस्तित्वात असलेल्या घातक परिस्थितीतून सुटका करून घेण्याकरिता प्रयत्न करण्यासाठी घाबरणाऱ्या लोकांचं वर्तन 'बुडू लागलेल्या बोटीतील उतारूंनी केबीनमध्ये गर्दी करावी आणि किनाऱ्यावर घेऊन जायला आलेल्या बोटीत बसायची हिंमत

नसल्यामुळे केबीनमधून बाहेर पडायला त्यांनी नकार द्यावा' अथवा 'शेतातील गोठ्याला आग लागल्यामुळे शेळ्यांनी गोठ्यातील एका कोपऱ्यात गोळा व्हावं आणि बाहेर पडायचं दार उघडं दिसत असतानाही त्यातून बाहेर पडू नये' याप्रमाणे हे होईल. [वरीलप्रमाणे, पृष्ठ २६९]

अखेरचा आक्षेप असा घेण्यात आला की येशूच्या शिकवणुकीचं अनुसरण करणं अशक्य आहे कारण त्याचं पूर्णार्थानं अनुसरण केल्यास जीवनच नष्ट होईल. टॉलस्टॉय यांनी उत्तर दिलं की वर्तनविषयक नियमांच्या परिपूर्ण अवस्थेविषयीच्या गैरसमजामुळे येशूची शिकवणुकीतील अव्यवहार्यता जाणवते. सत्यशोधकाला मार्गदर्शन करायच्या दोन पद्धती आहेत. एका पद्धतीत रस्त्याच्या आजुबाजूच्या खुणा मार्गदर्शनासाठी सांगण्यात येतात. दुसऱ्या पद्धतीत त्याच्याजवळ असलेल्या दिशादर्शकाधारे दिशाज्ञान करून देण्यात आलेलं असतं. त्या 'दिशादर्शकावर त्याला केवळ एकच दिशा दिसत असते व नंतर परिस्थितीप्रमाणे त्यात तो बदल करतो.' पहिली पद्धत ही नैतिकतेचा उपचार सांगणारी पद्धत आहे व तिच्यात 'हे करा' व 'ते करू नका' असे नियम सांगितलेले असतात. दुसरी पद्धत 'परिपूर्णतेकडे निर्देश करत असते. तिथं माणूस कधीही पोहोचू शकत नाहीं' परंतु तरीही तो अविचलपणे आणि जाणीवपूर्वक तिथं पोहोचायचा प्रयत्न करत असतो. 'त्याच्यासमोर एक आदर्श ठेवण्यात आलेला असतो व तो जेव्हा केव्हा योग्य मार्गापासून विचलित होतो तेव्हा तो त्यापासून किती विचलित झाला ते सांगत असतो.' कायद्याच्या मागणीनुसार वर्तनविषयक नियम ठरत असतात व त्याप्रमाणे प्रत्येकाला पूर्णपणे वागावंच लागतं व तसं न वागल्यास शिक्षेचा धोका पत्करावा लागतो. येशूची शिकवण माणसासमोर अनंत परिपूर्णतेचा आदर्श ठेवते व सर्व लोकांच्या काहीही सीमा असल्या तरी ती परिपूर्णता प्राप्त करावीशी वाटणं स्वाभाविक असते, ह्या 'ध्येयाप्रत पोहोचायचा अथक व सतत वाढता प्रयत्न करणं' ही गोष्ट ही अट पूर्ण करायची कसोटी आहे.

जो माणूस बाह्य नियम मान्य करतो त्याची तुलना टॉलस्टॉय यांनी खांबावर लावलेल्या दिव्याच्या प्रकाशात उभा असलेल्या माणसाशी केली. 'तो आपल्या दिव्याच्या प्रकाशात उभा

असतो व त्याच्या आजुबाजूलाही प्रकाश असतो परंतु पुढं जायला त्याला कोणतीच जागा नसते.' परंतु ज्या माणसानं येशूच्या शिकवणुकीचा स्वीकार केलेला असतो तो माणूस 'आपल्यापुढे काठीला बांधून दिवा घेऊन चाललेल्या माणसासारखा असतो; त्याच्यासमोर नेहमी दिवा असतो आणि तो चालत असलेला मार्ग तो दिवा पुढेपुढे प्रकाशित करीत जात असल्यामुळे त्या माणसाला पुढं जाण्यासाठी सतत प्रेरणा मिळत असते.' [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अल्मेर मॉड, पृष्ठ ४३]

जे लोक येशूच्या तत्त्वज्ञानाचं मोजमाप राज्याच्या वा नागरी कायद्याच्या मापदंडानं करत होते त्यांची कल्पना होती की येशू ज्या परिपूर्णतेविषयी बोलला ती परिपूर्णता याच जीवनात साध्य होण्यासारखी आहे. त्यामुळे जर तसं घडलं तर काय होईल असं ते विचारत होते. त्यावेळी ते विसरायचे की आपली शिकवण देताना येशूला माहीत होतं की,

संपूर्ण परिपूर्णता कधीच शक्य नाही आणि परिपूर्ण आणि असीम परिपूर्णतेसाठी सुरू असलेल्या धडपडीमुळे चांगल्या लोकांची संख्या सतत वाढत राहील व त्यामुळे चांगुलपणाही कल्पनातीत सीमेपर्यंत वाढत राहील.... मानवी जीवनाचा पारलौकिक परिपूर्णतेकडे सतत स्वाभाविक कल राहिला असून अनंताकडे त्याची वाटचाल सुरू असून अनंत काळातच तो कधी तरी तिथं पोहोचू शकणार आहे. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेज*, पृष्ठ ११७ (ठळक अक्षरं माझी)]

टॉलस्टॉय यांनी मानवी स्वभावाच्या मर्यादा लक्षात घेतल्या नाही कारण त्यांना पूर्ण जाणीव होती की येशूनं माणसांसमोर ईश्वरी परिपूर्णतेचा एक आदर्श ठेवला आहे. त्यांना माहीत होतं की माणूस पूर्णपणे देवदूतही नाही व पूर्णपणे राक्षसही नाही. या दोघांचंही तो एक विचित्र मिश्रण आहे. माणसातील पाशवी शक्तीला पूर्णपणे नष्ट करता येत नाही व ती नेहमीच आपला प्रभाव दाखवील हे माहीत असल्यामुळे टॉलस्टॉय यांनी माणसाला ईश्वरी परिपूर्णतेची जाणीव करून दिली अशा रीतीनं या दोन टोकांमधून जाणाऱ्या जीवनाला पाशवी शक्तीच्या विरोधात मार्गदर्शन करण्यासाठी ईश्वरी शक्तीचं दर्शन घडविलं. समांतर चालणाऱ्या या दोन शक्तींमध्ये

एक शक्ती पाशवी स्वरूपाचं प्रतिनिधित्व करत असते तर दुसरी ईश्वरी परिपूर्णतेच्या जाणिवेचं. मानवी जीवनाची कृतार्थता पाशवी स्वरूपातून मुक्त व्हायची अविश्रांत धडपड करण्यात आणि आपल्यातील दैवी संपदेत वाढ करून शक्य तो ईश्वरी स्वरूपापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आहे. वर्तनविषयक नियम नैतिक आणि आध्यात्मिक विकासातील ही विशिष्ट परिस्थिती विचारात घेतात.

पर्वतावरील प्रवचनात येशूनं शाश्वत आदर्श आपल्यासमोर मांडला आहे. तत्कालीन मानवसमाजाच्या विकासाच्या अवस्थेत माणसानं किमान पात्रता मिळवण्यासाठी काय करायला पाहिजे ते आज्ञा सांगतात. कुणाबद्दलही द्वेषभावना न ठेवता सर्वांवर प्रेम करायचा आदर्श अशाच प्रकारचा आहे. आपल्या शेजाऱ्याला दुखवायला मनाई करणारी आज्ञा आदर्शाकडे जायची धडपड करणाऱ्या मानसानं 'किमान कसं वर्तन करायला पाहिजे' ते सांगते. वैवाहिक जीवनचं पावित्र्य राखायची आणि व्यभिचाराला मनाई करणारी आज्ञा आदर्शाकडे जाणाऱ्या माणसानं किमान काय करायला पाहिजे ते सांगते. अशाच प्रकारे कुणाचीही किंचितही हिंसा न करायचा आदर्श आपल्याला झालेली इजा शांतपणे सहन करायला सांगते, आणि आपल्या शत्रूवरही प्रेम करायची आज्ञा त्याला इजा न पोहोचवण्याची आपल्याकडून अपेक्षा करते आणि आपल्या सर्व बांधवांकडे समत्वभावनेनं पाहायला आपल्याला सांगते. परंतु या सर्व आज्ञांमध्ये येशूची शिकवण संपत नाही. संघर्षरत मानवता अनंत परिपूर्णतेच्या मार्गावर जी वाटचाल करते आहे त्या मार्गावरील या आज्ञा केवळ 'मैलाचे दगड' आहेत. माणूस जसजसा परिपूर्णतेकडे जाईल तसतशी त्यांची जागा 'उच्च आणि अजून उच्च' अशा आदर्शानी घ्यायला पाहिजे आणि 'सतत त्या परिपूर्णतेचा माणसानं ध्यास धरायला पाहिजे जिच्याकडे केवळ अनंत काळातच पोहोचता येऊ शकते.

प्रत्यक्ष ज्ञानवाद्यांनी मानवी स्वभावाच्या शक्यतांसंबंधी आपल्या लहरीप्रमाणे मर्यादा कल्पिलेल्या आहेत. त्यांनी विनाकारण गृहीत धरलं आहे की पाच आज्ञांचा शब्दशः अर्थ घेणं

चूक आहे; व्यावहारिक स्वरूप द्यायच्या दृष्टीनं त्यांची छटाई करायला पाहिजे असं त्यांचं म्हणणं होतं. उदाहरणार्थ 'आपल्याजवळ जे काही आहे ते सर्व गरिबाला देण्याऐवजी दान म्हणून आपल्या संपत्तीतील काही भाग देणं चांगलं; अविवाहित राहण्याऐवजी व्यभिचारी जीवन टाळावं,' आणि अशाच प्रकारे इतर आज्ञांविषयीही. टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की 'आदर्शाचा स्तर कमी करायचा अर्थ परिपक्वतेकडे जायची शक्यता कमी करणं एवढाच होत नाही तर आदर्शालाच नष्ट करणं असा त्याचा अर्थ होतो.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ १०२-३] मानवजातीला पुढं जायची प्रेरणा देणारा आदर्श हा काही मानवी बुद्धीचा 'शोध' नाही, ती अशी काही तरी गोष्ट आहे जी माणसाच्या आत्म्यात आधीच रुजलेली आहे. जो माणसाला पूर्ण आणि अनंत परिपूर्णतेकडे नेण्यासाठी प्रयत्न करायला प्रेरीत करत असतो तोच हा आदर्श आहे. कामचलाऊ परिपक्वतेचा आदर्श माणसाच्या आत्म्याला चेतवू शकणार नाही.

'सुजाण स्वार्थ' अपरिहार्यपणे मानवतेच्या प्रेमाकडे जातो व या संकल्पनेवर आधारित मानवताप्रेम 'सर्वांवर प्रेम करायच्या तत्त्वाची जागा घेऊ शकते असा प्रत्यक्ष ज्ञानवाद्यांनी जो युक्तिवाद मांडला होता त्याची टॉलस्टॉयनी कसून तपासणी केली.

प्रत्यक्ष ज्ञानवाद्यांच्या तत्त्वज्ञानानुसार मानवसमाज धार्मिक अवस्थेतून आधिभौतिक अवस्थेत गेला होता व आता त्यानं तीही अवस्था ओलांडली असून वैज्ञानिक अवस्थेत प्रवेश केलेला आहे. पहिल्या दोन अवस्था क्रमशः अंधश्रद्धेवर आणि भविष्याच्या अमूर्त अंदाजावर आधारित होत्या. सर्वात अलीकडची अवस्था सकारात्मक ज्ञानावर आधारित ज्ञानप्रसाराची आहे. मानवजातीला अज्ञान, अंधश्रद्धा आणि भीती या गोष्टीतून मुक्त करणं व शांतता आणि प्रगतीच्या युगाची स्थापना करणं तिचं कार्य.

प्रेमाचं आणि देवाची सेवा करायचं ख्रिश्चन धर्माचं तत्त्वज्ञान (त्या प्रेमाचा आणि सेवेचा अपरिहार्य परिणाम म्हणून) आणि त्या अनुषंगानं आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करायचं आणि त्याची सेवा करायचं तत्त्वज्ञान हे 'गूढ आणि संदिग्ध' आहे व त्याचबरोबर ते 'गोंधळवणारं आणि

लहरीपणाचं' आहे असा प्रत्यक्ष ज्ञानवाद्यांचा आक्षेप होता. मानव समाजावर प्रेम करायचं तत्त्वज्ञान हे अत्यंत मजबूत पायावर आधारलेलं आहे व समजायला फार सोपं आहे. प्रत्येक माणसासाठी स्वतःवर, स्वतःच्या कुटुंबावर आणि स्वतःच्या देशातील लोकांवर प्रेम करणं स्वाभाविक गोष्ट आहे असा त्यांचा युक्तिवाद होता. त्यामुळे हीच भावना विश्वात्मकतेवर म्हणजे संपूर्ण मानवतेपर्यंत पोहोचवणं त्याच्या हिताचं होईल. 'आतापर्यंत जी माणसं कुटुंबासाठी आणि देशासाठी जगत होती त्यांनी आता मानव समाजासाठी जगायचं आहे.' त्यामुळे प्रत्यक्ष ज्ञानवाद्यांचं म्हणणं होतं की 'ईश्वरावर प्रेम करा' व 'त्याची सेवा करा' या ठिकाणी 'मानवतेची सेवा करा' हे शब्द टाकायला पाहिजे.

टॉलस्टॉय यावर म्हणाले की प्रेम ही अमूर्त गृहीत कल्पना नाही ही गोष्ट वैज्ञानिक बंधुभावाच्या या सूत्रधारांनी लक्षात घेतलेली नाही; सिद्धान्ताची मांडणी केल्यानं ते निर्माण करता येत नाही. प्रेम एक 'अंतर्गत भावना' आहे व ते 'कुणावर तरी बसण्यासाठी कोणत्या तरी प्रत्यक्ष गोष्टीची गरज असते. परंतु मानवता ही संकल्पना 'प्रत्यक्ष नाही तर अमूर्त आहे.

आपल्याला मानवता ठोस स्वरूपात माहीत नसते व तिच्या सीमाही आपण ठरवू शकत नाही. मानवता एक कल्पना आहे व तिच्यावर प्रेम करता येऊ शकत नाही. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ१०८-९]

बंधुभावाचे पुरस्कर्ते असलेल्या समाजवाद्यांना माणसावरील प्रेमाच्या संकल्पनेचा व्याप वाढवणं आवश्यक वाटत होतं परंतु प्रेमाच्या क्षेत्राचा व्याप वाढवण्यासाठी त्यांनी वैयक्तिक आणि सामाजिक जीवनसंकल्पनेचा उपयोग केला, त्यामुळे ती अमूर्त झाली व परिणामी तिचा आधारच खिळखिळा होऊन नष्ट झाला. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनसंकल्पना माणसावरील प्रेमाचा व्याप एका सीमेपलीकडे वाढवणं सहन करू शकत नाही. परंतु दैवी जीवनसंकल्पनेवर आधारित प्रेम हे 'स्वतःपर्यंत, राष्ट्रापर्यंत वा मानवतेपर्यंतच' मर्यादित नसते तर त्यात सर्व भूतमात्रांचादेखील समावेश झालेला असतो.

प्रेमाच्या साम्राज्याचा अनंत व्याप वाढवला जाण्याची शक्यता त्याला माहीत असते, परंतु त्याचा हेतू बाहेर दिसू शकत नाही.... तर तो त्यातच असतो, त्याच्या व्यक्तित्वात - दैवी व्यक्तित्वात - असतो ज्याचं सार प्रेम असते व त्याला व्यापक क्षेत्राची गरज असते. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ११०]

दुसरी गोष्ट म्हणजे माणसाचा स्वभाव अपरिहार्यपणे पाशवी आहे असं सामाजिक संकल्पना गृहीत धरते. त्या स्वभावाला नियंत्रित करून त्याला 'कुटुंबाच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या मान्य करण्यात आलेल्या कायद्यात बसवायचं असतं.' दुसरीकडे येशूच्या तत्त्वज्ञानानुसार माणसानं आपल्या स्वभावानुसार जगायचं असतं व हा स्वभाव मूलतःच दैवी असतो व 'त्याला कशाचाच विषय करता येत नाही, स्वतःच्या पाशवी स्वभावाचा नाही,' त्याच्याकडून कुटुंबाच्या असलेल्या अपेक्षांचा नाही वा राज्याच्या मागण्याचाही नाही.' सामाजिक जीवन संकल्पनेत प्रेमाचं क्षेत्र व्यापक करायची आवश्यकता व्यक्तीच्या मुक्तीसाठी आहे असं गृहीत धरण्यात येतं. येशूची शिकवणूक सांगते की गरजेप्रमाणे तयार करण्यात आलेल्या गृहीतकानुसार नव्हे तर आत्म्याच्या अंतर्गत गुणानुसार प्रेमाचं क्षेत्र व्यापक करावं लागतं. थोडक्यात ख्रिश्चन धर्माची माणसाला शिकवणूक आहे की,

त्याच्या आत्म्याचं सार प्रेम आहे, तो या वस्तूंवर प्रेम करतो की त्या, यावर त्याचं कल्याण अवलंबून नसून तो सर्व गोष्टीचं सार असलेल्या गोष्टीवर म्हणजे देवावर करत असलेल्या प्रेमात त्याचं कल्याण आहे. त्याला त्याच्यातील देवाची ओळख प्रेमाच्या माध्यमातूनच पटते, आणि देवावरील प्रेमाच्या माध्यमातून तो सर्व माणसांवर व इतर गोष्टींवर प्रेम करील. [वरीलप्रमाणे, पृष्ठ १११]

माणूस स्वतंत्र नसल्यामुळे आपलं जीवन बदलवू शकत नाही या आवश्यकतेवर आधारित जडवाद्यांच्या युक्तिवादाला टॉलस्टॉयनी 'नवीन आणि वैज्ञानिक पद्धतीच्या दांभिकतेनं भरलेला' युक्तिवाद असं संबोधलं. माणसाचं वर्तन त्याच्या भौतिक वातावरणानं नियंत्रित होत असतं असं समाजशास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. तो जे काही करतो त्यासाठी पूर्ववर्ती कारणं

कारणीभूत असतात. व्यक्तींच्या जीवनात बदल करून त्यांच्या बाह्य परिस्थितीत बदल करायचा प्रयत्न करणं म्हणजे माणसानं आपल्या स्वतःच्या पायातील वहाणांच्या सहाय्यानं स्वतःलाच वर उचलायचा प्रयत्न करणं होय. टॉलस्टॉय यांनी मान्य केलं की माणसाला नेहमीच वर्तनस्वातंत्र्य नसतं. परंतु आधीच ज्ञात असलेल्या सत्याचा अवलंब करायचं वा न करायचं एक स्वातंत्र्य त्याला नेहमीच असतं. त्यामुळे 'त्याच्या वर्तनाच्या कारणाच्या संदर्भात' त्याला वर्तनस्वातंत्र्य जरी नसलं, आणि यात सत्याची ओळख पटणं वा न पटणं यांचाही समावेश असला तरीही तो स्वतंत्र असतोच. विशिष्ट सत्य मान्य करणं वा न करणं हे बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसतं तर 'विशिष्ट.... गुणांवर ते आधारित असतं. माणसाला ते आपल्या अंतर्गत आढळून येतं आणि 'त्याची ओळख पटलेली त्याला नसते.' [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३५९] ही शक्ती आत्म्याचा अंगभूत भाग असते व माणसाच्या जीवनातील सर्व प्रकारच्या प्रगटिकरणाचं ती कारण असते. माणूस विशिष्ट पद्धतीनं वागतो कारण त्याला वाटत असतं की त्या वेळी तोच मार्ग योग्य मार्ग आहे अथवा आधी त्यानं यासंबंधी विचार केलेला असतो व त्यामुळे आता सवयीमुळे त्याला तसं वागणं भाग पडतं. त्यामुळे विशिष्ट वेळी त्याला हवं त्याप्रमाणे वागायला तो स्वतंत्र नसला तरी त्याला आपल्या इच्छेनुसार वागता यावं म्हणून ती कारणं दूर करण्यासाठी प्रयत्न करायचं स्वातंत्र्य त्याला आहेच.

टॉलस्टॉय यांनी निदर्शनास आणून दिलं की माणसाला जर सत्याचं अगदीच ज्ञान नसतं तर माणसाला स्वातंत्र्य राहिलं नसत. 'एवढंच नाही तर त्याला स्वातंत्र्याची कल्पनाही नसती.' त्याचप्रमाणे त्याला सत्याचं संपूर्ण ज्ञान असलं तरी त्याला स्वातंत्र्य असणार नाही. अपरिहार्यपणे तो त्या सत्याकडे ढकलला जाईल. निवडस्वातंत्र्याचा प्रश्न तेव्हाच येतो जेव्हा चूक व्हायची शक्यता असते. माणूस अचल नाही तर त्याची सतत वाढ होत असते. त्याच्या भावी वर्तनावर परिणाम करणाऱ्या सत्याची पारख करणाऱ्या त्याच्या अंगभूत गुणामुळे तो सतत विकसित होणारा प्राणी आहे. जीवनात तो जसजसा पुढं जात जातो तसतसं सत्याचं त्याला पूर्ण आणि अजून पूर्ण दर्शन होत जातं.

काही सत्यं त्याला इतकी परिचित असतात की ती अनाहूतपणे त्याच्या वर्तनाला प्रेरणा देणारी स्रोत होतात; इतर काही सत्यांचं त्याला अस्पष्टसं दर्शन होत असतं; आणि अजून काही जरी त्याला अपरिचित असली तरी ती त्याच्यासमोर इतक्या स्पष्टपणे उघड करण्यात आलेली असतात की ती त्याचं लक्ष स्वतःकडे वेधून घेतात आणि या ना त्या प्रकारे त्याला त्यांचा विचार करणं भाग पडतं. तो त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. त्याला एक तर त्यांना मान्य करावं लागतं वा फेटाळून लावावं लागतं. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३६१-६२]

ईश्वराच्या चिरंतन सत्याची माणसाला ज्या सीमेपर्यंत ओळख पटते व त्या ईश्वरी आज्ञेचा जाणीवपूर्वक तो पाईक बनतो तेव्हा त्या सीमेपर्यंत त्याला स्वातंत्र्य असतं. या सत्याकडे डोळेझाक करून तो गुलाम होतो. उदाहरणार्थ, दारूचं व्यसन जडलेल्या माणसाला जुन्या सवयीमुळे दारूचा मोह टाळायची शक्ती नसू शकते. तरीही दारू पिणं वाईट आहे हे स्वतःला सांगण्यासाठी तो स्वतंत्र असतो. आणि यामुळे त्याच्या विश्वासाच्या प्रमाणात हळूहळू दारूचं व्यसन सोडायची शक्ती मिळू शकते. परंतु तो जर वाईटाला वाईट म्हणून ओळखायला नकार देणार असेल आणि स्वतःजवळ व इतरांजवळ त्या व्यसनाचं समर्थन करत असेल तर त्याचं व्यसन वाढेल आणि त्याला मिळणाऱ्या मुक्तीची दारं त्याच्यासाठी बंद व्हायची शक्यता आहे. तो सत्याला ओळख दाखवो वा न दाखवो सत्य कोणत्याही परिस्थितीत त्याला सहकार्य करायला भाग पाडेलच. स्वेच्छेनं सहकार्य केलं तर ते उत्तमच पण त्यानं प्रतिकार केला तर गुलामाचा मालक जसा हातात चाबूक घेऊन गुलामाला आपल्या इच्छेप्रमाणे वागायला लावतो त्याप्रमाणे ते सत्य त्याला वागायला भाग पाडेल.

माणसानं जीवनात कोणत्या दिशेकडे वळावं हेच केवळ सत्य सांगत नाही तर तो जाऊ शकेल असा जो एकमेव मार्ग असतो त्या मार्गाची दारंही सत्य त्याच्यासाठी उघडते. त्यामुळे सर्व लोक अपरिहार्यपणे, तसं करायला ते स्वतंत्र असो वा नसो, सत्याच्या मार्गानं जातील; काही

लोक स्वेच्छेनं आपण ठरवलेलं काम करतील; तर इतर लोक अनिच्छेनं जीवनाच्या नियमाला शरण जातील. निवड करायच्या या सामर्थ्यात माणसाचं स्वातंत्र्य निहित आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३६२]

जो माणूस विषयासक्तीच्या जीवनाला स्वतःला वाहून घेतो तो नेहमी त्याच्या ताब्यात नसलेल्या तात्कालिक कारणांप्रमाणे वागत असतो.... तो जीवनाचा निर्माता नाही तर गुलाम आहे. परंतु जो माणूस आपलं स्वतःचं जीवन त्याच्यासमोर उघड करून सांगण्यात आलेल्या सत्याची ओळख करून घेण्यासाठी व त्यानुसार आचरण करण्यासाठी वाहून टाकतो तो विश्वचैतन्याशी म्हणजे विश्वातील जीवनाचा स्रोत असलेल्या शक्तीशी एकरूप होतो आणि असं वर्तन करतो की जे वैयक्तिक नसतं व स्थळकाळावरही अवलंबून नसतं. ज्याला कोणतंही कारण नसतं असं ते वर्तन असतं. उलट इतर सर्व कारणांचं ते कारण असतं व त्याचं महत्त्व असीम आणि अनंत असतं. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३६३]

'परंतु सध्याची हिंसेवर आधारित व्यवस्था नष्ट झाली तर जगाचं काय होईल?' लोकांनी विचारलं. ज्या क्षणी ते उडी घ्यायचा विचार करतात त्याच क्षणी त्यांना भीती ग्रासते - भीती पोकळीची, अवकाशाची, स्वातंत्र्याची. त्यांना एकट्यानं पुढं जायचं साहस करायची भीती वाटते. टॉलस्टॉय यांनी सांगितलं की मानवजात ज्या लोकांची स्मृती अभिमानानं जपते त्या नवीन पायंडा पाडणाऱ्या आणि मानवतेच्या कल्याणाचं कार्य करणाऱ्या लोकांच्या भवितव्यातच शौर्याचं हे पाऊल टाकणं असतं.

कोलंबसनं जर असा विचार केला असता तर त्यानं नांगर उचललाच नसता. अज्ञात सागर ओलांडायची इच्छा करणं आणि ज्या देशाचं अस्तित्वच संशयास्पद होतं तिथं जायचा प्रयत्न करणं हाच मुळी वेडेपणा होता. परंतु याच वेडेपणाच्या आधारानं त्यानं नव्या जगाचा शोध लावला. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३६५]

प्रत्येक माणूस जर सत्य समजावून घ्यायचा आणि आणि त्याला ओळखायचा प्रयत्न करील म्हणजे 'त्याला आपल्या अंतःकरणात बिंबवायचा प्रयत्न करील' व त्याप्रमाणे निर्भयपणे आचरण

करील तर त्याला असं आढळेल की इतर अगणित लोकही त्याच्यासारख्याच अवस्थेत आहेत व त्याच्याचप्रमाणे आपण एकटं पडू या भीतीनं सत्याला ओळख द्यायला घाबरत आहेत व स्वतः उडी घ्यायच्या आधी इतरांनी सत्याला कबुली द्यायची वाट पाहत आहेत.

आजचं जग जर पुरेसं सुरक्षित असतं तर भविष्यकालीन अज्ञात जगाच्या भीतीला एकदा रास्तही म्हणता आलं असतं. परंतु कुणालाही दिसू शकेल की हे जग आजारी आहे. परिस्थितीत क्रांतिकारक बदल करण्यात आला नाही तर हे जग फार दिवस टिकणार नाही. एखादा माणूस जुनाट मोडकळीस आलेल्या घरात राहत असावा, ते घर केव्हाही कोसळू शकेल हे त्याला माहीत असतं. पण मी हे घर तेव्हाच सोडेन जेव्हा याच ठिकाणी दुसरं घर बांधण्यात येईल व त्यात मला हव्या असलेल्या सर्व सोयी असतील असं मला आश्वासन देण्यात येईल असा त्यानं हट्ट धरल्याप्रमाणे हे होईल. बांधकामाचं साहित्य आणि मजूर हजर असले तर जिथं हा माणूस जिवाला धोका न राहता राहू शकेल असं नवीन घर बांधण्यात येईल अशी अपेक्षा करता येऊ शकते. उलटपक्षी काहीच करण्यात आलं नाही तर जुनं घर एका दिवशी पडायची आणि त्यात राहणाऱ्या सर्वांचा मृत्यू होण्याची शक्यताच नव्हे तर खात्री असेल. अशा रीतीनं लोक त्या पडू पाहणाऱ्या घराला पकडून राहतात याला कारण त्यांची सुस्ती आणि घाबरटपणाच आहे व त्यामुळेच त्यांना दुःखी व्हावं लागतं. प्रस्थापित व्यवस्थेत, ज्यात त्यांना स्वातंत्र्य नाही व जी व्यवस्था त्यांचा छळ करते आहे आणि अजून मोठा धोक्याची जिच्यातून भीती आहे, त्या व्यवस्थेत बाह्य डागडुजी करण्याकरिता लोक जेवढी शक्ती लावतात त्याच्या एक शतांश भाग जरी त्यांनी त्यांना ज्यात स्वातंत्र्य असेल अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी लावला तर जुनी व्यवस्था इतक्या सहज कोसळून पडेल की त्याचं त्यांनाच आश्चर्य वाटेल.

मिठाच्या संपृक्त द्रावणाला एकदा जोरात हालवलं की त्यातून मिठाच्या स्फटिकाचे खडे बाहेर पडू लागतात तसंच आजच्या वर्तमान काळात आपल्यासमोर उघड झालेलं सत्य शेकडो, हजारो, लाखो लोकात पसरायला व अस्तित्वात असलेल्या जाणिवेशी सुसंगत असं जनमत

तयार व्हायला आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्था बदलायला किमान श्रम लागतील. हे प्रयत्न करणं हे आता आपल्या हाती आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३६४]

टॉलस्टॉय यांनी ज्या प्रखर प्रामाणिकपणानं, हृदयस्पर्शी वक्तृत्वानं, आणि युक्तिवादाच्या संपन्नतेनं आपला सिद्धान्त मांडला त्याचं सार कितीही विस्तारानं सांगायचा प्रयत्न केला तरी त्याची पूर्णपणे कल्पना आणून देणं कठीण आहे. टॉलस्टॉय म्हणाले की व्यक्ती कितीही मोठी असो, तिचं जीवनातील स्थान कितीही मोठं असो वा त्याच्या हाती कितीही मोठी सत्ता असो तरी दोन गोष्टी स्पष्ट आहेत. पहिली म्हणजे मृत्यू. तो तिला केव्हाही नेऊ शकतो आणि तिच्या जीवनपद्धतीचं सगळं महत्त्व हिरावून घेऊ शकतो. दुसरी गोष्ट म्हणजे माणसाची सगळी कामं तात्पुरत्या स्वरूपाची असतात व त्यांचा मागमूसही मागे उरत नाही. परंतु कोणत्याही असत्यामुळे त्यांना मूर्ख बनवण्यात आलेलं असलं आणि संमोहन प्रक्रियेनं आणि स्वयंसूचनेनं त्यांनी त्याच्या विवेकाला बंदिस्त केलेलं असलं तरी 'कोणत्याही बाह्य प्रयत्नांनी आपल्या जिवाचं संरक्षण करता येऊ शकत नाही. हे जीवन न टाळता येणाऱ्या यातनांनी भरलेलं आहे आणि त्याहूनही अटळ अशा मृत्यूनं त्याचा शेवट होणार आहे. तो मृत्यू आपल्या प्रत्येकाच्या जीवनात कोणत्याही क्षणी येऊ शकतो.' हे चिरंतन सत्य त्याच्यापासून लपवता येऊ शकत नाही. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेंज*, पृष्ठ ४४३] परिणामी माणसाच्या जीवनाचं खरं महत्त्व त्याच्या वैयक्तिक भौतिक अस्तित्वातही नाही अथवा या जगातील व्यावहारिक संस्था अथवा संघटनातही नाही तर ज्यानं आपल्याला या जगात पाठवलं त्याच्याकडे लवकरच आपल्याला परतावं लागणार आहे या निष्कर्षापासून कोणाचीच सुटका नाही. त्याच्या इच्छेप्रमाणे आपल्या वागण्याला खरं महत्त्व आहे. त्याला आपण जे करावंसं वाटतं ते तो करतो काय? टॉलस्टॉयनी विचारलं : *जमीनदार वा कारखानदार म्हणून गरिबाच्या श्रमाची फळं तुम्ही जेव्हा घेता आणि त्या लुबाडलेल्या संपत्तीवर तुम्ही तुमचं जीवन उभारता तेव्हा तुम्ही चांगलं काम करता काय? अथवा जेव्हा राज्यपाल वा न्यायाधीश म्हणून लोकांना फाशीची शिक्षा देऊन तुम्ही हिंसा करता तेव्हा तुम्ही चांगलं काम*

करता काय? अथवा सैनिक म्हणून लढण्यासाठी, लुटण्यासाठी, हत्त्या करण्यासाठी तुम्ही युद्धाची तयारी करता तेव्हा तुम्ही चांगलं काम करता काय? [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ ३७०]

समाजाचे आणि राज्याचे तुम्ही भाग आहात हे खरं आहे. परंतु राज्याचे भाग म्हणून तुम्हाला तुमचं कर्तव्य असेल तर 'ईश्वरानं निर्माण केलेल्या या असीम जगाचे भाग म्हणून तुमचं काही उच्च कर्तव्य नाही काय? [वरीलप्रमाणे, पृष्ठ ३७३] त्यामुळे नागरिक म्हणून तुमचं जे कर्तव्य आहे ते 'उच्च आणि चिरंतन कर्तव्याच्या आड येता कामा नये.

मोहांनी घेरलेला माणूस कितीही सामर्थ्यसंपन्न असला तरी त्यानं स्वीकारलेल्या आणि कुटुंबाच्या अपरिहार्य अशा जबाबदाऱ्यांसमोर त्याला असहाय झाल्यासारखं वाटतं. त्यामुळे त्याला वाटत असतं की आपण आपली सर्व संपत्ती गरिबांमध्ये वाटू शकत नाही, अथवा सरकारी नोकरीही ठोकरून देऊ शकत नाही, सैन्यातील नोकरी नाकारू शकत नाही वा पंच म्हणून काम करण्यासाठी न्यायालयात पाचारण करण्यात आल्यास त्याला आपण नाही म्हणू शकत नाही.

मला असं म्हणायचं नाही की तुम्ही जमीनमालक असाल तर ताबडतोब तुम्ही तुमची जमीन गरिबांना देऊन टाका; जर तुम्ही कारखानदार असाल तर तुमचा पैसा वा कारखाना मजुरांना देऊन टाका; तुम्ही जर झार, मंत्री, अधिकारी, न्यायाधीश वा सेनापती असाल तर तुम्ही ताबडतोब तुमचं लाभाचं पद सोडा; अथवा तुम्ही सैनिक असाल (मला असं म्हणायचं आहे की जर तुम्ही अशा पदावर असाल की ज्याला हिंसेचा आधार आहे) तर सर्व धोका पत्करून ताबडतोब तुम्ही ती नोकरी सोडा. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड अँड पीस एसेज*, पृष्ठ ४४१]

परंतु तुम्ही एवढं निश्चितच करू शकाल – 'सत्याला ओळखायचं नाकारायचं नाही व खोटं बोलायचं नाही.'

मी जमीनदार आहे वा कारखानदार आहे वा कलावंत आहे वा लेखक आहे कारण त्यामुळे मी लोकांची सेवा करू शकतो असं म्हणायचं तुम्ही टाळू शकता; मी राज्यपाल आहे, महाधिवक्ता

आहे, झार आहे ते मला पसंत आहे म्हणून नाही तर लोकांच्या सेवेसाठी मी या पदावर आहे असं घोषित करायचं तुम्ही टाळू शकता; शिक्षा व्हायची मला भीती वाटते म्हणून मी सैनिक नाही तर सैन्य लोकांच्या जीवनरक्षणासाठी आवश्यक आहे असं मला वाटतं म्हणून मी सैनिक आहे असं बोलणं तुम्ही बंद करू शकता. अशा प्रकारे स्वतःशी आणि इतरांशी खोटं बोलायचं टाळून तुम्ही स्वतःला असत्यापासून मुक्त करू शकता आणि सत्याकडे जाऊ शकता. असं तुम्ही नेहमीच करू शकता, आणि केवळ करूच शकत नाही तर असं करायच्या कर्तव्याशी तुम्ही बांधलेलेही आहात. कारण सत्यासाठी धडपडणं हेच माणसाचं सर्वोच्च कर्तव्य असते. तुम्ही एवढं करा आणि तेवढ्यानंच परिस्थितीत एकदम परिवर्तन झालेलं तुम्हांला आढळेल. [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ ३७४-७५]

टॉलस्टॉय आपला विचार व्यक्त करत म्हणाले की स्पष्टपणे पाहणं आणि स्वतःशी सत्याची कबुली देणं ही अर्धी लढाई आहे. 'जहाज सुकाणूनं दिलेल्या दिशेकडे ज्याप्रमाणे अपरिहार्यपणे जाते त्याप्रमाणे माणसाच्या विचारात जेव्हा बदल होतो तेव्हा कृती विचारांच्या दिशेनं जाते.' [लिओ टॉलस्टॉय, *एसेज अँड लेटर्स*, अनुवादक अल्मेर मॉड, पृष्ठ ११७] जे अशक्य वा असंभव असेल त्याची माणसाकडून देव अपेक्षा करत नाही, 'तो आपल्याकडून जे शक्य आणि संभव असेल त्याचीच मागणी करतो.... आपल्यासमोर प्रगट करण्यात आलेल्या सत्त्याला ओळखणं आणि त्यानुसार आचरण करणं ही गोष्ट नेहमीच आपल्या अधिकारात असते.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ ३७६]

टॉलस्टॉय समारोप करत म्हणाले की 'जीवनाचा संपूर्ण हेतू ईश्वराचं राज्य यायला मदत करणं आहे. यामुळे मानवजातीत ऐक्य प्रस्थापित होईल - ते ऐक्य जे सत्याद्वारेच शक्य आहे.' जर आत्म्यात परिवर्तन झालं तर जगातील परिवर्तन त्या मागोमाग येईलच. [तिखॉन पोल्नर यांनी दिलेलं उद्धरण, *टॉलस्टॉय अँड हिज वाईफ*, पृष्ठ १७७] 'आधी देवाचं राज्य आणि त्याची सदाचारिता मिळवा आणि मग सर्व गोष्टी त्यात आपोआप येऊन मिळतील.' [कौंट लिओ टॉलस्टॉय, *द किंगडम ऑफ गॉड इज वुइदिन यू*, पृष्ठ ३७६]

१७

गांधीजी एकदा म्हणाले होते की हिंदू धर्माचे सर्व धर्मग्रंथ नष्ट झाले तरी ईशोपनिषदातील एकच मंत्र हिंदू धर्माचं सार सांगायला पुरेसा होईल, परंतु त्याप्रमाणेही कोणी आचरण करणारा नसेल तर त्या मंत्राचाही काही उपयोग होणार नाही. [*हरिजन*, मे १, १९३७, पृष्ठ ९३] येशूच्या शिकवणुकीच्या संबंधात टॉलस्टॉय यांनी काय केलं हे ठरवण्यासाठी गांधीजींनी सांगितलेली ही कसोटी उत्तम मापदंड आहे. तात्त्विक दृष्टीनं विचार केला तर येशूची शिकवण बुद्ध, कन्फ्युशिअस आणि सॉक्रेटीस या त्यांच्यापूर्वी झालेल्या सर्व महान गुरूंच्या शिकवणुकीपेक्षा काही वेगळी नव्हती. त्यांचीच मूलभूत शिकवण येशूनं स्पष्ट भाषेत सांगितलेली होती. लोकांनी मान्य केलं की ख्रिश्चनत्वाचा अर्थ 'ईश्वरावर आणि आपल्या शेजाऱ्यांवर स्वतःवर करतो तसंच प्रेम करावं' हाच आहे. परंतु त्यातून आपण केवळ प्रश्नाकडेच जात होतो - देव काय आहे? प्रेम करणं म्हणजे काय? जे ईश्वरासारखं अनाकलनीय आहे त्याच्यावर प्रेम करावं म्हणजे काय? शेजारी कोण आहे? ईश्वरावर प्रेम कसं करावं? म्हणजे ज्याची अनुभूती प्रत्येक माणसाला आपापल्या पद्धतीनं वेगवेगळी होते व काही तर त्याला ओळखायलाही तयार नसतात त्या ईश्वरावर प्रेम कसं करावं? स्वतःवरील प्रेम हे माणसाच्या अंतःकरणात रुजलेलं असताना आणि तेवढ्याच प्रमाणात इतरांबद्दलचा द्वेषही त्याच्या अंतःकरणात भरलेला असताना माणूस स्वतःवर करतो तसंच आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करू शकतो काय? या सर्व प्रश्नांची स्पष्ट आणि थोडक्यात उत्तरं मिळाल्याशिवाय येशूची सर्व शिकवण केवळ तत्त्वज्ञानात्मक पातळीवर राहते व वाटायला लागतं की 'तशी ती फार महत्त्वाची आहे, परंतु जीवनात अनुसरायचा नियम म्हणून जेव्हा तिचा विचार करावा तेव्हा ती.... केवळ मूर्खपणाची वाटते.'

जिवंत श्रद्धा असेल तर शिकवणुकीत सांगितलेली तत्त्वं जीवनात कशी अंमलात आणायची; त्यांचा व्यक्तीच्या व समाजाच्या कल्याणाशी काय संबंध आहे, 'ते अंमलात यायची शक्यता किती आहे व ती अंमलात आणायचे नियम कोणते आहेत ते स्पष्ट सांगण्यात आलेलं

असायला हवं. [लिओ टॉलस्टाय, *व्हाट देन मस्ट वुई डू?* अनुवादक अलेमेर मॉड, पृष्ठ ३८२, एम. ए. एन्जलहार्ट यांना पाठवलेल्या पत्रातून] प्रेमाच्या नियमाच्या संबंधात टॉलस्टॉय यांनी हेच केलं. 'पाच आज्ञा' हे त्याचेच उपसिद्धांत आणि कसोटीचे मुद्दे आहेत. प्रेमाच्या नियमाचं पालन केल्यामुळे मिळणारा 'आनंद आणि समाधान' यांचं त्यांनी दर्शन घडवलं. 'किमान एकाही आज्ञेचं पालन न करणाऱ्या' लोकांविषयी (मॅथ्यू ५.१७.३२) पर्वतावरील प्रवचनाच्या प्रस्तावात केवळ विद्वानांशी नव्हे तर खालच्या वर्गातील अडाणी लोकांशी स्वतः येशू बोलला होता आणि शेवटी येशू म्हणाला होता की 'बोलायची आवश्यकता नाही तर त्यानुसार करायची आवश्यकता आहे (मॅथ्यू ७.२१.७)'; साध्या आणि सरळ माणसाच्या मनात अर्थाविषयी संशय राहू नये म्हणून यापेक्षा वेगळं असं काही त्या प्रवचनात येशू बोलू शकला असता काय? या गोष्टीची कल्पनाही करता येऊ शकत नाही. 'पाच आज्ञांमध्ये' ज्या शिकवणुकीचं सार सांगण्यात आलं आहे त्यापेक्षा समजण्यासाठी साधं आणि सोपं आणि अनुसरण्यासाठी सहज असं काही असू शकतं काय असं टॉलस्टॉय यांनी विचारलं : 'संतापू नका, वासनांपासून मुक्त राहा, शपथ घेऊ नका, न्यायालयात जाऊ नका, भांडू नका.' जर या आज्ञांमधील सत्य आणि ते आचरणात आणायची संभाव्यता मान्य करण्यात आली तर टॉलस्टॉय यांचं म्हणणं होतं की त्यानुसार आचरण करताना येणाऱ्या अडचणी आणि होणारी गैरसोय यांचं कारण सांगून त्यांना अडगळीत टाकता येऊ शकत नाही. येशूची शिकवण एक तर बरोबर असू शकते वा चूक. सत्य हे विशिष्ट परिस्थितीत सत्य आहे आणि आपल्याला जेव्हा ते सोयीस्कर राहत नाही तेव्हा ते सत्य सत्य राहत नाही असं म्हणता येऊ शकत नाही. जर त्यामुळे गैरसोय होत असेल तर चूक सत्याची नसते, आपल्या विकृत जीवनाची असते. येशूच्या शिकवणुकीतील न्याय आणि सत्य मान्य असेल तर मग कांगावा करण्यासाठी काहीच जागा नाही.

प्रत्येक माणसाच्या संपूर्ण जीवनाला आणि सर्व मानवजातीला स्पर्श करणाऱ्या येशूच्या पाच आज्ञांची परिपूर्ती केल्यामुळेच व्यक्ती आणि समाज यांचं खरं कल्याण होऊ शकते याबद्दल

टॉलस्टॉय पूर्णपणे आश्वस्त होते. त्या पाच आज्ञांनी विवेकाला केलेलं आवाहन टॉलस्टॉय यांना इतकं अपरिहार्य वाटत होतं की ते निसर्ग नियमांप्रमाणे वस्तुनिष्ठ दृष्टीनं सिद्ध केलेले नियम आहेत अशी त्यांची धारणा होती. श्रीयुत एंजलहार्ट यांना टॉलस्टॉय यांनी लिहिलं : 'आता असं दिसतं की येशू आणि त्याची शिकवण अस्तित्वात नसती तरी मला स्वतःला या सत्याचा शोध लागू शकला असता.'

सत्यासमोर त्यांनी स्वीकारलेली संपूर्ण शरणागती व सदसद्विवेकबुद्धी आणि विवेकानं काढलेले तर्कशुद्ध निष्कर्ष यांनी कुठंही नेलं तरी त्यानुसार निर्भयपणे आचरण करायचं सामर्थ्य, आणि आपली चूक लक्षात आली की निःसंकोचपणे आपलं पाऊल मागे घ्यायची तयारी यात टॉलस्टॉय यांचं मोठेपण सामावलेलं आहे. टॉलस्टॉय यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणाऱ्या गांधीजींच्या जीवनातही ह्याच गोष्टींना मूलमंत्रासारखं स्थान मिळालेलं होतं.

बारीकसारीक दोष काढणारे टीकाकार टॉलस्टॉय यांना विचारायचे, 'बरं..... लिओ निकोलविच तुम्ही लोकांना उपदेश करता पण तुमच्या वर्तनाचं काय?' आपल्या नितांत प्रांजळपणानं आणि नम्रपणानं विरोधकाला निःशस्त्र करत टॉलस्टॉय म्हणायचे, 'माझी तीव्र इच्छा असली तरीही मी उपदेश देऊ शकत नाही. मी केवळ 'माझ्या वर्तनाद्वारेच' उपदेश करू शकतो, आणि माझं दुर्दैव असं की माझं वर्तनच वाईट आहे ! मी जे काही बोलतो ते उपदेश नाही तर ख्रिश्चन धर्माचा जो चुकीचा अर्थ लावण्यात आला आहे तो अर्थ दुरुस्त करायचा व खरा अर्थ सांगायचा माझा प्रयत्न आहे.' येशूच्या शिकवणुकीप्रमाणे आचरण केल्याशिवाय विवेकी जीवन जगता येऊ शकत नाही. तर मग तुम्ही येशूच्या आज्ञांची परिपूर्ती का करत नाही या पुढील प्रश्नाचं स्पष्ट, प्रामाणिक आणि सरळसरळ उत्तर देत टॉलस्टॉय म्हणाले :

मी भयानक प्राणी आहे आणि त्या आज्ञांची परिपूर्ती मी करत नाही म्हणून मी दोषाला आणि घृणेला पात्र आहे. परंतु तरीही, माझ्या वर्तनाच्या समर्थनार्थ नाही तर स्पष्टीकरणार्थ मी सांगतो की : तुम्ही माझ्या आधीच्या जीवनाचा आणि आताच्या जीवनाचा विचार करा आणि

तुम्हाला आढळेल की मी त्यांच्या परिपूर्तीचा प्रयत्न करतो आहे. मी त्यांच्या एक हजाराव्या भागाचीही परिपूर्ती करत नाही हे खरं आहे व त्यासाठी मी दोषालाही पात्र आहे; परंतु याचा अर्थ असा नाही की मी त्यांची परिपूर्ती करू इच्छीत नाही, मी त्यांची परिपूर्ती करू शकत नाही कारण ती कशी करावी हे मला कळत नाही आणि त्यामुळे मला त्यात अपयश येतं. ज्या मोहांच्या जाळ्यात मी सापडलो आहे त्यातून कसं सुटायचं ते तुम्ही मला शिकवा, मला मदत करा आणि मी त्या आज्ञांची परिपूर्ती करायचा प्रयत्न करेन; परंतु मदतीशिवायही असं करायची माझी इच्छा आहे व मी तसं करू शकेन अशी मला आशा आहे. मला दोष द्या, मी मलाही दोष देतो आहे, मला दोष द्या परंतु मी ज्या मार्गावरून जातो आहे त्या मार्गाला दोष देऊ नका. तो कुठं जातो ते मला विचारणाऱ्या लोकांना मी दाखवत आहे ! मला जर माझ्या घराचा रस्ता माहीत असेल व त्यावरून मी दारू पिऊन एका बाजूनं दुसऱ्या बाजूला झोकांड्या खात जात असेन तर त्यामुळे मी चालत असलेला मार्ग चुकीचा ठरतो काय? तो जर चुकीचा असेल तर मला दुसरा मार्ग दाखवा; मी जर रस्ता चुकलो असेन व मी लटपटत असेन तर मला योग्य मार्गावर न्या आणि मला मदत करा जसा मी तुम्हांला मदत करायचा प्रयत्न करतो आहे. परंतु मला गोधळवू नका, मी भटकलो याचा आनंद मानू नका, आनंदित होऊन उद्गारू नका : याच्याकडे पाहा ! तो म्हणतो आहे की मी घरी चाललो आहे परंतु तो दलदलीत चालला आहे!.... पहा मी एकटा आहे आणि दलदलीत फसायची मी इच्छा करू शकत नाही. मला मदत करा ! [लिओ टॉलस्टॉय, *व्हाट देन मस्ट वुई डू?* अनुवादक अलेमेर मॉड, पृष्ठ ३९१-९२]

१९२८ साली टॉलस्टॉय याच्या जयंतीच्या समारंभात 'आधुनिक युगानं निर्मिलेला अहिंसेचा सर्वात मोठा प्रेषित' असं टॉलस्टॉय यांचं वर्णन करत टॉलस्टॉय यांना सार्वजनिक श्रद्धांजली वाहत गांधीजी म्हणाले की 'टॉलस्टॉय जे शिकवायचे त्यानुसार ते वर्तन करायचे आणि कितीही किंमत द्यावी लागली तरी सत्याचा शोध घेणं त्यांनी थांबवलं नाही. त्यांनी सत्याला लपवायचा वा त्याचं महत्त्व कमी करायचा कधी प्रयत्न केला नाही. त्यांनी ते जगासमोर स्पष्ट

भाषेत आणि कोणत्याही प्रकारची तडजोड न करता मांडलं व तसं करताना ते जगाला वा सत्ताधाऱ्यांना घाबरले नाहीत.'

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्या जीवनातील साधेपणा. उच्च आणि श्रीमंत घरंदाज घराण्यातील सुखासीन वातावरणात जन्म घेतलेल्या टॉलस्टॉय यांना जीवनातील सर्व विलासांची माहिती होती व तरीही त्यांनी त्याकडे आपल्या ऐन तारुण्यात पाठ वळवली आणि मग त्याकडे परत कधी वळूनही पाहिलं नाही.

गांधीजी पुढं म्हणाले की टॉलस्टॉय यांच्या शिकवणुकीतील तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांनी मांडलेला 'भाकरीसाठी श्रमाचा' सिद्धान्त. रशियन पंडितानं सांगितलं आहे की माणसाला भरडून टाकणारी या जगातील बहुतांश दुःखं या सिद्धान्ताचं अनुसरण न केल्यामुळेच निर्माण झालेली आहेत. 'त्यामुळे जेव्हा श्रीमंत लोक शारीरिक श्रमापासून अंग चोरतात आणि ऐषआरामात व विलासात राहणं सुरू ठेवतात व सर्व सामान्य लोकांची गरिबी दूर करण्यासाठी दांभिकतेनं व ढोंगीपणानं दानधर्माचे प्रयत्न करतात तेव्हा टॉलस्टॉय यांचा त्यांच्या त्या प्रयत्नांवर अगदीच विश्वास नसतो. त्यांनी सुचवलं की श्रीमंत लोक जर केवळ गरिबांच्या पाठीवरून उतरले तर त्यांच्या बऱ्याचशा दानशूरपणाचा काहीही उपयोग राहणार नाही.'

टॉलस्टॉय जीवनात पूर्णपणे अपयशी राहिलेले आहेत; 'ज्या गूढ हिरव्या काठीच्या' शोधात त्यांनी आपलं सर्व आयुष्य घालवलं त्या आदर्शाचा शोध त्यांना कधीच लागला नाही अशी टीका जे टीकाकार टॉलस्टॉय यांच्यावर करत होते होते त्यांना गांधीजींनी सणकून उत्तर दिलं. गांधीजी उद्‌गारले की जास्तीत जास्त एवढंच म्हणता येईल की त्यांना स्वतःच्या आदर्शाचा शोध लावण्यात अपयश आलं. परंतु ही तर माणसासाठी अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. जोपर्यंत माणूस देहधारी आहे तोपर्यंत तो परिपूर्णता कधीच प्राप्त करू शकत नाही. जोपर्यंत माणसाचा अहंकार कायम आहे तोपर्यंत आदर्श अवस्थेत माणूस पोहोचू शकत नाही हे याचं साधं कारण आहे, व जोपर्यंत माणूस देहाच्या बंधनानं बांधलेला आहे तोपर्यंत त्याची अहंकारातून पूर्णपणे

मुक्तता होऊ शकत नाही. 'टॉलस्टॉय यांचं प्रसिद्ध वचन आहे की माणसाचा ज्या क्षणी विश्वास होतो की आपण आदर्शापर्यंत पोहोचलो आहोत त्याक्षणीच त्याची पुढील प्रगती थांबते व त्याच्या अधोगतीला सुरुवात होते. आदर्शाचा गुण हा असतो की आपण त्याच्याजवळ गेल्यासारखं जसं आपल्याला वाटतं तसं ते अजून पुढे जातं.' त्यामुळे टॉलस्टॉय यांना त्यांच्या आदर्शात अपयश आलं असं म्हटल्यामुळे टॉलस्टॉय यांच्या चारित्र्यावर थोडासाही डाग पडत नाही; त्यातून त्यांची नम्रता तेवढी दिसते.

हीच गोष्ट त्यांच्यातील विसंगतीलाही लागू होते. गांधीजींचं मत होतं की त्या काल्पनिक अधिक आणि खऱ्या कमी आहेत. 'सतत विकसित होत जाणं हा जीवनाचा नियम आहे. जो माणूस आपली सुसंगती राखण्याकरिता आपल्या अंधश्रद्धांना चिकटून राहतो तो माणूस स्वतःलाच चुकीच्या मार्गानं नेतो. टॉलस्टॉय यांच्यातील तथाकथित विसंगतीची उदाहरणं ही त्यांच्या विकासाची आणि त्यांच्या सत्यावर असलेल्या उत्कट प्रेमाची लक्षणं आहेत. त्यांचं वर्तन अनेकदा 'विसंगतीपूर्ण दिसायचं' कारण ते सतत आपल्या सिद्धान्ताचा विकास करत होते. 'त्यांचं अपयश सार्वजनिक असायचं, त्यांचा संघर्ष आणि त्यांचे विजय खाजगी असायचे. जगाला केवळ पहिली गोष्ट दिसत होती, टीकाकारांनी त्यांच्या दोषांचं भांडवल करायचा प्रयत्न केला. गांधीजी म्हणाले की ते स्वतःचे जेवढे कठोर टीकाकार होते तेवढा त्यांचा कठोर टीकाकार कोणीच नव्हता. 'आपल्या उणिवांबद्दल सतत जागृत असल्यामुळे त्यांच्या टीकाकारांनी त्यांच्या दोषांकडे बोट दाखवायच्या आधीच ते ती उणीव हजारपट मोठी करून जगात घोषित करायचे आणि त्यासाठी त्यांना आवश्यक वाटत असलेलं प्रायश्चित्तही घ्यायचे. टीकेचं - ती अतिशयोक्त असली तरी - ते स्वागत करायचे आणि जगातील सर्व महापुरुषाप्रमाणे स्तुतीला घाबरायचे. ते त्यांच्या अपयशातही महान होते आणि त्यांच्या अपयशांनी त्यांच्या आदर्शातील वैय्यर्थ दर्शवलेलं नाही तर त्यांच्या यशाचं दर्शन घडवलेलं आहे.

आतापर्यंत संशोधन न झालेल्या आत्म्याच्या क्षेत्रातीलच टॉलस्टॉय हे आद्य संशोधकच नव्हते तर अहिंसक शासनविरहित समाज व्यवस्थेचेही ते प्रवर्तकही होते. परंतु त्यांनी आपल्या संशोधनाची व्यवस्थित मांडणी केली नाही. त्यांचे उद्‌गार हे त्यांच्या मूलभूत प्रतिभेचे निदर्शक होते, विसाल मनाचे प्रचंड भाग होते. यास्नाया पोल्याना येथील ऋषीनं ज्या आध्यात्मिक आणि सामाजिक सत्याचा शोध लावला होता त्याला भारतातील प्राचीन ऋषींनी अधिक व्यवस्थित, सूत्रबद्ध आणि वैज्ञानिक पद्धतीनं मांडलं असल्याचं गांधीजींना आढळलं. दोघांनी वेगवेगळ्या गृहीतकांनी सुरुवात केली होती. टॉलस्टॉय यांचा जन्म परंपरागत ख्रिश्चन कुटुंबात झाला होता. अठराव्या शतकातील प्रस्थापित चर्चच्या परंपरेतील ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीमधील कालबाह्य भाग त्यांना काढून टाकायचा होता आणि येशूच्या शिकवणुकीच्या खऱ्या तत्त्वांची त्या ठिकाणी प्रस्थापना करायची होती. उलटपक्षी गांधीजींना परंपरागत हिंदुत्वातील दोषांशी लढा द्यायचा होता. त्यांचा लढा सनातनी शास्त्री मंडळींशी होता. ते अस्पृश्यतेला हिंदू धर्माचा अंगभूत भाग मानत होते, विधवांच्या पुनर्विवाहाला विरोध करत होते व हिंदू धर्माला कर्मकांडात आणि स्पृश्यास्पृश्यतेत बंदिस्त करत होते. पुनर्जन्म, आत्म्याचं देहांतर, शपथ घ्यायची प्रथा, ईश्वरासंबंधीचा व्यक्तिसापेक्ष आणि व्यक्तिनिरपेक्ष दृष्टिकोन, वैयक्तिक अमरत्व आणि अवतार कल्पना अशा काही आध्यात्मिक प्रश्नांकडे पाहायचे त्यांचे दृष्टिकोन भिन्न होते. परंतु दोघांच्याही आध्यात्मिक श्रद्धा त्यांच्या अंतर्गत प्रकाशावर आधारित असल्यामुळे व तिची अभिव्यक्ती माणसाच्या विवेकाच्या माध्यमातून होत असल्यामुळे ते अनेक बाबतीत भिन्न मार्गानं पण एकाच मुक्कामावर पोहोचले. तिकडे टॉलस्टॉय यांनी जाहीर केलं की त्यांची अप्रतिकाराच्या आज्ञेवरील श्रद्धा व्यक्ती आणि समाज यांसाठी जीवनाचा नियम म्हणून आहे व तिचं अस्तित्व बायबल, चर्च आणि एवढंच नाही तर येशूवरही अवलंबून नाही. आणि जर येशूचा जन्म झाला नसता तर आपल्याला स्वतःला त्या तत्त्वाचा शोध लागला असता. इकडे गांधीजींचं म्हणणं होतं की गीतेतील युक्तिवादाच्या आधारावर जरी त्यांनी अहिंसेचा निष्कर्ष काढला असला तरी

अहिंसेवरील त्यांच्या श्रद्धेचा गीतेशी काही संबंध नाही आणि गीतेच्या लेखकाच्या मनात गीता लिहिताना काहीही विचार असला तरी त्यामुळे आपला निष्कर्ष प्रभावित होणार नाही.

अहिंसा आणि इतर गोष्टींच्या मर्यादेसाठी गीतेच्या लेखकाच्या मनाचा शोध घ्यायची आपल्याला आवश्यकता नाही. कारण कवी विशिष्ट सत्य जगासमोर मांडतो, त्याचा अर्थ असा नसतो की त्याला त्याच्या सर्व परिणामांची त्यावेळी कल्पना असते वा त्यानं त्यांचा विचार केलेला असतो, व त्यानं तसं केलेलं असलं तरी त्यानं त्याचा सर्व अर्थ व्यक्त केलेलाच असेल असंही नाही. [महादेव देसाई, *गीता ॲकॉरडिंग टू गांधी*, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, पृष्ठ १३३]

गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानात आणि सामुदायिक अहिंसेत टॉलस्टॉय यांनी घातलेली वैशिष्ट्यपूर्ण भर अशी आहे : (अ) वैशिष्ट्यानं पंचेचाळीस कोटी लोकसंख्या असलेल्या देशातील लोकांच्या जाणिवेत महत्त्वाचे सूक्ष्म परिवर्तन करण्यात आलं. (ब) विचार ही कृतीची जननी असल्यामुळे विरोधकाच्या अंतःकरणात बदल करण्यासाठी बचावाची भावना निर्माण न होऊ देता विरोधकाला त्याच्या विचारातील दोष दाखवणं वा त्याला ते दोष पाहायला मदत करणं पुरेसं आहे. गांधीजींचं म्हणणं होतं की असं केल्यानंतर माणूस पूर्वीचा राहत नाही; वर्तनातील परिवर्तन त्यामागोमाग व्हायलाच पाहिजे. (क) मानवी मनाच्या कार्यप्रणालीबद्दल आणि सामाजिक परिवर्तनाबद्दल टॉलस्टॉय यांनी दाखवलेली अंतर्दृष्टी. ज्या माणसानं बळाचा त्याग करायचं ठरवलेलं असतं त्याच्याजवळ संघटनेला आणि जनसमुदायाला अहिंसक कार्याची शिस्त लावण्यासाठी आणि विरोधकाच्या प्रतिकारावर मात करण्यासाठी मानवी स्वभाचं आणि माणसाची काम करायची पद्धत यांच्या ज्ञानाशिवाय इतर काहीच साधनं नसतात. गांधीजींना टॉलस्टॉय यांच्याकडून मिळालेल्या अंतर्दृष्टीचा गांधीजींना राजकीय आणि सामाजिक कार्य करताना फार मोठा उपयोग झाला.

दक्षिण आफ्रिका आणि भारतात गांधीजींना अतिशय विपरीत परिस्थितीत प्रखर लढा द्यावा लागला असताना ते वारंवार टॉलस्टॉय यांच्याकडे प्रेरणेचा अविरत स्रोत म्हणून पाहत होते.

ज्याला अरुंद दऱ्या, सुळके, कडे वा उंच चढणीवरील पाय रोवण्यासारख्या जागा या सर्व गोष्टींची माहिती असते अशा गिर्यारोहणातील मार्गदर्शकाचं टॉलस्टॉयमध्ये गांधीजींना दर्शन झालं. गांधीजींनी जेव्हा प्रेमाच्या नियमानुसार कार्य करायला सुरुवात केली तेव्हा टॉलस्टॉय यांच्यासमोर निर्माण झालेल्या समस्यांची त्यांनी जी उत्तरं शोधून काढली होती त्यांचा गांधीजींसमोरील समस्यांसाठी तयार उत्तरांसारखा उपयोग झाला. टॉलस्टॉय उत्तरं देण्यासाठी ज्या बोधकथा आणि रूपककथांचा उपयोग करायचे त्या बोधकथा आणि रूपककथा यांचा गांधीजी केवळ उपयोगच करत नव्हते तर टॉलस्टॉय यांच्या भाषेचाही गांधीजी उपयोग करायचे. काही प्रख्यात वकिलांनी आपला व्यवसाय बंद केला तरी त्यामुळे ब्रिटिश न्यायव्यवस्था बंद पडणार नाही असा आक्षेप काही लोकांनी १९२० सालच्या असहकाराच्या काळात घेतला असता गांधीजी जवळपास टॉलस्टॉय यांच्याच भाषेत म्हणाले की काही प्रख्यात वकिलांनी आपला व्यवसाय बंद केला तर त्यामुळे ब्रिटिश न्यायव्यवस्था बंद पडणार नाही हे खरं आहे, परंतु व्यवसायातील काही प्रख्यात लोकांनी व्यवसाय बंद केला तर त्यामुळे ब्रिटिश न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा काढून घेतल्यासारखी होईल व 'त्या प्रमाणात ब्रिटिश सरकारचीही प्रतिष्ठा कमी होईल.' त्याचप्रमाणे रवींद्रनाथ टागोर यांच्याबरोबर गांधीजींचा चरखा आणि परदेशी कापडावरील बहिष्कार यासंबंधी जो प्रसिद्ध वाद होता त्यावेळी गांधीजी जवळपास टॉलस्टॉय यांच्याच भाषेत म्हणाले होते की यातना भोगणाऱ्या आजाऱ्याच्या यातना कबिराच्या दोह्यांच्या आधारानं कमी करता येत असल्याचं मला आढळलेलं नाही. टॉलस्टॉय म्हणाले होते, 'प्रेम मूर्ख असू शकत नाही. एखाद्या उपाशी मरणाऱ्या माणसावरील प्रेमामुळे आपण जर त्याला कादंबऱ्या वाचून दाखवू लागलो तर तो तसं करू देणार नाही.... त्याचप्रमाणे मानवजातीच्या प्रेमामुळे पोट भरलेल्या माणसांचं आपण रंजन करत राहिलो व गरिबांना थंडी आणि उपासमारीनं मरू देऊ लागलो तर ते प्रेम आपल्याला तसं करू देणार नाही.' एवढंच नाही तर गांधीजींवर १९२२ साली भरण्यात आलेल्या प्रसिद्ध खटल्याच्या दरम्यान न्यायाधीश ब्रुमफिल्ड यांना गांधीजी म्हणाले होते:

'कायद्यानं करता येण्यासारखी मला कठोरतम शिक्षा करा कारण कायद्यानुसार तो जाणीवपूर्वक केलेला अपराध आहे आणि मला ती गोष्ट नागरिकाचं सर्वोच्च कर्तव्य आहे असं वाटते.' या विधानात टॉलस्टॉय यांनी झारला जे आव्हान दिलं होतं त्याचा प्रतिध्वनी आढळतो : 'सरकार ज्याला अपराध मानते आणि जे करणं ईश्वराप्रती माझं सर्वोच्च कर्तव्य वाटते ते कार्य करणं मी सुरू ठेवणार आहे.'

आपल्या गुरूप्रमाणेच गांधीजींचंही आपल्या बायकोशी, मुलाशी व कुटुंबातील सदस्यांशी कौटुंबिक प्रेम आणि विश्वप्रेम यांच्यात होणाऱ्या संघर्षामुळे भांडण व्हायचं. आपल्या मुलांचं भवितव्य सुरक्षित करायचा प्रयत्न करताना गांधीजींनी गुरूच्या पावलावरच पाऊल टाकलं. शारीरिक श्रमाची गरज पडू नये असं शिक्षण गांधीजींनी आपल्या मुलांना दिलं नाही तर जीवनातील समस्यांना आपल्या श्रमानं तोंड देता येईल असं शिक्षण गांधीजींनी त्यांना दिलं.

प्रेमाच्या नियमाच्या आर्थिक बाजूचं दर्शन टॉलस्टॉय यांनी गांधीजींना जेवढ्या स्पष्टपणे घडवलं तसं कोणीच घडवलं नाही. भारतातील बहुसंख्यक लोकांच्या दारिद्र्याचा प्रश्न श्री. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्यापासून तर गोखले, टिळक आणि रानडे यांच्यापर्यंत सर्वांना भेडसावत होता. दक्षिणेश्वराच्या संताचा उपाय दानधर्मापलीकडे गेलेला नव्हता, व त्यांच्या अनुयायांना भाबडेपणानं वाटत होतं की अमेरिकेच्या मानवताप्रेमी कार्यामुळे ही समस्या सुटू शकेल. गोखले, टिळक आणि स्वदेशी चळवळीच्या पुरस्कर्त्यांचा विश्वास होता की ब्रिटिश भांडवलाची जागा भारतीय भांडवलानं घेतली आणि आधुनिक औद्योगिक व्यवस्थेत भारताबाहेर जाणारा पैसा वाचवला तर भारताच्या सार्वजनिक दारिद्र्याचा प्रश्न सोडवता येईल. टॉलस्टॉय यांच्यापूर्वी कोणीच कल्पना केली नव्हती की गरिबांच्या गरिबीचं कारण श्रीमंतांचा आळशीपणा आहे. त्यामुळे गरिबांना खरोखरी मदत करायची असेल व 'आपल्या काळातील गुलामगिरी थांबवावयाची असेल तर आहेरेच्या वर्गानं आधी गरिबांच्या पाठीवरून उतरायला पाहिजे आणि आपल्या मेहनतीवर जगणं शिकायला पाहिजे. सूतकताई, हातमाग वगैरेसारखे

मेलेले वा मरू घातलेले जे अहिंसक गृहोद्योग भारतात होते त्यांचं पुनरुज्जीवन करून अहिंसक, शोषणविरहित समताधिष्ठित समाज निर्माण करायच्या गांधीजींच्या योजनेमागे टॉलस्टॉय यांचा हा विचारच प्रामुख्यानं होता. 'गांधीवादाचा संस्थापक टॉलस्टॉय आहे' या जी. एफ. कानन यांच्या विधानात भर घालून आपण म्हणू शकतो : आणि त्याचप्रमाणे : महात्म्याचा म्हणून काही संप्रदाय आहे असं अमान्य करणारेही गांधीजीच होते.

आपला संपूर्ण विचार कुठेही अमलात आणला गेलेला पाहण्यासाठी वा त्याची सविस्तर योजना तयार करण्यासाठी टॉलस्टॉय जिवंत राहिले नाहीत. परंतु प्रभावी सामुदायिक कृती करण्यासाठी तिचा उपयोग करण्यापूर्वी तिच्यात दोन गोष्टींची भर घालणं आवश्यक आहे. एक म्हणजे अहिंसक शिस्त आणि समुदायाची संघटना तयार करण्यासाठी आवश्यक तंत्र. आणि दुसरी गोष्ट म्हणजे परिपूर्णतेच्या ध्येयाकडे जाण्यासाठी अपरिपूर्ण साधनांचा उपयोग करायचं तंत्र. विधायक कार्याद्वारे गांधीजींना पहिल्या प्रश्नाचं उत्तर सापडलं. दुसऱ्या भागाविषयीच्या गांधीजींच्या संशोधनाचं वैशिष्ट्य हे होतं की, टॉलस्टॉय यांच्या अप्रतिकाराच्या तत्त्वाची सामुदायिक पातळीवर अमलबजावणी करण्यासाठी गांधीजींना अहिंसेच्या सिद्धान्तावर पूर्ण विश्वास असणाऱ्या लोकांची गरज नव्हती. सत्याग्रहशास्त्रात प्रवीण असलेल्या आपल्या नेत्याबरोबर काम करताना आलेले अनुभव आणि त्याच्यावरील विश्वास यांमुळे ही श्रद्धा निर्माण होईल असा गांधीजींचा विश्वास होता.

टॉलस्टॉयप्रमाणेच गांधीजींचाही विश्वास होता की 'आदर्श राज्य हे शिस्तशीर अराजक असेल'. त्यात प्रत्येकजण आपल्या शेजाऱ्याच्या मार्गात आपला अडथळा कधीच होणार नाही अशा प्रकारे स्वतःला अनुशासित करील. परंतु त्यांच्यातील व्यावहारिक आदर्शवाद्याला माहीत होतं की हा आदर्श कधीच वास्तवात येऊ शकत नाही. सर्व प्रकारच्या व्यावहारिक कारणांसाठी शासन होतं आणि राहणारही आहे. आणि आपलं नाव सार्थ करू इच्छिणारं कोणतंही सरकार अराजक सहन करू शकत नसल्यामुळे 'मुख्यत्वेकरून अहिंसक सरकार - जे सरकार किमान

राज्य करील' हाच ताबडतोब अमलात आणण्यासारखा उपाय गांधीजींना दिसत होता. शासनव्यवस्था पूर्णपणे नष्ट न करता अहिंसेचा पाठिंबा असलेली प्रातिनिधिक लोकशाही हा तो तात्कालिक उपाय होता.

टॉलस्टॉय यांच्याप्रमाणे गांधीजींनी राष्ट्रीयत्वाचा आणि राष्ट्रभक्तीचा पूर्णपणे निषेध केलेला नाही. स्वदेशीच्या तत्त्वावर आधारित त्यांचा राष्ट्रवाद कोणत्याही प्रकारचे अधिकार न देता आपल्या निकटच्या शेजाऱ्यांबद्दलच्या कर्तव्याची आपल्यावर जबाबदारी टाकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीयत्वाकडे जाण्यासाठी टाकलेल्या पहिल्या पावलाचं स्वरूप त्याला आलं. इतर अनेक गोष्टींप्रमाणेच या बाबतीत या दोघांमध्ये जे अंतर आढळून येतं त्याला कारण विशिष्ट अंगावर देण्यात आलेला भर आणि दृष्टिकोनातील अंतर आहे; मूलभूत विचारातील अंतर नाही.

टॉलस्टॉय यांच्या अपरिग्रहाच्या सिद्धान्ताचं गांधीजींच्या विचारसरणीत विश्वस्ताच्या कल्पनेत रूपांतर झालं. संपूर्ण असंग्रह ही अमूर्त कल्पना आहे असं गांधीजींचं म्हणणं होतं. एवढंच नाही तर आपला भौतिक देह आणि आपली प्रतिभा, मग ती जन्मजात असो वा अर्जित, संग्रहच आहे. परंतु अशा संग्रहवृत्तीतून - जी सर्व वाईटाचं खरं मूळ आहे आणि सर्व भौतिक संपत्तीचा त्याग केल्यानंतरही जी राहू शकते - माणसाची सुटका झाली तरी पुरे आहे. त्याचप्रमाणे माणसामाणसामधील भेद हा निसर्गाचा नियम आहे; झाडाची दोन पानंही अगदीच सारखी नसतात. त्यामुळे सतत निर्माण होत जाणाऱ्या या विषमतेला निष्क्रिय करायचा व तिचा अवशिष्ट भाग असलेल्या मालकीहक्काचे दुष्परिणाम नष्ट करायचा एकमेव मार्ग म्हणजे आपली सर्व भौतिक संपत्ती तसंच आपली नैसर्गिक आणि अर्जित प्रतिभा वगैरे सर्वार्थानं आपल्या आहेत असं न समजता त्या ईश्वरानं आपल्याला त्याच्या सेवेसाठी म्हणजे समाजाच्या सेवेसाठी विश्वस्त म्हणून दिलेल्या ठेवी आहेत असं समजायला हवं.

शासन आपल्या सत्तेचं कशाप्रकारे संरक्षण करते याचं विश्लेषण करताना टॉलस्टॉय यांनी अहिंसक क्रांती कशी करता येईल याची योजनाही मांडली होती. *द किंगडम ऑफ गॉड इज*

वुइदिन यू या ग्रंथात गांधीजींच्या अहिंसक असहकाराच्या कार्यक्रमाचा जवळपास संपूर्ण आराखडा आला आहे. गांधीजींनी टॉलस्टॉय यांच्या अप्रतिकाराच्या सिद्धान्ताला कसं व्यावहारिक रूप दिलं आणि त्यानुसार केलेल्या आंदोलनाद्वारे भारताचं स्वातंत्र्य मिळवलं हे आपण नंतर पाहणार आहोत. यासाठी गांधीजींना दोन विद्वानांची - रस्किन आणि हेन्री डेव्हीड थोरो - कशी मदत झाली आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा टॉलस्टॉय यांच्या तत्त्वज्ञानाशी गांधीजींनी कसा मेळ घातला हे आपण पुढील खंडात पाहू.

प्रकरण ६: परत मातृभूमीला

१

प्रिटोरिया येथील गांधीजींच्या मिशनरी मित्रांना गांधीजींबद्दल जशी काळजी वाटत होती तशीच काळजी गांधीजी डरबन येथे गेले असता डरबनमधील मिशनरी मित्रांनाही वाटू लागली. इथं दक्षिण आफ्रिकी जनरल मिशनचे स्पेन्सर वाल्टन गांधीजींची आध्यात्मिक काळजी घेत होते. ते बेकरप्रमाणे कडवे बायबलवादी नसले तरी लोकांची मनं जिंकायचा वाल्टन यांचा आपला स्वतःचाच एक मार्ग होता. सौजन्यशील, सहनशील आणि समंजस स्वभावाच्या वाल्टन यांनी गांधीजींना ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करायचा कधीही आग्रह धरला नाही, परंतु गांधीजींसमोर त्यांनी आपलं जीवन एखाद्या उघड्या पुस्तकाप्रमाणे ठेवलं. श्रीमती वाल्टन चांगुलपणात त्यांच्या रतीभरही मागे नव्हत्या. परंतु आध्यात्मिक पाल्य आता अननुभवी राहिलेला नव्हता. आता त्याला वेगात पंखं फुटू लागले होते. कितीही चर्चा केली तरी त्यांच्यातील मूलभूत मतभेद कमी होत नव्हते. परंतु प्रामाणिकपणा, नम्रता आणि औदार्य या त्यांच्या गुणांनी गांधीजींच्या मनावर खोल ठसा उमटवला आणि गांधीजींना ते आणि त्यांना गांधीजी निकटवर्तियांसारखे वाटू लागले - धार्मिक श्रद्धेच्या बाबतीत नव्हे तर शोधक म्हणून.

निवांतपणे धर्माचा अभ्यास करायचे प्रिटोरियातील गांधीजींचे दिवस आता संपले होते. सार्वजनिक कार्य त्यांचा अधिकाधिक वेळ घेऊ लागलं होतं. तरीही त्यांनी बरंच वाचन केलं. श्रीमद राजचंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली गांधीजींनी सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास सुरू केला. कवी नर्मदाशंकर यांच्या धर्मविचार या ग्रंथानं - ज्यात कवीनं आपल्या धार्मिक अभ्यासामुळे आपल्या सैल जीवनात कशाप्रकारे परिवर्तन झालं त्याचं वर्णन केलं होतं - गांधीजींना फार प्रभावित केलं. थिऑसॉफिकल सोसायटीनं इंग्रजीत अनुवादिलेल्या उपनिषदाचं वाचन त्यांनी केलं तसंच मॅक्स मुल्लरच्या इंडिया - *व्हाट कॅन इट टीच अस?*, वाशिंग्टन अर्विंग यांच्या *लाईफ*

ऑफ महमत अँड हिज सक्सेसर आणि *सेईंग्ज ऑफ झरतुष्ट्र* याही ग्रंथांचं वाचन इथं असताना गांधीजींनी केलं.

पतंजलीच्या योगसूत्र या ग्रंथात मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि चित्तशुद्धी करण्यासाठी काही यौगिकक्रिया अतिशय वैज्ञानिक पद्धतीनं आणि मानसशास्त्रीय अंतर्दृष्टीनं सांगितलेल्या आहेत. त्या शिकायची रशियन ऋषीला ज्याप्रमाणे इच्छा झाली होती तशीच गांधीजींनाही इच्छा झाली. त्यांनी योगसाधनेनुसार काही प्रयोग सुरू केले परंतु अनुभवी मार्गदर्शक नसल्यामुळे त्यांना त्यात प्रगती करता येऊ शकली नाही. त्यांनी अपेक्षिल्याप्रमाणे भारतात आल्यानंतरही त्यांना आपले प्रयोग परत सुरू करता आले नाही. योगक्रिया शिकायची त्यांची इच्छा अखेर इच्छाच राहिली. परंतु माणसाच्या उच्च आध्यात्मिक शक्तीच्या जागृतीचं साधन म्हणून आणि आत्म्यात दडलेल्या असीम सामर्थ्याला मुक्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या एकाग्रतेचं साधन म्हणून योगशक्तीचं महत्त्व गांधीजी सतत सांगायचे.

धर्माच्या अभ्यासामुळे गांधीजींना वाल्टनशिवाय अजून एका ख्रिश्चन कुटुंबाजवळ आणलं. वेस्लियन चर्चच्या निमंत्रणानुसार गांधीजींनी रविवारी त्या चर्चमध्ये जायला सुरुवात केली. परंतु तिथली प्रवचनं निरस आणि निर्जीव असायची व त्यामुळे अनेकदा इच्छा नसतानाही आपल्याला डुलकी लागत असल्याचं गांधीजींना आढळायचं. तशीच अवस्था इतर अनेकांचीही असल्याचं त्यांना जेव्हा आढळलं तेव्हा त्यांनी तिथं जाणं थांबवलं.

त्यानंतर थोड्याच दिवसात या ख्रिश्चन कुटुंबाशी येणारा त्यांचा संबंध एका आश्चर्यजनक परिस्थितीमुळे थांबला. त्यांनी गांधीजींना रविवारी जेवायला यायचं कायम निमंत्रण देऊन ठेवलं होतं व गांधीजीही अनकेदा त्या निमंत्रणानुसार त्यांच्याकडे जायचे. त्यांच्या यजमानबाईंना एक अतिशय लाडका मुलगा होता आणि गांधीजीमध्ये मुलांना आपलंसं करून घ्यायचं खास कौशल्य होतं. त्यांच्या धार्मिक चर्चेत शाकाहारवाद अधूनमधून उसळी मारायचा. एके दिवशी गांधीजींनी बुद्धाच्या करुणेची स्तुती केली. पंगू झालेल्या कोकराबद्दल करुणा वाटल्यामुळे त्या

कोकराला बुद्ध खांद्यावर नेत आहे असं वर्णन एडविन अर्नोल्ड यांनी आपल्या *लाईट ऑफ आशिया* या ग्रंथात केलं होतं. त्याचा उल्लेख करत गांधीजी अतिशय निरागसपणानं म्हणाले की येशूमध्ये सर्व प्राणिमात्रांबद्दलची ही करुणा आढळत नाही. त्यांची यजमानबाई त्यामुळे दुखावली. अजाणता गांधीजींकडून दगड फेकला गेला होता. गांधीजींनी कौशल्यानं विषय बदलला आणि त्या बाईच्या दुखावलेल्या भावनांना दिलासा द्यायचा शक्य तेवढा प्रयत्न केला. परंतु फार उशीर झालेला होता, चूक होऊन गेलेली होती. जेवायच्या टेबलवर मांसापेक्षा सफरचंद कसे श्रेष्ठ असतात याचं गांधीजींनी वर्णन केलेलं असल्यामुळे यजमानबाईंचा मुलगा शाकाहाराच्या बाबतीत त्यांचा शिष्य झाला होता. त्या सज्जन बाईला वाटलं की धर्मांतराच्या प्रवाहाला उलट्या दिशेनं वाहू देणं बंद करायची वेळ आता आलेली आहे. तिनं सौजन्यानं गांधीजींना सांगितलं की शाकाहारासंबंधीचा तुमचा युक्तिवाद कुटुंबातील मोठ्या माणसांपर्यंतच मर्यादित ठेवा आणि लहान मुलांना त्यापासून मुक्त ठेवा. ती तक्रार करत म्हणाली की मुलगा आतापासूनच मांसाहारावर आक्षेप घेऊ लागला आहे आणि तसं करताना तुम्ही जे युक्तिवाद करता ते तो सांगतो. मुलाच्या प्रकृतीवर परिणाम व्हावा अशी माझी इच्छा नाही.

परिस्थितीची जाणीव होताच गांधीजींनी ताबडतोब तिला आश्वस्त करायचा प्रयत्न केला. त्यांच्या बोलण्याचा त्या दांपत्याच्या मुलावर जेवढा परिणाम होऊ शकणार होता किमान तेवढाच परिणाम ते जे काही खाणार होते त्याचाही त्या मुलावर होऊ शकणार होता. गांधीजींनी त्या बाईला सुचवलं की अशा परिस्थितीत मी तुमच्या घरी येणं बंद करणं उचित होईल. तसं म्हणत असतानाच त्यांनी तिला असंही सांगितलं की यामुळे आपल्या मैत्रीवर प्रभाव पडायचं काही कारण नाही.

त्या सज्जन बाईचा चेहरा उजळला. सहमती दर्शवत ती म्हणाली, 'मी आभारी आहे.'

२

आध्यात्मिक दृष्ट्या गांधीजींचा आधार पक्का होऊ लागला होता. धार्मिक अस्थिरता आता त्यांना छळत नव्हती. त्यांच्या मिशनरी मित्रांनी ख्रिश्चन धर्माचा जो विचार त्यांच्यासमोर मांडला होता त्यातून टॉलस्टॉयनी त्यांना मार्ग दाखवला होता. टॉलस्टॉय यांनी सांगितलं होतं की माणूस आपला धर्म न बदलताही खऱ्या ख्रिश्चनत्वाचं अनुसरण करू शकतो आणि ख्रिश्चन धर्म आणि हिंदू धर्म यांनी माणसाच्या वर्तनाबद्दल जे नियम सांगितले आहेत त्यांची भाषा वेगळी असली तरी ते मूलतः सारखेच आहेत. गांधीजींनी ख्रिश्चनत्वाचा आणि मिशनऱ्यांच्या कार्याचा नवीन दृष्टिकोनातून अभ्यास सुरू केला : उदाहरणार्थ 'नेटिव्हांविषयीचं त्यांचं धोरण' आणि 'नेटिव्हांचं जीवन'.

टॉलस्टॉय यांच्या धार्मिक शिकवणुकीचा आणि परंपरागत धर्मावर त्यांनी केलेल्या निघृण हल्ल्याचा परिणाम काळ्या खंडातही दिसू लागला होता. त्यामुळे सुशिक्षित आफ्रिकन ख्रिश्चन लोकांच्या अंतःकरणातही खळबळ माजली होती व ते ख्रिश्चन धर्माचं मूल्यन वेगळ्या तराजूनं करू लागले होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांनाही नवीन शिकवणुकीच्या प्रकाशात आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करावा लागत होता.

इन्कॅनिस्को या नेटिव्हांच्या वृत्तपत्रात *'खिश्चानिटी विरुद्ध नेटिव्ह'* या शीर्षकाखाली आलेल्या लेखमालेतील स्पष्ट विचारांचा सखोल ठसा गांधीजींच्या मनावर उमटला. लेखकाला आपलं नाव जाहीर न करणं सोयीचं वाटलं होतं. तो स्वतःच मिशनरी होता. मिशनऱ्यांच्या वर्तुळात ख्रिश्चन काफीर 'अपयशी झाल्याची सर्वसाधारण चर्चा होती. त्यावर भाष्य करत या लेखकानं लिहिलं की ख्रिश्चनत्व अपयशी झालेलं नसून धर्मगुरूंनी 'अधमपणाचं जे वातावरण' निर्माण केलं आहे ते अयशस्वी झालं आहे. 'जे काफीर अपयशी झाले आहेत ते कधीच ख्रिश्चन नव्हते.' अपयश काफिरांचं नाही तर धर्मगुरूंचं आहे.

आपल्या अनुयायांना सोनं वा चांदी, तांब्याची नाणी, प्रवासासाठी धर्मग्रंथ, दोन कोट अथवा काठी यापैकी कशाचाही आधार न देता येशूनं पाठवलं होतं. येशू म्हणाला होता, 'कारण काम करणारा आपल्या प्राणाचे मोल देऊनच काम करू शकतो.... लक्षात ठेवा, मी तुम्हाला लांडग्यांमध्ये शेळीला पाठवावं तसं पाठवत आहे; त्यामुळे तुम्ही सर्पाप्रमाणे सावध राहा आणि कबूतराप्रमाणे निरुपद्रवी राहा.... आणि ज्यांना आत्म्याचा वध करणं शक्य होत नाही पण जे शरीराचा वध करू शकतात त्यांना घाबरू नका, परंतु जो शरीराचा आणि आत्म्याचाही वध करू शकतो त्याला मात्र घाबरा.' [*इन्कॅनिसो*, एप्रिल १९, १८९५]

परंतु या गैरसोयीच्या उपदेशाचा आधुनिक मिशनऱ्यांना काहीही उपयोग नव्हता. कूच करताना इतर धर्मगुरूंनी त्यांना दिलेल्या आज्ञा अशा असाव्यातसं वाटतं:

तुमच्याजवळ पेट्या आणि ग्लॅडस्टोनच्या सूटकेसेस ठेवा.... त्या पेट्या सभ्य लोकांना शोभतील अशा प्रकारच्या कपड्यांनी चांगल्या भरा. त्याचबरोबर टेनिसची बॅट आणि बॉलही घ्या कारण सर्व दिवसभर तुम्ही त्याच त्याच कंटाळवाण्या गोष्टी सांगत बसणार नाही. उपदेशाबरोबर तुम्ही आनंदही घ्या. सोबत काही सोनं आणि काही सुटी नाणीही घ्या. ती प्रवासात तुम्हांला उपयोगी पडतील. सोबत डे आणि मार्टिनच्या काही अर्धाएक डझन पेट्या आणि ब्रशही घ्या.... तुम्ही तुमच्यासोबत पाल्सीचं 'इव्हिडन्स ऑफ खिश्चॅनिटी'ही घेऊ शकता.... सोनेरी बांधणी असलेल्या काही थोड्याशा बायबलच्या प्रती.... आणि कंटाळवाण्या प्रसंगी तुमचं मनोरंजन करण्यासाठी काही हलकंफुलकं साहित्यही घ्या. तुमच्यासोबत ब्रँडीच्या काही बाटल्या ठेवायला विसरू नका, दक्षिण आफ्रिकेच्या वाळवंटात तुम्हाला जेव्हा कंटाळा येईल तेव्हा तुम्हाला आणि तुमच्या बायकोला त्यामुळे उत्साह वाटेल. [*इन्कॅनिसो*, एप्रिल १९, १८९५]

गंभीरपणाचा आव आणत लेखकानं 'सोयिस्कर ख्रिश्चनत्वाच्या' पुरस्कर्त्या मिशनऱ्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची यादी सांगत पुढं लिहिलं :

तुम्हांला जेव्हा अती खाल्ल्यामुळे अजीर्णाचा वा अपचनाचा त्रास होईल तेव्हा उपयोग व्हावा म्हणून तुम्ही तुमच्याबरोबर औषधाची पेटी आणि सौम्य रेचकाची औषधं घ्याच. तुम्ही तुम्हांला पोटभर खाऊ घाला, कारण जे पोटात जाते त्यामुळे तुमचं पावित्र्य नष्ट होत नसते तर तुमच्या अंतःकरणातून जे बाहेर पडते त्यामुळे तुमचं पावित्र्य नष्ट होत असते. त्यामुळे संस्कृतीनं पुरवलेले मांसाचे डबे आणि इतर चविष्ट पदार्थ सोबत घ्या. या पदार्थांशिवाय तुम्ही राहावं असं कुठंच सांगितलेलं नाही. तुम्ही दक्षिण आफ्रिकेला जायला संमती द्यावी एवढं पुरेसं आहे. बाजाराच्या आजच्या मंदीच्या काळात तुम्ही येथील गर्दी कमी करता व दक्षिण आफ्रिकेत एवढ्या कमी पगारावर जायला तयार होता हा तुमचा त्याग प्रशंसनीय आहे. [इन्कॅनिसो, एप्रिल १९, १८९५]

'लांडग्यांमध्ये शेळीप्रमाणे जा' हे शब्द अलंकारिक अर्थानं घ्यायचे आहेत, शब्दशः नाही. या जुन्या बंधनाचं आधुनिक स्वरूप असं आहे :

तुमच्यासोबत पाच नळ्यांची बंदूक आणि काडतुसांची पेटी असू द्या. दक्षिण आफ्रिकेचे रानटी नेटिव्ह तुमचं काय करतील हे तुम्हांला माहीत नाही. जर त्यांचा हेतू तुम्हांला खायचा असेल तर बंदुकीचा योग्य उपयोग करा. आजकाल मनाई असली तरी गोळ्यांनी भरलेल्या बंदुकीचा उपयोग तुम्हांला शिकारीसाठीही होऊ शकेल. [*इन्कॅनिसो*, एप्रिल १९, १८९५]

येशूनं आपल्या अनुयायांना आज्ञा केली होती की 'आजाऱ्यांची सेवा करा, महारोग्यांना स्वच्छ करा.... व सैतानाला हाकलून लावा'. हा सर्व जुनाटपणा आणि मूर्खपणा आहे. आता दवाखाने आणि महारोग्यांची शुश्रूशालये आहेत आणि तिथं आजाऱ्यांची व महारोग्यांची काळजी घेतली जाऊ शकते. विज्ञानानं सैतानांना आणि त्यांना आणणाऱ्या अंधश्रद्धांना आधीच बाहेर हाकललेलं आहे. शुभवर्तमानाच्या आधुनिक उपदेशकांची उच्च आणि उदात्त ध्येय वाट पाहत आहे - अंधकारात असलेल्या धर्महीन लोकांमध्ये संस्कृतीचा प्रसार केल्यामुळे आम्ही निर्माण केलेल्या वस्तूंना अमर्यादित बाजारपेठ मिळेल आणि आपले कारखाने चोवीस तास सुरू ठेवता

येतील. साम्राज्याच्या सीमा पुढं ढकलण्यासाठी नेटिव्हांच्या प्रदेशाचं, त्यांच्या भाषेचं आणि सवयींचं ज्ञान या काळ्या खंडात आवश्यक आहे आणि राष्ट्रभक्ती हा तर खिश्चनांचा गुण आहे. आधुनिक धर्मोपदेशकाला कूच करण्यासाठी देण्यात आलेले आदेश असे आहेत:

नेटिव्हांना आज्ञाधारक व्हायला शिकवा, त्यांच्यात गोऱ्या माणसाचा दरारा आणि भीती निर्माण करा. त्यांना चांगलं अक्षरज्ञान द्या. इंग्रजी भाषेचं कामचलाऊ ज्ञान त्यांना द्या. त्यांना बायबल वाचून दाखवा.... त्यांना काटे, चमचे, चाकू वापरायला आणि आधुनिक पद्धतीनं पोषाख करायला शिकवा. आधुनिक संस्कृतीची साधनं त्यांना शिकवा. उपाहारगृह आणि सट्टेबाज यांच्यासाठी मार्ग मोकळा करा. तुम्हाला माहीत आहे की आपल्या संस्कृतीच्या वाढत्या गरजांसाठी मोठं आणि अजून मोठं क्षेत्र पाहिजे. आपल्या तरुण लोकांनी बाहेर जायला पाहिजे आणि जमीन ताब्यात घ्यायला पाहिजे. तुम्ही राष्ट्रभक्ती विसरू नये. निधर्मी नेटिव्हांच्या जिवावर का होईना परंतु संस्कृतीचा प्रसार व्हायला पाहिजे. त्यांच्या स्वभावाचा चांगला अभ्यास करा. देशाच्या भौगोलिक रचनेचा अभ्यास करा आणि त्याचा फायदा आपल्या मातृभूमीला द्या. आणि घ्या! हे पाहा स्वर्गाचं राज्य तुमच्या हाताशी आहे. हे माझ्या बंधो, एवढं कर आणि आम्ही तुला एवढं भरपूर देऊ की तुझा जीव गुदमरेल. [*इन्कॅनिसो*, एप्रिल २६, १८९५]

लेखकानं तीव्रतेनं निदर्शनास आणून दिलं की ख्रिश्चन मिशनऱ्यांना अपयश यायचं कारण नेटिव्हांना येथील खिश्चनांनी जी गोष्ट देऊ केली होती त्या गोष्टीत आणि खऱ्या ख्रिश्चन धर्मात 'उत्तर आणि दक्षिण ध्रुवाएवढाच' विरोध होता. मिशनरी धूम्रपान करतात, पितात, यथेच्छ खातात आणि जीवनातील विलासांचा उपभोग घेत राहतात. 'त्यांच्या देशात त्यांना जागा नव्हती आणि बाजारात मंदी पसरलेली आहे म्हणून धर्मोपदेशकाचं कार्य स्वीकारून दक्षिण आफ्रिका आणि इतर देशात जायचं त्यांनी मान्य केलं. अनेकदा ते सट्टेबाजांचा आणि उपाहारगृह चालकांचा मार्ग मोकळा करत नाहीत काय?' नेटिव्हांना आपली जमीन गमवावी लागण्यासाठी ते अनेकदा साधनीभूत झाले नाहीत काय? आणि 'जॉन बुल वा युरोपिअन लोकांनी काफिरांचं आणि त्यांच्या

देशाचं ख्रिश्चन धर्मात केलेलं धर्मांतर आपल्या स्वार्थासाठी केलेलं आहे हे मॅक्स ओरेल यांचं म्हणणं खरं ठरलं नाही काय?' [*इन्कॅनिसो*, एप्रिल २६, १८९५] असं या वृत्तपत्रानं विचारलं. एक मिशनरी आफ्रिकी लोकांना ख्रिश्चन धर्माचे फायदे जेव्हा समजावून सांगत होता तेव्हा एक सामर्थ्यशाली आफ्रिकी माणूस स्वाभाविकपणे चिडून म्हणाला :

ख्रिश्चन असत! ख्रिश्चन लुबाडणारा! ख्रिश्चन चोर, मद्यपी, खुनी ! ख्रिश्चनांनी माझी जमीन लुबाडली आणि माझ्या जमातीची कत्तल केली. राक्षसी ख्रिश्चन! मला ख्रिश्चन व्हायचं नाही. [*इन्कॅनिसो*, एप्रिल २६, १८९५]

त्याच्या या उद्गारात आश्चर्य वाटण्यासारखं काही आहे काय?

मुसलमान आणि ख्रिश्चन लोकांच्या धर्मकार्याची तुलना करताना एका विद्वान बिशपनी लंडन टाईम्सला पाठवलेल्या पत्रात लिहिलं होतं की स्पर्धेत इस्लाम ख्रिश्चन धर्माच्या पुढं निघून गेला आहे. बिशपच्या या उद्‌गाराची इन्कॅनिसो या वृत्तपत्रानं आठवण करून दिली. इस्लामनं आपल्या धर्मांतराच्या कामासाठी बळाचा वापर केला या प्रचलित मताला विरोध करत इन्कॅनिसोनं सांगितलं की चर्चचे मिशनरी विलासाचं जीवन जगतात आणि ते नेटिव्हांपासून वेगळे राहतात. उलट इस्लामचे लोक साधे राहतात व नेटिव्हांना गुलामासारखं वा अर्ध मानवासारखं न वागवता बरोबरीच्या नात्यानं वागवतात.

जो कोणी पूर्व किनाऱ्यावरील नेटिव्हांना पाहील तो या विधानाची सत्यता पारखू शकेल. अरब आणि नेटिव्हांसाठी एकच मशीद असते. ते एकत्र जेवतात; वास्तवात त्यांच्यात मोकळेपणाचे संबंध असतात. त्यामुळे मुसलमान नेटिव्ह धर्मांतर न केलेल्या नेटिव्हापेक्षा फार वेगळा असतो. त्यानं व्यवस्थित पोषाख केलेला असतो. तो सौजन्यशील असतोः दिसायला तो स्वच्छ आणि भारदस्त वाटतो. तो बुद्धिमान असतो. तो मेहनती असतो आणि माझा विश्वास आहे की तो प्रामाणिक नागरिक असतो. [*इन्कॅनिसो*, एप्रिल २६, १८९५]

इन्कॅनिसोच्या लेखकानं शेवटी लिहिलं की मी हे सांगायचं साहस करतो की अशा प्रकारच्या दंगलखोरीच्या वागणुकीचा (धर्मोपदेशकासाठी दंगलखोरीची) दाखला जगाच्या इतिहासात कुठेच आढळणार नाही. धर्मगुरूंनी आणि धर्मांतरासाठी प्रयत्न करणारांनी जगात गरिबीला छातीशी लावलं आहे. येशू, जॉन द बॅप्टिस्टनं आणि सेंट पॉल यांनीदेखील प्रवासात आपल्यासोबत पैसा घेतला नव्हता. कॅथॉलिक मिशनऱ्यांवर गरिबी लादण्यात येत असे तर मुसलमान फकीर स्वेच्छेनं गरिबीत राहतात. बुद्धानं वारसा हक्कानं मिळालेल्या राज्यपदाच्या अधिकाराचा, कुटुंबाचा आणि सर्व गोष्टींचा त्याग केला होता. पीत वस्त्र घातलेले महंत त्याच्या पावलावर पाऊल टाकून फिरत असतात, जैन साधूंनी धातूच्या भांड्यांचा त्याग केला व केवळ लाकडी भांडंच ते जवळ बाळगतात.

कौंट टॉलस्टॉय यांच्याजवळ जरी राजेशाहीची संपत्ती असली तरी ते गरिबीचं जीवन जगतात - आणि अशीच माणसं जगाचं काही नाव घेण्यासारखं कल्याण करत असतात. मिशनऱ्यांचे समूह घराघरामध्ये शांतता पसरवायचं काम करत आहेत, धनसंपत्ती हिरावून घेण्याच्या कामात क्षणही दवडत नाहीत आणि केवळ मानवतेवरील व कामावरील प्रेमामुळे धर्मप्रसाराचं आपलं अंगिकृत कार्य करताना ज्यांना वेळ कमी पडतो अशा मिशनऱ्यांची उदाहरणं आज कुठं आहेत? [*टाईम्स ऑफ नाताळ*, जून १८, १८९५]

नेटिव्हांना शिकवायच्याआधी मिशनऱ्यांनी स्वतःत बदल घडवून आणायला पाहिजे. ढोंगीपणा केल्याशिवाय तुम्ही कुंपणावर बसून राहू शकत नाही आणि विषमता, रंगभेद यामुळे होणाऱ्या अन्यायाचे मूग गिळून स्वस्थ बसणारे मूक साक्षीदार पण राहू शकत नाही. तसंच नेटिव्हांच्या विदेश प्रवासावर बंधनही आणू शकत नाही. तुम्ही नेटिव्हांना कायम किरकोळ घरकामे म्हणून ठेवू शकत नाही. ह्या राजकीय बाबी आहेत व त्यामुळे मिशनरी म्हणून याच्याशी आमचा संबंध येत नाही अशा लंगड्या सबबी सांगून तुम्ही दिमाख मिरवू शकत नाही. वास्तवात मागील काळात मिशनऱ्यांनी राजकारणात लुडबुड केलेली आहे, त्यांच्या ताब्यात असलेल्या

लोकांच्या हितासाठी नव्हे तर त्यांना पगार देणारांच्या आणि ज्या देशाच्या सरकारकडून त्यांना पाठिंबा मिळतो त्या देशातील सरकारच्या हितासाठी. पॉन्टियस पायलटप्रमाणे नेटिव्हांचं 'रक्तशोषण' करून तुम्ही गंगास्नान करून मोकळे होऊ शकत नाही. मिशनऱ्यांनी आपलं कर्तव्य जर नीट पार पाडलं तर 'नेटिव्हांची काहीच समस्या' राहणार नाही व ही वसाहतही 'इतर ब्रिटिश वसाहतीप्रमाणे आदर्श वसाहत होईल.'

या लेखात काळ्या आणि गोऱ्या लोकांमध्ये भांडणं लावायचा डाव असल्याचं *टाईम्स ऑफ नाताळचं* मत झालं. 'अशा प्रकारच्या कार्यक्रमाला थारा देण्यात आला तर 'नाताळ राजकीय आणि सामाजिक दृष्टीनं एका दशकाच्या आत काळी वसाहत होईल असं टाईम्स ऑफ नाताळनं मत दिलं.' [*नाताळ विटनेस*, जून २१, १८९५]

*टाईम्स ऑफ नाताळ*च्या या गर्जनेला नाताळच्या बिशपनी तेवढंच जोरदार उत्तर दिलं. सेंट झेवियर कॅथेड्रलमध्ये भरलेल्या धर्माधिकाऱ्यांच्या सभेत बोलताना त्यांनी धैर्यानं जोरदार वक्तव्य दिलं. त्यातून त्यांनी इन्कॅनिसोतील वक्तव्यातील आरोपांचीच पुनरावृत्ती केली. 'मालक, आम्ही रात्रभर काम केलं आणि काहीही घेतलेलं नाही' [*नाताळ विटनेस*, जून २१, १८९५] यावर मालक कान उघाडणी करत म्हणतो, 'अजून खोलात जा व तुमची जाळी अजून खोलवर सोडा,' [नाताळ विटनेस, जून २१, १८९५] ल्यूक ५,५मधील ही बोधकथा विवेचनासाठी घेत ते उद्‌गारले की मिशनरी आपल्या कर्तव्याचं अनुसरण भेकडपणानं करतात. 'त्यांचं बँकेवरील प्रेम, मोठ्या यशाच्या बलिदानापासून सुरक्षित अंतरावर राहणं', सागराचा आणि सागर किनाऱ्याचाही एकाचवेळी फायदा घ्यायचा त्यांचा प्रयत्न' [*नाताळ विटनेस*, जून २१, १८९५] ही मिशनऱ्यांमधील नैराश्याची कारणं आहेत.

दोन्हीही गोष्टी मिळवायचा प्रयत्न करणं म्हणजे एकही गोष्ट न मिळणं. 'जगाशी वैर घेतल्याशिवाय' अथवा ईश्वरी राज्याच्या तत्त्वांचा मानवी परंपरांशी मेळ घातल्याशिवाय तुम्ही ईश्वराचं काम करू शकत नाही. तुमच्या चर्चच्या अंतर्गत असलेल्या 'निम्म्याहून अधिक

लोकांकडे तुम्ही जेव्हा दुर्लक्ष करता' तेव्हा तुम्ही हाच अपराध करता. 'गोऱ्या लोकांच्या लहानशा गटासाठी तुम्ही त्यांना तुमच्या कार्यक्षेत्राबाहेरच ठेवत नाही तर त्यांच्या हिताकडेही तुम्ही दुर्लक्ष करता.

सन्माननीय बिशप पुढं म्हणाले की येशूवरील तुमच्या प्रेमामुळे तुम्हांला 'संतत्वाच्या' सामर्थ्याचा शोध लागायला पाहिजे आणि 'काफीर व हिंदू यांच्यातील प्रेम करता येण्यासारख्या गुणांचं' दर्शन तुम्हांला व्हायला पाहिजे. जेव्हा मनाची ही नवीन वृत्ती 'तुमच्या येशूवरील प्रेमात परिवर्तन घडवून आणील' तेव्हा ती तुम्हांला त्यांचा ताबा घ्यायला लावील. त्यामुळे नेटिव्हविषयक कर्तव्याच्या नवीन सिद्धान्ताचा तुम्हांला अपरिहार्यतेनं नव्यानं विचार करावा लागेल. 'याशिवाय वेगळं काही घडूच शकत नाही.... *जगातील सर्वसामान्य माणसासारखं खऱ्या ख्रिश्चनाचं नेटिव्हांबद्दलचं धोरण असूच शकत नाही.*' ख्रिश्चन सदसद्विवेकबुद्धीची मागणी आहे की कोणत्याही माणसाचा केवळ यंत्रासारखा उपयोग करून घेण्यात येऊ नये. 'नैतिक आयुष्य जगायला पात्र असलेल्या कोणत्याही माणसाचा आपल्या स्वार्थासाठी साधनासारखा उपयोग करण्यात येऊ नये. माणूसच स्वतःचं ध्येय असतो. म्हणजे असं की आपल्या स्वतःच्या नैतिक आदर्शाला धक्का लावल्याशिवाय त्याच्या नैतिक जीवनाचा विचार करणं आपण बंद करू शकत नाही कारण ती गोष्ट आपल्यासाठी मूल्यवान आहे. हे असं ध्येय आहे की जे साध्य करायचा केवळ त्यानंच प्रयत्न करायचा नसतो तर आपल्यालाही तसा प्रयत्न करावा लागत असतो.' [*नाताळ विटनेस*, जून २१, १८९५]

वेगळ्या पद्धतीनं सांगायचं तर माणूस स्वतःसाठी जे सर्वोच्च चांगलं ध्येय आहे असं ठरवतो ते ध्येय तो तेव्हाच प्राप्त करू शकतो जेव्हा ते ध्येय प्राप्त करायची क्षमता असणाऱ्या लोकांचाही तो विचार करील. 'नैतिक जीवन सर्वोच्च श्रेष्ठ आहे आणि एकाकी माणसाला त्याची प्राप्ती होऊ शकत नाही. नैतिकतेच्या जाणिवेची क्षमता असलेल्या सर्व लोकांशी असलेले संबंध, त्यांच्याबद्दलची कर्तव्यभावना, सद्भावना आणि उदारपणा यांचा त्यात समावेश होतो. त्यामुळे

माझ्या जीवनात ज्यामुळे परिपूर्णता येते त्या गोष्टीत, त्यासाठी पात्र असलेल्या इतर लोकांनाही मी त्यात भागिदार करून घ्यायला पाहिजे ही गोष्ट ओघातच येते.' [*नाताळ विटनेस*, जून २१, १८९५]

ख्रिश्चनत्वाच्या कर्तव्याची जाणीव नसलेले लोक निर्दय वा अडाणी असतातच असं नाही. परंतु ज्या देशात काळे आणि गोरे एकत्रित येतात व जिथलं वातावरण गोऱ्या माणसाला आपलं कुटुंब ठेवायला सोयिस्कर वाटतं तिथं काळ्या माणसानं गोऱ्या माणसाला जागा करून द्यायला पाहिजे असं धोरण, ज्यांची नैतिकता जगातील सामान्य नैतिकतेच्या पातळीची असते असे गोरे ठरवू शकतात; गोरा माणूस काळ्या माणसाला आपल्या स्पर्धेत उतरू देणार नाही.' हे मान्य झालेलं तत्त्व आहे. बिशपनी समारोप करत सांगितलं की परंतु अजूनही एक शक्ती आहे. ख्रिश्चनत्वाच्या जाणिवेची शक्ती. संपूर्ण समाज यामुळे प्रभावित होईल हे पाहणं हे तुमचं कर्तव्य आहे.

नेटिव्हांबद्दलच्या तुमच्या वृत्तीचा यामुळे अर्थ होईल :

आपण धर्मगुरू असो वा सर्वसामान्य माणूस, आपण गोऱ्यांना उपदेश देवो अथवा काळ्यांना, परंतु येशू ख्रिस्ताचे सेवक म्हणून या प्रश्नाबाबत ख्रिश्चन लोकांच्या मतात परिवर्तन करण्यासाठी आपण जबाबदार आहोत. आपल्यासाठी सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे नेटिव्हांबद्दलचं आपलं कर्तव्य. त्याची हेळसांड करण्यासाठी जगाची मिळालेली मूकसंमती या गोष्टींना काहीही अर्थ नाही. त्यामुळे आपल्या सदसद्विवेकबुद्धीवर, आपल्या स्वतःच्या आध्यात्मिक जीवनावर आणि गोऱ्या लोकांतील आपल्या कार्याच्या सखोलतेवर घातक परिणाम होईल. [*नाताळ विटनेस*, जून २१, १८९५ (ठळक अक्षरं माझी)]

या भाषणाचा वृत्तांत गांधीजींनी आपल्या नोंदवहीत नीट जपून ठेवला होता. त्यावरून त्याबद्दल गांधीजींमध्ये किती कुतूहल जागृत झालं असावं याची आपल्याला कल्पना येते. दक्षिण आफ्रिकेत गेल्यानंतरची १५ वर्ष हा त्यांच्या जीवनाच्या घडणीतील फार महत्त्वाचा काळ असावा. या काळात त्यांच्या मनावर जे ठसे उमटले ते त्यांच्या जाणिवेत खोलवर रुजले. त्यांचा विसर

पडायची वेळ येईपर्यंत ते गांधीजींच्या जीवनाचे अविभाज्य भाग झालेले होते. मुसलमान मिशनऱ्यांच्या यशाबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन; स्वसंरक्षणासाठी मिशनऱ्यांनी स्फोटक शस्त्रं वापरण्याबद्दलचं त्यांचं मत वा आपल्या मताच्या प्रसारासाठी भौतिक शक्तीची मदत घेण्यासंबंधीचा विचार आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो ज्या देशात सेवेचं कार्य करतो त्या देशातील जनतेच्या जीवनावर पडणारा प्रभाव आणि त्या देशातील 'लोकांसंबंधीचं धोरण' याशिवाय इतर कोणत्याही गोष्टीवरून ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याच्या यशाचं मोजमाप करता येऊ शकत नाही हे गांधीजींचं मत, या सर्व गोष्टीतून हे स्पष्ट होईल. ते भारतात परतल्यानंतर अनेक वर्षांनी डॉ. जॉन मॉट या अमेरिकन मिशनरी गृहस्थांनी गांधीजींना विचारलं, 'भारताच्या उभारणीसाठी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लावलेला सर्वाधिक महत्त्वाचा हातभार कोणता?' अजून स्पष्ट करत ते म्हणाले की 'ख्रिश्चन धर्म नव्हे तर येशूचा काय प्रभाव पडला असं मला विचारायचं आहे कारण या दोघात फार मोठं अंतर असायची मला भीती वाटते.

'होय हीच खरी अडचण आहे. धार्मिक शिक्षकांच्या शिकवणुकीच्या प्रभावाचा विचार त्यांच्या अनुयायांपासून वेगळा करता येऊ शकत नाही. दुर्दैवानं ख्रिश्चनत्वाचं आम्हांला घडणारं दर्शन हे भौतिक संस्कृतीशी आणि शक्तिशाली गोऱ्या लोकांच्या साम्राज्याकडून जगातील दुबळ्या वंशांच्या लोकांची जी पिळवणूक होते तिच्याशी एकरूप झालेलं आहे. [*यंग इंडिया*, मार्च २१, १९२९, पृष्ठ ९५] गांधीजी उत्तरले.

नेहमीच नाताळच्या बिशपनी आपल्या व्याख्यानाच्या दरम्यान असंही सांगितलं होतं की येशू हा अल्पमतात होता व पुढेही तो अल्पमतात राहायची शक्यता आहे. 'असं असलं तरीही मानव समाजाच्या दीर्घकालीन धोरणावर ख्रिश्चन दृष्टिकोनाचा प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाही.' अशा प्रकारचे ख्रिश्चन मिशनरी जरी दुर्बिणीनं शोध घेण्याएवढ्या कमी प्रमाणात असले तरी त्यांनी जर शोषितांच्या हक्कासाठी आणि गुलामगिरीतील जनतेसाठी भौतिक सत्तेचा विरोध

पत्करूनही काम केलं तर त्यांच्या धर्मांतराच्या पद्धतीचा आणि श्रद्धेचा फारसा बाऊ करायची गरज पडणार नाही असं गांधीजींना अंतःकरणापासून वाटत होतं.

३

दक्षिण आफ्रिकेत येण्यासाठी समुद्र ओलांडायच्या वेळी गांधीजींनी कस्तुरबांना वचन दिलं होतं की मी दादा अब्दुल्ला यांचं काम संपल्यानंतरही जर येऊ शकलो नाही व माझा तिथला मुक्काम सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ लांबला तर एक तर मी तुला घ्यायला येईन आणि व्यावसायिक कामामुळे जर तसं करणं शक्य झालं नाही तर तुला घ्यायला मी कोणाला तरी पाठवीन. ते देत असलेला लढा दीर्घकाळ चालेल असं आता त्यांच्या लक्षात आलं. त्यामुळे ते वचन पाळायची वेळ आली असल्याची गांधीजींना तीव्रतेने जाणीव झाली. वकिलीच्या व्यवसायात चांगला जम बसल्यामुळे त्या कमाईच्या बळावर दक्षिण आफ्रिकेत आपण आपल्या कुटुंबाला काहीशा सुखात ठेवू शकू असं गांधीजींना वाटत होतं. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेतील ज्या लोकांची त्यांना जाऊ द्यायची तयारी नव्हती त्यांच्या हितालाही तसं केल्यामुळे धक्का लागणार नाही असा गांधीजींना विश्वास वाटत होता. गांधीजींनी त्यांना सहा महिन्याची रजा मागितली व ती त्यांनी आनंदानं मंजूर केली. समुद्रापलीकडे राहणारे आपले बांधव कसे राहतात याची आतापर्यंत भारतीयांना किंचितही कल्पना नव्हती. असंही वाटत होतं की गांधीजींच्या या भारत भेटीमुळे भारतातील लोकांना त्यांच्या हलाखीच्या परिस्थितीची जाणीव करून देता येईल. नाताळ इंडियन काँग्रेसनं त्यांना आपलं प्रतिनिधी नियुक्त केलं आणि भारतातील त्या कामासाठी व प्रवास आदी खर्चासाठी ७५ पौंड मंजूर केले.

गांधीजींच्या अनुपस्थितीत आदमजी मियाखान हे नाताळ इंडियन काँग्रेसचं व शिक्षण संस्थेचं काम पाहणार होते. आदमजी मियाखान व्यवसायात प्रवीण होते. त्यांना इंग्रजीचंही कामापुरतं ज्ञान होतं. युरोपिअनांशी व्यवहार करताना ते त्यांनी मिळवलं होतं. झुलूंशी आलेल्या संपर्कामुळे ते झुलूंची भाषाही शिकले व त्यामुळे त्यांना त्यांच्या मानसिकतेचा, परंपरांचा आणि

शिष्टाचाराचा परिचय झाला. या त्यांच्या गुणात निग्रहीपणा, शांतपणा आणि चिकाटी, मानवी स्वभावाचं ज्ञान, भरपूर व्यवहार ज्ञान आणि निर्दोष निर्णयशक्ति या गुणांची भर पडली होती. गांधीजींच्या वारंवार लक्षात आलं होतं की कायद्याचं शिक्षण, इंग्रजीवरील प्रभुत्व वा पुस्तकी ज्ञान यापेक्षाही सार्वजनिक जीवनात आणि वैशिष्ट्यानं राजकारणाच्या धकाधकीच्या जीवनात वरील गुणांचं फार महत्त्व आहे.

ते निघायच्या दिवशी डरबन येथील तामिळ आणि गुजराती लोकांनी नाताळ इंडियन काँग्रेसच्या अंतर्गत भारतीय काँग्रेस हॉलमध्ये त्यांचा निरोप समारंभ ठेवला. दादा अब्दुल्ला अध्यक्षस्थानी होते. व्हिन्सेट लॉरेन हे दुभाष्याचं काम करत होते. त्यांच्या सेवेचं गौरव करणारं मानपत्र देऊन त्यांना एक सुवर्ण पदक देण्यात आलं. मानपत्र गुजराती, हिंदी आणि उर्दू भाषेत होतं परंतु इंग्रजी भाषेत असल्याचं मात्र आढळत नाही. भारतीय समाजातील विविध घटकांनी एका व्यासपीठावर एकत्रित येण्यात दाखवलेल्या उत्साहाबद्दल गांधीजींनी आपल्या भाषणात त्यांची प्रशंसा केली व ते सुचिन्ह असल्याचं सांगितलं. आपण तामिळमध्ये बोलू शकत नसल्याबद्दल गांधीजींनी खेद व्यक्त केला आणि या पुढे तामिळ लोक मोठ्या संख्येत उपस्थित राहतील हे पाहायची उपस्थितांना विनंती केली. काँग्रेसच्या उद्दिष्टांची परिपूर्ती केवळ शब्दांनी होऊ शकत नाही. तुम्ही तुमची श्रद्धा शब्दातून नाही तर कृतीतून व्यक्त करायला हवी. सध्या काँग्रेसचा जो निधी केवळ १९४ पौंड आहे तो कमीतकमी १,००० पौंडांनी वाढवायला हवा. [नाताळ इंडियन काँग्रेसचा दुसरा अहवाल] काँग्रेसच्या तामिळ सदस्यांनी एक खास सभा घेतली व त्यात गांधीजींना परत एक मानपत्र अर्पण केलं.

नाताळच्या वृत्तपत्रांनी या समारंभाकडे खेळाडू वृत्तीनं पाहिलं. गांधीजी निघायच्या आदल्या दिवशी नाताळ ॲडव्हरटाईझरच्या विनंतीवरून त्याला दिलेल्या मुलाखतीत गांधीजींनी सांगितलं की १८५८च्या जाहीरनाम्यात देण्यात आलेल्या वचनांची परिपूर्ती करवून घेणं हे काँग्रेसचं सर्वप्रथम उद्दिष्ट आहे. 'भारतीयांना वसाहतीत जेव्हा भारताप्रमाणेच समान दर्जा मिळेल

तेव्हा काँग्रेसनं राजकीय दृष्टीनं आपलं उद्दिष्ट साध्य केलं असं म्हणता येईल.' जर युरोपिअनांच्या बरोबरीनं कायदेशीर दर्जा भारतीयांना देण्यात आला व वसाहतीतील युरोपिअनांचं प्रभुत्व कायम ठेवण्यासाठी काही सुरक्षेची उपाययोजना करण्यात आली तर भारतीय त्यावर आक्षेप घेणार नाहीत.

गांधीजी प्रवास करत असलेल्या *एस. एस. पोंगोला* या जहाजानं जून ५, १८९६ला नांगर उचलला. त्या दिवसात नाताळहून जाणाऱ्या बऱ्याचशा आगबोटीप्रमाणे तेही कोलकाताला चाललं होतं. बोटीवरील प्रवाशात काही इंग्रज अधिकारीही होते. एकाबरोबर ते रोज एक तास बुद्धिबळ खेळायचे तर दुसऱ्याकडून ते उर्दू शिकले. या दुसऱ्या अधिकाऱ्याच्या विनंतीनुसार गांधीजींनी मुन्शी या हिंदूस्तानीच्या स्वयंशिक्षकाची प्रत मिळवली. एकोणवीसशेवीस साली रेल्वेच्या प्रवासात ते पुस्तक त्यांच्याजवळ असलेलं मला आढळलं. उर्दूत त्यांनी सरळ बोलायला सुरुवात केली परंतु लिपीमुळे त्यांचा गोंधळ होत होता; त्यांच्या इंग्रज मित्रानं त्यांच्यापेक्षा चांगली प्रगती केली. तामिळ स्वयंशिक्षकाच्या आधारे त्यांनी तामिळ शिकायलाही सुरुवात केली व त्यातही गांधीजींनी बरंचसं यश मिळवलं. भारतात आल्यानंतर त्यांनी तेलगू शिकायलाही सुरुवात केली परंतु मुळाक्षरांच्या पलीकडे त्यांची त्यात कधीच प्रगती झाली नाही. नाताळमध्ये प्रतल्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील मुसलमान आणि दक्षिण भारतीय समाजाशी जवळीक साधण्यासाठी गांधीजींनी या अभ्यासाला सुरुवात केलेली होती. दक्षिण भारतीय भाषा शिकण्यात गांधीजींना नाव घेण्याजोगं यश कधीच मिळालेलं नसलं तरी त्यामुळे आध्यात्मिक दृष्टीनं तामिळ आणि तेलगू भाषिक लोकांच्या आपण अधिक जवळ आलो असं गांधीजींना वाटत होतं व त्या वेळी केलेल्या प्रयत्नाची अतिशय आतुरतेनं नंतरच्या काळात गांधीजी आठवण करायचे.

दक्षिण आफ्रिकेतील द्रविड लोकांनी माझ्यावर प्रेमाचा जो वर्षाव केला त्याची आठवणं अजूनही मनाला उत्साहित करते. जेव्हा केव्हा माझी तामिळ वा तेलगू मित्राशी भेट होते तेव्हा

दक्षिण आफ्रिकेतील त्याच्या देशबांधवातील श्रद्धा, चिकाटी, निःस्वार्थ बलिदान या गुणांची आठवण होते. आणि ते बहुतेक अशिक्षित होते व पुरुषांची अवस्थाही स्त्रियांपेक्षा काही चांगली नव्हती. दक्षिण आफ्रिकेतील संघर्ष अशा लोकांसाठी होता,.... तो लढा अशिक्षित शिपाई लढले; तो लढा गरिबांसाठी होता व गरिबांनी त्यातील आपला संपूर्ण वाटा उचलला. त्यांच्या भाषेच्या अज्ञानामुळे त्या साध्यासरळ आणि सज्जन लोकांची अंतःकरणं जिंकण्यात मला कधीच अडचण जाणवली नाही.... परंतु मला त्यांचं प्रेम तामिळ वा तेलगू शिकून मिळवायचं होतं.... आता मला भीती वाटते की मला या भाषा कधीच शिकता येणार नाही त्यामुळे मी आशा करत असतो की द्रविड लोक हिंदूस्तानी शिकतील. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १६६]

जहाजाचा कप्तान प्लायमाऊथ ब्रदर होता. तो गांधीजींचा मित्र झाला. गांधीजींच्या शाकाहारवादामुळे अनेकदा धर्मासंबंधी चर्चा व्हायची. परंतु *जो धर्म नैतिक बंधनं आणतो तो त्याच्यासाठी चांगला नव्हता.... मी मांसाहार का करू नये....? खालच्या कोटीतील सर्व प्राणी देवानं माणसाच्या चैनीसाठी निर्माण केले नाहीत काय...? धर्म आणि नैतिकता एकच आहे हे माझं ठाम मत होतं. कप्तानालाही आपल्या मताच्या अचूकतेबद्दल पूर्ण विश्वास होता.* [वरीलप्रमाणे, पृष्ठ १६७]

आपल्यात मतभेद असल्याबद्दल त्यांचं मतैक्य झालं. २४ दिवसात जहाज कोलकाता येथे पोहोचलं. त्याच दिवशी, जुलै ४, १८९६ला गांधीजी मुंबईच्या गाडीत बसले.

जहाजाच्या प्रवासाच्या दरम्यान समुद्राच्या पाण्याबरोबर साबण वापरल्यामुळे गांधीजींना त्रासदायक खाज सुटली होती. गाडी अलाहाबादला पोहोचली असता खाजेवर आराम पडणारं मलम आणण्यासाठी ते गाडीतून उतरले. दुकानाच्या कट्ट्याच्या मागे दुकानदार अर्धवट झोपेत बसलेला होता. आवश्यक औषध घेऊन गांधीजी जेव्हा स्टेशनवर पोहोचले तेव्हा गाडी सुटलेली होती.

गांधीजींनी त्या अडचणीचंही संधीत रूपांतर करायचा प्रयत्न केला. केल्नर्सकडे भाड्यानं घेतलेल्या खोलीत बसून गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या कामाला सुरुवात केली. अलाहाबादमधील प्रसिद्ध दैनिक *पायोनियरचे* संपादक श्रीयुत जॉर्ज मॅक्लॅगन (नंतर सर) चेन्सी (धाकटे) यांची गांधीजींनी भेट घेतली. त्यांना दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या प्रश्नाबद्दल पूर्ण सहानुभूती वाटत होती. त्यांनी गांधीजींना वचन दिलं की तुम्ही या प्रश्नासंबंधी जे काही पाठवाल त्याची या वृत्तपत्रात दखल घेण्यात येईल. त्याचबरोबर त्यांनी हेही सांगितलं की या प्रश्नासंबंधी वसाहतीतील गोऱ्यांचा जो दृष्टिकोन असेल त्यालाही योग्य महत्त्व द्यावं लागेल. गांधीजींनी त्यांना सांगितलं की आपण या प्रश्नाचा पूर्वग्रहदूषित न होता अभ्यास करावा व मग जे आपल्याला योग्य वाटेल तेच आपण लिहावं एवढीच माझी आपल्याकडून अपेक्षा आहे. मला याहून अधिक काहीही नको. या अकल्पित मुलाखतीमुळे अशा अनेक घटनाक्रमाचा पाया रचला गेला की ज्यामुळे नाताळमध्ये जमावाच्या हातून जवळपास ठार मारलं जायची वेळ आली होती असं गांधीजींनी आपल्या आत्मकथेत लिहिलं आहे. [वरीलप्रमाणे, पृष्ठ १६८] उरलेला दिवस शहर पाहण्यात आणि गंगा आणि यमुना यांचा जिथे भव्य संगम होतो तो त्रिवेणी संगम पाहण्यात गेला.

दुसऱ्या गाडीनं प्रवासाला सुरुवात करून मुंबईला न उतरता ते राजकोटला जुलै ९, १८९६ ला पोहोचले आणि सरळ 'दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या तक्रारी' वरील सविस्तर निवेदन तयार करायच्या कामाला लागले. हीच पुस्तिका नंतर ग्रीन पॅम्फ्लेट म्हणून प्रसिद्ध झाली. छापण्यात आलेल्या ४,००० प्रतींचं विस्तृत प्रमाणात वाटप करण्यात आलं.

खर्चात काटकसर करायच्या आणि अतिशय नगण्य वा दुर्लक्षित साधनांचा उपयोग करायच्या गांधीजींच्या गुणांचा या वेळी बराच उपयोग झाला. हिरव्या पत्रिका डाकेनं पाठवण्यासाठी शेजारच्या सर्व मुलांना त्यांनी गोळा केलं व त्यांची शाळा नसताना त्यांच्याकडून २-३ तास हे काम करून घेतलं. 'उपयोगात आलेली पोस्टाची तिकिटं' आणि आपले आशिर्वाद

गांधीजींनी त्या मुलांना बक्षीस म्हणून दिले. त्या मुलांनी अगदी मन लावून काम केलं व त्या कामाचा किमान वेळेत फडशा पाडला.

ही केवळ सुरुवात होती. १९२०च्या दरम्यान गांधीजींनी नंतरच्या काळात उभारलेल्या अंहिंसक लढ्यात स्वयंसेवक मुलं आणि मुली यांचं महत्त्व वाढत गेलं आणि उपलब्ध साधनाचा उपयोग करायच्या त्यांच्या पद्धतीचं हे खास वैशिष्ट्य होतं व त्यातून त्यांच्या प्रतिभेचं दर्शन होतं.

जवळपास सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रांनी 'हिरव्या पुस्तिकेची दखल घेतली. *टाईम्स ऑफ इंडिया*नंआपल्या अग्रलेखातून जाहीर चौकशीची मागणी केली. *पायोनियर*नंतक्रारी मान्य करत असतानाच लिहिलं की 'स्वयंशासित वसाहतींच्या बाबतीत ही समस्या अतिशय गुंतागुंतीची ठरते.' भारतातील वरच्या वर्गातील लोकांनी अशा परिस्थितीत तिथं जाणं टाळावं असा त्यानं सल्ला दिला. लंडन टाईम्सच्या सिमला येथील प्रतिनिधीनं पुस्तिकेतील सारांश आणि *टाईम्स ऑफ इंडिया* व *पायोनियर* यांनी व्यक्त केलेल्या मताची तार पाठवली.

मध्यंतरीच्या काळात मुंबईत प्लेगचा प्रकोप झालेला होता व राजकोटमध्येही तो पसरेल अशी भीती होती. गांधीजींनी राज्याला आपली सेवा देऊ केली व तिचा स्वीकार करण्यात आला. प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या समितीवर गांधीजींना घेण्यात आलं. या उपाययोजनेत गांधीजींनी सर्वात अधिक महत्त्व दिलं स्वच्छतेला. समितीनं प्रत्येक गल्लीतील संडासांची तपासणी केली. त्या काळात खाजगी घरात घाणीपासून मुक्त राहायची व्यवस्था स्वप्नवत वाटायची. गांधीजींनी तिथं जे पाहिलं त्यामुळे त्यांची धडकी भरली. दोन मजली घरातील झोपायच्या खोलीत एवढा वास येत होता की 'तिथं कोणी पाय ठेवू शकतो याची कल्पनाही करता येऊ शकत नव्हती.' आपल्या संडासांची तपासणी करू द्यायला गरिबांचा विरोध नव्हता परंतु श्रीमंतांचा होता. चांगल्या परिस्थितीतील लोकांचे संडास तर सर्वात घाणेरडे होते. दुरुस्तीसाठी केलेल्या सूचनाही त्यांना अगदीच आवडत नसत. परिणामी या बाबतीत समितीनं केलेल्या अनेक शिफारसींची अवस्था पालथ्या घागरीवर पाणी पडावं त्याप्रमाणे झाली.

समितीनं वैष्णव हवेली या देवळालाही भेट दिली. मंदिराच्या एका कोपऱ्यात भक्तांच्या जेवणाच्या पत्रावळी आणि घाण साठवलेली असल्याचं समितीला आढळलं. असं दिसत होतं की ते देऊळ बांधल्यापासून ती जागा स्वच्छ करायची कोणीच काळजी घेतलेली नव्हती. त्या घाणीच्या ढिगाऱ्यावर घारी आणि कावळ्यांचे ढग गोळा झालेले होते. माशांचा आणि वासाचा तर विचारच करायला नको. ते पाहूनच माणूस आजारी पडायचा. हिंदू धर्माच्या विधीत स्वच्छतेला स्थान आहे. अशा प्रकारे करण्यात आलेल्या तिच्या अवहेलनेमुळे गांधीजींचं हृदय व्यथित झालं आणि भारतातील सर्व तीर्थस्थळांची भौतिक आणि नैतिक स्वच्छता करायची इच्छा त्यांच्यात जागृत झाली.

तथाकथित अस्पृश्यांच्या वस्तीच्या तपासणीच्या बाबतीत एक वेगळंच आव्हान उभं राहिलं. भंग्याच्या संडासाची पाहणी करणं केवळ मूर्खपणा आहे असं समितीच्या लोकांना वाटत होतं. ती पाहणी करण्याकरिता गांधीजींबरोबर जाण्यासाठी केवळ एका सदस्याला तयार करता येऊ शकलं.

अशा प्रकारच्या वस्तीला गांधीजींनी दिलेली ही पहिली भेट होती. त्यांना अतिशय कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. माजी प्रधानमंत्र्याच्या मुलाचं भंग्यांनी किती स्वागत केलं! बाया आणि माणसांना अत्यानंद झाला होता व ते सारखे कुजबुजत होते. परंतु त्यांना जेव्हा त्यांचे संडास दाखवायचं सांगण्यात आलं तेव्हा ते उद्‌गारले, 'संडास तुमच्यासारख्या मोठ्या लोकांसाठी असतात ! आम्ही हे काम उघड्यावरच उरकवतो.' तुमच्या घराचं काय ? आम्ही ती पाहू शकतो काय? 'जरूर पाहू शकता.' ते उत्तरले आणि गांधीजींना ते आपल्या तथाकथित घरात घेऊन गेले. एखाद्या छिद्रासारख्या त्या घरात गांधीजी जेव्हा गेले तेव्हा ती घरं अगदी नीटनेटकी असल्याचं त्यांना आढळलं. प्रवेशाच्या ठिकाणी स्वच्छ झाडझूड करण्यात आलेली होती, मातीचं आंगण शेणामातीनं चांगलं सारवलेलं होतं, आणि भांडीकुंडी त्या अर्धवट प्रकाशातही चमकत

होती. 'या वस्तीत प्लेगची लागण व्हायचा धोका नाही' गांधीजींनी समितीच्या सदस्यांना सांगितलं.

नंतरच्या काळात गांधीजी जेव्हा केव्हा निवासस्थळांना भेट द्यायचे तेव्हा ते आधी संडास तपासायचे आणि नंतर स्वयंपाकघर. गांधीजींनी प्रतिज्ञेवर सांगितलं की यामुळे प्रत्येक संस्थेच्या कामाचा स्तर काय आहे हे त्यांच्या अहवालांपेक्षाही अधिक चांगल्या पद्धतीनं मला कळू शकलं.

हिरव्या पुस्तिकेच्या प्रकाशनानंतर तीन दिवसांनी १७ ऑगस्टला गांधीजी मुंबईला गेले. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती व्हायच्या आधी काँग्रेसचे पहिले मुसलमान अध्यक्ष झालेले बद्रुद्दिन तैय्यबजी आणि आर्थिक व सामाजिक सुधारणेसाठी कार्य करणारे व आता बद्रुद्दिन तैय्यबजी यांचे सहकारी न्यायाधीश असलेले महादेव गोविंद रानडे यांच्याशी गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नाची सविस्तर चर्चा केली. त्या दोघांनीही गांधीजींना फिरोजशहा मेहता यांच्याकडे पाठवलं. गांधीजींची ज्यावेळी फिरोजशहा मेहतांशी भेट झाली त्यावेळी त्या मुंबईच्या सिंहाच्या आजुबाजूला प्रशंसकांची आणि मित्राची गर्दी जमलेली होती. त्यात त्यांचे उजवा हात असलेले अर्थशास्त्रज्ञ आणि सांख्यिकी तज्ज्ञ डी. सी. वाच्छा आणि श्रीयुत कामा यांचा समावेश होता. गांधीजींकडे आकर्षित होऊन वाच्छा म्हणाले, 'श्रीयुत गांधी, आपण पुन्हा भेटायला पाहिजे.'

मुंबईच्या अनभिषिक्त सम्राटाला परिस्थितीतील गांभीर्याची जाणीव झाली. वडीलकीच्या भावनेनं त्यांनी मुन्शी या आपल्या सचिवाला बोलावलं आणि एका जाहीर सभेसाठी तारीख ठरवायचं सांगितलं. हे केल्यानंतर त्यांनी गांधीजींचा निरोप घेतला व सभेच्या आदल्या दिवशी त्यांना भेटायला सांगितलं. जिथं आतापर्यंत काळोखाशिवाय काहीच हाती लागलं नव्हतं तिथं यशाची किरणं दिसू लागली.

गांधीजींचे बहीणजावई मुंबईत गंभीर आजारामुळे अत्यवस्थ होते. २४ तास शुश्रूषा करायची बहिणीत शक्तीही नव्हती व एखादी दाई ठेवायचं सामर्थ्यही तिच्यात नव्हतं. त्या विनयशील घरात प्रवेश करताच गांधीजींनी परिस्थितीचा ताबा घेतला. आपलं काम होताच त्या दोघांनाही गांधीजींनी आपल्याबरोबर राजकोटला नेलं. स्वतःच्या झोपायच्या खोलीत रात्रंदिवस शुश्रूषा केल्यानंतरही जावयाचा मृत्यू झाला. या सेवेमुळे गांधीजींना मोठं समाधान मिळालं. त्यामुळे गांधीजींना तशा संधीची ओढ वाटू लागली. ती ओढ एवढी तीव्रतेने वाटू लागली की 'प्रसंगी माझं कामाकडेही दुर्लक्ष होऊ लागलं' असं गांधीजी म्हणाले. दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्समधील आश्रमवासीयांसमोर आजाऱ्यांच्या शुश्रूषेच्या आदर्शाचं महत्त्व सांगताना गांधीजी प्रार्थनोत्तर प्रवचनात म्हणाले होते की 'शुश्रूषा करत असताना आपण ईश्वराजवळ प्रार्थना करायला पाहिजे की आजाऱ्याच्या वेदना बऱ्या करून ईश्वरानं त्या आम्हाला द्याव्या.' [प्रभुदास गांधी, *जीवन प्रभात*, सस्ता साहित्य मंडल प्रकाशन, दिल्ली, (१९५४), हिंदी आवृत्ती, पृष्ठ १६१] अशा प्रकारच्या निःस्वार्थ सेवेनं इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक आत्मशुद्धी होते असा गांधीजींचा विश्वास होता. त्यांच्या महात्मापणाच्या काळात जेव्हा लोक त्यांच्याकडे आपल्या आध्यात्मिक वेदना आणि व्यथा घेऊन यायचे तेव्हा आपल्या असीम प्रेमानं गांधीजी त्यांना हाच रामबाण उपाय सुचवायचे.

आनंदाशिवाय केलेल्या सेवेमुळे सेवकाचा वा ज्याची सेवा करतो त्याचाही लाभ होत नाही. परंतु आनंदानं केलेल्या सेवेसमोर इतर सर्व प्रकारचे आनंद फिके पडतात. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १७५]

'एकूण पाहता ब्रिटिशांची सत्ता जगासाठी हितावह आहे' असा गांधीजींचा अजूनही विश्वास होता. त्यांनी स्वतः दक्षिण आफ्रिकेत अनुभव घेतलेला रंगभेद ही तात्कालिक व स्थानिक विकृती आहे व ती ब्रिटिश घटनेच्या तत्त्वाशी व परंपरांशी विसंगत आहे असं गांधीजींना वाटत होतं. त्यामुळे 'सिंहासनाशी निष्ठा दाखवायच्या बाबतीत ते इंग्रजांशी स्पर्धा करायचे, आपल्या मुलांना अचूक इंग्रजी पद्धतीनं राष्ट्रगीत म्हणायला शिकवायचे. सिंहासनाबद्दल असलेली निष्ठा

व्यक्त करायची एकही संधी तें सोडत नसत. अस करताना ते कुरकुरतही नसत आणि देखावाही करत नसत.

नंतर राष्ट्रगीतातील काही भाग ख्रिश्चनत्वाशी विरोधी आहे असं गांधीजींना वाटायला लागल्यानं गांधीजींचा आत्मा त्याविरुद्ध बंड करू लागला आणि त्यांची ज्वलंत निष्ठा क्रांतिकारकांच्या बेशिस्त घृणेपेक्षाही ब्रिटिश साम्राज्यवादाला अधिक विध्वंसक वाटायला लागली. याबद्दल पुढे प्रसंगोपात चर्चा होणारच आहे. गांधीजी भारतात पोहोचले त्यावेळी राणी व्हिक्टोरियाच्या हीरक महोत्सवाची तयारी सुरू होती. त्यासाठी राजकोटमध्ये जी समिती तयार करण्यात आली होती तिच्यात भाग घ्यावा म्हणून गांधीजींना आग्रहाची आवश्यकता नव्हती. लांगुलचालन व हाजीहाजी यांच्या झालेल्या दर्शनानं त्यांना वीट आला आणि आपण या समितीवर काम करू शकू की नाही याबद्दल काही काळ त्यांना संशय वाटायला लागला. परंतु अखेरीस 'आपलं कर्तव्य तेवढं पार पाडावं' असा निर्णय त्यांनी घेतला.

त्या प्रसंगाच्या निमित्तानं वृक्षारोपणाच्या एका कार्यक्रमाची योजना आखण्यात आली होती. त्या द्वीपकल्पाचा बऱ्याचशा भागातील झाडं लाकडासाठी आणि शेतीच्या लागवडीसाठी तोडण्यात आलेली होती. गरिबीमुळे लोकांना भात शिजवायलाही इंधन मिळणं कठीण झाल्यामुळे या प्रक्रियेला अजूनच गती आली होती. जेव्हा अतिशय पाऊस व्हायचा तेव्हा उंचवटा नसलेल्या सर्व भागात पूर पसरल्यानं पिकांचं नुकसान व्हायचं, घरं उद्ध्वस्त व्हायची व जनावरं मरायची. त्यांच्या सहकारी सदस्यांना हे सर्व माहीत असावं. झाडांच्या मुळांमुळे पुराचा जोर कमी होतो. गांधीजींनी जेव्हा त्यांना ह्या कामासाठी सर्व शक्ती लावा अथवा हे काम सोडून द्या असं सुचवलं तेव्हा ते मनातल्या मनात हसत असल्याचा गांधीजींचा समज झाला. गांधीजींनी त्यांच्याकडे सोपवण्यात आलेली झाडं केवळ लावलीच नाही तर त्यांचं संगोपनही केलं. त्यांना पाणी घालायला काही कमी श्रम लागले नव्हते.

अर्ध्या शतकानंतर आयुष्याचा प्रवास जवळपास संपत आलेला असताना भारतात परत वृक्षारोपणासाठी वनमहोत्सवाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्यांच्या लक्षात आलं की याही वेळी लोकांचा प्रतिसाद पूर्वीप्रमाणेच थंड आहे व ते केवळ कामाचा देखावा करत आहेत. त्यामुळे त्यांना फार खेद झाला. देशातील पहिली महिला - लेडी माऊंटबॅटन केवळ त्याला गौरवास्पद अपवाद होत्या. त्यांच्यातही आपल्याचप्रमाणे या विषयाबद्दल प्रेम आहे हे पाहून गांधीजींना आनंद झाला आणि त्यांनी आपली भावना श्रीमती माऊंटबॅटन यांना गौरवास्पद शब्दात कळवली. [प्यारेलाल, *महात्मा गांधी - लास्ट फेज, खंड २*, पृष्ठ ३३५-३६]

४

२६ सप्टेंबरला ठरवण्यात आलेल्या जाहीर सभेनं गांधीजींना संकुचित जगातून बाहेर काढलं. शुश्रूषेच्या ताणानं शिणून गेल्यामुळे ज्या दिवशी त्यांच्या जावयाचा मृत्यू झाला त्याच दिवशी ते मुंबईसाठी रवाना झाले. भाषणाच्या आदल्या दिवशी तुमचं भाषण तयार आहे काय म्हणून फिरोजशहा मेहतांनी विचारलं. गांधीजी म्हणाले की मी उत्स्फूर्तपणे वेळेवर बोलेन. त्या महान वक्त्यानं गांधीजींना सांगितलं, 'असं चालणार नाही. मुंबईतील वृत्तपत्र वृत्तांत छापताना फार चुका करतात. तुम्ही तुमचं भाषण लिहून काढायला पाहिजे व उद्या सायंकाळच्या आत ते छापून तयार असलं पाहिजे.' तेव्हा पाच वाजून गेलेले होते. फिरोजशहा मेहता म्हणाले की माझा माणूस ११ वाजता भाषण घ्यायला येईल. 'मला आशा आहे की तोपर्यंत तुम्ही भाषण तयार ठेवाल.'

आपली धाकधूक लपवत गांधीजी म्हणाले की मी प्रयत्न करतो. तो माणूस बरोबर ११ वाजता भाषणाचं हस्तलिखित घ्यायला आला. ते भाषण रात्रीतून छापण्यात आलं.

कावसजी जहांगीर संस्थेच्या सभागृहात सभा झाली. अध्यक्षस्थानी फिरोजशहा मेहता होते. गांधीजींना भाषणासाठी जेव्हा बोलावण्यात आलं तेव्हा त्यांना आवाजच फुटत नव्हता.

आपल्या जावयाच्या शुश्रूषेमुळे आलेल्या ताणानं आपला प्रभाव दाखवला होता. त्रेधा उडालेल्या अवस्थेत बोलत असताना त्यांचा आवाज फारच कमी लोकांपर्यंत पोहोचत होता. भारतातील पहिल्याच जाहीर सभेत बोलत असल्यामुळे ते धांदरले होते. प्रोत्साहन देत अध्यक्ष म्हणाले, 'जोरात, अजून जोरात.' परंतु त्यामुळे परिस्थिती अजून बिघडली.

केशवराव देशपांडे त्यांच्या मदतीसाठी धावून आले. गांधीजींनी आपलं भाषण त्यांना वाचून दाखवण्यासाठी दिलं. परंतु वाच्छांनी ते वाचावं म्हणून श्रोत्यांनी गिलका केला. फिरोजशहा मेहतांची संमती मिळताच वाच्छा उभे राहिले व त्यांनी भाषण वाचायला सुरुवात केली. व्यासपीठावर भाषण द्यायची सवय असल्यामुळे आणि विषयाशी समरस झाल्यामुळे आपल्या कमावलेल्या आवाजानं त्यांनी सभेला मंत्रमुग्ध करून टाकलं. जणू काय गांधीजींच्या लेखणीतून उतरलेले शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडताच सरळ जाणकार श्रोत्यांच्या अंतःकरणात शिरत होते. नाताळमधील आपल्या भावंडांना ज्या अपमानास्पद परिस्थितीतून जावं लागतं होतं व त्याविरुद्ध ज्या शौर्यानं ते लढा देत होते त्याचं वर्णन ऐकताना वारंवार टाळ्यांचा कडकडाट व 'शेम, शेम'च्या घोषणा होत होत्या. फिरोजशहा मेहतांना भाषण फार आवडलं. गांधीजींना आनंद वाटला.

फिरोजशहा मेहतांच्या कसलेल्या हाताच्या स्पर्शानं तयार झालेला सहानुभूतीचा ठराव मंजूर करण्यात आला. फिरोजशहांनी प्रस्तावित केलेला आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक सदस्य सन्माननीय झवेरीलाल याज्ञिक आणि रहिमतउल्ला महमद सयानी आणि *चॅम्पियनचे* संपादक सन्माननीय श्रीयुत चेम्बर्स यांनी अनुमोदित केलेला ठराव एकमतानं मंजूर करण्यात आला. त्या प्रस्तावानुसार अध्यक्षांना निवेदन तयार करायचा आणि ते सम्राज्ञी सरकारच्या भारत मंत्र्यांना पाठवायचा अधिकार देण्यात आला.

दुसऱ्या दिवशी सभेचा संपूर्ण वृत्तांत आलेला पाहून गांधीजींना समाधान वाटलं. प्रेसिडेन्सी असोसिएशननं फिरोजशहा मेहतांनी तयार केलेल्या अहवालाच्या सारांशाची तार लंडनला केली.

मुंबईहून गांधीजी पुण्याला गेले आणि भारतातील त्यावेळच्या राजकारणातील गटबाजीचं त्यांना पहिल्यांदाच दर्शन झालं. मुंबई प्रांतात रानडे यांच्या प्रभावाखालील सार्वजनिक सभा आणि लोकमान्य टिळकांच्या प्रभावाखालील डेक्कन सभा यांच्यात सतत भांडणं सुरू असायची. गांधीजींची निरागसता पाहून टिळकांनी त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयाच्या प्रश्नाकडे दोन्ही पक्षांचा पाहायचा दृष्टिकोन सारखा असला तरी कोणत्याही एका गटातील माणसाच्या अध्यक्षतेखाली दोन्ही गट एकाच व्यासपीठावर एकत्र येणं अशक्य होतं. त्यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांना भेटायचा आणि निष्पक्ष समजले जाणारे डॉ. रा. ग. भांडारकर यांना सभेचं अध्यक्षपद भूषवण्याठी समजावण्याचा सल्ला दिला. डॉ. भांडारकर जरी त्या दिवसात सार्वजनिक जीवनात भाग घेत नव्हते तरी त्यांच्याकडे गेल्यानंतर सभेचं अध्यक्ष व्हायला त्यांनी संमती दिली. गांधीजींना ते म्हणाले, 'तुमची बाजू एवढी बळकट आहे आणि तुम्ही एवढे कष्ट घेत आहात की मी तुम्हाला नाही म्हणू शकत नाही.'

भारतातील महान नेत्यांशी गांधीजींची ही पहिलीच भेट होती. ज्याच्या शिखरापर्यंत कोणीही पोहोचू शकत नाही अशा फिरोजशहा मेहतांसारख्या हिमालयापासून तर असीम, भव्य आणि तळाचा शोध लागू न शकणाऱ्या अशा टिळकांकडे ते पोहोचले होते. परंतु गोखल्यांमध्ये त्यांना जिच्या कुशीत आपण केव्हाही विसावू शकतो अशा गंगामाईचं दर्शन झालं.

महाविद्यालयाच्या मैदानाजवळील त्यांच्या सदनिकेत मी त्यांना भेटलो. जणू काय जुन्या मित्रांची भेट व्हावी तशी वा अजूनही चांगली उपमा देऊन सांगायचं तर दीर्घकाळ आईशी ताटातूट झाल्यानंतर परत तिची भेट व्हावी तशी ती भेट होती असं म्हटलं तर अधिक उचित होईल. माझ्याबद्दल आणि दक्षिण आफ्रिकेतील माझ्या कामाबद्दल त्यांनी जी बारीक चौकशी

केली त्यामुळे एकदम त्यांना माझ्या हृदयात स्थान मिळालं. मी त्यांच्याकडून जेव्हा निघालो तेव्हा मी स्वतःशीच म्हणालो, 'तुम्ही माझा आदर्श आहात.' आणि तेव्हापासून गोखल्यांचं माझ्यावरील लक्ष कधीच विचलित झालं नाही. [*यंग इंडिया*, जुलै १३, १९२१, पृष्ठ २२३]

गोखल्यांनी गांधीजींमध्ये वैयक्तिक लक्ष घातलं. त्याच्या भाषणावर ते एक दृष्टी टाकायचे, कुणाकडे जावं आणि कसं जावं याचा सल्ला द्यायचे आणि अखेरीस डॉ. भांडारकर याच्या भेटीत काय झालं म्हणून त्यांनी गांधीजींना विचारलं. त्यांच्या भेटीनंतर गांधीजी अतिशय प्रसन्न अंतःकरणानं बाहेर आले. त्यांच्यात जे वैयक्तिक भावबंध निर्माण झाले त्याचं रूपांतर अखेरीस गांधीजींनी गोखल्यांना 'राजकीय गुरू' मानण्यात झालं. पुण्याच्या सभेची तारीख ठरल्यानंतर गांधीजी मद्रासला गेले. तिथं त्यांचा कब्जा ताबडतोब प्रसिद्ध न्यायविद न्यायाधीश सुब्रमण्य अय्यर यांनी घेतला. नंतर १९२०च्या दरम्यान भारताच्या राजकीय लढ्यात आघाडीवर राहून ज्यांनी भाग घेतला त्या अर्डली नॉर्टन आणि भाष्यम अय्यंगार यांनी गांधीजींचं म्हणणं शांतपणे आणि सहानुभूतीनं ऐकून घेतलं व ते त्यांचे कायमचे निष्ठावंत मित्र झाले. दक्षिण भारतातील प्रमुख वर्तमानपत्र *द हिंदूचे* संपादक जी. सुब्रमण्यम आणि *मद्रास स्टँडर्डचे* संपादक परमेश्वरम पिल्ले यांनी तसंच घणाघाती व्याख्याते आणि काँग्रेसच्या स्थापनेत भाग घेणारे आनंद चालू यांनी गांधीजींचं स्वागत केलं. मद्रास महाजन सभेच्या अंतर्गत जाहीर सभा बोलावण्याच्या पत्रकावर विविध क्षेत्रातील जवळपास ४० लोकांनी सह्या केल्या होत्या. त्यात पहिली सही होती राजा सर रामस्वामी मुदलीयार यांची. ऑक्टोबर २६ला पंचैप्पा सभागृहात सभा झाली. सन्माननीय आनंद चालू अध्यक्षस्थानी होते. भाषण बरंच लांब होतं. परंतु ते अतिशय शांतपणे ऐकून घेण्यात आलं. सभेनंतर मुंबईच्या पद्धतीनं जयघोषात ठराव मंजूर करण्यात आला व त्याचे प्रस्तावक, अनुमोदक आणि पाठिंबा देणारे श्रीयुत ॲडम्स, श्रीयुत परमेश्वरम पिल्ले आणि श्रीयुत पार्थसारथी नायडू यांच्यासारखे सार्वजनिक जीवनातील प्रमुख लोक होते. नाताळमध्ये आप्रवासी

भारतीयांना बंधुआ मजूर म्हणून पाठवणं बंद करावं असाही एक विशेष ठराव मंजूर करण्यात आला. महत्त्वाच्या सर्व दैनिकांनी सभेचा सविस्तर वृत्तांत प्रकाशित केला.

परमेश्वरम पिल्ले अजून एक पाऊल पुढं गेले. त्यांनी आपल्या वृत्तपत्राचे स्तंभ गांधीजींसाठी मोकळे केले. जेव्हा केव्हा आवश्यकता वाटली तेव्हा त्या संधीचा लाभ घेण्यात गांधीजीही मागे नव्हते. सभेच्या शेवटी हिरवी पुस्तिका मिळवण्यासाठी उडालेल्या झुंबडीचं दृश्य पाहण्यासारखं होतं. सर्व उपलब्ध प्रतींची ताबडतोब विक्री झाली. लोकांची मागणी पूर्ण करण्यासाठी मद्रासमध्येच २००० प्रती पुन्हा मुद्रित कराव्या लागल्या.

मद्रास ही बालसुंदरमची जन्मभूमी होती. नाताळमध्ये गांधीजींनी दक्षिण भारतातील बंधुआ मजुरांसाठी जे केलं होतं त्याची बातमी इथं आधीच पोहोचलेली होती. त्यांनी प्रेमापोटी केलेल्या श्रमाची परतफेड मद्रासच्या लोकांनी इतक्या जिव्हाळ्यानं केली की त्याचा ठसा गांधीजींच्या मनावर कायमचा उठला. अशा रीतीनं निर्माण झालेलं बंधन काळाला वा अंतरालाही कधीच तोडता आले नाही. भारताच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या संघर्षात मद्रास सदैव आघाडीच्या फळीत राहिलेला होता.

हिरव्या पुस्तिकेच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनानंतर *लंडन टाईम्सच्या* सिमला येथील वार्ताहरानं जी तार पाठवली होती त्यामुळे नाताळचे लंडनमधील मुख्य प्रतिनिधी सर वाल्टर पीस यांचा तिळपापड झाला. त्यांची स्वतःची मुलाखत घेण्यात आली. त्यांनी निर्लज्जपणे सांगितलं की नाताळपेक्षा इतर कुठेही भारतीयांना जास्त चांगली वागणूक मिळत नाही. आणि बंधुआ मजुरातील बहुतेक लोक परतीच्या प्रवास खर्चाच्या तरतुदीचा उपयोग करत नाहीत हे गांधीजींच्या पुस्तिकेतील आक्षेपांना निरुत्तर करणारं उत्तर आहे. ते पुढं म्हणाले की रेल्वे आणि ट्रामकारचे अधिकारी भारतीयांना पशुंप्रमाणे वागवत नाहीत आणि न्यायालयेही त्यांना न्याय द्यायचं नाकारत नाहीत.

ही जी बेछूट विधानं करण्यात आली होती त्यांना आव्हान दिल्याशिवाय गांधीजीही राहू शकत नव्हते. 'हिरव्या पुस्तिकेच्या दुसऱ्या आणि नवीन भर घातलेल्या आवृत्तीत दक्षिण आफ्रिकेच्या वृत्तपत्रातील व सरकारी अहवालातील भरपूर उतारे पुराव्यादाखल देऊन गांधीजींनी जोरदार प्रत्युत्तर दिलं. उत्साहाच्या भरात गांधीजींनी त्या पुस्तिकेच्या १०,००० प्रती छापल्या. परंतु हा अंदाज प्रमाणाबाहेर मोठा झाला असल्याचं दिसून आलं. गांधीजींनी आपल्या उत्तरात सांगितलं की भारतीय परतीच्या प्रवाससवलतीचा सरसहा फायदा घेत नाहीत यावरून भारतीयांना कायदेशीर आणि इतरही ज्या अडचणींना तोंड द्यावं लागतं ते खोटं ठरत नाही. 'त्यातून एवढंच सिद्ध होऊ शकेल की एक तर भारतीय.... अडचणींची पर्वा करत नाहीत वा अडचणींनंतरही वसाहतीत राहतात.' जर पहिलं कारण असेल तर ज्यांना ते माहीत आहे त्यांनी भारतीयांना अधःपातापासून वाचवायचा प्रयत्न करायला पाहिजे. जर दुसरं कारण असेल तर 'भारतीयांच्या सहनशीलतेचा तो अजून एक पुरावा असेल. भारतीय 'ती गोष्ट सहन करतात हे त्यांच्या मार्गातील अडसर दूर न करायचं कारण असू शकत नाही वा शक्य असलेली सर्वोत्तम वागणूक त्यांना मिळते असंही यावरून सिद्ध होऊ शकत नाही. (२६) त्याशिवाय हे सर्वांनाच माहीत आहे की वसाहतीत जाणारे बंधुआ मजूर हे सर्वात गरीब वर्गातील असतात:

भुकेला माणूस भाकरीचा तुकडा मिळवण्यासाठी कितीही वाईट वागणूक मिळाली तरी ती सहन करायला तयार राहील. ट्रान्सव्हालमध्ये युटिलँडरांच्या तक्रारींची फार मोठी यादी नाही काय? आणि ट्रान्सव्हालमध्ये युटिलँडरांना अशा प्रकारची वाईट वागणूक मिळत असूनही केवळ त्यांच्या मूळ देशात मिळते त्यापेक्षा अधिक सहजपणानं ट्रान्सव्हालमध्ये भाकरी मिळते म्हणून हजारोंच्या संख्येनं ते ट्रान्सव्हालकडे धाव घेत नाहीत काय? [एम. के. गांधी यांची हिरवी पुस्तिका, *द ग्रिव्हान्सेस ऑफ द ब्रिटिश इंडियन्स इन साऊथ आफ्रिका*, राजकोट, १४ ऑगस्ट १८९६]

रेल्वे आणि ट्राममध्ये मिळणाऱ्या गैरवर्तणुकीबद्दल बोलायचं तर गांधीजींनी दोन वर्षांपूर्वीच नाताळच्या संसद सदस्यांना उद्देशून एक अनावृत पत्र लिहिलं होतं. ते पत्र वसाहतीत

सर्वत्र पोहोचलं होतं आणि दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक महत्त्वाच्या वृत्तपत्रानं त्याची दखल घेतली होती. 'त्या वेळी कोणीही त्यातील मुद्दे खोडून काढले नव्हते एवढंच नाही तर काही वृत्तपत्रांनी त्यातील मुद्दे मान्यही केले होते.' गांधीजी म्हणाले की त्यामुळे त्यातील उद्धरण 'हिरव्या पुस्तिकेत' देणं योग्यच होतं. दक्षिण आफ्रिकेतील रेल्वेत प्रवास करत असताना रंगीत लोकांना देण्यात आलेल्या वाईट वागणुकीचे दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रांमध्ये जे वृत्तांत आले होते त्यातील उतारे; न्यायालयांनी निकाल देताना रेल्वेच्या अधिकाऱ्यांवर जे ताशेरे मारले होते ते आणि रेल्वेच्या नियमातच रंगभेदाला जी मान्यता देण्यात आली होती त्यातील गांधीजींनी प्रकाशित केलेले उतारे हे सर्व विरोधकांच्या टीकेचा पूर्णपणे विध्वंस करणारे होते.

टाईम्स ऑफ इंडियाला पाठवलेल्या पत्रात गांधीजींनी लिहिलं की 'नाताळच्या न्यायालयात भारतीयांना कधीच न्याय मिळत नाही असं मी कधीही म्हणालो नाही. तसंच तो न्याय त्यांना दरवेळी आणि कोणत्याही न्यायालयात मिळतो हेही मी मान्य करू शकत नाही.' [संपादक *टाईम्स ऑफ इंडिया*ला गांधीजींचं पत्र, दिनांक ऑक्टोबर १७, १८९६, प्रकाशन ऑक्टोबर २०, १८९६] परंतु आगीत तेल पडलेलं होतं, भडका उडणं सुरूच होतं.

एक पंधरवडा मद्रास येथे थांबल्यानंतर गांधीजी कोलकात्याला गेले. ते तिथं १० नोव्हेंबरला पोहोचले. तिथं कोणालाच ओळखत नसल्यामुळे त्यांनी ग्रेट ईस्टर्न हॉटेलमध्ये खोली भाड्यानं घेतली. लंडन *डेली टेलिग्राफचे* श्रीयुत एल्लरथोर्पे यांची गांधीजींशी सहज भेट झाली होती. ते राहत असलेल्या बंगाल क्लबमध्ये यायचं त्यांनी गांधीजीना आमंत्रण दिलं. त्यांना विसर पडला होता की साम्राज्याची राजधानी ही साहेबी परंपरेचीही पक्की राजधानी होती. तिथं सत्ताधारी वंशाच्या परंपरेलाच सर्वाधिक महत्त्व होतं. या क्लबमधील दिवाणखान्यात 'नेटिवहां'ना प्रवेश नव्हता. लज्जित होऊन त्यांनी आपल्या या भारतीय पाहुण्याला स्वतःच्या खोलीत नेलं.

सुरेन्द्रनाथ बॅनर्जी हे कलकत्त्याचे अनभिषिक्त सम्राट होते. गांधीजी त्यांना भेटले तेव्हा त्यांना फारशी आशा वाटत नव्हती. त्यांनी सल्ला दिला, 'तुम्ही महाराजांची सहानुभूती मिळवायला पाहिजे आणि ब्रिटिश इंडिया असोसिएशनच्या प्रतिनिधीला भेटायला पाहिजे.' गांधीजी राजा सर प्यारीमोहन मुखर्जी आणि महाराज ज्योतिन्द्रनाथ टागोर यांना भेटले. त्यांनी गांधीजींच्या कामाबद्दल कोणतीच सहानुभूती न दाखवता सांगितलं की कलकत्त्यात जाहीर सभा घेणं कठीण आहे. एखाद्या 'भटक्या ज्यू' प्रमाणे ते आहेत असा *अमृत बझार पत्रिकेचा* समज झाला व त्यांना तशीच वागणूकही देण्यात आली. बेंगाली या वृत्तपत्रानं त्यापेक्षा चांगली वागणूक दिली. संपादकाच्या खोलीत इतर लोकांचा प्रवाह सारखा आतबाहेर करत असतानाच त्यांना दारावरील पायपोसाजवळ उभं ठेवण्यात आलं. अखेरीस आत घेतल्यानंतर गांधीजी आपलं म्हणणं मांडत असतानाच त्यांना मध्येच संपादकांनी तुसडेपणानं अडवलं व सांगितलं, 'तुमच्यासारखे अनेक लोक इथं भेटायला येत असतात. त्या सर्वांचं बोलणं ऐकत बसायला मला वेळ नाही. तुम्ही गेलेलं बरं राहील.'

मिळालेली ही चपराक वेदनादायक असली तरी गांधीजींनी प्रयत्न सोडले नाही. त्यामुळे त्यांच्या लक्षात अजूनच प्रकर्षानं आलं की दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नासंबंधी इथल्या लोकांना शिक्षित करणं आवश्यक आहे. ते *स्टेट्समन*कडे गेले. दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नासंबंधी आपल्याला कसा जिव्हाळा वाटतो त्याची माहिती श्रीयुत पॉल नाईट यांनी सांगितली. इंग्लिशमनच्या श्रीयुत साँडर्स यांनी सांगितलं की या बाबतीत माझं तुमच्याशी संपूर्ण एकमत आहे. गांधीजींनी सांगितलं की माझी त्यांनी बारकाईनं चौकशी केल्यानंतर 'या प्रकरणाची निष्पक्ष माहिती द्यायच्या प्रयत्नात मी कोणतीही कसर ठेवली नाही. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांची बाजू देखील मी निष्पक्षतेनं मांडली.' श्रीयुत साँडर्स यांच्यावर गांधीजींच्या सत्यनिष्ठेचा आणि अतिशयोक्ती न करण्याच्या गुणाचा फार प्रभाव पडला. 'विरोधकाला न्याय देऊनच आपल्याला जलद न्याय मिळू शकतो' हा धडा गांधीजी यातून शिकले. श्रीयुत साँडर्स यांनी दिलेल्या प्रेरणेमुळे कलकत्त्यात लवकरच

आपल्याला जाहीर सभा घेता येईल असं गांधीजींना वाटायला लागलं. त्यांनी तल्यारखान यांना लिहिलं की 'मला विश्वास वाटू लागला की या आठवड्यातील शुक्रवारी सभा घेता येईल.' परंतु सभेच्या दोन दिवसांपूर्वी ११ नोव्हेंबरला नाताळहून आलेली तार त्यांना मिळाली. मेसर्स दादा अब्दुल्ला अँड कंपनीच्या प्रतिनिधीनं मुंबईहून ती तार गांधीजींकडे कोलकाता येथे परत पाठवली होती. तारेत लिहिलं होतं, **'मोहनलालला परत पाठवा. रोड भारतीयांना वस्त्यात पाठवण्यासाठी बळजबरी करत आहे**.'

'रोड' हा शब्द चुकून 'व्होड्स'ऐवजी आला असावा असा विचार करत गांधीजींनी तारेचा असा अर्थ घेतला की केप सरकारनं ईस्ट लंडन नगरपालिकेला भारतीयांना वस्त्यांमध्ये हलवण्याचा अधिकार दिलेला आहे आणि श्रीयुत चेम्बर्लेनसमोर भारतीयांचा संपूर्ण प्रश्न विचारार्थ पडलेला असतानाही हा निर्णय घेण्यात आलेला आहे. नंतर त्यांच्या लक्षात आलं की मूळ तारेत 'रोड' हा शब्दही नव्हता आणि 'व्होड्स' हा शब्दही नव्हता. तो शब्द होता 'राड' म्हणजे ट्रान्सवालची संसद आणि त्यामुळे प्रभावित होणारे भारतीय केपमधील भारतीय नव्हते तर क्रुगरच्या गणराज्यातील भारतीय होते. डी. व्हिलर्स यांनी त्यांच्याविरोधात दिलेल्या निर्णयाच्या अमलबजावणीस सुरुवात झालेली होती.

गांधीजींनी लगेच मुंबईला परतायचा निर्णय घेतला. *इंग्लिशमन*ला पाठवलेल्या पत्रात गांधीजींनी स्पष्ट करून सांगितलं की नुकतंच आलेल्या तारेमुळे मला दक्षिण आफ्रिकेत पहिल्या उपलब्ध जहाजानं परतणं भाग पडलेलं आहे. तिथल्या वसाहतींच्या अनेक सरकारांनी लंडन येथील वसाहत कार्यालयावर दडपण आणून दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांच्या बाजूनं निर्णय लावून घ्यायचा कसा प्रयत्न चालवलेला आहे याचं गांधीजींनी त्या पत्रात वर्णन केलं. वेगवेगळ्या शहरातील महापौर परिषदा घेऊन भारतीयांचा लोंढा अडवायचा प्रस्ताव मंजूर करत आहेत. केपच्या प्रधानमंत्रीपदावरून व्होड्सचं पतन झाल्यानंतर त्यांच्या जागी आलेले सर जॉर्डन स्प्रिंग हे वसाहत कार्यालयाच्या सतत संपर्कात आहेत व त्यांना समाधानकारक परिणाम निर्माण

व्हायची आशा वाटत आहे. नाताळ संसदेचे सदस्य श्रीयुत मेडन नाताळमध्ये आपल्या श्रोत्यांना सांगत आहेत की तुमच्यावतीनं हे प्रकरण वसाहतीनं इंग्लंडमध्ये धसास लावून ठेवलं आहे. वसाहतीच्या प्रश्नांची चर्चा चेम्बर्लेन यांच्याशी करावी असा सर जॉन रॉबिन्सन यांच्या इंग्लंड भेटीचा एक हेतू होता. गांधीजी उद्‌गारले की ह्या काही शक्ती अशा आहेत की ज्या वसाहतीत भारताच्या विरोधात कार्यरत आहेत. माजी संसद सदस्यानं पाठवलेल्या सहानुभूतीच्या पत्रात लिहिलं की हा संपूर्ण संघर्ष 'विषम' आहे आणि 'न्याय तुमच्या बाजूला आहे.' [संपादक *इंग्लिशमनला* गांधीजींचं पत्र, दिनांक नोव्हेंबर १३, १८९६, प्रकाश नोव्हेंबर १४, १८९६] ते शेवटी म्हणाले की लवकरच या प्रकरणाचा निकाल लागणं भाग आहे. आंग्ल-भारतीयांनी आणि भारतीय जनतेनं जागं होऊन आपलं संपूर्ण वजन न्यायाच्या बाजूनं टाकायची आता वेळ आली आहे. 'तसं आता न केल्यास तसं कधीच घडणार नाही.' हुजूर पक्षाच्या एका प्रसिद्ध गृहस्थांनी गांधीजींना लिहिलं होतं की 'अन्याय एवढा मोठा आणि गंभीर आहे की तो दूर करण्यासाठी केवळ त्याची माहिती करून द्यायचीच आवश्यकता आहे.' [वरीलप्रमाणे]

मुंबईला निघण्यापूर्वी गांधीजींनी दादा अब्दुल्ला आणि कंपनीला तार करून पहिल्या उपलब्ध जहाजानं आपली आणि आपल्या कुटुंबियांसाठी नाताळच्या प्रवासाची व्यवस्था करायची सूचना केली. दादा अब्दुल्लांनी नुकतंच *एस. एस. कुरलँड* जहाज विकत घेतलं होतं. गांधीजींनी त्याच जहाजानं प्रवास करावा असा दादा अब्दुल्लांचा आग्रह होता. त्यासाठी गांधीजी आणि त्यांच्या कुटुंबियांना भाडं भरावं लागणार नाही असंही त्यांनी सांगितलं. गांधीजींनी तो प्रस्ताव साभार मान्य केला.

१६ नोव्हेंबरला सार्वजनिक सभेच्यावतीनं जोशी हॉलमध्ये भरलेल्या सभेत गांधीजी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या तक्रारींविषयी बोलले. डॉ. भांडारकर अध्यक्षस्थानी होते. गांधीजींचं भाषण झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांबद्दल सहानुभूतिदर्शक ठराव लोकमान्य टिळकांनी मांडला आणि त्याचबरोबर डॉ. भांडारकर, आणि गोखले सदस्य असलेल्या

समितीला दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना ज्या अन्यायाला तोंड द्यावं लागतं त्यासंबंधीचं निवेदन तयार करून ते भारत सरकारला द्यायचा अधिकार समितीला देणारा ठरावही मंजूर करण्यात आला.

५

नाताळ इंडियन काँग्रेसमध्ये जेव्हा लोक धीर सोडू लागले होते तेव्हा गांधीजी त्यांना धीर देत म्हणाले होते की तुम्हांला मदत करण्यासाठी काही भारतीय बॅरिस्टरांना दक्षिण आफ्रिकेत यायला मी सांगेन. मुंबईच्या भाषणानंतर श्रीयुत केशवराव देशपांडे आणि एफ. एस. तल्यारखान या दोन बॅरिस्टरांनी दक्षिण आफ्रिकेत येऊन त्यांच्या कामात सहभागी व्हायची तयारी दाखवली होती. गांधीजींबरोबर लंडनमध्ये शिकणारे तीन पारशी सहाध्यायी होते. त्यापैकी तल्यारखान यांना बारमध्ये प्रवेश मिळताच तेही गांधीजींबरोबरच एकाच जहाजानं भारतात परतले होते. दुसरे दोन सहाध्यायी होते पेस्तनजी पादशाह आणि दयाळू अंतःकरणाचे त्यांचे भाऊ बर्जोर्जी पादशाह. घोड्यांच्या दयेमुळे ते ट्राममध्येही बसत नसत. त्यांची स्मरणशक्ती जरी दांडगी होती तरी ते इतक्या स्वतंत्र विचाराचे होते की कोणत्याही परीक्षेत ते पास होऊ शकत नव्हते. गांधीजींची पेस्तनजींशी जेव्हा पहिली भेट झाली तेव्हाच पांडित्यासाठी ते प्रसिद्ध झालेले होते. त्यांच्यातील सोनेरी बंधन होतं शाकाहाराचं. फार कमी पारसी ते पाळत. मुंबई न्यायालयात ज्येष्ठ कारकून असलेले पेस्तनजी आता उच्च गुजराती शब्दकोश तयार करायच्या कामाला लागले होते. दक्षिण आफ्रिकेत जाण्यासाठी होतकरू लोकांचं मन वळवण्याकरिता गांधीजींना मदत करायला त्यांनी साफ नकार दिला. त्यांचं म्हणणं होतं की अशा लोकांची आपल्या मातृभूमीलाच गरज आहे. त्यांना तर गांधीजींचं तिकडे जाणंच पसंत नव्हतं. तिकडे जाण्यापासून गांधीजींना अडवण्यासाठी ते म्हणाले, 'आपण आधी इथं स्वयंशासन मिळवू या. मग आपोआपच तिथल्या आपल्या देशबांधवांना आपली मदत होईल.' परंतु गांधीजींना आपल्या निर्धारावर अटळ पाहून

ते पुढं म्हणाले, 'मला माहीत आहे की मी तुम्हाला समजावू शकत नाही, परंतु तुमच्यासारख्या इतर कोणालाही तुमच्याबरोबर जायला मी सांगणार नाही.

ते जसं बोलले तसंच वागले. त्यांनी केलेली कानउघाडणी मनावर घेण्याऐवजी गांधीजींना आपल्या या पारसी मित्राच्या राष्ट्रभक्तीचं आणि मातृभाषेच्या प्रेमाचं कौतुक वाटलं. 'देशभक्ताला आपल्या मातृभूमीच्या सेवेची संधी सोडणं कधीच परवडू शकत नाहीं' हा धडा ते त्यातून शिकले. [एम. के. गांधी, *द स्टोरी ऑफ माय एक्सपेरीमेंट्स विथ ट्रुथ*, पृष्ठ १७५] या पारसी मित्राच्या उदाहरणामुळे दैवानं त्यांच्यासाठी वाढून ठेवलेल्या ताटाला ते न्याय देऊ शकले. दक्षिण आफ्रिकेतील माझं काम सोडून देण्याऐवजी माझा निर्धार अजूनच बळकट झाला.' गीतेच्या शब्दात,

श्रेयान स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्
स्वधर्मे निधनं श्रेयाः परधर्मो भयावहः
(उणाहि आपुला धर्म पर-धर्मोहुनी बरा
स्व-धर्मात भला मत्यू परधर्म भयंकर,
गिताई, विनोबा)

मद्रास येथून तल्यारखान यांना लिहिलेल्या पत्रातून गांधीजींनी तल्यारखानांसमोर व्यवसायातील तसंच सार्वजनिक कामातील भागीदारीचा प्रस्ताव मांडला. आतापर्यंत त्याच्या उत्पन्नाचा आधार त्यांना थांबवून घेणाऱ्या लोकांनी दिलेलं कामच होतं. त्यासाठी भारतीय येत्या सहा महिन्यात त्यांचं उत्पन्न दरमहा ७० पौंडांपर्यंत पोहोचू शकावं व ते दोघंही एकाच घरात राहिले असते तर त्यांचा खर्च ५० पौडांपेक्षा अधिक येऊ नये असा गांधीजींचा अंदाज होता.

हा किमान अंदाज आहे. भारतीयांचं काम करत असतानाच मी एकट्यानं जरी हे काम केलं तरी एवढं उत्पन्न मिळवता यावं अशी माझी अपेक्षा आहे. आपण जर १५० पौंड मिळवले तर मला आश्चर्य वाटणार नाही.

मी एवढंच आश्वासन देऊ शकतो. नाताळचा प्रवासखर्च तुम्हाला स्वतःला करावा लागेल. तुमच्या सनदेसाठी येणारा खर्च कार्यालयातर्फे करण्यात येईल. तुमच्या राहण्याचा आणि जेवणाचा खर्चही कार्यालय सोसेल. म्हणायचा अर्थ असा आहे की पहिल्या सहा महिन्यात काही तोटा आल्यास तो मी सोसेन. उलटपक्षी काही नफा आला तर तुम्ही वाटून घ्या. नाताळमध्ये तुमची निराशा झाली तरी मला खात्री आहे की मुंबईत तुमचे संबंध असे आहेत की मुंबईतून तुम्ही सहा महिने जरी बाहेर राहिलात तरी तुमच्या भविष्यकालीन व्यवसायावर त्याचा काहीच परिणाम होणार नाही. आपल्या परिस्थितीतील माणसांनी संपत्तीचे ढीग गोळा करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत जाऊ नये असं मी यापेक्षा अधिक स्पष्ट शब्दात सांगू शकणार नाही. तुम्ही तिथं स्वार्थत्यागाच्या भावनेनं जायला पाहिजे. तुम्ही संपत्तीला हातभर अंतरावर ठेवायला पाहिजे. तेव्हाच ते तुमच्यावर प्रेम करू शकतील. तुम्ही तिच्यावर एक कटाक्ष टाकायची कृपा केली तर ती इतकी नखरेल आहे की लगेच ती तुमची हेळसांड करायला सुरुवात करील. दक्षिण आफ्रिकेतील माझा अनुभव हा असा आहे.

क्षुल्लक गोष्टींकडेही दुर्लक्ष न करायच्या आपल्या स्वभावाप्रमाणे गांधीजींनी सोबत काम कसं करायचं याचीही रूपरेषा मांडली :

एकत्रित राहिल्यामुळे कदाचित काही अडचणी येऊ शकतील. तुम्ही जर शाकाहारावर भागवू शकत असाल तर मी इंग्रजी आणि भारतीय शैलीचे अतिशय रुचकर पदार्थ टेबलवर मांडू शकेन. परंतु तसं शक्य नसल्यास आपल्याला वेगळा स्वयंपाकी ठेवावा लागेल. ते काहीही असलं तरी ही अडचण अशी नाही की जिच्यातून तोडगा काढताच येऊ शकत नाही.... मला आशा आहे की तुम्ही अशा क्षुद्र बाबी आपल्या आड येऊ देणार नाही. मला खात्री आहे की तुम्ही दक्षिण आफ्रिकेत किती तरी काम करू शकाल, मी जेवढं काम काम करू शकलो त्याहूनही अधिक.....

तुम्ही जर माझ्यासोबतच नाताळला येऊ शकलात तर फार बरं होईल. त्या वेळी एस. एस. कुरलँड उपलब्ध असली तर तुम्हाला तिकीट पडू नये यासाठीही मी प्रयत्न करू शकेन.

[गांधीजींचं एफ. एस. तल्यारखान यांना पत्र, दिनांक ऑक्टोबर १८, १८९६]

परंतु हे घडायचं नव्हतं. त्यावेळी लघु न्यायालयाचे न्यायाधीश असलेले सी. एम. कुरसेटजी यांनी तल्यारखान यांचं मन वळवलं. त्यांनी तल्यारखान यांचं लग्न जुळवलं होतं. तल्यारखान यांना लग्न की दक्षिण आफ्रिका यातून निवड करायची होती. त्यांनी पहिला पर्याय निवडला. ते मोठे सरकारी अधिकारी झाले. देशपांडे यांच्या बाबतीत लग्नाची अडचण नव्हती. 'परंतु तेही आले नाहीत.' झांजीबार येथे गांधीजींना एक तैय्यबजी भेटले. त्यांनाही गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत चलण्यासाठी समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातही यश आलं नाही.

तल्यारखान यांना पाठवलेल्या पत्रात गांधीजींनी संपत्तीविषयक व्यक्त केलेला दृष्टिकोन हा एकप्रकारे पतंजलीच्या योगसूत्रावरील भाष्यासारखाच आहे. त्यांच्या आध्यात्मिक विकासाचं त्यातून चांगलंच दर्शन होतं व याचीच परिणती पुढे त्यांनी स्वीकारलेल्या स्वेच्छादारिद्र्यात झाली होती. जवळपास पस्तीस वर्षांनंतर लंडन येथील श्रोत्यांसमोर बोलताना त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाची मांडणी अशी केली :

स्वेच्छापूर्वक स्वीकारलेल्या या शपथेचं माणसाला शक्य असेल तेवढ्या प्रमाणात जे पालन करतात ते साक्ष देतात की जेव्हा तुम्ही तुमच्याजवळील प्रत्येक गोष्टीचा त्याग करता तेव्हा तुम्ही जगातील जवळपास सर्व संपत्तीचे धनी होता.... जे याचं अनुसरण करतील त्यांना कधीच उणीव भासत नसल्याचं त्यांच्या लक्षात येईल. [मिस मॉड रॉयडन चर्च, लंडन, येथे स्वैच्छिक दारिद्र्य या विषयावर गांधीजींनी दिलेलं भाषण, १९३१]

त्यांच्या काटकसरीनंतरही नाताळ इंडियन काँग्रेसनं त्यांच्या खर्चासाठी मंजूर केलेले ७५ पौंड आतापर्यंत संपले होते. एवढंच नाही तर त्यांचे स्वतःचेही ४० पौंड काँग्रेसच्या कामासाठी खर्च झाले होते. दक्षिण आफ्रिकेत पोहोचल्यानंतर त्यांनी तयार केलेल्या हिशेबातून त्यांच्या

स्वभाववैशिष्ट्याचं दर्शन होतं. त्यातील नोंदी अशा आहेत : म्हाली ४ आणे, धोबी ८ आणे, पिक्विक पेन ६ आणे, पंखा कुली २ आगे, थिएटर ४ रुपये, लालू नोकर १० रुपये, भंगी ८ आणे, जादूगार ६ पै, दान ८ आणे, पाणी ६ पै आणि गरीब माणूस १ आणा!

१८९६च्या डिसेंबरच्या सुरुवातीला गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेच्या प्रवासाला सुरुवात झाली. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी, त्यांची दोन मुलं हरिलाल आणि, मणिलाल होते तसंच त्यांच्या विधवा बहिणीचा एकुलता मुलगा गोकुलदासही त्यांच्याबरोबर होता. त्याच वेळी एस. एस. नदारी हे दुसरं जहाजही डरबनसाठी निघालं. या दोन जहाजात एकूण ८०० प्रवासी होते.

गांधीजी भारतात असतानाच दक्षिण आफ्रिकेतून काही वाईट वार्ता येऊ लागल्या होत्या. परंतु त्यांच्या भयावहतेची अस्पष्टशी कल्पनाही गांधीजींना वा त्यांच्याबरोबरच्या ८०० प्रवाशांना नव्हती.

परिशिष्ट

परिशिष्ट अ

काबा गांधी या दिवाणाला राजकीय प्रतिनिधीच्या न्यायालयात उपस्थित राहण्याविषयी कार्यकारी राजकीय प्रतिनिधींनी पोरबंदरच्या राणांना पाठवलेला आदेश.

शहर कार्यालय

प्रती,

राणा श्री विक्मातजी पोरबंदर.

एका बाजूला मी आणि दुसऱ्या बाजूला राजकोट संस्थानाचे भयात भूपतसिंगजी यांच्यातील मुंधडा गावातील एक तृतियांश हक्काविषयीचा निर्णय करण्याकरिता मी, कॉलनल एस. सी. लॉ, कार्यकारी राजकीय प्रतिनिधी, काठेवाड विभाग, तुमचे कारभारी आझम करमचंद उत्तमचंद यांना नियुक्त करत आहे व त्यांची राजकोट येथील माझ्या कार्यालयात ऑगस्ट ५, १८७०ला सकाळी ठीक १० वाजता उपस्थित राहण्याविषयी व्यवस्था करायचा आदेश देत आहे. या बाबतीत कोणत्याही प्रकारची सबब सांगण्यात येणार नाही अशी आशा करण्यात येत आहे.

कार्यकारी राजकीय प्रतिनिधी

दिनांक, २२ जुलै १८७०

सही - (दुलेराय व्ही. रघुनाथराय)

अधीक्षकांची शासकीय कागदपत्रे

(दफ्तरदार)

युरोपिअन अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या कागदपत्रांच्या फाईलमधून

परिशिष्ट ब

राजस्थानिक न्यायालयावर सदस्य म्हणून काबा गांधींच्या नियुक्तीची अधिसूचना राजस्थानिक न्यायालयाच्या स्थापनेसंबंधीची खालील अधिसूचना सर्व लोकांच्या माहितीसाठी पुन्हा प्रकाशित करण्यात येत आहे :

कट्टीवार राजकीय एजन्सी

राजकोट, १ सप्टेंबर १८७३

सही/ जे. बी. पील कार्यकारी राजकीय प्रतिनिधी

राजकीय विभाग

सन्माननीय गव्हर्नर इन कौन्सिल पुढील गोष्ट सर्व लोकांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करत आहेत :

भायद यांनी गिरसबद्दल अथवा मूलग्रासीबद्दलची सुनावणी करण्याकरिता भारत सरकार आणि सम्राज्ञींचे मुख्य सचिव, भारत, यांनी दिलेल्या मान्यतेनुसार कट्टीवार येथे राजस्थानिक न्यायालयाची स्थापना करण्यात आलेली आहे.

भारत सरकार आणि सम्राज्ञींचे मुख्य सचिव, भारत विभाग, यांनी दिलेल्या मान्यतेनुसार न्यायालयाच्या आस्थापनेसाठी करण्यात आलेले नियम आणि उपनियम खाली पुन्हा प्रकाशित करण्यात येत आहेत.

न्यायालयाच्या नियमानुसार लेफ्टनंट कॉलनल एस. सी. लॉ यांना सरकारने न्यायालयाच्या अध्यक्षपदी नियुक्त केलेले आहे आणि दरबारांनी सुचवलेल्या बारा लोकांच्या यादीतून खालील सहा लोकांची न्यायालयावर नियुक्ती करण्यात येत आहे.: माधवराव

उमाशंकर, वेलजी देवजी, जयंतीलाल वेणीलाल, कृष्णराव पांडूरंग, क्रुमचंद ओतुमचंद, जयशंकर लालशंकर.

राजस्थानिक न्यायालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण कट्टीवार राहील. मुख्य राजकीय न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात ज्या बाबी येतात त्या बाबी या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतील. न्यायालयानं दिलेल्या आदेशांना आणि निर्णयांना कट्टीवार एजन्सीकडून मान्यता देण्यात येईल.

राजस्थानिक न्यायालयाच्या बैठका राजकोट येथे वा कट्टीवार मधील इतर कोणत्याही सोयिस्कर अशा ठिकाणी वेळोवेळी होतील.

प्काठेवाड एजन्सीच्या १८६४ ते १९०५ च्या कालावधीतील परिपत्रकांच्या, आदेशांच्या, जाहीर सूचनेच्या आणि नियमांच्या संग्रहातून. (काठेवाड एजन्सी राजपत्र ४ सप्टेंबर १८७३ खंड २०, पृष्ठ २१३).

परिशिष्ट क

काबा गांधी यांची राजकोट संस्थानाच्या कारभारीपदी नियुक्ती

क्रमांक १६

श्रीयुत पील यांना ठाकोर श्री बावजी राज, राजकोट यांनी पाठवलेले निवेदन. आम्ही आपले अभिवादन करतो आणि आपल्याला सांगू इच्छितो की कारभारी पद सैय्यद हमीद यांच्याकडे होतं. त्यांनी आता राजिनामा दिला आहे व त्यांच्या ठिकाणी आम्ही गांधी करमचंद ओटमचंद यांची नियुक्ती केली आहे. मान्यवर महोदय आपल्याला सूचित करण्यासाठी आम्ही आपल्याला हे कळवत आहोत.

दिनांक १६ नोव्हेंबर १८७४

राजकोट संस्थानाच्या जावक नोंदवहीतील उतारा – १८७४ - १८७५

पहा पृष्ठ क्रमांक १८२

परिशिष्ट ड

संपूर्ण अधिकारांसह काबा गांधींची दिवाणपदी कायम नियुक्ती

एस.एस.पी.ए.एन.

आर.के.एम. ए.

कार्यालयीन आदेश

आतापर्यंत यांचं जे काम आम्ही पाहिले ते समाधानकारक वाटल्यामुळे आझम करमचंद राज्याचा निष्ठावान, प्रामाणिक आणि आज्ञाधारक सेवक असल्याचे आढळलेले आहे. त्यामुळे त्यांना आम्ही पुढील अधिकार बहाल करतो व विश्वास करतो की ते या विश्वासाला सदैव पात्र ठरायचा प्रयत्न करतील. आतापर्यंत ते ज्या विभागांचे कामकाज पाहत होते त्या विभागांचे आणि महसूल विभागाचे काम तर ते पाहतीलच शिवाय या आदेशात नमूद करण्यात आलेली इतर कामेही ते पाहतील. ते शहरातील कार्यालयाचा हिसेबाच्या कामकाजावर तशाच प्रकारे लक्ष ठेवतील जसे ते आतापर्यंत ठेवत होते व राज्याच्या सर्वोत्तम हिताकडे लक्ष ठेवतील.

आजपासून आझम करमचंद यांना पुढील अधिकार देण्यात येत आहेत:

(१) वारंवार होणाऱ्या खर्चासाठी द्यावयाच्या देयकांवर व त्याचबरोबर लेखी आदेश असलेली कोणतीही रक्कम देण्यासंबंधीच्या कागदपत्रांवर आतापर्यंत आम्ही सह्या करत होतो. यापुढे आझम करमचंद सह्या करतील. आमच्या तोंडी आदेशासंबंधीच्या आर्थिक सूचनांवर आम्ही सह्या करू.

(२) राज्यातील सर्व नोकरांचे कोणत्याही प्रकारच्या सुट्यांसंबंधीचे तसेच इतर कोणत्याही विषयासंबंधीचे अर्ज आझम करमचंदकडे पाठवण्यात यावे व ते ते आपल्या शिफारशींसह आमच्याकडे पाठवतील.

(३) गोंडल राज्याशी चाललेल्या न्यायालयीन कामकाजासंबंधीची कागदपत्रे व सर्व प्रकारच्या अपिलांची कागदपत्रे आझम न्यायाधीश आमच्याकडे पाठवत राहतील.

(४) या राज्यात आणि इतर राज्यातील व तालुक्यातील व्यापारविषयक वाद निर्माण झाल्यास गोंडल राज्य सोडून इतर सर्व राज्यांची कागदपत्रे संबंधित अधिकाऱ्यांनी आझम करमचंद यांच्याकडे पाठवावी. व आझम करमचंद यांनी सरळ राज्याच्या सही शिक्यानिशी त्या राज्यांशी वा तालुक्यांशी पत्रव्यवहार करावा. त्याचबरोबर त्यांनी आमचा व्यापार जास्तीतजास्त वाढवायचा प्रयत्न करावा.

(५) सरळ आमच्याशी पत्रव्यवहार करावा असा आदेश दिलेला पत्रव्यवहार सोडून आम्ही दिलेल्या आदेशाप्रमाणे इतर सर्व पत्रव्यवहार आणि सर्व उत्तरे ही राज्याच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मुख्य प्रशासकाकडे पाठवावी व ते ती पत्रे आमच्याकडे आवश्यक वाटतील त्या ठिकाणी आपल्या शेऱ्यांसह आमच्याकडे पाठवतील व आमच्याशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे असे त्यांना ज्या प्रकरणी वाटेल ती प्रकरणं सोडून इतर सर्व प्रकरणी आपल्या सहीनिशी संबंधित राज्याविषयी वा तालुक्याविषयी योग्य ते आदेश सरळ काढतील.

(६) एखाद्या फर्मानाच्या अमलबजावणीसंबंधीचे आदेश सरळ आमच्यातर्फे काढण्यात येतील व त्याचप्रमाणे त्यांची उत्तरेही सरळ आमच्याकडे पाठवण्यात येतील.

(७) राज्याकडे पाठवावयाची सर्व मूळ निवेदनं इत्यादी आझम देवजी रावजी आणि इज्जत अशर जाधव.... कालजी यांच्याकडे पाठवण्यात येतील व त्यावरील टिप्पणी, शेरे आदींसह ते आझम करमचंद यांच्याकडे पाठवतील. आझम करमचंद मूळ निवेदनावर आपला शेरा लिहिणार नाहीत तर सोबत जोडण्यात आलेल्या अहवालावर आपला शेरा लिहितील व मग ते प्रत्यक्ष आमच्याकडे सादर करतील व जिथे आमच्या आदेशाची गरज असेल तिथे आमचे आदेश घेऊन उत्तर पाठवतील.

(८) नगरपालिकेचे जे हिशेब आमच्या सहीसाठी सादर करण्यात येतात त्यांच्यावर यापुढे आझम करमचंद सही करतील.

(९) नगरपालिकेच्या सचिवाच्या कार्यकक्षेत असलेल्या आदेशाविरुद्ध करण्यात आलेले अपील आणि त्यासंबंधीची मूळ तक्रार आझम करमचंद यांच्याकडे पाठवण्यात यावी. आझम करमचंद यांनी दिलेल्या आदेशामुळे कुणाचे समाधान न झाल्यास त्याला आपल्यासमोर हजर व्हायचा अधिकार राहील. त्यांच्या विभागातर्फे काढण्यात आलेले आदेश लोकांच्या माहितीकरिता प्रसृत करण्यात यावे.

(१०) आदेश देण्यात येत आहे की आमच्यासाठी राखून ठेवण्यात आलेली कागदपत्रे असलेल्या संपत्तीच्या गहाणखतांचे, विक्रीच्या दस्तावेजाचे काम आझम करमचंद पाहतील. परंतु ज्या संपत्तीची कागदपत्रे नाहीत त्यांच्या नोंदणीसाठी अटींचा आदेश आमच्याकडून मिळेपर्यंत नोंदणी करण्यात येऊ नये.

(११) भयात आणि मूळ गरशिया यांनी गरस, चौकशी समिती आणि तत्सम विषयाचे आपल्या अधिकाराबाबतचे सर्व अर्ज आझम करमचंद यांच्याकडे पाठवावे व ते अर्ज आपल्या टिप्पणींसह ते आमच्याकडे पाठवतील. या प्रकरणी आझम करमचंद यांना मदत करणारा आमच्या कार्यालयातील कारकून आमच्या कार्यालयाला व आझम करमचंद यांच्या कार्यालयाला या बाबतीत एकच समजेल.

ह्या आदेशाची प्रत माहितीसाठी आझम करमचंद, मुख्य न्यायाधीश, सरधार येथील पोलीस अधिकारी, रेसिडन्सीमधील कायदेशीर प्रतिनिधी, राजकीय प्रतिनिधीच्या कार्यालयातील कायदेशीर प्रतिनिधी, अधीक्षक (पोलीस), नगरपालिका सचिव, सर्व्हेअर, आणि राजकोट व कुवाडवा येथील सब इन्सपेक्टर यांना पाठवण्यात यावी व मग ती फाईल करण्यात यावी.

परिच्छेद ११ हा भयात मुख्य गरसिया यांना त्या त्या विभागातील अधिकाऱ्यांच्या सह्यानिशी कळवण्यात यावा.

दिनांक ७ नोव्हेंबर १८७६, राजकोट.

सही / ठाकोर श्री भावजी राज

राजकोट राज्य

फाईल दिनांक ९ - ११ - ७६

जी. एस. करमचंद उत्तमचंद

एम. के. राजकोट राज्य

राजकोट राज्य : परिपत्रक आणि शेरे असलेली फाईल

परिशिष्ट इ

काबा गांधी यांची वांकनेर राज्याच्या दिवाणपदी नियुक्ती

क्रमांक १२९

महाराजासाहेब श्री बानेसंगजी यांच्याकडून गांधी करमचंद ओतमचंद यांना, याद्वारे आपल्याला सूचित करण्यात येते की आमच्या राज्याचा प्रशासक म्हणून तुमची कारभारी पदी नियुक्ती करण्यात येत आहे. तुम्ही राज्याचे प्रशासन निष्ठापूर्वक आणि राज्याचा लाभ होईल व राज्याचे अधिकार वाढतील अशी रीतीने करावे.

तुमचा पगार दरमहा ६०० रुपये (सहाशे रुपये केवळ) ठरवण्यात येत आहे व हाच पगार पुढील पाच वर्ष तुम्हांला देण्यात येईल याची आम्ही जबाबदारी घेतो. जर हा काळ संपायच्या आधी तुम्हाला सेवेतून मुक्त करण्यात आले तर एका विश्वसनीय माणसाची तुम्हांला जमानत देण्यात येईल व त्याच्याकडून उरलेल्या काळाचा पगार तुम्ही वसूल करू शकाल. अशाप्रकारची कबुली देणारे वेगळे पत्र तुम्हाला जमानतदार लिहून देईल.

राज्याची प्रतिष्ठा वाढेल अशा प्रकारची सुधारणा तुम्ही न्यायव्यवस्थेत कराल. तुम्हांला वांकनेर राज्याच्या बाहेर राज्याच्या कामासाठी जावे लागेल. अशा कारणासाठी येणारा खर्च राज्य करील. यात प्रवासखर्च आणि नोकरावरील खर्चही अंतर्भूत असेल. प्रवासासाठी तुम्हांला राज्याकडून एक घोडागाडी उपलब्ध करून देण्यात येईल. तुमच्या राहण्याची योग्य व्यवस्था खोर्दा दरबारकडून करण्यात येईल.

रविवार, चैत्र वद्य एकादशी संवत १९३४

(महसूल विभागाच्या फाईल क्र. ५७, दप्तर क्र. १० साल १८७८, वांकनेरच्या हुजूर कार्यालयातून)

परिशिष्ट फ

वांकनेर राज्याच्या दिवाणपदाचा काबा गांधी यांनी दिलेलं राजीनामा पत्र

प्रति

सन्माननीय महाराजासाहेब

श्री बानेसंगजी, वांकनेर राज्य

मी आपल्याला खालील विनंती करू इच्छितो :

सन्माननीय महाराज साहेबांना माझ्या नियुक्तीच्या अटी विदित आहेतच. त्यामुळे त्या परत सांगून मी आपल्याला त्रास देऊ इच्छित नाही. स्वार्थी आणि कारस्थानी लोकांच्या सल्ल्यामुळे माझ्या या नऊ महिन्यांच्या नोकरीच्या काळात माझ्या तोंडी वा लेखी सूचनेकडे कोणतेही लक्ष दिलेले नाही. अखेरीस २९ डिसेंबरला माझ्या तक्रारी काय आहेत ते आपण मला लेखी द्यायला सांगितले. त्यामुळे मी या प्रकरणी ज्यांना तुम्ही लक्ष घालायला सांगितले त्या प्रतापसिंगजी गव्हरीदाद यांच्याकडे माझ्या तक्रारी सविस्तर कळवणारं रजिस्टर्ड पत्र पाठवले. परंतु महाराज साहेबांनी मी सुचवलेल्या उपाययोजनेपैकी कोणतीही उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे प्रशासन चालवण्यात येत असलेल्या अडचणींमुळे मला राजिनामा देणे भाग पडत आहे. तो आपण मंजूर करावा अशी आपल्याला प्रार्थना आहे. आपण तसे न केल्यास ९ ते १९ तारखेच्या दरम्यान मेघजी वा ज्या कुणाला आपण सांगाल त्याला कारभार सोपवून राजकोट येथे मी निघून जाईन.

बुधवार, पौष वद्य प्रतिपदा विक्रम संवत १९३५, इ.स. ८ जानेवारी १८७९

सही - फिदवी (आज्ञाधारक सेवक)

करमचंद उत्तमचंद

नम्र प्रार्थनेसह

वांकनेर

(गांधी करमचंद उत्तमचंद यांच्याशी संबंधित कागदपत्रांच्या फाईलमधून, फाईल क्रमांक ८४, दस्तावेज क्रमांक ११, संवत १९३५ इ. स. १८७७९, हुजूर कोर्ट वांकनेर राज्य)

परिशिष्ट ग

काबा गांधी यांच्याकडे राजकोटच्या दिवाणपदाचा कारभार परत सुपूर्द

एस.टी. आर.पी.ए. क्र. १/१८७९-८०

फाईल क्र. १

आदेश देण्यात आला होता की आझम करमचंद जर वांकनेर राज्यातून एक वर्षाच्या आत परतले तर त्यांना त्या कालावधीत आपल्या पूर्वपदावर परतायचा अधिकार राहील. आझम करमचंद आपल्या कारभारी या पदावर या कालावधीत परत आले आहेत त्यामुळे त्यांना आदेश देण्यात येतो की त्यांनी जटाशंकर यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार शक्य तितक्या लवकर सांभाळावा व तसे केल्याचा अहवाल द्यावा.

आझम जटाशंकर यांनी या राज्यात ११ महिन्यांपेक्षा अधिक काळ कारभारी पदावर काम केलेले आहे. ते या पदासाठी पात्र असल्याचे या कालावधीत आढळून आले आहे. हा आदेश आझम करमचंद आणि आझम जटाशंकर यांना दाखवण्यात यावा आणि राज्यातील सर्व विभागात प्रसृत करण्यात यावा; यासंबंधात आवश्यक पत्र सहायक राजकीय प्रतिनिधींना माहितीसाठी पाठवण्यात यावे. यासंबंधातील आझम करमचंद यांचे २५ फेब्रुवारीचे पत्र सोबत जोडलेले आहे.

सही

राजकोट राज्य

राजकोट, ४ एप्रिल १८७९

झराजकोट राज्याच्या कार्यालयीन आदेशाच्या हुजूर फाईलमधून, शेरे आणि परिपत्रक - १८७९-८० (पी. क्र. १३)

परिशिष्ट ह

अॅलन ऑक्टोव्हियन ह्यूम यांच्या पक्षीविद्याविषक कामासंबंधी एक टिपण

अॅलन ऑक्टोव्हियन ह्यूम यांनी भारत सरकारला भेट दिलेल्या आशियातील पक्षांशी संबंधित जगातील सर्वात मोठ्या पक्षीसंग्रहालयाची व वाचनालयाची भारतातील कोणत्याही स्रोताकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळू शकल्यामुळे मी ग्रंथपाल, इंडिया ऑफिस लायब्ररी, लंडन यांच्याकडे चौकशी केली. त्यांनी दिलेल्या खालील माहितीसाठी मी त्यांचा आभारी आहे :

त्यांनी (अॅलन ऑक्टोव्हियन ह्यूम) स्ट्रे फिदर म्हणून पक्षीविद्येला वाहिलेले मासिकही १८७२ साली काढले होते व त्याचं संपादन अनेक वर्षे केले होते. सिमला येथे २५ वर्षांच्या कालावधीत त्यांनी जे संग्रहालय तयार केले होते ते त्यांना १८७९ साली अलाहाबाद येथील महसूल बोर्डावर बदली झाल्यामुळे सोडावे लागले होते. अजूनही भारतातील पक्षीविद्याविषयक पूर्ण वेळ काम करता येईल अशी आशा बाळगत त्यांनी काही काळ आपले संग्रहालय भारत सरकारला दिले. परंतु १८८४ साली त्यांच्या हस्तलिखिताचा फार मोठा भाग चोरीला जाऊन नष्ट झाला. त्यामुळे आपले काम पूर्ण करता यायची त्यांची आशा मावळली. १८८५ साली त्यांच्या संग्रहालयातील ६३,००० पेंढा भरलेले पक्षी आणि १९,००० अंडी ब्रिटिश संग्रहालय, नैसर्गिक इतिहास, लंडनला भेट देण्यात आले. या देणगीचे स्वरूप इतके महत्त्वाचे होते की ब्रिटिश संग्रहालयाचे पक्षीविद्याविभाग प्रमुख डॉ. बौडलर शार्पे स्वतः सिमल्याला त्या देणगीचा स्वीकार करण्यासाठी आले.

ह्यूम यांच्या टिपणांचा जो भाग नष्ट झाला नव्हता तो त्यांनी ई. डब्ल्यू. ओट्स यांना भेट दिला. त्यांनी त्यांचा उपयोग ह्यूम याच्याच नेस्ट्स अँड एग्ज ऑफ इंडियन बर्ड्स या पुस्तकाच्या

दुसऱ्या आवृत्तीसाठी तसेच १८८९पासून प्रकाशनास सुरुवात झालेल्या फौना ऑफ ब्रिटिश इंडियाच्या खंडांसाठी केला.

ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम यांचे पक्षीविद्येवरील प्रकाशित ग्रंथ

(१) कॅटलॉग ऑफ बर्डस्, एग्ज, अँड नेस्ट्स, १९६८. (सिमला संग्रहालयाची सूची)

(२) माय स्क्रैप बुक : ऑर रफ नोट्स ऑन इंडियन झुऑलॉजी अँड ऑरिन्थोलॉजी, २ खंड, कलकत्ता, १८६९-७०

(३) द नेस्ट्स अँड एग्ज ऑफ इंडियन बर्ड्स, कलकत्ता, १८७३, दुसरी आवृत्ती, संपादक : ई. डब्ल्यू. ओट्स, ३ खंड, लंडन, १८८९-९०

(४) द इंडियन ऑरिन्थोलॉजी कलेक्टर्स व्हाडिमेइकम, लंडन, १८७४

(५) द लिस्ट ऑफ द बर्ड्स ऑफ इंडिया.... करेक्टेड टू १८७९, कलकत्ता, १८७९

(६) द गेम बर्ड्स ऑफ इंडिया, बर्मा अँड सिलोन, ३ खंड, कलकत्ता, १८७९-८१

तिसऱ्या क्रमांकाच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती सोडली तर इंडियन नॅशनल लायब्ररी कलकत्ता येथे सर्व पुस्तकांची नोंद करण्यात आलेली आहे.

(प्यारेलाल यांना इंडिया ऑफिस लायब्ररी, लंडनच्या वतीनं जे. एच. मॅकिलवेन यांनी पाठवलेले पत्र क्र. आय.ओ.एल./एफ९ दिनांक ५ सप्टेंबर १९६३)

परिशिष्ट ई

मतदान दुरुस्ती विधेयक, १८९४

(कायदा क्रमांक २५)

ज्याअर्थी आशियायी वंशाच्या लोकांना सांसदीय संस्थांसाठी मतदानाची सवय नसल्यामुळे मतदान विषयक कायदा दुरुस्त करून त्यातून त्यांना वगळायची आवश्यकता आहे,

त्यामुळे महाराणीसाहेबांनी विधान परिषद आणि विधान परिषद यांच्या सल्ल्यानुसार पुढील कायदा मंजूर करावा.

१. १८९३ च्या घटनेच्या कलम २२ अनुसार वा विधान सभेच्या निवडणुकीच्या कोणत्याही कायद्यानुसार आशियायी वंशाचे लोक आपले नाव कोणत्याही मतदानसूचीत घालायला पात्र राहणार नाहीत व त्यांना त्यासाठी मतदानाचा अधिकार राहणार नाही. त्यामुळे त्यांना परिच्छेद दोनमधून वगळण्यात येत आहे.

२. वर निर्देशित केलेल्या वर्गातील ज्या लोकांची नावे हा कायदा लागू व्हायच्या दिवशी वैधरित्या मतदारसूचीत असतील व इतर दृष्टींनी जे मतदार म्हणून पात्र असतील त्यांना कलम एकमधील तरतूद लागू होणार नाही.

३. हा कायदा नामंजूर करायचा महाराणीसाहेबांचा विचार नाही असे नाताळ सरकारच्या राजपत्रातून राज्यपाल घोषित करत नाहीत व त्यानंतर हा कायदा अमलात यायची राज्यपाल जी तारीख घोषित करतील त्या तारखेपासून हा कायदा अमलात येईल.

मतदान दुरुस्ती विधेयक, १८९६

(कायदा क्रमांक ८)

मतदानाशी संबंधित कायदा दुरुस्त करण्यासाठी :

मतदानाशी संबंधित कायदा दुरुस्त करणे आवश्यक असल्यामुळे महाराणी साहेबांनी विधान सभा आणि विधान परिषद यांच्या सल्ल्यानुसार हा कायदा मंजूर करावा.

१. १८९४चा कायदा क्रमांक २५ या अन्वये रद्द करण्यात येत आहे.

२. या कायद्याच्या परिच्छेद ३च्या अंतर्गत येणारे लोकसोडून (मूळ युरोपिअन वंशाचे नाहीत अशा) जे नेटिव्ह आहेत वा पुरुषाच्या बाजूने नेटिव्हांच्या वंशाचे आहेत वा ज्या देशात निवडणुकीच्या पद्धतीच्या संस्था नाहीत त्या व्यक्तींना राज्यपालांकडून या कायद्यातून सूट मिळाल्याचा पूर्वादेश मिळवल्याशिवाय निवड करणाऱ्या व्यक्तींच्या यादीत वा मतदारसूचीत आपले नाव नोंदवून घ्यायचा अधिकार नसेल वा १८९३च्या घटनेच्या कलम २२च्या अर्थांतर्गत मतदान करायचा अधिकार नसेल वा विधान सभेच्या निवडणुकीच्या कोणत्याही नियमाशी संबंधित मतदानाचा अधिकार नसेल.

३. वर निर्देशित केलेल्या वर्गातील ज्या लोकांची नावे हा कायदा लागू व्हायच्या दिवशी वैधरित्या मतदार सूचीत असतील व इतर दृष्टींनी जे मतदार म्हणून पात्र असतील त्यांना लागू होणार नाही त्या लोकांना या कायद्याच्या परिच्छेद दोनमधील तरतुदी लागू होणार नाहीत.

टीप :

दुरुस्तीनंतर कायदा असा असेल :

.....सांसदीय मतदानासाठी निवडणुकीद्वारे प्रतिनिधित्व करायच्या संस्था.....

परिशिष्ट ज

भारतीय बंधुआ मजुरांच्या भरतीची पद्धत आणि त्यानंतर त्यांना मिळणारी वागणूक

तोतारामजी सानंध्या हे माजी बंधुआ मजूर होते. फिजीमधून २१ वर्षांनंतर आपल्या पत्नीबरोबर परतल्यानंतर ते गांधीजींच्या साबरमती आश्रमात आले. ते तिथे आपल्या मृत्यूपर्यंत अनेक वर्षे राहिले. जो कोणी त्यांच्या सहवासात यायचा तो त्यांच्यावर प्रेम करायचा व त्यांच्याबद्दल आदर बाळगायचा. भरतीचे काम करणाऱ्या विवेकहीन लोकांनी आपल्याला कसं जाळ्यात पकडले याचे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात असे वर्णन केले आहे :

एके दिवशी प्रयाग येथील पोलीस स्टेशनजवळ माझ्या आर्थिक परिस्थितीची काळजी करत अतिशय चिंतित होऊन मी बसलेलो होतो तेव्हा एक अनोळखी माणूस आला व तुला नोकरी पाहिजे काय असे मला विचारू लागला. मी 'होय' असे उत्तरलो. तो म्हणाला की तुला आवडेल तशी नोकरी मी तुला पाहून देईन. मी त्याला म्हणालो की घरापासून सहा महिन्यांहून अधिक काळ दूर राहणे मला परवडणार नाही. तो म्हणाला की मला केव्हाही नोकरी सोडता येईल आणि घरी परतता येईल. त्याने जगन्नाथ पुरीला दर्शनासाठी जायचा विचार माझ्यासमोर मांडला. मी त्याच्यावर विश्वास ठेवला. त्याने मला त्याच्या घरी नेले. तिथे ओसरीच्या दोन वेगवेगळ्या भागात १०० माणसांनी आणि ६० बायांनी गर्दी केलेली होती. ओल्या लाकडांना पेटवायचा प्रयत्न करत ते चुलीवर भांड्यात अन्न शिजवायचा प्रयत्न करत होते. परंतु लाकडे पेटायचे नावच घेत नव्हती. तिथे बाया कशा काय असा प्रश्न मला पडला. त्या नक्कीच नोकरीच्या शोधात आलेल्या नसतील. मी चौकशी करायचा प्रयत्न केला परंतु दलालाने कठोरतेने त्यांच्याशी कोणतेही संभाषण करण्यापासून मला अडवले. आम्ही शब्दशः कैदेत होतो.... आमच्या जवळ जे काही असेल - पैसा, भांडीकुंडी, बिछाना वगैरे - ते सर्व सुरक्षित ठेवण्यासाठी दलालाने त्याच्याजवळ जमा करायला सांगितले. हो-नाही करत तो म्हणाला तसे आम्ही केले.

दुसऱ्या दिवशी कायदेशीर प्रक्रियेकरिता न्यायालयात नेत असताना न्यायाधीश जे काही म्हणेल त्याला होय म्हणायचे म्हणून आम्हांला शिकवण्यात आले. तसे न केल्यास आमच्यावर खटला चालवून न्यायाधीश आम्हांला तुरुंगात पाठवील असेही सांगण्यात आले. तुमची फिजीला जायची तयारी आहे काय असा न्यायाधीशांनी आम्हांला केवळ एक प्रश्न विचारला. फिजी कुठे आहे, तिथे गेल्यानंतर आम्हाला काय करायचे आहे व आम्ही नकार दिला तर काय शिक्षा आहे ते आम्हांला काहीही सांगण्यात आले नाही. १६५ लोकांची प्रकरणे निपटवायला न्यायाधीशाला केवळ २० मिनिटे लागली.... त्यानंतर आप्रवासी लोकांना गोळा करण्यात आलेल्या ठिकाणावर नेण्यासाठी आम्हांला रेल्वेत बसवण्यात आले. रस्त्यात कुणाशीही बोलायची वा संपर्क करायची आम्हांला सक्त मनाई करण्यात आली होती. आप्रवासी अधिकाऱ्याने आम्हांला सांगितले की फिजी आम्हांला खरोखरीचा स्वर्ग असल्यासारखा भासेल. आमच्यापैकी कोणाजवळ पैसाअडका वा इतर काही सामान आहे काय असे अखेरीस त्याने आम्हांला विचारले. आमच्यामागे उभ्या असलेल्या दलालानं या प्रश्नाचे काहीच उत्तर न द्यायची खूण केली. परंतु न्यायाधीश जसे न्यायालयातून निघाले तसा तो दलालही नाहीसा झाला. त्यानंतर त्याचा चेहरा आणि आमचे सामान आम्हांला कधीही दिसले नाही.

..... पुढे विचार करताना मला वाटायला लागले की दूरच्या प्रदेशात ५ वर्षे काम करण्यासाठी बांधून घेण्यात मी चूक केली आहे.... मी अधिकाऱ्याला सांगितले की मला फिजीला जायचे नाही. अधिकाऱ्याने मला दोन बंगाली कारकुनांकडे 'माझे मन वळवण्यासाठी' पाठवले.... माझा निर्धार पक्का असल्याचे आढळल्यानंतर त्यांनी मला एका खोलीत कोंडले व माझी असहायता माझ्या लक्षात येऊन मी कबुली देईपर्यंत अन्न-पाण्यावाचून ठेवले.

दुसरा बळी एक शाळेतील मुलगा होता. त्याला नाताळसाठी भरती करण्यात आले होते. त्यानेही अशाच प्रकारचा अनुभव लिहून ठेवला आहे :

आम्ही घरचे सुखवस्तू लोक होतो. मी इंग्रजी शाळेत शिकत होतो. एके दिवशी माझ्या शाळेतील काही मित्रांबरोबर आंघोळीला जात असताना मी त्यांच्यापासून वेगळा पडलो. मी त्यांना शोधत असतानाच एका अनोळखी माणसाने मला हाक मारली. मला नोकरी पाहिजे काय म्हणून त्याने मला विचारले..... 'कशा प्रकारची नोकरी?' मी विचारले. तो म्हणाला की समुद्राचा गार वारा घ्यायची, या जगाच्या मालकाजवळ राहायची व माझ्या आईवडिलांकडे श्रीमंत माणूस म्हणून परतायची संधी मी सोडली तर मी मूर्ख ठरेन.... माझी फसवणूक झाली.... त्याने मला त्याच्या घरी नेले आणि तिथे कोंडून ठेवले. अचानक माझ्या नजरेला तिथे दाराला चिकटवलेली एक नोटीस पडली. तिच्यात लिहिलेले होते की इथे नाताळ, त्रिनीदाद आणि फिजीसाठी मजुरांची भरती करण्यात येते. दलाल परत आला तेव्हा मी त्याला सांगितलं की मला मजूर म्हणून नोकरी करायची नाही व माझी पुस्तकं वगैरे परत कर असे मी त्याला म्हणालो. त्याने मला कारण विचारले. मी त्याला दारावर चिकटवलेली नोटीस दाखवली. तो संतापला आणि म्हणाला की एखाद्या बदमाशाने ती तिथे चिकटवली असावी. मी जेव्हा माझा हट्ट कायम ठेवला तेव्हा तो म्हणाला की मला तिथे आणण्यासाठी आलेला भाड्याचा खर्च मी त्याला परत करायला पाहिजे आणि बदल्यात माझ्या थोबाडीत मारली.... मला धक्काच बसला. मला न्यायाधीशाकडे नेण्यात आले आणि अनेक धमक्या देऊन मला सांगण्यात आले की मला केवळ 'होय साहेब' एवढेच म्हणायचे आहे. घाबरलेलो असल्यामुळे मला जसे सांगण्यात आले होते तसेच मी म्हणालो. मला कोलकाताला नेण्यात आले व कोंडून ठेवण्यात आले. नैसर्गिक विधीसाठी बाहेर जायचीही मला सूट नव्हती. मी स्वतंत्र माणूस आहे अशी तक्रार मी केली. मला सांगण्यात आले की माझी परिस्थिती कैद्यापेक्षाही वाईट आहे. मी ओक्साबोक्शी रडू लागलो. दुसऱ्या दिवशी तो दलाल माझे कपडे आणि पुस्तके घेऊन गायब झाला. मी त्याला वा माझ्या सामानाला कधीच परत पाहिले नाही.

बंधुआ मजुरांना ठेवायच्या ठिकाणी आणि समुद्र प्रवासात बंधुआ मजुरांना मिळणाऱ्या वागणुकीविषयी तोतारामजी लिहितात :

मला कोंडून ठेवण्यात आलेल्या खोलीतून मी बाहेर पडल्यानंतर माझ्यासारख्या भरती झालेल्या मजुरांना काशाच्या घाणेरड्या भांड्यात अन्न वाढलेले असल्याचे मला आढळले. तक्रार करणारांना मारहाण करण्यात आली.... कैदी घालतात तसे कपडे त्यांना देण्यात आले.... बायांची तपासणी पुरुष डॉक्टर करत होते. वैद्यकीय तपासणीनंतर विविध वयातील सर्व आप्रवाशांना दाटीवाटीने डेकखाली जनावराप्रमाणे तारेने विभागणी केलेल्या दोन स्वतंत्र कप्प्यात गोळा करण्यात आले. जहाजाच्या मागील बाजूचा डेकचा भाग स्त्रियांसाठी राखीव होता. प्रत्येकाला देण्यात आलेली जागा दीड फूट बाय सहा फूट मोठ्या मुश्किलीनं असावी. आम्हांला काही त्रास होतो की काय हे पाहणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने तक्रार करणारांना सांगितले जे काही आम्हांला मिळते त्यात आम्हांला समाधान मानावे लागेल. अशा रीतीनं आम्हा सर्वांना जागा देण्यात आल्यानंतर आमच्यापैकी प्रत्येकाला ४-४ कुत्र्याची बिस्किटं देण्यात आली. ती इतकी कडक होती की पाण्यात भिजवल्याशिवाय आमच्यापैकी कुणालाच ती चावणे शक्य नव्हते. प्यायला केवळ पाच औंस प्यायचे पाणी देण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळीच आमच्यापैकी काहींना जहाजाच्या अधिकाऱ्याने गॅलीच्या भागात स्वयंपाक करायला पाठवले व इतरांवर लक्ष ठेवायची जबाबदारी आमच्यावर सोपवण्यात आली, जे उरले होते त्यांना जहाजावरील संडास साफ करायला सांगण्यात आले. ज्यांनी नकार दिला त्यांना चोप देण्यात आला व हुकुमाप्रमाणे वागायला भाग पाडण्यात आले. प्रत्येकाला काहीही झाले तरी एका बाटलीपेक्षा अधिक प्यायचे पाणी देण्यात येत नसे. भात आणि मासे हेच अन्न वाढण्यात येत असे. अनेकांना समुद्राच्या व इतर आजारांची लागण होऊन मृत्यू आला.

* * * * *